# Journal of Research and Development


***A Multidisciplinary International Level***

*Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access Journal*

*ISSN: 2230-9578* *May- 2025* *Volume-17 Issue-5 (II)*





**Website: https://jrdrvb.org** **Chief Editor: Prof. Ramesh V. Bhole**

# MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL JOURNAL

Website: https://jrdrvb.org



JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT

ISSN: 2230-9578

May - 2025

Volume-17 Issue-5(II)

**Please Get in Touch**

Email: jrdrvb.org@gmail.com

Mob: +91-9552416001,+91- 8888454089

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May- 2025

# Journal of Research and Development

***A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal***

***May-2025 Volume-17 Issue-5(II)***

## Chief Editor

Prof. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102



| EDITORIAL BOARD | | |
|---|---|---|
| ***Nguyen Kim Anh*** ***[Hanoi] Virtnam*** | ***Prof. Andrew Cherepanow*** *Detroit, Michigan [USA]* | ***Prof. S. N. Bharambe*** *Jalgaon[M.S]* |
| ***Dr. R. K. Narkhede*** ***Nanded [M.S]*** | ***Prof. B. P. Mishra,*** *Aizawal [Mizoram]* | ***Prin. L. N. Varma*** *Raipur [C. G.]* |
| ***Dr. C. V. Rajeshwari*** ***Pottikona [ AP]*** | ***Prof. R. J. Varma*** *Bhavnagar [Guj]* | ***Dr. D. D. Sharma*** *Shimla [H.P.]* |
| ***Dr. AbhinandanNagraj*** ***Benglore[Karanataka]*** | ***Dr. VenuTrivedi*** *Indore[M.P.]* | ***Dr. ChitraRamanan*** *Navi ,Mumbai[M.S]* |
| ***Dr. S. T. Bhukan*** ***Khiroda[M.S]*** | ***Prin. A. S. KolheBhalod*** *[M.S]* | ***Prof.KaveriDabholkar*** *Bilaspur [C.G]* |



**Published by**-Chief Editor, Prof. R. V. Bhole, (Maharashtra)

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II)|May - 2025



| Sr. No. | CONTENTS | Page No. |
|---|---|---|
| 1 | शाश्वत पर्यावरण आणि नवीन शैक्षणिक धोरण<br>प्रा.डॉ.एन.एस.गिरडे | 1-3 |
| 2 | गुणवत्तापूर्ण और समावेशी शिक्षा के लिए वैश्विक दृष्टिकोण: एक गुणात्मक एवं मात्रात्मक विश्लेषण<br>Ms. Swatti Chowdhary | 4-6 |
| 3 | भोसलेकालीन नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासामध्ये संतांचे योगदान<br>राजेंद्र मारोती गहाणे, डॉ. श्रीकांत एम .सोनटक्के | 7-10 |
| 4 | कृत्रिम बुद्धिमत्ता आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम<br>प्रा. उदय जाधव | 11-16 |
| 5 | स्त्री सक्षमीकरण आणि समतोल समाजाची निर्मिती<br>डॉ. मनोहर आनंद गुडधे | 17-20 |
| 6 | राष्ट्राच्या आर्थिक विकासात उद्योजकतेचे महत्व<br>प्रा.डॉ. श्रीकृष्ण बी.बोढे | 21-24 |
| 7 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर: दलित स्वातंत्र्याचा ऐतिहासिक टप्पा - एक विष्लेषणात्क अध्ययन<br>श्री. संजय चंद्रभान मेश्राम प्रा. डॉ. विठ्ठल चव्हाण | 25-29 |
| 8 | पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि समाज यांच्यावर प्रभाव<br>प्रा.योगेश कांचन खंडेराव पाटील | 30-32 |
| 9 | शिक्षणाच्या जागतिकीकरणाचे महत्त्व<br>डॉ. एकनाथ दत्तात्रय वाजगे. | 33-35 |
| 10 | जडवादी चार्वाक दर्शनाचे विश्लेषण<br>डॉ. गोरोबा तुकाराम खुरपे | 36-39 |
| 11 | प्रधानमंत्री मुद्रा योजना : एक विश्लेषणात्मक अध्ययन<br>डॉ. महेंद्र पांडुरंगजी गावंडे | 40-47 |
| 12 | एकल व सांघिक खेळ खेळणाऱ्या विद्यापीठ स्तरावरील पुरुश खेळाडूंच्या खांद्याच्या दुखापतींचा तुलनात्मक अभ्यास<br>शिशिर दिलीपराव चौधरी , अनिल पुरूशोत्तम चरडे | 48-51 |
| 13 | प्रधानमंत्री आवास योजनेचा आढावा<br>राजेश्वर वारलु काकडे ,डॉ. विठ्ठल एन. ठावरी | 52-57 |
| 14 | पर्यावरण दुष्टया कृषकोन्नती बाबत राष्ट्रसंत तुकडोजींचे विचार<br>डॉ. दिनकर रामेष्वर चौधरी | 58-60 |
| 15 | तंजावर मराठा साम्राज्य : एक ऐतिहासिक अध्ययन<br>अमितकुमार गणेश शिंगणे | 61-65 |
| 16 | मराठी साहित्यातील स्त्रीवाद व स्त्रीवादी प्रवाह<br>कीर्ती महादेव सेलोकर , डॉ. उज्ज्वला वंजारी | 66-71 |
| 17 | नाशिकराव तिरपुडे यांचे पर्यावरण विषयक धोरण<br>कु. चंद्रकला शालिकराम गजभिये , प्रा.डॉ. एन.एस. गिरडे | 72-73 |
| 18 | भारताची राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 मध्ये शिक्षणाच्या मूल्यांचे मूल्य महमांसा<br>योगेश खंडेराव पाटील | 74-79 |
| 19 | महात्मा गांधीचे सत्य आणि अहिंसा संबंधी विचार काळाची प्रासंगिकता<br>प्रा.डॉ. प्रमिला डी. भोयर | 80-83 |
| 20 | कृषीच्या शाश्वत विकासावर हवामान बदलाचा होणारा परिणाम<br>प्रा. डॉ. सरवदे एम. पी. | 84-88 |
| 21 | मराठी कवितेत सामाजिक-सांस्कृतिक संदर्भातून प्रकटणारे मातृत्व आणि पितृत्वाचे स्वरूप.<br>डॉ. संजय जनार्दन आगलावे | 89-93 |
| 22 | हरित तंत्रज्ञान आणि पुनर्नवीनीकरण उर्जा<br>ज्ञानेश्वर बापूराव जांभुळे | 94-97 |

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II)|May - 2025


| | | |
|---|---|---|
| 23 | प्रा.फौजिया खान यांचे जीवन व कार्याचा अभ्यास<br>प्रा. डॉ. सौ. विभा प्र.देशपांडे , अरुण लक्ष्मीनारायण धकाते | 98-102 |
| 24 | कवी आनंद गायकवाड:- आंबेडकरी चळवळीतील एक उत्तुंग व्यक्तिमत्व.एक षोधनिबंध<br>गोपाल श्रीकृश्णाजी मून | 103-107 |
| 25 | पर्यावरणीय आव्हाने आणि उपाययोजना<br>प्रा. डॉ. विठ्ठल निळकंठ ठावरी | 108-113 |
| 26 | महाविद्यालयीन मुली आणि मुलांची भावनिक बुद्धिमत्ता, लवचिकता यामधील सहसंबंध<br>डॉ.मिलिंद भगवानराव बचुटे | 114-116 |
| 27 | मराठी विज्ञान साहित्याची भविष्यकालीन वाटचाल आणि कृत्रिम बुद्धिमत्ता<br>प्रा.डॉ.कोमल वि ठाकरे | 117-121 |
| 28 | "सदानंद देशमुख यांची कादंबरी ' बारोमास ' ,'तहान' ,'चारीमेरा ' यातील कथानक संदर्भात....<br>गीतांजली बाबुरावजी सातपुते. | 122-126 |
| 29 | **भारत की राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 में शिक्षा के मूल्यों का मूल्यमीमांसा**<br>**Pinki Rani, Dr. Bharti Kumari** | 127-132 |
| 30 | मानव आणि पर्यावरण<br>डॉ. वंदना वा. चरडे | 133-136 |
| 31 | “लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून महिला सबलीकरण एक अध्ययन” (परिक्षेत्र:मधुबन कॉलनी, पंचवटी,नाशिक.<br>प्रा.चंद्रप्रभा निकम | 137-145 |
| 32 | महाराष्ट्रातील पहिल्या महीला आयपीएस डॉ.मीरा चढढा-बोरवणकर यांच्या स्वकथनातून व्यक्त होणाऱ्या स्त्रीवादी जाणीवा<br>धीरजकुमार रामदास नंदागवळी, डॉ. प्रवीण बळीरामजी काळे | 146-149 |
| 33 | आधुनिक काळातील नाविन्यपूर्ण उद्योजकतेच्या स्थितीचे आर्थिक अध्ययन<br>कु. शुभांगी भगवानजी राऊत , डॉ. विठ्ठल मा. घिनमिने | 150-155 |
| 34 | भारतातील भाववाढीचा चिकीत्सक अभ्यास<br>अमृता करवंदे | 156-158 |
| 35 | नागपूर विभागातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यक्षमतेचे आर्थिक विश्लेषण<br>श्री. अमोल विठोबाजी भगत, प्रा. डॉ. सुनिल शिंदे | 159-163 |
| 36 | अंतराळ संशोधन आणि विज्ञानातील नवी क्षितिजे<br>प्रा.डॉ. सुनंदा चरडे | 164-167 |
| 37 | "स्त्री सक्षमीकरण आणि शाश्वत विकासाकडे महाराष्ट्राची वाटचाल"<br>कु. शिल्पा मधुकर रामटेके | 168-176 |
| 38 | तंत्रज्ञान आधारित आरोग्यसेवा प्रणालीचा अभ्यास<br>डॉ. जिजाबाई राऊत | 177-180 |
| 39 | योगाचे मानसशास्त्र - एक चिंतन<br>डॉ. राजेंद्र जाणे | 181-183 |

JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT ISSN: 2230-9578

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# शाश्वत पर्यावरण आणि नवीन शैक्षणिक धोरण

**प्रा.डॉ.एन.एस.गिरडे**

कला व वाणिज्य महाविद्यालय, भिसी

Email: girdenss@gmail.com

**Manuscript ID:**

JRD -2025-170501

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 5(II)|

Pp. 1-3

May 2025

**Submitted:** 02 Apr. 2025

**Revised:** 08 Apr. 2025

**Accepted:** 23 May. 2025

**Published:** 31 May. 2025

**प्रस्तावना**

पर्यावरण शाश्वतता ही २१ व्या शतकातील सर्वात गंभीर आणि आवश्यक बाब ठरली आहे. वाढती लोकसंख्या, शहरीकरण, आणि नैसर्गिक संसाधनांचा अमर्याद उपसा यामुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. जागतिक तापमानवाढ, जीवसृष्टीचा –हास, वायू, जल आणि मृदा प्रदूषण, तसेच जलस्रोतांची अनियमितता यांसारख्या समस्यांनी आज संपूर्ण मानवजातीसमोर मोठे आव्हान निर्माण केले आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धनासाठी तातडीने उपाययोजना करणे अनिवार्य बनले आहे.

र्यावरणीय शाश्वततेसाठी शिक्षणाची भूमिका केवळ समस्या मांडणे आणि त्यावर उपाय सांगणे एवढ्यावर मर्यादित नाही, तर त्यातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची सवय आणि मानसिकता तयार करणे गरजेचे आहे. छम्च यामध्ये स्थानिकता, जागतिक दृष्टिकोन, आणि सामूहिक जबाबदारी यांचा समतोल साधण्यात आला आहे. धोरणामध्ये पर्यावरण शिक्षणासाठी शाळांमध्ये प्रकल्प आधारित शिक्षण, हरित शाळा अभियान, आणि विद्यार्थ्यांसाठी स्थानिक स्तरावरील समस्यांवर काम करण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे.

पर्यावरणीय शाश्वततेसाठी शिक्षणाची भूमिका केवळ समस्या मांडणे आणि त्यावर उपाय सांगणे एवढ्यावर मर्यादित नाही, तर त्यातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची सवय आणि मानसिकता तयार करणे गरजेचे आहे. छम्च यामध्ये स्थानिकता, जागतिक दृष्टिकोन, आणि सामूहिक जबाबदारी यांचा समतोल साधण्यात आला आहे. धोरणामध्ये पर्यावरण शिक्षणासाठी शाळांमध्ये प्रकल्प आधारित शिक्षण, हरित शाळा अभियान, आणि विद्यार्थ्यांसाठी स्थानिक स्तरावरील समस्यांवर काम करण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे.

**पर्यावरण शाश्वतता म्हणजे काय ?**

पर्यावरण शाश्वतता म्हणजे नैस संसाधनांचा असा वापर करणे, ज्यामुळे सध्याच्या आणि भविष्यातील पिढ्यांस संसाधने टिकून राहतील. या संकल्पनेचा मुख्य आधार म्हणजे मानवाची गरज भागवताना पर्यावरणाचा ऱ्हास टाळणे आणि जैवविविधतेचे रक्षण करणे.

**पर्यावरण शाश्वततेची तत्त्वे**

१. पर्यावरणीय संतुलनः नैसर्गिक परिसंस्था टिकवणे, त्यातील घटकांमध्ये तोल राखणे.
२. नैसर्गिक संसाधनांचा संवर्धनात्मक उपयोगः पाणी, माती, जंगल, इंधन यांचा जबाबदारीने वापर.
३. कचऱ्याचे व्यवस्थापनः पुनर्वापर, पुनर्वसन, आणि जैविक कचऱ्याचे खतामध्ये रूपांतर.
४. जैवविविधतेचे संवर्धनः वन्यजीव, वनस्पती, आणि इतर जीवसृष्टीचे रक्षण करणे.

५.कार्बन उत्सर्जन कमी करणेः हरितगृह वायूंच्या उत्सर्जनाला आळा घालणे.[2]

**पर्यावरण शाश्वततेचे घटक**

अ. आर्थिक शाश्वतता संसाधनांचा असा उपयोग करणे, जो अर्थव्यवस्थेस चालना देईल, पण पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही.
ब. सामाजिक शाश्वतताः समाजातील प्रत्येक घटकाला पर्यावरण रक्षणासाठी सहभागी करून घेणे.
क. परिसंस्था शाश्वतताः नैसर्गिक परिसंस्थांचा समतोल राखणे. उदाहरणः नदी संवर्धन उपक्रम, ऊर्जेच्या

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**

*प्रा. डॉ एन एस गिरडे , कला व वाणिज्य महाविद्यालय भिसी*

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.15817205

OPEN ACCESS

**How to cite this article:**

*गिरडे, . एन . एस . (2025). शाश्वत पर्यावरण आणि नवीन शैक्षणिक धोरण. Journal of Research & Development, 17(5(II)), 1–3. https://doi.org/10.5281/zenodo.15817205*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

पुनर्नवीकरणीय साधनांचा वापर.[3]

**पर्यावरण शाश्वततेची गरज का आहे?**

१. पर्यावरणीय संकटेः वायुप्रदूषण, जलप्रदूषण, हवामान बदल आणि जंगलतोड यामुळे परिसंस्थांना धोका निर्माण झाला आहे.
२. मानवी जीवनावर होणारे परिणामः अन्नसुरक्षा, आरोग्याच्या समस्या, आणि नैसर्गिक आपत्तींची वाढ.
३. भविष्यासाठी जबाबदारीः सध्या संसाधनांचा अपव्यय केल्यास भविष्यातील पिढ्यांना त्यांचा अभाव भासेल.[4]

**पर्यावरण शाश्वततेसाठी उपयोजना**

१. शाश्वत विकासाच्या धोरणांची अंमलबजावणी
२. पुनर्नवीकरणीय ऊर्जा स्रोतांचा उपयोग.
३. पर्यावरण शिक्षणाद्वारे जनजागृती.
४. वृक्षारोपण आणि जलसंधारणाचे कार्यक्रम.[5]

**नवीन शैक्षणिक धोरणातील पर्यावरण शाश्वततेचे महत्त्व**

नवीन शैक्षणिक धोरण 2020 पर्यावरणीय साक्षरतेवर भर देते. विद्यार्थ्यांना पर्यावरण शाश्वततेची संकल्पना शिकवून ते सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीसाठी तयार करण्यावर जोर दिला जातो. नवीन शैक्षणिक धोरण (छम्च्) 2020 मध्ये पर्यावरण विषयाशी संबंधित विविध उपायांचा समावेश केला आहे, ज्याचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय जागरूकता निर्माण करणे, शाश्वत विकासाचे तत्त्वज्ञान रुजवणे, आणि कृतीशील पर्यावरणीय साक्षरता वाढवणे आहे. या धोरणातील महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

**१. पर्यावरण शिक्षणाचा समावेश**

छम्च्–2020मध्ये पर्यावरण शिक्षणावर भर देत, शालेय व महाविद्यालयीन पातळीवर पुढील उपाय सुचवण्यात आले आहेतः

अ) नवीन अभ्यासक्रम रचनाः पर्यावरण साक्षरता आणि शाश्वत विकासाचे मुद्दे मुख्य अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले आहेत.
ब) प्रायोगिक शिक्षणः विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवर निसर्ग संवर्धन आणि परिसंस्था समजून घेण्यासाठी प्रकल्प दिले जातील.
क) कला आणि विज्ञानाचा समन्वयः पर्यावरणीय आव्हानांवर शास्त्रज्ञ, कलाकार, आणि सामाजिक कार्यकर्त्यांद्वारे मार्गदर्शन.[6]

**2. सामाजिक आणि स्थानिक उपक्रम**

छम्च्–2020 स्थानिक पर्यावरणीय समस्यांवर लक्ष केंद्रित करतेः

स्थानिक परिसंस्था अभ्यासः विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरातील जलस्रोत, जैवविविधता,आणि पर्यावरणीय समस्यांचा अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. पर्यावरणीय सेवाभावी कामे विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण, स्वच्छता मोहिमा, आणि जलसंधारण यांसारख्या उपक्रमांमध्ये सहभागी होणे अपेक्षित आहे.

**2.शाश्वत विकास उद्दिष्टांसोबत संलग्नता**

छम्च्–2020 संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी सुसंगत आहे. पर्यावरण संरक्षणाचे तत्त्वज्ञान आणि हरित ऊर्जा विषयक शिक्षणाचा समावेश. प्लास्टिक टाळण्यासाठी शाळा–कॉलेज स्तरावर जागरूकता मोहिमा.

**3.शिक्षक प्रशिक्षण**

पर्यावरण साक्षरता कार्यक्रमः शिक्षकांना पर्यावरण शिक्षणावर विशेष प्रशिक्षण दिले जाईल. कुशलता विकासः शिक्षकांना विद्यार्थ्यांना शाश्वत जीवनशैलीचा प्रचार करण्यासाठी योग्य कौशल्ये दिली जातील.

**4. हरित शाळा उपक्रम**

छम्च्–2020 मध्ये शाळांना हरित शाळा म्हणून विकसित करण्याचा उपक्रम आहेः हरित तत्त्वांचा अवलंब, जसे की सौरऊर्जा, जलसंधारण प्रणाली, आणि कचरा व्यवस्थापन. शाळा परिसरात पर्यावरणीय मैत्रीपूर्ण पद्धती राबविणे.[7]

**उपाय योजना**

1) शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात पर्यावरण शिक्षण समाविष्ट करणे.
2) शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना स्थानिक पर्यावरणीय समस्या सोडवण्यासाठी प्रोत्साहन देणे.
3) शिक्षकांसाठी विशेष पर्यावरण शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रम राबवणे.
4) शाश्वत विकासासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग.[8]

**निष्कर्ष**

नवीन शैक्षणिक धोरणात पर्यावरणीय शाश्वततेला प्राधान्य दिले आहे, ज्यामुळे विद्यार्थी केवळ पर्यावरणाबाबत जागरूक होत नाहीत, तर त्याचे संवर्धन करण्यासाठी सक्रिय पाऊले उचलतात. यामुळे सध्याच्या आणि भविष्यातील पिढ्यांसाठी शाश्वत जीवनशैली घडवणे शक्य होईल.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**तळटिप**

1) विभुते प्रा.डॉ. भालबा, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चिकित्सा, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, 6 जानेवारी 2022
2) नवीन शैक्षणिक धोरण 2020 संदर्भ दस्तऐवज.
3) पर्यावरण शिक्षण आणि शाश्वत विकासावरचे शैक्षणिक जर्नल्स.
4) चौबे,एस. पी, भारतीय शिक्षणाचा इतिहास आणि समस्या, विनोद पुस्तक मंदिर. आग्रा. 1988
5) सिंग व्ही.एन., भारतातील शिक्षणः पूर्वीच्या काळापासून आजपर्यंत, व्हिस्टा इंटरनॅशनल पब्लिशिंग हाऊस नवी दिल्ली,2005
6) कित्ता
7) नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 एक चिकित्सक अभ्यास अंमलबजावणीच्या शिफारशीसह, सहित वितरण बुक्स पुणे, 1 जानेवारी 2020
8) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, शिक्षण मंत्रालय

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# गुणवत्तापूर्ण और समावेशी शिक्षा के लिए वैश्विक दृष्टिकोण: एक गुणात्मक एवं मात्रात्मक विश्लेषण

**Ms. Swatti Chowdhary**
Designation-Assistant Professor Department-EducationUniversity- Lingaya's Vidyapeeth
**Email**: swatichaudhary.delhi@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170502
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 4-6
May 2025
**Submitted:** 02 Apr. 2025
**Revised:** 08 Apr. 2025
**Accepted:** 23 May. 2025
**Published:** 31 May. 2025

## सारांश

यह शोधपत्र गुणवत्तापूर्ण और समावेशी शिक्षा (Quality and Inclusive Education) की वैश्विक स्थिति का विश्लेषण करता है। इसमें यूनाइटेड नेशंस सस्टेनेबल डेवलपमेंट गोल (SDG-4) के अंतर्गत शिक्षा की गुणवत्ता और समावेशिता को सुनिश्चित करने के लिए अपनाई गई नीतियों, चुनौतियों और प्रगति का गुणात्मक और मात्रात्मक विश्लेषण किया गया है। अध्ययन में विभिन्न देशों की तुलना कर यह समझने का प्रयास किया गया है कि शिक्षा के क्षेत्र में वैश्विक असमानताएँ किस प्रकार मौजूद हैं और उन्हें दूर करने के लिए कौन से सफल मॉडल कार्य कर रहे हैं।

## प्रस्तावना

शिक्षा न केवल व्यक्ति के बौद्धिक विकास का माध्यम है, बल्कि यह सामाजिक समावेशन, आर्थिक विकास और लैंगिक समानता का भी आधार है। संयुक्त राष्ट्र का सतत विकास लक्ष्य 4 (SDG-4) सभी के लिए समावेशी और न्यायसंगत गुणवत्तापूर्ण शिक्षा सुनिश्चित करने और आजीवन सीखने के अवसरों को बढ़ावा देने पर बल देता है।

## 1.शोध की आवश्यकता और उद्देश्य

### 2.1 आवश्यकता:

1) वैश्विक असमानता की पृष्ठभूमि में गुणवत्तापूर्ण शिक्षा की स्थिति का मूल्यांकन।
2) समावेशी शिक्षा के लिए नीति और व्यावहारिक बाधाओं की पहचान।

### 2.2 उद्देश्य:

1) विभिन्न देशों में गुणवत्तापूर्ण शिक्षा की स्थिति का मूल्यांकन करना।
2) समावेशी शिक्षा के वैश्विक मॉडल्स की तुलना करना।
3) शिक्षा क्षेत्र में सामाजिक, आर्थिक, और लैंगिक कारकों की भूमिका को समझना।

## 2 अनुसंधान पद्धति

### 2.1गुणात्मक दृष्टिकोण :

1) केस स्टडी: फ़िनलैंड, भारत, केन्या, और ब्राज़ील की शिक्षा प्रणालियों की समीक्षा।
2) साक्षात्कार: शिक्षाविदों, नीति निर्माताओं और छात्रों से संवाद।
3) नीति विश्लेषण: UNESCO, UNICEF, और World Bank के रिपोर्टों की समीक्षा।

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*Ms. Swatti Chowdhary Designation-Assistant Professor Department-EducationUniversity-Lingaya's Vidyapeeth*

**How to cite this article:**
*Chowdhary, S. (2025). गुणवत्तापूर्ण और समावेशी शिक्षा के लिए वैश्विक दृष्टिकोण: एक गुणात्मक एवं मात्रात्मक विश्लेषण. Journal of Research & Development, 17(5(II)), 4–6. https://doi.org/10.5281/zenodo.15817228*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817228
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**2.2 मात्रात्मक दृष्टिकोण:**

1) डेटा स्रोत: UNESCO Institute for Statistics (UIS), World Bank Education Data.
2) मापदंड:
a) साक्षरता दर
b) नामांकन दर (Enrollment Rate)
c) ड्रॉपआउट रेट
d) शिक्षा पर सकल घरेलू उत्पाद (GDP) का व्यय
e) लैंगिक समानता सूचकांक (Gender Parity Index)

**3. विश्लेषण और निष्कर्ष**

**3.1 गुणात्मक विश्लेषण:**

1) फ़िनलैंड में शिक्षक प्रशिक्षण और सामुदायिक भागीदारी के कारण उच्च शिक्षा गुणवत्ता।
2) भारत में शिक्षा का विस्तार हुआ है, लेकिन ग्रामीण क्षेत्रों में समावेशिता की कमी।
3) ब्राज़ील में लिंग और नस्लीय समानता को बढ़ावा देने की पहलें।
4) केन्या में डिजिटल शिक्षा मॉडल का उभरता हुआ प्रभाव।

**3.2 मात्रात्मक विश्लेषण (2015–2023):**

| देश | साक्षरता दर | नामांकन दर | ड्रॉपआउट रेट | GDP शिक्षा व्यय (%) | GPI |
|---|---|---|---|---|---|
| फ़िनलैंड | 99% | 98% | 1% | 6.80% | 1 |
| भारत | 77.70% | 89% | 16% | 3.10% | 0.94 |
| केन्या | 82% | 91% | 12% | 5.30% | 0.97 |
| ब्राज़ील | 93% | 95% | 8% | 6.20% | 1.01 |

**चुनौतियाँ**

1) भौगोलिक और आर्थिक विषमता।
2) डिजिटल डिवाइड (डिजिटल साक्षरता की असमानता)।
3) विशेष आवश्यकता वाले बच्चों के लिए पर्याप्त संसाधनों की कमी।
4) शिक्षक प्रशिक्षण की गुणवत्ता।

**सुझाव**

1) शिक्षा बजट में वृद्धि।
2) विशेष रूप से हाशिए पर रहने वाले समुदायों के लिए लक्षित नीति निर्माण।
3) डिजिटल समावेशन को बढ़ावा देना।
4) वैश्विक सहयोग और नीति हस्तांतरण।

**निष्कर्ष**

भारत जैसे विशाल और विविधता से भरे देश के लिए गुणवत्तापूर्ण और समावेशी शिक्षा केवल एक विकासशील लक्ष्य (Development Goal) नहीं है, बल्कि यह सामाजिक न्याय, आर्थिक समानता और लोकतांत्रिक मजबूती का आधार है। इस शोध में प्रस्तुत आंकड़ों, भारत

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

के संदर्भ में केस स्टडी, और वैश्विक तुलना से यह स्पष्ट होता है कि शिक्षा के क्षेत्र में भारत ने उल्लेखनीय प्रगति तो की है, लेकिन अभी भी कई चुनौतियाँ बनी हुई हैं।

भारत में शिक्षा की पहुंच पिछले कुछ दशकों में व्यापक हुई है—नामांकन दर में वृद्धि, साक्षरता दर में सुधार, और लड़कियों की शिक्षा में बढ़ती भागीदारी इसके उदाहरण हैं। परंतु गुणवत्ता और समावेशन के क्षेत्र में अभी भी असमानता देखी जाती है—ग्रामीण-शहरी विभाजन, सरकारी व निजी विद्यालयों में अंतर, आर्थिक रूप से पिछड़े वर्गों, अनुसूचित जाति/जनजाति, और विकलांग बच्चों के लिए शिक्षा की समानता अब भी एक चुनौती बनी हुई है। नई शिक्षा नीति 2020 (NEP 2020) एक सकारात्मक पहल है जो समावेशी और गुणात्मक शिक्षा की दिशा में मार्ग प्रशस्त करती है। नीति में मातृभाषा में शिक्षा, डिजिटल तकनीकों का उपयोग, कौशल विकास और शिक्षक प्रशिक्षण पर विशेष बल दिया गया है। इसके साथ ही, विभिन्न राज्यों द्वारा शिक्षा में नवाचार जैसे कि दिल्ली मॉडल, केरल का साक्षरता अभियान, और राजस्थान के 'गर्भाधान से पूर्व शिक्षा' मॉडल प्रेरणादायक उदाहरण हैं।

**संदर्भ**

1. यूनेस्को (2023)। वैश्विक शिक्षा निगरानी रिपोर्ट।
2. विश्व बैंक (2022)। विश्व विकास संकेतक।
3. यूनिसेफ (2021)। समावेशी शिक्षा टूलकिट।
4. भारत सरकार। राष्ट्रीय शिक्षा नीति 2020।
5. ओईसीडी (2022)। शिक्षा पर एक नज़र।

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# भोसलेकालीन नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासामध्ये संतांचे योगदान

**राजेंद्र मारोती गहाणे[1] डॉ. श्रीकांत एम .सोनटक्के [2]**

[1]राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,नागपूर विद्यापीठ, नागपूर

[2]सहयोगी प्राध्यापक, विभाग प्रमुख इतिहास विभाग संताजी महाविद्यालय वर्धा रोड, नागपूर

**Email** :rmgahane@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170504

ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 5(II)|
Pp. 7-10
May 2025

**Submitted:** 02 Apr. 2025
**Revised:** 08 Apr. 2025
**Accepted:** 23 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश :**

देशाच्या हृदयस्थानी वसलेल्या नागपूर जिल्ह्याला भव्य गौरवशाली इतिहास असून इ. स. पूर्व 8 व्या शतकापासून या ठिकाणी मानवी सभ्यता अस्तित्वात असल्याचे पुरावे सापडल्याचे आढळतात. बख्त बुलंद याने इ. स. 1702 मध्ये नवनागपूरची निर्मिती केली. मात्र नंतरच्या काळात देवगडच्या चांद सुलतान राजाने आपल्या साम्राज्याच्या राजधानीचे शहर म्हणून निश्चित केले. 1739 मध्ये चांद सुलतानाचे निधन झाल्यावर चांद सुलतानाचा अनौरस पुत्र वली शहा हा या साम्राज्याचा राजा बनला. परंतु चांद सुलतानाची विधवा आपल्या मुलांचे हित जोपासण्याच्या उद्देशाने बेरार प्रांताचे राजे रघुजी भोसले यांना जाऊन मिळाली. 1743 च्या सुमारास रघुजी भोसले यांनी या प्रांतावर आक्रमण करून आपली सत्ता काबीज केली. मराठा राज्यकर्त्यांचे देवगड, चांदा आणि छत्तीसगड प्रांतावर राज्यकारभार सुमारे 17 व्या शतकाच्या मध्यापर्यंत असल्याचे गतकालीन इतिहासाच्या अध्ययनावरून आढळते .म्हणजेच नागपूर शहराची जरी गोंड राजांनी स्थापना केली असली तरी भोसल्यांच्या कारकिर्दीतच नागपूर मराठा साम्राज्याचा भाग बनला असल्याचे आढळते. मुधोजी भोसले यांनी 16 वर्षे नागपूर येथे राज्यकारभार केला. मूत्रविकाराच्या आजाराने 19 मे 1788 रोजी नागपुरात त्यांचे निधन झाले. मुधोजीच्या मृत्यूमुळे संपूर्ण सत्ता पुत्र दुसऱ्या रघुजी भोसले यांच्या हाती आली. मुधोजी पुत्र दुसरे रघुजीला 'आधुनिक नागपूर नगरीचे ' शिल्पकार म्हटले जाते. नागपूर हे शहर दोन गोष्टी करता प्रसिद्ध आहे, एक म्हणजे नागपूरचा उन्हाळा आणि दुसरे म्हणजे नागपूरची जगप्रसिद्ध संत्री .नागपुरात व सभोवताली संत्र्यांची लागवड करण्याचे श्रेय दुसऱ्या रघुजीला जाते (1788-1816). दुसऱ्या रघुजीने 18 व्या शतकाच्या शेवटी संत्र्यांची झाडे औरंगाबाद( बिहार) आणि सियालकोट येथून आणून नागपुरात लागवड केली म्हणूनच नागपूर शहर संपूर्ण भारतात 'संत्रा नगरी' म्हणून प्रसिद्ध आहे. नागपूरच्या गौरवशाली इतिहासाला संताचा समृद्ध इतिहास लाभलेला आहे . अनेक सुफी संतांची शिकवण आणि साहित्य नागपूरच्या सांस्कृतिक योगदानात भर घालतात . नागपुरातील भिन्नभाषी, भिन्नधर्मी ,भिन्न चालीरीती असलेल्या नागपूरकरवासियांनी येथील समाजजीवन आकर्षक केलेला आहे .'एकमेका साह्य करू 'असा सुपंथ नागपूरकरांनी पत्करलेला असल्यामुळे येथे सामाजिक ताणतणाव वाढले नाहीत उलटपक्षी त्यामुळे येथील सामाजिक व सांस्कृतिक जीवन संपन्न बनवण्यात, येथील भिन्न समाज गटानी- हिंदू ,मुस्लिम, बौद्ध,जैन ,शीख ,पारशी इत्यादींनी मौलिक योगदान केले आहे .यात संतांचा सिंहाचा वाटा आहे .विदर्भाला संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. संत जणू चालते बोलते विद्यापीठच होय. या विद्यापीठातून ते समाजाला जणू दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करतात .अशा संतांचा नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासात सिंहाचा वाटा आहे. संतांचे विचार आणि योगदान नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासात एक सुवर्णकाळ म्हणून ओळखले जातात. ज्यांनी विदर्भाला, समाज आणि संस्कृतीला एक नवा आयाम दिला .

**बीज शब्द:-** बख्त बुलंद ,रघुजी भोसले (दुसरे ),सुवर्णकाळ, बाबा ताजुद्दीन, शाह हसन ,सच्चिदानंद स्वामी ,अनुसया माता.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:

**Address for correspondence:**
*राजेंद्र मारोती गहाणे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,नागपूर विद्यापीठ, नागपूर*

***How to cite this article:***
*गहाणे, . राजेंद्र . मारोती ., & सोनटक्के, . श्रीकांत . एम . (2025). भोसलेकालीन नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासामध्ये संतांचे योगदान. Journal of Research & Development, 17(5(II)), 7–10. https://doi.org/10.5281/zenodo.15817243*

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.15817243

OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1) नागपूरच्या सांस्कृतिक जीवनातील संतांच्या भूमिकेचे अध्ययन करणे.

2) नागपुरातील संतांची कामगिरी प्रकाशात आणणे.

3) संतांनी केलेल्या सामाजिक बदलांचे अध्ययन करणे.

4) संतांच्या कार्याचा नागपूरच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनावरील परिणामाचे अध्ययन करणे.

**नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासात संतांचे योगदान :-**

**बाबा ताजुद्दीन:**

आज सर्व जगात ताजुद्दीन बाबाची प्रसिद्धी आहे. नागपुरातील ताजबाग परिसरात त्यांचे दर्गा आहे. 1925 मध्ये मृत्यू झाल्यानंतर त्यांना दफन केलेल्या जागेच्या आजूबाजूला लोकवस्ती होऊ लागली. म्हणून त्या भागाला ताजबाग म्हणून ओळखले जाऊ लागले. कर्नाटकातील बंगलोर जवळील कोलार जिल्ह्यात हजरत बाबा ताजुद्दीनचे कुटुंब राहत असे. त्या भागात हे कुटुंब परिजादा म्हणून ओळखले जाते. या कुटुंबातील सईद कादिर या नावाची व्यक्ती आपल्या पूर्वजांची जहागीर सोडून हैदराबादच्या निजामाच्या राज्यात स्थायिक झाली व लष्करात सुभेदाराच्या पदापर्यंत वाढली. त्याचा नातू सईद हैदर हा इंग्रजांच्या सैन्यात रुजू होण्यासाठी कामठीला आला. ह्याच सईद हैदरचा नातू म्हणजे ताजुद्दीन बाबा होय. कामठीतील गोरा बाजार या भागात हे कुटुंब राहत असे. ताजुद्दीन बाबाचे राजे चौथे रघुजी भोसले हे अनुयायी होते. यांनी ताजुद्दिन बाबाला आपल्या लाल बंगल्यात आणून ठेवले. 1908 ते 1925 च्या दरम्यान सक्करदरा येथे या संताचे वास्तव्य होते. त्यांचे अध्यात्मिक मार्गदर्शन व आशीर्वाद घेण्यासाठी लोक उत्सुक असत. सोमवार दिनांक 17 ऑगस्ट 1925 रोजी सायंकाळी सक्करदरा येथील भोसल्यांच्या लाल बंगल्यात त्यांचे निधन झाले. बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या संतांपैकी बाबा ताजुद्दीन आधुनिक काळातील एक प्रमुख संत होते.

**शाह जलालुद्दीन:**

सिव्हिल लाईन्स मधील विधान भवनाजवळ शाह जलालुद्दीन यांचे स्मारक आहे. हे स्मारक मिठा नीम या नावाने ओळखले जाते .दुसऱ्या रघुजीच्या अरब लष्करात ते काम करीत होते. त्यांच्यातील अध्यात्मिक शक्तीमुळे त्यांना समाजात मोठा मान व प्रतिष्ठा होती . 1817 च्या सीताबर्डीच्या लढाईत त्यांनी भाग घेतला आणि तिथेच ते धारातीर्थी पडले. त्या ठिकाणी त्यांचे स्मारक बांधण्यात आले. तेथे दरवर्षी उरुस भरतो.

**शाह हसन:**

हजरत शाह मोहम्मद हसन अबू अल-अलई हे भारतातील बीदर येथे जन्मलेले एक प्रसिद्ध सूफी संत होते. त्यांनी लहान वयातच धार्मिकतेची ओळख निर्माण केली आणि विविध इस्लामी शास्त्रांचे शिक्षण घेतले. त्यांच्या अध्यात्मिक शिक्षणाने त्यांना एक महान सूफी संत म्हणून ओळख दिली. त्यांच्या शिकवणींनी आणि आध्यात्मिक कार्यांनी अनेकांना प्रभावित केले, आणि त्यांचा प्रभाव आजही अनेक अनुयायांमध्ये दिसून येतो.

नागपुरातील हसनबाग क्षेत्र 'शाह हसन' या संतांच्या नावाने प्रसिद्ध आहे. 1817 मध्ये त्यांचे निधन झाले. भोसल्यांचा सेनापती नवाब सिद्दीक अली खान हा शाह हसनचा अनुयायी होता. त्यांची दरगाह स्थानिक मुस्लिम समाजासाठी एक महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे. त्यांच्या आध्यात्मिक शिक्षणाने आणि कार्याने अनेक अनुयायांना प्रभावित केले आहे. दरगाहमध्ये नियमितपणे धार्मिक कार्यक्रम आणि उर्स साजरे केले जातात.

**सच्चिदानंद स्वामी:**

श्री सच्चिदानंद स्वामी (इ. स. (1721-1796) या नावाने प्रसिद्ध असलेल्या मानाजी पंत गणेश विचुरणे यांचा जन्म सारस्वतपूर (सावनेर )येथे झाला. बालपणापासून त्यांना कृष्णभक्तीचा ध्यास होता माता-पित्याच्या मृत्यूनंतर ते मोहपा येथे आले व तेथील विद्वान सतपुरुष अच्युतानंद स्वामी यांचे शिष्यत्व पत्करले. त्यांनी मनाजीपंतांचे नाव 'महामती स्वामी 'असे ठेवले. त्यांच्या अध्यात्मिक सामर्थ्याने दामाजीपंत व्यवहारे सारखे भक्त त्यांच्याकडे आकृष्ट होऊन शिष्यत्व स्वीकारित .

सच्चिदानंद स्वामींनी केलेले गोसेवेचे सामाजिक कार्यही विशेष महत्त्वाचे आहे .आज प्रांत भर प्रसिद्ध असलेल्या मोहपा येथील बैलबाजाराचे मूळ त्यांनी 250 वर्षांपूर्वी आचारलेल्या गोसेवेच्या व्रतात आहे .हा बैलबाजार त्यांनीच सुरू केला. सच्चिदानंदानी चमत्कार केले नाहीत .मात्र ते काव्यरचना करीत. श्री नृसिंह स्वामी आष्टीकर यांच्याकडून इ. स.1796 मध्ये त्यांनी संन्यासदीक्षा घेऊन याच वर्षी समाधी घेतली.

**स्वामी तुकाराम महाराज:-**

(इ.स.1816-1883) हे दिव्यदृष्टीचे सतपुरुष मोहपा (मधुपुरी) येथे होऊन गेले. त्यांनी आपल्या दिव्य दृष्टीचा उपयोग भक्तांवरील संकट निवारण्यासाठी केला. त्यांनी भक्तांना ज्ञानदृष्टी देऊन मनुष्य जीवाच्या उद्धार कार्यासाठी आपले जीवन वेचले .आश्रमाने संन्यस्त ,पण वृत्तीने व कार्याने समाजस्थ असे त्यांचे लोककल्याणकारी जीवन होते. या सतपुरुषाच्या थोरवी विषयी अनेक साधू सत्पुरुषांनी गौरवाने लिहिलेआहे. तुकाराम महाराज कवीही होते .मोहपा येते त्यांनी समाधी घेतली.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**मारुती महाराज :-**

उमरेड तालुक्यातील मांढळ गावच्या (आती, तालुका कुही) मारुती महाराजांना (जन्म इ .स. 1818) मारुतीचा अवतार मानले जाई.अनेक व्याधीग्रस्त लोक त्यांच्या आशीर्वादासाठी येत. ते नेहमी पाळण्यावर बसून झोके घेत भजन करीत. नागपूरचे राजे तिसरे रघुजी यांनी त्यांचे दर्शन घेतले होते. महाराजांची समाधी मांढळ येथे असून दीपावलीस मोठा उत्सव साजरा होतो.

**माधवराव महाराज:-**

नागपूरच्या इतवारी विभागातील श्री नाथमंदिरात ज्यांची गादी आहे. त्या श्री माधवनाथ महाराजांनी ( इ.स.1857-1936) आसेतू हिमाचल तीर्थयात्रा केल्या. नाशिक मधील वणी येथील सप्तशृंगी डोंगरावर त्यांनी कठोर तपश्चर्या केली. त्यांनी अनेक संसारी जनांस आपत्तीमुक्त व दुःखमुक्त केले. त्याचबरोबर अन्नदान ,मंदिरांचे जिर्णोद्धार, नवीन मंदिर उभारणी अशी लोकोपयोगी कार्येही त्यांनी केली. देवगाव रंगारी येथील श्री बाळासाहेबांचे मंदिर व पुणे येथील दगडूशेठ हलवाई यांचे सुप्रसिद्ध दत्त मंदिर यामागील प्रेरणा यांचीच होती. जानेवारी 1936 मध्ये ते पुण्याहून नागपूरला आले .माधवनाथ महाराजांची गादी व समाधी एकाच ठिकाणी असलेले एकमेव स्थान म्हणजेच इतवारी भागातील श्रीनाथ मंदिर होय.

**पुरुषोत्तम महाराज जडी:-**

(इ.स.1740-1820) नावाचे एक सतपुरुष काटोल येथे होऊन गेले. त्यांनी लहान वयातच पूर्ण ऋग्वेद आत्मसात केला .नागपूरचे राजे मुधोजी उर्फ आप्पासाहेब भोसले यांनी त्यांची भेट घेतली होती. जडी महाराज रामभक्त असल्याने राम व मारुतीच्या सेवेतच मग्न रहात. वाचासिद्धी ,जनकल्याण व नि:स्पृह वृत्ती यामुळे त्यांची कीर्ती दूरवर पसरली. त्यांना अनेक शिष्य लाभले होते.

**डाऊ महाराज उर्फ तेलीयास्वामी:-**

डाऊ महाराज उर्फ तेलीयास्वामी नावाने प्रसिद्धीस आलेल्या एका अवलिया सतपुरुषाचा जन्म नागपूर येथे झाला. त्यांनी महाराष्ट्र कवी अमृतराय (शके 1620-1605) यांच्याकडून गुरुपदेश घेतला होता असे 'सच्चरित मालिका 'ग्रंथात लेखकाने नमूद केले आहे .बालवयातच त्यांनी वेदशास्त्रे पुराने यांचे अध्ययन केले होते .नागपूरला अयाचित मंदिरासमोर मंगळवारीचे रस्त्यावर डाऊ महाराजांचे मंदिर असून तेथेच त्यांची समाधी व विठ्ठल मूर्ती आहे .

**अनुसया माता:-**

काटोल तालुक्यातील पारडसिंगा येथे जन्मलेल्या अनुसया माता (इ.स.1920-1997) यांचा बालपणीच विवाह झाला होता. पण वैदेही वृत्तीमुळे त्यांचे मन संसारात रमले नाही. रिठी येथील मेहरामबाबा हे त्यांचे गुरु होत. भक्तगण त्यांना श्रद्धेने मायबाई म्हणत .त्यांच्या बोलण्यातून भक्तांना काही निश्चित संकेत, उपदेश व दिशा मिळे. समाजाच्या विविध स्तरात व अनेक प्रांतात त्यांचे भक्त आहेत.

**निष्कर्ष:-**

नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासात संतांचा मोठा वाटा आहे. संतांनी नागपूर आणि विदर्भाच्या सांस्कृतिक , धार्मिक तसेच सामाजिक जडणघडणीवर मोठा प्रभाव टाकला आहे .

**सामाजिक सुधारणा**

संतांनी समाजात समानता आणि बंधुत्वाचा संदेश दिला. त्यांनी जातिभेद आणि अंधश्रद्धा यासारख्या सामाजिक समस्यावर टीका केली .

गरीब आणि दुर्बल लोकांच्या हक्कासाठी लढा दिला.

**नैतिक मार्गदर्शन**

संतांनी लोकांना नैतिक मूल्यांचे महत्त्व सांगितले. त्यांनी लोकांना प्रामाणिकपणा, दयाळूपणा आणि क्षमाशीलता यासारख्या गुणांचे आचरण करण्यास प्रवृत्त केले.

**साहित्य आणि कला**

संतांनी त्यांच्या रचना मधून अध्यात्मिक आणि सामाजिक विचारांचा प्रसार केला. त्यांनी अभंग, भजन आणि कीर्तन यासारख्या कला प्रकारांचा वापर केला .

त्यांच्या रचनांनी मराठी साहित्य आणि संगीताला समृद्ध केले .

विदर्भातील संतांनी जे मोलाचे कार्य केले त्यांचा आज आपल्या समाजावर अत्यंत सुपरिणाम झालेला दिसून येतो. समाजातील लोक धार्मिक आणि सामाजिक स्थितीमध्ये गुण्यागोविंदाने राहतांना दिसतात .त्यांचीच फलश्रुती म्हणजेच नागपूरमध्ये नागपूर विद्यापीठाला राष्ट्रसंतांचे नाव देण्यात आले. तसेच अनेक ठिकाणांना संतांची नावे देण्यात आलेली आहेत आणि त्यांचे मार्गदर्शन आजही समाजाला दीपस्तंभ प्रमाणे कार्य करताना दिसून येतात .संतांच्या कार्याची आठवण म्हणून समाजातील लोक त्यांच्या उत्सव, जयंती साजरे करताना दिसतात आणि एक नैतिक मूल्यांचा आदर्श आपल्या जीवनात अंगीकारताना दिसून येतात.

**शिफारशी :**

प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून पुढीलप्रमाणे शिफारशी सुचवण्यात येत आहेत .

नागपूरचा समृद्ध सांस्कृतिक वारसा जोपासण्यासाठी शासकीय स्तरावरून प्रयत्न करण्यात यावे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

संतांची सामाजिक शिकवण लोकांपर्यंत पोहोचवण्यात यावी यासाठी संत साहित्यिक लेखनाला शासकीय माध्यमातून प्रेरणा देण्यात यावी .
नागरिकांना संत साहित्य वाचण्यासाठी शासन स्तरावरून सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्या.
संतांचे समाधीस्थळ , त्यांचे साहित्याचे जतन करण्यासाठी योग्य त्या प्रमाणात शासकीय अनुदान देण्यात यावे .

**संदर्भ ग्रंथसूची:**

1. महाराष्ट्र राज्य गॅजेटिअर नागपूर जिल्हा भाग 1
2. अंधारे, डॉ. भा. रा. **'नागपूरचे भोसले 1730 ते 2002'**, हिंदी -मराठी प्रकाशन, नागपुर.
3. कोठेकर, डॉ. शांता , अंधारे डॉ. भा. रा. , **'नागपूर नगरी त्रिशताब्दी इतिहास ग्रंथ 1702 -2002',**
4. नागपूर नगरी त्रिशताब्दी महोत्सव इतिहास उपसमिती प्रकाशन नागपूर.
5. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर नागपूर जिल्हा भाग 2
6. लांडगे, दे. गो. ( 1954). **'नागपूरचा सांस्कृतिक इतिहास'**, विदर्भ संशोधन मंडळ, नागपुर.
7. लांडगे, दे. गो. ( 1954). **'संशोधानाजली'**, विदर्भ संशोधन मंडळ, नागपुर.
8. अंधारे डॉ. भा.रा. , सोनटक्के डॉ. श्रीकांत (2015), **'आधुनिक नागपुर'**, हिंदी -मराठी प्रकाशन,
9. नागपुर .

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# कृत्रिम बुद्धिमत्ता आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम

**प्रा. उदय जाधव**
भोगावती महाविद्यालय, कुरुकली
**Email:** udayjadhav453@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-170504
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 5(II)|
Pp. 11-16
May 2025

**Submitted:** 02 Apr. 2025
**Revised:** 08 Apr. 2025
**Accepted:** 23 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश**

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ही आधुनिक तंत्रज्ञानाची एक क्रांतिकारी शक्ती आहे, जी समाजाच्या प्रत्येक क्षेत्रावर मोठा परिणाम करत आहे. या संशोधन पेपर मध्ये AI चा शिक्षण, आरोग्य, अर्थव्यवस्था, पर्यावरण, आणि दैनंदिन जीवनावर होणारा सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम सविस्तर अभ्यासला आहे. AI मुळे वैयक्तिकृत शिक्षण, अचूक वैद्यकीय निदान, आणि कार्यक्षम उद्योग प्रक्रिया शक्य झाल्या आहेत; परंतु त्याचबरोबर बेरोजगारी, गोपनीयता भंग, आणि नैतिक प्रश्न यासारखी आव्हानेही उद्भवली आहेत. कायदेशीर आणि नियामक चौकटींचे विश्लेषण करून, AI च्या जबाबदार वापरासाठी उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत. या संशोधन पेपर मध्ये AI च्या भविष्यातील संभाव्य परिणामांचा आणि समाजाला समृद्ध बनवण्याच्या क्षमतेचा आढावा घेतला आहे. भारतासह जागतिक समुदायाने AI चा नैतिक आणि सुरक्षित वापर सुनिश्चित करण्यासाठी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे.

**बीज संज्ञा :** कृत्रिम बुद्धिमत्ता, समाज, तंत्रज्ञान, नैतिकता, गोपनीयता, कायदा, शिक्षण, आरोग्य, अर्थव्यवस्था, पर्यावरण

प्रास्ताविककृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) ही आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातील एक क्रांतिकारी शक्ती आहे. AI म्हणजे संगणक प्रणालींना मानवी बुद्धिमत्तेप्रमाणे विचार करण्याची, शिकण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता प्रदान करणारी तंत्रज्ञान शाखा. यात मशीन लर्निंग, डीप लर्निंग, नैसर्गिक भाषा प्रक्रिया (NLP), आणि रोबोटिक्स यांचा समावेश होतो. AI चा प्रभाव समाजाच्या प्रत्येक क्षेत्रावर पडत आहे, मग ते शिक्षण, आरोग्य, अर्थव्यवस्था, कायदा, किंवा दैनंदिन जीवन असो. या संशोधन पेपर मध्ये, AI चा समाजावर होणारा सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम, त्यासंबंधीचे कायदेशीर आणि नैतिक प्रश्न, आणि भविष्यातील संभाव्य बदल यांचा सविस्तर अभ्यास केला आहे.

**उद्देश**

1. AI चा समाजाच्या विविध क्षेत्रांवर होणारा परिणाम समजून घेणे.
2. AI च्या वापरामुळे उद्भवणाऱ्या कायदेशीर आणि नैतिक आव्हानांचे विश्लेषण करणे.
3. AI चा वापर सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना सुचवणे.
4. AI च्या सामाजिक परिणामांचा भविष्यातील दृष्टिकोन स्पष्ट करणे.

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा. उदय जाधव भोगावती महाविद्यालय, कुरुकली*

Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817258
OPEN ACCESS

**How to cite this article:**
*जाधव, . उदय . (2025). कृत्रिम बुद्धिमत्ता आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम. Journal of Research & Development, 17(5(II)), 11–16. https://doi.org/10.5281/zenodo.15817258*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**कृत्रिम बुद्धिमत्ता: एक विहंगावलोकन**

कृत्रिम बुद्धिमत्ता ही तंत्रज्ञानाची अशी शाखा आहे जी संगणकांना मानवासारखे विचार करण्याची आणि कार्य करण्याची क्षमता देते. AI प्रणाली डेटाचे विश्लेषण करू शकतात, अनुभवातून शिकू शकतात, आणि स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकतात. AI च्या प्रमुख तंत्रज्ञानांमध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो:

**मशीन लर्निंग**:

डेटामधून पॅटर्न शोधणे आणि त्याआधारे भविष्यवाणी करणे.

**डीप लर्निंग**:

कृत्रिम न्यूरल नेटवर्क्सचा उपयोग करून जटिल समस्यांचे निराकरण करणे.

**नैसर्गिक भाषा प्रक्रिया**:

मानवी भाषा समजून घेणे आणि त्यावर प्रक्रिया करणे.

**रोबोटिक्स**:

स्वायत्त रोबोट्सचा विकास जो मानवी कार्ये पार पाडू शकतो.

**AI ची प्रगती**

AI ची प्रगती गेल्या काही दशकांत झपाट्याने झाली आहे. 1950 मध्ये ॲलन ट्युरिंग यांनी "ट्युरिंग टेस्ट" मांडली, जी AI च्या बुद्धिमत्तेची चाचणी घेण्यासाठी आधारभूत ठरली. 1997 मध्ये IBM च्या डीप ब्ल्यूने बुद्धिबळात गॅरी कास्पारोव्हला हरवले, तर 2016 मध्ये Google च्या AlphaGo ने गो खेळात जागतिक विजेता ली सेडॉलला पराभूत केले. आज, AI चा उपयोग स्मार्टफोन, स्वयंचलित वाहने, वैद्यकीय निदान, आणि सायबर सुरक्षा यासारख्या क्षेत्रांत केला जात आहे.

**AI चा समाजावर सकारात्मक परिणाम**

AI चा समाजावर सकारात्मक परिणाम खूप मोठा आहे. खालील क्षेत्रांत AI ने क्रांती घडवली आहे:

**1. आरोग्यसेवा**

**निदान आणि उपचार**:

AI प्रणाली रोगांचे अचूक निदान करू शकतात. उदाहरणार्थ, AI-आधारित अल्गोरिदम्स कर्करोगाच्या प्रारंभिक अवस्थेची ओळख करू शकतात.

**वैयक्तिकृत उपचार**:

AI रुग्णांच्या वैद्यकीय इतिहासाचे विश्लेषण करून वैयक्तिकृत उपचार योजना तयार करते.

**दूरस्थ आरोग्यसेवा**:

टेलिमेडिसिन आणि AI-आधारित चॅटबॉट्समुळे ग्रामीण भागातही आरोग्यसेवा उपलब्ध झाल्या आहेत.

**2. शिक्षण**

**वैयक्तिकृत शिक्षण**:

AI-आधारित प्लॅटफॉर्म्स विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांनुसार अभ्यासक्रम तयार करतात.

**स्वयंचलित मूल्यांकन**:

AI प्रणाली परीक्षा तपासणी आणि ग्रेडिंग स्वयंचलितपणे करू शकतात.

**ऑनलाइन शिक्षण**:

AI ने ऑनलाइन शिक्षणाला चालना दिली आहे, ज्यामुळे जगभरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध झाले आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**3. अर्थव्यवस्था आणि उद्योग**

**उत्पादकता वाढ**:

AI ने स्वयंचलनाद्वारे उत्पादन प्रक्रिया अधिक कार्यक्षम केल्या आहेत.

**ग्राहक सेवा**:

AI-आधारित चॅटबॉट्स आणि व्हर्च्युअल असिस्टंट्स ग्राहक सेवेची गुणवत्ता सुधारतात.

**नवीन रोजगार**:

AI ने डेटा सायन्स, मशीन लर्निंग इंजिनीअरिंग यासारख्या नवीन रोजगार संधी निर्माण केल्या आहेत.

**4. पर्यावरण संरक्षण**

**हवामान बदल**:

AI हवामान बदलाच्या समस्यांचे विश्लेषण आणि उपाययोजना सुचवण्यासाठी वापरले जाते.

**ऊर्जा व्यवस्थापन**:

AI ऊर्जेचा कार्यक्षम वापर सुनिश्चित करते, ज्यामुळे पर्यावरणाचे नुकसान कमी होते.

**वन्यजीव संरक्षण**:

AI-आधारित ड्रोन आणि सेन्सर्सचा उपयोग अवैध शिकार रोखण्यासाठी केला जातो.

**5. दैनंदिन जीवन**

**स्मार्ट उपकरणे**:

स्मार्टफोन, स्मार्ट होम डिव्हाइसेस, आणि व्हर्च्युअल असिस्टंट्स (उदा., Alexa, Siri) यांनी दैनंदिन जीवन सुलभ केले आहे.

**वाहतूक**:

स्वायत्त वाहने आणि AI-आधारित ट्रॅफिक व्यवस्थापन प्रणाली रस्ते सुरक्षित आणि कार्यक्षम बनवतात.

**मनोरंजन**:

AI चा उपयोग चित्रपट, संगीत, आणि गेमिंग उद्योगात वैयक्तिकृत अनुभव देण्यासाठी केला जातो.

**AI चा समाजावर नकारात्मक परिणाम**

AI चे फायदे असले तरी त्याचे काही नकारात्मक परिणाम देखील आहेत, ज्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

**1. रोजगारावर परिणाम**

**स्वयंचलनामुळे बेरोजगारी**:

AI आणि रोबोटिक्समुळे अनेक पारंपरिक नोकऱ्या धोक्यात आल्या आहेत, विशेषतः उत्पादन आणि सेवा क्षेत्रात.

**कौशल्य**:

AI च्या प्रगतीमुळे नवीन कौशल्यांची गरज वाढली आहे, परंतु सर्वांना ही कौशल्ये शिकणे शक्य नाही.

**आर्थिक असमानता**:

AI चा लाभ प्रामुख्याने मोठ्या कंपन्या आणि विकसित देशांना मिळत आहे, ज्यामुळे आर्थिक असमानता वाढत आहे.

**2. गोपनीयता आणि माहिती सुरक्षा**

**माहिती संकलन**:

AI प्रणाली मोठ्या प्रमाणावर वैयक्तिक माहिती गोळा करतात, ज्यामुळे गोपनीयतेचा भंग होऊ शकतो.

**माहिती गैरवापर**:

माहितीचा गैरवापर किंवा हॅकिंगमुळे व्यक्तींच्या किंवा संस्थेच्या सुरक्षेला धोका निर्माण होतो.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**निगरानी**:

AI-आधारित निगरानी प्रणालींमुळे व्यक्तीस्वातंत्र्यावर मर्यादा येऊ शकतात.

**3. नैतिक प्रश्न**

**पक्षपात**:

AI प्रणालींमध्ये डेटामधील पक्षपातामुळे अन्यायकारक निर्णय घेतले जाऊ शकतात, उदा., नोकरभरती किंवा कायदेशीर प्रक्रियेत.

**पारदर्शकतेचा अभाव**:

AI च्या निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता नसल्यामुळे त्यावर विश्वास ठेवणे कठीण आहे.

**जबाबदारी**:

AI प्रणाली चुकीचे निर्णय घेतल्यास त्याची जबाबदारी कोणाची याचा प्रश्न निर्माण होतो.

**4. सामाजिक आणि सांस्कृतिक परिणाम**

**सामाजिक दुरावा**:

AI-आधारित तंत्रज्ञानामुळे मानवी संवाद कमी होत आहे, ज्यामुळे सामाजिक दुरावा वाढत आहे.

**सांस्कृतिक प्रभाव**:

AI-आधारित मनोरंजन आणि माहितीचा प्रसार स्थानिक संस्कृतींवर परिणाम करू शकतो.

**अविश्वास**:

AI च्या गैरवापरामुळे (उदा., डीपफेक) समाजात अविश्वास आणि गोंधळ वाढू शकतो.

**5. सुरक्षा जोखीम**

**सायबर हल्ले**:

AI चा उपयोग हॅकिंग, फिशिंग, आणि डीपफेक हल्ल्यांसाठी केला जाऊ शकतो.

**स्वायत्त शस्त्रे**:

AI-आधारित स्वायत्त शस्त्रांचा गैरवापर मानवतेला धोका निर्माण करू शकतो.

**नियंत्रणाचा अभाव**: AI प्रणालींवर पूर्ण नियंत्रण ठेवणे कठीण आहे, ज्यामुळे अनपेक्षित परिणाम होऊ शकतात.

**कायदेशीर आणि नियामक आव्हाने**

AI च्या वाढत्या प्रभावामुळे कायदेशीर आणि नियामक आव्हाने समोर येत आहेत. भारतात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर यासंदर्भात काही कायदे आणि धोरणे अस्तित्वात आहेत, परंतु AI च्या वेगवान प्रगतीमुळे नवीन चौकटींची गरज आहे.

**भारतातील कायदेशीर चौकट**

**1.माहिती तंत्रज्ञान कायदा, 2000 )IT Act 2000(**:

हा कायदा डेटा (माहिती) सुरक्षा आणि सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी आहे, परंतु AI-आधारित गुन्ह्यांसाठी त्यात सुधारणा आवश्यक आहे.

**2.डेटा संरक्षण कायदा**:

भारताने 2023 मध्ये डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायदा (DPDP Act) मंजूर केला, जो AI-आधारित डेटा प्रक्रियेला नियंत्रित करतो.

**3.राष्ट्रीय AI धोरण**:

भारत सरकारने AI च्या विकासासाठी राष्ट्रीय AI धोरणाची घोषणा केली आहे, ज्यामध्ये जबाबदार पूर्वक AI वापरावर भर दिला आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**4.आंतरराष्ट्रीय कायदे**

**GDPR (EU)**:

युरोपियन युनियनचा सामान्य डेटा संरक्षण नियमन (GDPR) AI आणि डेटा गोपनीयतेशी संबंधित आहे.

**AI कायदा (EU)**: EU ने 2024 मध्ये AI च्या वापरासाठी नियम प्रस्तावित केले आहेत.

**OECD AI तत्त्वे**: OECD ने AI च्या नैतिक वापरासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.

**कायदेशीर आव्हाने**

1. **AI ची स्वायत्तता**:

   AI प्रणाली स्वायत्तपणे निर्णय घेतात, त्यामुळे त्यांच्या कृतींसाठी जबाबदारी कोणाची याचा प्रश्न आहे.

2. **आंतरराष्ट्रीय समन्वय**:

   AI चा प्रभाव जागतिक आहे, त्यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्यांमध्ये समन्वय आवश्यक आहे.

3. **नवीन जोखीम**:

   डीपफेक, स्वायत्त शस्त्रे, आणि AI-आधारित हल्ले यांसारख्या नवीन जोखमींसाठी कायदे अद्ययावत करणे गरजेचे आहे.

**नैतिक प्रश्न आणि AI**

AI च्या वापरामुळे अनेक नैतिक प्रश्न निर्माण झाले आहेत, ज्यांचे निराकरण करणे आवश्यक आहे.

**1. पारदर्शकता**

AI च्या निर्णय प्रक्रिया पारदर्शक असाव्यात, जेणेकरून त्यावर विश्वास ठेवता येईल. यासाठी "एक्सप्लेनेबल AI" (Explainable AI) चा विकास होत आहे, जो AI च्या निर्णयांचे स्पष्टीकरण देऊ शकतो.

**2. पक्षपात आणि निष्पक्षता**

AI प्रणालींमध्ये डेटामधील पक्षपातामुळे अन्यायकारक निर्णय होऊ शकतात. यासाठी डेटा संकलन आणि अल्गोरिदम डिझाइनमध्ये निष्पक्षता सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

**3. गोपनीयता**

AI प्रणालींनी व्यक्तींच्या गोपनीयतेचा आदर करावा. यासाठी डेटा संरक्षण कायद्यांचे काटेकोर पालन आणि अनामिक डेटा वापरावर भर द्यावा.

**4. मानवी नियंत्रण**

AI प्रणालींवर मानवी नियंत्रण असावे, विशेषतः संवेदनशील क्षेत्रांत जसे की कायदा अंमलबजावणी आणि संरक्षण.

**उपाययोजना आणि शिफारसी**

AI चा समाजावर सकारात्मक परिणाम वाढवण्यासाठी आणि नकारात्मक परिणाम कमी करण्यासाठी खालील उपाययोजना सुचवल्या जातात:

1. **कायदेशीर आणि प्रशासकिय सुधारणा**:

   AI-आधारित गुन्ह्यांसाठी कायद्यांमध्ये सुधारणा करावी.

   माहितीची गोपनीयता आणि AI च्या जबाबदारीसाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे तयार करावीत.

2. **शिक्षण आणि कौशल्य विकास**:

   AI-संबंधित कौशल्यांचे शिक्षण सर्व स्तरांवर उपलब्ध करावे.

   बेरोजगारीचा सामना करण्यासाठी पुनर्कौशल्य (reskilling) आणि अपस्किलिंग कार्यक्रम राबवावेत.

   AI विकासासाठी नैतिक मार्गदर्शक तत्त्वे तयार करावीत.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

3. **नैतिक AI विकास**:

   पारदर्शक आणि निष्पक्ष AI प्रणाली विकसित कराव्यात.

4. **आंतरराष्ट्रीय सहकार्य**:

   AI च्या नियमनासाठी आंतरराष्ट्रीय समन्वय वाढवावा.

   डेटा सामायिकरण आणि संयुक्त संशोधनासाठी करार करावेत.

5. **जनजागृती**:

   AI च्या फायद्यांबाबत आणि जोखमींबाबत जनजागृती करावी.

   AI चा जबाबदार वापर प्रोत्साहन द्यावा.

**भविष्यातील दृष्टिकोन**

AI चा समाजावर होणारा परिणाम भविष्यात आणखी वाढेल. स्वयंचलित वाहने, स्मार्ट शहरे, आणि AI-आधारित गव्हर्नन्स यासारख्या नवीन तंत्रज्ञानांचा उदय होईल. तथापि, यासोबतच AI च्या गैरवापराला आळा घालणे आणि त्याचे सामाजिक परिणाम संतुलित करणे महत्त्वाचे असेल. भारतासारख्या विकसनशील देशांसाठी AI ही एक मोठी संधी आहे, परंतु त्यासाठी योग्य धोरणे आणि नियोजन आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

कृत्रिम बुद्धिमत्ता ही समाजाला प्रगतीच्या नव्या उंचीवर नेणारी शक्ती आहे, परंतु तिच्यासोबत अनेक आव्हाने देखील आहेत. AI चा समाजावर सकारात्मक परिणाम वाढवण्यासाठी आणि नकारात्मक परिणाम कमी करण्यासाठी कायदेशीर, नैतिक, आणि तांत्रिक उपाययोजनांची गरज आहे. भारताने आणि जागतिक समुदायाने AI चा जबाबदार वापर सुनिश्चित करण्यासाठी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. भविष्यात, AI चा योग्य वापर समाजाला अधिक समृद्ध, सुरक्षित, आणि समान बनवू शकतो.

**संदर्भ**

1. माहिती तंत्रज्ञान कायदा, 2000, भारत सरकार.
2. डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायदा, 2023, भारत सरकार.
3. राष्ट्रीय AI धोरण, भारत सरकार.
4. OECD AI तत्त्वे, 2019.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# स्त्री सक्षमीकरण आणि समतोल समाजाची निर्मिती

**डॉ. मनोहर आनंद गुडधे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख चिंतामणी महाविद्यालय पोंभूर्णा
**Email:** manojgudadhe5@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-170505
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 17-20
May 2025
**Submitted:** 02 Apr. 2025
**Revised:** 08 Apr. 2025
**Accepted:** 23 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश**

आज स्त्रियांनी प्रत्येक क्षेत्रात स्वत:चे नाव लौकिक केलेले आहे व आपल्या कार्याचा ठसा सुद्धा उमटविलेला आहे. तरी सुद्धा स्त्री ही आजही असमानतेच्या ओझाखाली दबलेली असून तिची घुसमट होतांना दिसते. पुरुषप्रधान समाज व्यवस्थेत स्त्रियांच्या विकासाचा विचार न करता पुरुषांच्या विकासासाठी स्त्रियांचा उपयोग कसा होईल यावर पुरुषप्रणित धर्मशास्त्रांनी भर दिला पुरुषाने सर्वत्र असावे मात्र स्त्रीने कुठेच नसावे अशा विचित्र चालीरीती धर्मग्रंथातून तयार झाल्या. वर्तमान समाजातही पुरुषांचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन फारसा सकारात्मक असल्याचे दिसत नाही. सभोताल घडणाऱ्या विविध घटना व घडामोडीवरून याचा वारंवार प्रत्यय येतो की, आजही पुरुषी मानसिकतेचे प्रस्थ कायम असल्याची प्रचिती येते. ग्रामीण जीवनात कुटुंबात पुरुषाचे वर्चस्व प्रभावशाली असल्या कारणास्तव कुटुंबातील इतर व्यवहार करतांना पुरुषाच्या संमतीनेच तो पार पाडावा लागतो. स्त्रियांच्या न्याय हक्क व संरक्षण विषयाच्या अनुषंगाने ग्रामीण भागाची शहरी भागाशी तुलना निश्चितच करता येणार नाही. ग्रामीण क्षेत्रात लैंगिक असमानता याविषयीचे चित्र विदारक स्वरूपात आहे. यात स्त्रियांच्या शोषणाचे स्वरूप हे लक्षवेधक ठरते. स्त्रियांचे शोषण त्यांच्यावरील अत्याचार याला प्रतिबंध घालून त्यांना समाजात प्रतिष्ठेने जगता यावे व त्यांना न्याय व हक्काची समान उपलब्धता व्हावी याकरिता कायद्याची निर्मिती झाली असली तरी आजही स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराची शृंखला खंडित झाल्याचे दिसत नाही. समाजात स्त्रियांना न्याय, हक्क व प्रतिष्ठा प्राप्तीसाठी त्यांचा सामाजिक, आर्थिक व राजकीय विकास साधण्यासाठी आज महिला सबलीकरणाची नितांत आवश्यकता आहे.

**बिज शब्द:** पुरुषी वर्चस्व, जडणघडण, कायदा, हितसंबंध, दुर्बलता, विकास, असमानता.

**प्रस्तावना**

काश्मीरच्या पहेलगाम येथे दहशतवाद्यांनी २२ एप्रिल २०२५ रोजी पर्यटकावर केलेल्या हमल्यानंतर भारतीय लष्कराने ७ मे २०२५ ला मध्यरात्री १ वाजून ०५ मिनिटांनी 'आपरेशन सिंदूर' या मोहिमेला सुरुवात केली. यात पाकिस्तान आणि पाकिस्तान प्रशासित काश्मीरमध्ये अनेक ठिकाणी भारताने क्षेपणास्त्र हल्ले केले. त्यानंतर भारतीय लष्करातल्या महिला प्रतिनिधींची चर्चा सगळया देशभर सुरू झाली. या चर्चेतून विंग कमांडर व्योमिका सिंग आणि कर्नल सोफिया कुरेशी अशा कर्तबगार महिलांचे नाव पुढे आले. आज साहित्य कला, विज्ञान, क्रीडा, आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अशा कोणत्याही क्षेत्राचे उदाहरण घेतले असता या प्रत्येक

**क्षेत्रात स्त्रियांनी स्वतः**

चे न नाव लौकिक केलेले आहे व आपल्या कार्याचा ठसा सुद्धा उमटविलेला आहे. तरी सुद्धा स्त्री ही आजही असमानतेच्या ओझाखाली दबलेली असून तिची घुसमट होतांना दिसते. यातूनच लैंगिक असमानता, महिला सक्षमीकरण या विषयावरील चर्चेला गती प्राप्त होते. कुटुंब, समाज आणि राष्ट्र घडवितांना महिलाच्या कार्याचे व तिच्या एकूण योगदानाचे महत्त्व प्रतिपादन करतांना

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817269
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
डॉ. मनोहर आनंद गुडधे अर्थशास्त्र विभाग प्रमुख चिंतामणी महाविद्यालय पोंभूर्णा

**How to cite this article:**
*गुडधे, . मनोहर . आनंद . (2025). स्त्री सक्षमीकरण आणि समतोल समाजाची निर्मिती. Journal of Research & Development, 17(5(II)), 17–20. https://doi.org/10.5281/zenodo.15817269*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की, 'एखाद्या समाजाचा दर्जा लक्षात घ्यायचा असेल तर त्या समाजातील महिलांचे स्थान हे कोणत्या प्रकारचे आहे या बाबीचा विचार होणे महत्त्वाचे ठरते.' फार पूर्वीपासूनच स्त्रियांना धार्मिक रूढी व खुळचट समजुतीमुळे अन्यायाचे वाटेकरी व्हावे लागले. पुरुषप्रधान समाज व्यवस्थेत स्त्रियांच्या विकासाचा विचार न करता पुरुषांच्या विकासासाठी स्त्रियांचा उपयोग कसा होईल यावर पुरुषप्रणित धर्मशास्त्रांनी भर दिला. सतीप्रथा, बालविवाह, केशवपण, पुनर्विवाहाला विरोध अशा अनिष्ट चालीरीतीमुळे स्त्रियांचे जीवन नरकमय झाले. पुढे जाऊन स्त्रियांच्या मातृत्वाला मान मिळाला मात्र स्त्रीत्वाला हा मान नाकारण्यात आला. पुरुषाने सर्वत्र असावे मात्र स्त्रीने कुठेच नसावे अशा विचित्र चालीरीती धर्मग्रंथातून तयार झाल्या. या चालीरीती नियमात रूपांतर होऊन या नियमामुळे स्त्रियांचे जीवन नियंत्रित होऊ लागले व ती विविध प्रकारच्या शोषणाला बळी ठरली.

**उद्दिष्टे**

१) लैंगिक असमानतेचे स्वरूप समजून घेणे

२) समाजातील स्त्रियांचा दर्जा व भूमिकेचे अध्ययन करणे

**तथ्य व पद्धती शास्त्र**

तथ्य संकलनासाठी दुय्यम स्त्रोता अंतर्गत प्रकाशित साहित्य तसेच इंटरनेटवरील विविध साईटचा आधार घेण्यात आला.
समाजाने आखलेली मर्यादा अर्थात 'चूल आणि मूल' ही समाज जीवनाची चौकट स्त्री जातीने आज मोडीत काढत जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्वतःचे कर्तुत्व सिद्ध केले आहे. पूर्वी स्त्री जीवनावर असलेले निर्बंध ते स्त्रियांनी केलेली आजच्या काळातील प्रगती या मधला प्रवास **हा अचंबित सर्वांनाच करणारा आहे. निसर्गतः**

स्त्रीला मिळालेली सहनशीलता, नाविन्यता, सौंदर्याची जाणीव, संघ प्रेरणा, स्मरणशक्ती, सृजनशीलता अशा गुणांची देण असतांना कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या जडणघडणीत सुद्धा स्त्रियांनी मोलाचा वाटा उचललेला आहे. असे असतांनाही मात्र तिच्या या कार्याची उपेक्षा होतांना दिसते. तिला गौण मानण्यात येते. तिचे कार्य दुर्लक्षिल्या जाते. एकूणच शिक्षण, अर्थव्यवस्था आणि तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रात देशाने प्रगती साध्य केली असली तरी आजही स्त्रियांची सुरक्षितता आणि सन्मान याबाबत अनेक आव्हान कायम दिसतात. आजच्या वर्तमान समाजातही पुरुषांचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन फारसा सकारात्मक असल्याचे दिसत नाही. सभोताल घडणाऱ्या विविध घटना व घडामोडीवरून याचा वारंवार प्रत्यय येतो की, आजही पुरुषी मानसिकतेचे प्रस्थ कायम असल्याची प्रचिती येते.
दिवसागणित प्रगतीचे नवनवे क्षेत्र देश पादाक्रांत करीत असतांना अजूनही पुरुषी मानसिकतेचा प्रभाव पूर्णपणे कमी झाल्याचे दिसत नाही. या पुरुष प्रधान वर्चस्वामुळे स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात येते आणि तिचे योगदान कितीही महत्त्वपूर्ण असले तरी त्याकडे डोळेझाक होत असते. कुटुंबात मुलगी जन्माला आली असता ती मुलगी म्हणून तिची ओळख निर्माण करण्यात येते. पुढे जाऊन ती मोठी होत असतांना एक मुलगी म्हणून तिने काय करावे व काय करू नये याचा वेळापत्रक जणू तिच्यासमोर मांडला जातो. अजूनही विविध समाजात मुलींचे शिक्षण, तिचे खेळ, तिचे आरोग्य, तिच्या गरजा व एकूणच तिचे संगोपन यात मुलांच्या तुलनेत कमी महत्त्वाचे मानले जाते. त्यातच एक स्त्री म्हणूनही तिचे हक्क डावलतांनाच तिला मिळणाऱ्या संधीही नाकारल्या जातात. यातूनच स्त्री आणि पुरुष यांच्यातील विषमतेची दरी प्रकर्षाने जाणवते. ही दरी मिटविण्यासाठी व स्त्रियांचे हितसंबंध जोपासण्याकरिता महिला सक्षमीकरणाचा विचार पुढे येतो.

स्त्रियावरील अत्याचार, लैंगिक असमानता, तिच्या हक्काची होणारी पायमल्ली, तिला देण्यात येणारी वागणूक व एकूणच तिच्या संरक्षणाचा प्रश्न हा केवळ भारत देशापुरता मर्यादित नसून या विषयाची तीव्रता कमी अधिक प्रमाणात जगाच्या विविध देशांमध्ये जाणवते. काळ जसजसा पुढे जात आहे तसतसा जगातील अनेक देशांनी आपल्या राष्ट्राच्या विकासाचा गाडा पुढे पुढे रेटतांना दृष्टीक्षेपास पडते. विज्ञान, तंत्रज्ञानात प्रगती होत आहे. शिक्षण आणि नोकरी उद्योगाच्या संधी वाढत आहेत. परंतु स्त्रियांची सुरक्षा, स्वातंत्र्य, निर्णयक्षमता या गोष्टी मात्र आजही जास्त झाकोळल्या कशा जातील याची पुरेपूर काळजी इथल्या निरनिराळया व्यवस्था पद्धतशीरपणे घेतांना दिसतात. भारतीय राज्यघटनेत स्त्रीविषयक अनेक तरतुदी करून सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात दर्जा आणि संधीच्या दृष्टीने स्त्री-पुरुषांमध्ये समानता प्रस्थापित केलेली आहे. धर्म, वंश, जात, भाषा, लिपी, संस्कृती इत्यादीच्या आधारे भेदभाव करण्यास कायद्याने बंदी करण्यात आली. यासोबतच आंतरराष्ट्रीय स्तरावर या विषयाकडे नजर टाकली असता असे दिसते की, आज मानवी हक्काविषयी अनेक आंतरराष्ट्रीय कराराला मान्यता मिळूनही स्त्रिया निर्धन आणि निरक्षर राहण्याचे प्रमाण मोठे आहे. वैद्यकीय सुविधा, मालमत्तेची माहिती, पतपुरवठा, प्रशिक्षण आणि रोजगारात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना कमी संधी मिळतांना दिसते.

शहरी भागात स्त्रियांच्या प्रगती विषयक चित्र हे निश्चितच सकारात्मक असले तरी. हे चित्र ग्रामीण भागात नकारात्मक स्वरूपात समोर येते. ग्रामीण भागामध्ये आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय इत्यादी क्षेत्रातील स्त्रियांचे स्थान हे गौण असल्याचे निदर्शनास येते. विविध परीक्षेमध्ये निकालाच्या बाबतीत मुली हे मुलापेक्षा दरवर्षी श्रेयस ठरतांना दिसतात मात्र ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणविषयक प्रगतीचे चित्र हे निराशाजनकच आहे. अर्धवट शिक्षण घेऊन शाळा सोडण्याचे प्रमाण कमी होत असले तरी आजही ग्रामीण भागातील मुली विविध कारणामुळे महाविद्यालयीन शिक्षण घेऊ शकत नाहीत. आजही मुलींच्या शिक्षणा बाबत समाजाचा मुलीकडे पाहण्याचा दृष्टिकोन तसेच मुलींना कुटुंबात मिळणारी वागणूक या बाबी प्रमुख अडथळा निर्माण करणाऱ्या ठरतात.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

रोजगाराच्या क्षेत्रात स्त्रियांना मोकळीकता उपलब्ध होत असली तरी यातही स्त्रियांच्या अधिकाराचे हनन होताना दिसते. ग्रामीण स्त्रिया हे काम करण्याच्या बाबतीत कोणत्याही स्वरूपात पुरुषांच्या तुलनेत कमी पडत नाहीत. पुरुषांच्या बरोबरीने ते कामास हातभार लावत असतात. मात्र वास्तविकता ही आहे की पुरुषांच्या बरोबरीने काम करूनही त्यांना त्या कामाचा उचित व समान असा मोबदला मिळत नाही. परिणामी आजही ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक दुर्बलतेचे शिकार होणे भाग पडत असते. ग्रामीण जीवनात कुटुंबात पुरुषाचे वर्चस्व प्रभावशाली असल्या कारणास्तव कुटुंबातील इतर व्यवहार करतांना पुरुषाच्या संमतीनेच तो पार पाडावा लागतो. यात पैशाशी निगडित असलेल्या बाबीमध्ये गरज असतांनाही ते पुरुषाच्या संमतीविना खर्च करू शकत नाहीत. साधा स्वतःच्या आरोग्याचा प्रश्न सोडवतांना सुद्धा स्त्रियांना पुरुषाच्या परवानगीवरच अवलंबून राहावे लागते.

ग्रामीण जीवनाचा कायापालट करणारी १९९३ मध्ये ७३ वी घटना दुरुस्ती करण्यात आली या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून महिलांना स्थानिक स्तरावरील राजकीय प्रक्रियेत सहभागाची संधी उपलब्ध झाली. यात महिलांचा राजकीय सहभाग वाढावा, त्यांचे राजकीय नेतृत्व विकसित व्हावे याकरिता ३३ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली. महाराष्ट्र सरकारने ही ३३ टक्क्याच्या आरक्षणाच्या तरतुदीमध्ये वाढ करीत ती ५० टक्के पर्यंत नेली. महिला सक्षमीकरणाच्या अनुषंगाने ही बाब खरोखरच वरदानी ठरली. त्याचा परिणाम हा पंचायत राज व्यवस्थेत महिलांना संधी मिळू लागल्याने ग्रामीण भागातील अनेक महिलांनी ग्रामपंचायत पासून ते जिल्हा परिषद पर्यंत आपल्या कार्यकर्तृत्वाची चूनुक दाखविण्यात कोणतीही कसर सोडली नाही. या सकारात्मक बाबी बरोबरच त्यांच्या कार्यकर्तृत्वावर पुरुषी वर्चस्वाचा प्रभाव असल्याचे नकारात्मक चित्रही दृष्टिक्षेपास पडते. ग्रामीण भागात कुटुंबातील महिला जरी विशिष्ट पद धारण करीत असल्या तरी तिच्या ऐवजी कुटुंबातील इतर पुरुष मंडळी आजही विविध भागात प्रत्यक्ष कारभार करत असल्याची उदाहरणे आहेत. ही बाब निश्चितच स्त्रियांच्या कर्तृत्व सिद्ध करण्यामधील प्रमुख अडथळा निर्माण करणारी ठरत आहे.

स्त्रियांच्या न्याय हक्क व संरक्षण विषयाच्या अनुषंगाने ग्रामीण भागाची शहरी भागाशी तुलना निश्चितच करता येणार नाही. ग्रामीण क्षेत्रात लैंगिक असमानता याविषयीचे चित्र विदारक स्वरूपात आहे. यात स्त्रियांच्या शोषणाचे स्वरूप हे लक्षवेधक ठरते. ग्रामीण भागातील स्त्रिया ह्या गृह कार्यासोबत शेतीविषयक विविध कामे करतानाच मजुरीचेही कामे करीत असतात. मात्र अनेक कुटुंबात पुरुषांच्या वर्चस्वाखाली स्त्रियांना आपले जीवन व्यतीत करावे लागत असल्यामुळे त्यांच्या कोणत्याही कार्यांना वाव मिळत नाही. अशातच अनेक स्त्रिया या कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडत असतात. स्त्रिया सोबत भांडणे त्यांना मारहाण करणे त्यांचा विविध प्रकारे छळ करून घराबाहेर काढणे त्यांच्यावरील आरोप प्रत्यारोप अशा विविध घटना ग्रामीण भागात आजही मोठ्या प्रमाणात घडतात. विशेष म्हणजे अशा परिस्थितीत या स्त्रिया कोणत्या कायद्याचा किंवा सामाजिक नियमांचा आधार घेतांना दिसत नाहीत.

स्त्रियांच्या न्याय व हक्क विषयक संविधानात तरतुदी करतानाच तिच्या प्रगती मधील अडथळयांना दूर करण्याकरिता स्त्रियांच्या संरक्षणविषयक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक कायद्याचीही निर्मिती करण्यात आली. स्त्रियांवर होणारा अन्याय अत्याचार यावर प्रतिबंध घालणे व स्त्रियांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील करून त्यांची उन्नती साध्य करणे असा उदात्त हेतू या तरतुदी व कायद्या मागील आहे. अशातच शासनाद्वारे महिलांच्या स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी वेगवेगळया पातळीवर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात असते तरी मात्र विशिष्ट समाज व त्यातील स्त्रियांपर्यंत या योजनांची माहिती पोचू शकत नाही ही वास्तविकता आहे. स्त्रियांचे शोषण त्यांच्यावरील अत्याचार याला प्रतिबंध घालून त्यांना समाजात प्रतिष्ठेने जगता यावे व त्यांना न्याय व हक्काची समान उपलब्धता व्हावी याकरिता कायद्याची निर्मिती झाली असली तरी आजही स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराची शृंखला खंडित झाल्याचे दिसत नाही. कायदे असूनही त्यातून पळवाटा काढल्या जातात व पीडित व्यक्तीला न्याय मिळत नाही. त्यामुळे स्त्रियांचे हक्क व संरक्षणासाठी कायद्याची निर्मिती करण्यात आली असली तरी त्यातील अंमलबजावणीतील अनेक त्रुटीमुळे कायद्याचे संरक्षण स्त्रियांना प्राप्त होत नाही.

मानवी समूहात स्त्री जातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे त्यामुळे मनुष्यबळाचे सर्वांगीण विकासाच्या दिशेने सामाजिक आर्थिक व राजकीय क्षेत्राला योग्य चालना मिळण्यासाठी स्त्रियांच्या न्यायविषयक हक्काकडे व एकूणच त्यांच्या कार्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. स्त्री ही देशाच्या विकास रुपी रथाच्या दोन चाकापैकी महत्त्वपूर्ण असा चाक आहे. हा विकासरुपी रथ योग्य दिशेने गतिमान होण्यासाठी ही दोन्ही चाके समांतर असणे गरजेचे ठरते. या अनुषंगाने स्त्री-पुरुष असा भेद दूर करून स्त्रियांच्या प्रगतीस पोषक वातावरणाची निर्मिती आणि त्याचे संचालन करणे आणि लैंगिक समतेद्वारे समाजाचे संतुलन साधने यासाठी समाजाने पुरोगामी आणि विवेकी दृष्टिकोन बाळगणे अगत्याचे आहे. वास्तविक पाहता महिला सबलीकरण हा विषय केवळ महिलांच्या हितसंबंधापुरताच मर्यादित नाही तर समस्त पुरुषांच्या व एकूणच मानव मुक्तीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. समाजात स्त्रियांना न्याय, हक्क व प्रतिष्ठा प्राप्तीसाठी त्यांचा सामाजिक, आर्थिक व राजकीय विकास साधण्यासाठी आज महिला सबलीकरणाची नितांत आवश्यकता आहे आणि ही आवश्यकता पुरुषी वर्चस्वाची मानसिकता दूर करूनच पूर्ण होणे गरजेचे आहे.

एकूणच आजही पुरुषप्रधान संस्कृतिच्या वर्चस्वामुळे महिलांकडे, त्यांच्या अधिकाराकडे, व्यक्ती स्वातंत्र्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा संकुचित असल्याचे प्रत्ययास येते. तो दृष्टिकोन बदलण्याची नितांत गरज आहे. स्त्रियांना असमानतेची वागणूक देतांनाच त्यांचा जीवन स्तर उंचावण्याकडे दुर्लक्ष करण्यापासून त्यांचा छळ आणि अत्याचार करण्यापर्यंत अनेक प्रकारे हिनत्वाची वागणूक स्त्री जातीला मिळत राहिली आहे. त्यामुळे स्त्री जातीवर होणारा हा अन्याय दूर करण्यासाठी व स्त्री पुरुष असा भेदभाव न करता स्त्रियांच्या प्रगतीस पोषक वातावरणाची निर्मिती करण्यासाठी आज महिला सक्षमीकरणाचा विचार गांभीर्याने करणे ही काळाची गरज ठरते.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**निष्कर्ष**

१) समाज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे.

२) समाजात पुरुषी मानसिकतेचे वर्चस्व अजूनही कायम दिसून येते.

३) शहरी क्षेत्राच्या तुलनेत ग्रामीण भागात महिलांच्या न्याय व हक्क विषयक स्थिती निराशा जनक आहे.

४) स्त्री जातीवरील होणारा अन्याय व अत्याचार दूर करण्यासाठी स्त्री सक्षमीकरण गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. गोरे अशोक, जून २०००, भारतीय सामाजिक समस्या, विद्या बुक्स पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
2. आगलावे प्रदिप, जुलै २००९, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
3. माने माणिक, १९९७, भारतातील सामाजिक समस्या, विद्या प्रकाशन, नागपूर.
4. mr.vikaspedia.in

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# राष्ट्राच्या आर्थिक विकासात उद्योजकतेचे महत्व

**प्रा.डॉ. श्रीकृष्ण बी.बोढे**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख रा.सु.बिडकर महाविद्यालय हिंगणघाट, जी.वर्धा

**Email** - shreyashribhavan@gmail.com

**Manuscript ID**:

JRD -2025-170506

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 5(II)|

Pp. 21-24

May 2025

**Submitted:** 02 Apr. 2025

**Revised:** 08 Apr. 2025

**Accepted:** 23 May. 2025

**Published:** 31 May. 2025

**सारांश:**

देशाच्या आर्थिक विकासात उद्योजकांची भूमिका महत्त्वाची असते. तो विखुरलेले नैसर्गिक आणि मानवी संसाधने गोळा करतो. नावीन्यपूर्णतेद्वारे त्यांचा सर्वोत्तम वापर करतो. म्हणजेच उद्योजकता प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे रोजगार संसाधने निर्माण करून लाखो लोकांना रोजगार प्रदान करते, सामाजिक स्थिरता आणते. मागास भागात उद्योग उभारून उद्योगांचा संतुलित प्रादेशिक विकास साधला जातो. सर्वोत्तम आणि उर्वरित उत्पादन करून, ते निर्यात वाढवते. परदेशी बाजारपेठेतील स्पर्धेला तोंड देण्यासाठी, उद्योजक कमीत कमी किमतीत परदेशी उत्पादनांपेक्षा चांगली आणि अधिक उपयुक्त उत्पादने नाविन्यपूर्ण आणि उत्पादन करून आयातीत लक्षणीय घट आणतो, ज्यामुळे आयात प्रतिस्थापन होते आणि त्यामुळे देशाचे मौल्यवान परकीय चलन वाचते. उद्योजक आवश्यकतेपेक्षा जास्त उत्पादन करतो आणि जास्तीचे निर्यात करतो, ज्यामुळे देशासाठी मौल्यवान परकीय चलन मिळते. अशाप्रकारे उद्योजक आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. प्रस्तुत शोधलेखात राष्ट्राच्या आर्थिक विकासात उद्योजकतेचे महत्व विशद करण्यात आलेले आहे.

**बिज शब्द:** आर्थिक विकास, उद्योजकता, मानवी संसाधने,रोजगार

## प्रस्तावना:

आर्थिक विकास म्हणजे अशी प्रक्रिया ज्याद्वारे देशाचे दरडोई उत्पन्न आणि एकूण उत्पन्न ठराविक कालावधीत वाढते. देशाच्या औद्योगिकीकरण आणि आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत उद्योजक उत्प्रेरकाची भूमिका बजावतात. सध्याच्या युगात, उद्योजकाला आर्थिक विकासाचा कर्णधार मानले जाते. देशाच्या आर्थिक विकासाचे चक्र उद्योजकांच्या कृतींमुळे सुरू होते. उद्योजक हा प्रत्येक अर्थव्यवस्थेत मुख्य कामगार असतो कारण त्याच्याशिवाय अर्थव्यवस्था पुढे जाऊ शकत नाही. हे देशाच्या नैसर्गिक, आर्थिक, मानवी आणि तांत्रिक संसाधनांचा संग्रह करते आणि देशाच्या आर्थिक विकासासाठी त्यांचा वापर करते. आधुनिक युगातील सर्वात गंभीर समस्या म्हणजे सतत वाढत जाणारी बेरोजगारी, विशेषतः सुशिक्षित बेरोजगारी, जी आज जागतिक स्वरूप धारण करत आहे. अविकसित आणि विकसनशील देशांमध्ये, आपल्याला गरिबी, अज्ञान, प्रभाव, रोग, सामाजिक निराशा, निराशा, संताप, जघन्य गुन्हे, कमी राहणीमान, भूक आणि आर्थिक गुन्हे अशा अनेक आर्थिक समस्या दिसतात. बेरोजगारी म्हणजे अशी परिस्थिती ज्यामध्ये एखादी व्यक्ती सध्याच्या वेतन दराने काम करण्यास तयार असते परंतु त्याला काम मिळत नाही. भारतात उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संधी केवळ ५ ते १०% बेरोजगारांना रोजगार देऊ शकत आहे. ही तफावत वाढतच आहे, ज्यामुळे बेरोजगारीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**

*प्रा.डॉ. श्रीकृष्ण बी.बोढे*

*अर्थशास्त्र विभाग प्रमुख रा.सु.बिडकर महाविद्यालय हिंगणघाट, जी.वर्धा*

**How to cite this article:**

*बोढे, . श्रीकृष्ण . बी . (2025). राष्ट्राच्या आर्थिक विकासात उद्योजकतेचे महत्व. Journal of Research & Development, 17(5(II)), 21–24. https://doi.org/10.5281/zenodo.15817281*

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.15817281

OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

आपल्या देशात दरवर्षी वाढणाऱ्या बेरोजगारीच्या समस्येने केवळ राष्ट्रीय व्यवस्थेलाच हादरवून सोडले नाही तर आपल्या नियोजित विकास प्रक्रियेवरही प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. जर या समस्येचे निराकरण करण्यासाठी त्वरित योग्य पावले उचलली गेली नाहीत, तर तो दिवस दूर नाही जेव्हा देशाची संपूर्ण रचना संकटात येईल आणि देशाचे स्वातंत्र्य धोक्यात येईल.

बेरोजगारीची समस्या सोडवण्यासाठी उद्योजकता हा सर्वात महत्त्वाचा मार्ग आहे. उदाहरणार्थ, समजा एखादे सरकार विविध विभागांमध्ये १०० नोकऱ्या निर्माण करते म्हणजेच देते. यापैकी फक्त १०० बेरोजगारांना रोजगार मिळतो आणि ते ३०-४० वर्षे नोकरीत राहतात. त्यानंतर ते निवृत्त होतात आणि त्यामुळे नोकरी पुन्हा रिक्त होते. ज्यावर नवीन अर्जदारांची नियुक्ती केली जाते.

अशाप्रकारे नवीन अर्जदारांची नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरू राहते.

जर हे १०० लोक उद्योजक झाले तर ते केवळ स्वतःसाठी रोजगार उपलब्ध करून देऊ शकतील असे नाही तर शेकडो बेरोजगारांनाही रोजगार उपलब्ध करून देऊ शकतील.

जसजसा काळ जाईल तसतसे त्यांचा व्यवसाय वाढवून ते अधिकाधिक लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे रोजगार देऊ शकतील. या दृष्टिकोनातून, उद्योजकता हा बेरोजगारीच्या समस्येला तोंड देण्याचा आणि सोडवण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे.

**उद्योजकता विकास कार्यक्रम:**

उद्योजकता विकास म्हणजे व्यवसाय यशस्वीरित्या सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या उद्योजकीय कौशल्यांचा आणि बुद्धिमत्तेचा समग्र विकास.

आर्थिक विकासात उद्योजकतेची भूमिका शब्दात वर्णन करता येणार नाही कारण ती देशांच्या अर्थव्यवस्थांना पुढे नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

उद्योजक म्हणून आपला प्रवास सुरू करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनेक उद्योजकता अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. ते सतत अनुभवी व्यावसायिकांकडून वैयक्तिक मार्गदर्शन आणि ज्ञान घेतात. आजच्या वेगवान अर्थव्यवस्थेत, आर्थिक वाढ आणि व्यावसायिक प्रगती साध्य करण्यासाठी उद्योजकता विकास आवश्यक आहे.

उद्योजकता विकास कार्यक्रम व्यक्तींना त्यांच्या कल्पना यशस्वी व्यवसायात रूपांतरित करण्यास अनुमती देतात. या कार्यक्रमांमध्ये व्यापक व्यवसाय नियोजन,

विपणन धोरणे, सर्जनशीलता, टीमवर्क कौशल्ये, संवाद, आर्थिक व्यवस्थापन इत्यादींचा समावेश आहे. उद्योजकता विकास कार्यक्रम हे शैक्षणिक उपक्रम आहेत जे इच्छुक उद्योजकांना त्यांचे यशस्वी व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि महत्त्वाची कौशल्ये प्रदान करतात.

हे उद्योजकीय प्रगतीला चालना देण्यास आणि नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करण्यास मदत करते. हे कार्यक्रम समग्र ज्ञान प्रदान करतात ज्यामध्ये व्यवसाय कौशल्यांचे व्यापक प्रशिक्षण, निधी संधी, नेटवर्किंग कनेक्शन, अनुभवी मार्गदर्शकांची उपलब्धता,

परस्परसंवादी कार्यशाळा इत्यादींचा समावेश आहे. विद्यार्थी कोचिंग, ऑनलाइन प्लॅटफॉर्म आणि उद्योग व्यावसायिकांच्या मार्गदर्शनाखाली उद्योजकता विकास कार्यक्रम देणाऱ्या महाविद्यालये आणि विद्यापीठांद्वारे उद्योजकता विकास कार्यक्रमांमध्ये सहजपणे प्रवेश करू शकतात.

उद्योजकता अभ्यासक्रमात व्यवस्थापन कौशल्ये, उद्योजकतेचा सामान्य परिचय, प्रेरणा प्रशिक्षण, नियोजन भेटी, धोरणात्मक व्यवसाय नियोजन,

बाजार विश्लेषण इत्यादी सर्व आवश्यक बाबींचा समावेश आहे. या व्यापक कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन, विद्यार्थी व्यावसायिक नेटवर्क तयार करण्यासाठी मौल्यवान कौशल्ये आणि ज्ञान शिकतात

**उद्योजकतेचे महत्व:**

**रोजगार निर्मिती:-**

उद्योजकता प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे रोजगार निर्माण करते. ते प्रत्यक्षपणे लोकांमध्ये काम करण्याची इच्छा निर्माण करते आणि अप्रत्यक्षपणे मोठ्या आणि लहान व्यवसाय युनिट्सची स्थापना करून लाखो लोकांना रोजगार प्रदान करते. अशाप्रकारे देशातील बेरोजगारीची समस्या सोडवण्यात उद्योजकता खूप महत्त्वाची भूमिका बजावते.

**देशाचे दरडोई उत्पन्न वाढ:**

उद्योजक नेहमीच नवीन व्यवसाय संधींच्या शोधात असतो. एक उद्योजक रिकामी जमीन, श्रम, भांडवल, संघटना आणि धैर्य यांचे राष्ट्रीय उत्पन्नात रूपांतर करतो जे दरडोई उत्पन्नात वाढ होण्याच्या स्वरूपात दिसून येते.

**भांडवल निर्मितीत मदत करते:-**

उद्योजक देशात इकडे तिकडे विखुरलेले भांडवल प्रमाणात गोळा करतो आणि सार्वजनिक ठेवी आणि सिक्युरिटीजच्या स्वरूपात व्यवसायात गुंतवतो. कोणत्याही उद्योगात सार्वजनिक ठेवींची गुंतवणूक केल्याने देशाच्या संसाधनांचा कार्यक्षम वापर होतो

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

आणि बांधकामाचा वेग वाढतो, जो देशाच्या जलद आर्थिक विकासासाठी आवश्यक आहे. अशाप्रकारे उद्योजक हा भांडवलाचा संचयक नसून भांडवल निर्माण करणारा असतो.

**संतुलित प्रादेशिक विकास:-**

उद्योजकता सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांच्या विकासाद्वारे देशातील आर्थिक विकासातील असमानता कमी करते. मागासलेल्या भागात उद्योग उभारून उद्योजकांना राज्य आणि केंद्र सरकारकडून मदत मिळते. अशी अनेक उदाहरणे आहेत जिथे सरकारी मदत मिळवण्यासाठी देशातील सर्वात मोठ्या उद्योजकांनी खूप मागासलेल्या ठिकाणी त्यांचे कारखाने उभारले आहेत.

**राहणीमानात सुधारणा:**

एक उद्योजक व्यवसाय सुरू करून आवश्यक वस्तूंच्या कमतरतेवर मात करण्याचा प्रयत्न करतो आणि बाजारात नवीन आणि चांगल्या दर्जाची उत्पादने पुरवतो. लघु उद्योगांच्या मदतीने उद्योजकता सामान्य माणसाचे जीवनमान उंचावते. उद्योजक कमीत कमी किमतीत ग्राहकांच्या वापरासाठी विविध वस्तूंचे उत्पादन करतात.

**आर्थिक स्वातंत्र्य:**

देशाच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी उद्योजकता हा एक अत्यंत आवश्यक घटक आहे. उद्योजक देशात चांगल्या दर्जाच्या परदेशी उत्पादनांचे उत्पादन करण्यास प्रोत्साहन देतो. परदेशी बाजारपेठेतील स्पर्धेला तोंड देण्यासाठी, उद्योजक कमीत कमी खर्चात परदेशी उत्पादनांपासून अधिक उपयुक्त उत्पादने बनवण्याचा प्रयत्न करतो, ज्यामुळे देशासाठी मौल्यवान परकीय चलनाची बचत होते. हाच उद्योजक गरजेपेक्षा जास्त उत्पादन करतो आणि निर्यातही करतो, ज्यामुळे देशाला मौल्यवान परकीय चलन मिळते. देशाला आर्थिक स्वातंत्र्य मिळविण्यात मदत करण्यासाठी ही निर्यात प्रोत्साहन निर्णायक भूमिका बजावते.

**सर्जनशीलता आणि नवोन्मेष:**

सर्जनशीलता ही नवोन्मेषाची प्राथमिक आवश्यकता आहे. ही एक अद्भुत प्रक्रिया आहे ज्याची अंमलबजावणी केवळ तीक्ष्ण मेंदूनेच शक्य आहे. सर्जनशील शक्तीशिवाय आर्थिक विकास शक्य नाही. सर्जनशील शक्ती म्हणजे नवोपक्रम घडवून आणण्याची क्षमता. नवोपक्रम म्हणजे काहीतरी नवीन आणण्याची प्रक्रिया देखील आहे.

सर्जनशीलता आणि नवोपक्रम यातील मूलभूत फरक असा आहे की सर्जनशीलता ही क्षमता बाळगण्याशी संबंधित आहे, तर नवोपक्रम नवीन काम करण्याशी संबंधित आहे. सर्जनशील शक्तीचे उपयुक्त उत्पादने आणि सेवांमध्ये रूपांतर झाल्याशिवाय तिचे कोणतेही मूल्य नाही. हे काम नवोपक्रमाद्वारे साध्य होते.

या दृष्टिकोनातून, सर्जनशील शक्ती ही नवोपक्रमाची प्राथमिक आवश्यकता बनली. अशाप्रकारे नवोन्मेष सर्जनशील शक्तीचा वापर करतो ज्यामुळे देशाचा आर्थिक विकास शक्य होतो.

**नवोपक्रमाला प्रोत्साहन:**

उद्योजक संशोधन आणि तपासावर जास्त भर देऊन समाजात नवोपक्रमाला प्रोत्साहन देतो. उद्योगात नवीन उत्पादने, नवीन उत्पादन पद्धती, नवीन यंत्रसामग्री, नवीन कच्चा माल, नवीन तंत्रज्ञान, नवीन उद्योग इत्यादींच्या निर्मितीला प्रोत्साहन देणारा उद्योजकच असतो. बदलाची जोखीम पत्करूनही तो समाजात नवीन बदल आणि नवोपक्रम आणतो.

**नवीन व्यवसाय आणि उद्योगांची स्थापना आणि विस्तार:-**

उद्योजकांमुळेच समाजात नवीन व्यवसाय आणि उद्योग स्थापन होतात. उद्योजक उत्पादनाच्या घटकांना उत्पादक क्रियाकलापांकडे वळवतो. आणि एंटरप्राइझचा विस्तार करून वाढीचा वेग वाढवते. उद्योजकाच्या नेतृत्वाशिवाय सर्व संसाधने निष्क्रिय राहतात. कोणताही व्यवसाय किंवा उद्योग स्थापन करण्याचा निर्णय घेणे हे खूप धोकादायक आणि कठीण काम असते. आपल्याला प्रत्येक क्षणी अडचणींना तोंड द्यावे लागते. अशा परिस्थितीत, उद्योजक व्यवसाय आणि उद्योग उभारणीच्या विविध पैलूंचा विचार करून नावीन्यपूर्णतेचा वापर करून एक विवेकपूर्ण योजना बनवतो. यासाठी उद्योजकाकडे तांत्रिक आणि धोरणात्मक ज्ञानाबरोबरच दूरदृष्टी, कल्पनाशक्ती, अदम्य धैर्य, उत्साह, संयम इत्यादी विविध वैयक्तिक गुण असणे आवश्यक आहे. कोणताही नवीन व्यवसाय किंवा उद्योग स्थापन करण्यासाठी आणि सुरू करण्यासाठी, उद्योजकाला व्यवसायाच्या संधी शोधण्यापासून ते उत्पादन सुरू करण्यापर्यंत विविध उपक्रम करावे लागतात. नवोपक्रमाद्वारे, उद्योजक विविध उपक्रम पूर्ण करून केवळ व्यवसाय आणि उद्योग स्थापित करत नाही तर व्यवसायाचा विस्तार देखील करतो, ज्यामुळे अधिकाधिक बेरोजगारांना रोजगार मिळतो.

**निर्यात प्रोत्साहन आणि आयात प्रतिस्थापनात योगदान:-**

निर्यात प्रोत्साहनामध्ये देशात उत्पादित उत्पादने आणि सेवांचा समावेश होतो. उत्पादने आणि सेवा देशात वापरण्यासाठी आणि निर्यातीसाठी तयार केल्या जातात. लोकसंख्या वाढ आणि राहणीमान उंचावल्याने देशांतर्गत मागणी वाढते. नवोपक्रमाद्वारे उत्पादनांच्या प्रमाणात आणि विविधतेत सुधारणा केल्याने परदेशात त्यांची मागणी वाढते.

ही सतत वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी, उत्पादनाचे प्रमाण वाढवावे लागेल, ज्यामुळे अधिकाधिक उद्योजकांची आवश्यकता निर्माण होते. उद्योजक शेकडो आणि लाखो बेरोजगारांना रोजगार देतात.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

सध्या भारतात आयात प्रतिस्थापनाची प्रगती समाधानकारक आहे. आमचे उद्योजक परदेशातून आयात केलेल्या वस्तूंच्या निर्मितीवर विशेष भर देत आहेत. या दिशेने आम्हाला परदेशी उद्योजकांकडूनही पाठिंबा मिळत आहे.

ते पूर्वी भारतात निर्यात केलेल्या वस्तूंसाठी भारतीय उद्योजकांसोबत भागीदारीत उद्योग उभारत आहेत. देशात त्यांचे उत्पादन करून, आपल्या देशाच्या गरजा पूर्ण होतीलच, शिवाय त्या परदेशात निर्यातही करता येतील.

**उद्योजकतेला चालना देण्यासाठी सूचना:**

एकंदरीत, रहिवाशांमध्ये उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी समुदाय अनेक गोष्टी करू शकतात. शहरी आणि ग्रामीण दोन्ही समुदायांमध्ये उच्च-वृद्धी करणारे उद्योजक तयार करण्यासाठी या सूचना उपयुक्त आहेत. उच्च-वाढीचे उद्योजक बनण्यासाठी आवश्यक असलेले तांत्रिक आणि व्यवस्थापकीय कौशल्ये (उदा. व्यवसाय नियोजन) विकसित करण्यास मदत करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम प्रदान करण्यासाठी समुदाय ना-नफा आणि सरकारी संस्थांसोबत भागीदारी करू शकतात. यापैकी बरेच कार्यक्रम विद्यापीठाच्या विस्तार कार्यक्रमांद्वारे दिले जातात ज्यांनी समुदायांसाठी अभ्यासक्रम आणि प्रशिक्षण विकसित केले आहे. समुदाय स्थानिक उद्योजकांना विकसित होण्यासाठी आणि समर्थन नेटवर्कमध्ये स्वतःला समाविष्ट करण्यासाठी संधी प्रदान करू शकतात.

सपोर्ट नेटवर्क हे औपचारिक किंवा अनौपचारिक लोकांचे गट असू शकतात जे उद्योजकांना भागीदारी, कर्मचारी, भांडवल आणि इतर व्यवसाय सेवांशी जोडण्यास मदत करतात. स्थानिक समर्थन नेटवर्क असणे देखील उद्योजकीय वातावरण निर्माण करण्यास मदत करू शकते. समुदायांनी असे वातावरण निर्माण केले पाहिजे जे उद्योजकतेला करिअर पर्याय आणि आर्थिक विकास धोरण म्हणून ओळखते.

हे करण्याचा मार्ग म्हणजे स्थानिक उद्योजकांना महत्व देणे जेणेकरून उद्योजकतेची ओळख वाढेल. तरुणांना उद्योजकतेची ओळख करून द्या. समुदायांनी तरुणांना त्यांच्या समुदायातील उद्योजकांशी जोडले पाहिजे. तरुणांना उच्च-स्तरीय कौशल्ये, शिक्षण आणि नोकरीच्या संधी ज्या समुदायात आहेत त्यांच्याशी जोडता याव्यात यासाठी युवा कार्यक्रम आणि शैक्षणिक संधी स्थानिक संदर्भाशी सुसंगत बनवल्या पाहिजेत. तरुण उद्योजकता शिकण्यासाठी अनुभवात्मक आणि व्यावहारिक काम फायदेशीर आहे, कारण तरुणांना या प्रक्रियेत सहभागी होऊन उद्योजकीय अनुभव मिळतो.

**समारोप:**

आर्थिक विकासात उद्योजकतेची भूमिका नवीन व्यवसायांना चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. विद्यार्थ्यांसाठी, उद्योजकता विकास कार्यक्रमांमध्ये सहभागी झाल्याने त्यांना व्यावहारिक मदतीसह मौल्यवान अंतर्दृष्टी मिळू शकते. उद्योजकता म्हणजे एखाद्या व्यवसायाचा किंवा फर्मचा विकास जो एखाद्याच्या समुदायात आर्थिक वाढ निर्माण करतो. बहुतेक उद्योजक तीन उद्योगांपैकी एका क्षेत्रात काम करतात: उत्पादन, किरकोळ विक्री आणि सेवा, तर तंत्रज्ञान आणि मूल्यवर्धित शेती यासारखे नवीन क्षेत्र वेगाने वाढत आहेत. उद्योग कोणताही असो, सर्व उद्योजकतेचा एक सामान्य घटक म्हणजे नवोन्मेष. नवीन व्यवसाय हे उद्योजकांच्या नवोपक्रमाचे प्रतिबिंब असतात जे काहीतरी नवीन निर्माण करतात किंवा बाजारपेठ बदलतात. उद्योजक हे समाजातील समस्या सोडवणारे असतात. ते त्यांच्या समुदायातील गरज ओळखतात आणि ती गरज सोडवण्यासाठी धोरणे विकसित करतात. उद्योजक एखाद्या समस्येवर उपाय विकसित करू शकतात, परंतु नंतर त्यांच्या समुदायाच्या सतत बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी उपायांमध्ये सतत बदल देखील करतात. यामुळे उद्योजक यशस्वी होतात आणि त्यांची भरभराट सुरू राहते. म्हणूनच कोणत्याही देशाच्या आर्थिक विकास करिता उद्योजकता विकास आवश्यक आहे.

**संदर्भ-सूची:**

1. कार्लैंड, जे.डब्ल्यू., होय, एफ., बौल्टन, डब्ल्यू.आर., और कार्लैंड, जे.ए.सी. (1984). उद्यमियों को छोटे व्यवसाय मालिकों से अलग करना: एक अवधारणा. एकेडमी ऑफ मैनेजमेंट रिव्यू , 9 (2), 354–359.
2. एरायडिन, ए., तसन-कोक, टी., और ब्रानकेन, जे. (2010). अप्रवासी उद्यमिता और शहरों के आर्थिक प्रदर्शन में सामाजिक एकीकरण के विभिन्न रूपों का योगदान. यूरोपीय योजना अध्ययन , 18 (4), 521–543.
3. ग्लिंका, बी., और ब्रज़ोज़ोस्का, ए. (2015). अप्रवासी उद्यमी: पहचान की तलाश में. उद्यमी व्यवसाय और अर्थशास्त्र समीक्षा, 3(4), 51–76.
4. हेंडरसन, जे. (2002). उच्च विकास उद्यमियों के साथ ग्रामीण अर्थव्यवस्था का निर्माण. आर्थिक समीक्षा-फेडरल रिजर्व बैंक ऑफ कैनसस सिटी , 87 (3), 45.
5. होलमैन, डी. (2000). यू.के. में प्रबंधन शिक्षा के समकालीन मॉडल. प्रबंधन शिक्षा , 31 (2), 197–217.
6. हसीह, सी., निकर्सन, जे.ए., और ज़ेंगर, टी.आर. (2007). अवसर की खोज, समस्या समाधान और उद्यमी फर्म का सिद्धांत. जर्नल ऑफ़ मैनेजमेंट स्टडीज़ , 44 (7), 1255–1277.

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर : दलित स्वातंत्र्याचा ऐतिहासिक टप्पा – एक विश्लेषणात्क अध्ययन

**श्री. संजय चंद्रभान मेश्राम**[1]
[1]आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय,देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली
**प्रा. डॉ. विठ्ठल चव्हाण**[2]
[2]समाजशास्त्र विभाग, मार्गदर्शक समाजशास्त्र विभाग प्रमुख देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली
**Email-**sanjaymeshram100@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-170507
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 25-29
May 2025
**Submitted:** 02 Apr. 2025
**Revised:** 08 Apr. 2025
**Accepted:** 23 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे बौद्ध धर्मात धर्मांतर हे भारतीय सामाजिक इतिहासातील एक क्रांतिकारी व निर्णायक टप्पा होता. हे धर्मांतर केवळ एका व्यक्तीचे वैयक्तिक धार्मिक परिवर्तन नव्हते, तर ते संपूर्ण दलित समाजाच्या सामाजिक, धार्मिक आणि मानसिक मुक्तीचे प्रतीक होते. बाबासाहेबांनी बालपणापासूनच अस्पृश्यतेचा कटू अनुभव घेतला होता. त्यांनी आपल्या अभ्यास, विचार आणि कृतीच्या माध्यमातून जातिव्यवस्थेविरुद्ध आवाज उठवला. अनेक प्रयत्न करूनही हिंदू धर्मात समतेचे स्थान मिळत नसल्यामुळे त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की "मी हिंदू म्हणून जन्मलो, ही माझी चूक नव्हतीय पण हिंदू म्हणून मरणार नाही." डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्माची निवड केली कारण तो एक समतेवर आधारित, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेला धर्म आहे. बौद्ध धर्मात कोणतीही जात नाही, वेदांचा अधिकार नाही, कोणतेही कर्मकांड नाहीत आणि सगळ्या मानवजातीला समानतेने वागवले जाते. अशा धर्माचा स्वीकार करून बाबासाहेबांनी एक नवा सामाजिक संदेश दिला. या ऐतिहासिक धर्मांतरानंतर लाखो दलितांनी बौद्ध धर्म स्वीकारला. यामुळे त्यांना एक नवी ओळख, आत्मविश्वास आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळाली. बाबासाहेबांच्या या कृतीने दलित समाजाच्या चळवळीत नवचैतन्य निर्माण झाले. धर्मांतर ही बाबासाहेबांनी केलेली केवळ धार्मिक निवड नव्हती, तर ती सामाजिक क्रांतीची प्रक्रिया होती, जी दलित समाजाला एक नवीन जीवनदृष्टी आणि स्वातंत्र्याच्या दिशेने चालण्याची प्रेरणा देणारी होती. या घटनेचा परिणाम फक्त तात्कालिक न राहता, पुढील अनेक वर्षांपर्यंत जाणवला. दलित साहित्य, चळवळी, राजकारण आणि समाजकार्य यावर या धर्मांतराचा खोलवर प्रभाव पडला. बाबासाहेबांचे धर्मांतर हे दलित समाजाच्या स्वातंत्र्याची आणि आत्मसन्मानाची सुरुवात होती. त्यामुळे ही घटना भारतीय इतिहासात दलित स्वातंत्र्याचा एक ऐतिहासिक टप्पा म्हणून कायमच लक्षात राहील.

**कळीचे शब्द (Key Words) :**धर्मांतर, क्रांतिकारी, वैज्ञानिक, कर्मकांड, प्रतिष्ठा, ऐतिहासिक, स्वातत्र्याचा, गुलामगिरी, अस्पृश्यता, विद्रोह, अंधश्रद्धा, परिवर्तन, आत्मसन्मान, मुल्यव्यवस्था, क्षण, प्रेरणास्थान, तात्त्विक, वैचारिक, नैतिक.

**प्रस्तावना :**

भारतीय समाजरचनेत जातिव्यवस्था ही एक अत्यंत खोलवर रुजलेली आणि शतकानुशतकांपासून चालत आलेली सामाजिक रचना आहे. या व्यवस्थेने समाजातील व्यक्तींना जन्मावर आधारित वर्गवारीत विभागले असून, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ही चार वर्णे निर्माण केली. या वर्णव्यवस्थेच्या कक्षेबाहेर ज्यांना स्थान देण्यात आले आणि ज्यांना 'अस्पृश्य' समजले गेले, अशा लोकांचा समावेश 'दलित' या श्रेणीत होतो. दलित समुदाय शतकानुशतकांपासून शोषण, अन्याय, अपमान, आणि बहिष्कार यांचा सामना करत आला आहे. या विषमतेच्या विरोधात उठून उभे राहणारे थोर समाजसुधारक म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर. डॉ. आंबेडकर हे केवळ एक कायदेतज्ज्ञ किंवा संविधानकार नव्हते, तर ते एक द्रष्टे विचारवंत, सामाजिक क्रांतिकारक आणि दलितांच्या मुक्तीसाठी झगडणारे महान नेता होते. त्यांचे संपूर्ण आयुष्य दलित, शोषित, पीडित आणि वंचित घटकांच्या सामाजिक उत्थानासाठी समर्पित होते. त्यांनी आपल्या अनुभवातून आणि सखोल अभ्यासातून समजले की, केवळ कायदा बदलून समाज बदलत नाही, तर विचारांची व मूल्यव्यवस्थेची पुनर्रचना आवश्यक आहे. यासाठी त्यांनी हिंदू धर्मातील अंतर्गत जातिभेद आणि अस्पृश्यतेचा जोरदार विरोध केला. १९३५ मध्ये त्यांनी 'मी हिंदू म्हणून जन्मलो याला माझा दोष नाही, पण हिंदू म्हणून मरणार नाही' अशी ठाम घोषणा केली आणि त्यामुळे एक ऐतिहासिक चळवळ सुरू झाली – धर्मांतर चळवळ. ही घोषणा फक्त वैयक्तिक निर्णय नव्हता, तर दलित

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
**श्री. संजय चंद्रभान मेश्राम ,**आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय,देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली

**How to cite this article:**
मेश्राम संजय चंद्रभान, चव्हाण विठ्ठल. (2025). डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर: दलित स्वातंत्र्याचा ऐतिहासिक टप्पा - एक विश्लेषणात्क अध्ययन. Journal of Research & Development, 17(5(II)), 25–29.
https://doi.org/10.5281/zenodo.15817298

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817298

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

समाजाच्या सामूहिक चेतनेचा उद्गार होता. हिंदू धर्मातील जातीय विषमता आणि दडपशाहीच्या विरोधात त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला, जो समतेवर आधारित आहे. डॉ. आंबेडकरांचे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दीक्षाभूमीवर झालेले बौद्ध धर्मात धर्मांतर ही एक फक्त धार्मिक घटना नव्हे, तर सामाजिक क्रांतीची गूंज होती. लाखो दलितांनी त्यांच्यासोबत धर्मांतर करून गुलामीचे बंध तोडले आणि नव्या विचारप्रणालीच्या दिशेने वाटचाल केली.

**अध्ययन विषयाची उद्दीष्ये :**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
२. धर्मांतरामागील तात्त्विक, सामाजिक आणि वैचारिक कारणांचा शोध घेणे.
३. धर्मांतराच्या प्रक्रियेचे विश्लेषण करणे.
४. धर्मांतराचे दलित समाजावर झालेले सामाजिक, शैक्षणिक आणि मानसिक परिणाम स्पष्ट करणे.
५. धर्मांतराचे भारतीय राजकारणावर झालेले परिणाम तपासणे.
६. धर्मांतर हे दलित स्वातंत्र्याचे एक शक्तिशाली माध्यम कसे? ठरले.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराच्या निर्णयामागे अनेक ऐतिहासिक, सामाजिक आणि वैयक्तिक कारणांची पार्श्वभूमी होती. भारतात शतकानुशतकांपासून चालत आलेली जातिव्यवस्था ही धार्मिक ग्रंथाद्वारे पवित्र मानली गेलेली सामाजिक संरचना होती, ज्यात जन्मावर आधारित माणसाचे स्थान ठरवले जात होते. या व्यवस्थेने दलित किंवा तथाकथित अस्पृश्य समाजाला मानवी हक्कांपासून वंचित ठेवले.

**१. जातिव्यवस्थेची निर्मिती आणि दलितांचे स्थान**

हिंदू धर्मातील वर्णव्यवस्था वेदकाळात उदयास आली. 'मनुस्मृती' सारख्या धर्मग्रंथांनी या वर्णव्यवस्थेला धार्मिक अधिष्ठान दिले. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ही चार वर्णे समाजात कर्तव्यांनुसार विभागली गेली, पण त्याहूनही खाली ज्यांना गणले गेले ते म्हणजे 'अवर्ण' किंवा 'अस्पृश्य' – यांना कोणतीही धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय हक्क प्राप्त नव्हते. दलित समाजावर शतकानुशतकांपासून मंदिरप्रवेश बंदी, सार्वजनिक विहिरी, टाक्या वापरण्यास बंदी, शिक्षण घेण्यावर निर्बंध, सामाजिक बहिष्कार, मानहानीकारक आणि अपमानास्पद वागणूक, रहदारीसाठी वेगळ्या रस्त्यांचा वापर या व्यवस्थेने दलितांमध्ये नैराश्य, पराभूत मानसिकता आणि गुलामगिरीची भावना रोवली. शेकडो वर्षे या समाजाने ही स्थिती सहन केली, पण १९ व्या आणि २० व्या शतकात या विषमतेविरोधात चळवळी सुरू झाल्या.

**२. डॉ. आंबेडकरांचे बालपण आणि सामाजिक अनुभव**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४† एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या गावात महार कुटुंबात झाला. त्यांचे वडील रामजी सकपाल हे ब्रिटिश सैन्यात सुभेदार होते. शिक्षणाच्या बाबतीत घरात चांगला आग्रह होता, पण आंबेडकरांनी लहानपणापासून अस्पृश्यतेचे भयाण वास्तव अनुभवले. शाळेत त्यांना इतर विद्यार्थ्यांपासून वेगळं बसवलं जात होतं. पाणी प्यायचं असेल तर शिक्षकाने त्यांच्यासाठी पाणी ओतावं लागे. स्वत: त्यांना नळाला हात लावता येत नसे. सार्वजनिक वाहतूक, हॉटेल, रेस्टॉरंट्स, धार्मिक स्थळे अशा ठिकाणी त्यांना प्रवेश नाकारला जात असे. या अनुभवांनी त्यांच्या मनात अत्यंत तीव्र वेदना आणि प्रश्न निर्माण होऊन, मानवजन्म घेऊनही आपण इतके अपमानित का? हा प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाला.

**३. शिक्षण आणि जागृतीचा प्रवास**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी शिक्षण घेतलं. एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई आणि पुढे कोलंबिया युनिव्हर्सिटी, युएसए व लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या जागतिक दर्जाच्या संस्थांमधून त्यांनी पदवी व डॉक्टरेट घेतली. शिक्षणाने त्यांच्यात वैचारिक क्रांती घडवली आणि सामाजिक अन्यायाच्या मुळाशी जाण्याची ताकद दिली. डॉ. आंबेडकरांनी स्वत: अनुभवलेल्या जातीय अपमानाचा प्रतिकार करण्यासाठी सामाजिक संघटनांची स्थापना केली. बहिष्कृत हितकारिणी सभा, मूकनायक, जनता, प्रबुद्ध भारत अशा माध्यमांतून त्यांनी दलित चळवळीला नवा आवाज दिला. त्यांनी सत्यशोधक समाजाच्या आणि फुले–शाहूंच्या विचारांची सांगड आधुनिक वैचारिकतेशी घातली.

**४. धर्म आणि जातीय अत्याचार**

आंबेडकरांनी आपल्या लेखनातून आणि भाषणांतून वारंवार दाखवून दिलं की, हिंदू धर्मातील मूलभूत रचना ही जातिव्यवस्थेवर आधारित असून, ती कधीही खऱ्या समतेचा स्वीकार करू शकत नाही. 'मनुस्मृती' हे ग्रंथ अस्पृश्यतेला धार्मिक आधार देतात. त्यामुळे या व्यवस्थेत राहून दलितांनी सन्मान मिळवणे शक्य नाही, हे त्यांना स्पष्टपणे उमगले.

- **धर्मांतराची प्रक्रिया :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मांतर केवळ एका व्यक्तीचे धार्मिक परिवर्तन नव्हते, तर ते एक समाजक्रांतीचे रूप होते. ही प्रक्रिया टप्प्याटप्प्याने विकसित झाली आणि त्यामागे खोल अभ्यास, समाजातील अनुभव, राजकीय रणनीती आणि तात्त्विक विचार होते. धर्मांतर ही डॉ. आंबेडकरांच्या दीर्घकालीन सामाजिक संघर्षाची परिणती होती.

**१. धर्मांतराची पहिली घोषणा (१९३५ – येवला परिषद)**

१९३५ साली नाशिकजवळील येवला येथे झालेल्या सार्वजनिक परिषदेत डॉ. आंबेडकरांनी एक ऐतिहासिक विधान केलं "I was born a Hindu, but I will not die a Hindu." (मी हिंदू म्हणून जन्मलो याला माझा दोष नाही, पण हिंदू म्हणून मरणार नाही.) ही घोषणा म्हणजे दलित चळवळीतील एक निर्णायक टप्पा होता. या विधानाने दलित समाजात प्रचंड खळबळ माजली आणि आत्मपरीक्षण सुरू झालं. या क्षणापासून धर्मांतर ही केवळ शक्यता नव्हे, तर एक नियोजित आंदोलन बनलं.

**२. धर्मांचा तुलनात्मक अभ्यास**

धर्मांतरणाच्या घोषणेनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढची अनेक वर्षे विविध धर्मांचा सखोल अभ्यास केला. ते कोणताही निर्णय घेण्याआधी विश्लेषण, तर्क आणि तत्त्वज्ञानाचा आधार घेत. त्यांनी पुढील धर्मांचा तुलनात्मक अभ्यास केला. इस्लाम धर्मात समतेचा आग्रह असूनही, भारतातील मुस्लीम समाजातही जातींचे अस्तित्व आहे. ख्रिश्चन धर्मात प्रेम व क्षमाशीलतेचे संदेश असूनही, चर्चमध्ये दलित ख्रिश्चनांवर भेदभाव होताना दिसतो.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

शिख धर्मात समतेचा संदेश असला तरी सामाजिक संरचनेत जातिनिहाय भेद काही अंशी दिसून येतो. झरथुष्ट्र (पारशी धर्म) हा धर्म संकुचित समुदायासाठी मर्यादित आहे. बौद्ध धर्मात तर्काधारित, समतावादी, अहिंसेवर आधारित, आणि जातिव्यवस्थेला नाकारणारा आहे. या अभ्यासातून त्यांनी निष्कर्ष काढला की बौद्ध धर्म हा एकमेव धर्म आहे जो निरपेक्ष समतेचा, वैचारिक स्वातंत्र्याचा आणि सामाजिक न्यायाचा पुरस्कार करतो.

**३. बौद्ध धर्माची निवड**

डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्माची निवड करताना पुढील बाबी ध्यानात घेतल्या. बुद्धाचा इतिहास व शिकवण – गौतम बुद्ध हा भारतात जन्मलेला महामानव असून त्याचे धर्मशास्त्र जातिप्रथा, यज्ञकांड, ब्राह्मणवाद यांना नाकारते. तर्क आणि विज्ञानाशी सुसंगती – बौद्ध धर्म अंधश्रद्धांपासून मुक्त असून आत्मा, परमेश्वर, पुनर्जन्म याबाबतीत वैज्ञानिक विचार करते. समता आणि करुणा – बौद्ध धर्म मानवात कोणताही भेद मानत नाही आणि करुणा हे त्याचे मूलभूत तत्त्व आहे.

**४. दीक्षाभूमी, नागपूर : धर्मांतर समारंभ (१४ ऑक्टोबर १९५६)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे दीक्षाभूमीवर एका ऐतिहासिक धर्मांतर सोहळ्याचे आयोजन केले. या दिवशी त्यांनी आणि त्यांच्या पत्नी डॉ. सविता आंबेडकर यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. त्यांच्यासोबत सुमारे चार ते पाच लाख दलित अनुयायांनी बौद्ध धर्म स्वीकारला. धम्म दीक्षा विधी – डॉ. आंबेडकरांनी 'त्रिरत्न' आणि 'पंचशील' यांचे उच्चारण करून नवबौद्ध धर्म स्वीकारला. त्यांनी २२ प्रतिज्ञा दिल्या (उदा. मी ब्रह्मा, विष्णू, महेश यांची पूजा करणार नाही, मी जातिव्यवस्था नाकारतो इत्यादी). त्यांनी स्पष्ट केलं की हे धर्मांतर म्हणजे नवजीवनाची सुरूवात आहे, गुलामगिरीचा शेवट आहे.

**५. धर्मांतरानंतरची कृतीशील चळवळ**

धर्मांतर हे एकदिवसीय कार्यक्रम नव्हता. त्यानंतर आंबेडकरांनी बौद्ध धर्माचे सखोल अभ्यासक्रम लिहिले. त्यांच्या "The Buddha and His Dhamma" या ग्रंथातून त्यांनी बौद्ध तत्त्वज्ञानाचे जनसामान्यांसाठी सुलभ सादरीकरण केलं. ते मृत्युपूर्व काही महिन्यांमध्ये भारतभर धर्मांतर सभा घेत होते. त्यांनी असंख्य लोकांना बौद्ध धम्मात प्रवेश दिला आणि त्यांना संघटित केलं.

**६. बौद्ध धर्माचा नव्याने स्वीकार : 'नवबौद्ध' संकल्पना**

धर्मांतरानंतर 'नवबौद्ध' ही एक नवी सामाजिक व धार्मिक ओळख निर्माण झाली. ही ओळख केवळ बौद्ध धर्मात दीक्षा घेतल्याने नव्हे, तर आंबेडकर विचारधारेशी बांधिलकी दर्शवणारी ओळख होती. नवबौद्ध समुदायाने शिक्षण, स्वावलंबन, संघटन, आत्मसन्मान, आणि सामाजिक सुधारणांकडे लक्ष केंद्रित केले.

**७. धर्मांतर म्हणजे क्रांती**

डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर म्हणजे फक्त धार्मिक बदल नव्हे तर गुलामगिरीवर केलेला विद्रोह, अन्यायाविरुद्ध केलेला आवाज, आणि नवजीवनाचा स्वीकार होता. त्यांनी धर्माच्या माध्यमातून दलितांना एक नवा वैचारिक आणि सामाजिक दृष्टिकोन दिला.

**धर्मांतराचे सामाजिक परिणाम**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धर्म स्वीकारल्याने केवळ धार्मिक परिवर्तन झाले नाही, तर एक व्यापक सामाजिक क्रांतीचा आरंभ झाला. हे धर्मांतर म्हणजे दलित समाजाच्या शतकानुशतके चाललेल्या अस्पृश्यतेच्या, शोषणाच्या, आणि अपमानाच्या विरुद्धचा निर्णायक लढा होता. याचे अनेक स्तरांवर परिणाम झाले, जे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतात :

**१. सामाजिक अस्मिता आणि आत्मसन्मान जागृती**

धर्मांतराने दलित समाजात स्वाभिमानाचे नवे बीज रोवले. 'अस्पृश्य' म्हणून ज्यांचा बहिष्कार होत होता, त्या लोकांनी आता नवबौद्ध म्हणून स्वतंत्र ओळख स्वीकारली. डॉ. आंबेडकरांनी सांगितले की – ''मी हिंदू म्हणून जन्मलो हे माझ्या हातात नव्हते, पण मी हिंदू म्हणून मरणार नाही – हे माझ्या हातात आहे.'' – हा आत्मसन्मानाचा उद्‌गार होता.

**२. जातीच्या अधःपतनातून मुक्ती**

हिंदू धर्मातील जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्थेपासून मुक्ती हे धर्मांतराचे मुख्य उद्दिष्ट होते. बौद्ध धर्मात कोणतीही जात–पात नाही, त्यामुळे दलित समाजाने एक समतेवर आधारित समाजव्यवस्था स्वीकारली. विवाह, भोजन, आणि समाजात वागणूक या बाबतीत बदल झाले.

**३. धार्मिक समता आणि नवीन जीवनशैली**

नवबौद्धांनी हिंदू कर्मकांड, पूजा, आणि रूढी परित्याग करून धम्म, प्रज्ञा, आणि करुणेवर आधारित जीवनशैली अंगीकारली. नवीन संस्कारपद्धती (नवीन विवाहसंस्कार, मृत्यूपरंपरा) रूढ झाली. ''त्रिरत्न'', ''पंचशील'', आणि ''ह्यह्य प्रतिज्ञा'' हे सामाजिक आचरणाचे मार्गदर्शक तत्त्वे ठरले.

**४. शिक्षणाबद्दल जागरूकता**

आंबेडकरांनी नेहमी सांगितले, ''शिका, संघटित व्हा, संघर्ष करा''. धर्मांतरानंतर शिक्षणाचे महत्व नवबौद्ध समाजात अधिक रुजले. अनेक नवबौद्ध कुटुंबांनी मुला–मुलींना शिक्षणासाठी पुढे ढकलले. परिणामी, पुढील पिढ्यांमध्ये डॉक्टर, वकील, शिक्षक, अधिकारी निर्माण झाले.

**५. सामाजिक संघटन आणि एकजूट**

धर्मांतरामुळे दलित समाजात सामाजिक एकजुटीचा नवचैतन्य आला. विविध नवबौद्ध संघटना, केंद्रे, ध्यानशिबिरे, आणि बौद्ध अनुयायींचे मेळावे नियमित होऊ लागले. ''धम्मचक्र प्रवर्तन दिन'' सारखे सार्वजनिक सण आणि उत्सवांनी एकता वाढवली.

**६. रूढी, अंधश्रद्धा आणि कर्मकांड यांचा त्याग**

नवबौद्ध समाजाने देवभोळेपणा, मूर्तिपूजा, अंधश्रद्धा यांचा त्याग केला. त्याऐवजी विज्ञाननिष्ठ, विवेकाधारित विचार आणि मानवतावादी दृष्टिकोन अंगीकारला. यामुळे समाज अधिक प्रगल्भ आणि प्रगतिशील बनू लागला.

**७. स्त्रियांमध्ये बदल**

बौद्ध धर्मात स्त्रियांना पुरुषांच्या समकक्ष स्थान आहे. त्यामुळे धर्मांतरानंतर नवबौद्ध स्त्रियांमध्ये स्वावलंबन आणि आत्मभानाची वाढ झाली. स्त्री–शिक्षण, स्वतंत्र व्यवसाय, आणि सार्वजनिक जीवनात सहभाग वाढला.

**५. सामाजिक संघर्ष आणि विरोध**

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

धर्मांतरामुळे दलित समाजाने आपली वेगळी ओळख निर्माण केल्याने हिंदू समाजातील उच्चवर्णीयांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. काही ठिकाणी नवबौद्धांविरुद्ध सामाजिक बहिष्कार, हिंसाचार, वा भेदभावाच्या घटना घडल्या. परंतु या संघर्षांनी नवबौद्ध समाज अधिक संघटित व सजग झाला.

**९. नवबौद्ध सांस्कृतिक चळवळीचा उदय**

धर्मांतरानंतर अनेक सांस्कृतिक कार्यक्रम, धम्मगीते, वाचनालये, सभागृहांची निर्मिती झाली. लेखक, कवी, नाटककार यांनी बौद्ध धर्म, समता, आणि आंबेडकरी विचारांवर साहित्य निर्मिती केली. दलित साहित्य आणि नवबौद्ध कला चळवळींना बळकटी मिळाली.

- **धर्मांतरणाचे राजकीय परिणाम :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धर्मात धर्मांतर ही घटना केवळ वैयक्तिक धार्मिक कृती नव्हती, तर ती एक राजकीय दृष्टिकोनातून क्रांतिकारी विधान होती. या कृतीने भारतीय राजकारणात दलित समाजाच्या स्थानात मूलगामी बदल घडवून आणले. दलित समाजाच्या आत्मभानातून आणि स्वतंत्र अस्तित्वातून एक नव्या स्वरूपाचे राजकीय आंदोलन आकाराला आले.

**१. दलित राजकारणाची नव्याने मांडणी**

आंबेडकरांनी दिलेल्या संविधानिक अधिकारांच्या जाणीवेने दलित समाजात राजकीय आत्मभान निर्माण झाले. धर्मांतरानंतर दलित मतदारांनी केवळ पारंपरिक पक्षांवर विसंबून न राहता स्वतःचे नेते, पक्ष, आणि धोरणे तयार करायला सुरुवात केली. यामुळे दलित राजकारणाने "भिक्षा नव्हे, हक्कांचा लढा" या भूमिकेकडे वाटचाल केली.

**२. नवबौद्ध मतदारगटाचा उदय**

धर्मांतरानंतर नवबौद्ध समुदाय हा एक स्वतंत्र आणि प्रभावी मतदारगट बनला. विशेषतः महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि कर्नाटक येथे नवबौद्धांचे मतदान निर्णयात निर्णायक ठरू लागले. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी नवबौद्ध हितसंबंधांची दखल घेणे आवश्यक समजले.

**३. बहुजन चळवळींना दिशा**

आंबेडकरांच्या धर्मांतरातून प्रेरणा घेत कांशीराम, मायावती, रामदास आठवले, प्रकाश आंबेडकर यांसारख्या नेत्यांनी दलित–बहुजन चळवळी घडवून आणल्या. BAMCEF, DS-4, आणि BSP यांसारख्या चळवळींना आंबेडकर विचार व धर्मांतर ही राजकीय प्रेरणा ठरली."बहुजन हिताय, बहुजन सुखाय" हे बौद्ध वचन राजकारणाचे घोषवाक्य बनले.

**४. राज्यसंस्थेची संवेदनशीलता वाढली**

नवबौद्ध समाजाच्या संघटनामुळे शासनाला त्यांची मागणी, हक्क, आणि अधिकार याची दखल घ्यावी लागली. अनुसूचित जाती–सजगता योजना, दलित कल्याण विभाग, बौद्ध महोत्सव अशा उपक्रमांना गती मिळाली. सामाजिक न्याय मंत्रालय यासारख्या संस्था अधिक सक्रिय झाल्या.

**५. विरोध आणि राजकीय ध्रुवीकरण**

आंबेडकरांच्या धर्मांतरामुळे हिंदू संघटनांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. धर्मांतराच्या विरोधात काही संघटनांनी घरवापसी, धर्मांतरविरोधी कायदे, आणि सांस्कृतिक राष्ट्रवाद यावर भर दिला. परिणामी धर्म, जाती आणि राजकारण याचं ध्रुवीकरण वाढले.

**६. आंतरराष्ट्रीय राजकारणात चर्चा**

धर्मांतराची चर्चा मानवाधिकार पातळीवर जागतिक समुदायात झाली. आंबेडकरांचा लढा हे धर्माच्या आधारावर होणाऱ्या भेदभावाविरुद्धचे प्रतीक बनले. भारतातील जाति–धर्मावर आधारित भेदभावावर यामुळे आंतरराष्ट्रीय लक्ष वेधले गेले.

**७. नवबौद्ध नेतृत्वाची निर्मिती**

धर्मांतरानंतर अनेक नवबौद्ध तरुण राजकीय क्षेत्रात उतरले, ज्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा, आणि संसदेमध्ये सहभाग घेतला. नवबौद्ध नेतृत्वाने दलित समाजाच्या मागण्या संसदेत मांडायला सुरुवात केली. त्यामुळे, दलित राजकारण स्वतंत्र अस्तित्व म्हणून विकसित झाले.

**८. समतेच्या राजकारणाचा प्रचार**

धर्मांतरामुळे भारतीय राजकारणात समता, न्याय, आणि बंधुता या मूल्यांचा पुनःउच्चार झाला. बौद्ध धर्माच्या तत्त्वज्ञानावर आधारित एक नव–नैतिक राजकारण घडवण्याचा प्रयत्न झाला. 'धम्मराज्य' ही संकल्पना एका नव्या राजकीय आदर्शाची सुरुवात होती.

**९. प्रतीकवाद आणि सार्वजनिक सणांची राजकारणात एन्ट्री**

धम्मचक्र प्रवर्तन दिन, आंबेडकर जयंती, बौद्ध उत्सव यांना राजकीय प्रतिष्ठा प्राप्त झाली. सर्वच पक्ष या सणांना उपस्थित राहू लागले, तेथे घोषणा करू लागले – जे नवबौद्धांना समजून घेण्याचा राजकीय प्रयत्न होता. परिणामी, हे उत्सव निवडणूक राजकारणाच्या दृष्टिकोनातूनही महत्त्वाचे ठरले.

**निष्कर्ष**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर हे दलित स्वातंत्र्याच्या इतिहासातील एक निर्णायक आणि क्रांतिकारी टप्पा ठरला. त्यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला, आणि या कृतीने सामाजिक, धार्मिक आणि राजकीय स्तरावर मोठा परिणाम घडवला. हे धर्मांतर केवळ धार्मिक बदल नव्हते, तर दलित समाजासाठी सन्मान, आत्मसन्मान आणि समतेकडे वाटचाल करणारा एक क्रांतिकारी निर्णय होता. आंबेडकरांनी हिंदू धर्मातील जातिव्यवस्थेचा कठोर विरोध केला होता, कारण ती व्यवस्था दलितांना शतकानुशतके दुय्यम मानत होती. त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला, कारण हा धर्म समतेचा, करुणेचा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार करतो. त्यांच्या धर्मांतरामुळे लाखो दलितांनी मानसिक गुलामगिरीतून मुक्ती अनुभवली आणि नव्या ओळखीची सुरुवात केली. धर्मांतरानंतर दलित समाजात नवचैतन्य निर्माण झाले. शिक्षण, संघटन, सामाजिक सुधारणांच्या चळवळींना चालना मिळाली. या घटनेने केवळ भारतातच नव्हे तर आंरराष्ट्रीय स्तरावरही दलितांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पाऊल दलित समाजाच्या सक्षमीकरणासाठी एक प्रेरणास्त्रोत बनले. शेवटी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर हे एका व्यक्तीचे नाही, तर संपूर्ण समाजाच्या आत्मसन्मानाची पुनर्स्थापना होती. हे परिवर्तन केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक न्याय, मानवता आणि समतेच्या मूल्यांवर आधारित होते. त्यामुळे हे धर्मांतर दलित स्वातंत्र्याच्या इतिहासात एक मीलाचा दगड मानले जाते.

**संदर्भसूची :**

१. डॉ. आगलावे प्रदीप, समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन पुणे
२. कांबळे अरूण, धर्मांतराची भीमगर्जना, प्रतिमा प्रकाशन पुणे

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

३. खैरमोडे चांगदेव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळचळीची पार्श्वभूमी, श्रीविद्या प्रकाशन पुणे
४. खैरमोडे चांगदेव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर : अस्पृश्यांचा उध्दारक, सुगावा प्रकाशन पुणे
५. डॉ. खरात श्शंकरराव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धर्मांतर आंदोलन, क्षतिज प्रकाशन, पुणे
६. मुणगेकर भालचंद्र, धम्मक्रांतीचा इतिहास, साहित्यमित्र प्रकाशन, मुंबई
७. जगताप सुरेंद्र, धम्म आणि आंबेडकरी चळवळ, सिद्धार्थ बुक्स, नागपूर

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# पर्यटन: पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि समाज यांच्यावर प्रभाव

**प्रा.योगेश कांचन खंडेराव पाटील**
अध्यापक महाविद्यालय अरण्येश्वर पुणे ०९
**Email** yogaru17@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-170508
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 5(II)|
Pp. 30-32
May 2025

**Submitted:** 02 Apr. 2025
**Revised:** 08 Apr. 2025
**Accepted:** 23 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**गोषवारा:**

आर्थिक संधी आणि सांस्कृतिक देवाणघेवाण देणारा, पर्यटन हा एक महत्त्वाचा जागतिक उद्योग म्हणून उदयास आला आहे. तथापि, त्याच्या अनियंत्रित वाढीमुळे पर्यावरणाचा ऱ्हास आणि सामाजिक व्यत्यय येऊ शकतो. हा लेख पर्यटन, पर्यावरण आणि समाज यांच्यातील गुंतागुंतीचे नाते तपासतो. हे पर्यावरण आणि स्थानिक समुदायांवरील नकारात्मक परिणामांना संबोधित करताना पर्यटनाच्या सकारात्मक आर्थिक आणि सांस्कृतिक प्रभावांवर चर्चा करते. लेख नैसर्गिक संसाधनांचे जतन, जैवविविधतेचे संरक्षण आणि समान विकासाला चालना देण्यासाठी शाश्वत पर्यटन पद्धतींच्या महत्त्वावर भर देतो.

**कीवर्ड:** पर्यटन, पर्यावरण, समाज, शाश्वतता, आर्थिक विकास, सांस्कृतिक देवाणघेवाण, पर्यावरणाचा ऱ्हास, समुदाय सहभाग.

**प्रस्तावना**

पर्यटन जागतिक अर्थव्यवस्था, संस्कृती, आणि भूप्रदेशाचा विकास घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. हे आर्थिक प्रगतीस चालना देते, रोजगाराच्या संधी निर्माण करते आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीला प्रोत्साहन देते. तथापि, पर्यटनाचा वेगवान विस्तार परिसंस्थांवर दबाव आणतो, नैसर्गिक संसाधने संपवतो आणि स्थानिक समुदायांना बाधा पोहोचवतो. पर्यटनामुळे होणाऱ्या पर्यावरणीय, आर्थिक आणि सामाजिक परिणामांची सखोल चिकित्सा करणे आणि स्थायित्वपूर्ण पद्धतींच्या आवश्यकतेवर भर देणे महत्त्वाचे आहे, ज्यामुळे पर्यटनस्थळे आणि त्यातील रहिवाशांचे दीर्घकालीन कल्याण सुनिश्चित होईल.

**पर्यटनाचा पर्यावरणावर होणारा परिणाम**

पर्यटन नैसर्गिक पर्यावरणांवर मोठ्या प्रमाणावर ताण टाकते, ज्यामुळे अधिवास नष्ट होणे, प्रदूषण आणि जैवविविधतेचा नाश होतो. हॉटेल्स, रिसॉर्ट्स, आणि वाहतूक नेटवर्कसारख्या पायाभूत सुविधांच्या विकासामुळे नाजूक परिसंस्था बाधित होतात, अधिवास तुटतात आणि वन्यजीवांचे मार्ग खंडित होतात. याशिवाय, पर्यटन स्थळांवर वाढणाऱ्या मानवी हालचालींमुळे पाणी, ऊर्जा आणि कचरा व्यवस्थापन सेवांची मागणी वाढते, ज्यामुळे स्थानिक संसाधनांवर आणि पायाभूत सुविधांवर अधिक ताण पडतो.समुद्रकिनारी असलेल्या भागांना

**विशेषतः**

मोठ्या पर्यावरणीय समस्यांना सामोरे जावे लागते, जसे की किनाऱ्यांचे अपरदन, प्रवाळ खडकांचे

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा.योगेश कांचन खंडेराव पाटील.*अध्यापक महाविद्यालय अरण्येश्वर पुणे ०९

***How to cite this article:***
*पाटील, . योगेश . कांचन . खंडेराव . (2025). पर्यटन: पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि समाज यांच्यावर प्रभाव. Journal of Research & Development, 17(5(II)), 30–32.*
*https://doi.org/10.5281/zenodo.15817337*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.15817337
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

ऱ्हास, आणि सागरी प्रदूषण. नौकाविहार, डायव्हिंग, आणि किनारपट्टी विकासासारख्या क्रियाकलापांमुळे या समस्या निर्माण होतात, ज्यामुळे सागरी परिसंस्थेचे आरोग्य आणि

अखंडता धोक्यात येते. अशाच प्रकारे, राष्ट्रीय उद्याने आणि वन्यजीव अभयारण्यांसारख्या पर्यावरणीय संवेदनशील भागांवर अति-भेटीमुळे अधिवासाचे नुकसान, मातीचे अपरदन आणि स्थानिक वनस्पती आणि प्राण्यांना बाधा पोहोचते.

**पर्यटनाचे सकारात्मक आर्थिक आणि सांस्कृतिक फायदे**

र्यटन अनेक प्रदेशांच्या आर्थिक विकासाचा आधारस्तंभ आहे, जीडीपीमध्ये मोठ्या प्रमाणात भर घालते, रोजगार निर्माण करते आणि पायाभूत सुविधा वाढवते. हे निवास व्यवस्था, वाहतूक, भोजन आणि मनोरंजन सेवांच्या माध्यमातून महसूल निर्माण करून आर्थिक क्रियाकलापांना चालना देते. स्थानिक वस्तू, हस्तकला आणि सांस्कृतिक अनुभव प्रोत्साहित करून पर्यटन स्थानिक अर्थव्यवस्थांना आधार देते.आर्थिक लाभांव्यतिरिक्त, पर्यटन सांस्कृतिक देवाणघेवाण आणि विविध पार्श्वभूमीतील लोकांमधील परस्पर समज वाढवते. हे विविध संस्कृती, परंपरा, आणि जीवनशैलींचे कौतुक वाढवते, सामाजिक सलोखा आणि जागतिक जागरूकता प्रोत्साहित करते. स्थानिक वारसा, खाद्यपदार्थ, आणि कला सादर करणारे कार्यक्रम आणि सण पर्यटकांना आकर्षित करतात आणि सांस्कृतिक ओळखी जतन करण्यास मदत करतात.

**शाश्वत पर्यटनासाठी आर्थिक दृष्टिकोन**

शाश्वत पर्यटनाच्या पद्धती समाकलित केल्याने दीर्घकालीन आर्थिक फायदे होतात:

**उत्पन्न प्रवाहांचे विविधीकरण**:

ईको-टूरिझम, वारसा पर्यटन, आणि कृषी पर्यटनास चालना देऊन विविध उत्पन्न स्रोत निर्माण होतात.

**संसाधन कार्यक्षमतेद्वारे खर्च बचत**:

ऊर्जाक्षम पायाभूत सुविधा आणि कचरा व्यवस्थापन प्रणाल्या ऑपरेशनल खर्च कमी करतात.

**पर्यटनस्थळांचे आकर्षण वाढवणे**:

नैसर्गिक भूभाग आणि सांस्कृतिक वारसा जपल्यामुळे पर्यावरण-जागरूक प्रवाशांना आकर्षित करता येते.

**बाजारातील चढ-उतारांपासून प्रतिकारशक्ती**:

अति-पर्यटन, पर्यावरणीय नुकसान आणि बाजारातील अशाश्वतता यांचे परिणाम कमी करून शाश्वत पद्धती पर्यटनस्थळे स्पर्धात्मक ठेवतात

**शाश्वत पर्यटनासाठीच्या रणनीती**

पर्यटनाच्या आर्थिक फायद्यांचा लाभ घेताना त्याचे नकारात्मक परिणाम कमी करण्यासाठी, भागधारकांनी शाश्वततेला प्राधान्य देणाऱ्या धोरणांचा अवलंब करणे आवश्यक आहे:

**सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPPs):**

सरकार, खाजगी उद्योग, आणि स्थानिक संघटनांमधील सहकार्याने सर्वसमावेशक पर्यटन विकासाला प्रोत्साहन देता येईल.

**शाश्वत प्रथांसाठी कर सवलती:**

पर्यावरणपूरक धोरणे स्वीकारणाऱ्या व्यवसायांना सरकारकडून कर सवलती दिल्या जाऊ शकतात, ज्यामुळे शाश्वत पर्यटन पायाभूत सुविधा तयार करण्यास प्रोत्साहन मिळते.

**क्षमता वाढवणे:**

स्थानिक समुदाय आणि व्यवसायांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबवून त्यांना शाश्वत पद्धतीने पर्यटन वाढीमध्ये सहभागी होण्यास आणि त्याचा लाभ घेण्यास सक्षम करता येईल.

**शाश्वत पर्यटणासाठी खालील बाबीकडे विशेष लक्ष देणे आवश्यक**

पर्यटनाचे आर्थिक आणि सांस्कृतिक फायदे वाढवण्यासाठी आणि नकारात्मक परिणाम कमी करण्यासाठी, संपूर्ण पर्यटन क्षेत्रात शाश्वत प्रथांचा अवलंब करणे महत्त्वाचे आहे. यासाठीच्या प्रमुख धोरणांमध्ये समावेश आहे:

**स्रोत व्यवस्थापन:**

पाण्याचा आणि उर्जेचा वापर कमी करणे, कचरा व्यवस्थापन सुधारणे, आणि शाश्वत खरेदी धोरणे राबवणे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**जैवविविधतेचे संरक्षण:**

महत्त्वाच्या अधिवासांचे संरक्षण करणे, सागरी संरक्षित क्षेत्रे स्थापन करणे, आणि पर्यटकांसाठी नियम कडक करणे.

**शाश्वत वाहतूक:**

पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देणे, सार्वजनिक वाहतुकीत गुंतवणूक करणे, आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी शाश्वत वाहतुकीचे पर्याय वापरणे.

**समुदाय सहभाग:**

स्थानिक समुदायांना पर्यटन नियोजनामध्ये सहभागी करून घेणे आणि पर्यटन उत्पन्नाचा लाभ न्याय्य पद्धतीने वाटप करणे.

**शिक्षण आणि जनजागृती:**

जबाबदार पर्यटन प्रथांबाबत भागधारकांमध्ये जनजागृती करणे, तसेच जागतिक शाश्वत पर्यटन परिषद (GSTC) सारख्या प्रमाणपत्र योजनांद्वारे जबाबदारीची जाणीव वाढवणे.

**शाश्वत पर्यटनाचे प्रत्यक्ष उदाहरणे-**

**भूतानचे "हाय व्हॅल्यू, लो इम्पॅक्ट" मॉडेल:**

भूतान पर्यटकांची संख्या मर्यादित ठेवतो आणि दररोज शाश्वत विकास शुल्क आकारतो. हे उत्पन्न पर्यावरण आणि संस्कृतीच्या संरक्षणासाठी वापरले जाते.

**कोस्टा रिकाचे इकोटूरिझम उपक्रम:**

कोस्टा रिका आपल्या २५% प्रदेशावर राष्ट्रीय उद्याने आणि राखीव क्षेत्रे स्थापन करून संवर्धन आणि पर्यटन यांचे समन्वय साधत स्थानिक समुदायांना फायदा पोचवतो.

**युरोपियन ग्रीन डेस्टिनेशन्स:**

नेदरलँड्स आणि डेन्मार्कसारख्या देशांनी सायकलिंग पायाभूत सुविधा, शाश्वत ऊर्जा, आणि पर्यावरणपूरक निवासासाठी हिरवे पर्यटन उपक्रम राबवले आहेत.

**सारांश**

पर्यटन हा एक द्विधारी तलवारीसारखा विषय आहे, जो आर्थिक विकास, पर्यावरणीय शाश्वतता, आणि सामाजिक कल्याणासाठी संधी आणि आव्हाने दोन्ही निर्माण करतो. जरी पर्यटन अर्थव्यवस्थेच्या वाढीस आणि सांस्कृतिक समृद्धीस महत्त्वाचे योगदान देते, तरी त्याचा अनियंत्रित विकास परिसंस्था नष्ट करू शकतो, स्थानिक संसाधनांचा गैरवापर करू शकतो, आणि पारंपरिक जीवनशैलीमध्ये अडथळा निर्माण करू शकतो. शाश्वत पर्यटन प्रथांचा अवलंब करून, भागधारक आर्थिक समृद्धी, पर्यावरणीय संवर्धन, आणि सामाजिक न्याय यांच्यात समतोल साधू शकतात, पर्यटन स्थळांचे दीर्घकालीन टिकाऊपणा सुनिश्चित करू शकतात, आणि त्यांचा नैसर्गिक व सांस्कृतिक वारसा टिकवू शकतात.

**References**

1. Gössling, S., Hall, C. M., & Weaver, D. (Eds.). (2019). *Sustainable tourism futures: Perspectives on systems, restructuring, and innovations.* Routledge.
2. Hall, C. M., & Lew, A. A. (Eds.). (2018). *Understanding and managing tourism impacts: An integrated approach.* Routledge.
3. Honey, M. (2008). *Ecotourism and sustainable development: Who owns paradise?* Island Press.
4. International Labour Organization (ILO). (2021). *Tourism and employment: A study on opportunities and challenges in tourism sector jobs.*
5. Sharpley, R. (2020). *Tourism, development, and the environment: Beyond sustainability.* Earthscan.
6. Weaver, D. (2018). *Sustainable tourism: Research and reality.* Channel View Publications.
7. World Bank. (2020). *Tourism for development: Boosting economic growth and livelihoods.*
8. World Tourism Organization (UNWTO). (2020). *Global guidelines for reopening tourism.* Retrieved from https://www.unwto.org/global-guidelines-for-reopening-tourism.
9. McCool, S. F., & Moisey, R. N. (2001). *Tourism, recreation, and sustainability: Linking culture and the environment.* CABI Publishing.
10. Smith, M. K., & Robinson, M. (Eds.). (2006). *Cultural tourism in a changing world: Politics, participation, and (re)presentation.* Channel View Publications.
11. United Nations World Tourism Organization (UNWTO). (2018). *Tourism for sustainable development in least developed countries.*
12. Wearing, S., & Neil, J. (2009). *Ecotourism: Impacts, potentials, and possibilities?* (2nd ed.). Routledge.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# शिक्षणाच्या जागतिकीकरणाचे महत्त्व

**डॉ. एकनाथ दत्तात्रय वाजगे.**
सहयोगी प्राध्यापक,
श्री शिव छत्रपती महाविद्यालय जुन्नर, पुणे.
**Email:** ewajage@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-170509
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 5(II)|
Pp. 33-35
May 2025

**Submitted:** 02 Apr. 2025
**Revised:** 08 Apr. 2025
**Accepted:** 23 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश**

जागतिकीकरण ही आर्थिक व राजकीय क्षेत्राशी संबंधित संकल्पना असून आधुनिक कालखंडात जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेस गती मिळताना दिसून येत आहे. वेगाने बदलणाऱ्या जागतिकीकरणाच्या गतिमानतेमुळे राष्ट्रीय शिक्षण प्रणालीही विकसित होत आहे. जागतिक शिक्षण हे देशांचे एककेकांवर असलेले जागतिक परस्परांबंध आणि परस्परावलंबन यांचे सखोल आकलन वाढविण्याच मदत करते जागतिक शिक्षणामुळे जगभरात शैक्षणिक व व्यवसायिक संधी प्राप्त होत आहे. जागतिक स्पर्धेच्या युगात आंतरराष्ट्रीय सामंजस्याची निर्मिती होणे गरजेचे आहे. सामाजिक आर्थिक विकासाबरोबरच सांस्कृतिक मूल्यांचा विकास होण्यासाठी , जागतिक मागणीनुसार कुशल मनुष्यबळाच्या विकासाबरोबरच रोजगाराची निर्मिती होण्याच्या दृष्टीने शिक्षणाचे जागतिकीकरण महत्वाचे आहे.

**प्रास्ताविक**

जागतिकीकरण ही जगातील विविध लोक, राष्ट्रे व समाज यांच्यातील आर्थिक,राजकीय सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक संबंधांची जागतिक व्यवस्था निर्माण करणारी प्रक्रीया आहे. जागतिक पातळीवरील विविध देशांच्या अर्थव्यवस्थांचे एकमेकांवरील अवलंबित्व हे जागतिकीकरणाचा महत्वाचा दुवा आहे. प्राचीन कालखंडापासून व्यापार आणि आयात निर्यातीच्या प्रक्रीयेतून सांस्कृतिक , सामाजिक क्षेत्रातही विविध देशांचा एकमंकांवर प्रभाव पडलेला दिसून येतो. मात्र आधुनिक कालखंडात जागतिकीकरणाची संकल्पना अधिक दृढ झाल्याचे दिसून येत आहे. जागतिकीकरणाची प्रक्रीया ही विविध माध्यमांद्वारे गतिमान झालेली आहे. यापैकी प्रमुख माध्यम म्हणजे आंतरराष्ट्रीय संघटना होय. जागतिक पातळीवर शांतता प्रस्थापित करण्यासाठी, आरोग्यविषयक कार्यासाठी, आर्थिक विकासात समन्वय व हातभार लावण्यासाठी विविध संघटना प्रस्थापित झालेल्या आहेत. यामध्ये संयुक्त राष्ट्रसंघ, जागतिक आरोग्य संघटना, जागतिक बॅंक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांचा समावेश होतो. याचबरोबर काही प्रादेशिक संघटना देखिल जागतिकीकरणाचे माध्यम ठरल्याचे दिसून येते यामध्ये अमेरिकन राज्यसंघ, आफ्रिकन ऐक्य संघटना, युरोपियन मुक्त व्यापार संघ तसेच सार्क यासारख्या संघटनांचा याचा समावेश होतो. प्रादेशिक संघटनांबरोबरच काही बहुराष्ट्रीय महामंडळेही जागतिकीकरणाचे माध्यम ठरलेली आहेत. यामध्ये विविध व्यवसायीक संघांचा समावेश होतो. आंतरराष्ट्रीय संघटनांबरोबरच बिगरशासकीय संघटनादेखिल जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेला चालना देतात. उदा. रेडक्रॉस, स्काऊट ॲंड गाईड, मानवी हक्क आयोग इ. जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेला गती देण्याचे काम जनसंप्रेषण माध्यमातूनही होताना दिसते. यामध्ये आकाशवाणी, वृत्तपत्रे, दूरदर्शन, इंटरनेट, सोशल मिडीया यांचा समावेश होतो.

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

DOI:10.5281/zenodo.15817346
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*डॉ. एकनाथ दत्तात्रय वाजगे.सहयोगी प्राध्यापक,श्री शिव छत्रपती महाविद्यालय जुन्नर, पुणे.*

**How to cite this article:**
*वाजगे एकनाथ दत्तात्रय (2025). शिक्षणाच्या जागतिकीकरणाचे महत्त्व. Journal of Research & Development, 17(5(II)), 33–35.* https://doi.org/10.5281/zenodo.15817346

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**जागतिकीकरणाची व्याख्या**

**प्रो. सी. टी. कुरीयन यांच्यामते**

'जागतिकीकरण म्हणजे विविध अर्थव्यवस्थांचा परस्परातील व्यवहाराद्वारे वैयक्तिक उद्दिष्ट साध्य करण्याच्या प्रक्रीयेतून भविष्यात निर्माण होणाऱ्या वैशिष्टयपूर्ण अर्थव्यवस्थांचा समूह होय.'

**एडवर्ड हार्मन** – जागतिकीकरण ही सीमापार उत्पादने, भांडवल, सेवा आणि आर्थिक क्रीया प्रक्रीयांच्या वाढत्या प्रवाहाला लक्ष करणारी प्रक्रीया आहे.

गीलपीन प्रभुत्वशाली राष्ट्रांनी विकसनशील राष्ट्रांवर आपली अर्थव्यवस्था व संस्कृती लादण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे जागतिकीकरण होय.

**शिक्षणाचे जागतिकीकरण**

विविध देशातील शिक्षणप्रणालींमधील भौगोलिक सीमा अस्पष्ट करून विविध प्रकारच्या शैक्षणिक पद्धतींचे स्वागत आणि अनुकूलन करण्याच्या प्रक्रीयेला शिक्षणातील जागतिकीकरण म्हणता येईल. जागतिक स्तरावरील विविध क्षेत्रातील मागणीच्या बदलत्या स्वरूपानुसार आणि त्याच्या गतिमानतेनुसार भारतीय शिक्षण प्रणालीतही मोठया प्रमाणात बदल होताना दिसून येत आहे. भारतीय शिक्षणव्यवस्था नवीन प्रवाहांशी जूळवून घेतानाचे चित्र दिसत आहे. जागतिक शिक्षण म्हणजे ज्ञानाच्या जागतिकीकरणामुळे राष्ट्रीय शिक्षणावर परिणाम करण्यासठी गोळा केलेल्या माहिती आणि तत्रज्ञानाच्या एकात्मिकतेमुळे उद्भवणाऱ्या विस्तृत शिक्षणपद्धतींचा स्वीकार होय.

जगातील सामाजिक, आर्थिक समस्यांचे स्वरूप लक्षात घेता त्यासाठी राबविण्यात येणारी शिक्षणव्यवस्था ही कोणत्याही सीमेचे प्रदेशाचे बंधन न ठेवता सर्वव्यापी व्हावी हा शिक्षणाच्या जागतिकीकरणाचा महत्वाचा भाग आहे. भारतीय संस्कृतीतील वसुदैव कुटुंबकम' , 'हे विश्वची माझे घर' तसेच ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील विचारांतूनही जागतिक शिक्षणाचा पुरस्कार केल्याचे दिसून येते.जागतिक शिक्षण या प्रक्रीयेला योग्य दिशा मिळाल्यास आंतरराष्ट्रीय साहित्य, तत्वज्ञान, आंतरराष्ट्रीय व्यवस्थापनशास्त्र, स्थापत्यशास्त्र अशा विविध प्रकारच्या शाखांतून सखोल ज्ञानाचा विकास होऊ शकेल.

**शिक्षणाच्या जागतिकीकरणाचे महत्त्व**

**संस्कृतीचा विकास**

प्राचीन कालखंडामध्ये जागतिक स्तरावरील समृद्ध संस्कृतीमध्ये भारतीय संस्कृतीचा समावेश होतो. जगामध्ये बहुतांश नद्यांच्या कडेला वसाहतींची निर्मिती झाली. कालांतराने जीवन जगण्याची एक विशिष्ट पद्धती प्रत्येक ठिकाणी विकसित झाली. व्यापार आणि वसाहतवादाच्या माध्यमांतून एकमेकांच्या संस्कृतीचा परिचय झाल्यानंतर त्या संस्कृतीतही एकमेकांच्या मूल्यांचे संक्रमण झाले. यातून जगभरातील विविध संस्कृतींनी एकमेकांची उदात्त मूल्ये स्विकारलेली दिसून येतात. शिक्षणाच्या जागतिकीकरणातून संस्कृतींचा चिकीत्सक अभ्यास होऊन यामध्ये अधिक भर घालण्याचे काम होताना दिसून येत आहे. जगातील विविध प्राचीन भाषांचे ज्ञान, त्या भाषेत रचल्या गेलेल्या साहित्याचे ज्ञान मिळण्यास यातून मदत होत आहे. विविध वंश, धर्म, संस्कृती यामध्ये सलोखा राखणे आंतरराष्ट्रीय सांमजस्याच्या दृष्टीनेही महत्वाचे आहे.

**जागतिक समस्यांचे आकलन**

जागतिक शिक्षणातून प्रादेशीक सीमा बाजूला ठेऊन अध्ययन होत असल्याने केवळ एका प्रदेशापुरतेच नव्हे तर समग्र विश्वाचा आणि त्यातील सामायिक समस्यांचा आढावा घेता येणे शक्य होत आहे. दहशतवाद, पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास, स्त्री –पुरूष असमानता, स्त्रीयांचे प्रश्न यासारख्या अनेक समस्या या सर्वच देशांना भेडसावताना दिसून येत आहे. या समस्यांचा सखोल संशोधनात्मक अभ्यास जागतिक शिक्षणामुळे होऊन या समस्यांबाबत आणि त्यांचे निर्मूलन करण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून जाणीव जागृतीसाठी जागतिक शिक्षण महत्वाचे आहे.

**आंतरभाषीक संवाद कौशल्यांचा विकास**

भाषा हे संवादाचे माध्यम आहे. तसेच` विचार मते मांडण्याचे ते प्रभावी माध्यम आहे. जागतिक स्तरावर अनेक भाषा बोलल्या जात असताना या भाषांचे ज्ञान विविध देशांमध्ये मिळत असल्याचे दिसून येत आहे. भारतासारख्या ठिकाणी जर्मन , फ्रेंच, फारशी या भाषांचे शिक्षण दिले जात आहे. यातून संवाद कौशल्यांचा विकास होताना दिसून येत आहे.

**चिकीत्सक विचारक्षमतेत वाढ**

जागतिक शिक्षणातून चिकीत्सक विचारांना परिपूर्ण दिशा मिळत असल्याचे दिसून येत आहे. मॉडर्न युनायटेड नेशन यासारखे कार्यक्रम विद्यार्थ्यांना अनेक स्त्रोतांतून माहितीचे विश्लेषण करण्यास आणि निर्णय घेण्यास प्रोत्साहित करतात. जगभरातील विविध स्त्रोतांतून मिळणाऱ्या ज्ञानाचे विश्लेषन करून चिकीत्सक विचारांना चालना मिळत आहे.

**माहितीची अमर्याद उपलब्धता**

माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाने वास्तविकत: ज्ञान मिळविण्यासाठी प्रादेशिक सीमा केव्हाच भेदलेल्या आहेत. जागतिक शिक्षणाच्या माध्यमातून माहितीची अमर्याद उपलब्धता होताना दिसून येत आहे. माहितीवर प्रक्रीया होऊन विविध

ज्ञानशाखांतील ज्ञानाचे आकलन व उपयोजन होत आहे. वैद्यकीय क्षेत्रात परदेशी विद्यापीठांत अनेक भारतीय तरूण प्रवेश घेत आहेत. भारतातील योगा, आयुर्वेद यांचा जगातील अनेक देशांनी अभ्यासक्रमात समावेश केलेला आहे. इंटरनेटच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील साधन व्यक्तिंच्या ज्ञानाचा फायदा होत आहे.

**आंतरराष्ट्रीय दर्जाचे उच्च शिक्षण**

शिक्षणाच्या जागतिकीकरणातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे उच्च शिक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा होत आहे. कारण परकीय शिक्षणसंस्था आपले अभ्यासक्रम आधुनिक प्रवाहाशी सुसंगत ठेवतात. जगभरामध्ये विविध विद्यापीठांच्या ज्ञानशाखांमध्ये प्रवेश घेता येत असल्याने जागतिक पातळीवरील उच्च दर्जाच्या शिक्षणाचा लाभ विद्यार्थ्यांना होतो. आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या विचारवंतांचे विचार त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळाल्यामुळे दर्जात्मक शिक्षणाचा मार्ग मोकळा होत आहे.

**विधायक स्पर्धेतून विकास**

जगातील विविध शिक्षणसंस्था विद्यार्थ्यांना आपल्या अभ्यासक्रमाकडे आकर्षित करून घेण्यासाठी दर्जात्मक शिक्षण देण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्यामध्ये चालणाऱ्या स्पर्धेचा फायदा विद्यार्थ्यांना होतो. यातून वैविध्यपूर्ण अभ्यासक्रम, उत्तम दर्जाच्या सुविधा, कमी खर्चात उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होतो. जगभरातील विविध देशांनी जागतिक स्तरावरील विद्यापीठांच्या शिक्षणसंस्थांना मान्यता दिलेल्या आहेत. यातून त्या देशातील स्थानिक विद्यापीठांना आणि शिक्षणसंस्थांनाही परकीय विद्यापीठांच्या आणि शैक्षणिक संस्थांच्या तुलनेत स्वताचा दर्जा राखावा लागत असल्याने शिक्षणाचा विकास होताना दिसून येतो.

**आधुनिक तंत्रज्ञानाचा विकास**

जागतिक स्तरावरील शिक्षणसंस्था शिक्षणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करतात. संगणक, दृकश्राव्य माध्यमे, इंटरनेट, अभासी वर्ग, यासारख्या माध्यमातून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा लाभ विद्यार्थ्यांना देतात.

**जागतिक स्तरावर रोजगाराची निर्मिती**

जागतिक शिक्षणातून नव्या अभ्यासक्रमांचा लाभ घेता येतो. आंतरराष्ट्रीय स्तरावरील बहुतांश अभ्यासक्रम हे त्या देशातील कुशल मनुष्यबळाचा विकास करणे हे ध्येय ठेवूनच तयार केले जातात. यामुळे बाहेरील देशांमध्ये रोजगार मिळवणे शक्य होत आहे. यातून सुशिक्षितांमधील बेरोजगारीची समस्या दूर करण्यामध्ये एकप्रकारे मदत होत आहे. जागतिक बाजारपेठेतील मागणीनुसार शिक्षणाचा विचार केला जात असल्याने शिक्षणाच्या जागतिकीकरणातून रोजगार निर्मिती होत आहे.

**आंतरराष्ट्रीय सामंजस्याची निर्मिती**

जगातिल विविध अर्थव्यवस्था यांचे एकमेकांवरील अवलंबित्व वाढले असल्याने त्या दृष्टीकोनातून प्रत्येक देश स्वत:ची परकीय धोरणे आखत असतो. आयात – निर्यातीचे धोरण , कुशल मनुष्यबळाची प्राप्ती, संरक्षणात्मक सामग्रीचे आदानप्रदान, परकीय गुतवणूक यासारख्या अनेक बाबींतून एकमेकांमधील सामंजस्याचे धोरण ठेवले जात आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर शीतयुद्धाच्या काळातही जागतिक अस्थिरता मोठया प्रमाणात दिसून आली. यातून शांततेसाठी आणि समन्वयासाठी संयुक्त राष्ट्रसंघ आणि त्यासारख्या ज्या आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण झाल्या त्या आंतरराष्ट्रीय सामंजस्याचे प्रयत्न करताना दिसून येत आहे. जागतिक शांतता आणि सहकार्यात्मक विकासासाठी आंतरराष्ट्रीय सामंजस्याची तीव्र गरज असल्याचे दिसून येते. शिक्षणाच्या जागतिकीकरणातून आंतरराष्ट्रीय सामंजस्यामध्ये वाढ होताना दिसून येत आहे.

थोडक्यात जागतिकीकरणातून सामाजिक, राजकीय व आर्थिक ध्येयधोरणांच जसा समन्वय साधला जातो त्याचप्रमाणे शिक्षणाचे जागतिकीकरणातून आंतरराष्ट्रीय सामंजस्य, विज्ञानाचा विकास, जागतिक समस्यांचे निराकरण, आधुनिकीकरण यासाठी शिक्षणाचे जागतिकीकरण महत्वाचे आहे.

**संदर्भ**

1. जगताप ,ह.ना. (२००६). शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने. पुणे: नित्यनूतन प्रकाशन
2. इंगळे दा. (२००९). जागतिकीकरण – भारतापुढील आव्हाने,पुणे : धम्मधिका प्रकाशन
3. पंडीत, नलिनी (२००९). जागतिकीकरण आणि भारत, लोकवाड्मय प्रकाशन.
4. खेर, सी. पं. (२००४). जागतिकीकरण :समस्या, आशय आणि अनुभव, पुणे: दिलीपराज प्रकाशन.
5. https://www.skvgwalior.org/blog/impact-of-globalization-on-education/
6. https://educationforallinindia.com/impact-of-globalization-on-education-in-india/

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# जडवादी चार्वाक दर्शनाचे विश्लेषण

**डॉ. गोरोबा तुकाराम खुरपे**
कला व वाणिज्य महाविद्यालय, मायणी
ता. खटाव जि. सातारा (महाराष्ट्र)
Email :gtkhurpe@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-170510
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 36-39
May 2025
**Submitted:** 02 Apr. 2025
**Revised:** 08 Apr. 2025
**Accepted:** 23 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**प्रास्ताविक :**

काळाच्या कसोटीवर चार्वाक दर्शन स्वतःला सिद्ध करू शकले नाही. कारण सृष्टीचा स्वभाववाद मांडताना चार्वाक हे विसरले की पृथ्वीवर सृष्टीने निर्माण केलेला एक जण करुणेने ओथंबलेला असतो, तर दुसरा क्रौर्याची परिसीमा गाठत असतो. एकाला आज सांगितलेले आजच कळते, तर दुसऱ्याला तेच चार वेळा सांगावे लागते. एकच सिद्धान्त दोन माणसे पूर्णतः भिन्न प्रकारे समजून घेतात व आपलाच खरा असे प्रतिपादन करतात. कसलेच भय नसताना नीतीने वागणे व्यवहारात अवघड असते. त्यामुळेच या तत्त्वज्ञानाला पाय रोवता आले नाहीत, म्हणूनच सुजाण समाजधुरीणांनी हे दर्शन नाकारले. कारण स्वैराचार आणि सहजपणा यांतील बारीक रेष सर्वांच्याच लक्षात येत नाही. या अशा सर्व प्रकारच्या घटकांनी समाजधारणा होत असते. म्हणूनच उगमाजवळ शुद्ध असणारे हे तत्त्व लोकमाता सरितेचे रूप घेऊन वाहू शकत नाही. दर्शनात "प्रत्यक्ष" हेच प्रमाण आहे. या शब्दात, प्रति आणि अक्ष अशी दोन पदे आहेत. अक्ष म्हणजे इन्द्रिय; त्यामुळे प्रत्यक्ष म्हणजे जे इंद्रियांना अनुभवता येते ते. "शब्द " आणि "अनुमान" याला मर्यादा आहेत. यामुळे आत्मा, ईश्वर आणि स्वर्ग या गोष्टींना या तत्त्वज्ञानात स्थान नाही. चार्वाक मताप्रमाणे जे ज्ञान इंद्रियांच्या द्वारे बुद्धीला होते तेच अस्तित्वात आहे असे समजले जाते. चैतन्य हे जडापासूनच निर्माण होते. चैतन्याला वेगळे अस्तित्व नाही आणि देह नष्ट झाला की ते नष्ट होते. आकारामुळे निराकाराचा भास होतो, निराकार असे काही नाही, फक्त आकारच आहे. निर्माण झालेल्या ध्वनीमुळे आधी शांतता होती असे वाटते; शांतता असे काही नसते.

विसाव्या शतकातील श्रेष्ठ तत्त्वज्ञ मानवेंद्रनाथ रॉय यांनी लिहिलेल्या Materialism : An outline of History of Scientific Thought या ग्रंथाचा बा. र. सुंठणकर यांनी 'जडवाद' या नावाने अनुवाद केला आहे. मानवेंद्रनाथ रॉय यांनी अगदी प्रारंभापासून पौर्वात्य आणि पाश्चात्य विचारधारेतील जडवादी प्रवृतीचा शोध घेतला आहे. प्राचीन भारतात अध्यात्मवादी परंपरेबरोबरच जडवादी परंपरा चालू होती आणि 'जडवाद' हेच अंतिम तत्त्वज्ञान आहे अशी त्याची धारणा होती. चार्वाक दर्शन हे जडवादी म्हणजे भौतिकवादी दर्शन आहे. चार्वाकांच्या जडवादी सिद्धांताचा आणि स्वरूपाचा मोठ्या प्रमाणात ऊहापोह विचार विश्वात झाला आहे. चार्वाक तत्त्वज्ञान जडवादी असल्याने ही दृश्य सृष्टी केवळ जड द्रव्यांची परिणती आहे असे ठाम मत या दर्शनाने मांडले. 'भूतेभ्यः चैतन्यम्!' हा त्याचा मुख्य सिद्धान्त आहे. हे जड पदार्थ परस्परांच्या संपर्कात येतात आणि आकार धारण करतात आणि हे विश्व साकारते. ते घटक विशिष्ट प्रमाणात एकत्र येतात आणि निरनिराळे देह उत्पन्न होतात व त्यात चैतन्य स्वयं उत्पन्न होते. अंतर्भूत घटकांचे प्रमाण बिघडले की, देह किंवा आकार नष्ट होतात, चैतन्यही नाश पावते. हाच मृत्यू. चैतन्य किंवा आत्मा जडाहून वेगळा नाही. तो देहात येतो, देहातून जातो, ही कल्पना वेडगळपणाची आहे, असे स्पष्ट मत या दर्शनात आढळते. या मताला आधुनिक विज्ञानाने पुष्टी दिली नाही. चैतन्य हे जड भौतिक पदार्थांपासून तयार होते

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. गोरोबा तुकाराम खुरपे कला व वाणिज्य महाविद्यालय, मायणी*
*ता. खटाव जि. सातारा (महाराष्ट्र)*

**How to cite this article:**
*खुरपे, गोरोबा . तुकाराम . (2025). जडवादी चार्वाक दर्शनाचे विश्लेषण. Journal of Research & Development, 17(5(II)), 36–39. https://doi.org/10.5281/zenodo.15817354*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817354
OPEN ACCESS

हेआधुनिक विज्ञानाने अजून सिद्ध केलेले नाही दर्शनात अर्थ आणि काम हेच पुरुषार्थ म्हटले आहेत. धर्म आणि मोक्ष या संकल्पना नाहीत. सुखी होण्यासाठी माणसाने उद्योग करावेत, अर्थप्राप्ती करून घ्यावी. पण असा हा चार्वाक दर्शनातील 'ऋणं कृत्वा घृतं पिबेत्, भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः' या तत्त्वविचारामुळे काहीसे हेटाळले गेले.

**संशोधन पद्धती :**

संशोधकाने प्रस्तुत संशोधन लेख लिहिण्यासाठी ग्रंथालयीन पद्धतीचा वापर अधिक प्रमाणात केलेला आहे. ऐतिहासिक पद्धती बरोबरच विश्लेषणात्मक पद्धती आणि अनेक दुय्यम साधनांचाही वापर या संशोधन लेखाच्या अनुषंगाने केलेला आहे. त्याचबरोबर सदरील संशोधन लेखासाठी विविध ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रातील लेख आणि विविध तज्ञांची मते विचारात घेऊन जडवादी चार्वाक दर्शनाचे विश्लेषण मांडले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. चार्वाक दर्शनाचा सखोल अभ्यास करणे
२. चार्वाक दर्शनातील जडवादाचे विश्लेषण करणे
३. चार्वाक दर्शनातील जडवादाचे विश्लेषणावरून निष्कर्ष काढणे

**जडवादी चार्वाक दर्शनाचे विश्लेषण :**

आधुनिक काळातील जडवादाची मूळे ही दोन प्रकारची होती एक म्हणजे एपिक्युरस प्रमाणे धार्मिक अंधश्रद्धेमुळे माणसे भयग्रस्त होतात व जे सुख त्यांना स्वतःच्या प्रयत्नांनी साधता येते त्यालाही आचवतात, या जाणिवेतून धार्मिक श्रद्धेचा अव्हेर करणारा जडवाद उदयाला आला परंतु भौतिकवादी प्रगतीमुळे माणसाच्या सर्व वर्तनाचा–शारीरिक व मानसिक वर्तनाचा–संपूर्ण उलगडा केवळ भौतिक विज्ञानांच्या साहाय्याने करता येईल, अशी आशा निर्माण झाली होती. मानव हा संपूर्ण निसर्ग सृष्टीत उठून दिसतो याचे प्रमुख कारण म्हणजे मानवाचे मानसिक वर्तन विशेषतः त्याचे विवेकी वर्तन उदाहरणार्थ - त्याचे तर्कशुद्ध विचार, नैतिक आचरण इत्यादी तेंव्हा मानवाच्या स्वरूपाचा उलगडा करायचा झाला तर जडवस्तूहून भिन्न मन किंवा आत्मा हे चित्स्वरूप तत्त्व मानावे लागते, असे अनेकांना वाटते परंतु जडद्रव्याने बनलेले मानवी शरीर आणि मानवी चित्य स्वरूप ! मानवी मन प्रकृतीत कशा प्रकारे एकवटू शकते हे एक गूढ बाब आहे आणि शिवाय जडद्रव्य हेच एकमेव द्रव्य आहे असे मानून जर सर्व मानवी व्यवहाराचा उलगडा करता येतो असे दाखवून देता आले, तर मानवी ज्ञानाचे स्वरूप बंदिस्त व एकसंध होईल .

चार्वाक तत्त्वज्ञान जडवादी असल्याने दृश्य म्हणजे डोळयांना दिसणारी सृष्टी हिच खरी आहे असे ते मानतात. यावरून असे म्हणता येईल की, जे दिसते तेच खरे आणि मानवाच्या मृत्युनंतर म्हणजे मानवी शरीर नष्ट झाल्यावर आत्मा नावाची बाब शिल्लक राहत नाही. मानवाला वाटते की, जे जग आहे तेच सत्य आहे असे मानून चालणा ऱ्याचा मानवी स्वभावाचा विचार चार्वाक दर्शन मांडते. चार्वाक दर्शनाचे तत्त्व आहे की, जे आपण पाहू शकत नाही त्यावर विश्वास तरी कसा ठेवायचा! अर्थातच चार्वाक तत्त्व विचारात अनुमान हे प्रमाण नाकारून प्रत्यक्ष प्रमाणाला महत्त्व दिले गेले. याबाबत उदाहरणच द्यायचे झाले तर मृत्युनंतरचे जीवन चार्वाक मान्य करत नाहीत त्यामुळे चार्वाक तत्त्वविचारांचा मृत्युनंतरच्या विविध संकल्पनावर चार्वाक दर्शन विश्वास ठेवत नाही. यानुसार हे सिद्ध होते की, चार्वाक हे जडवादी विचारसरणीचे आहेत.

भारतीय तत्त्वज्ञानात चार्वाक दर्शनाला नास्तिक म्हणून अग्रक्रम दिलेला दिसून येतो परंतु हा अग्रक्रम हा निम्नतेच्या दृष्टीने दिला असला तरी तत्त्वचिंतनाच्या विचार केला तर ही बाब संयुक्तिक आहे असे नाही. प्रस्थापित कल्पनावादी आणि आध्यात्मवादी विचारधारेपेक्षा वेगळी भूमिका चार्वाक दर्शनाची दिसून येते. पारंपारिक तत्त्वज्ञानातील सर्वच समस्यांचे कारण आहे ते म्हणजे जड आणि चेतनविषयक द्वंद्व होय. मानवी जीवनाचे अंतिम ध्येय कोणते ?, विश्वाच्या उत्पत्तीचे मूळ कारण कोणते ?, ज्ञान म्हणजे काय ?, मोक्ष म्हणजे काय ?, आत्मा म्हणजे काय ? अशा अनेक प्रश्नांची मीमांसा चार्वाक दर्शनाने जडवादी विचारधारेनेच केलेली आहे.

चार्वाक दर्शनातील तत्त्वविचारांचा विचार केला तर लक्षात येते की, चार्वाक दर्शनातील विचारसरणी पूर्णतः जडवादी आणि नास्तिक आहे त्यामुळे या विचारसरणीने आत्मा, ईश्वर, मोक्ष, पारमार्थिक ज्ञान अशा बाबी नाकारल्या आहेत. इतर दर्शनाप्रमाणे चार्वाक दर्शनाने आत्मा, ईश्वर, धर्म, मोक्ष, ज्ञान, अंतिम सत्ता अशा संकल्पनांचे चिंतन जडवादी आणि व्यक्तिनिष्ठवादी दृष्टीकोनातून केल्याचे आढळते. मोक्ष या संकल्पनेचा अर्थ इतर दर्शनांनी आणि चार्वाक दर्शनाने वेगवेगळा केलेला दिसतो. आस्तिक दर्शनांनी मोक्ष प्राप्ती हेच मानवी जीवनाचे अंतिम ध्येय मानले तर चार्वाक दर्शनात सुखप्राप्ती हेच मानवी जीवनाचे अंतिम ध्येय मानले.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

जड आणि चेतन यामध्ये इतर अर्थात आस्तिक दर्शनांनी भेद केला तसा भेद चार्वाक दर्शनाने केला नाही. चार्वाक दर्शनाच्या मते जड शरीराशिवाय आत्मा नावाचा पदार्थ अस्तित्वात असू शकत नाही म्हणून चेतन्य विशिष्ट देह हाच आत्मा आहे. अर्थातच चार्वाक दर्शनाचा शरीर आणि आत्मा यांच्यातील परस्पर अविभाज्यता सांगण्याचा हा प्रयत्न आहे. चार्वाकांनी आत्मा, ईश्वर, धर्म, मोक्ष, ज्ञान, अंतिम सत्ता अशा बाबींची मांडणी वेगळी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. लोकांमध्ये प्रतिष्ठा प्राप्त झालेला राजा म्हणजे परमेश्वर आणि देहाचा विनाश म्हणजेच मोक्ष प्राप्ती होय अशा प्रकारच्या व्याख्या चार्वाक दर्शनाने मांडल्या. यावरून असे म्हणता येईल की, चार्वाक दर्शनाने आत्मा, ईश्वर, सुख, दु:ख, मोक्ष अशा बाबींचे अस्तित्त्व स्वीकारले मात्र यांची मांडणी ही व्यावहारिक आणि प्रत्यक्ष प्रमाणाच्या कसोटीवर करून आनुभविक दृष्टीकोन समोर ठेवलेला आहे.

तत्कालीन परिस्थितीत 'ज्ञान म्हणजे काय ? हा प्रश्न महत्त्वाचा मानला जात होता शिवाय ज्ञानासाठी आवश्यक घटक कोणते ? ही बाबही महत्त्वपूर्ण होती. याची मीमांसा आणि व्यावहारिक, अनुभवजन्य आधारावर आणि जडवादी विचाराप्रमाणे देण्याचा प्रयत्न चार्वाकाने केलेला आहे. सदाशिव आठवले यांनी आपल्या "

**चार्वाक** :

तत्त्वज्ञान आणि इतिहास" या ग्रंथात चार्वाकांच्या ज्ञान विषयक विचारांची मांडणी केलेली आहे ती अशी की, विश्व हे भूतात्मक आहे, जीव चैतन्य सुद्धा भूतापासून बनलेले आहे, कोणताही भूतामध्ये नसलेले चैतन्य विशिष्ट भूतसंयोगातून उत्पन्न होते, उत्पत्ती, स्थिती आणि लय हे सर्व स्वभावात्माकच आहे आणि देह हाच आत्मा आहे.

चार्वाक दर्शनात आत्म्याची व्याख्याही भौतिक दृष्टीने केलेली आहे कारण या दर्शनात जड जगत हे भूतात्मक असून जीव चैतन्याची निर्मिती ही देखील भूताचीच आहे असे सिद्ध केल्याचे दिसून येते. चार्वाक विचारसरणीनुसार 'ज्ञान' हे कोणत्याच एका तत्त्वात दिसून येत नाही. पंच महाभूतापैकी आकाश हे तत्त्व चार्वाक मानत नाहीत, पृथ्वी, जल, अग्नी जल आणि वायु यापैकी कोणा एकात आपणास 'ज्ञान' हा गुण आढळणार नाही तर यांच्या संयोगातून 'ज्ञान' उत्पन्न होते असे चार्वाक मत आहे आणि यासाठी चार्वाक उदाहरण देतात की, पान, कात, सुपारी आणि चुना यापैकी कोणा एकात लाल रंग आढळत नाही मात्र यांचे एकत्रीकरण करून पानाचा विडा चघळला तर लाल रंगाची निर्मिती होते. भौतिक पदार्थ जेंव्हा निश्चित प्रमाणात एकत्र येऊन शरीर रूप धारण करतात, तेंव्हा शरीरात ज्ञान रुपी नवीन गुणाची निर्मिती होते आणि जेंव्हा हे भौतिक तत्त्व विघटीत होतात तेंव्हा त्यांच्या ठिकाणी असलेला चैतन्य नामक ज्ञानरूपी गुण सुद्धा नाश पावतो.

अचेतन जडद्रव्यच मुळात आहे, चेतन जीव हा जडद्रव्याचाच विकार किंवा जडद्रव्याचीच कार्यरूप परिणती आहे, असे मत उपनिषत्कालापासून भारतात प्रचलित आहे. विश्वाचे कारण हे ईश्वर नसून भूत द्रव्येच आहेत असे एक मत '*श्वेताश्वतरोनिषदात*' सांगितले आहे. मृत्यूनंतर ज्याचे अस्तित्व राहते, असा आत्मा नाही असे जडवादी मत '*कठोपनिषदात*' सांगितले आहे. चार्वाकाने आत्मा, ईश्वर, मोक्ष, स्वर्ग- नरक, परलोकगमन, पुनर्जन्म - पूर्वजन्म अशा सगळया संकल्पना प्रत्यक्ष प्रमाणाच्या आधारावर अप्रमाणित करून नाकरल्या आणि पृथ्वी, जल, तेज, वायु ही तत्त्वे केवळ अंतिम ठरवली. जडवादी चार्वाक विचारदर्शन जाणून घेण्याचा प्रयत्न करंदीकरांनी काव्यातून पुढीलप्रमाणे केला आहे -

" इंद्रिय ज्ञानाचे / विषय ती होती
म्हणून ठरती / जडद्रव्य
या जडद्रव्यांची / मिश्रणे होऊन
होतात उत्पन्न / सर्व वस्तू "

पृथ्वी, जल, अग्नि आणि वायु ही चारच मूलभूत भूतद्रव्ये विश्वात असून त्यांच्या संयोगामुळे मानवी सजीव शरीराची निर्मिती होती. ज्याप्रमाणे फसफसणाऱ्या द्राक्षादी फळांपासून मद्य तयार होते त्याचप्रमाणे जीवद्रव्ये तयार होतात. चार्वाकांच्या मते विश्वाची रचना, विश्वाची व्यवस्था ही विश्वाच्या स्वभावातून सिद्ध होते. पोपटाचा रंग हिरवा, मोराच्या पिसांचे वैविध्य, ऋतुचक्राचा नियमितपणा, आकाशस्थ गोलांचे नियमित परिवर्तन या विश्वाच्या रचनेच्या पाठीमागे कोणीतरी स्वतंत्र सर्वज्ञ परमेश्वरच आहे, असे मानण्यास निश्चित प्रमाण नाही त्यामुळे चार्वाक ईश्वर मानत नाहीत आणि म्हणूनच चार्वाक यांचे मत म्हणजे केवळ भौतिकवाद किंवा जडवाद होय.

**निष्कर्ष :**

जडवाद आणि चेतनवाद, आत्मवाद आणि अनात्मवाद, ईश्वरवाद आणि निरीश्वरवाद, द्वैत आणि अद्वैत, वैदिक आणि अवैदिक यांच्या विविध मतांचा प्रभाव भारतीय तत्त्वचिंतन परंपरेत दिसून येतो. या सर्वच विचार प्रवाह्यांचा प्रभाव भारतीय समाजाच्या वैचारिक जडण-घडणीवर कमी-अधिक प्रमाणात झालेला आढळतो. धर्माचे आणि तत्त्वज्ञानाचे समाजाच्या वैचारिक विकासातील योगदान अगदी सुरुवाती पासूनच महत्त्वपूर्ण असल्याचे दिसते. चार्वाक दर्शनानुसार ज्याप्रमाणे जड आणि चेतन नितांत भिन्न नाहीत असे मानले तर अनेक तात्विक आणि व्यावहारिक समस्या निर्माण होतील तसेच जड आणि चेतन नितांत भिन्न आहेत असे

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

मानले तरीही अनेक समस्या निर्माण होतात. तत्कालीन प्रस्थापित व्यवस्थेत आत्मा, ईश्वर, मोक्ष, अंतिम सत्य अशा बाबी चार्वाकांनी मान्य केल्या आहेत मात्र याविषयी आपला वेगळा विचार मांडण्याचा प्रयत्न चार्वाकांनी केला आहे.

परलोकवादी धार्मिक विचारांचा अतिरेक रोखण्यासाठी इहवादाचा, ऐहिक मूल्यांचा पुरस्कार करावा लागतो हे चार्वाक दर्शनाने केले. परलोकाच्या आणि परमार्थाच्या नावे ऐहिक मूल्यांची हेटाळणी होता कामा नये. ‘धर्म’ हा श्रद्धेचा विषय असला तरी त्यात विवेकाचीही आवश्यकता असते हे सत्य चार्वाक दर्शनात परलोकवादाची कठोर चिकित्सा करून दुर्लक्षित होऊ दिले नाही. ऐतिहासिक बाजूने विचार केला तर चार्वाकाचा जडवाद हा स्वभाववादाचा परिणाम होय.

**संदर्भ :**

१. Hayes, C. J. H. *A Generation of Materialism : 1871–1900*, New York, 1941

२. माधवाचार्य अनु.; शर्मा, उमाशंकर, *सर्वदर्शनसंग्रह*, बनारस, १९६४

३. चार्वाकमंथन - संपादकः उदय कुमठेकर - परामर्श प्रकाशन, तत्त्वज्ञान विभाग, पुणे

४. चार्वाकवाद आणि अद्वैतवाद - डॉ. प्रदीप गोखले - टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

५. सर्वदर्शनसंग्रह - माधवाचार्य - प्र. फोटोझिंको प्रेस पुणे, (शासकीय प्रकाशन)

६. 'जडवाद' - मानवेन्द्रनाथ रॉय ( अनुवाद : बा.र. सुंठणकर ) कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे

७. सदाशिव, आठवले, *चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान*, वाई, प्रज्ञा पाठशाळा, १९८०

८. कुमठेकर, उदय, वेध चार्वाकाचा, नांदेड, अभय प्रकाशन, २००१

९. गाडगीळ, स.रा . *लोकायत*, मुंबई, लोकवाङ्मय गृह, १९७४

१०. गोखले, प्रदीप, *तत्त्वचिंतक चार्वाक*, पुणे, मनोविकास प्रकाशन, २०१३

११. झा, आचार्य आनंद, *चार्वाकदर्शन*, लखनऊ, उत्तर प्रदेश हिन्दी संस्थान २०१३

१२. पाठक, सर्वानंद, *चार्वाकदर्शन की शास्त्रीय समीक्षा*, वाराणसी, चौकम्बा विद्या भवन १९६५

१३. साळुंखे, आ.ह .

**१४.** *आस्तिकशिरोमणी* , सातारा, लोकायत प्रकाशन १९९२

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# प्रधानमंत्री मुद्रा योजना : एक विश्लेषणात्मक अध्ययन

**डॉ. महेंद्र पांडुरंगजी गावंडे**

नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज,कारंजा (घाडगे), जि. वर्धा

**Email-** gawandemahendra9@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-170511
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 40-47
May 2025
**Submitted:** 05 Apr. 2025
**Revised:** 20 Apr. 2025
**Accepted:** 20 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**गोषवारा .सारांश**

बेरोजगारीच्या समस्येवर मात करण्याकरिता शासनाने विविध रोजगार निर्माण करणाऱ्या योजना सुरू केलेल्या आहेत. देशातील कुशल-अकुशल बेरोजगार श्रमिकाची स्थिती लक्षात घेऊन प्रधानमंत्री मुद्रा योजना 08 एप्रिल 2015 रोजी आपल्या देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी सुरू केली, या योजनेअंतर्गत बिगर कॉर्पोरेट, अकृषिक, लघु, सूक्ष्म उद्योगांमध्ये 10 लाख रूपयांपर्यंत ऋण दिले जाते. ही योजना युवाशक्तीला कार्यप्रवण करणारी आहे. या योजनेमुळे लघु, सूक्ष्म उद्योगांच्या स्थापनेकरिता व विकासाकरिता लागणारे भांडवल सहजरीत्या उपलब्ध होते. त्यामुळे रोजगार निर्मिती होते व देशाचा आर्थिक विकास घडून येतो, तसेच व्यक्ती व देशाला आत्मनिर्भर होण्यास सहकार्य मिळते. परंतु या योजनेत काही अडचणी सुद्धा आहेत, त्या अडचणी योग्यरित्या हाताळल्यास व ऋण घेणाऱ्यांनी योग्य प्रतिसाद दिल्यास, तसेच शासनाने व प्रशासनाने विशेष लक्ष दिल्यास ही योजना खरंच उद्देशानुरूप कार्य करू शकते व राष्ट्रीय विकास सहज घडून येऊ शकते. परंतु या योजनेचा दुरुपयोग केल्यास अपेक्षित लाभ मिळणार नाही व बेरोजगारी तशीच राहील त्याचबरोबर युवाशक्ती निष्क्रीय बनेल, याकरिता दक्षता घेणे गरजेचे आहे.

**बीज शब्द-** प्रधानमंत्री, मुद्रा, ऋण, योजना, रोजगार, उद्योजक

**प्रस्तावना**

भारत हा लोकसंख्येच्या बाबतीत जगातील प्रथम क्रमांकाचा देश असून, भारतातील वाढत्या लोकसंख्येला रोजगार पुरवण्याची फार मोठी जबाबदारी भारतीय शासन व प्रशासन व्यवस्थेवर आहे. बेरोजगारीच्या समस्येवर मात करण्याकरिता शासनाने विविध रोजगार निर्माण करणाऱ्या योजना सुरू केलेल्या आहेत, देशातील कुशल-अकुशल बेरोजगार श्रमिकाची स्थिती लक्षात घेऊन प्रधानमंत्री मुद्रा योजना 08 एप्रिल 2015 रोजी आपल्या देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी सुरू केली, या योजनेअंतर्गत बिगर कॉर्पोरेट, अकृषिक, लघु, सूक्ष्म उद्योगांमध्ये 10 लाख रूपयांपर्यंत ऋण दिले जाते. हे ऋण व्यावसायिक अधिकोष, प्रादेशिक ग्रामीण अधिकोष, लघु वित्त बँका, सहकारी अधिकोष, सूक्ष्म वित्त संस्था आणि बिगर बँकिंग वित्तीय कंपन्या देतात.

देशातील बेरोजगार युवक स्वतःचा उद्योग सुरू करू इच्छितात परंतु आर्थिक अडचणीमुळे ते उद्योग सुरू करू शकत नाही. अशा लाभार्थ्यांना भारत सरकार अधिकोषांकडून 10 लाख रूपयापर्यंतचे ऋण देऊन आर्थिक मदत करते व उद्योग सुरू करण्यास प्रोत्साहित करून आर्थिक विकासाला चालना देते.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**

डॉ. महेंद्र पांडुरंगजी गावंडे नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज,कारंजा (घाडगे), जि. वर्धा

**How to cite this article:**

*गावंडे, . महेंद्र . पांडुरंगजी . (2025). प्रधानमंत्री मुद्रा योजना : एक विश्लेषणात्मक अध्ययन. Journal of Research & Development, 17(5(II)), 40–47.* https://doi.org/10.5281/zenodo.15817366

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.15817366

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**संशोधन पद्धती**

1. दुय्यम सामग्रीचा वापर करून वर्णनात्मक पद्धतीद्वारे हा शोध निबंध सादर करण्यात येत आहे.
2. दुय्यम सामग्री यामध्ये महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, आर्थिक समीक्षा, जनगणना अहवाल, मानव विकास निर्देशांक अहवाल, संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, इंटरनेटचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे स्वरूप अभ्यासणे.
2. प्रधानमंत्री मुद्रा योजनेची आवश्यकता, उद्दिष्टे व वैशिष्ट्ये अभ्यासणे.
3. प्रधानमंत्री मुद्रा योजनेची कार्यपद्धती अभ्यासणे
4. प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे महत्त्व अभ्यासणे.
5. प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे फायदे अभ्यासणे.
6. प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या अंमलबजावणीतील आव्हाने अभ्यासणे.

**गृहीते**

1. प्रधानमंत्री मुद्रा योजना युवकांना आत्मनिर्भर करण्यास सहकार्य करते.
2. प्रधानमंत्री मुद्रा योजनेमुळे बेरोजगारीची समस्या सोडविण्यास मदत मिळते.
3. प्रधानमंत्री मुद्रा योजनेमुळे लघु उद्योग विकासात मदत होते.
4. प्रधानमंत्री मुद्रा योजना देशाच्या विकासात सहकार्य करते.

**प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY)**

प्रधानमंत्री मुद्रा योजना ही भारत सरकारने *8* एप्रिल *2015* रोजी सुरू केलेली एक महत्त्वपूर्ण योजना आहे. या योजनेचा मुख्य उद्देश बिगर-कॉर्पोरेट, बिगर-शेती, सूक्ष्म आणि लघु उद्योगांना आर्थिक सहाय्य प्रदान करणे आहे. जेणेकरून त्यांना आपले व्यवसाय सुरू करता येतील, वाढवता येतील किंवा विस्तारता येतील. या योजनेला 'अंडरफंडेड निधी' असेही म्हटले जाते, कारण त्यामुळे अनेक लहान उद्योजकांना औपचारिक आर्थिक प्रणालीमध्ये आणले जाते.

**प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये**

अशा छोट्या उद्योजकांना, ज्यांना पारंपारिक अधिकोषण सेवांमध्ये प्रवेश मिळत नाही, त्यांना 10 लाख रूपयापर्यंतचे ऋण उपलब्ध करून देणे.

रोजगार निर्मितीला चालना देणे आणि स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देणे.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना आर्थिक मदत देऊन आर्थिक विकासाला गती देणे.

ऋणाचे प्रकार (श्रेणी)- मुद्रा योजनेअंतर्गत ऋणाची रक्कम आणि व्यवसायाच्या गरजेनुसार तीन मुख्य श्रेणींमध्ये ऋण दिले जाते.

तारणविरहित ऋण दिले जाते.

या ऋणांना 'क्रेडिट गॅरंटी फंड ट्रस्ट फॉर मायक्रो अँड स्मॉल एंटरप्रायझेस' (CGTMSE) अंतर्गत संरक्षण दिले जाते.

प्रक्रिया शुल्क नाही.

व्याज दर बँकेनुसार आणि ऋणाच्या प्रकारानुसार बदलतात. हे दर सामान्यतः स्पर्धात्मक असतात.

ऋणाच्या प्रकारानुसार आणि व्यवसायाच्या रोख प्रवाहावर आधारित, परतफेडीचा कालावधी साधारणतः १२ महिन्यांपासून ते ८४ महिन्यांपर्यंत असू शकतो. कार्यशील भांडवलासाठी वार्षिक पुनरावलोकन केले जाते.

उत्पादन, व्यापार आणि सेवा क्षेत्रातील कोणताही बिगर-कॉर्पोरेट, बिगर-शेती लघु व सूक्ष्म उद्योजक, ज्याला नवीन व्यवसाय सुरू करायचा आहे किंवा सध्याचा व्यवसाय वाढवायचा आहे, त्याला या योजनेअंतर्गत ऋण उपलब्ध करून दिले जाते.

यामध्ये सलून, ब्युटी पार्लर, व्यायामशाळा, बुटीक, टेलरिंग शॉप, ड्राय क्लीनिंग, सायकल दुरुस्तीची दुकाने, औषध दुकाने, कुरिअर एजंट इत्यादींचा समावेश होतो.

कृषी आणि संलग्न उद्योगांतील व्यक्तीही या योजनेचा लाभ घेऊ शकतात. उदा. पशुपालन, मत्स्यपालन, कुक्कुटपालन, अन्न प्रक्रिया इ.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**उपलब्धता**

सार्वजनिक क्षेत्रातील अधिकोष, प्रादेशिक ग्रामीण अधिकोष, सहकारी अधिकोष, लघु वित्त बँका (SFBs) आणि नॉन-बँकिंग वित्तीय कंपन्या (NBFCs) यांच्यामार्फत ही ऋण योजना उपलब्ध आहे.

या योजनेमुळे भारतातील अनेक सूक्ष्म आणि लघु उद्योजकांना आर्थिक सहकार्य मिळाले. त्यामुळे त्यांना आपले व्यवसाय सुरू करण्यास आणि वाढवण्यास मदत झाली आहे.

**मुद्रा योजनेची कार्यपद्धती**

1. उद्देश -गैर-कॉर्पोरेट, गैर-शेती क्षेत्रातील सूक्ष्म आणि लघु उद्योगांना 10 लाख रूपयापर्यंतच्या हमीमुक्त ऋणाची सुविधा उपलब्ध करून देणे. अलीकडे विशेषतः "युवा प्लस" श्रेणीमध्ये ही मर्यादा 20 लाख रूपयापर्यंत वाढवण्यात आली आहे,

2 लक्ष्य- उत्पादन, प्रक्रिया, व्यापार किंवा सेवा क्षेत्रातील उत्पन्न मिळवणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या लहान व्यवसायांना मदत करणे, ज्यांच्याकडे व्यवसाय योजना आहे, परंतु पुरेसे भांडवल नाही अशा उद्योजकांना विशेष सहकार्य करणे.

3. कर्जाचे प्रकार (श्रेणी)- मुद्रा योजने अंतर्गत ऋणाचे तीन मुख्य प्रकार आहेत, जे व्यवसाय वाढीच्या टप्प्यावर आणि निधीच्या गरजेनुसार विभागलेले आहेत.

शिशु ऋण- रू. 50,000 पर्यंतचे ऋण. हे नवीन व्यवसाय सुरू करणाऱ्यांसाठी किंवा खूप लहान व्यवसायांसाठी आहे.

किशोर ऋण- रू. 50,001 ते रू. 5 लारख रूपयापर्यंतचे ऋण. हे ज्या व्यवसायांनी त्यांची स्थापना केली आहे आणि आता वाढ करू इच्छित आहेत त्यांच्यासाठी आहे.

युवा ऋण- रू. 5 लाखरूपयापासून ते 10 लाखरूपयापर्यंतचे ऋण. हे स्थापित व्यवसायांना विस्तार करण्यासाठी किंवा मोठ्या प्रमाणावर प्रगती करण्यासाठी दिले जाते.

युवा प्लस ऋण- काही अहवालानुसार, ही श्रेणी रू. 10 लाख ते रू. 20 लाख पर्यंतच्या ऋणाकरिता आहे, हे युवा श्रेणीतील ऋण यशस्वीरित्या ऋण परतफेड करणाऱ्यांकरिता असू शकते.

**4. ऋण देणाऱ्या संस्था**

सार्वजनिक क्षेत्रातील अधिकोष
खाजगी क्षेत्रातील अधिकोष
प्रादेशिक ग्रामीण अधिकोष
लघु वित्त अधिकोष
गैर-अधिकोषीय वित्तीय कंपन्या
मायक्रो-फायनान्स संस्था

**5. अर्ज करण्याची प्रक्रिया**

अर्जदार ऑफलाइन किंवा ऑनलाइन पद्धतीने अर्ज करू शकतात.

ऑफलाइन अर्ज प्रक्रिया-अधिकोषाला भेट द्या, अर्ज मिळवा, अर्जामध्ये विचारलेली सर्व माहिती योग्यरित्या भरा, अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडा, अर्ज सादर करा, अधिकोष अधिकारी तुमच्या अर्जाची आणि कागदपत्रांची पडताळणी करतील. व्यवसाय योजना आणि तुमच्या पात्रतेनुसार ऋणाला मंजुरी दिली जाईल, मंजुरी मिळाल्यानंतर ऋणाची रक्कम तुमच्या अधिकोष खात्यात जमा केली जाईल.

ऑनलाइन अर्ज प्रक्रिया- प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या अधिकृत वेबसाइट mudra.org.in किंवा www.udyamimitra.in ला भेट द्या, नोंदणी करा- तुम्ही नवीन अर्जदार असल्यास, पोर्टलवर नोंदणी करा. यासाठी तुमचा मोबाईल नंबर, आधार क्रमांक आणि ईमेल आयडी आवश्यक असू शकतो. OTP द्वारे पडताळणी केली जाईल, अर्ज भरा- आवश्यक माहिती भरा, ज्यात वैयक्तिक आणि व्यावसायिक तपशील, उद्योगाचे नाव, व्यवसायाचा प्रकार, क्रियाकलाप इत्यादींचा समावेश असेल, लेंडर निवडा- तुम्हाला कोणत्या अधिकोषाकडून किंवा वित्तीय संस्थेकडून ऋणघ्यायचे आहे ते निवडा, आवश्यक कागदपत्रे अपलोड करा, अर्ज सादर करा- अर्ज ऑनलाइन सादर करा. तुम्हाला एक संदर्भ क्रमांक (reference ID) मिळू शकतो, अधिकोषाचा संपर्क- अधिकोषाचा प्रतिनिधी पुढील औपचारिकता पूर्ण करण्यासाठी तुमच्याशी संपर्क साधेल.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

6. आवश्यक कागदपत्रे- ओळखपत्र- आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, पॅन कार्ड, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स, निवासाचा पुरावा- आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स, वीज बिल, दूरध्वनी बिल, मालमत्ता कर पावती (नवीनतम), अधिकोष पासबुक किंवा अधिकोष स्टेटमेंट. व्यवसायाचा पुरावा- व्यवसायाची नोंदणी प्रमाणपत्र, व्यवसाय स्थापनेचे प्रमाणपत्र, व्यवसायाच्या पत्त्याचा पुरावा. उत्पन्नाचा पुरावा- मागील 6 महिन्यांचे बँक स्टेटमेंट, मागील 2 वर्षांचे आयकर रिटर्न, व्यवसाय योजना किंवा प्रस्ताव- तुम्ही सुरू करू इच्छित असलेल्या किंवा वाढवू इच्छित असलेल्या व्यवसायाची सविस्तर योजना सागा , फोटो- अर्जदाराचे दोन पासपोर्ट आकाराचे रंगीत फोटो, जात प्रमाणपत्र- (जर अर्जदार SC/ST/OBC किंवा इतर विशेष प्रवर्गात येत असेल तर), अधिकोष/वित्तीय संस्थेचा डिफॉल्ट स्टेटस- अर्जदार कोणत्याही अधिकोषात किंवा वित्तीय संस्थेमध्ये डिफॉल्टर नसावा.

6. मुद्रा कार्ड- काही मुद्रा ऋणाकरिता, विशेषतः कार्यशील भांडवलाच्या गरजांकरिता, कर्जदारांना मुद्रा कार्ड दिले जाते. हे एक RuPay डेबिट कार्ड आहे, जे एटीएममधून पैसे काढण्यासाठी किंवा POS मशीनद्वारे खरेदीसाठी वापरले जाऊ शकते. यामुळे कर्जदाराला गरजेनुसार पैसे वापरण्याची लवचिकता मिळते आणि जेवढी रक्कम वापरली जाते, तेवढ्याच रकमेवर व्याज लागते.

**7. ऋणाची हमी आणि परतफेड-**

हमीमुक्त ऋण- मुद्रा योजनेअंतर्गत रू. 10 लाख पर्यंतचे कर्ज कोणत्याही हमीशिवाय दिले जाते. हे ऋण सूक्ष्म युनिट्ससाठी क्रेडिट गॅरंटी फंडद्वारे राष्ट्रीय क्रेडिट गॅरंटी ट्रस्टी कंपनी मार्फत संरक्षित असते.

परतफेड कालावधी- ऋणाच्या प्रकारानुसार आणि अधिकोषाच्या धोरणानुसार परतफेड कालावधी बदलू शकतो. साधारणपणे 84 महिन्यांपर्यंतचा परतफेड कालावधी असू शकतो. या योजनेमुळे लहान उद्योजकांना औपचारिक क्रेडिट मिळवणे सोपे झाले आहे, ज्यामुळे त्यांना आपला व्यवसाय वाढवण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन मिळते.

**प्रधानमंत्री मुद्रा योजनेची आवश्यकता-**

**१. सूक्ष्म आणि लघु उद्योगांना आर्थिक सहाय्य करणे-**

सूक्ष्म आणि लघु उद्योगांना ऋण पुरवठा करणे- भारतातील अनेक सूक्ष्म आणि लघु उद्योगांना औपचारिक बँकिंग प्रणालीकडून ऋण मिळत नव्हते. त्यांच्याकडे तारण ठेवण्याकरिता कोणतीही मालमत्ता उपलब्ध नसल्यामुळे किंवा इतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे त्यांना कठीण असल्यामुळे ऋण मिळणे कठीण होते. मुद्रा योजनेमुळे अशा उद्योगांना विना-तारण ऋण उपलब्ध झाले.

औपचारिक वित्तपुरवठ्याचा अभाव- छोटे व्यावसायिक, विशेषतः ग्रामीण आणि निमशहरी भागातील, सावकारांकडून किंवा अनौपचारिक स्त्रोतांकडून जास्त व्याजदराने ऋण घेत असे. या योजनेमुळे त्यांना परवडणाऱ्या दरात आणि सोप्या पद्धतीने ऋण मिळण्याची सोय उपल्बध झाली, त्यामुळे ते सावकारांच्या ऋण संकटातून बाहेर पडू शकेल.

**२. रोजगार निर्मितीला सहकार्य**

**स्वयंरोजगाराला प्रोत्साहन**

भारतासारख्या युवा देशात मोठ्या प्रमाणावर स्वयंरोजगाराची आवश्यकता आहे. मुद्रा योजना लोकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा तो वाढवण्यासाठी आर्थिक मदत देऊन स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देते. त्यामुळे फक्त उद्योजकांनाच नाही तर इतरांनाही रोजगार मिळतो.

**आर्थिक विकासात सहकार्य**

सूक्ष्म आणि लघु उद्योग भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. त्यांना आर्थिक सहाय्य मिळाल्याने त्यांची वाढ होते, त्यामुळे देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात वाढ होते आणि आर्थिक विकासाला सहकार्य मिळते.

**आर्थिक समावेशनाला प्रोत्साहन**

**वचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याकरिता सहकार्य**

महिला उद्योजक, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तींना पारंपारिक बँकिंग प्रणालीकडून ऋण मिळण्यास अनेक अडचणी येत होत्या. मुद्रा योजनेमुळे अशा वंचित घटकांना सहजपणे ऋण उपलब्ध झाले, त्यामुळे त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास सहकार्य मिळाले.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

अधिकोषण सेवांचा विस्तार- प्रधानमंत्री मुद्रा योजनेमुळे अधिकोषण आणि इतर वित्तीय संस्थांना सूक्ष्म उद्योगांना ऋण देण्यास प्रोत्साहन मिळाले, त्यामुळे अधिकोषण सेवा शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली.

४. **उद्योजकतेला चालना:**

**नव-उद्योजकांना संधी**

अनेक युवकांना व महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची इच्छा असते, परंतु भांडवलाअभावी त्यांचे स्वप्न पूर्ण होत नाही. मुद्रा योजना अशा नवीन उद्योजकांना त्यांच्या कल्पना प्रत्यक्षात आणण्याकरिता आवश्यक भांडवल उपलब्ध करून देते.

**व्यवसाय वाढ व विकासाकरिता सहकार्य**

ज्या उद्योजकांचे छोटे व्यवसाय आधीच सुरू आहेत, त्यांनाही त्यांचा व्यवसाय वाढवण्याकरिता किंवा नवीन तंत्रज्ञान घेऊन विकास करण्याकरिता मुद्रा योजनेद्वारे सहकार्य केले जाते.

थोडक्यात, प्रधानमंत्री मुद्रा योजना ही देशातील सूक्ष्म आणि लघु उद्योगांना आर्थिक आधार देऊन, स्वयंरोजगार आणि रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देते व आर्थिक समावेशनाला चालना देऊन देशाचा सर्वांगीण आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न करते.

**प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे उद्देश**

**असंघटित क्षेत्राला ऋण पुरवठा करणे**

अनेक छोटे व्यावसाय आणि उद्योजक हे औपचारिक अधिकोषण व्यवस्थेच्या बाहेर असून त्यांना ऋण मिळवितांना अनेक अडचणी येतात. अशा व्यवसायांना, विशेषतः बिगर-कॉर्पोरेट आणि बिगर-शेती क्षेत्रातील सूक्ष्म व लघु उद्योगांना रू.10 लाखांपर्यंतचे कर्ज उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

**रोजगार निर्मितीला चालना देणे**

छोट्या उद्योगांना ऋण उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांना आपला व्यवसाय वाढवता येतो, त्यामुळे नवीन रोजगार संधी निर्माण होतात आणि देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात वाढ घडून येते.

**स्वयंरोजगाराला प्रोत्साहन**

ज्या युवकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करून आत्मनिर्भरता प्राप्त करायची आहे किंवा त्या व्यवसायाचा विकास करायचा आहे, त्यांना भांडवलाची समस्या येऊ नये यासाठी ही योजना सहकार्य करते. त्यामुळे युवकांना स्वावलंबी होण्यास प्रोत्साहन मिळते.

**आर्थिक समावेशन करणे**

दुर्बळ घटक, महिला उद्योजक, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय उद्योजकांना आर्थिक व्यवस्थेत आणून त्यांना ऋण सुविधा उपलब्ध करून देवून आर्थिक समावेशन करणे.

**औपचारिक वित्तीय प्रणालीशी जोडणे**

अनौपचारिक अर्थव्यवस्थेतील लाखो लघु व सुक्ष्म उद्योग व उद्योजकांना औपचारिक अधिकोषण प्रणालीशी जोडणे, जेणेकरून त्यांना स्वस्त आणि विश्वासार्ह ऋण मिळू शकेल.

**पत हमी घेणे**

ऋणाकरिता कोणतेही तारण किंवा हमी न घेता ऋण उपलब्ध करून देणे, जेणेकरून ज्यांच्याकडे तारण ठेवण्यासाठी मालमत्ता नाही. त्यांनाही ऋण लाभ घेता आला पाहिजेत हा या योजनेचा उद्देश आहे.

**सूक्ष्म-वित्तीय संस्थांचे नियमन करणे**

सूक्ष्म-वित्तीय संस्था आणि इतर वित्तीय संस्थांना मार्गदर्शन आणि पुनर्वित्त पुरवणे, जेणेकरून सूक्ष्म उद्योगांना आर्थिक सेवा देण्यासाठी त्यांना मदत होईल.

थोडक्यात, प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा उद्देश देशातील सूक्ष्म आणि लघु उद्योगांना आर्थिक पाठबळ देऊन त्यांना वाढ व विकासाकरिता प्रोत्साहन देणे, त्यामुळे रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**प्रधानमंत्री मुद्रा योजनेची लघु आणि सूक्ष्म उद्योगांच्या विकासात भूमिका**

**सुलभ आणि तारणमुक्त ऋण सुविधा उपलब्ध करणे**

**आर्थिक समावेशकता निर्माण करणे**

मुद्रा योजनेमुळे अशा उद्योजकांना, विशेषतः नवउद्योजकांना, महिलांना, दलित, आदिवासी आणि इतर दुर्बळ घटकांना औपचारिक अधिकोषण प्रणालीमध्ये सहभागी होण्यास मदत करत असल्यामुळे, ज्यांना पूर्वी ऋण मिळवण्यास अडचणी येत होत्या. अनेकदा त्यांना तारण ठेवण्यासाठी मालमत्ता नसल्यामुळे किंवा त्यांची क्रेडिट हिस्ट्री नसल्यामुळे अधिकोषांकडून ऋण उपलब्ध होत नव्हते. मुद्रा योजनेने ही अडचण दूर केली आहे.

**तारणमुक्त ऋण उपलब्ध करणे**

या योजनेअंतर्गत रू. 10 लाखांपर्यंतचे ऋण कोणत्याही तारणाशिवाय दिले जाते. त्यामुळे छोट्या उद्योजकांना ऋण मिळवणे सहज शक्य झाले आहे.

**व्यवसायाच्या विविध गरजा पूर्ण करणे**

**मुद्रा योजनेत ऋणाच्या तीन श्रेणी**

मुद्रा योजनेमध्ये व्यवसायाच्या वाढीच्या अवस्थेनुसार तीन श्रेणींमध्ये ऋण सुविधा उपलब्ध आहे - शिशु ऋण सुविधा - 50,000 रू. पर्यंतचे ऋण, जे नव्याने व्यवसाय सुरू करणाऱ्यांसाठी किंवा खूप लहान व्यवसायांसाठी उपयुक्त आहे.

किशोर ऋण- रू. 50,001 ते रू. 5 लाख पर्यंतचे ऋण, जे वाढत्या व्यवसायांना किंवा थोडे मोठे प्रकल्प सुरू करण्यासाठी मदत करते.

तरुण ऋण- रू. 5 लाख ते रू.10 लाख पर्यंतचे ऋण, जे चांगल्या प्रकारे स्थापित झालेल्या व्यवसायांच्या विस्तारासाठी किंवा आधुनिकीकरणासाठी वापरले जाते.

**विविध क्षेत्रांना आधार उपलब्ध करून देणे**

उत्पादन, व्यापार, सेवा आणि कृषी संबंधित विविध क्षेत्रांतील व्यवसायांना मुद्रा ऋण योजनेच्या लाभ सुविधा उपलब्ध करून देणे.

**रोजगार निर्मितीला चालना देणे**

**स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देणे**

या योजनेमुळे मोठ्या संख्येने युवकांनी स्वतःचे छोटे व्यवसाय सुरू केले आहेत, त्यामुळे ते केवळ स्वतःसाठीच नव्हे तर इतरांसाठीही रोजगार निर्माण करत आहेत.

**अर्थव्यवस्थेला चालना देणे**

छोटे व्यवसाय स्थानिक पातळीवर रोजगार निर्माण करून ग्रामीण आणि निमशहरी भागांमध्ये आर्थिक क्रियाकलापांना गती निर्माण करते.

**महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणे**

मुद्रा योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये महिलांचा मोठा वाटा असल्यामुळे महिला सक्षमीकरणाला चालना मिळाली आहे आणि त्या आर्थिकदृष्ट्या अधिक स्वतंत्र व आत्मनिर्भर झाल्या आहेत.

**व्यवसाय वाढीसाठी आवश्यक भांडवल उपलब्धता**

अनेक सूक्ष्म आणि लघु उद्योगांना वाढीसाठी आणि विस्तारासाठी आवश्यक असलेल्या भांडवलाची कमतरता जाणवते. मुद्रा योजनेमुळे त्यांना हे भांडवल सहज उपलब्ध होते, त्यामुळे ते नवीन उपकरणे खरेदी करू शकतात, उत्पादन वाढवू शकतात किंवा नवीन सेवा सुरू करून सक्षम झाले आहे.

**अनौपचारिक क्षेत्राचे औपचारिकीकरण करण्यास सहकार्य**

भारतात मोठ्या प्रमाणात अनौपचारिक व्यवसाय आहेत. मुद्रा योजनेमुळे हे व्यवसाय औपचारिक अधिकोषण प्रणालीशी जोडले जात असल्यामुळे त्यांना केवळ ऋणच मिळत नाही तर भविष्यात इतर वित्तीय सेवांचा लाभ घेण्याची संधीही उपलब्ध होते.

थोडक्यात, प्रधानमंत्री मुद्रा योजनेने लघु आणि सूक्ष्म उद्योजकांसाठी एक आर्थिक आधार तयार केला आहे, त्यामुळे त्यांना सहज भांडवल मिळून, देशात उद्योजकतेला प्रोत्साहन मिळाले आहे व रोजगार निर्मिती झाली आहे. त्यामुळे आर्थिक विकासाला गती मिळाली आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे फायदे**

1. तारणमुक्त ऋण उपलब्धी झाली.
2. आर्थिक समावेशनाला सहकार्य मिळाले.
3. व्यवसाय सुरू करण्यास आणि वाढवण्यास मदत मिळाली.
4. ऋणाकरिता कमी व्याजदर आणि सुलभ प्रक्रिया उपलब्ध.
5. विविध श्रेणींमध्ये ऋण उपलब्धता झाली.
6. रोजगार निर्मितीला चालना मिळाली.
7. महिला सक्षमीकरणास सहकार्य मिळाले.
8. विविध क्षेत्रांना आधार उपलब्ध झाला.

**प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे तोटे/आव्हाने**

**जागरुकतेचा अभाव**

या योजनेबद्दल अजूनही अनेकांना पुरेशी माहिती नाही, त्यामुळे अनेक पात्र लाभार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित आहे.

**अपुरे ऋण वाटप**

काही प्रकरणांमध्ये, अर्जदारांना त्यांच्या गरजेनुसार पुरेसे ऋण मिळत नाही, विशेषतः 'शिशु' श्रेणीतील ऋण वाढत्या खर्चात फार अपूरे आहे.

अधिकोषाकडून उदासीनता व सहकार्यचा अभाव-

काही अधिकोष किंवा अधिकोष अधिकारी मुद्रा ऋणाच्या अर्जांवर योग्य लक्ष देत नाहीत किंवा प्रक्रिया किचकट करतात.

**थकबाकीचा धोका**

कोणतेही तारण नसल्याने. जर व्यवसाय यशस्वी झाला नाही तर ऋणाची परतफेड न होण्याचा धोका वाढतो.

**देखरेखीचा अभाव**

ऋण मिळाल्यानंतर व्यवसायाच्या प्रगतीवर किंवा व्यवस्थापनावर फारशी देखरेख नसते, त्यामुळे व्यवसायाच्या वाढीसाठी मार्गदर्शन मिळत नाही.

**कागदपत्रांची समस्या**

काहीवेळा, जरी योजना सोपी असली तरी, आवश्यक कागदपत्रे गोळा करण्यात छोट्या उद्योजकांना अडचणी येऊ शकतात.

**योग्य उद्योजकाची निवड**

मोठ्या प्रमाणावर ऋण वाटप करताना योग्य आणि व्यवहार्य व्यवसायांची निवड करण्याचे आव्हान अधिकोषाण समोर आहे.

थोडक्यात, मुद्रा योजना ही लघु उद्योगांना पाठबळ देण्यासाठी एक प्रभावी योजना आहे, परंतु तिच्या अंमलबजावणीतील काही आव्हानांवर मात करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

प्रधानमंत्री मुद्रा योजना युवाशक्तीला कार्यप्रवण करणारी योजना आहे. या योजनेमुळे लघु, सूक्ष्म उद्योगांच्या स्थापनेकरिता व विकासाकरिता लागणारे भांडवल सहजरीत्या उपलब्ध होते, त्यामुळे रोजगार निर्मिती होते व देशाचा आर्थिक विकास घडून येतो. तसेच व्यक्ती व देशाला आत्मनिर्भरहोण्यास सहकार्य मिळते. परंतु या योजनेत काही अडचणी सुद्धा आहेत, त्या अडचणी योग्यरित्या हाताळल्यास व ऋण घेणाऱ्यांनी योग्य प्रतिसाद दिल्यास, तसेच शासनाने व प्रशासनाने विशेष लक्ष दिल्यास ही योजना खरंच उद्देशानुरूप कार्य करू शकते व राष्ट्रीय विकास सहज घडून येऊ शकते. परंतु या योजनेचा दुरुपयोग केल्यास अपेक्षित लाभ मिळणार नाही व बेरोजगारी तशीच राहील, त्याचबरोबर युवाशक्ती निष्क्रिय बनेल. याकरिता दक्षता घेणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1. प्रा. डॉ. रक्षित मदन बागडे - मानवी विकासाचे अर्थशास्त्र
2. डॉ. जी. एन. झांबरे -भारतीय अर्थव्यवस्था
3. प्रा. बी. एल. जिभकाटे -भारतीय अर्थव्यवस्था

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

4. डॉ. राजू श्रीरामे -भारतीय अर्थव्यवस्था
5. रूद्र दत्त, के. पी. एम सुन्दरम -भारतीय अर्थव्यवस्था
6. विविध वर्तमान पत्रे, मासिके, त्रैमासिक, वार्षिक अहवाल
7. विविध इंटरनेट सायटेशन
8. प्रधानमंत्री मुद्रा योजना
9. mudra.org.in
10. https://www.mudra.org.in
11. प्रधानमंत्री मुद्रा योजना (पीएमएमवाई) के लिए ऋण आवेदन - शिशु
12. Union Bank of India
13. https://www.unionbankofindia.co.in › Details › loan-appl...
14. प्रधानमंत्री मुद्रा योजना ऋण (पीएमएमवाई) | बैंक ऑफ बड़ौदा
15. Bank of Baroda
16. https://www.bankofbaroda.in › Personal › Loans
17. प्रधानमंत्री मुद्रा योजना
18. Wikipedia
19. https://hi.wikipedia.org › wiki › प...

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# एकल व सांघिक खेळ खेळणाऱ्या विद्यापीठ स्तरावरील पुरुष खेळाडूंच्या खांद्याच्या दुखापतींचा तुलनात्मक अभ्यास

**शिशिर दिलीपराव चौधरी**[1] **अनिल पुरूषोत्तम चरडे**[2]
[1]पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग रा.तु.म.नागपूर विद्यापीठ नागपूर– ४४००३३
[2]संत गाडगे महाराज महाविद्यालय, हिंगणा
**Email:** shishirchoudhari854@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170512
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 5(II)|
Pp. 43-46
May 2025

**Submitted:** 05 Apr. 2025
**Revised:** 20 Apr. 2025
**Accepted:** 20 May. 2025
**Published:** 31 May. 2025

## प्रस्तावना

आधुनिक खेळ इतके लोकप्रिय, संघटित आणि महत्त्वाचे आहेत की, जागतिक क्रीडा इतिहासातील कोणत्याही कालखंडाची तुलना खेळांच्या सध्याच्या स्थितीशी करता येत नाही. नियम आणि नियम आता स्पष्ट झाले आहेत, कामगिरीची वस्तुनिष्ठ तुलना करण्यासाठी एकात्मिक पद्धती तयार केल्या आहेत. क्रीडा क्षेत्रातील कामगिरी मानवी क्षमतेचे मूल्यांकन करण्यासाठी मानके बनतात आणि त्याच वेळी महत्त्वाच्या घटनांच्या पुढील विकासात भूमिका बजावतात. जसजसे खेळ वाढत गेले आणि यश हे ध्येय बनले तसतसे लोक त्यांची कामगिरी कशी वाढवायची याचा विचार करू लागले. मानवी कामगिरीच्या सीमा वाढवण्याच्या सतत इच्छेने खेळांसाठी वैज्ञानिक प्रशिक्षणाची कल्पना मानवी मनात आली. हळूहळू व्यक्तीची शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक कामगिरी क्षमता सुधारण्यासाठी प्रशिक्षण संघटित आणि पद्धतशीर होते परंतु त्याच वेळी, खेळाडूंवर शारीरिक आणि भावनिक भार वाढला आहे. उच्च प्रदर्शन दर आणि नाविन्यपूर्ण प्रशिक्षणामुळे चांगले कामगिरी करणारे विकसित होतात परंतु त्याच वेळी, ते खेळाडूंमध्ये दुखापतीचे कारण बनते. क्रीडा दुखापतीची व्याख्या फक्त व्यायाम आणि क्रीडा क्रियाकलापांशी संबंधित असलेल्या दुखापती म्हणून करता येते.

खेळ आणि खेळांमध्ये सहभाग घेतल्याने दुखापती होण्याचा धोका असतो. प्रेक्षकांनाही क्रीडा स्पर्धांमध्ये दुखापत होऊ शकते. खेळांमध्ये, विशेषत: ओव्हरहेड थ्रोइंग आणि स्ट्राइकिंग ॲक्टिव्हिटीजमध्ये खांद्याच्या दुखापती सामान्य आहेत. खांद्याच्या दुखापती खेळाडूच्या प्रशिक्षण आणि स्पर्धा करण्याच्या क्षमतेवर लक्षणीय परिणाम करू शकतात, ज्यामुळे वेळ वाया जातो आणि उच्च पातळीवर कामगिरी करण्याच्या त्यांच्या क्षमतेवर संभाव्य परिणाम होतो. खांद्याच्या दुखापतींमध्ये अनेक घटक योगदान देऊ शकतात, ज्यात जास्त प्रशिक्षण भार, खांद्याच्या हालचालींची कमतरता, खराब तंत्र आणि स्नायू असंतुलन यांचा समावेश आहे. खांद्याच्या दुखापतींचा धोका कमी करण्यासाठी प्रभावी दुखापत प्रतिबंधक कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या कार्यक्रमांनी जोखीम घटकांना संबोधित केले पाहिजे, योग्य प्रशिक्षण तंत्रांना

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*शिशिर दिलीपराव चौधरी , शारीरिक शिक्षण विभाग रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नागपूर-440033*

**How to cite this article:**
*चौधरी, . शिशिर . दिलीपराव ., & चरडे, . अनिल . पुरूषोत्तम . (2025). एकल व सांघिक खेळ खेळणाऱ्या विद्यापीठ स्तरावरील पुरुष खेळाडूंच्या खांद्याच्या दुखापतींचा तुलनात्मक अभ्यास. Journal of Research & Development, 17(5(II)), 43–46.* https://doi.org/10.5281/zenodo.15817387

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.15817387

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

प्रोत्साहन दिले पाहिजे आणि स्नायूंची ताकद आणि लवचिकता वाढवली पाहिजे.खांद्याच्या स्थिरता आणि हालचालीमध्ये स्कॅप्युला किंवा खांदा ब्लेड महत्त्वाची भूमिका बजावते. खेळाडूंमध्ये दुखापती प्रतिबंध आणि पुनर्वसनासाठी स्कॅप्युलर फंक्शन समजून घेणे आणि ऑप्टिमायझ करणे आवश्यक आहे. जेव्हा खांद्याला दुखापत होते, तेव्हा यशस्वीरित्या खेळात परतण्यासाठी योग्य उपचार आणि पुनर्वसन आवश्यक असते. यामध्ये शारीरिक उपचार, इंजेक्शन आणि काही प्रकरणांमध्ये शस्त्रक्रिया हस्तक्षेप यांचा समावेश असू शकतो. खेळाडूंना त्यांचे विशिष्ट जोखीम घटक समजून घेण्यासाठी, प्रभावी प्रतिबंधात्मक धोरणे अंमलात आणण्यासाठी आणि त्यांना होणाऱ्या कोणत्याही दुखापतींसाठी योग्य उपचार मिळविण्यासाठी क्रीडा वैद्यकीय व्यावसायिकांकडून मार्गदर्शन घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या अनुशंगाने, प्रस्तुत संशोधनकार्यात विद्यापीठ स्तरावरील सांघिक व एकल खेळ खेळणाऱ्या पुरुष खेळाडूंच्या
पायाला होणाऱ्या दुखापतींचे स्वरूप व तीव्रतेचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन कार्यात माहिती मिळण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आला. ज्यात विदर्भातील विद्यापीठ स्तरावर खेळणाऱ्या सर्व खेळाडूंचा जनसंख्या म्हणुन विचार करण्यात आला. विदर्भातील विविध विद्यापीठस्तरावर स्पर्धेत खेळलेल्या १८ ते २५ वयोगटातील १००० पुरूष खेळाडूंची न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली. संशोधनात वर्णनात्मक संशोधन आराखड्याची निवड करण्यात आली व खेळाडूंकडून खांद्याच्या दुखपतींसंदर्भात माहिती मिळविण्यासाठी स्वनिर्मीत व प्रमाणीकृत प्रश्नावलीचा वापर करण्यात आला. दुय्यम तथ्य संकलनाकरीता शासकीय ग्रंथालये, वृत्तपत्र, पाक्षिके, नियतकालीके, क्रीडा विभागाकडून प्रसिद्ध होणारा अहवाल, राज्य व राष्ट्रीय क्रीडा प्राधकरणाचा वार्षिक अहवाल इत्यादीचा उपयोग करण्यात आला. प्राप्त झालेल्या माहितीच्या विश्लेषणाकरीता सांख्यिकिय तंत्रातील विविध ग्राहयता चाचणींचा उपयोग करण्यात आला. त्यात माहितीवरुन वारंवारीता व बहुलक काढण्यात आले. विद्यापीठ स्तरीय खेळाडूंच्या खांद्याच्या दुखापतींची तुलना करण्यासाठी 'Z' Test of Proportion या सांख्यिकीय चाचणींचा वापर करण्यात आला. संभाव्यता पातळी ०.०५ निर्धारीत करण्यात आली.

**सांख्यिकीय विश्लेषण आणि विवेचन**

**खेळतांना खांद्यास दुखापत**

**सारणी क्र. १:** खेळतांना खांद्यास दुखापत

| खेळ प्रकार | होय | | नाही | | आठवत/लक्षात नाही | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| सांघिक खेळ | ३०४ | ६०.८ | १३८ | २७.६ | ५८ | ११.६ |
| वैयक्तिक खेळ | १७७ | ३५.४ | २१७ | ४३.४ | १०६ | २१.२ |
| Z test score | Z=8.038, p<0.05 | | Z=-5.220, p<0.05 | | Z= - 4.099, p<0.05 | |

वरील सारणी क्रमांक १ मध्ये विद्यापीठ स्तरावरील सांघिक व वैयक्तिक खेळ खेळणाऱ्या पुरूष खेळाडूंना खेळतांना खांद्यास दुखापतीसंबंधित माहिती प्रस्तुत करण्यात आली आहे. सांघिक खेळ खेळणाऱ्या ६०.८ टक्के खेळाडूंना तर वैयक्तिक खेळ खेळणाऱ्या ३५.४ टक्के खेळाडूंना खांद्यास दुखापत झाली असल्याचे आढळले. तसेच २७.६ टक्के व ४३.४ टक्के सांघिक व वैयक्तिक खेळ खेळणाऱ्या खेळाडूंना खांद्यास दुखापत झाली नसल्याचे आढळले. त्याचप्रमाणे सांघिक खेळ खेळणाऱ्या ११.६ टक्के खेळाडूंना तर वैयक्तिक खेळ खेळणाऱ्या २१.२ टक्के खेळाडूंना खांद्यास दुखापत झाली असल्याचे लक्षात नाही.

**खांद्याच्या दुखापतींचे स्वरूप**

**सारणी क्र. २:** खांद्याच्या दुखापतींचे स्वरूप

| खेळ प्रकार | त्वचा चिरणे | | लचकणे | | लागु पडत नाही | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| सांघिक खेळ | ३३ | ६.६ | ३२९ | ६५.८ | १३८ | २७.६ |

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वैयक्तिक खेळ | ४२ | ८.४ | २४१ | ४८.२ | २१७ | ४३.४ |
| Z test score | Z= - 1.080, p<0.05 | | Z=5.621, p<0.01 | | Z= - 5.220, p<0.01 | |

वरील सारणी क्रमांक २ मध्ये विद्यापीठ स्तरावरील सांघिक व एकल खेळ खेळणाऱ्या पुरूष खेळाडूंना खांद्याला झालेल्या दुखापतींचे स्वरूप याबाबत माहिती प्रस्तुत करण्यात आली आहे. सांघिक खेळ खेळणाऱ्या ६.६ टक्के खेळाडूंना तर एकल खेळ खेळणाऱ्या ८.४ टक्के खेळाडूंना त्वचा चिरण्याची दुखापत झाली असल्याचे आढळले. तसेच अनुक्रमे ६५.८ टक्के व ४८.२ टक्के सांघिक व एकल खेळ खेळणाऱ्या खेळाडूंचा खांद्या लचकला असल्याचे आढळले.

**खांद्याची दुखापत बरी होण्यात लागणारा वेळ**

**सारणी क्र. ३:** खांद्याची दुखापत बरी होण्यात लागणारा वेळ

| खेळ प्रकार | <१ महिना | | १ ते २ महिने | | लागु पडत नाही | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| सांघिक खेळ | ६३ | १२.६ | २९९ | ५९.८ | १३८ | २७.६ |
| वैयक्तिक खेळ | ७९ | १५.८ | २०४ | ४०.८ | २१७ | ४३.४ |
| Z test score | Z= - 1.449, p<0.05 | | Z= 6.008, p<0.01 | | Z= -5.220, p<0.01 | |

वरील सारणी क्रमांक ३ मध्ये विद्यापीठ स्तरावरील सांघिक व वैयक्तिक खेळ खेळणाऱ्या पुरूष खेळाडूंना खांद्याची दुखापत बरी होण्यात लागणारा वेळ याबाबत माहिती प्रस्तुत करण्यात आली आहे. सांघिक खेळ खेळणाऱ्या १२.६ टक्के खेळाडूंना तर वैयक्तिक खेळ खेळणाऱ्या १५.८ टक्के खेळाडूंना खांद्याची दुखापत बरी होण्यासाठी एक महिन्यापेक्षा कमी वेळ लागला असल्याचे आढळले. तसेच अनुक्रमे ५९.८ टक्के व ४०.८ टक्के सांघिक व वैयक्तिक खेळ खेळणाऱ्या खेळाडूंना खांद्याची दुखापत बरी होण्यासाठी १ ते २ महिन्यांचा वेळ लागला असल्याचे आढळले.

**खेळतांना खांद्याला दुखापत होण्याचे कारण**

**सारणी क्र. ४:** खेळतांना खांद्याला दुखापत होण्याचे कारण

| खेळ प्रकार | कौशल्य व समय सूचकतेचा अभाव | | खेळादरम्यान अती आक्रमकता | | लागु पडत नाही | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| सांघिक खेळ | १२५ | २५.० | २३७ | ४७.४ | १३८ | २७.६ |
| वैयक्तिक खेळ | १२ | २.४ | २७१ | ५४.२ | २१७ | ४३.४ |
| Z test score | Z= 10.392, p<0.05 | | Z= -2.150, p<0.01 | | Z= -5.220, p<0.01 | |

वरील सारणी क्रमांक ४ मध्ये विद्यापीठ स्तरावरील सांघिक व वैयक्तिक खेळ खेळणाऱ्या पुरूष खेळाडूंना खेळतांना खांद्याला दुखापत होण्याचे कारण याबाबत माहिती प्रस्तुत करण्यात आली आहे. सांघिक खेळ खेळणाऱ्या २५.० टक्के खेळाडूंना तर वैयक्तिक खेळ खेळणाऱ्या २.४ टक्के खेळाडूंना कौशल्य व समय सूचकतेच्या अभावामुळे खांद्याला दुखापत झाली असल्याचे आढळले. तसेच अनुक्रमे ४७.४ टक्के व ५४.२ टक्के सांघिक व वैयक्तिक खेळ खेळणाऱ्या खेळाडूंना खेळादरम्यान अती आक्रमकता असल्यामुळे खांद्याला दुखापत झाली असल्याचे आढळले.

**निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधनकार्यात प्राप्त झालेल्या माहितीची तुलना केली असता असे निदर्शनास येते की सांघिक खेळ खेळणाऱ्या पुरूष खेळाडूंना एकल खेळ खेळणाऱ्या खेळाडूंपेक्षा सार्थकरीत्या (p<०.०५) अधिक प्रमाणात खेळादरम्यान अती आक्रमकता असल्यामुळे खांद्याच्या लचकसंबंधित दुखापतींचा सामना करावा लागतो. सांघिक खेळ खेळणाऱ्या पुरूष खेळाडूंना एकल खेळ खेळणाऱ्या खेळाडूंपेक्षा सार्थकरीत्या (p<०.०५) अधिक प्रमाणात खांद्या संबंधित दुखापत बरी होण्यासाठी १ ते २ महिन्याचा वेळ लागतो.

**संदर्भ ग्रंथसूची**

1. कायंदे पाटील डॉ. गंगाधर वि. – संशोधन पद्धती चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक–१३, जून, २००६

2. कऱ्हाडे बी. एम – 'शास्त्रीय संशोधन पद्धती' पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर – २००८
3. मेश्राम सुरेश (२०००) प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन, नागपूर (कृष्णचंद एजन्सीज लक्ष्मीनगर)
4. Agarwal S. and Mann E. (2016). Knee injuries in wrestlers: A prospective study from the Indian subcontinent, Asian journal of sports medicine, 7(4), p. e35000.
5. Gil J. A., Goodman A. D., DeFroda S. F. and Owens B. D. (2018). Characteristics of operative shoulder injuries in the National Collegiate Athletic Association, 2009-2010 through 2013-2014, Orthopaedic journal of sports medicine, 6(8), p.23-25.
6. Sharma S. and Hussain M. E. (2018). Psychometric properties of the Hindi version of SPADI in overhead athletes with shoulder impingement syndrome, *International Journal of Athletic Therapy and Training*, 23(6), pp.246-252.
7. Srinivasan S. and Pandey R. (2017). Current concepts in the management of shoulder instability, *Indian journal of orthopaedics*, 51, pp.524-528.
8. Tiwari A., Sathe P. K., Sathe A. and Kumar D. V. (2024). Comparison of anterior knee pain in recreational and professional Indian athletes, Saudi Journal of Sports Medicine, 24(3), pp.87-91.
9. Tummala S. V., Hartigan D. E., Patel K. A., Makovicka J. L. and Chhabra A. (2018). Shoulder injuries in National Collegiate Athletic Association quarterbacks: 10-year epidemiology of incidence, risk factors, and trends, Orthopaedic journal of sports medicine, 6(2), p.2325967118756826.
10. Zaremski J. L., Wasser J. G. and Vincent H. K. (2017). Mechanisms and treatments for shoulder injuries in overhead throwing athletes, Current sports medicine reports, 16(3), pp.179-188.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# प्रधानमंत्री आवास योजनेचा आढावा

**राजेश्वर वारलु काकडे**
अर्थशास्त्र विभाग नेवजाबई हितकरणी महाविद्यालय, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर
**डॉ. विठ्ठल एन. ठावरी**
अर्थशास्त्र विभाग कला व वाणिज्य महाविद्यालय, भिसी, ता. चिमुर, जि.चंद्रपूर
**Email**-rajeshwarkakde@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-170513
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 52-57
May 2025
**Submitted:** 05 Apr. 2025
**Revised:** 20 Apr. 2025
**Accepted:** 20 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**गोषवारा**

घर मनुष्याला समाजात एक महत्त्वपूर्ण आर्थिक सुरक्षा व सामाजिक दर्जा प्राप्त करुन देतात. मनुष्य जीवन जगत असताना अन्न, वस्त्र, निवारा या त्यांच्या प्रमुख गरजा आहे. या गरजा पूर्ण करण्यासाठी मनुष्य आपल्या आयुष्यात कार्यरत असतो. निवारा ही मानवाची अन्न व वस्त्र यानंतरची मूलभूत गरज आहे. आनंदित व तणाव विरहित जीवन जगण्यासाठी एक चांगला निवारा अत्यंत महत्त्वाचा असतो. निवारा व्यक्तीसाठी स्थैर्य उपलब्ध करुन देऊन त्यास कौटुंबिक व सामाजिक जीवनात भाग घेण्यास सक्षम बनवितो. मनाची शांतता व आनंदास हातभार लागल्याने व्यक्तींची उत्पादकता वाढते. पर्यायाने देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वाढण्यास मदत होते. प्रधानमंत्री आवास योजना ही केंद्र पुरस्कृत असून देशातील गरिबी निर्मूलन करण्यात महत्वाची भूमिका बजावत आहे. या संशोधनाचा मुख्य उद्देश्य म्हणजे देशातील प्रधानमंत्री आवास योजनेचा आढावा घेणे हा आहे.

**शब्द संकेत:** ग्रामीण, कल्याण, समता, महिला सशक्तीकरण, सुलभ आवास व पर्यावरण.

**प्रस्तावना:**

भारतीय संविधानाने भारतातील सर्व नागरिकांसाठी अन्न, वस्त्र, निवारा आरोग्य व शिक्षण या मूलभूत गरजा मानलेल्या आहे आणि सर्वसामान्य नागरिकांच्या या मूलभूत गरजांची पूर्तता करणे हे शासनाचे कर्तव्य मानलेले असून या मूलभूत गरजांची पूर्तता होणे किंवा त्या गरजेच्या वस्तू व्यक्तीला मिळणे हा देशातील लोकांचा मूलभूत अधिकार मानण्यात आला आहे. असे असले तरी आजही देशातील लाखो लोकांना त्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करता येईल अशी परिस्थिती नाही. दारिद्र्यामुळे देशातील लाखो लोकांना आपले पोट भरण्यासाठी आवश्यक असणारे दोन वेळचे अन्न देखील मिळत नाही. देशातील कितीतरी लाख लोक आज देखील अर्धपोटी राहत आहे. लज्जा रक्षणासाठी आवश्यक असलेले अंगभर वस्त्र देखील लाखो बंधू– भगिनीना मिळत नाही. निवाऱ्यासाठी स्व:मारकीचे घर देखील नाही. अत्यंत विदारक अशा स्थितीत देशातील लाखो जनता जीवन कंठीत आहेत, भारतीय संविधानातील तरतुदीनुसार जनतेच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्याची जबाबदारी हे शासनाची असते आणि आपल्या कर्तव्याला जाणून शासन अशा गोर– गरीब , आर्थिक, शारीरिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या जनतेला, समाजाला त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी विविध उपक्रम किंवा योजना राबवित आहे, उद्देश्य हाच की या योजनेच्या माध्यमातून समाजातील दुर्बल अशा घटकांच्या गरजा पूर्ण होऊन तो समाज, गट किंवा समूह समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होऊन उत्तम रीतीने जगता यावे.

सद्य:स्थितीत शासनातर्फे गोर–गरीब, अपंग, वृद्ध, बालक, स्त्रिया, समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या जाती जमाती यांच्या करिता अनेक योजना राबवल्या जात आहेत .. शासनाच्या या योजनांमुळे या घटकांना सुव्यवस्थित रीतीने जीवन जगणे शक्य होताना दिसत आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर समाजात दारिद्र्य ही एक भीषण समस्या निर्माण झाली. या दारिद्र्यामुळे अनेक भयानक स्वरुपाचे प्रश्न जन्माला आलेत. दारिद्र्यामुळे अनेक भयानक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. तेव्हा दारिद्र्य निर्मूलन करणे किंवा देशातील दारिद्र्याचे प्रमाण कमी करणे यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे. देशातील जनतेचे राहणीमान सुधारणे हा विकासाचा एक भाग असतो. देशाच्या सर्वांगीण विकासाचा विचार करताना जनतेच्या राहणीमानाचा मुद्दा देखील विचारात घ्यावा लागतो.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*राजेश्वर वारलू काकडे ,अर्थशास्त्र विभाग नेवजबाई हितकरणा महाविद्यालय. ता. ब्रम्हपूरी जि. च्रंद्रपूर*

**How to cite this article:**
*काकडे, . राजेश्वर . वारलु ., & ठावरी, . विठ्ठल . एन . (2025). प्रधानमंत्री आवास योजनेचा आढावा. Journal of Research & Development, 17(5(II)), 52–57.*
*https://doi.org/10.5281/zenodo.15817419*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817419
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

देशात सुरुवातीपासून आर्थिकदृष्ट्या कमकुवत गटातील लोकांची संख्या अधिक राहिलेली आहे. त्यामुळे या लोकांचे राहणीमान कसे सुधारेल आणि ते दारिद्र्य रेषेच्या वर कसे येतील? याचा विचार करुन केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या मार्फत विविध योजना राबवल्या जातात

**शोधनाचा उद्देश्य आणि पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधात प्रधानमंत्री आवास योजनेचा आढावा घेण्यात येत आहे, त्या अनुषंगाने पुढील उद्देश्य निश्चित करण्यात आले आहे.

१. प्रधानमंत्री आवास योजनेमुळे लाभार्थीच्या राहणीमानावर झालेल्या परिणामाचा आढावा घेणे.
२. प्रधानमंत्री आवास योजनेबाबत जागरुकता आणि प्रभावशीलता माहित करुन घेणे.

सदर शोध निबंध लिहिताना द्वितीय समकांचा वापर करण्यात आला आहे, तसेच काही संकेतस्थळावर प्रकाशित माहितीचा सुद्धा वापर करण्यात आला आहे.

**प्रधानमंत्री आवास योजनेचा पूर्व इतिहास**

प्रधानमंत्री आवास योजना म्हणजे स्त्री—पुरुषांना भारतीय घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अंतर्भूत असलेल्या निवाऱ्याच्या समान हक्क मान्य करण्याच्या दृष्टीने टाकलेले पहिले पाऊल होय. शहरी झोपडपट्टी व ग्रामीण भागातील आर्थिक मागास, बेघर, महिला, वृद्ध व अपंग ज्यांना राहण्यासाठी घर नसून त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीमध्ये राहणीमानाच्या दर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी सरकारने आवास योजना सुरु केली आहे. स्वातंत्र्यानंतर स्थलांतरित लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी भारतात एक आवाज कार्यक्रम १९५७ ला सुरु करण्यात आला त्याचे नाव विलेज हाऊसिंग प्रोग्राम (VHP) आहे. वर्ष १९६० पर्यंत भारतात विविध भागात जवळपास पाच लाख कुटुंबाला घरे उपलब्ध झाली. या कार्यक्रम अंतर्गत लोकांना व सहकारी समित्यांना प्रति कुटुंब पाच हजार रुपये पर्यंत कर्ज दिले गेले. पाचवी पंचवार्षिक (१९७४-१९९) योजनेच्या शेवट पर्यंत योजनेअंतर्गत फक्त ६७ हजार आवास निर्माण केले गेले. जून १९८५ ला इंदिरा आवास योजना सुरु करण्यात आली. त्यामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती लोकांसाठी ही योजना सुरु करण्यात आली. १ जानेवारी १९९६ पासून इंदिरा आवास योजना स्वतंत्रपणे सुरु करण्यात येऊन त्यामध्ये गैरअनुसूचित जाती, जमाती व दारिद्र्य रेषेखाली लोकांचा समावेश करण्यात आला आहे.

वर्ष २०१५ पासून इंदिरा आवास योजना हे नाव बदलून केंद्र सरकार मार्फत प्रधानमंत्री आवास योजना हे नवीन नाव या योजनेला देण्यात आले तसेच या योजनेमध्ये घरबांधणीसाठी मैदानी क्षेत्रात एक लाख वीस हजार रुपये व पूर्व —उत्तर राज्यांसाठी तसेच पहाडी क्षेत्रात राहणाऱ्या लोकांसाठी एक लाख तीस हजार रुपये आर्थिक मदत दिल्या जाते.

**प्रधानमंत्री आवास योजनेचा उद्देश**

१. आर्थिकदृष्ट्या दुर्बळ वर्ग समूहाला मदत करणे.
२. श्रीमंत व गरीब या दोन वर्गात असलेली विषमता कमी करणे.
३. वर्ष २०२२ पर्यंत १ करोड घरे आर्थिकदृष्ट्या दुर्बळ वर्गाला उपलब्ध करुन देणे.
४. माजी सैनिक व शहीद सैनिकांच्या कुटुंबांना घरे मंजूर करुन देऊन आर्थिक सहाय्य करणे.
५. विधवा महिला विकलांग व्यक्ती व अल्पसंख्याकांना मदत करणे.

**प्रधानमंत्री आवास योजनेची विशेषता**

1. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत केंद्र सरकार मार्फत मैदानी क्षेत्रात घर बांधण्यासाठी १ लाख २० हजार व पहाडी क्षेत्रासाठी १ लाख ३० हजार रुपये निधी दिला जातो तसेच केंद्र व राज्य सरकार मार्फत या योजनेचा खर्च ७५:२५ या प्रमाणात निधी पुरवठा केला जातो.
2. शौचालय बांधून देण्यासाठी स्वच्छ भारत मिशन अंतर्गत केंद्र सरकार मार्फत १२ हजार रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.
3. प्रधानमंत्री आवास योजने मार्फत देण्यात येणारी घरे महिलांच्या नावाने देण्यात येत आहे.
4. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत उत्पन्नानुसार वर्गीकरण करुन कमी व्याजाच्या दराने कर्ज घेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.
5. प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये घरासोबत घरासोबत स्वयंपाक रुमची व्यवस्था करण्यात आल्यामुळे पूर्वीपेक्षा भूभाग क्षेत्र वाढवण्यात आले आहे.
6. शुद्ध पाणी, एलपीजी गॅस कनेक्शन, वीज कनेक्शन इत्यादी योजनेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
7. प्रधानमंत्री आवास योजनेमुळे ग्रामीण भागातील बेरोजगार वर्गांना रोजगार प्राप्त होत आहे.
8. घर बांधण्यासाठी आवश्यक असलेल्या वस्तूंना मागणी वाढल्याने संबंधित उद्योगाचा विस्तार होत आहे.

**तक्ता क्र. १**

**स्वातंत्र्यानंतर भारत सरकारच्या विविध गृहनिर्माण योजना**

भारत सरकारने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशातील नागरिकांसाठी विभिन्न आवास योजना सुरु केलेल्या होत्या त्या पुढील तक्त्यात नमुद केल्या आहेत.

| अ.क्र. | गृहनिर्माण योजना | प्रारंभ वर्ष |
|---|---|---|
| १ | औद्योगिक कामगारांसाठी आणि आर्थिकदृष्ट्या कमजोर घटकांसाठी एकात्मिक अनुदानित गृहनिर्माण योजना | १९५२ |
| २ | कमी उत्पन्न गट गृहनिर्माण योजना | १९५४ |
| ३ | वृक्षारोपन कामगारांसाठी अनुदानित गृहनिर्माण योजना | १९५६ |
| ४ | मध्यम उत्पन्न गट गृहनिर्माण योजना | १९५९ |
| ५ | राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी भाडेपट्टा गृहनिर्माण योजना | १९५९ |

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

| | | |
|---|---|---|
| ६ | झोपडपट्टी मंजुरी आणि सुधारणा योजना | १९५६ |
| ७ | ग्राम गृहनिर्माण प्रकल्प योजना | १९५९ |
| ८ | जमीन संपादन आणि विकास योजना | १९५९ |
| ९ | ग्रामीण भागातील बेघर कामगारांसाठी घरांच्या जागांची तरतूद | १९७१ |
| १० | शहरी झोपडपट्ट्यांचा पर्यावरणीय सुधारणा | १९७२ |
| ११ | स्थळे आणि सेवा योजना | १९८० |
| १२ | इंदिरा आवास योजना | १९८५ |
| १३ | फुटपाथ रहिवाशांसाठी रात्रीचा निवारा योजना | १९९० |
| १४ | राष्ट्रीय झोपडपट्ट्या विकास कार्यक्रम | १९९६ |
| १५ | २ लाख गृहनिर्माण कार्यक्रम | १९९८ |
| १६ | वाल्मिकी आंबेडकर माळीण बस्ती आवास योजना | २००० |
| १७ | प्रधानमंत्र ग्रामोदय योजना | २००१ |
| १८ | जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी नूतनीकरण अभियान | २००५ |
| १९ | प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना (२००९-१०) | २००९ |
| २० | राजीव आवास योजना | २०११ |
| २१ | प्रधानमंत्री आवास योजना (सर्वांसाठी घरे) | २०१५ |

**स्रोत:**
भारत सरकार, गृहनिर्माण मंत्रालय, शहरी विकास आणि दारिद्र्य निर्मूलन मंत्रालयाचे विविध अहवाल.

**पीएमएवाय (PMAY) ची अमलबजावणी कशी झाली?**

भारतातील परवडनाऱ्या घरांच्या तीव्र गरजेला प्रतिसाद म्हणून जून २०१५ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना स्थापन करण्यात आली. योजनेच्या अंमलबजावणीमध्ये महत्त्वपूर्ण अर्थसंकल्पीय वाटप, पारदर्शक, लाभार्थी निवड प्रक्रिया, ऑनलाइन देखरेख प्रणाली समाविष्ट आहे. पीएमएवायमध्ये शहरी व ग्रामीण अशा दोन घटकांचा समावेश आहे. ज्यानी आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटक आणि अपेक्षित गटावर विशेष लक्ष केंद्रित करुन सर्व उत्पन्न गटांच्या घरांच्या गरजा पूर्ण केल्या. त्यांची परिणामकारकता वाढवण्यासाठी त्यानंतरच्या बदल आणि उपयोजनासह घरांचे बांधकाम, खरेदी किंवा सुधारणेसाठी आर्थिक सहाय्य प्रदान करणे हा त्यांचा उद्देश्य होता.

**प्रधानमंत्री आवास योजना शहरी योजनेचे फायदे**

१. पीएमएवाय शहरी हा एक सरकारी उपक्रम आहे. ज्यांचा उद्देश्य भारतातील शहरी भागातील रहिवाशांना परवडणारी घरे उपलब्ध करुन देणे आहे. ही योजना घरांच्या बांधकामासाठी आणि सुधारणेसाठी आर्थिक सहाय्य प्रधान करते ज्यामुळे घराची मालकी अधिक प्राप्त होते.
२. पीएमएवाय शहरी मध्ये क्रेडिट लिंक सबसिडी स्कीम (C LSS)समाविष्ट आहे जी गृह कर्जावर व्याज अनुदान देते ज्यामुळे लाभार्थ्यांवर आर्थिक भार कमी होतो.
३. योजनेचे विविध घटक परवडणारे गृहनिर्माण प्रकल्प आणि वैयक्तिक घर बांधणे किंवा जोडणे पूर्ण करतात.

**पीएमएवाय (PMAY) ग्रामीण चे फायदे**

१. पीएमएवाय ग्रामीण भारतातील ग्रामीण घरांच्या गरजा पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करते. ज्यांच्याकडे कायमस्वरुपी घर नाही अशा ग्रामीण भागात राहणाऱ्यांना लक्ष करते. ही योजना ग्रामीण कुटुंबांना घरांचे बांधकाम आणि नूतनी करण्यासाठी आर्थिक सहाय्य देऊन ग्रामीण विकासात महत्त्वपूर्ण योगदान देते.
२. हा उपक्रम केवळ ग्रामीण कुटुंबाची राहणीमान सुधारत नाही तर स्थानिक अर्थव्यवस्थेला आधार देत ग्रामीण भागात रोजगारांच्या संधीही निर्माण करतो. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण शाश्वत आणि सर्व समावेशक ग्रामीण विकास आणि विकासासाठी सरकारच्या वचनबद्धतेशी सुसंगत आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**प्रधानमंत्री आवास योजनेसाठी पात्रता**

सरकारी गृहनिर्माण योजनेसाठी खालील विविध पात्रतेची आवश्यकता आहे.

१. योजनेसाठी पात्र होण्यासाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १८ लाखापेक्षा कमी असावे. कुटुंबाचे त्याच्या उत्पन्नाच्या आधारे तीन गटांमध्ये वर्गीकरण केले जाते, ईडब्ल्यूएस (EWS), एलआयजी (LIG), आणि एमआयजी (MIG)
२. प्रधानमंत्री आवास योजना फक्त नवीन मालमत्ता खरेदी किंवा बांधकामासाठी लागू आहे. शिवाय या योजनेसाठी अर्ज करताना अर्जदार कोणतेही स्थावर मालमत्ता बाळगु शकत नाही.
३. मालमत्तेच्या दस्तऐवजावर किंवा डिडवर महिलेचे नाव असणे आवश्यक आहे. महिलेकडे एकमेव मालकीच्या अंतर्गत निवास असणे आवश्यक आहे जर तो संयुक्त उपक्रम असेल तर भागीदारांपैकी एक स्त्री असणे आवश्यक आहे. केवळ कुटुंबात महिला सदस्य नसलेल्या पकडणामध्ये हा नियम मोडला जाऊ शकतो.
४. यामध्ये केवळ अशाच व्यक्ती पात्र असतील ज्यांना केंद्र सरकार किंवा इतर कोणत्याही राज्य किंवा फेडरल गृह वित्त योजनेकडून कोणतेही अनुदान मिळालेले नाही.
५. योजनेचा लाभ एकदाच मिळतो. तुम्हाला लाभ मंजूर केले असल्यास तुम्ही लाभासाठी पुन्हा अर्ज करु शकत नाही.
६. अधिग्रहित केलेली मालमत्ता किंवा घर हे जनगणनेनुसार भारतातील शहर किंवा गावात असले पाहिजे.
७. जर तुम्ही सध्याच्या घराच्या विस्तारासाठी किंवा नूतनीकरणासाठी गृह कर्ज शोधात असेल तर पहिले कर्ज पेमेंट मिळाल्यापासून ३६ महिन्याच्या आत काम पूर्ण करणे आवश्यक आहे.

**तक्ता क्र. २**

**प्रधानमंत्री आवास योजनेची प्रगती रिपोर्ट (१९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत)**

राज्य व केंद्रशासित प्रदेश मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेची प्रगती रिपोर्ट पुढील तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. क्र. | राज्य | घराची भौतक प्रगती | | | आर्थिक प्रगती (कोटींमध्ये) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | जमिनीवर आधारीत | पूर्ण झालेले/वितरीत केलेले | गुंतवणूक | केंद्रिय सहाय्य | |
| | | | | | | मंजूर | राहीलेले |
| १ | आंध्रप्रदेश | २१,३२,४३२ | २०,०७,५२१ | ९,१५,०४१ | ९१,५९३.०५ | ३२,४९.३३ | २१,८३४.४९ |
| २ | बिहार | ३,२४,९९६ | ३,०३,६९२ | १,१७,९९१ | १८,६१४.९५ | ५,१०८.२४ | २,९८४.०८ |
| ३ | छत्तीसगढ | ३,०२,६६३ | २,८५,३६० | २,१२,१७० | १३,४७१.८८ | ४,८१०.९८ | ३९२५.७३ |
| ४ | गोवा | ३,१४६ | ३,१४६ | ३,१४४ | ६९६.५४ | ७४.७६ | ७५.०४ |
| ५ | गुजरात | १०,०५,२०४ | ९,८०,८१९ | ८,९८,२२७ | १,०५,२५३.०४ | २१,०६४.३४ | १९,५८५.१६ |
| ६ | हरियाना | १,१५,०३४ | ९३,०४३ | ६६,७६० | ९,४७१.७२ | २,१७१.६४ | १,६७३.५० |
| ७ | हिमाचल प्रदेश | १२,७५८ | १२,५२६ | ९,९८७ | ८६५.०४ | २१५.९५ | १९९.६० |
| ८ | झारखंड | २,२९,१५६ | २,१३,४२८ | १,३६,८११ | ११,४५१.६६ | ३,६०३.३१ | २,८२९.४३ |
| ९ | कर्णाटक | ६,३८,१२१ | ५,९६,२१६ | ३,३६,४९० | ४८,७७६.८६ | १०,६१४.४३ | ६,८१३.४२ |
| १० | केरळ | १,६६,७५२ | १,४७,०८५ | १,१९,२५९ | ८,८५९.३० | २,७७२.६३ | २,२८१.७९ |
| ११ | मध्यप्रदेश | ९,६१,१४७ | ९,४५,३८३ | ७,५२,३८६ | ५३,५३०.६३ | १५,९३०.४५ | २,२८१.७९ |
| **१२** | महाराष्ट्र | १३,९५,१९९ | ११,१७,५६४ | ८,३३,५३३ | १,७८,९५३.०६ | २५,९९९.५६ | १८,०८३.५९ |
| १३ | ओडिसा | २,०३,३८० | १,७४,९९२ | १,४०,७०६ | ८,४७०.६७ | २५,९९९.५६ | १८,०८३.५९ |
| १४ | पंजाब | १,३२,२३५ | १,१५,०१४ | ८०,१६१ | ९,१३२.३८ | २,३४२.७८ | १,८२५.७९ |
| १५ | राजस्थान | २,८९,४४६ | २,५८,०६२ | १,७९,७४७ | २३,५७९.१४ | ५,४३५.१६ | ४,२५९.६४ |
| १६ | तामिळनाडू | ६,८१,७९५ | ६,६२,६६० | ५,५५,९४९ | ४८,२६५.४४ | ११,२०७.०२ | ९,८१३.७६ |

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | तेलंगणा | २,५०,०८४ | २,४४,२१९ | २,२४,४३४ | ३०,७०६.३१ | ४,४७५.६६ | ३,३१४.२७ |
| १८ | उत्तरप्रदेश | १७,७२,३०१ | १७,०४,७५२ | १४,०२,७८६ | ८३,९७४.०० | २७,८९४.८५ | २५,४६१.६९ |
| १९ | उत्तराखंड | ६५,५१९ | ५६,१६९ | ३३,१४९ | ४,९३८.२३ | १,१९३.३८ | ८९१.४० |
| २० | पश्चिम बंगाल | ६,६८,९५३ | ५६,१६९ | ३३,१४९ | ४,९३८.२३ | १,१९३.३८ | ८९१.४० |
| २१ | अरुणाचल | ८,४९९ | ८,३६० | ७,१७२ | ४८२.६२ | १८२.३८ | १६१.१८ |
| २२ | आसाम | १,७६,६४३ | १,५७,५०८ | ९७,१३१ | ५,३१६.६५ | २,६७४.२६ | १,७८३.८० |
| २३ | मनिपूर | ५६,०३७ | ४८,५६१ | १३,३०१ | १,४४६.३२ | ८४१.३९ | ४७१.७२ |
| २४ | मेघालय | ४,७५८ | ३,७८९ | १,२०५ | १८७.१३ | ७२.३५ | ३५.०४ |
| २५ | मिझोरम | ३९,६०५ | ३९,२१५ | ७,९५२ | ९२८.२८ | ६०७.८० | ३६८.९१ |
| २६ | नागालँड | ३१,८६० | ३१,८४१ | १९,०९२ | १,०३३.५२ | ५०३.९१ | ३३९.२७ |
| २७ | सिक्कीम | ५९४ | ४५१ | २०९ | ३२.३५ | १०.३० | ७.०९ |
| २८ | त्रिपुरा | ८९,०६८ | ८६,६२८ | ७०,४९४ | २,८४३.७७ | १,४३७.५६ | १,२३४.४३ |
| २९ | अंदबार निकोबार | ३७६ | ३७६ | ४७ | ९५.८३ | ५.८४ | २.९३ |
| ३० | चंदीगढ | १,२५६ | १,२५६ | १,२५६ | २६३.०२ | २८.७८ | २८.७८ |
| ३१ | दादर नगर हवेली/दमन दिव | १०,४६८ | १०,१९६ | ९,१८१ | ९३८.५१ | २२२.२२ | २००.२७ |
| ३२ | दिल्ली | २९,९७६ | २९,९७६ | २९,९७६ | ५,६९६.०५ | ६९२.५३ | ६९२.५३ |
| ३३ | जम्मू काश्मिर | ४७,०४० | ४१,५३१ | २१,३८५ | २,५९३.३२ | ७२४.९४ | ४४५.९७ |
| ३४ | लदाख | १,३०७ | १,०१४ | ७८४ | ६५.३० | ३०.२२ | २३.२१ |
| ३५ | लक्षद्विप | | | | | | |
| ३६ | पाँडेचरी | १५,२६५ | १४,८१७ | ९,३४० | १,०१३.२३ | २४३.१७ | २०४.७१ |
| | **एकूण** | **११८.६३ लाख** | **११४.०९ लाख** | **८०.३५ लाख** | **८.११ लाख कोटी** | **२.०० लाख कोटी** | **१.५६ लाख कोटी** |

**स्त्रोत:**
पीएमएवाय योजनेचा राज्य/केंद्रशासित प्रदेशनिहाय प्रगती अहवाल, भारत सरकार, गृहनिर्माण आणि शहरी विकास मंत्रालय

**प्रधानमंत्री आवास योजनेचा परिणाम**

प्रधानमंत्री आवास योजना ही देशातील गरिबी निर्मूलन, सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेचा पुढील प्रमाणे परिणाम झालेला दिसून येतो.

**१) महिला सशक्तिकरण**

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत महिलांच्या नावाने घर उपलब्ध होत असल्यामुळे महिलाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलून महिला सक्षमीकरण स्थापित होत आहे.

**२) मूलभूत सुविधा**

प्रधानमंत्री आवास योजनेमार्फत घरबांधणी बरोबर इतर सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. उदा. विज कनेक्शन, गॅस कनेक्शन, स्वच्छ पाण्याची सोय इत्यादी यामुळे ग्रामीण भागातील राहणीमानात सुधारणा होण्यास मदत होत आहे.

**३) ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती**

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

आवास योजना मोठ्या प्रमाणात सुरु करण्यात आल्यामुळे आर्थिक घटकांना प्रोत्साहन मिळून गुंतवणूक होत आहे, त्याचा परिणाम होऊन रोजगार निर्मिती झाली त्यामुळे लोकांना रोजगार मिळून ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती प्राप्त झाली आहे.

**४) गरिबी निर्मूलन**

सरकार मार्फत गरीब लोकांना घर उपलब्ध होत असल्यामुळे एक प्रकारची आर्थिक सहाय्य मिळत आहे. त्यांच्या जीवनात सुधारणा होत आहे, गरीबी दूर करण्याचा आवास योजनेमार्फत प्रयत्न सरकार करीत असल्याचे दिसून येतात.

**५) सकारात्मक पर्यावरणीय प्रभाव**

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सक्षम घरबांधणी सोबत मूलभूत सुविधा उपलब्ध होत आहे. उदा. गॅस कनेक्शन, स्वच्छ पाणीपुरवठा व शौचालय इत्यादी त्यामुळे पर्यावरणावर सकारात्मक परिणाम होत आहे.

**६) सामाजिक समानता**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मजदूर, अल्पसंख्या आणि विकलांग व्यक्ती इत्यादी दुर्बळ घटकांना प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये प्राथमिकता दिल्यामुळे समाजामध्ये सामाजिक न्याय प्रस्तावित होऊन समानता निर्माण होत आहे.

**निष्कर्ष**

प्रधानमंत्री आवास योजना केंद्र पुरस्कृत योजना असून ही योजना सन २०१५ या वर्षी सुरु झाली आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील बेघर, कच्चे घर असलेल्या कुटुंबांना घरकुल बांधण्यासाठी अर्थसहाय्य देणे हा योजनेचा उद्देश आहे. या योजनेच्या लाभार्थ्यांची निवड ग्रामपंचायत मार्फत केली जाते. ही योजना शहरी तसेच ग्रामीण दोन्ही भागासाठी आहे म्हणूनच या योजनेला प्रधानमंत्री आवास योजना शहरी व ग्रामीण म्हणून ओळखले जाते.

प्रधानमंत्री आवास योजनामुळे ग्रामीण भागातील पात्र लाभार्थ्यांना आवास प्राप्त होऊन त्यांच्या राहणीमान मोठ्या प्रमाणात बदल झाल्याचे दिसून येतात, तसेच सामाजिक समानता प्रस्थापित होऊन सशक्त ग्रामीण भारत निर्माण होताना आपल्याला दिसून येत आहे. दोन करोड अतिरिक्त घरे निर्माण करण्यासाठी मंजुरी देऊन सर्वांसाठी घरे हे लक्ष प्राप्त करण्यासाठी सरकार प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे, समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या जाती जमातींना सन्मानपूर्वक जीवन जगता यावे हे सरकारचे उद्देश्य पूर्ण होत आहे .

**संदर्भग्रंथ सूची**

1. बि. डी. कुलकर्णी, एस. वी. ढमढेरे (२००७): “अर्थशास्त्रीय संशोधन पद्धती”, डायमंड पब्लिकेशन, नागपुर.
2. सुनील मायी (२००९): “भारतीय समाज प्रश्न आणि समस्या”, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
3. सुधीर बोधनकर, विवेक अलोनी, मृनाल कुलकर्णी (२०१४): “सामाजिक संशोधन पध्दती”, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
4. https//rdd.maharashtra.gov.in
5. https//www.housing.com
6. Mishra Durga Shankar (2017): “Affordable housing in urban area" Yojana development monthly government of India.
7. H. Manjula bhai (2022): “A study on public perception on pradhanmantri Awas Yojana" confine research vol.10, no.2, 2022.
8. रेड्डी डब्ल्यू. आर. (२०१८): पीएमएवाय– जी का प्रभाव आंकलन ग्रामीण बुनियादी ढाचे के लिए केंद्र राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्थान.
9. आवास और शहरी मामलो के मंत्रालय भारत सरकार, प्रधानमंत्री आवास योजना के ७ वर्ष (२०१५–२०२२).

.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# पर्यावरण दुष्टया कृषकोन्नती बाबत राष्ट्रसंत तुकडोजींचे विचार

**डॉ. दिनकर रामेश्वर चौधरी**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख कला व वाणिज्य महा. भिसी ता. चिमूर जि. चंद्रपूर
**Email-** drcpolitical@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-170514
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 58-60
May 2025
**Submitted:** 05 Apr. 2025
**Revised:** 20 Apr. 2025
**Accepted:** 20 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**प्रस्तावना**

भारतीय शेतीचा विचार केला तर आपल्याला असे दिसून येते की, जगात भारत हा 'कृषीप्रधान देश' म्हणुन ओळखला जातो. स्वतंत्र भारतीय अर्थव्यवस्थेच्या कणा शेतीचे असुन देखील शासन कृषी विकासाबाबत उदासिन असल्याचे आढळून येते. देश स्वांतत्र झाला त्यावेळी देशातील ६९ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबुन होती आज सुमारे एकुण लोकसंख्येच्या ६४ टक्के लोकसंख्या शेतीवरच उदर निरवाह साठी अवलंबुन आहे. शेतीचे एकुण अवस्था पाहता हे स्पष्ट होते की, ऐवढया मोठया लोकसंख्येला राजी रोटी पुरवणाऱ्या शेतीसाठी शासनाने पंचवार्षीक नियोजनाच्या माध्यमातून अपेक्षीत खर्च केलेला नाही. २० व्या शतकाच्या शेवटच्या उत्तरार्धात जागतीकीकरण आणि खाजगी करण यांची जागतीक लाट निर्माण झाली. या बदललेल्या परिस्थीत भारतास आंतरराष्ट्रीय बाजारपेठ आणि भांडवल उपलब्ध होवुन देशाच्या सर्वागीन विकासाच्या वेग वाढेल अशा अपेक्षेणे भारताने जागतीकीकरणाच्या प्रस्तावाला मान्यता दिली. जागतीकीकरणाच्या औधोगिक शौक्षणिक आणि कृषी क्षेत्रावर प्रतिकुल प्रभाव पडत आहे. असे दिसुन येवु लागले आहे. या प्रतिकुलते विरूध्द मोर्चे, निशेद, सभा, चर्चासत्रे व कार्यशाळा याव्दारे जागतिकीकरणाविरोधी जनमत तयार होत आहे. शासन शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी व विविध प्याकेज यासारख्या योजना राबवुन देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरूच आहेत. शेतकऱ्यांची हि दुरदशा थांबविण्यासाठी, शेतीच्या प्रगतीस राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार उपयुक्त आहेत. तसेच तुकडोजींच्या कृषी विषयक विचारावर म. गांधी, विनोबा भावे यांचा प्रभाव पडलेला दिसुन येतो.

**पर्यावरणिय दृष्टया कृषकोन्नती बाबत राष्ट्रसंत तुकडोजींचे विचार**

वंदनिय तुकडोजी महारांजानी शेतकऱ्यांना भोळा शंकर संभोदले आहे. ते म्हणतात शेतकऱ्यांना शौख्य लाभण्यासाठी मी 'ग्रामगीता' केली आहे. हा गंथ महाराजांनीशेतकऱ्यांना अर्पण केला आहे. जगात त्यांच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळण्यासाठी सर्व लक्ष्य वेधण्यासाठी मानवतेचे तेज झळकण्यासाठी शेतकऱ्याच्या उत्थानासाठी विश्वाचा अधिष्ठान म्हणून त्यांच्यासाठी हि ग्रामगिता तुकडोजीनी केली आहे. भारत हा खेड्यात दिसुन येतो आणि खेड्यातील लोकांचा उदरनिर्वाह व प्रपंच शेतीवर चालत असतो मराठीत एक म्हण शेती, 'उत्तम शेती—मध्यम व्यापार—कनिष्ठ चाकरी.' ही म्हण आता कालबाहय झाली आहे जी शेती क्षेष्ठ होती, ती कनिष्ठ बनली आहे. स्वत: शेतकरीच शेतीला कनिष्ठ मानु लागला आहे. त्याच्या मुलीचे लग्न करावयाचे झाल्यास तो शेती करणाऱ्या शेतकऱ्याच्या मुलास देणास नकार देतो. त्याला हवा असतो नौकरी करणारा जावाई, मग ती चपराशी का असेना. कारण चपराशाचा पगार चांगला नौकरी पकी, निवृत्ती नंतर पेंशन मिळते. शेती मध्ये सामान्यत: तोटाच येतो.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817450
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*चौधरी, प. ड. (2025). पर्यावरण दुष्टया कृषकोन्नती बाबत राष्ट्रसंत तुकडोजींचे विचार. Journal of Research and Development.*

**How to cite this article:**
*चौधरी, दिनकर रामेश्वर (2025). पर्यावरण दुष्टया कृषकोन्नती बाबत राष्ट्रसंत तुकडोजींचे विचार. Journal of Research & Development, 17(5(II)), 58–60.* https://doi.org/10.5281/zenodo.15817450

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

कर्ज वाढत जावुन शेवटी त्याला आत्महत्या करावी लागते. शेतकरी आपल्या पुढच्या पिढीने शेती करू नये असे काय? या प्रशनांची उत्तरे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपल्या ग्रामगितेतुन देतात.

रासायनिक खते, बी—बियाणे, औषधी यांच्या किमंती भरमसाठ वाढत आहेत. आणि शेतीतून निघणाऱ्या शेतमालाला योग्य तो भाव मिळत नाही म्हणून शेतकरी हवालदिल झाला आहे. रासायनिक खते व बी—बीयाणांवर होणार खर्च शेतकऱ्यांना परवडण्यासारखा नाही म्हणून राष्ट्रसंत म्हणतात—

''मिळोनि करावी ग्रामसफाई । नाली, मोरी ठायी ठायी ।
हस्ते, परहस्ते साफ सर्वहि । चहुकडे मार्ग ।।५३।।
त्यात जी जी निघले घाण । ती दूर न्यावी गावापासून ।
अस्ताव्यस्त न देता फेकून । नीट व्यवस्था लावावी ।। ५४ ।।
त्यासाठी करावे खतखड्डे । गावाबाहेर जागी उघडे ।
ज्नावरांचे मलमूत्र सापडे । तेहि त्यातचि भरावे ।। ५५ ।।

**ग्रामगीता अ. १२—ग्रामशुध्दी)**

सर्व ग्रामस्थांनी मिळून गावाची साफसफाई करावी नाल्या मोऱ्या (आंगोळी नंतर खड्डयात साचनारे पाणी) गावातील चारही बाजुख्चे रस्ते साफ करून जो कचरा आणि घाण निघेल त्याला अस्ताव्यस्त फकून न देता गावाच्या दूर त्याची नीट व्यवस्था लावावी किंवा त्यासाठी खतखड्डे तयार करून त्यात टाकावे. जनावरांची मलमूत्र त्यात टाकावे. त्यातून विनाखर्चात शेतीसाठी चांगले खत तयार होईल. तसेच गावाच्या सभोवताल कोणत्याही व्यक्तीचा मल दिसणार नाही म्हणूनच प्रतेक घ्ररी चरसंडास तयार करावीत मानसाच्याही मलमुत्रांन पांसन चांगले खत तयार होईल. निसर्गाच्या रचनांची अशी आहे. की, खाद्यांपासुन खत तयार होते. खतापासुनंच खाद्यनिर्मीती हे सर्व लोंकाना समजले पाहिजे म्हणुन उत्तपन्न काढण्यासाठी खताची जोपासना करणे आवश्यक आहे. नाहीतर जमिनीची दैनाअवस्था झाल्याशिवाय राहणार नाही. शेतजमिनीत गोखरू, तरोटा, तालीमखाना इ. वनस्पती उगवतात त्यांनपासुन देखील चांगले शेन्द्रीय खत तयार होते. त्याने उत्पन्नात निश्चीत वाढ होईल. मूबलक खत, मूबलक पाणी,मूबलक श्रम,मूबलक बी—बीयाणे यामूळे मूबलक उत्पन्न येईल. शेतकऱ्यां कृषीविषयी विविध बाबतीत माहीती मिळावी याकरीता कृषी प्रदर्शनीचे आयोजन करावे.हया प्रदर्शनीत उत्कष्ट बैलजोडीला बक्षीस देण्यात यावे. कृषी उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांनी पडीक जागेवर शेततळी खोदावीत. शेततळयातील पाण्याने शेतीत ओलीत करता येते. त्यामुळे शेतकऱ्यांची प्रगती होईल.

**स्वावलंबन**

व राष्ट्रसंत ग्रामगीतेच्या 'ग्रामनिर्मान कला' या तेराव्या अध्यायात म्हणतात

''हात फिरे तेथे लक्ष्मी शिरे । हे सूत्र ध्यानी ठेवोनि खरे ।
आपूंले ग्रामचि करावे गोजिरे । शहराहून ।। १।।
हे गावींचे लोक विसरले । आळसाव्दारे दुर्दैव शिरले ।
दैन्य, दारिद्रय सर्वत्र भरले । गावामाजी ।। २।।'

गाव आणि गावातील लोकांची दुर्देशा कशी झाली हे वरील ओळीमधून स्पष्ट होते. शहरांमध्ये यंत्र आल्यामूळे गावातील कुशल मानसे उद्योगासाठी शहरात गेली. त्यामुळे गावातील उद्योगकला लोप पावली. गावात केवळ कृषी व्यवसाय शिल्लक राहीला. शिक्षित आणि सामर्थ्यवाान लोक नोकरीसाठी वणवण फिरायला लागले. त्यामुळे उद्योगधंदे व शेतीकडे या वर्गाचे दुर्लक्ष झाले.

ह्या वर्गाने जर छोटे उद्योग व शेतीकडे लक्ष दिले तर गावात कोणाची बेकार किंवा दीन राहणार नाही व गावाची प्रगती होईल. फळे, झाडाणी, चटई, नेवार, पलंग, पायपूस, मोट, संदोर, डवरे, वखर, नांगर, कापूस पिंजणे, सुंदर वस्त्र, स्वेटर विनणे, बेरडया मुसळे, दोर बनविणे यासारखके लघू उद्योग करावेत. धुरे बंधारे व्यवस्थीत करून विविध प्रकारचे वाफे तयार करून शेतीची रचना करावी. सर्वांनी मिळून काम केले तर कोणीही शहरावर अवलंबून राहणार नाही.गाव आणि गावातील शेतकरी स्वावलंबी होईल.

कृषकोन्नतीसाठी शेतकऱ्यानी गाई पाळाव्यात कारण त्यापासुन शेतीची कामे करण्यासाठी बैल मिळतील. गाई पासुन दुध—दही मिळेल व त्यापासुन पैसे मिळतील त्यामुळे शेतकरी सुखी—संपन्न होईल. शेतकऱ्यानी निर्व्यसनी राहवे. चहा, गांज्या व दारू पासुन दुर राहावे. या व्यसनात कितीतरी रूपये खर्च होतात. आणि दारिद्र येते. गाई—बैलापासुन भरघोस उत्पन्न घेण्यासाठी शेणखत मिळते त्यामुळे शेतकऱ्यांची प्रगती होईल. नाहीतर मजूरीचे धन आणि पैसा पुरणार नाही. मुलांचे शिक्षणपाणी होणार नाही. ऐकर दोन ऐकर असणारी शेतीही पुरणार नाही. त्यामुळे कुटुंबाला यातना होतील.

**निष्कर्ष**

आज भारतात सर्वात जास्त दु:खी शेतकरी आहे. कर्ज, निसर्गा लहरीपणा, महागाई, भारनियमण इ. कारणांमुळे शेतकरी दु:खी आहे शेतकरी आमच्या देशाची फेरणा आहे. आकाशाच्या खुल्या हवेत व सुर्यप्रकाशात तो गाई, बैल अन्य पशुपक्षी, जिवजंतु, किडे माकोडे, सर्वांबरोबर आनंदमय जीवन व्यतीत करतो.शेतीची सेवा करण्याला श्रम लागतात तो ते आनंदाने करतो. हसत—हसत, गात—गात शेती करतो. शेतकरी सर्व जगाचा अन्नदाता आहे. तोच स्वावलंबी व स्वंयपुर्ण आहे. म्हणून राष्ट्रसंताच्या विचाराने प्रेरीत होवुन स्वावलंबनासाठी स्वावलंबी शंती करावी. शेतकऱ्यांची दु:ख निवारण्यासाठी गांधीजींच्या सेवाग्राम आश्रमात आणि अनेक ठिकाणी असे सफल प्रयोग चालू आहेत. त्याचे अनुकरण केल्यास शेतकरी कर्जमुक्त आणि चिंतामुक्त होवू शकतो. श्रापपूर्वक शेती करून शेतकऱ्यांने या परिवर्तनाचा श्रीगणेशा करावा.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१) **ग्रामगीता**

वं. राष्ट्रसंत श्रीतुकडोजी महाराज ,प्रकाशक ,प्रकाश वाघ अ.भा. श्रीगुरूदेव सेवा मंउळ,गुरूकूंज आश्रम ,जि. अमरावती महाराष्ट्र).

२) **समाज—संजीवनी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,श्रीगुरूदेव प्रकाशन गुरूकुंज आश्रम,जि.अमरावती,बारावी आवृत्ती सन २०००.

३) **दिव्यदर्शन**

संत तुकडोजी महाराज,श्रीगुरूदेव प्रकाशन, गुरूकूंज आश्रम,जि. अमरावती, बारावी आवृत्ती सन २०००.

४) **स्वावलंबी शेती**

गंगाप्रसाद अग्रवाल, प्रकाशक रणजीत देसाई, परधाम प्रकाशन, पवनार जि.वर्धा, दुसरी आवृत्ती जूलै २००६.

५) **भारत काल आज व उद्या**

ठसकूरदार बंग ,परंधाम प्रकाशन ,नोव्हेंबर २००५.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# तंजावर मराठा साम्राज्य : एक ऐतिहासिक अध्ययन

**अमितकुमार गणेश शिंगणे**
एम.इ.एस. आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज
मेहकर, जि. बुलढाणा.
**Email-** amitshingane156@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170515
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 5(II)|
Pp.61-65
May 2025

**Submitted:** 05 Apr. 2025
**Revised:** 20 Apr. 2025
**Accepted:** 20 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश :**

तंजावर मराठा साम्राज्य (इ.स. 1676-1855) हे दक्षिण भारतातील मराठा शक्तीच्या प्रभावाचे एक महत्त्वपूर्ण उदाहरण आहे. व्यंकोजी राजे भोसले यांनी स्थापन केलेले हे मराठा साम्राज्य, मराठ्याच्या सांस्कृतिक आणि प्रशासकीय परंपरांचा दक्षिण भारतातील प्रसार दर्शविते. तंजावर मराठ्यांनी कला, साहित्य, संगीत आणि धर्म यांना प्रोत्साहन देत स्थानिक तमिळ संस्कृतीशी समन्वय साधला. या शोधनिबंधात तंजावरच्या मराठा साम्राज्याचा इतिहास, प्रशासन, सांस्कृतिक योगदान, सामाजिक प्रभाव आणि पतन याचा अभ्यास केला आहे. यामधून मराठा साम्राज्याचा दक्षिण भारतातील प्रभाव आणि स्थानिक संस्कृतीशी त्याचे असलेले संबंध याबाबत विश्लेषण केले आहे.

**प्रस्तावना :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स. 1674 मध्ये राज्याभिषेक करून महाराष्ट्रात मराठा साम्राज्याची स्थापना केली. हे भारतीय इतिहासातील स्वराज्याच्या संकल्पनेचे एक तेजस्वी प्रतीक आहे. या साम्राज्याने केवळ उत्तर भारतातच नव्हे, तर दक्षिण भारतातही आपला प्रभाव प्रस्थापित केला. तंजावरचे मराठा साम्राज्य हे मराठा साम्राज्याच्या दक्षिणेतील विस्ताराचे एक महत्त्वाचे केंद्र होते. शहाजी राजे भोसले यांचे धाकटे पुत्र आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे सावत्र बंधू व्यंकोजी यांनी इ.स. 1676 मध्ये दक्षिणेत तंजावर येथे राज्याभिषेक करून स्वतंत्र मराठा राज्याची स्थापना केली. हे साम्राज्य “तंजावर मराठा साम्राज्य” म्हणून ओळखले जाते जे जवळपास दोन शतके अर्थात इ.स. 1676 ते 1855 पर्यंत अस्तित्वात राहिले. त्याने मराठा प्रशासकीय, सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरांचा दक्षिण भारतात प्रसार केला. तंजावर मराठ्यांनी स्थानिक तमिळ संस्कृतीशी समन्वय साधत एक आगळावेगळा सांस्कृतिक संगम घडवून आणला, ज्यामुळे कर्नाटक संगीत, तमिळ साहित्य आणि मंदिर स्थापत्यकला या सर्वांना नवे आयाम प्राप्त झाले.

तंजावर मराठा साम्राज्याचा इतिहास हा केवळ राजकीय आणि लष्करी यशाचा नाही, तर सांस्कृतिक आणि सामाजिक समन्वयाचा आहे. तंजावर मराठ्यांनी स्थानिक तमिळ परंपरांचा आदर करत मराठा संस्कृतीचा प्रसार केला, ज्यामुळे दक्षिण भारताच्या इतिहासात त्यांचे स्थान अढळ झाले. यांनी कला, संगीत, साहित्य आणि धर्म यांना प्रोत्साहन देऊन दक्षिण भारताच्या सांस्कृतिक समृद्धीला हातभार लावला.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

**Address for correspondence:**
*अमितकुमार गणेश शिंगणे एम.इ.एस. आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज मेहकर, जि. बुलढाणा*

DOI:10.5281/zenodo.15820090
OPEN ACCESS

**How to cite this article:**
*शिंगणे, . अमितकुमार . गणेश . (2025). तंजावर मराठा साम्राज्य : एक ऐतिहासिक अध्ययन. Journal of Research & Development, 17(5(II)), 61–65.* https://doi.org/10.5281/zenodo.15820090

आंतरिक कमजोरी, पानिपतचे युद्ध आणि ब्रिटिश वसाहतीकरण यामुळे या साम्राज्याचा अस्त झाला. तरीही, तंजावर मराठ्यांचा वारसा आजही कर्नाटक संगीत, तमिळ साहित्य आणि दक्षिण भारताच्या सांस्कृतिक इतिहासात जिवंत आहे. हा शोधनिबंध तंजावरच्या मराठा साम्राज्याचा इतिहास, त्याचे प्रशासकीय, सांस्कृतिक वैशिष्ट्य, योगदान, आणि पतन यांचा सविस्तर अभ्यास करतो, ज्यामुळे मराठा साम्राज्याचा दक्षिण भारतातील प्रभाव आणि सांस्कृतिक संमिश्रणाचा आढावा घेणे हा सदर शोधनिबंधाचा उद्देश आहे.

**मुख्य शब्द :**
तंजावर मराठा साम्राज्य, छत्रपती शिवाजी महाराज, व्यंकोजी राजे भोसले, मराठा प्रशासन, तमिळ संस्कृती, सांस्कृतिक समन्वय, कर्नाटक संगीत, तमिळ साहित्य, मंदिर स्थापत्य, ब्रिटिश वसाहत.

**उद्दिष्टे :**

1. तंजावर मराठा साम्राज्याची स्थापना, विकास आणि पतनाचा ऐतिहासिक अभ्यास करणे.
2. मराठा प्रशासकीय व्यवस्था आणि स्थानिक तमिळ संस्कृती यांच्यातील समन्वयाचे सखोल विश्लेषण करणे.
3. तंजावर मराठ्यांच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक योगदानांचा विस्तृत आढावा घेणे.
4. तंजावर मराठा साम्राज्याच्या पतनाची कारणे आणि त्याचा भारतीय इतिहासावर झालेला परिणाम अभ्यासणे.
5. तंजावर मराठ्यांचा सांस्कृतिक वारसा आणि त्याचा आधुनिक काळातील प्रभाव जाणून घेणे.

**गृहितके :**

1. तंजावरचे मराठा साम्राज्य मराठा साम्राज्याच्या दक्षिण भारतातील विस्ताराचे आणि प्रभावाचे महत्त्वपूर्ण उदाहरण आहे.
2. मराठा प्रशासनाने स्थानिक तमिळ संस्कृतीशी समन्वय साधून सांस्कृतिक संमिश्रणाला चालना दिली.
3. तंजावर मराठ्यांचे सांस्कृतिक योगदान, विशेषतः कर्नाटक संगीत आणि तमिळ साहित्य, दक्षिण भारताच्या इतिहासात दीर्घकालीन परिणाम करणारे ठरले.
4. आंतरिक कमतरता, पानिपतचे युद्ध आणि ब्रिटिश हस्तक्षेप यामुळे तंजावर मराठा साम्राज्याच्या पतनाला वेग आला.
5. तंजावर मराठ्यांचा प्रशासकीय आणि सांस्कृतिक वारसा दक्षिण भारतातील इतर राज्यांवर प्रभाव टाकणारा ठरला.

**विषयाचे महत्त्व :**

तंजावरचे मराठा साम्राज्य हे मराठा साम्राज्याच्या व्यापक प्रभावाचे आणि स्थानिक संस्कृतीशी संबंध साधण्याच्या क्षमतेचे प्रतीक आहे. या साम्राज्याने मराठा प्रशासकीय आणि सांस्कृतिक परंपरांचा दक्षिण भारतात प्रसार करताना येथील स्थानिक तमिळ संस्कृतीशी जुळवून घेतले. तंजावर मराठ्यांनी कर्नाटक संगीत, तमिळ साहित्य आणि मंदिर स्थापत्यकला यांना प्रोत्साहन देऊन सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. या साम्राज्याचा अभ्यास मराठा साम्राज्याच्या बहुआयामी स्वरूपाला समजण्यास आणि भारतीय इतिहासातील सांस्कृतिक संमिश्रणाच्या प्रक्रियेला उलगडण्यास मदत करतो. तंजावर मराठ्यांचा वारसा अद्यापही दक्षिण भारताच्या सांस्कृतिक इतिहासात पाहायला मिळते. यामुळेच या विषयाचा अभ्यासाला महत्त्व प्राप्त होते.

**विषय विवेचन :**

**1. तंजावर मराठा साम्राज्याची स्थापना :**

तंजावर मराठा साम्राज्याची स्थापना व्यंकोजी भोसले यांनी इ.स. 1676 मध्ये केली. व्यंकोजी हे छत्रपती शिवाजी महाराजांचे सावत्र भाऊ असून त्यांनी तंजावरवर विजय मिळवून स्वतंत्र राज्य स्थापन केले. शिवाजी महाराजांनी दक्षिण भारतात आपला प्रभाव वाढवण्यासाठी राज्याभिषेकानंतर दक्षिण मोहिम हाती घेतली. याच मोहिमेदरम्यान व्यंकोजींनी तंजावरची जबाबदारी देण्यात आली. त्यांनी विजापूर सल्तनतीच्या कमजोर होत असलेल्या अवस्थेचा फायदा घेत तंजावरमध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित केले. व्यंकोजी राजांना स्थानिक नायक शासक, विजापूर सल्तनती आणि इतर स्थानिक शक्तींच्या विरोधाला तोंड द्यावे लागले. तंजावरच्या सुपीक कावेरी खोऱ्यामुळे हे क्षेत्र तेथील सर्वच साम्राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. व्यंकोजींनी कूटनीती आणि लष्करी बळाचा वापर करत इथे आपले नियंत्रण दृढ केले. एका परप्रांतावर आपले स्वराज्य निर्माण केल्यानंतर ते टिकविणे अत्यंत अवघड असल्याची जाणीव व्यंकोजींना होती त्यामुळे त्यांनी स्थानिक तमिळ नेत्यांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करून आपली सत्ता मजबूत केली. मराठ्यांनी स्थापना केलेल्या

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

साम्राज्यासाठी तंजावर शहराला राजधानी बनवून प्रशासकीय आणि सांस्कृतिक केंद्र विकसित केले. त्यासाठी तंजावर किल्ल्याची पुनर्बांधणी करून प्रशासकीय व्यवस्थेला आकार देत मराठा साम्राज्याला स्थिरस्थावर केले.

**2. मराठा प्रशासन आणि स्थानिक समन्वय :**

व्यंकोजी राजांचा राज्यभिषेक झाल्यानंतर त्यांनी तंजावरच्या राज्यकारभाराला मराठा शैलीचा परिचय करून दिला. त्यांनी आपल्या दरबारात मराठी तसेच स्थानिक अनुभवी मंत्रिगणांची नियुक्ती करून राज्याच्या प्रशासन व्यवस्थेत सुसूत्रता आणण्यासाठी प्रयत्न केला. राज्यकारभार चालविण्यासाठी मंत्रिमंडळाची स्थापना केली. या मंडळातील सर्वोच्च पद मंत्री किंवा दलवाई (सभापती तथा सेनापती) असून तो राजाच्या अनुपस्थितीत राज्याचा सर्वसाधारण कारभारी असायचा. दुसरा महत्त्वाचा अधिकारी प्रधान किंवा डबीर पंडित (मुख्य मंत्री) होता, ज्याला अर्थ-वित्त आणि दिनदर्शिका यासारखे दरबारी कार्यभार सांभाळण्याची जबाबदारी होती. तंजावर मराठ्यांनी मराठा साम्राज्याच्या अष्टप्रधान मंडळाच्या धर्तीवर प्रशासकीय व्यवस्था उभारली असल्याचे दिसून येते. परंतु ही व्यवस्था स्थानिक गरजांनुसार सुधारित करण्यात आली, ज्यामुळे स्थानिक तमिळ नेत्यांना प्रशासनात स्थान मिळाले.

व्यंकोजी राजानी राज्याच्या कार्यक्षम कारभारासाठी प्रदेशाचे सुबे, सीमाई (प्रांत) आणि मगनम (परगणे) असे प्रशासनिक विभाग पाडले होते. तंजावर राज्यात पाच मुख्य सुबे अस्तित्वात होते, ते म्हणजे पट्टुकोट्टई, मयावरम, कुंबकोणम्, मन्नारगुडी, तिरुवाडी. प्रत्येक सुबेच्या पुढारी पदावर मराठा किंवा तमिळ स्थानिक विश्वस्तांना नेमून त्यांना महसूल आणि न्याय व्यवस्थेची जबाबदारी देण्यात आली होती. प्रशासनातील महत्त्वाचे लेखनकार्य आणि नोंदींसाठी मराठीबरोबरच संस्कृत, तेलुगू व तमिळ भाषा वापरल्या जात असल्याचे आढळते. व्यंकोजी राजांनी  स्वतः आपल्या कारकीर्दीची माहिती तंजावर येथील मंदिराच्या भिंतीवर शिलालेखांद्वारे मराठी भाषेत नोंदवून ठेवली असल्याचे उल्लेख आहेत. मराठ्यांनी तमिळ भाषा आणि संस्कृतीचा स्वीकार करत स्थानिक समाजाशी संनाद साधला. त्यांनी तमिळ भाषेत प्रशासकीय कामकाज केले आणि स्थानिक परंपरांचा आदर केला. मराठा राजांनी तमिळ विद्वान आणि कवींना आपल्या दरबारात आश्रय दिला, ज्यामुळे मराठा-तमिळ सांस्कृतिक संमिश्रणाला चालना मिळाली.

तंजावरच्या सुपीक कावेरी खोऱ्यामुळे शेती हा येथील अर्थव्यवस्थेचा कणा होता. मराठ्यांनी मलिक अंबरच्या कर व्यवस्थेचा अवलंब करत जमिनीच्या मोजणीवर आधारित कर प्रणाली लागू केली. यामुळे शेती उत्पादनाला चालना मिळाली आणि राज्याला स्थिर महसूल मिळाला. राजस्व व्यवस्थेतही काही सुधारणा करून उत्पन्नाचे स्रोत वाढविण्यावर भर दिला. शेतकऱ्यांकडून कर संकलन करण्यासाठी गावपातळीवरील मिरासदार किंवा पुत्तक्केदार (जहागीरदार / भुमीस्वामी) वर्गाला जबाबदारी देण्यात आली होती. कर पद्धतीत पारदर्शकता येण्यासाठी महसुली अधिकाऱ्यांची शिस्तबद्ध श्रेणी निर्माण करण्यात आली. स्थानिक पंचायतींच्या माध्यमातून न्याय व्यवस्था राबवली. गावस्तरावर पंचायतींना स्वायत्तता दिली, ज्यामुळे स्थानिक समाजाशी त्यांचे संबंध दृढ झाले. कर्नाटकातील नायक, मदुराईचे शासक आणि इतर स्थानिक शक्तींशी कूटनीतिक संबंध प्रस्थापित केले. यामुळे तंजावर मराठ्यांना स्थानिक राजकारणात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले.

**3. सांस्कृतिक आणि धार्मिक योगदान :**

तंजावर मराठा राजांनी कर्नाटक संगीताला प्रोत्साहन देऊन दक्षिण भारतीय संगीत परंपरेला नवे आयाम दिले. त्यांच्या दरबारात अनेक संगीतकार, कलाकारांना आश्रय मिळाला. तंजावरच्या त्रिमूर्ती म्हणजे त्यागराज, मुथुस्वामी दीक्षितार आणि श्यामा शास्त्री यांचे योगदान देखील याच काळात बहरले. मराठा राजांनी संगीत क्षेत्राच्या विकासासाठी संगीत शिक्षण संस्था स्थापन केल्या सोबतच संगीत महोत्सवांचे आयोजन केले. मराठा राजांनी स्थानिक तमिळ साहित्याला प्रोत्साहन दिले. त्यांच्या दरबारात तमिळ आणि मराठी भाषेत काव्य, नाट्य आणि धार्मिक साहित्य रचले गेले. तमिळ कवींना राजाश्रय देऊन तमिळ साहित्याच्या समृद्धीला हातभार लावला. मराठा राजा सरफोजी दुसरे यांनी मोठ्या प्रमाणात तमिळ आणि संस्कृत ग्रंथांचे संकलन आणि संरक्षण केले.

हिंदूंच्या मंदिरांना चिरस्थायी बनविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मराठ्यांनी केले. नवीन मंदिरे बांधली, जुन्या मंदिरांचा जीर्णोद्धार केला आणि मंदिरांना दान देऊन धार्मिक परंपरांना चालना दिली. जुन्या हिंदू मंदिरामध्ये तंजावरच्या बृहदीश्वर मंदिराचा जीर्णोद्धार केला. त्यासोबतच अनेक मंदिरांचे संरक्षण आणि पुनर्बांधणी केली. मराठ्यांनी स्थापना केलेल्या मंदिरामध्ये मराठा स्थापत्य शैली आणि तमिळ द्रविड शैलीचा समन्वयाने मंदिरांची उभारणी झाल्याचे दिसून येतो. मराठ्यांनी हिंदू धर्माला प्रोत्साहन देताना वैष्णव आणि शैव परंपरांचा समन्वय साधला. त्यांनी मठ आणि धार्मिक संस्थांना आर्थिक सहाय्य प्रदान केले. मराठा राजांनी तमिळ संतांच्या परंपरांचा

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

आदर केला आणि त्यांच्या साहित्याला प्रोत्साहन दिले. भरतनाट्यम आणि यक्षगान यासारख्या नृत्य आणि नाट्य परंपरांना प्रोत्साहन देवून दरबारात त्याचे नियमित प्रदर्शन आयोजित केले जात असे.

**4. सामाजिक आणि आर्थिक प्रभाव :**

तंजावर मराठ्यांनी स्थानिक सामाजिक रचनेत फारसे बदल न करता स्थानिक तमिळ नेत्यांना प्रशासनात सामावून घेतले. यामुळे मराठा - तमिळ समाज यांच्यात सामाजिक समन्वय निर्माण झाला. मराठा राजांनी स्थानिक जाती, समुदायांना त्यांचे पारंपरिक अधिकार आणि जबाबदाऱ्या कायम ठेवण्याची परवानगी दिली. कावेरी खोऱ्यामुळे शेती हा येथील अर्थव्यवस्थेचा कणा होता. यामुळे सिंचन व्यवस्थेला प्रोत्साहन देऊन कालवे आणि जलाशयांची निर्मिती करण्यावर भर दिल्याने शेती उत्पादनात वाढ झाली आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळाली. मराठ्यांनी तंजावरच्या किनारपट्टीचा वापर व्यापारासाठी केला. तंजावरच्या किनारपट्टीवर नौदलाची निर्मिती केली, ज्यामुळे व्यापार आणि संरक्षणाला बळ मिळाले. त्यांनी पोर्तुगीज, डच आणि फ्रेंच व्यापाऱ्यांशी व्यापारी संबंध प्रस्थापित केले. तंजावरमधील कापड, मसाले आणि शेती उत्पादनांचा व्यापार वाढला. मराठ्यांनी हस्तकला आणि लघु उद्योगांना प्रोत्साहन दिले.

**5. तंजावर मराठा साम्राज्याचे पतन :**

मराठा साम्राज्याच्या केंद्रीय सत्तेच्या कमजोरीमुळे तंजावर मराठ्यांना स्वायत्तता मिळाली, परंतु यामुळे त्यांचा मुख्य मराठा साम्राज्याशी संपर्क कमी झाला. तंजावरच्या मराठा राजांमध्ये उत्तराधिकाराचे वाद आणि अंतर्गत कलह वाढले, ज्यामुळे साम्राज्य कमजोर झाले. पानिपतच्या तिसऱ्या युद्धात मराठ्यांचा अहमद शाह अब्दालीकडून पराभव झाला. या पराभवाने मराठा साम्राज्याची शक्ती, प्रतिष्ठा कमी झाली, ज्याचा परिणाम तंजावर मराठ्यांवरही झाला. मराठा साम्राज्याच्या पतनादरम्यान हैदर अली आणि टीपू सुलतान यांच्या मैसूर राज्याने तंजावरवर दबाव वाढवला. यामुळे तंजावर मराठ्यांची लष्करी आणि राजकीय शक्ती आणखी कमजोर झाली. यासोबतच 18व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने दक्षिण भारतात आपले वर्चस्व वाढवले. इ.स. 1799 मध्ये तंजावर ब्रिटिश संरक्षित राज्य बनले आणि मराठा राजांची स्वायत्तता कमी झाली. इ.स. 1855 मध्ये, उत्तराधिकारी नसल्याच्या कारणास्तव, ब्रिटिशांनी तंजावर मराठा राज्य खालसा केले आणि ते ब्रिटिश साम्राज्याचा भाग बनले.

**6. तंजावर मराठ्यांचा वारसा :**

तंजावर मराठा साम्राज्य हे मराठा साम्राज्याच्या दक्षिण भारतातील विस्ताराचे आणि सांस्कृतिक समन्वयाचे प्रतीक आहे. या साम्राज्याचा अभ्यास मराठा साम्राज्याच्या व्यापक स्वरूपाला आणि भारतीय इतिहासातील सांस्कृतिक संमिश्रणाच्या प्रक्रियेला समजण्यास मदत करतो. तंजावर मराठ्यांनी कर्नाटक संगीत आणि तमिळ साहित्याच्या क्षेत्रात दीर्घकालीन प्रभाव टाकला. त्यागराज, मुथुस्वामी दीक्षितार आणि श्यामा शास्त्री यांचे योगदान आजही कर्नाटक संगीताच्या परंपरेत जिवंत आहे. तंजावरच्या मराठा दरबारातील सांस्कृतिक कार्यांचा प्रभाव दक्षिण भारताच्या इतर भागांतही पसरला. मराठा प्रशासकीय पद्धतींचा प्रभाव दक्षिण भारतातील इतर राज्यांवर, विशेषतः मदुराई आणि त्रावणकोर यासारख्या राज्यांवर दिसून येतो. मराठ्यांनी लागू केलेली कर व्यवस्था आणि सिंचन प्रणालीचा प्रभाव दीर्घकालीन होता. तंजावरच्या मराठा राजांनी संरक्षित केलेले ग्रंथ, कलाकृती आणि मंदिरे आजही सांस्कृतिक आणि ऐतिहासिक अभ्यासाचे केंद्र आहेत. तंजावरमधील सरस्वती महाल ग्रंथालय, जे मराठा राजा सरफोजी दुसरे यांनी विकसित केले, हे आजही तमिळ आणि संस्कृत साहित्याच्या संरक्षणाचे महत्त्वाचे केंद्र आहे.

**निष्कर्ष :**

1. तंजावर मराठा साम्राज्य हे मराठा साम्राज्याच्या व्यापक प्रभावाचे आणि सांस्कृतिक समन्वयाचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.
2. व्यंकोजी राजे भोसले यांनी इ.स. 1676 मध्ये स्थापन केलेल्या या साम्राज्याने मराठ्यांच्या प्रशासकीय आणि सांस्कृतिक परंपरांचा दक्षिण भारतात प्रसार केला.
3. व्यंकोजी राजांच्या राज्यभिषेकानंतर तंजावरमध्ये प्रशासन अधिक शिस्तबद्ध आणि केंद्रीकृत झाले. राज्यकारभारात मराठा दरबारी परंपरा रूढ केली गेली, पण त्याचबरोबर स्थानिक तमिळ-तेलुगू प्रजेलाही अपेक्षित न्याय व सुविधा मिळतील याची काळजी घेतल्या गेली.
4. तंजावर मराठ्यांनी स्थानिक तमिळ संस्कृतीशी समन्वय साधत कला, साहित्य, संगीत आणि धर्म यांना प्रोत्साहन देऊन दक्षिण भारताच्या सांस्कृतिक इतिहासाला समृद्ध केले. त्यांनी कर्नाटक संगीत, तमिळ साहित्य आणि मंदिर स्थापत्यकला यांना नवे आयाम

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

दिले. तथापि, आंतरिक कमजोरी, पानिपत युद्ध आणि ब्रिटिश वसाहतीकरण यामुळे मराठा साम्राज्याचा अस्त झाला. तरीही, तंजावर मराठ्यांचा वारसा आजही कर्नाटक संगीत, तमिळ साहित्य आणि दक्षिण भारताच्या सांस्कृतिक इतिहासात जिवंत आहे.

5. तंजावर मराठा साम्राज्याचा अभ्यास भारतीय इतिहासातील सांस्कृतिक संमिश्रण आणि मराठा प्रभावाचे महत्त्व अधोरेखित करतो.
6. तंजावर मराठा साम्राज्याचा इतिहास हा केवळ राजकीय आणि लष्करी यशांचा नाही, तर सांस्कृतिक आणि सामाजिक समन्वयाचा आहे, जो भारतीय इतिहासाच्या अभ्यासकांसाठी प्रेरणादायी आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1. Grant Duff, - History of the Maratha, Edwardes Oxford, 1935.
2. Iyer, S., - Music and Dance in Thanjavur Maratha Period, Tamil University Press, Thanjavur, 2013.
3. Pillai, S., - Tamil Literature and Thanjavur Maratha Court, Madurai Kamaraj University Press, Madurai, 2010.
4. Rao, V. N., - Manuscripts and Cultural Heritage of Thanjavur, University of Madras Press, Chennai, 1995.
5. Subramanian, K. R., - The Maratha Rajas of Tanjore, Published 60, T. S. V. Koil Street, University of Madras, 1928.
6. कुलकर्णी अ. रा., - शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 1993.
7. गॉर्डन, डॉ. स्टुअर्ट (अनु. - कुलकर्णी र. अ.,) - द मराठाज (1600-1818), डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2016.
8. सरकार, यदुनाथ (अनु. - वाकसकर, विनायक सदाशिव) - शिवाजी व शिवकाल, प्रकाशन, भारत गौरव ग्रंथमाला, मुंबई, 1930.

•••

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# मराठी साहित्यातील स्त्रीवाद व स्त्रीवादी प्रवाह

**[1]कीर्ती महादेव सेलोकर**
**[2]डॉ. उज्ज्वला वंजारी**
मराठी विभाग,जे. एम. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भंडारा
**Email :** kirtiselokar@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170516
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 5(II)|
Pp. 66-71
May 2025

**Submitted:** 05 Apr. 2025
**Revised:** 20 Apr. 2025
**Accepted:** 20 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यामध्ये स्त्रीवादी साहित्य निर्मितीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. साहित्य क्षेत्रात स्त्री लेखन विविध अंगाने होत आले आहे. मराठी साहित्यात स्त्रीवादाने महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त केले आहे. स्त्रीवादी साहित्य म्हणजे स्त्री म्हणून जगताना येणाऱ्या अनुभवांना, भावनांना आणि विचारांना व्यक्त करणारे साहित्य. यात स्त्रीच्या जीवनातील समस्या, पुरुषप्रधान समाजात तिची भूमिका, आणि तिच्या हक्कांसाठीचा संघर्ष यांसारखे विषय अनेकदा मांडले जातात.कविता, कथा, नाटक, आत्मचरित्र, कादंबरी, ललितबंध अशा सर्व मूलभूत वाङ्मय प्रकारात स्त्री लेखणी वैविध्यपूर्ण अविष्कारात अभिव्यक्त झालेली दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व कालखंड व स्वातंत्र्योत्तर कालखंडात विविध साहित्य प्रकारातून बदलणाऱ्या काल प्रवाहात स्त्रीमन अभिव्यक्तीची व आत्मविष्काराची विविध माध्यमे हाताळताना दिसते. साहित्य प्रकार कोणताही असो, त्याचे वेगळेपण त्यातून व्यक्त होणाऱ्या जाणीवांवर अवलंबून असते. स्त्रीवादी साहित्याचा मागोवा घेतला तर असे दिसून येते. साहित्य क्षेत्रात स्त्री लेखन विविध अंगाने होत आले आहे. कविता, कथा, नाटक, आत्मचरित्र, कादंबरी, ललितबंध अशा सर्व मूलभूत वाङ्मय प्रकारात स्त्री लेखणी वैविध्यपूर्ण अविष्कारात अभिव्यक्त झालेली दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व कालखंड व स्वातंत्र्योत्तर कालखंडात विविध साहित्य प्रकारातून बदलणाऱ्या काल प्रवाहात स्त्रीमन अभिव्यक्तीची व आत्मविष्काराची विविध माध्यमे हाताळताना दिसते. साहित्य प्रकार कोणताही असो, त्याचे वेगळेपण त्यातून व्यक्त होणाऱ्या जाणीवांवर अवलंबून असते. स्त्रीवादी साहित्याचा मागोवा घेतला तर असे दिसून येते की, स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रियांनी आपला आत्मा संपूर्णपणे ओतला तो कवितेतून. पण कवितेच्या पाठोपाठ स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रिया आत्मकनातून ,आत्मचरित्रांतून व्यक्त होऊ लागल्या.

मराठी साहित्यात साधारणतः १९६० नंतरच्या दशकांत स्त्रीवादी साहित्य जाणीवपूर्वक लिहिले जाऊ लागले आणि सत्तर-ऐंशीच्या व नंतरच्या दशकांतही स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह काव्य, कथा, कादंबरी अशा प्रकारांत जोमाने विकसित होऊ लागला. मात्र तत्पूर्वीही स्त्रीकेंद्री साहित्याची निर्मिती अगदी प्राचीन काळापासून मौखिक वा लिखित स्वरूपात होत होती, असे दिसून येते.स्त्रियांच्या साहित्याचे मूळ प्राचीन काळापर्यंत जाऊन पोहोचते. मराठी लोकगीतां त हा स्त्रीत्वाचा स्वर सतत ऐकू येतो. अन्याय, बंधने, शिक्षा, दंड, तक्रार, शोषण, पुरुषांकडून मिळणारी अन्यायकारक व अपमानास्पद वागणूक, सततची अवहेलना व उपेक्षा, अपाय, इजा, आपल्याकडून चूक वा अपराध घडेल का ह्याची स्त्रीला वाटणारी धास्ती इ. स्त्रियांच्या

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*कीर्ती महादेव सेलोकर , मराठी विभाग,जे. एम. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भंडारा*

**How to cite this article:**
*सेलोकर, . कीर्ती . महादेव ., & वंजारी, . उज्ज्वला . (2025). मराठी साहित्यातील स्त्रीवाद व स्त्रीवादी प्रवाह. Journal of Research & Development, 17(5(II)), 66–71.*
https://doi.org/10.5281/zenodo.15817502

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817502
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

अनु-भवविश्वाच्या कक्षेतील अशा अनेक भावना आणि तथ्ये त्यांनी लोकवाङ्मयातून शब्दांकित केलेली दिसतात. समाजाने दुर्लक्षित केलेले हे वाङ्मय स्त्रीवादी समीक्षकांनी शोधून त्यावर नवा प्रकाश टाकला आहे. स्त्रीवादी दृष्टिकोणातून स्त्रियांचे अनेक प्रश्न व जाणिवा यांची अभिव्यक्ती, पुरुषसत्ताक व्यवस्था व पुरुषी मानसिकता यांची उपरोधपूर्ण टिंगलटवाळी, करिअरला प्राधान्य देणाऱ्या स्त्रीच्या समस्या व व्यथा यांचे प्रभावी चित्रण ही त्यांच्या स्त्रीवादी साहित्याची ठळक वैशिष्ट्ये होत. दलित स्त्रियांची आत्मकथने ही स्त्रीवादी साहित्यातील एक महत्त्वाचा दस्तावेज आहे. बेबी कांबळे ( जिणे आमचे ), कुमुद पावडे ( अंतःस्फोट ), शांताबाई कांबळे ( माज्या जलमाची चित्तरकथा (, मुक्ता सर्वगौड ( मिटलेली कवाडे ), ऊर्मिला पवार ( आयदान ), सिंधुताई सपकाळ ( मी वनवासी ) इत्यादींचे स्त्रीवादी साहित्याच्या संदर्भात महत्त्वाचे योगदान आहे. भारतीय व समाजशास्त्रीय अशा दुहेरी स्त्रीवादी भूमिकांतून त्यांचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे.

**स्त्रीवादाची वैशिष्ट्ये :-**

स्त्रीवादाची अनेक वैशिष्ट्ये दिसून येतात .त्यापैकी काही पुढीलप्रमाणे –

**१)स्त्री-पुरुष समानता :-**

स्त्रीवादी साहित्याला पुरुष आणि स्त्री यांच्यामध्ये प्रत्येक बाबतीत समानता अपेक्षित आहे.त्यासाठीच हे साहित्य प्रयत्नशील असते. स्त्रीवादी साहित्य स्त्रिया आणि पुरुषांमधील बरोबरी आणि अधिकार यावर जोर देते.

**२)स्त्री-जीवनातील अनुभव:-**

स्त्रीवादी साहित्य स्त्रियांना व्यक्त होण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देते.स्त्रियांचे दुःख ,त्यांच्या जाणीवा यांचे वर्णन स्त्रीवादी साहित्यातून झालेले दिसून येते. या साहित्यात स्त्रियांच्या वैयक्तिक आणि सामाजिक अनुभवांना महत्त्व असते.

**३)स्वतंत्र व्यक्ती म्हणून विचार –**

स्त्रीवादी साहित्याची एक महत्त्वाची अपेक्षा असते .ती म्हणजे स्त्रियांचा एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून विचार व्हावा अशी . स्त्रीवादी साहित्यातून नेहमीच अशा प्रकारचा प्रयत्न करण्यात आलेला दिसून येतो.स्त्री ही एक वेगळे व्यक्तिमत्त्व आहे .आणि म्हणूनच स्त्रियांचा वेगळेपणाने , स्वतंत्रपणे समाजात विचार व्हायला हवा.

**४)जाणीव आणि विचार:**

समाजात मिळणारी दुय्यम वागणूक,वाट्याला आलेले अपमान ,दुःख, स्त्रियांच्या जाणिवा आणि विचारांना स्त्रीवादी साहित्य व्यासपीठ मिळवून देते.

**५)सामाजिक बदल:**

स्त्रीवादी साहित्याचा स्त्रियांना चांगले मानाचे जीवन जगायला मिळावे ,समाजात बरोबरीचा दर्जा मिळावा,स्त्रियांचे दुःखसमूळ नष्ट व्हावे अशा प्रकारचा सामाजिक बदल स्त्रीवादी साहित्याला अपेक्षित असतो. स्त्रीवादी साहित्य सामाजातल्या चांगल्या परिवर्तनाला प्रोत्साहन देते आणि स्त्रीच्या अधिकारांसाठी वाचा फोडते.

**स्त्रीवादाचा उदय :**

पारंपरिक समाजव्यवस्थेत स्त्रीला असलेल्या स्थानाचा विचार करता असे दिसते की, पुरूषप्रधान संस्कृतीने, स्त्रीचे विविध पातळ्यांवर शोषण केले आहे.परंपरेने तिला 'अबला' हे विशेषण लावले आहे. 'चूल आणि मूल' हेच तिचे आयुष्यभराचे कार्यक्षेत्र. तिच्याकडे पाहत असताना न्यूनत्वाच्या दृष्टिकोणातून पाहिले आहे. 'पुरूषाशिवाय तिला पूर्णत्व येऊच शकत नाही' हे तिच्या मनावर वारंवार बिंबवले गेले. यासाठी पुरूषप्रधान संस्कृतीने धार्मिक ग्रंथांचा आधार घेतला. त्याचे लेखनही पुरूषांनी त्यांच्या सोयीप्रमाणेच केले. त्यात विविध युक्त्या वापरण्यात आल्या. धार्मिक ग्रंथांमध्ये स्त्रीचे चित्रण सहनशील, सोशिक, ममतेचा सागर अशारितीने केले गेले. पुरूषप्रधान संस्कृतीच्या जोखडात स्त्री दबतच गेली आणि स्वतःचा आवाज तिचे स्वतंत्र अस्तित्व हरवून बसली. आपण जे त्यागाचे, कष्टाचे जीवन जगत आहोत हेच आपले खरे जीवन आहे. या निर्णयाप्रत तिला आणले गेले. स्त्रीच्या अगतिकतेचे एक अबला म्हणून समाजातील हेच स्थान लक्षात घेऊन स्त्रीवादाचा विचार करू लागले तर सध्याच्या परिस्थितीत यात बदल होत असल्याचे दिसते. औद्योगिक क्रांती ही जागतिक इतिहासातील एक महत्त्वाची घटना आहे.विज्ञानातील विविध शोधांची मालिका चालू झाली आणि त्याचा परिणाम जीवनाच्या विविध क्षेत्रांवर पडू लागला. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत परिवर्तनाचे वारे वाहू लागले. याच काळात आणखी एक महत्त्वाची घटना घडली आणि ती म्हणजे फ्रेंच राज्यक्रांती. 'स्वातंत्र्य समता आणि बंधुता' ही महान मूल्य तिने गाला दिली व परिवर्तनाच्या पहाटेचा उदय झाला. हा मानवी स्वातंत्र्याचा जाहिरनामा होता. 'माणूस हा जन्मापासूनच स्वतंत्र असतो' त्याला बळाच्या जोरावर कोणीही आपला गुलाम म्हणून ठेऊ शकत नाही. या विचाराने प्रेरित होऊन पारतंत्र्यात खितपत पडलेल्या विविध देशांतील स्वतंत्र चळवळींनी जोर धरला. आतापर्यंत गुलामगिरीच्या बेड्यात बंदिस्त असलेल्या दुर्बल घटकांची अस्मिता जागी झाली. याला

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

स्त्रियाही अपवाद नव्हत्या आणि याच काळात स्त्रियांच्या चळवळींचा उदय झाला. यातूनच 'स्त्रीवाद' नावाची विचारसरणी आकाराला येऊ लागली. तिच्या विकासाचा इतिहास आहे. 'स्त्रीवाद' या विचारसरणीचा उदय हा स्त्रियांच्या चळवळीतून झाला. त्यातूनच 'स्त्रीवाद' या संकल्पनेचा उदय झालेला आहे.

**स्त्रीवाद म्हणजे काय** :

`रूढ व्याख्येनुसार सर्वसामान्यतः- " स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांच्या हक्कासंबंधी भूमिका तर स्त्रीमुक्तीचा अर्थ स्त्रियांना संपूर्ण स्वातंत्र्य. स्त्री चळवळीच्या इतिहासकार गेल येटस यांनी दाखविल्याप्रमाणे 'स्त्री - मुक्ती' ही संज्ञा सरसकटपणे 'नवा स्त्रीवाद' या संज्ञेसाठी वापरली जाते. खरे तर 'स्त्री-मुक्ती' ही संज्ञा अधिक मूलभूत आणि आक्रमक राजकीय विचारसरणी अंगिकारणाऱ्या स्त्रियांच्या संदर्भात जाणिवपूर्वक निर्माण केली गेली. टॉम बॉटमूर आणि इतरांनी संपादित केलेल्या 'ए डिक्शनरी ऑफ मार्क्सिस्ट थॉट' मध्ये स्त्रीवादाचा अर्थ आणि महत्त्व पुढीलप्रमाणे सांगितले आहे. "स्त्रीवाद हा वादग्रस्त विषय आहे. क्रांतिकारी मार्क्सवाद आणि उदारमतवाद यामुळे स्त्रीवाद हा स्त्री-पुरूष समानतेचा विषय आहे असा युक्तिवाद एका बाजूने करता येतो तर दुसऱ्या बाजूने, स्त्रियांचे शोषण आणि पिळवणूक यांचा नाश केल्याशिवाय मानवी मुक्ती शक्य नाही. परंतु हे सर्व फक्त समाजवादी क्रांतीमधूनच प्रस्थापित होऊ शकेल असा विचार मांडला जातो."'स्त्री' वर लादलेले स्त्रीत्व हे नैसर्गिक लिंगभेदामुळे कार्य-विभाजन किंवा श्रम विभाजन घडते, असे वर वर पाहता दिसते. परंतु नैसर्गिकतेची संकल्पनाच संस्कृतिजन्य असते, असे स्त्रीवादाचे एक महत्त्वाचे प्रमेय आहे. "स्त्री म्हणून आपण जन्म घेत नसतो, तर आपण स्त्री बनत असतो.

**स्त्रीवाद आणि स्त्रीवादी चळवळी :**

स्त्रीवादी' या संकल्पनेचा उदय व विकास स्त्रियांच्या क्रियाशील चळवळींमधून झालेला दिसतो. पुरूषांनी स्त्रियांकडे अभाववादी दृष्टिकोणातून पाहिले, तिचे माणूसपण नाकारले, निसर्गाने दिलेली समता नाकारली. स्त्रीवाद पुरूषी काव्याला विरोध करतो. स्त्रीवाद ही संकल्पना थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल. "अभावमूलक विचारसरणीला नकार देणे, स्त्री ही अपूर्ण मानव असल्याची समजूत नष्ट करणे आणि स्त्रीविषयक नवीन मानदंड निर्माण करण्यासाठी व्यहरचना करणे ही स्त्रीवादाची थोडक्यात भूमिका आहे." स्त्रीवादी केवळ बौद्धिक चर्चा करत नाही. समाजातील विविध घडामोडीतून त्याचा विकास होत आला आहे. स्त्रीवादी सिद्धांताच्या पाठीमागे अनुभवांची शिदोरी आहे. ही विचारसरणी पुस्तकी नसून त्यात सिद्धांताचा खरेखोटेपणा सत्याच्या पातळीवर पारखून घेतला आहे. स्त्रीवादी विचारसरणीचा उदय आणि विकास पाश्चिमात्य देशात झाला. स्त्रीवादाविषयी अनेक गैरसमज असलेले दिसतात. या चळवळीसंबंधी फार उथळपणे मते मांडली जातात.'स्त्रियांवर होत असलेल्या अन्याय अत्याचारांच्या विरोधात आवाज उठविणे, तिचे 'माणूसपण' तितला सन्मानाने बहाल करणे, समाजाने निर्माण केलेल्या एकांगी भूमिकेतून तिची सुटका करून समतावादी आणि अधिक स्वतंत्रता प्रदान करणे हे स्त्रीवादाचे उद्दिष्ट आहे.

**भारतीय स्त्रीवाद :**

भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रीला कित्येक शतकांपासून दुय्यम दर्जाचे स्थान दिलेले आहे. प्राचीन धर्मग्रंथ आणि पुरूषसत्ताक कुटुंबव्यवस्था यांच्या संगनमतातून निर्माण झालेले ग्रंथ आणि परंपरा यांना ही स्त्री एवढी बंदिस्त झाली आहे की, तिच्या 'सत्वा'चा विचार तिला कधीच शिवला नाही. 'चूल आणि मूल' एवढेच आपले कार्यक्षेत्र. आपला 'नवरा' म्हणजेच परमेश्वर त्याची सेवा हाच आपला पत्नीधर्म, मग तो कितीतीही वाईट चालीचा किंवा त्रास देणारा असो. यातूनच भारतीय संस्कृतीत 'वटसावित्री' सारख्या व्रतांना महत्त्व आले असावे व त्यातूनच पुरूषी कावा यशस्वी झाला असावा. " एकीकडे स्त्रीला दुर्गा, कालिका, जगदंबा असे शक्तिवान देवतांचे स्थान असले तरी ते दिशाभूल करणारे आहे.

**फ्रेंच स्त्रीवाद : -**

हा अमेरिकन व ब्रिटिश स्त्रीवादाहून निराळा आहे. त्यात भाषिक चिन्ह व्यवस्थेतून अर्थ कसा निष्पन्न होतो यावर भर दिला जातो. पुरूषप्रधान समाजरचनेतील भाषा व्यवहारावरही पुरूषत्वच केंद्रस्थानी असते. पुरूषाचा शब्दम्हणजे कायदा अशी लिंगप्रधान भाषिक सत्ता येथे नांदत असते. त्यामुळे ज्ञान क्षेत्रावर पुरूषसत्ता प्रभाव गाजवीत असते. भाषेवरील ह्या पुरूषकेंद्री आवरणामुळे स्त्रीला प्रकट होण्यास अडसर निर्माण होतो. त्यामुळे स्त्रियांनी दडपणुकीपासून मुक्त असलेली स्त्री विशिष्ट भाषा शोधणे तिला अभिव्यक्त होता येईल असे संभाषित निर्माण करणे यावर फ्रेंच स्त्रीवादाचा भर आहे. हेलन सिझू यांनी गेय भाषा रचून नवी स्त्री- केंद्री भाषिक रचना निर्माण करण्याचा पर्याय सुचविला, तर ॲन रोझलिंड जोन्स हिने स्त्रीचे शरीर हा तिच्या लेखनाचाच मूळ स्त्रोत मानून 'शरीरातून लिहिणे' या संकल्पनेवर भर दिला आहे. स्त्री-साहित्याची भाषा कशी असावी या संदर्भात मोनिका विटिंग म्हणतात, "जी भाषा तुम्ही

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

बोलता ती तुमच्या घशाला, जिभेला, टाळूला, ओठांना विष लावते,ती तुम्हाला नष्ट करण्याऱ्या शब्दांची बनली आहे. ती अशा खुणा चिन्हांची बनविली आहे की त्यांच्या उच्चार केला असता पुरूषांना अभिप्रेत असलेल्या संकेतांनाच व्यक्त केली जाते.

**साहित्यातील स्त्रीवादी प्रवाह :-**

'स्त्रीमुक्तीला अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी स्त्रीवादी जाणिवेतून लिहिलेले साहित्य स्त्रीवादी साहित्य होय. हे साहित्य स्त्री म्हणून आपल्या वाट्याला आलेल्या सर्व विषमता निर्मितीच्या केंद्रस्थानी मानते, केवळ स्त्रियांनी लिहिलेली पुस्तके म्हणजे स्त्रीवादी साहित्य ठरत नाही. किंवा स्त्रियांचा नैसर्गिक असा 'खास' अनुभव म्हणजे स्त्रीवादी साहित्य नव्हे. आज स्त्रीवादी चळवळ या 'खास' अनुभवाशी मर्यादित नाही. तर पुढे मानवमुक्तीच्या व्यापक लढ्याचा भाग बनली आहे. स्त्री-पुरुषांची नैसर्गिक म्हणून वैशिष्ट्ये आहेतच. या वास्तवाभोवती समाजाने काही कृत्रिम वैशिष्ट्ये निर्माण केली आहेत. (उदा. पुरुष - पराक्रमी, स्त्री-दुबळी) स्त्रीवादी साहित्य हे कृत्रिक भेदाभेद नाकारते. समाजव्यवस्थेने स्त्री-पुरुष यांच्या शारीरिक भिन्नतेला चिकटविलेल्या 'अर्थ' मूल्यांनी स्त्रियांची दडपणूक होते. हा या विचाराचा युक्तिवाद आहे." स्त्रियांचा, त्यांच्या प्रश्नांचा मानवतावादी दृष्टिकोणातून शोध घेण्याचा प्रयत्न स्त्रीवादी साहित्यामुळे सुरूझाला आहे. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीला कुटुंबात व समाजात संधी मिळत गेल्या तरच समाजजीवन अधिक प्रगतशील होईल आणि म्हणून स्त्रीवादी विचारांची आवश्यकता आहे. स्त्रीवादी वाङ्मय स्त्रीचा व्यक्ती म्हणून विचार करते आणि समाजनेही स्त्रीकडे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून तिच्या जीवन व्यवहाराकडे पहावयाला हवे, अशी अपेक्षा करते. 'स्त्रीवादी साहित्य' ही संकल्पना गेल्या तीन-साडेतीन दशकातील आहे. मराठीत तर गेल्या दशकातच 'स्त्रीवादी साहित्या' संबंधी लिहिले- बोलले जाऊ लागले आहे. 'स्त्रीवादी साहित्य' लिहिणाऱ्या लेखिकांचा एकसंघ गट जरी नसला तरी या काळातील स्त्रियांच्या लेखनातून स्त्रीवादी जाणिवा प्रकर्षाने आढळतात . मराठीत स्त्रीवादी साहित्याचा, स्वतंत्र साहित्यप्रवाह मानला जातो. विशेष म्हणजे 'स्त्रीवाद' ही संकल्पना आकाराला येण्याच्या पूर्वीच्या लेखनाचा विचारही 'स्त्रीवादी साहित्य' म्हणून केला जातो.मराठीत स्त्रीवादी साहित्य, ग्रामीण साहित्य, दलित साहित्य हे प्रवाह एकाच काळातील. साठोत्तरी साहित्यप्रवाह या तीनही साहित्यप्रवाहांच्या बाबत म्हणजे 'स्त्रीवाद' ही संकल्पना आकाराला येण्याच्या पूर्वीच्या लेखनाचा विचारही 'स्त्रीवादी साहित्य' म्हणून केला जातो." स्त्रियांनी लिहिलेले साहित्य स्त्रीवादी असेलच असे नाही. 'पुरूषांनी लिहिलेले साहित्य ही स्त्रीवादी असू शकते ?' 'ज्या साहित्यात स्त्रियांचे चित्रण आलेले आहे ते साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय.' ही व्याख्याही चुकीची आहे. "ज्या साहित्यातून स्त्रीवादाच्या विचारसरणीप्रमाणे जीवन जगण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्त्रीमनाचा, कृतीचा जीवनाचा आणि असे करताना निर्माण झालेल्या संघर्षा घडतो त्या साहित्याला स्त्रीवादी साहित्य असे म्हणता येईल. विचारसरणीत विचार सांगण्यात येणाऱ्या सिद्धांताची वाङ्मयीन मांडणी असलेले साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. हे साहित्य पारंपरिक साहित्य पद्धतीला नाकारते. त्यात स्त्रियांच्या स्वतःचे शारीरिक अनुभव आणि स्वत:ची भाषा यांना महत्त्वाचे स्थान आहे. स्त्रियांचे लेखन आणि स्त्रीवादी लेखन यातही फरक आहे. ती फक्त स्त्री आहे आणि तिने लिहिलेले साहित्य म्हणून ते स्त्रीवादी साहित्य असू शकत नाही. कावर्ड म्हणतात, 'पितृसत्ताक समाज व्यवस्थेने दडपून टाकलेल्या, कोंडमारा केलेल्या स्त्रीमनाचा, स्त्री जीवनाचा त्या समाजव्यवस्थेविरूद्ध दिलेल्या संघर्षाचा अविष्कार घडविणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. 'स्त्री' ही माणूस आहे असे मानणारे तिचे नाकारलेले माणूसपण तिला बहाल करणारे, स्त्री आणि पुरूष यांच्यात समता प्रस्थापित करणारे, स्त्रीची 'बाई' या पारंपरिक जोखडातून मुक्तता करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. स्त्रीवादी साहित्य स्त्रीला ही केंद्रस्थानी मानले आणि त्याचा आविष्कार करते.एखाद्या साहित्यकृतीला स्त्रीवादी ठरवत असताना त्या साहित्यकृतीतील स्त्री प्रतिमा कशी आविष्कृत झाली आहे याचा विचार करावा लागतो. त्या साहित्यकृतीतून व्यक्त होणारी स्त्री प्रतिमा पारंपरिक विचार स्वीकारून व्यक्तहोणारी असल्यास ती साहित्यकृती 'स्त्रीवादी' नसली तरी स्त्रीवादी दृष्टिकोणातून तिचा अभ्यास करून तिची पारंपरिक प्रतिमा बनण्याच्या कारणांचा शोध घेतो. साहित्यप्रकृतीतून आविष्कृत होणारी स्त्री प्रतिमा कशी व्यक्त होते यावरून ते साहित्य स्त्रीवादी आहे किंवा नाही ही गोष्ट स्पष्ट होते. यावरून ते साहित्य स्त्रीवादी आहे किंवा नाही ही गोष्ट स्पष्ट होते. लेखनातून स्त्रीवादी जाणिवा प्रकर्षाने आढळतात. म्हणूनच त्यांच्या साहित्याला 'स्त्रीवादी साहित्य' म्हटले जाऊ लागले.

**<u>स्त्रीवादी प्रवाह :</u>**

_स्त्रीवाद, स्त्रीमुक्ती वगैरे शब्द आज बरेच परिचित झाले आहेत. जगात सगळीकडेच या स्त्रीवादी प्रवाहाने लक्ष वेधून घेतलेले असून, चर्चा परिसंवादातही स्थान मिळवलेले आहे. याची सुरुवात जरी पाश्चात्य देशात झाली असली तरी भारतातही हळूहळू त्याची पाळेमुळे रुजू लागलेली दिसतात. त्यामुळे याचे पाश्चात्य स्त्रीवाद व भारतीय स्त्रीवाद या दोन भागात विभाजन केले जाते.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**पाश्चात्य स्त्रीवाद :**

१९६० च्या दशकात स्पष्ट रुप धारण केलेल्या जीवनाच्या सर्व क्षेत्रांची चिकित्सक मिमांसा करणारी स्त्रीवादी प्रणालीची मुळे सतराव्या शतकात सापडतात. लंडन, फ्रान्स, अमेरिका या देशांमध्ये स्त्रियांच्या हक्कासाठी ज्या चळवळी उभ्या राहिल्या त्यातून पुढे हळूहळू स्त्रीवादाची संकल्पना पुढे येऊ लागली. अशाप्रकारे पाश्चात्यांपासूनच या संकल्पनेला प्रारंभ झाला. १९०१ मध्ये प्रथम स्त्रियांच्या हक्कांबद्दलची मागणी करण्यात आली आणि १९४५ मध्ये फ्रेंच स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला. जॉन स्टुअर्ट मिल यांनीही सन १८६९ मध्ये 'दि सब्जेक्शन ऑफ वुमन' हे पुस्तक प्रसिद्ध करुन विवाहसंस्था आणि कुटुंबसंस्था स्त्रीच्या व्यक्तिविकासाला आणि स्वातंत्र्याला बाधक कशा होतात ते स्पष्ट केले. १९ व्या शतकात अमेरिकेमध्ये गुलामगिरीविरुद्ध पुकारलेल्या लढ्यात स्त्रिया मोठ्या प्रमाणावर सहभागी झाल्या. सन १८४८ साली एलिझाबेथ कँडी स्टॅटन आणि लुक्रेशिया मॉट यांनी 'अमेरिका सेनेका फॉल्स कन्हेंशन' ही परिषद भरवून त्यात स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा व हक्कांचा जाहिरनामा घोषित केला. १८९० मध्ये 'नॅशनल अमेरिकन वुमेन्स सफ्रेज असोसिएशन' या संस्थेच्या प्रयत्नातून १९२० साली अमेरिकन यांना मताधिकार मिळाला. १९४९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'द सेकंड सेक्स' या पुस्तकामध्ये 'सिमॉन दि बोव्हा' यांनी स्त्री ही जन्मत: स्त्री नसते तर संपूर्ण पुस्तकामध्ये "सिमॉन दि बोव्हा" यांनी स्त्री ही जन्मत: स्त्री नसते तर संपूर्ण माजव्यवस्था तिला स्त्री म्हणून घडवते' अशी भूमिका मांडली. तर १९७७मध्ये प्रसिद्ध झालेले 'सेक्शुअल पॉलिटिक्स' या पुस्तकांद्वारे केट मिलेट यांनी पितृसत्ताक समाजव्यवस्थेवर हल्ला चढविला. अशा या लेखिकांनी आपापल्या ग्रंथातून स्त्रीवादी विचारधारेची पायाभूत मांडणी केली. त्यामुळे 'स्त्रीवाद आणि स्त्रीवादी समीक्षा यांच्या

उभारणीचे आणि विकासाचे श्रेय हे सर्वस्वी पाश्चात्य स्त्रियांचे आहे' अशी भूमिका अरुणा दुभाषी मांडताना दिसतात.

**भारतीय स्त्रीवाद :**

गुलामगिरी, शोषण, समाजातील दुय्यम स्थान, हिन दर्जा इ. सर्व बाबतीत भारतीय स्त्रीचे जगातल्या स्त्रीशी जवळचे नाते आहे. अगदी प्राचिनकाळापासून भारतीय स्त्रीवर अतोनात अन्याय होत आला आहे. प्राचिन काळातील स्त्रीचे वर्णन करताना अरुणा दुभाषी म्हणतात, 'या काळात भारतीय स्त्रीचे स्थान बीज वाढवण्याचे क्षेत्र किंवा भस्त्रा (कातडी पिशवी ) एवढेच होते असे दिसते माणूस म्हणून कोणतेही स्थान वा प्रतिष्ठा तिला नव्हती.१९ व्या शतकात इंग्रजी शिक्षणामुळे नवशिक्षितांनी आपल्या संस्कृतीकडे, धर्माकडे, समाजरचनेकडे नव्या दृष्टिने पाहण्यास सुरुवात केली. त्यातच स्त्रियांच्याप्रश्नावरील चर्चेलाही चालना मिळाली आणि स्त्रियांची स्थिती सुधारण्याचे अनेक प्रयत्न केले गेले. राजा राममोहन रॉय यांनी सतीबंदीचा कायदा, संमतीवयाचा कायदा, सारडा कायदा अशा कायद्यान्वये त्यांनी स्त्रियांच्या शोषणाचे प्रश्न सोडण्यावर भर दिला. म. फुले यांनी 'ज्या धर्मग्रंथामध्ये स्त्रियांना एक नियम व पुरुषांना दुसरा नियम असा दुटप्पीपणा मांडला त्यावर हे हेकट पुरुषांनी लिहिलेले धर्मग्रंथ आहेत' असा स्त्रीवादाला साजेसा हल्ला करुन स्त्रियांच्या अवस्थेविषयी समाजनेत्रात अंजन घातलेले आहे.

मानवी व्यवहारातील शोषणाची कारणे शोधणे आणि स्त्री - अस्मितेचा पुरस्कार करणाऱ्या नव्या पर्यायांची मांडणी करणे हे सर्वसाधारणपणे स्त्रीवादाचे स्वरुप आहे. अनेक विचारप्रवाहांना सामावून घेणारी अशी ही विचारप्रणाली आहे. स्पर्धेपेक्षा सहकार्यावर भर देणाऱ्या मवाळ स्त्रीवादापासून ते पुरुष सत्तेचा पाया उखडून टाकण्याची भाषा करणाऱ्या जहाल स्त्रीशक्ती वादापर्यंत अनेक भूमिकांचा या विचारप्रणालीत समावेश होतो. 'स्त्रीवादाविषयी 'स्त्रीसत्तेचा पुरस्कार म्हणजे स्त्रीवाद', 'बिनलग्नचे स्वैराचाराला मुभा म्हणजे स्त्रीवाद', 'कंचुकी जाळा, मोहीम म्हणजे स्त्रीवाद', 'स्त्रियांनी निर्मिलेल्या वाङ्मयाची निर्मिती म्हणजे स्त्रीवाद' अशा अनेक चुकीच्या समजुती प्रचलित आहेत,असे सुक्मणी रॉय यांचे मत आहे.पण स्त्रीवादाविषयी वेगवेगळ्या समीक्षकांनी आपली वेगवेगळी भूमिका मांडलेली आहे. डॉ. अश्विनी धोंगडे स्त्रीवादाविषयी आपली भूमिका मांडताना म्हणतात,'स्त्रीवाद म्हणजे पुरुषांपासून फारकत घेऊन स्वत:चा सवतासुभा निर्माण करणे नव्हे पण संस्कृतीच्या हजारो वर्षांच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकरुन तिला जोपशुतुल्य अवस्था प्राप्त करुन दिली त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करुन घेण्यासाठी निर्माण केलेले हे व्यासपीठ आहे'.तर स्त्रीवादाविषयी आपले मत मांडताना पाश्चात्य समीक्षिका लिंडा गार्डन म्हणतात, 'स्त्रियांचे दुय्यमत्व आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे विश्लेषण म्हणजे स्त्रीवाद'. कोकाटे यांच्या मतानुसार 'व्यक्तीस्वातंत्र्य, आत्मशोध, आत्मभान, , समता हक्क, कर्तव्य व अधिकार या जाणिवांतून स्त्रियांनी आपल्याहक्कांसाठी अस्मितापूर्ण लढा दिला. जातिभेद व स्त्रियांच्या हक्कांसाठी समतामूलक स्त्री-पुरुषांनी दिलेला हा आत्मभानाचा अस्मितापूर्ण लढा म्हणजे स्त्रीवाद'थोडक्यात आपल्याला असे म्हणता येईल की, 'पितृसत्ताक अशा राजकीय सत्ताकेंद्राला विरोध करणे म्हणजे स्त्रीवाद'. प्रस्थापित विचारप्रणाली स्त्री संदर्भात विचार करताना तिच्यावर स्त्रीत्वाच्या वेगवेगळ्या संकल्पना लादून

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

तिच्याव्यक्तिमत्वाला साचेबंद करते. तिच्याविषयीच्या सर्व संकल्पनातून तिच्यातील माणूसपणा अधोरेखित न करता केवळ तिचे वस्तूमूल्य ठरविते. या प्रस्थापित लिंगभेदाधिष्ठित पुरुषकेंद्री दृष्टिकोनाविरुद्ध उभा राहणारा वाद म्हणजे स्त्रीवाद होय.

**स्त्रीवाद : स्वरुप आणि व्याप्ती :**

स्त्रीवाद ही १९६० नंतरच्या दशकात वेगाने पुढे आलेली विचारप्रणाली आहे.
पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रियांना मिळालेल्या दुय्यम स्थानाचा प्रतिवाद करणे आणि सामाजिक, राजकीय व आर्थिक सत्तास्थानात पुरुषांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त होण्यासाठी डावपेच आखणे हे स्त्रीवादाचे स्वरुप आहे. पाश्चात्य देशात जरी स्त्रीवाद प्रथम रुजला असला तरी भारतातही गेल्या तीन दशकात तो आपली पाळेमुळे रोवू लागला आहे. स्त्री वाद ही एक राजकीय विचारप्रणाली आहे. समाज जीवनातील स्त्री शोषणाचे प्रत्येक क्षेत्र शोधून ते उखडून टाकण्याच्या दृष्टितून योजकतेने होणारी ही विचारप्रणाली आहे. ती प्रस्थापित स्त्रीशोषणाच्या परंपरा उधळून लावणारे विचारव्यूह निर्माण करते, मानववंशातील सर्व स्त्रीसंदर्भात अन्यायकारक बाबींवर ती बोट ठेवते. अशाप्रकारे सर्व क्षेत्रातील पुरुषी वर्चस्वाला ती आव्हान देते व स्त्रियांना न्याय मिळवून देते. स्त्रीवादाची व्याप्ती स्पष्ट करताना डॉ. मंगला वरखेडे म्हणतात, अपत्यनिर्मिती हे स्त्रीच्या गुलामीचे कारण नसून ते स्त्रीत्वाच्या श्रेष्ठत्वाचे लक्षण आहे अशी शांततामय सहजीवनाचा पुरस्कार करणारी आत्मसमर्पणवादी मवाळ मांडणी हे स्त्रीवादाचे एक टोक आहे तर आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर सर्व प्रकारच्या पुरुषसत्ताक अवडंबरांना आव्हान द्यावे आणि शिक्षण, रोजगार, आरोग्य, राजकीय सत्ता या सर्व क्षेत्रातल्या हक्कांसाठी संघर्ष करावा, स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या दुय्यमत्वाला नकार देऊन स्त्रीशक्तीचे दर्शन घडविणारी संघर्षशील भूमिका हे स्त्रीशक्तीवादी स्त्रीवादाचे दुसरे टोक सांगता येईल.अशाप्रकारे अफाट व्याप्ती पसरलेल्या या स्त्रीवादाचे धर्मसंस्था,विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, राजकीय संस्था, शिक्षणसंस्था यांच्या संस्थापक बांधणीतला पुरुषसत्ताक मतलबीपणा उघड करणे, रुढी परंपरा, कायदा, तत्वज्ञान अशी बहुआयामी व्याप्ती आहे.

**समारोप**

**निष्कर्ष:**

मराठी साहित्यात स्त्रीवादाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. स्त्रीवादी साहित्य केवळ स्त्रियांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित न करता, तर सामाजिक बदलांनाही प्रेरणा देते. यामुळे, मराठी साहित्य स्त्रियांच्या हक्कांसाठी आणि समानतेसाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरले आहे.मराठी साहित्यातील स्त्री वाद ह्या भिन्न स्त्रीवादी जाणिवा व्यक्त करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य. पुरुषाच्या आधाराशिवाय स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाला परिपूर्णता येऊ शकते आणि प्रेमाइतकीच, माणसासारखे जगण्याची भूक स्त्रीलाही असते हे दर्शविणारे आणि स्त्री म्हणून घडताना आलेल्या विविध अनुभवांना अभिव्यक्त करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य.स्त्रीवादी इतिहासलेखन म्हणजे इतिहासाच्या अभ्यासात स्त्रियांच्या भूमिकेचा आणि त्यांच्या योगदानाचा विचार करणे. पारंपारिक इतिहासलेखनात स्त्रियांच्या योगदानाला कमी महत्त्व दिले गेले आहे

**संदर्भसूची :**

१) नाईक, शोभा, भारतीय संदर्भातून स्त्रीवाद, मुंबई, २००७.

२ ) बोव्हार, सीमॉन द; अनु. गोखले, करुणा, द सेकंड सेक्स, पुणे, २०१२ .

३) भागवत, विद्युत, स्त्रीजन्माची वाटचाल, पुणे, २ ००४.

४) मेश्राम, केशव, संपा. वाङ्मयीन प्रवृत्ती : तत्त्वशोध डॉ. दादा गोरे गौरवग्रंथ पुणे, २००७.

५ ) वरखेडे, मंगला, संपा. स्त्रीवादी समीक्षा : संकल्पना व उपयोजन, धुळे, १९९९.

६)स्त्री प्रश्नांची वाटचाल - परिवर्तनाच्या दिशेने: विद्युत भागवत ,प्रतिमा प्रकाशन, व्दितीय आवृत्ती ८ ,मार्च 2००९

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# नाशिकराव तिरपुडे यांचे पर्यावरण विशयक धोरण

कु. चंद्रकला शालीकराम गजभिये[१] प्रा.डॉ. एन.एस. गिरड[२]
[१]केंद्र - इतिहास संशोधन केंद्र
नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी
[२] संशोधन केंद्र प्रमुख- प्रा.डॉ.एम.आर.कापगते
**Email - chandrakalag02@gmail.com**

Manuscript ID:
JRD -2025-1705017
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)
Pp. 72-73
May 2025
Submitted: 05 Apr. 2025
Revised: 20 Apr. 2025
Accepted: 20 May. 2025
Published: 31 May. 2025

प्रस्तावना

नाशिकरावांच्या सामाजिक कार्याला सुरवात ही त्यांचे शिक्षण सुरू असतांनाच झाली होती. शैक्षणिक जिवनात त्यांनी अनेक सामाजिक प्रश्न वेशीवर टांगण्याचा प्रयत्न केला. पण खऱ्या अर्थाने त्यांच्या सामाजिक कार्याला धार आली ती त्यांनी राजकारणात प्रवेश केल्यानंतरच! वेगवेगळया राजकीय पदावर कार्यरत असतांना त्यांनी सामाजिक प्रश्नांचा मुळावरच आघात करून प्रश्नांचा अंत केला. प्रस्तुत लेखात त्यांनी केलेल्या सांस्कृतिक कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

नृत्य, संगीत, तमाशा इ. प्रयोग करमणूक कर माफ

भारत देश विविधतेने नटलेला देश आहे. या देशाला फार मोठा सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. त्यामुळे प्रत्येक प्रांतातील नाटय, संगीत, नृत्य इ. वेगवेगळया प्रकारचे दिसुन येतात. महाराष्ट्रात न्याटय, संगीताबरोबरच तमाशा, दंडारी सारख्या लोककला आढळून येतात. परंतु याकडे लोकांचा पाहण्याचा दृष्टीकोन फारच कलुषित होता. त्यामुळे नृत्य, संगीत, तमाशा, नाटक, दंडारी यांचा पाहिजे तसा विकास झाला नव्हता. तो विकास करणे गरजेचे होते.[१]

पूर्वी नृत्य, संगीत, तमाशा इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रम दुसऱ्या विभागात येत होते. आता समाजकल्याण विभागात त्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे नााशिकराव तिरपूडे समाजकल्याणमंत्री असतांना या सांस्कृतिक क्षेत्राच्या विकासाचा त्यांनी विशेष प्रयत्न केला. नाशिकरावांना गाणे गुणगुणाची आवड होती. त्यांना क्रिकेट खेळातही आवड होती. परंतु या क्षेत्राचा म्हणावा तसा विकास न झाल्याने क्षेत्राच्या विकासाची जबाबदारी त्यांनी स्वत: स्विकारली परंतु असे प्रयत्न यापूर्वी कुणीच केले नाहीत हे विशेष.[२]

महाराष्ट्रातील एक लोककला तमाशा पण तमाशाकडे पाहण्याचा अर्थ लोक चुकीच्या अर्थाने लावतात. तो अर्थ बदलविण्यांचा शासनाचा प्रयत्न आहे. तमाशाचा स्तर उंच करण्याचा सुध्दा शासनाचा प्रयत्न चालू आहे. याकरीता शासनाकडून एक योजना बनविण्यात आली आहे. त्यानुसार तमाशाच्या शासकीय स्तरावर स्पर्धा आयोजीत करण्यात आल्या. आणि या लोककलेला मानाचे स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न नाशिकरावांनी केला.[३]

तमाशा

तमाशा या कलाप्रकाराला महाराष्ट्राच्या लोकजीवनात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. ग्रामीण भागातील प्रेक्षक तर या कलेकडे जास्तच आकर्षिला जात होता. तमाशात काम करणारे कलावंत? प्रामुख्याने महार, मांग, वंजारी, ढोर, चांभार, कोल्हाटी, डवरी, गोधंळी इत्यादी उपेक्षित वर्गातलेच असतात. या समाजातील कलावंत तमाशा करून मानाने उत्पन्न मिळवण्याचा प्रयत्न करतात.[४]

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*
Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817523

Address for correspondence:
*कु.चंद्रकला शालीकराम गजभिये केंद्र - इतिहास संशोधन केंद्र नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी*

How to cite this article:
*गजभिय चंद्रकला शालीकराम, गिरडर एन.एस. (2025). नाशिकराव तिरपुडे यांचे पर्यावरण विशयक धोरण. Journal of Research & Development, 17(5(II)), 72–73.*
*https://doi.org/10.5281/zenodo.15817523*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

आधुनिक काळात दुरचित्रवाणीच्या प्रभावामुळे तमाशा टिकणार का असा प्रश्न अनेकांना पडतो. परंतु तमाशाची आवड खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील प्रेक्षकाला आहे. त्यामुळे दुरचित्रवाणीवरील विनोद, नाटय या ग्रामीण भागातील प्रेक्षकांना आकर्षित करू शकत नाही. त्यांना टिव्हीच्या कार्यक्रमापेक्षा गावात होणारा तमाशा जास्त जिवंत वाटतो.[५]

दंडारी

हा सुध्दा महाराष्ट्रातील लोककलेचा एक प्रकार असून यात प्राचीन काळातील एखादया कलेचा आश्रय घेऊन ते गाणे आणि अभिनयाच्या रूपाने लोकासमोर सादर करण्याची कला म्हणजे 'दंडार' होय. या लोककला प्रकारात काम करणारे कलावंत पूर्वी पुरूषच राहायचे आणि तेच स्त्री पात्राची भुमिका पार पाडायचे. हा लोककला प्रकार ग्रामीण क्षेत्राशी सबंधी असुन आजच्या काळात याला सुध्दा उतरती कळा लागली आहे. साहित्य, कला, संस्कृती यांच्या विकासासाठी सुध्दा बाळासाहेबांनी प्रयत्न केले. साहित्यकाराच्या साहित्य निर्मितीला बक्षीस देण्याची प्रथा प्रथम त्यांनीच अमलात आणली. पुढे तिला साहित्य संस्कृती मंडळाच्या रूपाने आकार देण्याचे काम यशंवतराव चव्हाण यांनी केले. श्री लक्ष्मणशास्त्री जोशी यांना पहिले अध्यक्ष होण्याचा मान मिळाला. खुले रंगमंदिर उभारण्यासाठी त्यांनी अनुदाने दिली. नागपूरातील धनवटे रंग मंदीराला सुध्दा त्यांनीच आर्थिक मदत दिली होती.[६]

बाळासाहेबांना कलेसोबतच साहित्याची जाण होती. साहित्याचे ते विशेष जाणकार होते. म्हणूनच विदर्भ साहित्य संघाच्या निर्मितीत त्यांचे मोलाचे योगदान आहे.

"विदर्भ साहित्य संघाच्या भंडारा जिल्हा शाखेचे ते अध्यक्ष होते. कै. ना.रा.शेंन्डे हे गणेशपूरचे आणि बाळासाहेबही गणेशपूरचेच त्यांच्या संपर्कात बाळासाहेब आले. त्यांच्यामुळेच त्यांना साहित्याची जाण आली. त्यांच्याच आग्रहामुळे भंडारा जिल्हा शाखेची निर्मिती होऊन ते त्या शाखेचे अध्यक्ष झाले. त्यामुळे मान्यवर साहित्यकांशी त्यांचा परिचय झाला व तो वाढत गेला. बाळासाहेब समाजकल्याणमंत्री असतांना विदर्भ साहित्य संघास सदिच्छा शासनाकडून भेट दिली.''[७]

खऱ्या अर्थाने बाळासाहेबांनी महाराष्ट्रातील सांस्कृतिक उत्थानाला एकप्रकारे हातभारच लावला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

तळटिपा

१) मुंबई विधानसभा कार्यवाही खंड ५, भाग २, दि. २४ एप्रिल १९५८, पृष्ठ ८९
२) नृत्य, संगीत तमाशा (१९५८) २४ एप्रिल मुंबई
३) तमाशा काळ रांगडी गंमत लेख - संदेश ज्ञानेश्वर भंडारी प्रथम आवृत्ती १४ मार्च २००६, प्रकाशक- प्रकाश विश्वासुराय लोकवाड्मय गृढ भुपेश गुप्ताभवन ८५, सयतीरोड प्रभादेवी पृष्ठ-१८
४) गेडाम, डॉ. तु. वि. 'स्वाभिमान' चरित्र ग्रंथ पृष्ठ-०८, प्रथम आवृत्ती १८ जून २०११, युगांतर शिक्षण संस्था नागपूर
५) कित्ता पृ.८
६) गेडाम, डॉ. तु. वि. 'एक निष्काम कर्मयोगी' ग्रंथ पृष्ठ-०३, प्रकाशन- नारायण ऑफसेट वर्क्स, धंतोली नागपूर- २०१०
७) तमाशा काळ रांगडी गंमत लेख पृ. १८

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# भारताची राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 मध्ये शिक्षणाच्या मूल्यांचे मूल्य महमांसा

**योगेश खंडेराव पाटील**
अध्यापक महाविद्यालय अरण्येश्वर पुणे ०९
**Email:** yogaru17@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-1705018
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 5(II)|
Pp. 74-79
May 2025

**Submitted:** 02 Apr. 2025
**Revised:** 08 Apr. 2025
**Accepted:** 23 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश:**

भारत की राष्ट्रीय शिक्षा नीति (NEP) 2020 एक परिवर्तनकारी दस्तावेज़ है जिसका उद्देश्य भारतीय शिक्षा प्रणाली को पुनः रूपांतरित करना है, जिसमें समग्र विकास, समावेशिता और मूल्य-आधारित शिक्षा पर जोर दिया गया है। यह नीति शिक्षा में नैतिक, मानवीय और नागरिक मूल्यों के समावेश को महत्वपूर्ण मानती है, जिससे जिम्मेदार और सहानुभूति से परिपूर्ण नागरिकों का निर्माण हो सके। नीति में सत्य, दया और अहिंसा जैसे उच्च नैतिक गुणों के विकास पर बल दिया गया है, जिससे शिक्षा केवल शैक्षिक सफलता तक सीमित न रहे, बल्कि अच्छे चरित्र और सामाजिक जिम्मेदारी की भावना भी विकसित हो। NEP 2020 में विविधता और समावेशन पर भी विशेष ध्यान दिया गया है, यह सुनिश्चित करते हुए कि सभी विद्यार्थियों को समान शैक्षिक अवसर मिलें, चाहे उनका सामाजिक, आर्थिक, या धार्मिक पृष्ठभूमि कुछ भी हो। नीति भारतीय सांस्कृतिक विविधता का सम्मान करती है और क्षेत्रीय भाषाओं के संरक्षण को बढ़ावा देती है, जिससे सांस्कृतिक संवेदनशीलता और सम्मान बढ़े। इसके साथ ही, यह विद्यार्थियों के मानसिक, शारीरिक और भावनात्मक स्वास्थ्य के महत्व को भी रेखांकित करती है। इस प्रकार, NEP 2020 शिक्षा को केवल बौद्धिक ज्ञान से कहीं आगे बढ़कर समग्र विकास के एक साधन के रूप में प्रस्तुत करती है, जो भविष्य में भारतीय शिक्षा की दिशा को प्रभावित करेगा।

**मुख्य शब्द:** राष्ट्रीय शिक्षा नीति 2020, नैतिक मूल्य, समावेशिता, सांस्कृतिक विविधता, समग्र विकास।

सदी की आवश्यकताओं के अनुरूप पुनः परिभाषित करना है। यह नीति केवल अकादमिक उत्कृष्टता तक सीमित नहीं है, बल्कि शिक्षा को समग्र विकास और जीवन मूल्यों से जोड़ने पर बल देती है (राष्ट्रीय शिक्षा नीति, 2020)। NEP 2020 यह स्पष्ट करती है कि शिक्षा का उद्देश्य केवल ज्ञान प्रदान करना नहीं, बल्कि ऐसे नागरिक तैयार करना है जो नैतिक, सहानुभूतिपूर्ण और जिम्मेदार हों। "मूल्य मिमांसा" का अर्थ है किसी मूल्य या सिद्धांत का विश्लेषण और उसकी प्रासंगिकता को समझना। NEP 2020 के संदर्भ में, यह शिक्षा के माध्यम से विद्यार्थियों में सत्य, अहिंसा, करुणा, समर्पण और सेवा जैसे जीवन मूल्यों के विकास को दर्शाता है (NEP, 2020)। नीति में नैतिक शिक्षा को पाठ्यक्रम का अनिवार्य हिस्सा बनाया जाना आवश्यक माना गया है, जिससे छात्र न केवल ज्ञान में बल्कि चरित्र निर्माण में भी प्रगति करें।

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

DOI:10.5281/zenodo.15817558
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*योगेश खंडेराव पाटील अध्यापक महाविद्यालय अरण्येश्वर पुणे ०९*

**How to cite this article:**
*पाटील, . योगेश . खंडेराव . (2025). भारताची राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 मध्ये शिक्षणाच्या मूल्यांचे मूल्य महमांसा. Journal of Research & Development, 17(5(II)), 74–79. https://doi.org/10.5281/zenodo.15817558*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

साथ ही, यह नीति समावेशी शिक्षा को बढ़ावा देती है, जो सामाजिक, आर्थिक और सांस्कृतिक रूप से सभी वर्गों के विद्यार्थियों को समान अवसर उपलब्ध कराती है (भारत सरकार, 2020)। यह दृष्टिकोण सामाजिक न्याय के साथ-साथ विविधता

**प्रस्तावना**

भारत की राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) एक क्रांतिकारी पहल है, जिसका उद्देश्य भारतीय शिक्षा प्रणाली को 21वीं के सम्मान और स्वीकार्यता की संस्कृति को भी बढ़ावा देता है। इस प्रकार, NEP 2020 शिक्षा को केवल पेशेवर कौशल तक सीमित न रखकर, इसे नैतिक और संवेदनशील समाज के निर्माण का आधार मानती है, जो एक सशक्त भारत की नींव रखता है।

**राष्ट्रीय शिक्षा नीति 2020: मुख्य उद्देश्य**

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) का मुख्य उद्देश्य भारतीय शिक्षा प्रणाली को आधुनिक आवश्यकताओं के अनुरूप और वैश्विक मानकों के हिसाब से पुनः रूपांतरित करना है। यह नीति शिक्षा को केवल ज्ञान प्राप्ति तक सीमित न रखकर, इसे एक समग्र और समावेशी प्रक्रिया के रूप में प्रस्तुत करती है, जिसका लक्ष्य विद्यार्थियों का बौद्धिक, नैतिक, सामाजिक और भावनात्मक विकास सुनिश्चित करना है (भारत सरकार, 2020)। NEP 2020 में समावेशी शिक्षा को विशेष महत्व दिया गया है, ताकि सामाजिक, आर्थिक या शारीरिक रूप से वंचित सभी वर्गों को गुणवत्तापूर्ण शिक्षा समान रूप से मिले। इसके तहत विशेष आवश्यकता वाले छात्रों, ट्रांसजेंडर विद्यार्थियों और दूरदराज़ के क्षेत्रों के लिए आवश्यक संसाधन और सुविधाएँ उपलब्ध कराई गई हैं (NEP, 2020)। नीति में तकनीकी और डिजिटल शिक्षा के विस्तार पर भी जोर दिया गया है, जिससे डिजिटल विभाजन कम हो और शिक्षा अधिक सुलभ व प्रभावी बने। 'राष्ट्रीय शैक्षिक तकनीकी मंच' (NETF) जैसी पहलों के माध्यम से शिक्षक और छात्र दोनों को डिजिटल उपकरणों का कुशल उपयोग सिखाया जाएगा (Ministry of Education, 2020)। साथ ही, पारंपरिक भारतीय ज्ञान जैसे योग, आयुर्वेद और दर्शन को आधुनिक शिक्षण पद्धतियों के साथ जोड़कर शिक्षा प्रणाली को सांस्कृतिक और ज्ञानात्मक रूप से सशक्त बनाने पर भी जोर दिया गया है। विद्यार्थियों के मानसिक, भावनात्मक और शारीरिक स्वास्थ्य का संरक्षण भी नीति का अहम हिस्सा है, जिसके तहत जीवन कौशल, परामर्श सेवाएं और खेल-कूद को पाठ्यक्रम में अनिवार्य किया गया है ताकि उनका समग्र विकास हो सके (NEP, 2020)।

**2. शिक्षा के मूल्यों का महत्व**

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) में शिक्षा के उद्देश्य को केवल शैक्षणिक ज्ञान तक सीमित न रखते हुए, उसे जीवन मूल्यों, नैतिकता और सामाजिक उत्तरदायित्व से जोड़ने पर विशेष जोर दिया गया है। यह नीति मानती है कि शिक्षा केवल किताबी ज्ञान नहीं, बल्कि जीवन जीने की कला भी है, जिससे विद्यार्थी अपने व्यक्तिगत और सामाजिक जीवन में सही निर्णय लेने में सक्षम बनें (भारत सरकार, 2020)। नीति में स्पष्ट रूप से उल्लेख है कि शिक्षा का एक महत्वपूर्ण उद्देश्य विद्यार्थियों में सत्य, करुणा, अहिंसा, सहिष्णुता, दया और सहयोग जैसे मानवीय मूल्यों का विकास करना है (NEP, 2020)। ये मूल्य ऐसे नागरिक का निर्माण करते हैं जो केवल अपने हित की नहीं सोचते, बल्कि समाज और राष्ट्र के प्रति जिम्मेदार होते हैं।

शिक्षा के नैतिक आयामों को विद्यालयी स्तर पर पाठ्यक्रम में शामिल किया गया है। कला, साहित्य, योग और सामाजिक गतिविधियों को शिक्षा का अभिन्न हिस्सा बनाया गया है, जिससे छात्रों में भावनात्मक संतुलन और सामाजिक समझ विकसित हो (Ministry of Education, 2020)। NEP 2020 के अनुसार, मूल्य आधारित शिक्षा विद्यार्थियों को सही और गलत के बीच अंतर करने तथा नैतिक निर्णय लेने की क्षमता प्रदान करती है। इससे वे आत्म-नियंत्रण, सह-अस्तित्व और मानवीय सहानुभूति जैसे गुण विकसित करते हैं, जो उन्हें बेहतर नागरिक बनाते हैं (भारत सरकार, 2020)।

**2.1 नैतिक और मानवीय मूल्य**

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) में नैतिक और मानवीय मूल्यों को शिक्षा का केंद्रीय तत्व माना गया है। यह नीति इस बात पर बल देती है कि शिक्षा केवल बौद्धिक विकास का माध्यम नहीं होनी चाहिए, बल्कि इसका उद्देश्य विद्यार्थियों में ऐसे गुणों का विकास करना होना चाहिए जो उन्हें एक संवेदनशील, सहानुभूतिपूर्ण और नैतिक नागरिक बना सकें (भारत सरकार, 2020)। नीति में दया, करुणा, सहानुभूति और समानता जैसे मानवीय मूल्यों को विद्यालयी जीवन से ही विद्यार्थियों में विकसित करने की बात कही गई है। यह मूल्यों पर आधारित शिक्षा प्रणाली छात्रों को आत्म-जागरूक बनाती है, जिससे वे दूसरों के दृष्टिकोण को समझने, स्वीकार करने और सहयोग करने में सक्षम हो पाते हैं (NEP, 2020)। साथ ही, नीति में सत्य, अहिंसा, और निष्कलंकता जैसे उच्च नैतिक मूल्यों के

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

समावेशन पर भी विशेष बल दिया गया है। इन मूल्यों को पाठ्यक्रम में नैतिक शिक्षा, योग, ध्यान और जीवन कौशल के रूप में शामिल किया गया है, ताकि विद्यार्थी न केवल अच्छे विद्यार्थी बनें, बल्कि अच्छे इंसान भी बन सकें (Ministry of Education, 2020)।

**2.2 समाज के प्रति जिम्मेदारी**

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) का एक प्रमुख उद्देश्य विद्यार्थियों में समाज के प्रति उत्तरदायित्व की भावना विकसित करना है। यह नीति इस बात पर ज़ोर देती है कि शिक्षा केवल व्यक्तिगत उन्नति का साधन नहीं होनी चाहिए, बल्कि उसका उपयोग सामाजिक कल्याण और राष्ट्रीय निर्माण के लिए भी किया जाना चाहिए (भारत सरकार, 2020)। नीति में विद्यार्थियों को जिम्मेदार नागरिक के रूप में तैयार करने के लिए सामाजिक कार्यों, सामुदायिक सेवा, और नागरिक कर्तव्यों को शिक्षा प्रणाली में एकीकृत किया गया है। छात्रों को सेवा कार्यों, जैसे स्वच्छता अभियान, रक्तदान शिविर, पर्यावरण संरक्षण और सामुदायिक भागीदारी में भाग लेने के लिए प्रेरित किया जाता है (NEP, 2020)।

इसके अतिरिक्त, पर्यावरणीय चेतना को भी पाठ्यक्रम में शामिल किया गया है ताकि विद्यार्थी प्राकृतिक संसाधनों के संरक्षण, सतत विकास और जलवायु परिवर्तन जैसे मुद्दों के प्रति जागरूक हो सकें। यह नीति विद्यार्थियों को यह सिखाती है कि वे समाज में सकारात्मक बदलाव लाने वाले सक्रिय भागीदार बनें (Ministry of Education, 2020)। इस प्रकार, NEP 2020 विद्यार्थियों को न केवल अपने अधिकारों के प्रति सजग बनाती है, बल्कि उनके कर्तव्यों के निर्वहन के लिए भी प्रेरित करती है। यह सामाजिक उत्तरदायित्व की भावना को शिक्षा का अभिन्न अंग बनाकर, एक संवेदनशील, जागरूक और उत्तरदायी नागरिक के निर्माण की दिशा में सशक्त कदम है।

**3. विविधता और समावेशन**

भारत एक विविधताओं से भरा हुआ देश है, जहाँ विभिन्न जातियाँ, धर्म, भाषाएँ, और संस्कृतियाँ सह-अस्तित्व में हैं। राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) इस सामाजिक-सांस्कृतिक विविधता को स्वीकार करते हुए, समावेशी शिक्षा प्रणाली को बढ़ावा देने पर विशेष बल देती है। नीति का उद्देश्य यह सुनिश्चित करना है कि शिक्षा सभी विद्यार्थियों के लिए सुलभ और समान रूप से उपयोगी हो, चाहे वे किसी भी जाति, धर्म, लिंग, भाषा या आर्थिक पृष्ठभूमि से संबंध रखते हों (भारत सरकार, 2020)। NEP 2020 में "समावेशिता" को शिक्षा का मूल आधार माना गया है। इसमें विशेष रूप से वंचित समूहों जैसे अनुसूचित जाति, अनुसूचित जनजाति, दिव्यांग, ट्रांसजेंडर, और ग्रामीण क्षेत्रों के विद्यार्थियों के लिए विशेष सुविधाओं और सहायता प्रणालियों की व्यवस्था का उल्लेख किया गया है (NEP, 2020)।

इसके साथ ही, पाठ्यक्रम में विविध भाषाओं, परंपराओं और संस्कृतियों को स्थान देकर विद्यार्थियों को विविधता का सम्मान करना सिखाया जाता है। इससे न केवल सहिष्णुता और सामंजस्य की भावना विकसित होती है, बल्कि सामाजिक एकता और राष्ट्रीय एकजुटता भी सुदृढ़ होती है (Ministry of Education, 2020)।

**3.1 सभी के लिए शिक्षा**

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) शिक्षा के अधिकार को सभी के लिए सुनिश्चित करने पर जोर देती है, विशेषकर कमजोर वर्गों और विकलांग विद्यार्थियों के लिए। नीति का उद्देश्य ऐसी शिक्षा प्रणाली विकसित करना है जो सामाजिक, आर्थिक या शारीरिक किसी भी प्रकार की बाधा के बावजूद सभी को समान अवसर प्रदान करे (भारत सरकार, 2020)। NEP 2020 में विशेष शिक्षा के लिए व्यापक प्रावधान किए गए हैं। इसमें विकलांग विद्यार्थियों के लिए समायोजित पाठ्यक्रम, सहायक तकनीकों, और विशेष शिक्षकों की व्यवस्था का उल्लेख है, जिससे वे भी शिक्षा प्रणाली का पूरा लाभ उठा सकें (NEP, 2020)। साथ ही, नीति डिजिटल शिक्षा को बढ़ावा देती है ताकि दूरदराज़ क्षेत्रों के बच्चे भी गुणवत्तापूर्ण शिक्षा प्राप्त कर सकें। डिजिटल उपकरणों और ऑनलाइन प्लेटफॉर्म के माध्यम से शिक्षा का प्रसार करने पर विशेष ध्यान दिया गया है। प्रौद्योगिकी के समावेशन से न केवल शिक्षा सुलभ होती है, बल्कि यह शिक्षा के गुणवत्ता स्तर को भी बढ़ाती है। NEP के तहत 'राष्ट्रीय शैक्षिक तकनीकी मंच' (NETF) जैसे प्रयास किये गए हैं, जो शिक्षकों और विद्यार्थियों को डिजिटल संसाधनों से जोड़ने का काम करते हैं (Ministry of Education, 2020)।

**3.2 भाषाई विविधता**

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) में भाषाई विविधता को अत्यंत महत्वपूर्ण माना गया है। भारत एक बहुभाषी देश है, जहाँ कई क्षेत्रीय भाषाएँ और बोलियाँ प्रचलित हैं। NEP 2020 का उद्देश्य इन भाषाओं के संरक्षण और संवर्धन के साथ-साथ विद्यार्थियों

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

को उनकी मातृभाषा में शिक्षा प्रदान करना है (भारत सरकार, 2020)। नीति के अनुसार, प्रारंभिक शिक्षा में मातृभाषा या क्षेत्रीय भाषा में पढ़ाई को प्राथमिकता दी जाएगी क्योंकि शोध भी यह दर्शाता है कि मातृभाषा में शिक्षा से बच्चों की सीखने की क्षमता और समझ में सुधार होता है (NEP, 2020)। इससे न केवल शिक्षा की गुणवत्ता बढ़ती है, बल्कि बच्चों का आत्मविश्वास और सांस्कृतिक पहचान भी मजबूत होती है।

इसके अतिरिक्त, नीति भाषा शिक्षा के तीन-भाषा सूत्र को प्रोत्साहित करती है, जिसमें मातृभाषा के साथ-साथ हिंदी और अंग्रेज़ी या अन्य भारतीय भाषाओं का अध्ययन शामिल है। यह दृष्टिकोण विद्यार्थियों को भाषाई समृद्धि और सामाजिक सौहार्द की भावना विकसित करने में मदद करता है (Ministry of Education, 2020)। भाषाई विविधता का सम्मान न केवल भाषा संरक्षण के लिए आवश्यक है, बल्कि यह भारत के सामाजिक-सांस्कृतिक ताने-बाने को भी मजबूत करता है। NEP 2020 के माध्यम से भारतीय भाषाओं को पुनर्जीवित और लोकप्रिय बनाने का प्रयास किया गया है, जिससे सभी भाषाई समूह शिक्षा के समान अवसर पा सकें।

**4. आध्यात्मिक और सांस्कृतिक मूल्य**

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) में भारतीय संस्कृति और आध्यात्मिकता को शिक्षा प्रणाली का महत्वपूर्ण अंग माना गया है। यह नीति यह मानती है कि विद्यार्थियों को न केवल आधुनिक ज्ञान प्राप्त करना चाहिए, बल्कि अपनी सांस्कृतिक जड़ों और आध्यात्मिक विरासत से भी परिचित होना आवश्यक है (भारत सरकार, 2020)। NEP 2020 में कहा गया है कि शिक्षा के माध्यम से विद्यार्थियों को उनके सांस्कृतिक मूल्यों की समझ विकसित करनी चाहिए। इसमें भारतीय दर्शन, योग, ध्यान, लोक कला, संगीत और नृत्य जैसे तत्व शामिल हैं, जो विद्यार्थियों के समग्र विकास में मदद करते हैं (NEP, 2020)। इन पहलुओं के अध्ययन से छात्र अपनी संस्कृति के प्रति गर्व और सम्मान की भावना विकसित करते हैं।

नीति का यह भी उद्देश्य है कि शिक्षा से विद्यार्थियों में सामाजिक समरसता और सांस्कृतिक सहिष्णुता को बढ़ावा मिले, जिससे वे विविधता में एकता की भावना को समझ सकें। आध्यात्मिक शिक्षा से विद्यार्थियों में नैतिकता, धैर्य, संयम और आत्म-नियंत्रण जैसे गुण उत्पन्न होते हैं, जो उनके व्यक्तिगत और सामाजिक जीवन में सहायक होते हैं (Ministry of Education, 2020)।

**4.1 धार्मिक और सांस्कृतिक सहिष्णुता**

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) शिक्षा को सामाजिक समरसता और राष्ट्रीय एकता के लिए एक महत्वपूर्ण माध्यम मानती है। नीति का उद्देश्य विद्यार्थियों में धार्मिक और सांस्कृतिक सहिष्णुता की भावना विकसित करना है, ताकि वे विभिन्न धर्मों, मान्यताओं और परंपराओं के प्रति सम्मान और समझ बनाए रख सकें (भारत सरकार, 2020)। NEP 2020 में यह स्पष्ट किया गया है कि शिक्षा का उद्देश्य न केवल ज्ञान देना है, बल्कि सामाजिक सद्भाव और सह-अस्तित्व की भावना को भी बढ़ावा देना है। विद्यार्थी जब विभिन्न धार्मिक एवं सांस्कृतिक विविधताओं को समझेंगे और उनका सम्मान करेंगे, तभी एक समृद्ध और सशक्त समाज का निर्माण संभव होगा (NEP, 2020)। नीति के अंतर्गत विभिन्न धर्मों, त्योहारों, रीति-रिवाजों और सांस्कृतिक पहलुओं को पाठ्यक्रम में शामिल किया गया है, जिससे विद्यार्थियों को विविधता में एकता का संदेश मिले। यह सहिष्णुता और पारस्परिक सम्मान का बीजारोपण करती है, जो आज के वैश्विक और बहुसांस्कृतिक समाज में अत्यंत आवश्यक है (Ministry of Education, 2020)।

**5. शिक्षा का उद्देश्य**

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) शिक्षा को केवल बौद्धिक और कौशल विकास तक सीमित नहीं रखती, बल्कि इसे एक समग्र जीवन कौशल के रूप में देखती है। नीति का उद्देश्य छात्रों को ज्ञान, नैतिकता, सामाजिक उत्तरदायित्व और जीवन के विविध पहलुओं के लिए तैयार करना है (भारत सरकार, 2020)। शिक्षा का लक्ष्य न केवल तकनीकी दक्षता प्राप्त करना है, बल्कि विद्यार्थियों में अच्छे नागरिक बनने के गुण, जिम्मेदारी, सहिष्णुता और मानवीय मूल्यों का विकास करना भी है। इसके जरिए छात्र अपने परिवार, समाज और राष्ट्र के प्रति जागरूक और समर्पित बनते हैं (NEP, 2020)। नीति में यह स्पष्ट किया गया है कि शिक्षा के माध्यम से व्यक्तित्व के समग्र विकास पर जोर दिया जाएगा, जिसमें मानसिक, शारीरिक, भावनात्मक और सामाजिक विकास शामिल है। इससे विद्यार्थी न केवल ज्ञान संपन्न होंगे, बल्कि सामाजिक और नैतिक रूप से भी सशक्त बनेंगे।

**5.1 स्वतंत्रता और आत्मनिर्भरता** NEP 2020 का एक महत्वपूर्ण पहलू छात्रों को आत्मनिर्भर बनाने का है। "आत्मनिर्भर भारत" के लक्ष्य के अनुरूप, नीति शिक्षा के माध्यम से स्वतंत्र सोच, निर्णय लेने की क्षमता और स्वावलंबन को प्रोत्साहित करती है (भारत सरकार,

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

2020)। नीति में कौशल विकास, उद्यमिता, नवाचार और प्रयोगात्मक शिक्षा को बढ़ावा दिया गया है, जिससे विद्यार्थी अपने जीवन और रोजगार के लिए आत्मनिर्भर बन सकें। नीति यह मानती है कि शिक्षा केवल नौकरी के लिए तैयारी नहीं, बल्कि स्वयं की आर्थिक और सामाजिक स्थिति सुधारने का साधन होनी चाहिए। इससे छात्र न केवल अपने लिए, बल्कि समाज और देश के लिए भी योगदान दे सकेंगे। डिजिटल शिक्षा, तकनीकी प्रशिक्षण और व्यावहारिक शिक्षा के माध्यम से विद्यार्थियों को आधुनिक युग के आवश्यक कौशल दिए जाते हैं, जो उन्हें आत्मनिर्भर बनाने में मदद करते हैं (Ministry of Education, 2020)।

**5.2 सामाजिक, मानसिक और शारीरिक स्वास्थ्य**

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) में विद्यार्थियों के मानसिक, शारीरिक और सामाजिक स्वास्थ्य को शिक्षा का अनिवार्य हिस्सा माना गया है। नीति के अनुसार, शिक्षा केवल अकादमिक सफलता तक सीमित नहीं होनी चाहिए, बल्कि विद्यार्थियों के समग्र विकास पर भी समान ध्यान दिया जाना चाहिए (भारत सरकार, 2020)। NEP 2020 में शारीरिक शिक्षा को पाठ्यक्रम में अनिवार्य किया गया है, जिससे विद्यार्थियों का शारीरिक स्वास्थ्य मजबूत हो। इसके साथ ही, मानसिक स्वास्थ्य के लिए भी विशेष कार्यक्रम और पहल शामिल की गई हैं, जैसे योग, ध्यान, Counselling, और जीवन कौशल विकास, ताकि विद्यार्थियों को तनाव प्रबंधन, आत्म-स्वीकृति और भावनात्मक स्थिरता प्राप्त हो सके (NEP, 2020)। सामाजिक स्वास्थ्य को भी नीति में महत्वपूर्ण स्थान दिया गया है, जिसमें विद्यार्थियों को सामाजिक कौशल, सहयोग, सहिष्णुता, और नेतृत्व गुण विकसित करने पर बल दिया गया है। इससे वे न केवल शैक्षिक रूप से, बल्कि सामाजिक रूप से भी सक्षम बनते हैं।

**निष्कर्ष**

भारत की राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) शिक्षा को एक समग्र और व्यापक दृष्टिकोण से देखती है, जहाँ शिक्षा केवल बौद्धिक या तकनीकी विकास तक सीमित नहीं है। इस नीति का मूल उद्देश्य शिक्षा प्रणाली को इस प्रकार विकसित करना है कि यह विद्यार्थियों को अच्छे नागरिक, जिम्मेदार और संवेदनशील व्यक्ति बनने में मदद करे (भारत सरकार, 2020)। NEP 2020 में नैतिकता, सामाजिक जिम्मेदारी, सहिष्णुता और समावेशन जैसे महत्वपूर्ण मूल्यों के विकास को समान महत्व दिया गया है। नीति समावेशिता और विविधता पर विशेष ध्यान केंद्रित करती है, जिससे सभी वर्गों, धर्मों, जातियों, लिंगों और क्षेत्रों के विद्यार्थियों को समान शैक्षिक अवसर मिल सकें (NEP, 2020)। इसके साथ ही, विद्यार्थियों को उनकी मातृभाषा में शिक्षा प्राप्त करने का अधिकार भी प्रदान किया गया है, जिससे उनकी सांस्कृतिक और भाषाई पहचान मजबूत हो सके। NEP 2020 शिक्षा को केवल अकादमिक या तकनीकी दक्षता तक सीमित न रखकर, इसे जीवन के सभी पहलुओं के लिए आवश्यक एक माध्यम मानती है। यह नीति विद्यार्थियों के मानसिक, शारीरिक, सामाजिक और आध्यात्मिक विकास पर भी सम्यक् ध्यान देती है। इस प्रकार, राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 एक समग्र और समावेशी शिक्षा प्रणाली प्रस्तुत करती है, जो प्रत्येक विद्यार्थी को सशक्त, जिम्मेदार और समाज में सकारात्मक योगदान देने वाला नागरिक बनने के लिए सक्षम बनाती है। यह नीति भारत के भविष्य के लिए एक मजबूत और समृद्ध शिक्षा मॉडल का निर्माण करती है।

**संदर्भ:**

1. भारत सरकार। (2020)। *राष्ट्रीय शिक्षा नीति 2020*। Ministry of Education, Government of India.
2. Ministry of Education, Government of India. (2020). *National Education Policy 2020*.
3. National Council of Educational Research and Training (NCERT). (2020). *NEP 2020: An overview*.
4. Sharma, R. (2021). Education reforms under NEP 2020: A new paradigm. *International Journal of Education*, 15(2), 45-58.
5. Singh, P. (2021). Inclusive education and digital learning in NEP 2020. *Journal of Indian Education*, 47(3), 12-25.
6. Gupta, A. (2020). Role of mother tongue in early education: Insights from NEP 2020. *Language and Culture Journal*, 9(1), 33-40.
7. Kumar, S. (2021). Impact of NEP 2020 on Indian education system. *Education and Society*, 14(4), 56-70.

8. Mishra, N. (2020). NEP 2020 and holistic development of students. *Educational Review India*, 22(1), 5-15.
9. Reddy, V. (2021). Promoting ethical values through education: A study on NEP 2020. *Journal of Moral Education*, 28(2), 102-110.
10. Indian Express. (2020, August 5). How NEP 2020 is transforming Indian education. Retrieved from https://indianexpress.com/article/education/nep-2020-transformation/
11. Times of India. (2021, January 10). Digital education and NEP 2020: Bridging the gap. Retrieved from https://timesofindia.indiatimes.com/digital-education-nep-2020
12. Ministry of Education, Government of India. (2020). *National Curriculum Framework 2020*.
13. Jain, R. (2021). Spirituality and culture in Indian education: NEP 2020 perspectives. *Journal of Cultural Studies*, 11(2), 80-89.
14. Sharma, L. (2020). Social responsibility and citizenship education in NEP 2020. *Indian Journal of Social Science Education*, 5(1), 60-68.
15. Patil, S. (2021). Language diversity and educational inclusion: NEP 2020 approach. *Language Policy Journal*, 7(3), 120-132.
16. Government of India. (2020). *Report on mental health and education: NEP 2020 guidelines*. Ministry of Health and Education.
17. Verma, M. (2021). Role of yoga and meditation in student wellness: An NEP 2020 review. *International Journal of Holistic Education*, 10(1), 45-53.
18. Indian Ministry of Education. (2020). *Digital Education Initiatives under NEP 2020*.
19. Singh, A. (2021). Promoting cultural heritage through education: NEP 2020's vision. *Journal of Heritage Studies*, 13(4), 150-160.
20. World Bank. (2020). *India Education Sector Analysis*. Washington DC: World Bank Publications.
21. Joshi, P. (2021). Challenges and opportunities in NEP 2020 implementation. *Educational Policy Review*, 19(2), 77-90.
22. Rao, K. (2020). Gender equity and education reforms in India. *Gender and Education Journal*, 8(2), 40-49.
23. The Hindu. (2020, September 10). NEP 2020: Emphasis on regional languages. Retrieved from https://thehindu.com/nep-2020-language-policy
24. Kumar, V., & Singh, D. (2021). Inclusive education models in India post-NEP 2020. *International Journal of Inclusive Education*, 25(5), 500-515.
25. Ministry of Education, India. (2021). *Annual Report on Education 2020-21*.
26. Chatterjee, S. (2021). Ethical education in modern India: NEP 2020 framework. *Ethics in Education*, 6(1), 25-35.
27. BBC News Hindi. (2020, July 30). NEP 2020: भारत की शिक्षा में बड़ा बदलाव। Retrieved from https://bbc.com/hindi/india-education-policy-2020
28. Mehta, R. (2021). Environmental education and sustainability in NEP 2020. *Journal of Environmental Studies*, 12(3), 100-110.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# महात्मा गांधीचे सत्य आणि अहिंसा संबंधी विचार काळाची प्रासंगिकता

**प्रा.डॉ. प्रमिला डी. भोयर**
स्व.नि. पा. वाघाये महाविद्यालय, सौंदड,
ता.सडक अर्जूनी, जि.गोंदिया
**Email**- bhandarkarpriyansh@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-1705019
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 80-83
May 2025
**Submitted:** 05 Apr. 2025
**Revised:** 20 Apr. 2025
**Accepted:** 20 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश :—**

आज संपुर्ण जग हिंसाचार रक्तपात, आर्थिक, साम्राज्यवाद, धार्मिक व जातीयवादामध्ये फसलेला आहे. प्रत्येक राष्ट्र स्वत:ला श्रेष्ठ समजतो आणि साम्राज्य वादापोटी दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करतो. पहिले आणि दुसरे महायुध्द सुध्दा श्रेष्ठ वंशवाद, श्रेष्ठ,राष्ट्रवाद यामुळे लढल्या गेले आणि जगाचा विनाश घडून आला. या विनाशाच्या मार्गावरून दुर लोटण्यासाठी म.गांधीची उदात्त, करूणामय व सत्यावर आधारीत अहिंसेचा अंगीकार आवश्यक आहे. आज म.गांधीची महत्ता व महानता संगळयांना कळत आहे. केवळ आपल्या भारतातच नाही तर विदेशात सुध्दा म. गांधीच्या तत्वांचा, विचारांचा अंगीकार करीत आहेत. विदेशी राष्ट्रप्रमुख जेव्हा भारतात येतात तेव्हा राजघाटावर जावून त्यांच्या समाधीला श्रध्दांजली अर्पण करतात. म.गांधीचे स्थान जगातील महान नेत्यांच्या रांगेत येते देशासाठी लढणाऱ्या,देशसेवा करणाऱ्या व देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महत्त्वाचा वाटा असणाऱ्या अशा महान नेत्याचा याच देशातील लोकांनी हत्या केली. ही एक शोकांतिका आहे. अहिंसेच्या मार्गावर चाललेल्या हया नेत्याला आपले प्राण गमवावे लागले.

**प्रस्तावणा :—**

आजचे युग हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे युग आहे. हया विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्येक देश व माणूस दहशतवादी हिंसेच्या भयानी संशयीत आहे. देश—विदेश आणि जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यात माणूस सुरक्षित समजत नाही. अत्यंत उग्र विचारसरणीच्या रक्तपिपासू टोळयांनी मानवाधिकार, लोकशाही, शांतता आणि सुरक्षेला वेटीस धरले आहे. पवित्र धर्माची चूकीची व्याख्या करून सारा जग रक्तरंजीत होत आहे. अत्यंत कृरर व निर्दयी संघटनांनी साऱ्या जगाला सळो की पळो करून सोडले आहे. मंदिर — मस्जीदीमध्ये स्फोट होत आहेत. शाळेतील निष्पाप व अबोध बालकांचा बळी जात आहे. स्त्रिया व मुलींचे अपहरण करून त्यांचे शोषण केल्या जात आहे व जगातील महान व्यंक्तींच्या मुर्त्या, बॉम्बस्फोट करून तोडल्या जात आहेत. प्राचीन पुरातत्व विभागाच्या संग्राहलयाला सुध्दा नष्ट केले आहे. देशपातळीवर नक्षलवादी संघटना हिंसेच्या वापर करून, दहशत पसरावित आहेत. हया सगळया हिंसाचाराच्या मार्ग शोषण, धार्मिक, कटट्रतावाद, शिक्षणाचा, अभाव व आसुरी महत्वाकांक्षा हे कारण आहे. सर्व जगभर पसरलेल्या हिंसेचा नायनाट करण्यासाठी म.गांधीनी दाखवलेला अहिंसेचा मार्ग एक अचूक व सुलभ मार्ग आहे.

**म.गांधीचे सत्याबद्दलचे विचार :—.**

सत्य हे मानवी जीवनातील सर्वात उत्तम मुल्य आहे. सत्याच्या मार्गानी जाणे म्हणजे हिमालयावर जाण्यापेक्षाही अधिक कठीण राहू शकते पण आपण सत्याच्या मार्गाने जात असाल तर कोणताही मार्ग कठिण नाही तर सोयीचा किंवा सोपा वाटतो. सत्याच्या तलवारीला कधीच गंज चढत नसतो. कारण तिला धारदार ठेवणारे प्रेरनास्त्रोत आपल्या अंतकरणात असतात एकेकाळी जग हिंदूस्थानकडे सुवर्णभुमी म्हणून पाहत असे, कारण त्याकाळी हिंदुस्थानामध्ये सोन्यासारखी माणसे

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा.डॉ. प्रमिला डी. भोयर स्व.नि. पा. वाघाये महाविद्यालय, सौंदड ता.सडक अर्जूनी, जि.गोंदिया*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817576
OPEN ACCESS

**How to cite this article:**
*भोयर, . प्रमिला . डी . (2025). महात्मा गांधीचे सत्य आणि अहिंसा संबंधी विचार काळाची प्रासंगिकता. Journal of Research & Development, 17(5(II)), 80–83.* https://doi.org/10.5281/zenodo.15817576

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

राहत असत परंतु आता तसे राहले नाही. इतिहास जमा झालेला सुवर्णयुग हिंदुस्थान आपल्याला पाहीजे असेल तर प्रथम आपल्याला खरा सोना बनावा लागेल आणि हिंदुस्थानला पुन्हा सुवर्णयुग प्राप्त करून देणाऱ्यापरिसाचे नाव म्हणजे सत्य होय. आज आपल्याकडे परिसही व लोखंडही आहे पण लोखंडाचे सोने होण्यासाठी त्याला स्पर्श करावा लागतो आणि हेच मात्र हिंदुस्थानी माणूस विसरला आहे. सदोदीत सत्याचरणातूनच भारतीयांना स्वराज्यांची प्राप्ती होइल. सत्याचा आग्रह स्वत:चेच नाही तर अखिल मानव जातीचे कल्याण, करीत असतो. म.गांधी, हरिश्चंद्र, मिराबाई, सॉक्रेटीस इ. माणसे काळाच्या पडदयामागे गेली असली तरी, त्यानिष्टेमुळे सत्याप्रमाणेच ती माणसे अजरामर झाली आहेत. देशस्वातंत्र्या नंतर कोण्या एकाने म.गांधीना बंदुकीच्या गोळीने संपविले परंतू त्याच बंदुकीच्या गोळीने म.गांधी गेल्यानंतर त्यांचे विचार संपवता आले नाही.

**म.गांधीप्रणीत सत्याचे प्रकार :—**

१) **सापेक्ष सत्य** :—

या सत्याची ओळख व्यक्तीला परिस्थिती नूसार होते. तसेच हे सत्य परिस्थितीसापेक्ष असते. हे बदलणारे सत्य असते त्यामुळे त्याला पूर्ण सत्यही मनता येणार नाही. म्हणुन त्याला अंशीक सत्य म्हणता येईल.

२) निरपेक्ष सत्य :—

या सत्याला सार्वभौम सत्यही म्हणता येईल सत, चित्त, आनंद या त्रयीचा समन्वय त्यात झालेला असते. या सरळ साध्या वरकरणी सोपाटया वाटणाऱ्स सत्यासाठी मानव जातीला सर्वोच्च त्यागाची तयारी ठेवावी लागते. निरपेक्ष सत्य पूर्ण भौतिक असते. सत्याचा मार्ग अतीशय खडतर किंवा कठीण आहे. याची जाणीव म.गांधीना होतीच परंतू सत्याच्या धगधगत्या अग्नीकुंडात प्राणाची आहूती देतांना देखील सर्वोच्च आनंदाची अनुभूती येत राहते हा गांधीचा स्वानुभव होता.

**म.गांधीचे अहिंसेविषयक विचार :—**

हिंसेच्या मार्गानी कितीही मोठी क्रांती केली असली तरी क्रांती शेवटी आपल्याला शांतता हवी असतेच, कारण मानसाचा स्वभावच शांतीप्रीय आहे. हिंसा करून मिळविलेले वैभव व शांती चिरकाळ राहात नाही. शेवटी मानसाला हया सगळया गोष्टी पासून मुक्त होवून शांतीचे जिवन जगायचे असते. हिंसेचा मागे हा प्रतिशोधाचा मार्ग असतो तर अहिंसेचा मार्ग, हा शांती, बंधुभाव, प्रेम, स्वातंत्र्य, करूणा, संस्कृती जपणे, विकाश व प्रगतीचा असतो.

म.गांधीच्या पूर्वी तथागत गौतम बुध्द, वर्धमान महाविर वा टॉलस्टॉय सारख्या व्यक्तींनी अहिंसेचा मार्ग सांगितला आहे. गांधीनंतरही मार्टिन ल्युथर किंग, सिमांत गांधी व नेल्सन मंडेला यांनीही म.गांधीनी दाखविलेल्या अहिंसेच्या मार्गाचा अवलंब केला आहे. अहिंसा मार्गाचा पूर्वी व्यक्तिगत, समुह किंवा सामाजिक रूपात अवलंब केल्या जात असे पण म. गांधीनी अहिंसेचा वापर बलाढय अशा इंग्रजा विरूध्द स्वातंत्र्य मिळविण्याकरीता केला. ज्यांचे अर्ध्या जगावर राज्य होते आणि असे म्हणतात. की, त्यांच्या राज्यात कधीच सुर्यास्त होत नाही. त्यांच्या सोबत म.गांधीनी अहिंसेच्या मार्गानी संबंध ठेवले. म.गांधीच्या मुल्यांप्रमाणे अहिंसा हा शाश्वत देवी व मानविय मुल्य आहे. अहिंसा म्हणजे हिंसेचा वापर न करणे एवढा नाही तर मन, वाणी आणि कर्माद्वारे कोणतेही नुकसान होणार नाही हे अहिंसेचे मुलभूत घटत आहेत. म. गांधीच्यामते अहिंसा शत्रुशी शत्रुत्व भाव ठेवत नाही तर शत्रुचे हृदय परिवर्तन करून त्यांची अभ्यास कृती बदलुन न्यायीक भावना जागृत करण्याची क्षमता असते. हातात तलवार घेऊन रणांगणात शत्रुसोबत लढणारा व शत्रुला धारातीर्थ पाडणारा माणूस वीर आहे. परंतु त्यापेक्षाही अन्याया विरूध्द शुर—विर असुनही अहिसक मार्गाचा वापर करून मृत्युला सामोरे जाणारा खरा शुर—विर आहे. शस्त्रापेक्षाही आत्मबल श्रेष्ठ आहे. हिंसेच्या मार्गानी हिंसा होते. रक्तपात घडून येतो. कित्येक निष्पाप व अबोध माणसे मारली जातात. संपत्तीचा नाश होतो. उपासमारीची पाळी येते, देशाची प्रगती थांबून सामाजिक व आर्थिक समस्या उभ्या होतात. नागरीकांच्या मुलभूत गरजा पूर्ण होणे कठीण असते. त्यामुळे समाज व देश रसातळाला जातो हे सगळ होऊन नये व देशाची प्रगती व्हावी. माणसानी माणसासारखे सामजस्याने वागावे सर्वांसी प्रेमभाव ठेवावे. म्हणून अहिंसेचा मार्ग प्रगती साधण्यासाठी म.गांधी सांगितला आहे.

**अहिंसेचे प्रकार :—**

**१) विधायक अहिंसा :—**

प्राणीमात्रांच्या कल्याणासाठी चांगल्या मनानी, प्रयत्न करने म्हणजे अहिंसा होय एखादया व्यक्तीच्या कार्यात व्यत्य न आणणे म्हणजे विधायक अहिंसा होय. सर्व जग प्रेममय बनविणे हाच विधायक अहिंसेचा आशय होय. विधाय अहिंसा ही सत्याची पूर्वअट होय.

**२) निषेधात्मक अहिंसा** :—

क्रोध, व्देषमूलक विचार, तिरस्कार, घृणा, इ. दुर्गुणाचा त्याग करणे म्हणजेच निषेधात्मक अहिंसा होय. जीवनातल्या निरामय आनंदासाठी निषेधात्मक अहिंसा हाच एकमेव पर्याय आहे.सर्व पापकर्माचा त्याग हिच निषेधात्मक अहिंसेची पूर्वअट होय. वाईटाचा सर्वार्थाने निषेध व चांगुलपणाचा सर्वस्वी स्वीकार म्हणजेच निषेधात्मक अहिंसा होय.

**३) निरपेक्ष अहिंसा :—**

हया अहिंसा प्रकारात संपूर्ण शाकाहारी असणे व अहंभाव त्यागणे हे अपेक्षीत असते. अर्थात ही अहिंसा ईश्वरी आहे. सर्वसामान्यांना ही साध्य होईलच असे नाही. तुमचा अहंभाव/अहंकार प्रगट झाला की जणू हिंसा घडली म्हणून निरपेक्ष हिंसा ही एक उच्चतर मनोवस्था असल्याचे म.गांधी म्हणतात.

**४) नैतिक अहिंसा :—**

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

ही व्यावहारीक अहिंसा होय या अहिंसेचे दोन प्रकार म.गांधीनी सांगितले आहेत.

**I) वीरपुरूषांची अहिंसा** :—

एखादा व्यक्ती सामर्थ्यवान असूनही अहिंसेचा पुजारी असतो. दुर्बलतेतून नाही तर सबलतेतून ज्या अहिंसेचा अविष्कार होत असतो तीच वीर पुरूषांची अहिंसा होय.

**II) वीरपुरूषांची अहिंसा** :—

ही स्वार्थासाही आणि गरजेनूसार स्विकारलेली अहिंसा असते. अशी व्यक्ती हिंसेला विरोध करत असते. ती आत्मबळाची **प्रेरणा म्हणुन नव्हे तर स्वत:**

च्या भित्रेपणामुळे कामचलाउ अहिंसा असते. भित्र्या किंवा भेकड लोकांची अहिंसा म.गांधीना काहीच मान्य नव्हती. भित्र्याच्या अहिंसेपेक्षा मी हिंसा काधीही मान्य करेन असे म.गांधी म्हणतात.

अशाप्रकारे म.गांधीनी अहिंसेचे उपयुक्त प्रकार सांगून पुढे म्हणतात अहिंसा हे भित्र्यांचे आभुषण नसून सामर्थ्यवानाचे आभुषण आहे. अहिंसा ही दुबळेपणातून निर्माण झाली असेल तर अहिंसेचा सत्यार्थच समजला नाही असे म्हणावे लागेल. कारण अहिंसा ही शौर्याची परमसीमा असते. सत्य हे लोकांच्या पसंती — नापसंतीवर अवलंबुन नसते, तर ते स्वयंमसिह असते. आणि अहिंसा हे मानवी जीवनातील स्वयंसिध्द मूल्य आहे.

**भारतीय स्वातंत्र्य आंदोलणाला सत्य व अहिंसेनी दिलेले योगदान व दिशा :**

१ ऑगष्ट १९२० रोजी लो.टिळकांचे हृदयविकाराच्या झटक्यानी दु:खद निधन झाले त्यानंतर भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसची धुरा व भारतीय स्वातंत्र्य आंदोलणाचे नेतृत्व म.गांधीजीकडे आले. देशाला इंग्रजाच्या तावडीतून सोडविण्यासाठी किंवा स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अनेक विचार प्रवाहाचे लोक, संघटना आपापल्या परी प्रयत्न करीत होते किंवा स्वातंत्र्य लढा लढीत होते. भगतीसिंह सावरकर, सुभाषचंद्र बोस यासारखे महान राष्ट्रभक्त क्रांतीकारी मार्गानी इंग्रजांच्या विरूध्द स्वातंत्र्य लढा, लढीत होते. तर काही राष्ट्रभक्त जहाल विचारसरणीनी इंग्रजांना लढा देत होते परंतु म.गांधी मात्र त्याचवेळी मवाळवादी विचारसरणी पत्करून सत्य व अहिंसेच्या मार्गानी आंदोलनाला नविन दिशा दिली. म.गांधीनी १९२० पासून शांतीच्या मार्गानी देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी इंग्रजांच्या विरोधात लढा सुरू केला हा लढा पूर्णपणे सत्य व अहिंसेवर आधारित होता सविनय कायदेभंग स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, असहकार व सत्याग्रह यांचा वापर केल्यामुळे भारतातील सर्व भागातील सामान्य जनता या लढयात सहभागी झाली. हया आंदोलनात कोणत्याही प्रकारचा विरोधकांबद्दलचा शत्रुभाव नव्हता तसेच कोणत्याही प्रकारची हिंसा केल्याजाणार नव्हती म्हणजेच हा लढा पूर्णपणे अहिंसेवर आधारीत होता. हया आंदोलणात हृदयपरीवर्तन होते. १९२२ च्या, चौरी—चौरा घटनेमुळे आंदोलनानी हिंसक वळण घेतले म्हणून म.गांधीनी असहकार आंदोलन मागे घेतले. म.गांधीना या घटनेमुळे फार दु:ख झाले आणि प्रायश्चित म्हणून आंदोलणाची स्थगीती केली.

निष्कर्ष :—

जग २१ व्या शतकात वावरत आहे. हे युग म्हणजे विज्ञान व तंत्रज्ञानाचे युग आहे. प्रत्येक देश विज्ञान हा नविन नविन तंत्रज्ञान शोधून काढत आहे. प्रत्येक देशात स्पर्धा सुरू झाली आहे. स्वत:च्या स्वार्थासाठी काही देश दुसऱ्या देशात अस्थिरता माजवित आहेत. दहशतवादी हल्ले करणे, देशाच्या सीमेवरून घुसखोरी करून हल्ले करणे, युध्द जन्य परिस्थिती निर्माण करणे, आर्थीक कोंडी करणे व शस्त्र स्पर्धा निर्माण करणे यासारख्या अनेक कुरघोडी आंतरराष्ट्रीय राजकारणात होत आहेत अशा अनेक प्रकारातून जगातील अनेक देश एकमेकांच्या विरूध्द कुरघोडींनी आंतरराष्ट्रीय शांतता भंग करीत आहेत.

स्वरक्षणाच्या नावाखाली आज कित्येक देश अणुशस्त्रांचासाठा करून आहेत. नवनवीन आंतरमहाव्दिपीय अणुशस्त्रयुक्त मीसाईलचे परिक्षण करीत आहेत. यामुळे जग नष्ट होऊ शकते. आधुनिक तंत्र व संगणकाच्या वापरामुळे जगातील कोणतीही गोष्ट वाऱ्यासारखी पसरून लगेच त्यांची प्रतिक्रीया उमटू लागते. जागतीक महासत्ता/महाशक्ती बनण्याची आसुरी इच्छा, जागतिक संघटनांमध्ये सभासदत्व मिळविण्याची धडपड, दुसऱ्या देशाची बाजारपेठे हस्तगत करण्यासाठी चाललेले षडयंत्र, दुसऱ्या देशांचे तुकडे करण्याकरीता चालवलेला आंतंकवाद, या सर्वामुळे जागतिक शांतता संकटात आली आहे. आज जगात नानाविध प्रश्न व गुंतागुंत निर्माण केली गेले आहेत. हया सर्व चक्रामधून बाहेत निघण्याची नितांत गरज आहे. शांततापूर्व मिळून मिसळून प्रेमभावाने उदारतापूर्ण व्यवहारीक रितीने वागणे गरजेचे आहे. जगातील अनेक ज्वलंत समस्येवर तोडगा, निघून परिस्थिती शांततामय करण्याची ताकद म.गांधीच्या सत्य—अहिंसेच्या तत्वामध्ये आहे. त्यामुळे जगातील देश एक दुसऱ्यासोबत प्रेमाणे, बंधुभावाने शांतीपूर्वक वागावे व एक—दुसऱ्याबद्दल हया करूणा निर्माण होउन संस्कृतीचे जतन केल्या जाईल, देशाचा विकाश घडुन येईल, देशची प्रगती होईल आणि माणुसकीला चालणार मिळेल. हे सर्व म.गांधीच्या सत्य—अहिंसेमुळे घडू शकते.

**उपाय :**

१) प्रत्येक देशानी/राष्ट्रांनी, व्यक्तीनी सत्य—अहिंसेचे तत्व अवलंबीले तर जगाला षडयंत्राच्या कुचक्रातुन मुक्ती मिळेल व ती गरजेची आहे.

२) प्रत्येक देशांनी आपली निती बदलली पाहीजे. आदर्श राज्यांच्या संकल्पनेप्रमाणे प्रत्येक राष्ट्राने आपले व्यवहार केले पाहीजे.

३) प्रत्येक राष्ट्रानी आपले राजकीय धोरण आदर्श राज्यांच्या संकल्पनेप्रमाणे अवलंबिली पाहीजेत.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

४) सत्य—अहिंसेचे तत्व अवलंबून जगातील ज्वलंत समस्यांवर तोडगा काढावा.
५) सत्य — अहिंसेच्या तत्वांचा अवलंब करून जगात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करावी.

**संदर्भसूची**

१) ६) कराळे, गंगाधर :
'ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टीकोन' मंगेश प्रकाशन
नागपूर २००८
२) **गांधी महात्मा:** '
सत्याचा प्रयोग' (आत्महत्या) नवजिवन प्रकाशन अहमदाबाद, २००६
३) **गांधी, महात्मा** :
'हमारे गावो का पुननिर्माण' नवजिवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद
**४) गांधी,महात्मा :**
'माझ्या स्वप्नांचा भारत' परमप्रधान प्रकाशन पवनार वर्धा २०१०
५) **गायकवाड, श्रीकांत व इतर :**
'भारतीय समाज संरचना आणि परिवर्तन' अरूणा
प्रकाशन, लातुर २००५
६**) डॉ.चोळकर,पराग :**
'गांधीजी जिवन और विचार' मंगेष प्रकाषन नागपूर २००७
७) डॉ.चव्हान पंजाब, डॉ.भिसे, रामचंद्र:
'गांधी तत्वज्ञान आणि भारतीय लोकशाही' अवन
पब्लीकेशन दिल्ली, २०१३
**८) प्रा.जवळणे, हनुमंत :**
'मुल्य व्यवस्था' गांधी विचार निर्मल प्रकाशन नांदेड २०१०
**९) जाधव, श्रीराम :**
'गांधीजी आणि सामाजिक समता' म.गांधी अध्ययन केंद्र,
औरंगाबाद २००९
१०) हेडा, ब्रिजमोहन (अनु) : महात्मा गांधीचे विचार' नवजिवन प्रकाश मंदिर,
अहमदाबाद २०१०

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# कृषीच्या शाश्वत विकासावर हवामान बदलाचा होणारा परिणाम

**प्रा. डॉ. सरवदे एम. पी.**
(भूगोल विभाग) जयक्रांती कला व वाणिज्य वरिष्ठ महा. लातूर
**Email-** sarwademaya71@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-1705020
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 5(II)|
Pp. 84-88
May 2025

**Submitted:** 05 Apr. 2025
**Revised:** 20 Apr. 2025
**Accepted:** 20 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश**

विसाव्या शतकातील भारताची परिस्थिती ही आजच्या तुलनेत वेगळ्या स्वरूपाची होती. आज आपण एकविसाव्या शतकात वावरत असलो तरी आपला आहार आणि विहार हा टप्प्या-टप्प्याने बदललेले दिसून येतो. आज हवामानातील बदल आणि शेतीत शाश्वत विकास झालेला दिसून येतो यालाच काळानुसार शेतीतील झालेले बदल असेही म्हणता येईल. शेतीमध्ये आज आपण नवनवीन तंत्रज्ञान व अवजारे वापरत असलो तरी वातावरणातील बदलाचा शेतीवरील परिणाम आपणास मान्य करावाच लागेल. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला महत्त्वाचे स्थान आहे. याचा उपयोग उद्योगधंद्यांना कच्चामाल पुरवठा करण्याच्या दृष्टीने देखील होतो. मात्र उद्योगधंद्यांच्या मार्फत होणारे प्रदूषण याचा थेट परिणाम हा वातावरणीय बदलावर झाल्याचे संशोधनातून सिद्ध झाले आहे.

भारता सारख्या खंडप्राय देशात प्राकृतिक रचना हवामान मृदा वनस्पती याबाबतीत अनेक प्रकारची विविधता आहे. भारतामध्ये प्राकृतिक दृष्ट्या विविध स्वरूपांचे पर्वत, पठार आणि मैदानी आहेत. भारताच्या उत्तरेस अतिभव्य आणि महाकाय हिमालयाच्या उत्तुंग पर्वत श्रेण्या आहेत. जगामधील एक विस्तीर्ण व सुपीक गाळाचा मैदानी प्रदेश पश्चिमेस पंजाब पासून पूर्वेस पश्चिम बंगालपर्यंत पसरलेला आहे. भारताच्या दक्षिण भागात जगामधील एक मोठा द्वीपकल्पा पैकी दख्खनचे पठार पसरलेले आहे. भारतात ज्या प्रमाणे सुपीक गाळाचा मैदानी प्रदेश आहे. त्याच प्रमाणे भारतीय वाळवंटी प्रदेश ही आहे. तसेच पश्चिम बंगालमध्ये सुंदरबन सारखा दलदलीचा प्रदेश आहे.

अन्न ही मानवाची मूलभूत गरज आहे. स्वतःच्या गरजे पुरते अन्नधान्य उत्पादन घेण्यासाठीच शेतीला सुरुवात झाली. स्वतःची गरज भागवून जे थोडे फार अन्नधान्य उरत होते ते दुसऱ्या वस्तू मिळवण्यासाठी वापरले जात असे.

**प्रस्तावना:-**

भारत हा कृषी प्रधान देश आहे. संपर्ण कृषीचा विकास हा देशाचा विकास ग्राह्य धरला जातो. त्याकरिता भारतीय हवामानाच्या बदलत्या स्वरुपाच्या संदर्भात विचार व अभ्यास करणे अत्यंत महत्वाचे ठरला आहे. हवामान बदलाचा प्रत्यक्ष परिणाम संपूर्ण मानवजातीवर होताना दिसत आहे. हवामान बदलाचा ऐतिहासिक व जागतिक बदलाचा आढावा घेतल्या नंतर असे निदर्शनात येते की, हवामान बदल ही अनंत काळापासन घडत आलेली नैसर्गिक क्रिया आहे मात्र आधुनिक काळात मानवी क्रियामुळे व कार्यामुळे पर्यावरणातील अनेक घटकांचे अमर्याद शोषण झाले आहे.

लोकसंख्यावाढ, नागरिकरण, औद्योगिकरण, वाढते प्रदूषण, रासायनिक बी-बियाणे, खते व औषधाच्या अमर्याद वापर स्थानिक व राष्ट्रीय वैश्विकता पमानात झालेली वाढ, पर्जन्यात झालेली घट, वाळवंटी करणाचे वाढते प्रमाण इत्यादी कारणामुळे जागतिक.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा. डॉ. सरवदे एम. पी. (भूगोल विभाग) जयक्रांती कला व वाणिज्य वरिष्ठ महा. लातूर*

**How to cite this article:**
*सरवदे, . एम . पी . (2025). कृषीच्या शाश्वत विकासावर हवामान बदलाचा होणारा परिणाम. Journal of Research & Development, 17(5(II)), 84–88.* https://doi.org/10.5281/zenodo.15817596

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817596
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

तापमान वाढ झाली आहे. या तापमान वाढीमुळे निसर्ग चक्रात बिघाड निर्माण झाली आहे. त्यातून भारतीय हवामान बदल झाल्याचे आढळते. त्यामुळे भारतीय कृषीवर काय परिणाम झाला त्यावरती उपाय काय याचा अभ्यास खालील शोध निबंधात केलेला आहे.

मानव वनस्पती आणि प्राणी यांच्यासह वस्ती स्थान निर्माण करून राहतो. त्यामुळे त्यांच्यात परस्परांशी निगडित असे संबंध आहेत. साहजिकच या संबंधातून मानवी क्रियांच्या दोन गोष्टी लक्षात येतात. एक म्हणजे पिकांची लागवड करणे दुसरी म्हणजे प्राण्यांची जोपासना करणे याचा अर्थ असाकी कृषी म्हणजे पिकांची लागवड करून प्राण्यांची जोपासना करणे होय.

**उद्दिष्टे :**

वातावरणीय बदलाचा शेतीवर झालेला परिणाम अभ्यासणे.

एकूण उत्पादनात झालेला बदल अभ्यासणे.

**अभ्यास पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये भारतीय पुरातत्व विभागद्वारा प्रकाशित दुय्यम स्वरूपाची आकडेवारीचा वापर केला असून. कृषी विभागाने प्रकाशित केलेल्या माहितीचा वापर व इंटरनेट वरील माहितीचा प्रस्तुत शोध निबंधामध्ये वापर करण्यात आलेला आहे.

**अभ्यास क्षेत्र:**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये भारतीय प्रदेशाचा अभ्यास क्षेत्र म्हणून निवड करण्यात आलेला आहे. भारताचे स्थान दक्षिण पूर्व आशियामध्ये असून उत्तरेस हिमालय पर्वत रांगा व दक्षिणेस हिंदी महासागर पसरलेला आहे. भारताची भूमी विविधतेने नटलेली असून उत्तरेकडील पर्वतीय प्रदेश, मैदानी प्रदेश, समुद्र किनारी प्रदेश, वाळवंटी प्रदेश व सागरी सागरी बेटे या प्राकृतिक विभागाने भारतीय प्रदेश निर्माण झाला आहे.

**विषय विवेचनः**

पृथ्वीच्या जीवन काळामध्ये अनेक वेळा वातावरणीय बदलामुळे वेगवेगळे युग येऊन गेले. डायनोसॉर सारख्या महाकाय प्राण्याचा विनाश देखील या वातावरणीय बदलाच्या घटनेतून झाल्याचे संशोधनातून सिद्ध झाले आहे. तसेच वातावरणात मानवी हस्तक्षेपामुळे व इतर कारणामुळे बदल हे होत असतात या बदलाचा परिणाम मानवाच्या शारीरिक व सांस्कृतिक बाबीवर होत असतो. अगदी त्याच पद्धतीने वातावरणातील बदलाचा शेतीवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम हा होत असतो.

UNFCCC नुसार हवामान बदल म्हणजे पृथ्वीच्या हवामानातील बदल की ज्याचे श्रेय प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मानवी क्रियाकल्पांना दिले जाते, ज्यामुळे आपल्या वातावरणाची रचना बदलते. असे आंतरराष्ट्रीय संस्थेने सांगितले आहे. निश्चितच वातावरणीय बदलाचा परिणाम हा शेतीवर होतो.

**शेतीचा विकास:**

शेतीला नवाश्मयुगात सुरुवात झाली असे मानतात. या नवाश्मयुगाचा (Neolithic Age) काळ इसवी सन पूर्व १०,००० वर्षांचा माणला जातो. त्याआधी मानव रानटी अवस्थेत होता. तेव्हाचे लोक गायी, बैल, घोडे वगैरे जनावरे पाळीत. या नंतरच्या, म्हणजेच ताम्र पाषाण (Chalcolithic Age) युगाच्या काळात (इ.स.पू. ५००० ते ३०००) लोक शेती करून घरे बांधून स्थायिक झाले. त्याकाळी भारतातील शेती बरीच प्रगत झाली होती. हे लोक ईजिप्त, इराण, मेसोपोटेमिया सारख्या देशांशी व्यापार करीत.

**मोहें जोदडो आणि हडप्पा काळ**

येथील उत्खननांवरून सिंधू संस्कृती (इ.स.पू. ३२०० - २७००) ही नागरी संस्कृती होती, हे स्पष्ट दिसते. त्या संस्कृतीतील लोकांचा व्यवसाय मुख्यतः शेती असून कापूस, जवस, टरबुजे, खजूर, भाजीपाला, आणि फळे यांची ते लागवड करीत होते. गहू, जवस, विविध शेंगा, तीळ यांची ही पिके त्याकाळी काढली जात होती. कापसाची निर्यात मेसोपोटेमिया सारख्या प्रदेशांमध्ये केली जात होती. कृत्रिम जलसिंचना बद्दल खात्री देता येत नाही पण त्याच्या अस्तित्वाची शक्यता आहे. आता परिचित असलेले बहुतेक भारतीय प्राणी - गोवंश, म्हशी, शेळ्या-मेंढ्या, डुकरे, कोंबड्या हे तेव्हाही पाळले जात होती. हडप्पा मध्ये सापडलेल्या एका मोठ्या धान्य कोठारावरून शेतकऱ्यांकडून कर वसूल केला जात असावा, असे अनुमान निघते.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**वैदिक काळातः**

(इ.स.पू. २००० ते इ. स. पू. ८००) वर्षांचा गणला जातो. या काळात भारतात आर्यांचे वास्तव्य असून त्यांचा मुख्य धंदा शेती होता. ते गायी - मेंढ रे पाळीत. भारतात येण्यापूर्वी आर्यांना कृषि विद्या अवगत होती, असे आढळून येते. ऋग्वेदात आणि अथर्ववेदात शेतीशी संबंधित उल्लेख आढळतात. उदा. उर्वरा म्हणजे नांगरलेली जमीन, अप्रस्वती म्हणजे खणणे, शिंपणे इ. कामे झालेली जमीन, असे शब्द ऋग्वेदात आले आहेत. पाट किंवा कालवे काढून शेतीला पाणी पुरवठा करण्यासंबंधीची वचने ऋग्वेद आणि अथर्ववेदात आहेत.

**शतपथ ब्राह्मकाळ:**

याकाळात धान्य विळयाने कापणे, त्याचे भारे बांधणे, ते खळयात नेऊन झोडणे, धान्य चाळन साफ करणे यांसारख्या शेती कामांचे वर्णन आहे. अथर्ववेदात उंदीर, पाखरे, कीटक यांच्या पासून तसेच अवर्षण, अतिवृष्टी अशा आपत्तीं पासून शेतीचे संरक्षण करण्याचे मंत्र दिलेले सापडतात. पाणिनीच्या 'अष्टाध्यायी' या ग्रंथात नदीचे पाणी कालव्याद्वारे शेतात नेणे आणि विहिरींचे पाणी मोटेने वर खेचून शेतात सोडणे, असे दोन्ही उल्लेख आढळतात. तत्कालिन भारतीय अर्थव्यवस्था पशुपालन आणि शेती या दोन गोष्टींवर आधारित होती. तत्कालीन वाङमयात शेती पेक्षा पशुपालनाचे उल्लेख जास्त येतात. याचे कारण शेतीचा व्याप कमी होता असे नाही. पण शेती व्यवसायाचा दर्जा निकृष्ट मानलेला होता. धान्याच्या संदर्भात 'यव' हा एकच शब्द ऋग्वेदात वापरलेला आहे पण त्याने सर्व प्रकारच्या धान्यांचा निर्देश होत असावा. एक विशिष्ट धान्य प्रकार हा अर्थ त्याला नंतरच्या काळात प्राप्त झाला असावा. नांगरणी आणि कापणी यांचे तत्कालीन उल्लेख आढळतात. कृत्रिम जलसिंचना बद्दल निर्णायक पुरावा मिळत नाही. गोधनाचा चलन आणि संपत्तीच्या मोजमापाचे साधन म्हणून उपयोग होई. रामायण, महाभारत या ग्रंथांमधील शेतीच्या बाबतीतल्या उल्लेखांवरून तत्कालीन शेती प्रगतावस्थेला पोहोचली होती, असे स्पष्ट होते.

**बौद्धकाळ:**

(इसवी सन पूर्व सुमारे ६०० ते ४००) पूर्वेकडे मगध, अंग, वायव्येकडे गांधार, पश्चिमेकडे काठेवाड, दक्षिणेकडे नर्मदा नदी अशा प्रदेशांत अनेक नव्या पिकांची भर पडली होती. कृत्रिम जलसिंचन आणि खतांचा वापर सुरू झाला होता. धातुकाम, दोर वळणे, टोपल्या तयार करणे, विणकाम, रंगकाम, सुतारकाम, कुंभारकाम इत्यादींच्या उल्लेखांवरून शेतीला उपयुक्त आणि शेतीवर अवलंबून असणाऱ्या व्यवसायांची वाढ झाल्याचे दिसून येते.

**मौर्यकाल :**

इ.स.पू. चौथ्या शतकात भारतातील शेती उच्च कोटीला पोहोचली होती. त्यावेळी शेतीच्या विकासासाठी एक स्वतंत्र खाते होते. त्याच्या प्रमुख अधिकाऱ्याला 'सीताध्यक्ष' म्हणत. त्यावेळी हवामानाचा अंदाज घेतला जात असे आणि पाऊस ही मोजत असत. सुदर्शन तलावासारख्या मोठ्या जलसिंचन योजना तत्कालीन राजांनी शेतीच्या विकासासाठी अंमलात आणल्या.

**कौटिल्याच्या काळ:**

'शेणखत (गोक्षकृत्त), हाडखत (गोस्थी), आणि मासळी खत (अशुष्ककटु मत्स्य) ही खते वापरली जात. शास्त्रीय दृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या शेती विषयक अनेक क्रिया कौटिल्याला माहीत होत्या. शेतकी अधिकारी कोणत्या पात्रतेचा असावा, त्याने कोणती कामे केव्हा करावीत, ऋतुमान आणि जमिनीचा प्रकार लक्षात घेऊन पिकांची योजना कशी करावी, अशा विषयांचे वर्णन कौटिल्याने आपल्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथात केले आहे. त्याच प्रमाणे, मेगॅस्थिनीज ह्या परकीय प्रवाशाने भारतातील आपल्या वास्तव्यात (इ.स.पू. ३०२ ते २९८) इथल्या शेतीचा गौरवाने उल्लेख केला आहे.

**स्मृतिकाल:**

इ.स.पू. २०० ते ५०० वर्षापर्यंतचा हा काळ. स्मृति ग्रंथांमध्ये शेती विषयक कायदे, राजा-वैश्य वगैरेंनी घ्यावयाची शेती विषयक जबाबदारी याबद्दल सविस्तर माहिती सापडते. चरक व सुश्रुत संहितांमध्ये निरनिराळया वनस्पती व त्यांचे गुणधर्म यांचे वर्णन केलेले आहे. पराशर ऋषींनी कृषी पराशर या ग्रंथात वनस्पति शास्त्रा बद्दल सविस्तर चर्चा केली आहे. शिवाय भाताची लागवड, उत्तम शेती कशी करावी, हवामानाचा अंदाज, शेतीची अवजारे, जनावरांची निगा, खते तयार करण्याची पद्धत वगैरे विषयांसंबंधी विवेचन ही केले आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**बराह मिहिरः**

यांनी आपल्या बृहत् संहिता या ग्रंथातील वृक्षायुर्वेद या अध्यायात लागवडी पूर्वीची मशागत, पिकांची फेर पालट, बीवड करण्याची क्रिया, तिच्यासाठी वापरावयाची पिके, वृक्षारोपण इ. विषयांचे सविस्तर वर्णन केलेले आहे. गुप्त काळातील (इ.स. ३२१ ते ५५०) शेती विषयक उल्लेख तत्कालीन वाङ्मय व परकीय प्रवासी यांच्या वर्णनांमधून येतात. त्यामुळे याकाळी भारतातील शेती प्रगती पथावर होती, यात शंका नाही.

**ह्यू एन त्संग:**

(इ.स.६०० ते ६६४) या चिनी प्रवाशाने केलेल्या सविस्तर वर्णना वरून हर्षाच्या काळात (इ.स.६०६ ते ६४७) वैश्यांकडून उत्तम प्रकारे शती केली जात असल्याचे दिसून येते. मोठ्या नद्यां मधून पाट काढून किंवा तळी बांधून शेतीला पाणी पुरविण्याची व्यवस्था होती. त्याकाळात राज्यकर्ते मोठ मोठी धरणे बांधीत. भारतात सुमारे १० ते १७ व्या शतकांच्या दरम्यान उत्तरेला चंदेल, परमार इ. राजांनी अनेक तलाव बांधून कृषी विकासाला चालना दिली तर दक्षिणेला चोल, पांड्य तसेच विजयानगरच्या साम्राज्यात, मराठ्यांच्या काळात महाराष्ट्रात आणि कर्नाटकात शेती विषयक अनेक जलसिंचन योजनांद्वारे सुधारणा झालेल्या होत्या, हे तत्कालीन कागदपत्रे व परकीय प्रवाशांची वर्णने यांवरून दृष्टोत्पत्तीस येते.

**सध्या काळातील शेतीचा विकासः**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतात कृषी विकास झपाट्याने होत गेला. पंचवार्षिक योजनांमध्ये भारतीय कृषी व्यवसायास प्राधान्य दिले गेले. नवनवीन योजनांच्या माध्यमातून अन्नधान्य उत्पादनात वाढ करणे व तसेच संपूर्ण कृषी क्षेत्राचा विकास करणे अत्यावश्यक होते. यासाठी संकरित व सुधारित बी बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, सिंचनाच्या पद्धती, यांत्रिकीकरण, कृषी संशोधन व भूसंवर्धन अशा अनेक आधुनिक घटकांच्या माध्यमातून कृषी विकास घडवून येण्यासाठी प्रयत्न केले गेले. भारतामध्ये कृषी विकास होण्यासाठी हरितक्रांती, श्वेतक्रांती, प्रीतक्रांती, निळीक्रांती, उती संवर्धन, हरितगृहे, आधुनिक जलसिंचन पद्धती इत्यादी घटकांचे योगदान महत्त्वपूर्ण समजले जाते.

**हरित क्रांती:**

स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भारताने उपलब्ध साधन संपत्तीच्या विकासासाठी पंचवार्षिक योजना राबविण्यात सुरुवात केली 1950 1960 चा दशकात भारतात कृषी उत्पादन खूपच कमी होते. लोकसंख्या मात्र झपाट्याने वाढत होती. वाढत्या लोकसंख्येला पुरेल इतके अन्नधान्य उत्पादन होत नव्हते. दरवर्षी अन्नधान्याची आयात करावी लागत होती. याचा अर्थव्यवस्थेवर ताण पडू लागला. म्हणून अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता प्राप्त करण्यासाठी भारतीय कृषीतज्ञांनी अथक परिश्रम घेतले डॉक्टर एम. एस. स्वामीनाथन यांनी त्यांच्या प्रयत्नातून कृषी उत्पादन वाढीचा प्रयोग यशस्वी करून दाखवला म्हणूनच त्यांना भारतीय हरित क्रांतीचे जनक मानले जाते.

संपूर्ण भारतात शेती व्यवसायावर हरित क्रांतीचा प्रभाव जाणवतो. हरित क्रांतीमुळे शेती व्यवसायात अमुलाग्र परिवर्तन होऊन शेतीचा विकास झपाट्याने होत गेला. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन वाढवून त्यांच्या जीवनस्तर उंचावण्यास मदत झाली परिणामी अन्नधान्य उत्पादनात खूप मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. गहू, तांदूळ, मका, ज्वारी, बाजरी व कडधान्य इत्यादीचे उत्पादन खूप वाढले इसवीसन 1950-1951 मध्ये एकूण अन्नधान्य उत्पादन 50.8 दशलक्ष टन होते. हरितक्रांती मुळे ते 1970-1971 मध्ये 108.4 दशलक्ष टन इतके झाले आणि 1990-1991 मध्ये 176 दशलक्ष टन इतके झाले तर 2003-2004 मध्ये त्यात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन 210.7 दशलक्ष पर्यंत पोहोचले. म्हणजेच हरितक्रांतीमुळे एकूण अन्नधान्य उत्पादनात चारपटीने वाढ झाली व भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला इतकेच नव्हे तर आपला देश अन्नधान्याची काही प्रमाणात निर्यात करू लागला.

स्वातंत्र्या पूर्वी भारताचा कृषी वृद्धीदर 0.3% होता हरित क्रांतीमुळे त्यात दहापटीने वाढ होऊन 3% पर्यंत पोहोचला. कारण स्वातंत्र्यानंतर नवीन कृषी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. जमीन सुधारणा व कृषीमालाच्या किमती संदर्भातील धोरण सार्वजनिक वितरण व्यवस्था या शेतीशी संबंधित अशा गोष्टींमध्ये खूप सुधारणा झाल्या.

**निष्कर्ष:**

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

प्राचीन काळातील शाश्वत शेती ही स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर असल्याचे दिसून येते. प्राचीन काळातील शेतीचा निर्यातील वाटा कमी असला तरी स्थानिक लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी सक्षम असल्याचे दिसून येते. प्राचीन भारतीय शेतीमध्ये उत्पादनात वाढ करण्याच्या उद्देशाने हवामानाचा अभ्यास केला जात होता. प्राचीन काळातील लोकसंख्या व सध्याची लोकसंख्या यातून शेतीवर ताण पडत असल्याचे दिसून येते तसेच बदलणाऱ्या हवामानाचा देखील शेतीवर परिणाम झालेला दिसून येतो. आज 21 व्या शतकामध्ये शेतीमध्ये अनेक अमुलाग्र बदल झालेले आहेत पीक पद्धती पिकांचे स्वरूप यामध्ये हे बदल पहावयास मिळतात. शेती व्यवसाय हा सुरुवातीला उदरनिर्वाह स्वरूपाचा होता. तर तो आज व्यापारी स्वरूपाचा झालेला आहे. भारतामध्ये बदलणाऱ्या हवामानानुसार शेतामध्ये वेगवेगळे पिके घेतले जात आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय बाजार पेठेत देखील शेतीतून निर्यात केली जात आहे. असे निष्कर्ष या शोध निबंधातून काढण्यात आले.

**संदर्भ:-**

1. Hussain, Majid (1994): Human Geography, Rawat Publications, Jaipur.
2. डॉ. शंकरराव शेटे (2003),'हवामानशास्त्र व सागर विज्ञान' अभिजीत पब्लिकेशन, लातूर.
3. डॉ. विठ्ठल घारपुरे (2008) 'हवामानशास्त्र' पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.
4. डॉ. हरिभाऊ रेडे (2011) 'हवामानशास्त्र' अरुणा प्रकाशन, लातूर.
5. Darrel Hess (2014), 'Mcknight's Physical Geography, Pearson Education, New Jersey.
6. Jones, Emrys & Eyles, John (1977): An Introduction to social Geography, Oxford University
7. Press, Oxford.
8. Symons L.: Agricultural Geography
9. Rostow, W. W. : The Stages of Economic Growth
10. Singh J. and Dhillon S.S.:Agricultural Geography
11. Wheeler, J.O: Economic Geography
12. Robertson, D.: Globalization and Environment.

# Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# मराठी कवितेत सामाजिक-सांस्कृतिक संदर्भातून प्रकटणारे मातृत्व आणि पितृत्वाचे स्वरूप.

**डॉ. संजय जनार्दन आगलावे**
प्राध्यापक ( मराठी विभाग )जे.डी.पाटील सांगळूदकर महाविद्यालय,दर्यापूर जिल्हा अमरावती
**Email:-** aglawesanjaysir@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-1705021
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 89-93
May 2025
**Submitted:** 10 Apr. 2025
**Revised:** 22 Apr. 2025
**Accepted:** 21 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांष** :

आई,वडील हे कुटुंब व्यवस्थेतील आधार स्तंभ मानले जातात, त्यातल्यात्यात भारतीय समाज व्यवस्थेत कुटुंब व्यवस्थेला पर्याय नाही,सर्व ऋण फेडता येतात पण मातृऋण,पितृऋण याची कधीही उतराई करता येत नाही मराठी साहित्यात आईला आणि वडिलांनवर लिहलेले साहित्य मोठ्या प्रमाणावर आढळते, अर्वाचीन मराठी साहित्यात ‘आई’ विषयावर आधारित कविता प्रसिद्ध कविंनी लिहलेल्या आहेत, त्यामानाने वडील म्हणजेच बाप हा दुलक्षीत राहीलेला आहे, कविता काय,पण ईतर साहित्य प्रकारामध्ये तो अभावानेच येतो, श्यामची आई मध्ये वडील येतात,पण ते आईच्या अनुषंगाने, या तुलनेत दलित आत्मचरित्रात बाप मोठ्या प्रमाणात येतांना दिसतो, किंवा आनंद यादवांच्या झोंबी मध्ये सुद्धा येतो,पण बऱ्याचशा वेळी तो कुटुंबातील सदस्यांना मुख्यतः आईला मारझोड करणारा,व्यसनाच्या आहारी गेलेला बाप दिसतो याला अपवाद सुद्धा आहे उदा.डॉ. नरेंद्र जाधव यांचे आत्मचरित्र’ आमचा बाप आणि आम्ही’ या मधील बाप कुटुंबातील सदस्यांची काळजी घेणारा आहे, आपल्या मुलांची चांगले नागरिक बनावे चांगले शिक्षण घ्यावे म्हणून धडपड करणारा आहे, आधुनिक आणि चांगल्या विचारांचे स्वागत करणारा,खुप शिकलेला नसला तरी विचारांची बैठक पक्की आहे, अनुभवाच्या विद्यापीठातील ज्ञान प्राप्त केलेला आहे, मुलांना घडविण्यात त्याची मोठी भूमिका आहे

आई, वडिल यांच्या वर आधारलेल्या कवितांचा विचार करतांना वडिल आणि मुलगी हे नातं खुप महत्वाचे आहे, एरवी कठोर वाटणारा बाप मुलीच्या बाबतीत खुप हळवा असतो,मुलीच दु:ख तो बघु शकत नाही,तीच्या डोळयातील अश्रू त्याला बघवत नाही या अनुषंगाने कवी ‘बी’यांची ‘माझी कन्या’ या कवितेत वडिल-मुलीच्या नात्याचे विलक्षण रूप कवितेच्या प्रत्येक ओळींतून प्रकट होते. हा संवाद फक्त शब्दांचा नाही, तर पित्याच्या अंतःकरणातून उमटलेल्या भावना आणि मुलीच्या निरागसतेचा उत्कट आविष्कार आहे. या कवितेतून पित्याच्या प्रेमाची, त्याच्या मृदुतेची, आणि तळमळीतून ओतप्रोत असलेल्या भावनेची गाथा उलगडत जाते.

गाई पाण्यावर काय म्हणुनि आल्या!

का ग गंगायमुनाहि या मिळाल्या ! आपल्या मुलीला रडतांना बघुन वडिलांना दु:ख होते तीला कोण? बोलले हा प्रश्न विचारतात, तिच्या नाकातून

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. संजय जनार्दन आगलावे प्राध्यापक ( मराठी विभाग )जे.डी.पाटील सांगळूदकर महाविद्यालय,दर्यापूर जिल्हा अमरावती*

**How to cite this article:**
*आगलावे, . संजय. जनार्दन. (2025). मराठी कवितेत सामाजिक-सांस्कृतिक संदर्भातून प्रकटणारे मातृत्व आणि पितृत्वाचे स्वरूप. Journal of Research & Development, 17(5(II)), 89–93.*
*https://doi.org/10.5281/zenodo.15820481*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15820481

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

वाहणाऱ्या उष्ण वाऱ्यामुळे जणू काश्मीरातील गुलाबाला सुकवित आहे, जणू नंदनवन हलवीत आहे, आपल्या
गरीब मुलीला बघुन कुठल्यातरी मुलीने
तिच्या दारिद्र्याची चेष्टा उडविताना म्हटले ‘अहा!आली पहा, भिकारीण!’आपल्या मुलीला समजावून सांगताना नाना प्रकारची उदाहरणे हा बाप देतो दरिद्री असला तरि मुलीला चांगले संस्कार देण्यासाठी तो धडपडतो धडपडत,रत्ने,मोती मातीत जन्माला येतात म्हणून त्याचे महत्त्व कमी होत नाही, मोठ मोठे राजेरजवाडे ती आपल्या जवळ बाळगतात, कमळ जरी चिखलात उगवत तरी बसंतात त्याचे महत्त्व असते

पंकसंपर्के कमळ का भिकारी!

धूलिसंसगे रत्न का भिकारी!

सूत्रसंगे सुमहार का भिकारी!

कशी तुम्ही मग मजमुळे भिकारी!

"गाई पाण्यावर काय म्हणुनि आल्या! का ग गंगायमुनाहि या मिळाल्या!" अशा काव्यात्मक प्रतीके वापरताना कवी बी यांनी गंगायमुना आणि काश्मीरमधील गुलाब यांच्या उपमांचा उपयोग करून मुलीचे सौंदर्य आणि तिच्या हळुवार भावनांचे प्रतिबिंबण केले आहे. मुलगी गरीब असली, तरी तिच्या आतमध्ये असलेले असंख्य गुण तिच्या अंत:करणाला तेज देतात, तिच्या मुखमंडलाचे तेज तिच्या निरागसतेला विलोभनीय बनवते.

वडील आपल्या मुलीला समजावण्यासाठी म्हणतात की, "रत्ने, मोती मातीत जन्माला येतात, त्यांचे मूल्य कमी होत नाही." पंकसंपकात जन्मलेले कमळ जसे चिखलात असूनही पवित्र राहते, तसेच दरिद्री असूनही आपले गुण कायम आहेत, असा विश्वास त्यांना मुलीमध्ये पेरायचा आहे. हे शब्द फक्त एका पित्याच्या धीराने सांगितलेले नाहीत, तर एक निर्धार व्यक्त करतात, की त्याच्या मुलीचे मूल्यमापन तिच्या परिस्थितीवरून होऊ नये.

या संवादात वडील मुलीला प्रेमाने समजावतात, तिच्या निरागसतेचे कौतुक करतात, तिच्या सौंदर्याची स्तुती करतात. "लाट उसळून जळी खळ पडावे, अशी खळी तुझ्या गालावर पडून तुझे लावण्य वर येते" या ओळींमधून मुलीच्या गालावर असलेल्या खळीचे वर्णन केले आहे. मुलीचे रडणे थांबवण्यासाठी वडिल परमेश्वराच्या गावाला जावू, असे म्हणतात, त्यावर मुलगी म्हणते, "मलाही न्यायला हवे," यामध्ये तिचे निरागसपण अगदी जिवंतपणे प्रकट होते.

ही कविता वाचताना डोळयांत नकळत अश्रू येतात. त्यातल्या त्यात, जर आपण मुलीचे वडील असाल, तर वडिलांच्या मनातील दु:ख आपल्या हृदयात खोलवर रुजते. वडिलांच्या हृदयाची हळवळ, मुलीचा निरागस स्वभाव, आणि त्यांच्या संवादातून व्यक्त होणारी वात्सल्यपूर्ण गाथा वाचकाच्या मनावर खोलवर ठसा उमटवते.

‘लावते मी निरांजन’ हे गीत म्हणजे बाळ कोल्हटकर यांच्या हृदयस्पर्शी लेखणीतून उतरलेली एक विलक्षण भावकविता आणि माणिक वर्मा यांच्या सुरेल आवाजात अजरामर झालेली गाथा आहे.

दिवाळीत धनत्रयोदशीच्या दिवशी, आपल्या माहेरच्या आठवणीत हरवलेली एक मुलगी तुळशीच्या साक्षीने निरांजन लावताना मनातल्या अनाहत वेदनांना कवितेच्या ओळींतून मुक्त करते. आईची आठवण म्हणजे
मराठी कवितेत सामाजिक- सांस्कृतिक तून प्रगटणारे
मुलीसाठी तिच्या माहेराशी जुळणारा एक हळुवार धागा असतो. आपल्या सुख-दुःखाचे, हळव्या क्षणांचे पहिले सोबती असलेल्या आईची आठवण दिवाळीच्या पहाटेला तिच्या मनात नव्याने जागवते.

‘लाविते मी निरांजन तुळशीच्या
पायापाशी
भाग्य होऊनिया आली आज
धनत्रयोदशी।’

घराघरात दिवाळीचा सण साजरा होतो आहे. आई मुलांना उठवते, दारात दिव्यांच्या माळा लागल्या आहेत. परंतु सासरी गेलेल्या या मुलीसाठी दिवाळीचा हा गोडवा आई शिवाय अपूर्णच आहे. त्या रम्य पहाटेची शिरशिरी तिच्या अंगाला झोंबते, आईच्या

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

मायेचा उबारा मिळत नसल्याची उणीव ती तीव्रतेने अनुभवते. ही वेदना फक्त शारीरिक थंडीची नाही, तर आईच्या उबदार अस्तित्वाची न जाणवणारी शीतलता तिच्या अंतःकरणाला ठणकावते आहे.

'आज झोंबतो अंगाला पहाटेचा थंड वारा
कुठे मिळेल का आई तुझ्या मायेचा उबारा।'

आई नसल्याने घर सुने सुने वाटते, माहेरचे अंगण, पारिजातकाचे झाड, अंगणातली रंगीत रांगोळी - सर्वच गोष्टींच्या आठवणींनी तिच्या मनातल्या विरहाची आग अधिक तीव्र होते. आईच्या पायाशी घोटाळणारे तिचे मन, अंगणातील पारिजातकाच्या फुलांचा गंध, दारात बसलेला कावळा, हे सारे तिला पुन्हा आपल्या माहेराशी बांधून ठेवतात. कवी कोल्हटकर यांनी या गीतात मुलीच्या हृदयातील तगमग, हुरहुर, आणि आठवणींची कोमलता प्रभावी शब्दकळेतून मांडली आहे.

आईची माया म्हणजे मुलीसाठी एक अनमोल उब असते. जी तिच्या नसलेल्या क्षणांमध्ये तिच्या अस्तित्वाची जाणीव करुन देते. या गाण्यात आईच्या आठवणीने मुलीचे अस्वस्थ मन, तीव्र विरह, आणि माहेरच्या आठवणींनी न्हालेलं तिचं कोवळं अंतःकरण मनाला हलवून सोडतं. या प्रत्येक ओळीतून स्त्रीच्या अंतःकरणातील कर्तव्य आणि भावना यांच्या कोमलतेचा प्रत्यय येतो.`लावते मी निरांजन' हे गीत म्हणजे प्रत्येकाच्या आयुष्यातल्या आईसारख्या अमूल्य व्यक्तीचे अस्तित्व साजरे करणारा एक शब्दचित्र आहे, ज्यामध्ये कवीने मुलीच्या हळव्या मनाच्या खिडक्या रसिकांसाठी उघडून दिल्या आहेत

`देणं` ही जयराम खेडेकर यांची कविता आई आणि मुलगी यांच्या नात्याचा गहिरा, हृदयस्पर्शी अनुभव आहे. ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी या कवितेत ठळकपणे आहे, जणू ती मातीचं सौंदर्य आणि दुःख एकत्र गुंफल्यासारखं वाटतं. यातून एकेकाळी आईला लाभलेल्या संस्काराची शिदोरी मुलीच्या पदरात जाताना दिसते, जणू एक पिढी दुसऱ्या पिढीकडे आपलं सर्वस्व प्रेमाने, ममतेने देत आहे.दुष्काळाच्या तीव्रतेत जीवनाची संघर्षमय कहाणी उलगडत असताना, कवीने आपल्या ग्रामीण संस्कृतीतील त्या अव्यक्त दुःखांना शब्दांमध्ये पकडले आहे.

'जीव जाळी दुष्काळात
घरसंसारातून मेटाकुटीला येते तेव्हा
वेळावक्ताला मागायचे आपल्याला
म्हणून सोबत रिकामे पोते।

मुलगी तिच्या सासरी स्थिरावलेली असते, पण संकटं सातत्याने दरवाजे ठोठावत असतात. जबाबदाऱ्या आणि अडचणींमध्ये तिचं अस्तित्व कोमेजून जातं, आणि या असह्य जिव्हाळयाच्या प्रसंगात तिला माहेरचा आधार लागतो. रिकाम्या पोत्याच्या प्रतीकातून तिचं माहेरी येणं सांगितलं आहे - जणू आईकडून काहीतरी घेऊनच परत जायचं असतं. हा केवळ वस्त्रात बांधलेला शिधा नाही, तर पिढ्यांनपिढ्या एकत्र जुळलेले प्रेम, श्रद्धा, आणि काळजीचं बंधन आहे.

आईची सुनेशी झालेली तात्पुरती खदखद तिच्या मनाचा उद्रेक आहे; अन्नानं तुटणाऱ्या संसारात दोन भाकरींचं ओझंही जड झालं आहे. पण त्याच वेळी, हृदयात अजूनही मुलीवरचं असीम प्रेम आहे. आईच्या दयाळू नजरेतून तिचं हृदय स्वच्छ दिसतं, जे मुलीला समजावून घेतं आणि तिच्या त्रासाचे पाझर सुकवून टाकतं. मुलगी जाताना, आईकडून देण्याची परंपरा सुरू राहते - ती तिच्या पदरात आंब्याची कोय बांधून देते. हा आंब्याचा बियाणाच नाही, तर मातृत्वाचं एक अनोखं रूप आहे - एक प्रतिज्ञा की तिचं प्रेम आणि संस्कार पिढ्यानपिढ्या अखंड चालत राहतील.

मुलगी परतताना या कोयीला जणू आईचं आशीर्वाद म्हणून पाहते. या अनमोल भेटीत आईच्या प्रेमाचा ठेवा, काळजाच्या तळाशी साठवलेला विश्वास आणि त्या आई-मुलीच्या नात्याचा अजोड गोडवा आहे. कधीतरी मुलगी तिच्या मुलांसाठी हेच आंब्याचं झाड फुलवेल, आणि एक दिवस त्यांना आईसारखंच संस्काराचं "देणं" मिळेल.

"घाल घाल पिंगा वारा" ही कृ. ब. निकुंब यांची कविता आईच्या ओढीनं अस्वस्थ झालेल्या लेकीचं सजीव चित्रण करते.

घाल घाल पिंगा वाऱ्या,माझ्या परसात
माहेरी जा सुवासाची कर बरसाद !

आपल्या माहेरच्या अंगणात पाऊल ठेवण्यासाठी ती वाऱ्याला आर्त साद घालते – "घाल घाल पिंगा वाऱ्या, माझ्या परसात, माहेरी जा सुवासाची कर बरसाद!" यामध्ये माहेरच्या अनामिक ओढीचं, त्यागाचं, आणि लडिवाळ भावनांचं गुंफण आहे. जुन्या काळात माहेराशी

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

संपर्क तुटला की तो खूपच दूरवर गेला, फोन वा इतर साधने नव्हती, आणि वरचेवर माहेरी येणं शक्यही नव्हतं. यामुळे, सासरी गेलेल्या मुलीचं माहेर फक्त आठवणींचा ठेवा बनून राहायचं, तिच्या मनाला आधार देणारं आणि जिव्हाळ्याचं ममतेचं माहेर. तुळशीला दिवा लावताना, वाऱ्याच्या सळसळत्या सुसाट वेगातून तीला माहेरचा स्पर्श होतो. जणू माहेरच्या ओलाव्यातून वारा तिला आपल्या आईच्या मायेची आणि भाऊबंदांच्या लाडाची जाणीव करून देतो. 'आनंदी आहे' हे कळवायची तिची तीव्र इच्छा आहे, पण कुठलाही माध्यम नाही; म्हणून ती त्या वाऱ्याला मागणी करते – "जा, माहेरी जा, सांग तुझ्या मुलीचं सुख सासरी आहे." तिची ही कातर भावना वाऱ्यात बंधू होऊन उडून जाते, आईच्या कानात सांगणारी, गोड मिठासारखी तिच्या ओठांवर विरघळणारी.

आईच्या आठवणी आणि त्यांचं भेटण्याचं स्वप्न तिच्या मनात सातत्यानं रुंजी घालतंय. लग्न होऊन एक वर्ष झालंय; तिचं मन या काळातलं एक एक क्षण जपून ठेवलंय. परसातलं परिजातकाचं फुलणं, काळया कपिलेची बेजारी करणारी लडिवाळ खोड, आईच्या हातावरची साय धरलेली दूधाची भांडी – या सगळया आठवणींनी तिचं मन गलबलून येतं. माहेरच्या ओलाव्याचं गूढ प्रेम आणि आईच्या काळजाचा नाजूक हात आपल्या वाट्याला मिळवण्यासाठी ती आतुरतेने साद घालते. काळया कपिलेनं हुंगून बेजार करणारी आठवण, परसातल्या ताज्या परिजातकांच्या सुवासासारखी तिच्या हृदयात दरवळत राहते. आईच्या मायेची पानोपानी ओतलेली भावना तिच्या डोळयात अश्रूंच्या ओल्या धारांतून झरते.

`घाल घाल पिंगा वारा` या गाण्याच्या ओळींमध्ये ती लेक सजीव होतं, त्याचं गाणं तिच्या काळजात गडबडून येतं. आईच्या भेटीसाठी आसुसलेल्या, आणि माहेरच्या आठवणीत ओथंबलेल्या मुलीच्या भावनेची या कवितेतून अशी ओल जाणवते, जणू तिचं मन त्या सुगंधी वाऱ्याशी स्वतःच्या अंतःकरणाच्या थेंबांतून जोडतं. सुमन कल्याणपूर यांच्या स्वरांनी हे गाणं जीवनाच्या नाजूक पण प्रभावी भावनांना एक मखमली पांघरूण दिलं आहे..

अलिकडच्या काळातील शेतकरी बापाचे चित्रण करणारी 'बाप वावरं पेरते' ही श्याम ठक यांची कविता महत्वाची आहे,

'पायी पायी जमवून
बाप वावरं पेरते
काया काया मातीतुन
दाना दाना अंकुरते.

शेतकरी बापाचे जीवन हे कष्टमय असते, त्याची कामे सतत चालत असतात,डवरुन,निंदणी करून तो तण दुर करतो,आपल्या कुटुंबातील सदस्यांचे उदरभरण आणि दिवाळी सारखा सण साजरा करण्याचे स्वप्न बघतो,पण निसर्ग साथ देत नाही, पेरणी झाल्यावर पाऊस येत नाही, त्यामुळे त्यांच्या जीवाला घोर लागतो, वडिलांना हिम्मत देण्याचे काम आई करते, अशा परिस्थितीमध्ये सुद्धा बाप नित्यनेमाने पेरणी करतो, मोठ्या कष्टाने पीक घरात येते,मात्र पिकाला भाव येत नाही, देणं वाढत जाते, दरवर्षी कर्ज काढून पेरणी करावी लागते, कष्टकरी शेतकरी बापाचे चित्रण या कवितेत आले आहे.

कवी ग्रेस यांची आई कविता आई विषयावरील इतर कवितेच्या तुलनेत वेगळी आहे, आई गेल्यानंतर त्यांच्या भावविश्वावर झालेला परिणाम व्यक्त झाला आहे,

' ती गेली तेव्हा रिमझिम
पाऊस निनादत होता
मेघात मिसळली किरणे
हा सूर्य सोडवत होता.

सूर्य अस्ताला जात होता,एरवी संध्याकाळ म्हणजे आनंदाची वेळ दिवे लावण्याची वेळ परंतु कवीच्या जीवनात संध्याकाळ म्हणजे दु:खाची जाणीव अधीक तीव्र करणारी आहे,पोरकेपणाची जाणीव करून देणारी आहे शब्दातून अर्थ निर्माण व्हावा, किंवा अर्थातुन शब्द वगळला जावा अशी संध्याकाळ कवीच्या दारात येउन थबकली होती दु:खाची प्रखर जाणीव कवीला झाली होती. ती आई होती म्हणून घनव्याकुळ होऊन तो रडला, त्यावेळी वारा सुद्धा सावधपणे म्हणजे संयमाने पाचोळा उडवत होता,

'अंगणात गमले मजला
संपले बालपण माझे
खिडकीवर धुरकट तेव्हा
कंदील एकटा होता'

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

मुलगा कितीही मोठा असला तरी आईसाठी तो लहानच असतो, त्यामुळेच आई गेल्यावर बालपण संपल्याची जाणीव त्याला झाली, खिडकीवर असलेल्या कंदिलाच्या प्रतिमेतून त्यांच्या एकटेपणाची जाणीव अधीकच तीव्र होतांना दिसते. दु:ख कितीही मोठे असले तरी कालांतराने त्याची तीव्रता कमी होते आज पहिले सारखं त्याला गहिवरून येतं नाही,मुलगा कितीही मोठा असला तरी आईसमोर तो लहानच असतो हे वास्तव कवितेतून व्यक्त झाले आहे.

`आईकरिता शोक` ही केशवसुतांची कविता, आईच्या अनुपस्थितीने कवीच्या जीवनावर झालेल्या अमीट प्रभावाची करुण आणि ममतेची अनुभूती देणारी आहे. आईची एकदाही भेट न झाल्याने मनात सतत दाटून आलेलं शून्य, त्या आठवणींनी ओथंबलेला हळवा स्पर्श या कवितेतून प्रकट झाला आहे.

`अंतले पाय तुझे हाय माते, मागे तव दर्शन मजलागुनी जहाले, तद्नंतर लोटूनिंया दिवस फार गेले` या ओळीतून केशवसुतांनी कधीच न संपणारं, मनातल्या मनीं साठून राहिलेलं आईचं अंतर उलगडलं आहे. आईच्या पायांचं अंतिम दर्शनही न होण्याची खंत कवीच्या मनाच्या तळाशी दाटून राहिली आहे. तीचं पुन्हा दर्शन घडण्याचं भाग्य लाभणार नाही ही दुःखद जाणीव त्यांच्या अंतरंगात व्रणासारखी खोलवर कोरली गेली आहे.

वडिलांच्या जाण्यानंतर मुलांच्या सगळया चिंता, काळजी, माया असं सर्वस्व उरलेलं आईचं एक दैवत आता नाही, ही जाणीव त्यांच्या अंतःकरणात मर्मभेदी वेदना निर्माण करते. "पोटी नुरले कोणी प्रेम करायां" या शब्दांतून आईच्या मायेचं सर्वस्व हरवल्याची हृदयद्रावक अनुभूती दिसते, कारण जगात आईसारखं स्नेहाचं, काळजीचं, ममतायुक्त प्रेम कुठेच मिळणार नाही, असा धक्कादायक सत्याचा स्वीकार त्यांना करावा लागतो. त्यांना खंत वाटते, आपण आईला किती कष्ट दिले, तिच्या निःस्वार्थ प्रेमाला आपण परतफेड करू शकलो नाही,असं तीळतीळ जळणारं अपराधभाव त्यांना गहिवरून टाकतं. "अंतले पाय तुझे हाय माते" या शब्दांतून आईच्या चरणांना पुन्हा एकदा स्पर्श करू न शकण्याची वेदना त्यांच्या हृदयात चिरंतन राहते.

ही कविता म्हणजे केवळ आईविना राहिलेल्या मुलाचं दुःख नाही; तर ती त्याच्या जीवनातल्या मातृत्वाच्या निर्भेळ प्रेमाची ओढ, जगाच्या कठोरतेत हरवलेलं एक नाजूक पण नितांत मोलाचं सत्य आहे. आईच्या ओढीचा, तिच्या आठवणींचा, आणि त्या गहिऱ्या विरहाचा गुंफलेला आविष्कार म्हणजे ही कवीची श्रद्धांजली आहे, जणू तीचं अंतिम दर्शन घडवणारं, कधीही न विरणारं प्रेमाचं प्रतिक आहे.

मराठी साहित्यात आई आणि वडील यांच्या वरील काही निवडक कवितांचा आढावा या लेखाच्या निमित्ताने घेतलेला आहे, भारतीय हा कुटुंबवत्सल म्हणून ओळखला जातो, मुलगा कितीही मोठा झाला तरी आई, वडिलांना तो लहानच वाटतो, मुलांना सुद्धा तो कितीही मोठे झाले तरी आई वडिलांची सोबत पाहिजे असते, त्यामुळेच मराठी साहित्यात अनेक ठिकाणी त्यांचे संदर्भ येतात विशेषतः मराठी कवितेतून त्यांच्या संदर्भातील भावना व्यक्त होतांना दिसतात.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) समग्र केशसुत :- संपादक, प्रा.भ.श्री.पंडित, व्हिनस प्रकाशन, पुणे.
2) आजची मराठी कविता :- संपादक- प्रा.वसंत बापट,चारुशीला गुप्ते, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे
3) अर्वाचीन मराठी काव्यदर्शन- डॉ. अक्षयकुमार काळे, श्री. ना. बनहट्टी,प्रकाशन नागपूर १९९९.
4) स्वातंत्र्योत्तर मराठी कविता :- संपादक-तु.शं. कुळकर्णी, साहित्य अकादमी २००८.
5) त्रिदल :- संपादक- डॉ. स्नेहल तावरे, डॉ. दत्तात्रय पुंडे,स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
6) मराठी कविता आणि आधुनिकता- डॉ. यशवंत मनोहर, धम्म प्रकाशन, नागपूर.
7) संकल्प भाग ३ :- संपादक: डॉ.एस.एम.कानडजे,प्रा.ए.आर.सिरसाट,पैनगंगा प्रकाशन, बुलढाणा,२००५.
8) बेबसाईट :- https://balbharatikavita.blogspot.com/2018/06/blog-post_16.html?m=1

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# हरित तंत्रज्ञान आणि पुनर्नवीनीकरण उर्जा

**ज्ञानेश्वर बापूराव जांभुळे**
सहाय्य कपक,अर्थशास्त्र विभाग, गोखले सोसायटीचे .टी.के.टोपे,
रात्र महाविद्यालय परळ,मुंबई-१२
**Email:** db1980j@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-1705022
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 5(II)|
Pp. 94-97
May 2025

**Submitted:** 10 Apr. 2025
**Revised:** 22 Apr. 2025
**Accepted:** 21 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश**

हरित तंत्रज्ञान (Green Technology) म्हणजेच पर्यावरणाच्या रक्षणासाठी, नैसर्गिक संसाधनांच्या बचतीसाठी आणि प्रदूषण कमी करण्यासाठी विकसित केलेले तंत्रज्ञान होय. या तंत्रज्ञानांचा वापर करून ऊर्जा, पाणी, कचरा व्यवस्थापन, शेती आणि बांधकाम क्षेत्रात सुधारणा केली जाते. पुनर्नवीनीकरण ऊर्जा प्रणालींपासून ते शाश्वत शेती पद्धतींपर्यंत, हरित तंत्रज्ञान विविध उद्योगांमध्ये शिरकाव करत आहे आणि जगाला अधिक शाश्वत भविष्याकडे नेण्याची क्षमता यामध्ये आहे. हरित तंत्रज्ञान म्हणजे पर्यावरणाच्या हानीपासून संरक्षण करण्यासाठी आणि शाश्वततेसाठी विकसित केलेली नवकल्पना होय. ऊर्जा, वायुमंडलीय विज्ञान, संसाधन विज्ञान आणि जलशास्त्र या विज्ञान शाखांचे एकत्रित रूप आहे. हरित तंत्रज्ञानाला सतत तंत्रज्ञान' किंवा पर्यावरणीय तंत्रज्ञान असेही म्हटले जाते,जे पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि नैतिक संसाधनांच्या वापरासाठी विकसित केलेले तंत्रज्ञान आहे. याचा मुख्य उद्देश म्हणजे नैसर्गिक संसाधनांचा वापर कमी करणे, ऊर्जा कार्यक्षमता वाढवणे आणि प्रदूषण कमी करणे आहे.

**प्रस्तावना**

हरित तंत्रज्ञान (Green Technology)ज्याला "Green Tech" असेही म्हणतात, हा एक वेगाने वाढणारा क्षेत्र आहे जो पर्यावरणाला होणारे नुकसान कमी करण्यासाठी आणि शाश्वत जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी उपाययोजना विकसित करतो आणि वापरतो. हवामान बदल, संसाधनांची कमतरता आणि प्रदूषण यांसारख्या समस्या जेव्हा जगासमोर निर्माण होतात तेव्हा ही तंत्रज्ञानात्मक नवकल्पना आणि पर्यावरणपूरक उपाययोजना यांची एक आशादायक दिशा आहे. आजच्या युगात, हरित तंत्रज्ञान आणि नूतनीकरणक्षम ऊर्जा हे पर्यावरणीय टिकाव, सामाजिक समावेश आणि आर्थिक विकास यांचे मुख्य आधार बनले आहेत. या तंत्रज्ञानांचा वापर केवळ प्रदूषण कमी करण्यासाठीच नाही, तर दीर्घकालीन विकासासाठीही अत्यंत आवश्यक ठरतो. हरित तंत्रज्ञानाची सुरुवात २० व्या शतकातील पर्यावरण चळवळींपासून झाली, जी औद्योगिकीकरणामुळे पृथ्वीवर होणाऱ्या विपरीत परिणामांमुळे उद्भवली. १९७० च्या दशकातील तेल संकटांमुळे पर्यायी ऊर्जा स्रोतांचा विचार सुरू झाला. क्योटो प्रोटोकॉल (१९९७) आणि पॅरिस करार (२०१५) यांसारखे जागतिक करार हे दर्शवतात की हरितगृह वायूंवर नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक आहे, आणि त्यामुळे हरित तंत्रज्ञानाचा विकास गतीने व्हावा, ही आज जागतिक गरज बनली आहे.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*ज्ञानेश्वर बापूराव जांभुळे सहाय्य कपक,अर्थशास्त्र विभाग, गोखले सोसायटीचे .टी.के.टोपे रात्र महाविद्यालय परळ,मुंबई-१२*

**How to cite this article:**
*जांभुळे, . ज्ञानेश्वर . बापूराव . (2025). हरित तंत्रज्ञान आणि पुनर्नवीनीकरण उर्जा. Journal of Research & Development, 17(5(II)), 94–97.* https://doi.org/10.5281/zenodo.15817628

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817628

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**हरित तंत्रज्ञानाचे मुख्य उद्दिष्टे**

**उत्सर्जनात कपात:**

हरित तंत्रज्ञानाचे प्रमुख उद्दिष्ट कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करणे आहे, जेणेकरून हवामान बदल रोखता येईल.

**ऊर्जा नवकल्पना:**

सौरऊर्जा ही हरित तंत्रज्ञान प्रकारांपैकी सर्वात उल्लेखनीय असून, सध्या ती अनेक देशांमध्ये जीवाश्म इंधनांपेक्षा स्वस्त आहे.

**गुतवणुकीची संधी:**

हरित तंत्रज्ञान गुंतवणूक शेअर्स, कमर्शियल पेपर्स किंवा सरकारी रोखे यांच्या स्वरूपात केली जाऊ शकते, जे शाश्वत क्रियाकलापांना आर्थिक पाठबळ देतात.

**हरित तंत्रज्ञानाचे प्रकार**

**1नवीकरणीय ऊर्जा स्रोत (Renewable Energy):**

सौर ऊर्जा (Solar Energy) ज्यामध्ये सौर पॅनेल्सद्वारे सूर्याच्या प्रकाशापासून वीज निर्माण केली जाते.पवन ऊर्जा (Wind Energy) पवनचक्क्यांच्या साहाय्याने वाऱ्याच्या गतीचा उपयोग करून वीज निर्माण करणे. जलविद्युत (Hydropower)निर्मिती म्हणजे पाण्याच्या प्रवाहाचा उपयोग करून वीज निर्माण करणे.

**२. इलेक्ट्रिक वाहने**

)Electric Vehicles-EVs): इलेक्ट्रिक मोटर्सद्वारे चालणारी वाहने, जी पारंपरिक इंधनाच्या तुलनेत कमी प्रदूषण करतात. ही वाहने हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करून आणि जीवाश्म इंधनांवरील अवलंबन कमी करून परिवहन प्रणालीत क्रांती घडवत आहेत. जलद चार्जिंग नेटवर्क्स आणि बॅटरी तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे ही वाहने आता अधिक सहज उपलब्ध होत आहेत. अनेक संस्था आता नूतनीकरणीय ऊर्जा स्त्रोतांना EV चार्जिंग स्टेशनसोबत जोडण्यावर भर देत आहेत.

**३. ऊर्जा कार्यक्षमता वाढवणारी उपकरणे**:

LED दिवे पारंपरिक बल्बसच्या तुलनेत ८५% कमी ऊर्जा वापरणारतात.स्मार्ट थर्मोस्टॅट्स घरातील तापमान नियंत्रित करून ऊर्जा बचत करतात.

**४.ग्रीन ऊर्जा संचयन प्रणाली**

)Green Energy Storage Systems): लिथियम-आयन (Li-ion) बॅटऱ्यांद्वारे ऊर्जा संचयित केली जाते, जेणेकरून पुनर्नवीनीकरणयोग्य ऊर्जा स्त्रोत ऊर्जा गरजा पूर्ण करू शकतील. फ्लो बॅटऱ्या आणि सॉलिड-स्टेट बॅटऱ्या ही पारंपरिक बॅटऱ्यांच्या तुलनेत अधिक कार्यक्षम आणि दीर्घायुषी ठरण्याची शक्यता आहे. अतिरिक्त सौर व वाऱ्याच्या उत्पादनातून ऊर्जा साठवून, कमी उत्पादनाच्या काळातही सातत्यपूर्ण पुरवठा सुनिश्चित केला जातो.

**५. उपयोगी कचऱ्याचे व्यवस्थापन**

)Waste Management):प्लास्टिक रस्ते वापरलेला प्लास्टिक कचरा वापरून बनवलेले रस्ते, जे अधिक टिकाऊ आणि पर्यावरणास अनुकूल आहेत.कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती (Waste-to-Energy)कचऱ्याचा वापर करून वीज निर्माण करणे. प्रगत कचरा व्यवस्थापन प्रणाली लँडफिल्सऐवजी कचऱ्याचे पुनर्वापर, कंपोस्टिंग आणि ऊर्जा निर्मितीमध्ये रूपांतर करतात.

**६. स्मार्ट शेती तंत्रज्ञान**

)Smart Agriculture): या तंत्रज्ञानात प्रिसिजन फार्मिंग, उभ्या शेती (Vertical Farming): लहान जागेत पिकांची वाढ, ज्यामुळे पाणी आणि जागेची बचत होते आणि सेंद्रिय शेती (Organic Farming) या पर्यावरणपूरक तंत्रांचा वापर केला जातो. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ड्रोनचा वापर पिकांचे रिअल-टाइम निरीक्षण करण्यासाठी केला जातो, ज्यामुळे पाण्याचे व खते वापरण्याचे प्रमाण योग्य प्रमाणात ठेवता येते.

**६. हरित इमारत तंत्रज्ञान**

)Green Building Technologies): या तंत्रज्ञानामध्ये ऊर्जा कार्यक्षम डिझाइन, बांधकाम साहित्य आणि स्मार्ट इमारत प्रणाली यांचा समावेश होतो. पर्यावरणपूरक इमारतींमध्ये आता हिरवे छत (ग्रीन रूफ्स), सौर पॅनेल्स आणि पर्जन्य जल संकलन प्रणाली (रेन वॉटर हार्वेस्टिंग) यांचा समावेश असतो.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**७. पाणी शुद्धीकरण व संवर्धन**

)Water Purification and Conservation): या अंतर्गत प्रगत फिल्टरेशन सिस्टम्स, समुद्रजल गोडं करणारे प्रकल्प (desalination plants), आणि स्मार्ट सिंचन प्रणालींचा समावेश होतो. या नवकल्पना पर्यावरणपूरक आणि स्वच्छ पाण्याचे स्रोत सुनिश्चित करतात. ग्राफिन आधारित फिल्टरेशन, सौर ऊर्जा आधारित शुद्धीकरण प्रणाली ही पाण्याच्या प्रक्रियेत तांत्रिक क्रांती घडवत आहेत.

**हरित तंत्रज्ञान आणि नूतनीकरणक्षम ऊर्जा ( Green Technology and Renewable Energy)**

नूतनीकरणक्षम ऊर्जा (Renewable Energy) म्हणजे अशी ऊर्जा जी नैसर्गिक स्रोतांपासून मिळते आणि जी सतत पुनर्निर्मित होऊ शकते. उदा:सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, जलविद्युत, बायोमास आणि भू-ऊर्जा इत्यादी

**१. सौर ऊर्जा )Solar Energy):**

सूर्यकिरणांपासून मिळणारी ऊर्जा म्हणजे सौर ऊर्जा होय. सूर्य प्रचंड प्रमाणात उष्णता आणि प्रकाश उत्सर्जित करतो. ही ऊर्जा सौर पॅनेल्सच्या साहाय्याने गोळा केली जाते. सौर पॅनेल्समध्ये "फोटोव्होल्टिक पेशी" (Photovoltaic Cells) असतात, ज्या सूर्यप्रकाशाचे थेट विजेमध्ये रूपांतर करतात. सौर ऊर्जा वापरून विजेची निर्मिती ही पाणी गरम करणे, घरगुती उपकरणे चालवणे आणि शेतीसाठी पंप चालवणे अशा विविध उपयोगांसाठी केली जाते. सौर ऊर्जा ही एक नूतनीकरणयोग्य, स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त ऊर्जा आहे, जी पर्यावरणाचे संरक्षण करते आणि भविष्यासाठी एक शाश्वत पर्याय आहे.

**२. पवन ऊर्जा (Wind Energy):**

पवनचक्क्यांच्या साहाय्याने वाऱ्याच्या गतीचा उपयोग करून वीज निर्माण करणे. हवेमुळे निर्माण होणारी गतिज ऊर्जा वापरून वीज तयार करण्याच्या प्रक्रियेला पवन ऊर्जा असे म्हणतात. जेव्हा वारा वेगाने वाहतो, तेव्हा त्याच्या शक्तीचा उपयोग मोठ्या पवनचाकांद्वारे )Wind Turbines) केला जातो. वाऱ्यामुळे हे पंखे फिरतात आणि त्यामधून जनरेटर चालवला जातो, ज्यामुळे वीज तयार होते.पवन ऊर्जा ही एक नूतनीकरणयोग्य, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ऊर्जा आहे. यासाठी वारा भरपूर प्रमाणात आणि सातत्याने वाहणारे भाग निवडले जातात, जसे की डोंगराळ भाग, समुद्रकिनारे किंवा मोकळी मैदाने.पवन उर्जा वापरून वीज निर्मिती करता येते त्यामुळे खेड्यांमध्ये अपारंपरिक ऊर्जेचा स्रोत उपलब्ध होतो आणि इंधनावर होणारा खर्च वाचतो. ही ऊर्जा पर्यावरणाच्या दृष्टीने सुरक्षित असून भविष्यासाठी एक शाश्वत ऊर्जास्रोत मानली जाते.

**३. जलविद्युत (Hydropower):**

पाण्याच्या प्रवाहाचा उपयोग करून वीज निर्माण करणे. पाण्याच्या पडणाऱ्या प्रवाहातील स्थितिज ऊर्जेचे रूपांतर यांत्रिक ऊर्जेत करून ती वीजेत बदलणाऱ्या प्रक्रियेला जलविद्युत ऊर्जा म्हणतात. औद्योगिक क्रांतीच्या प्रारंभी, जिथे पुरेसा उतार (उंचीतील फरक) उपलब्ध होता तिथे नद्या आणि ओढ्यांवर धरणे बांधली जात आणि गिरण्या उभारल्या जात. दाबाखालील पाणी टर्बाइनमधून वाहते आणि टर्बाइन फिरते. ही टर्बाइन जनरेटरशी जोडलेली असते. टर्बाइन फिरल्यामुळे जनरेटर वीज निर्माण करतो. ही प्रक्रिया स्वच्छ, नूतनीकरणयोग्य (renewable) आणि पर्यावरणपूरक ऊर्जा स्रोत मानली जाते.

**४. भू-ऊर्जा (Geothermal Energy):**

पृथ्वीच्या आतील भागात असलेली उष्णता म्हणजे भू-ऊर्जा होय. पृथ्वीच्या गर्भात दगड, खडक आणि मातीखाली असलेल्या गरम पाण्याचे साठे किंवा स्टीमचा (वाफेचा) वापर करून वीज निर्मिती किंवा थेट उष्णतेसाठी ही ऊर्जा वापरली जाते.भू-ऊर्जा निर्माण करण्याच्या प्रक्रियेत पृथ्वीच्या खोल भागातील गरम पाणी किंवा वाफ बाहेर काढली जाते.या वाफेचा वापर टर्बाइन चालवण्यासाठी केला जातो.टर्बाइन जनरेटरला जोडलेली असते, जी वीज निर्माण करते.ही ऊर्जा नूतनीकरणयोग्य आहे. प्रदूषणमुक्त आणि सतत उपलब्ध असलेली ऊर्जा आहे. हवामानावर अवलंबून नसल्यामुळे ती सतत व स्थिर ऊर्जा स्रोत मानली जाते. भू-ऊर्जा ही विशेषतः जिथे ज्वालामुखी, उष्ण पाण्याचे झरे किंवा पृथ्वीतील उष्णतेचा प्रभाव अधिक आहे अशा भागांमध्ये अधिक प्रमाणात उपलब्ध असते.

**५.नूतनीकरणीय बायोमास ऊर्जा (Renewable Biomass Energy):**

सजीव सत्त्वांपासून (उदा. झाडे, प्राणी, शेतीचे अवशेष, जनावरांचे शेण, लाकूड, वाळलेली झाडांची पाने इ.) मिळणाऱ्या सेंद्रिय पदार्थांपासून मिळणारी ऊर्जा म्हणजे बायोमास ऊर्जा होय. ही ऊर्जा नैसर्गिकपणे विघटन होणाऱ्या पदार्थांपासून मिळते. बायोमासपासून ऊर्जा लाकूड, शेण, पेंढा, सेंद्रिय कचरा इ. जाळून उष्णता निर्माण केली जाते. या उष्णतेचा वापर वीज निर्मितीसाठी किंवा स्वयंपाक व गरम पाण्यासाठी केला जातो. बायोगॅस प्लांटमध्ये सेंद्रिय कचऱ्यापासून मिथेन गॅस तयार होतो, जो इंधन म्हणून वापरला जातो. बायोमास ऊर्जा ही नूतनीकरणयोग्य ऊर्जा स्रोत आहे. ही प्रदूषण कमी करणारी व पर्यावरणपूरक पद्धत आहे. ग्रामीण भागात शेती व

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

जनावरांच्या अवशेषांचा योग्य उपयोग करता येतो. बायोमास ऊर्जा ही पारंपरिक आणि आधुनिक पद्धतींचा समावेश करणारी ऊर्जा असून ग्रामीण व शाश्वत विकासासाठी महत्त्वाची आहे.

**हरित तंत्रज्ञान आणि नूतनीकरणक्षम ऊर्जा यांचे महत्त्व )Importance of Green Technology and Renewable Energy)**

**१.पर्यावरणीय फायदे:**

कार्बन उत्सर्जन कमी करणे: नूतनीकरणक्षम ऊर्जा स्रोतांपासून वीज निर्माण केल्याने कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी होते, ज्यामुळे जागतिक तापमानवाढीला आळा बसतो.त्याचप्रमाणे इंधनांच्या वापरामुळे होणारे हवेतील प्रदूषण कमी होते, ज्यामुळे आरोग्याच्या समस्या कमी होतात.

**२.सामाजिक फायदे:**

दुर्गम आणि आदिवासी भागांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे वीज पोहोचवली जात आहे, ज्यामुळे जीवनमानात सुधारणा होत आहे. तसेच प्रदूषण कमी झाल्याने श्वसन आणि हृदयविकारांच्या समस्या कमी होतात

**३.आर्थिक फायदे:**

नूतनीकरणक्षम ऊर्जा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात की सौर पॅनेल्सची निर्मिती, स्थापत्य, देखभाल इत्यादीसाठी कामगार आवश्यक असतात.त्यामुळे रोजगार निर्मिती होते आणि नोकऱ्या निर्माण होतात.नूतनीकरणक्षम ऊर्जा स्रोतांच्या वापरामुळे ऊर्जा किंमती स्थिर राहतात, कारण इंधनाच्या किंमतींमध्ये होणारे बदल त्यावर परिणाम करत नाहीत.

**४. ऊर्जा सुरक्षा:**

नूतनीकरणक्षम ऊर्जा स्रोत स्थानिकपणे उपलब्ध असल्याने, इंधनाच्या आयातावर अवलंबित्व कमी होते, ज्यामुळे ऊर्जा सुरक्षा वाढते.

**समारोप**

हरित तंत्रज्ञान हे केवळ पर्यावरणासाठीच नाही, तर आर्थिक आणि सामाजिक दृष्टीनेही फायदेशीर आहे. याच्या वापरामुळे भविष्यातील पिढ्यांसाठी एक स्वच्छ आणि टिकाऊ पृथ्वी निर्माण होऊ शकते.त्यामुळे प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात हरित तंत्रज्ञानाचा अवलंब करून पर्यावरणाच्या रक्षणात योगदान द्यावे. हरित तंत्रज्ञान आणि नूतनीकरणक्षम ऊर्जा हे केवळ पर्यावरणाच्या रक्षणासाठीच नाही, तर सामाजिक आणि आर्थिक विकासासाठीही अत्यंत आवश्यक आहेत.या तंत्रज्ञानांचा अवलंब करून आपण एक स्वच्छ, सुरक्षित आणि समृद्ध भविष्य निर्माण करू शकतो.

**संदर्भसूची:**

१. गायकवाड, आर. डी. (2014). ऊर्जा व हरित क्रांती, पुणे: उज्ज्वल प्रकाशन.
२. जोशी, एम. व्ही. (2019). बायोमास व जैव ऊर्जा तंत्रज्ञान. नाशिक: स्वरूप प्रकाशन.
३. देशमुख, एस. के. (2016). हरित तंत्रज्ञान. पुणे: श्री विद्यापीठ प्रकाशन.
४. देशपांडे, एस. एम. (2015). पर्यावरण विज्ञानाचे मूलतत्त्वे. नागपूर: विद्या बुक्स.
५. भोसले, ए. व्ही. (2018). नूतनीकरणयोग्य ऊर्जा स्रोत. मुंबई: टेक्नो पब्लिकेशन्स.
६. पाटील, ए. ए. (2017). शाश्वत विकास आणि हरित तंत्रज्ञान. औरंगाबाद: बालाजी पब्लिकेशन.
७. साळुंखे, पी. एन. (2015). ऊर्जेचे नवे स्रोत व पर्यावरण. कोल्हापूर: ज्ञानदीप प्रकाशन

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# प्रा.फौजिया खान यांचे जीवन व कार्याचा अभ्यास

**प्रा. डॉ. सौ. विभा प्र.देशपांडे[1] अरुण लक्ष्मीनारायण धकाते [2]**
[1]राज्यशास्त्र विभाग प्रमुख कला व विज्ञान महाविद्यालय ,कुऱ्हा तालुका-तिवसा, जिल्हा-अमरावती
[2]राज्यशास्त्र विभाग
**Email :** arundhakate1981@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-1705023
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 98-102
May 2025
**Submitted:** 10 Apr. 2025
**Revised:** 22 Apr. 2025
**Accepted:** 21 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश :**
महाराष्ट्राच्या विधानपरिषदेमध्ये १९६० ते २०१४ दरम्यान ९३ पुरुष व १५ स्त्री असे एकूण १०८ व्यक्तींची राज्यपालाद्वारे नामनियुक्त सदस्य म्हणून निवड करण्यात आल्याचे दिसून येते. त्यापैकी केवळ सहा सदस्यांची पुनर्नियुक्ती झाल्याचे दिसून येते. त्यापैकी ५ पुरुष सदस्य व एकमात्र स्त्री सदस्या म्हणजे प्रा.फौजिया खान. सदर कालखंडातील राज्यपालाद्वारे नामनियुक्त झालेल्या एकूण १५ स्त्री सदस्यांमध्ये सलग दुसऱ्यादा राज्यपालाद्वारे नामनियुक्त होणाऱ्या एकमेव स्त्री सदस्य म्हणजे प्रा.फौजिया खान होय. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेमध्ये १९६० ते २०१४ दरम्यान राज्यपालाद्वारे नामनियुक्त होणाऱ्या पहिल्या मुस्लीम स्त्री होण्याचा बहुमान प्रा.फौजिया खान यांना मिळाला. यासोबत महाराष्ट्र सरकारमध्ये मंत्री म्हणून काम करणाऱ्या राज्यातील पहिल्या मुस्लिम महिला होण्याचा बहुमान त्यांनी मिळविला.

प्रा.फौजिया खान ह्या व्यवसायाने अध्यापिका होत्या. त्यांना शैक्षणिक क्षेत्रात रुचि असून त्यांनी शैक्षणिक संस्था स्थापन केल्या आहेत. त्यांनी स्थानिक, राज्य व केंद्र स्तरावरील राजकीय क्षेत्रात यशस्वीपणे कार्य केल्याचे दिसून येते. त्यांनी महिलांच्या विकासासाठी 'जेंडर बजेट' संकल्पना पूर्णपणे अंमलात आणण्यासाठी प्रयत्न केले.
नामनियुक्त सदस्याचा दोन्ही कालावधी यशस्वीपणे पूर्ण केलेल्या त्या पहिल्या महिला व एकमेव मुस्लिम महिला सदस्या ठरतात. त्यांना महाराष्ट्राच्या विधानपरिषदेतील कामकाजाचा १२ वर्षाचा दीर्घ अनुभव असल्याचे दिसून येते. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या सभागृहात त्या ९० टक्के पेक्षा अधिक कालावधी उपस्थित होत्या. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या सभागृहात त्यांनी लक्षवेधी सूचना, नियम ९३ अन्वये चर्चा, महत्वाच्या सार्वजनिक बाबींवर चर्चा घडवून आणून, विविध सांसदीय आयुधांचा वापर केल्याचे दिसून येते. महाराष्ट्राच्या विधान मंडळाच्या विविध समित्यात त्यांनी महत्वपूर्ण कार्य केले. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या कामकाजात त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविल्याचे दिसून येते. प्रा.फौजिया खान ह्यांनी महिला, बालकल्याण, शेती, आरोग्य, वीज, अन्न-धान्य अत्यावश्यक सेवा इत्यादी बाबत महत्वाच्या समस्या सोडवणुकीसाठी विशेष प्रयत्न केले. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या कामकाजावर प्रभाव टाकणाऱ्या निवडक स्त्रियांपैकी त्या एक महत्त्वपूर्ण स्त्री सदस्या आहेत.

**मुख्य शब्द :** विधानपरिषद, नामनियुक्त सदस्य, संसदीय आयुध

**प्रस्तावना :**

१ मे १९६० रोजी मराठी भाषिकांसाठी स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती करण्यात आली.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा. डॉ. सौ. विभा प्र.देशपांडे*
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख कला व विज्ञान महाविद्यालय ,कुऱ्हा तालुका-तिवसा, जिल्हा-अमरावती*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817637
OPEN ACCESS

**How to cite this article:**
*देशपांडे, . विभा . प्र ., & धकाते, . अरुण . लक्ष्मीनारायण . (2025). प्रा.फौजिया खान यांचे जीवन व कार्याचा अभ्यास. Journal of Research & Development, 17(5(II)), 98–102. https://doi.org/10.5281/zenodo.15817637*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

महाराष्ट्राच्या स्थापनेपासून महाराष्ट्रात द्विगृही विधिमंडळ म्हणजे विधानसभा व विधानपरिषद दोन्ही सभागृहे आहेत. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेतील ७८ सदस्यांपैकी राज्यपालांद्वारे एक षष्टांश सदस्य म्हणजे. बारा सदस्य नामनिर्देशित[१] केले जातात. त्यांना 'नामनियुक्त सदस्य' म्हणतात

महाराष्ट्राच्या विधानपरिषदेमध्ये १९६० ते २०१४ दरम्यान ९३ पुरुष व १५ स्त्री असे एकूण १०८ व्यक्तींची राज्यपालाद्वारे नामनियुक्त सदस्य म्हणून निवड करण्यात आल्याचे दिसून येते. त्यापैकी केवळ सहा सदस्यांची फेरनिवड झाल्याचे दिसून येते. यात केवळ एक स्त्री सदस्य सलग दुसऱ्यादा नामनियुक्त झाल्या त्या म्हणजे प्रा.फौजिया खान होय. सदर कालखंडातील एकूण १५ स्त्री सदस्यांमध्ये सलग दुसऱ्यादा राज्यपालाद्वारे नामनियुक्त होणाऱ्या एकमेव सदस्य प्रा.फौजिया खान आहेत. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेमध्ये १९६० ते २०१४ दरम्यान राज्यपालाद्वारे नामनियुक्त होणाऱ्या पहिल्या मुस्लीम स्त्री होण्याचा बहुमान प्रा.फौजिया खान यांना मिळाला. यासोबत महाराष्ट्र सरकारमध्ये मंत्री म्हणून काम करणाऱ्या राज्यातील पहिल्या मुस्लिम महिला होण्याचा बहुमान त्यांनी मिळविला. त्यांची राज्यपालाद्वारे नामनियुक्त सदस्य प्रथमत: नियुक्ती २१ फेब्रुवारी २००२ रोजी झाली. त्यांची नियुक्ती समाजसेवा क्षेत्रातून झाल्याचे दिसून येते. त्यांची नियुक्तीची शिफारीश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे झाल्याचे दिसून येते. सहा वर्षाचा कार्यकाल पूर्ण केल्यानंतर फेरनियुक्ती १२ मार्च २००८ रोजी करण्यात आली. त्यांनी दोन्ही कालावधी यशस्वीपणे पूर्ण केलेल्या पहिल्या महिला सदस्या ठरतात. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या कामकाजात त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविल्याचे दिसून येते. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या कामकाजावर प्रभाव टाकणाऱ्या मोजक्या स्त्रि सदस्यापैकी त्या एक महत्त्वपूर्ण स्त्री सदस्य आहेत. यादृष्टीने त्यांच्या जीवन व कार्याचा अभ्यास गरजेचे ठरते.

**२) संशोधनाचे विधान :**

प्रा.फौजिया खान यांचे जीवन व कार्याचा अभ्यास

**३) संशोधनाची उद्दिष्टे :**

१) प्रा.फौजिया खान यांचे शैक्षणिक कार्य अभ्यासणे.

२) प्रा.फौजिया खान यांचे सामाजिक कार्य अभ्यासणे.

३) प्रा.फौजिया खान यांचे राजकारणातील प्रमुख कार्याचे अध्ययन करणे.

**४) संशोधनाचे गृहितकृत्ये :**

१) प्रा.फौजिया खान यांना शैक्षणिक कार्यात रुचि आहे.

२) प्रा. फौजिया खान यांना सामाजिक कार्याची आवड आहे.

३) प्रा. फौजिया खान यांनी राजकारणाद्वारे जनतेच्या समस्या सोडवणुकीसाठी सतत प्रयत्नकेले आहे.

**५) संशोधन पद्धती :**

सदर संशोधनासाठी ग्रंथालय पद्धतीचा वापर करण्यात आला.

**६) संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :**

सदर संशोधन प्रा.फौजिया खान यांचे कौटुंबिक, सामाजिक , व्यावसायिक व राजकीय जीवनातील प्रमुख घटनांचे अध्ययन संदर्भात करण्यात आले.

**७) पूर्व संशोधनाचा आढावा**

सदर संशोधनासाठी खालील काही महत्त्वपूर्ण पूर्व संशोधन व पुस्तकांचे अध्ययन करण्यात आले.

१) संजय महादेव राऊत [२] (२०१७) यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी "महाराष्ट्र विधान परिषदेचा अभ्यास (१९६० ते २०१०)" या विषयावर २०१७ मध्ये शोध प्रबंध सादर केलेला आहे.

२) "महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह कौन्सिल रुल्स"' सेवन्थ एडिशन [३] (२००४) या पुस्तकाचे प्रकाशन शासकीय मुद्रण व लेखन सामग्री,महाराष्ट्र शासन,मुंबई यांनी केले आहे.सदर पुस्तकात महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या कामकाजाचे नियम, राज्यपालाचा संदेश, सभागृहाची कार्यपद्धती, सर्वसामान्य नियमावली, कायदेशीर प्रक्रिया, प्रश्नोत्तर यासारख्या विविध मुद्द्यावर कायदेशीर माहिती दिलेली आहे.

३) कांता जयसिंग नलावडे [४] (२०१७) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई येथे मराठी विषयातील पीएच.डी. करिता "महाराष्ट्र विधिमंडळातील स्त्री आमदारांच्या भाषणाचे मराठी भाषा, साहित्य- संस्कृतीच्या संदर्भात मूल्यमापन" हा प्रबंध सादर केलेला होता.

**८) प्रा.फौजिया खान यांचे जीवन व कार्य [५]:**

**८.१) कौटुंबिक जीवन :**

प्रा.फौजिया खान यांचा जन्म १९ फेब्रुवारी १९५७ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे झाला. त्यांच्या आईचे नाव श्रीमती फहमिदा बेगम व वडीलाचे नाव डॉ. जफर नक्शबंदी होते. त्यांनी मराठवाडा विद्यापीठातून इंग्रजी विषयात १९८२ साली पदव्युत्तर पदवी, १९८४ साली एम.फिल. व २०१६ मध्ये पीएच.डी. पदवी प्राप्त केली. १९८४ मध्ये त्यांचा विवाह श्री. तहसीन अहमद

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

खान यांच्याशी झाला. विवाहानंतर त्या परभणी येथे स्थायिक झाल्या. त्यांना एक मुलगा व एक मुलगी असे दोन अपत्ये आहेत. त्यांना मराठी, इंग्रजी, हिंदू भाषा अवगत असून वाचन, प्रवास व वन्यजीव संरक्षण करणे हे त्यांचे आवडते छंद आहेत.

**८.२) व्यावसायिक जीवन :**

प्रा.फौजिया खान यांनी महिला महाविद्यालय, परभणी येथे इंग्रजी विभाग प्रमुख म्हणून सात वर्षे, शिवाजी महाविद्यालय, परभणी पदव्युत्तर प्राध्यापिका म्हणून पाच वर्षे व क्वीन स्कूलच्या प्राचार्य पदी आठ वर्षे सेवा केली.

**८.३) शैक्षणिक कार्य :**

प्रा.फौजिया खान यांनी सरोश एज्युकेशन सोसायटी, अली अहमद चॅरिटेबलची परभणी येथे स्थापना केली. त्यांनी शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध शिबिरे, सामान्य ज्ञान स्पर्धा, वक्तृत्व, चित्रकला सारख्या विविध स्पर्धांचे आयोजन केले.

प्रा. फौजिया खान या फेडरेशन ऑफ ऑल महाराष्ट्र मायनॉरिटी एज्युकेशन ऑर्गनायझेशन (FAME) च्या प्रमुख आहेत. त्यांनी २००८ मध्ये औरंगाबाद येथे मौलाना आझाद राष्ट्रीय उर्दू विद्यापीठाच्या कॅम्पसबाहेरील शैक्षणिक संकुल विकसित करण्यासाठी ५ एकर जमीन दान केली. महाराष्ट्र सरकारमध्ये मंत्री असताना त्यांनी औरंगाबादजवळील खुलदाबाद येथे अलीगढ मुस्लिम विद्यापीठ (AMU) महाराष्ट्र केंद्रासाठी ३३२ एकर जागा देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

**८.४) सामजिक कार्य :**

त्यांनी परभणीच्या महिला दक्षता समिती, महिला तक्रार निवारण कक्ष, महिला व मुली कल्याणार्थ समितीच्या सदस्या म्हणून कार्य केले. राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध परिषदा, चर्चासत्रे यामध्ये त्यांनी महिला व बालकल्याणासाठी सहभाग नोंदवला. परभणीच्या शाहीन ब्लड बँक व स्वस्तिक क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या कार्यात सक्रिय सहभागी राहिल्या.

**८.५) राजकीय कारकीर्द :**

परभणी येथील नगर परिषदेची अध्यक्षपदाची निवडणूक जिंकून त्यांनी राजकीय कारकीर्दीचा प्रारंभ केला. नगर परिषदेच्या नगराध्यक्ष असतांना बालक व महिला कल्याण, आरोग्य व शिक्षणासाठी महत्वपूर्ण कार्य केल्याचे दिसून येते. प्रा.फौजिया खान ह्यांनी राष्ट्रवादी पक्षाच्या प्रगतीसाठी गाव पातळीपासून देश पातळीपर्यंत भरीव कामगिरी केल्याचे दिसून येते त्या मराठवाडा क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करताना दिसून येते. त्यांची 'राज्यपाल नियुक्त सदस्य' म्हणून नियुक्ती समाजसेवा क्षेत्रातील भरीव कामगिरीमुळे केल्याचे दिसून येते.

तत्कालीन राज्यपाल डॉ. महम्मद फजल यांनी प्रा. फौजिया खान यांची नियुक्ती विधानपरिषदेत 'राज्यपाल नियुक्त सदस्य' म्हणून २१ फेब्रुवारी २००२ रोजी केली. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या इतिहासात पहिल्या मुस्लीम अल्पसंख्याक महिला 'राज्यपाल नियुक्त सदस्य' होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. प्रा. फौजिया खान यांची प्रथम नामनियुक्त सदस्याचे वेळी वय ४५ वर्षे होते. २००२ ते २००८ या सहा वर्षाचा कार्यकाल पूर्ण केल्यानंतर त्यांची फेरनियुक्ती १२ मार्च २००८ रोजी तत्कालीन राज्यपाल श्री. एस. सी.जमीर यांनी केली. त्यांची शिफारश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे झाल्याचे दिसून येते. यासोबत महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या इतिहासात फेरनियुक्त होणाऱ्या पहिल्या महिला व पहिल्या मुस्लीम अल्पसंख्याक महिला होण्याचा दुहेरी बहुमान मिळविला.

त्यांनी २००९ ते २०१४ दरम्यान महाराष्ट्र सरकारच्या सामान्य प्रशासन, आणि माहिती जनसंपर्क, सांस्कृतिक कार्य, शालेय शिक्षण, महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, अल्पसंख्यांक विकास खात्याचे राज्यमंत्री पद भूषविले. २००९ मध्ये त्यांची 'महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सदस्य' म्हणून नियुक्ती झाली. २० एप्रिल २०१८ रोजी त्यांनी राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला. ३ एप्रिल २०२० रोजी त्यांची निवड राज्यसभेत झाली. त्यांनी युरोप, अमेरिका, सौदी अरेबिया व बहामा बेटे इत्यादी देशांचा दौरा केलेला आहे. अल्पसंख्यांक समुदायातील प्रभावी नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे. महाराष्ट्रातील प्रभावी राजकारणी महिला अशी त्यांची ओळख असल्याचे दिसून येते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय स्तरावरील प्रमुख नेत्यांपैकी एक आहेत.

**फ) विधानपरिषदेच्या कामकाजातील सहभाग :**

२००२ ते २०१४ या कालखंडात महाराष्ट्राच्या विधानपरिषदेची ४७ अधिवेशने झाली. सदर कालखंडात एकूण ५३४ बैठकी झाल्याचे दिसून येते.[६] प्रा. फौजिया खान ह्या २००२ ते २०१४ या कालखंडात महाराष्ट्राच्या विधानपरिषदेत राज्यपाल नामनियुक्त सदस्य होत्या. सदर कालखंडात त्यांची महाराष्ट्राच्या विधानपरिषद सभागृहातील सरासरी उपस्थिती ९०% पेक्षा जास्त होती. काही अधिवेशनात तर त्यांची उपस्थिती १०० % असल्याचे दिसून येते. महाराष्ट्राच्या विधानपरिषद सभागृहातील उपस्थितीच्या बाबतीत सर्व महिला सदस्यांमधून त्या अग्रेसर असल्याचे दिसून येते. त्यांनी सभागृहात लक्षवेधी सूचना, तारांकित प्रश्न, ओउचीत्याचा मुद्दा अशा विविध सांसदीय आयुधांचा वापर केल्याचे दिसून येते. त्यांनी जनतेच्या समस्या व प्रश्न सोडवणुकीसाठी सभागृहात कसोशीने प्रयत्न केल्याचे दिसून येते.

**९) प्रा. फौजिया खान यांच्या राजकीय कार्यातील उल्लेखनीय बाबी :**

१) १९६० ते २०१४ दरम्यान महाराष्ट्राच्या विधानपरिषदेत राज्यपाल नियुक्त सदस्यांपैकी फेरनियुक्त व सलगपणे सलग फेरनियुक्त होणाऱ्या त्या पहिल्या महिला सदस्या होत्या.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

२) १९६० ते २०१४ दरम्यान महाराष्ट्राच्या विधानपरिषदेत राज्यपाल नियुक्त सदस्यांपैकी नियुक्त व सलग फेरनियुक्त होणाऱ्या त्या पहिल्या मुस्लीम महिला सदस्या होत्या.
३) १९६० ते २०१४ दरम्यान महाराष्ट्राच्या विधानपरिषदेत राज्यपाल नामनियुक्त सदस्याचा दोन्ही कालावधी यशस्वीपणे पूर्ण केलेल्या त्या एकमेव मुस्लिम महिला सदस्या आहेत.
४) २०२२ वर्षीचा 'संसद रत्न' पुरस्कार देवून त्यांचा गौरव करण्यात आला.

**१०) गृहित कृत्यांची पडताळणी :**

**१) प्रा.फौजिया खान यांना शैक्षणिक कार्यात रुचि आहे.**

प्रा. फौजिया खान यांच्या ८.२) व्यावसायिक जीवन व ८.३) शैक्षणिक कार्याबाबत मुद्दावरून असे दिसून येते की, त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात अध्यापनाचे कार्य केले, विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविले. त्यांनी शैक्षणिक संस्था उघडून शैक्षणिक क्षेत्रात भरीव कार्य केल्याचे दिसून येते. यावरून त्यांना शैक्षणिक क्षेत्रात रुचि असल्याचे दिसून येते. यावरून सदर गृहितकृत्याचा स्वीकार करण्यात येते.

**२) प्रा. फौजिया खान यांना सामाजिक कार्याची आवड आहे.**

प्रा. फौजिया खान यांच्या ८. ४) सामाजिक कार्याबाबत मुद्दावरून असे दिसून येते की, त्यांनी महिला व बालकल्याण संदर्भात सामाजिक कार्य केले. त्यांची 'राज्यपाल नियुक्त सदस्य' म्हणून नियुक्ती समाजसेवा क्षेत्रातील भरीव कामगिरीमुळे केल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर गृहितकृत्याचा स्वीकार करण्यात येते.

**३) प्रा. फौजिया खान यांनी राजकारणाद्वारे जनतेच्या समस्या सोडवणुकीसाठी सतत प्रयत्न केले आहे.**

प्रा. फौजिया खान यांच्या ८.५) राजकीय कारकीर्द व व ९) राजकीय कार्यातील उल्लेखनीय बाबी मुद्दावरून असे दिसून येते की, त्यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात परभणी येथील नगर परिषदेची अध्यक्षपदाची निवडणूक जिंकून झाली. विधानपरिषदेत 'राज्यपाल नियुक्त सदस्य' म्हणून २१ फेब्रुवारी २००२ ते १२ मार्च २०१४ पर्यंत होत्या. त्यांची शिफारश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे झाल्याचे दिसून येते. त्यांना तब्बल १२ वर्षांचा विधानपरिषद सभागृहाच्या कामकाजाचा अनुभव असल्याचे दिसून येते. त्यांची विधानपरिषद सभागृहातील सरासरी उपस्थिती ९०% पेक्षा जास्त होती. प्रा. फौजिया खान ह्यांनी २००२ ते २०१४ या कालखंडात विधानपरिषदेत महत्वपूर्ण लक्षवेधी सूचना, ठराव मांडल्याचे दिसून येते. त्यांनी २००९ ते २०१४ दरम्यान महाराष्ट्र सरकारच्या सामान्य प्रशासन, महिती आणि जनसंपर्क, सांस्कृतिक कार्य, शालेय शिक्षण, महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, अल्पसंख्यांक विकास खात्याचे राज्यमंत्री पद भूषविले. त्यांनी जनतेच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या इतिहासात फेरनियुक्त होणाऱ्या पहिल्या महिला व पहिल्या मुस्लीम अल्पसंख्याक महिला होण्याचा दुहेरी बहुमान मिळविला. त्यामुळे सदर गृहितकृत्याचा स्वीकार करण्यात येते.

**११) निष्कर्ष**

वरील विश्लेषणातून असे दिसून येते की-
१) प्रा.फौजिया खान ह्या व्यवसायाने अध्यापिका होत्या. त्यांना शैक्षणिक क्षेत्रात रुचि असून त्यांनी शैक्षणिक संस्था स्थापन केल्या आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केले आहे.
२) प्रा.फौजिया खान ह्यांनी महिला व बालकल्याणासाठी सक्रिय कार्य केले. शाहीन ब्लड बँक व स्वस्तिक क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यासारख्या सामाजिक कार्याद्वारे समाजसेवा करण्यात अग्रेसर राहिल्या.
३) प्रा.फौजिया खान ह्या स्थानिक, राज्य व केंद्र स्तरावरील राजकीय क्षेत्रात यशस्वीपणे कार्य केल्याचे दिसून येते. प्रा.फौजिया खान ह्यांनी राष्ट्रवादी पक्षाच्या प्रगतीसाठी गाव पातळीपासून देश पातळीपर्यंत भरीव कामगिरी केल्याचे दिसून येते. प्रा. फौजिया खान यांनी राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाचा पदभार सांभाळीत आहेत.
४) प्रा.फौजिया खान ह्यांनी महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या कामकाजात सक्रिय सहभाग नोंदविल्याचे दिसून येते. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या कामकाजावर प्रभाव टाकणाऱ्या मोजक्या स्त्री सदस्यापैकी त्या एक महत्त्वपूर्ण स्त्री सदस्य आहेत.
५) १९६० ते २०१४ दरम्यान महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या इतिहासातील राज्यपाल नामनियुक्त सदस्याचा दोन्ही कालावधी यशस्वीपणे पूर्ण केलेल्या प्रा.फौजिया खान ह्या एकमेव मुस्लिम महिला सदस्या आहेत.
६) प्रा.फौजिया खान ह्यांनी २००९ ते २०१४ दरम्यान महाराष्ट्र सरकारच्या सामान्य प्रशासन, महिती आणि जनसंपर्क, सांस्कृतिक कार्य, शालेय शिक्षण, महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, अल्पसंख्यांक विकास खात्याचे राज्यमंत्री पद भूषविले.
७) प्रा.फौजिया खान ह्यांनी महिलांच्या विकासासाठी 'जेंडर बजेट' संकल्पना पूर्णपणे अंमलात आणण्यासाठी प्रयत्न केले.
८) प्रा.फौजिया खान ह्यांनी महिला, बालकल्याण, शेती, आरोग्य, वीज, अन्न-धान्य अत्यावश्यक सेवा इत्यादी बाबत महत्वाच्या समस्या सोडवणुकीसाठी विशेष प्रयत्न केले.
९) प्रा.फौजिया खान ह्या महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव टाकणाऱ्या प्रमुख नेत्यांपैकी एक आहेत.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**संदर्भ सूची :**
१https://mls.org.in.About_Us.aspx, विधानपरिषद मार्गदर्शिका, महाराष्ट्र विधान मंडळ, पृष्ठ क्र.६
२ संजय महादेव राऊत,(२०१७),"महाराष्ट्र विधान परिषदेचा अभ्यास(१९६० ते२०१०)", पीएच.डी. राज्यशास्त्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३ "महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह कौन्सिल रुल्स",(२००४), मुंबई, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री,महाराष्ट्र शासन, सेवन्थ एडिशन
४ कांता जयसिंग नलावडे,(२०१७), "महाराष्ट्र विधिमंडळातील स्त्री आमदारांच्या भाषणाचे मराठी भाषा, साहित्य- संस्कृतीच्या संदर्भात मूल्यमापन" पीएच.डी. मराठी,श्रीमती नाथीवाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
५ महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय २०१२,(२०१२),महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधान भवन, मुंबई,पृष्ठ क्र.२१-२२..
६ महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांची आडनावानुक्रमे यादी,(२०१३), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधान भवन, मुंबई,पृष्ठ क्र.१५-१६.

**संदर्भ ग्रंथ सूची :**
१) "महाराष्ट्र विधानपरिषद नियम",(१९८१), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई, पाचवी आवृत्ती.
२) "महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय २०१२",(२०१२),महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधान भवन, मुंबई,
३) "महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह कौन्सिल रुल्स",(२००४), मुंबई, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री,महाराष्ट्र शासन, सेवन्थ एडिशन
४) "महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही २००२ ते २०१४", महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) "महाराष्ट्र विधानपरिषद संक्षिप्त अहवाल २००२ ते २०१४", महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) "महाराष्ट्र विधानपरिषद कामकाजाचा संक्षिप्त अहवाल २००२ ते २०१४", महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधान भवन, मुंबई,
७) एम.लक्ष्मीकांत,(२०१७),"इंडियन पॉलिटिक्स", , के.सागर प्रकाशन, पुणे.

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# कवी आनंद गायकवाडः. आंबेडकरी चळवळीतील एक उत्तुंग व्यक्तिमत्व.एक षोधनिबंध

**गोपाल श्रीकृश्णाजी मून**
Rtmnu Nagpur University
**Email:** gopalmoon2018@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-1705024
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 103-107
May 2025
**Submitted:** 10 Apr. 2025
**Revised:** 22 Apr. 2025
**Accepted:** 21 May. 2025
**Published:** 31 May. 2025

प्रस्तावनाः

कवी आनंद गायकवाड यवतमाळ येथील पाटीपुरा या वस्तीत राहतात. पाटीपुऱ्यातील माणसाचे जीवन आनंद गायकवाड यांनी अतिशय जवळून पाहीले, अनुभवले आहे. पाटीपुऱ्यातील माणसाच्या जीवनातील दुःख, दैन्य, दारिद्रय गरिबी व्यथा, वास्वाला आलेला सामाजिक भेदभाव, कबाडकष्ट त्यांच्या कवितेतून शब्द बध्द झाला आहे. पाटीपुरा आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला आहे. कवी आनंद गायकवाड यांची भगवान बुध्द आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानावर अतोनात श्रध्दा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारत देशाला दिलेल्या संविधानानुसार हा देश चालावा सुजलाम, सुफलाम व्हावा सर्व प्रकारच्या विषमतेतुन मुक्त व्हावा असा प्रामाणिक हेतु कवी आनंद गायकवाड यांच्या कवितांतून प्रकट होत असतो. कवी आनंद गायकवाड यांच्या कवितांतून व्यक्त झालेलेविचार समाज आणि राज हितकारक असतात. समाजात वितुष्ट निर्माण करण्यासाठी नाही तर समाजाला राष्ट्रीय लोकशाहीवादी वळण देण्यासाठी ते आपल्या कवितेतून टीका करतात. धार्मिक अनिष्ट प्रथांवर चीड,राग व्यक्त करतात.

कवी आनंद गायकवाड यांचे आखरीच तुव्हचं सडान चिबवीन 2000, इस्तो 2012, तर हिंदान 2012, कविता संग्रह प्रसिध्द आहेत. त्यांचे शिक्षण M.A. [ Ambedkar Thought] नागपूर विद्यापीठ नागपूर येथे तर LLB पुर्ण.

जन्मः

28 ऑगस्ट 1960

लेख संग्रह

रू.चौरस्ता (ललीत) 2003

1. हिंदु म्हणून मरणार नाही 2010
2. मुक्काम पोष्ट पाटीपूरा (संपादीत)

कथासंग्रह

रूनिळी माणस 2012

नाटक :

वन मॅन शो (5 एक पात्री प्रयोग) सुरूंग 2005

लढाई थांबली कुठे ( दोन अंकी नाटक)

इयत्ता 9 वीच्या कुमार भारतीच्या पुस्तकात प्रकाशित झालेली "रॉपी" कविता.

2012 सामाजिक

संस्थापक अध्यक्ष NAG ( राष्ट्रीय आंबेडकरी गार्ड) संघटना

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*गोपाल श्रीकृश्णाजी मून RTMNU Nagpur University*

**How to cite this article:**
*मून, . गोपाल . श्रीकृश्णाजी . (2025). कवी आनंद गायकवाडः- आंबेडकरी चळवळीतील एक उत्तुंग व्यक्तिमत्व.एक षोधनिबंध. Journal of Research & Development, 17(5(II)), 103–107.*
https://doi.org/10.5281/zenodo.15817653

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817653
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**राजकीय**

नगर परिषद यवतमाळचे उपाध्यक्ष 1991–92 नगरपरिषद यवतमाळचे आरोग्य सभापती 1995–96 नगरपरिषद यवतमाळचे बांधकाम सभापती 2002–03 नगरपरिषद यवतमाळचे आरोग्य सभापती 2004–05 नगर परिषद यवतमाळचे सदस्य 2006

**आंदोलन**

मराठवाडा विद्यापीठ नामांतर कारावास मशाल मोर्चा

**सचिव**

आंबेडकरी साहित्य व विविध कला अकादमी संस्था 4

अखिल भारतीय आंबेडकरी साहित्य संमेलनाचे आयोजन 1997,2003,2014 व 2024, 2008 मध्ये आंबेडकरी युवा साहित्य संमेलन 2011 मध्ये भारती संविधान संमेलन 2012 मध्ये श्रमिक साहीत्य संमेलन सहभाग 2005 पासून फुले आंबेडकर समता पर्व फुले आंबेडकर स्मृती पर्व 2007 पासून आयोजन.

**कार्यक्रम**

बुध्द महोत्सव 2012 अखिल भारतीय आंबेडकरी महिला साहित्य संमेलन 2013 आनंद गायकवाड यांचे विविध कार्यक्रमांमध्ये संचालन आणि व्याख्याना मध्ये सहभाग आहे.

'आंबेडकरी' या शब्दाने आपले अस्तित्व सिध्द केले. त्याचा आकारही दिला. जन्म आणि मृत्युही 'आंबेडकरी' सोडून आपणास मान्य नाही. सामाजिक कार्य करतांना पडत झडत रखडत आपण 'आंबेडकर' जगण्याचा कसा प्रयत्न केला, संघर्ष पथावर कसे चाललो याचे विवेचन कवीने 'आखरीच तुव्हंच सडान चिबवोन' या काव्यसंग्रहाच्या मनोगतात मांडले.

कवी आनंद गायकवाड यांनी अनेक काव्यसंग्रह लिहीले. त्यांनी 'इस्तो' काव्यसंग्रहात आपली आंबेडकरी विचारधारा मांडली आहे. त्यांनी अनेक कार्यक्रमात हिरेरीने भाग घेतला. आपण प्रस्तुत शोधनिबंधनात त्यांनी आंबेडकरी चळवळीत घेतलेल्या भूमिकेचा सखोल आढावा करून घेणार आहोत.

**कवी आनंद गायकवाड यांची आंबेडकरी चळवळीतील भुमिका**

कवी आंनद गायकवाड यांच्या 'इस्तो' या कवितेत आई व मुलातील बोलका सवांद आहे. या संबादातुन कवीने आपण आंबेडकरी चळवळीत काम करतो हे आपल्या मोर्चातील सहभागातून सुचित केले आहे. चुलीवरील निखाऱ्यातून निर्मीती होते तर चितेवरील निखाऱ्यातून निर्मितीची राख होते. निखारे चुलीतील असोत की चितेवरील दाहकता हा त्याचा अंगभूत गुणधर्म आहे. मायच्या मृत्युपरांत कवी आपला स्वभावगुण पुन्हा तपासतो. चुलितला विस्तव आणि चितेतला विस्तव या मायने अभिव्यक्त केलेल्या प्रतिक्रियात्मक उपमांतून कवींच्या दाहक व्यक्तिमत्वांचा परिचय इस्तो या कवितेतील पुढील आळीतून आपल्याला होतो. कवी म्हणतो

कावराबावरा होऊन मोर्चावरून परत यायचो घरी,
घामेजलेला चेहरा, विस्कटलेले केस,
धापणारी छाती, लालबुंद डोळे
मायला विचारायचो मी कसा दिसतो?
माय म्हणायची चुलीतला इस्तो।

ांबेडकरी चळवळीतील बहुतेक सर्वच कवींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर कविता लिहील्या आहेत. कवी आनंद गायकवाड यांची 'संवेदना' ही कविता सुध्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर लिहिलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्तेचा लढा यशस्वी केल्यामुळे या देशातील अस्पृश्यता नष्ट झाले असे कवी कवितेत नमूद करतो. संर्घषाची पुढील वाट चालत असतांना आपल्या डोळयापुढे महाडच्या सत्याग्रहाचा, मनुस्मृती दहनाचा ऐतिहासिक संदर्भ आहे, असे कवी कवितेत सांगतो. भगवान बुध्दाच तत्वज्ञान आणि जयभीमच्या गर्जनेच्या बळावर आपण ही लढाई जिंकू असा आशावाद कवी 'संवेदना' या कवितेतील पुढील आळीत व्यक्त करतो आणि म्हणतो

तू चेतना युगाची
क्रांतिची योजना
भीमराया तू जगाच्या
मुक्तिची संवेदना।।

**आनंद गायकवाड यांचे कवितेतील आंबेडकरी समाजाचे वास्तववादी चित्रण**

रू कवी आनंद गायकवाड यांनी आंबेडकरी समाजाचे वास्तववादी चित्र आपल्या 'पाणी' या कवितेत रेखाटले आहे. समाजातील विषमता अनुभवत असतांना आंबेडकरी माणसाचे जाणीव जागृत मन सतत खदखदत असते. स्वताःला समाजाचे स्वयंघोषित ठेकेदार समजून फुशारख्या मारतात आणि हे सगळे ते आपला स्वार्थी षढपणा लपविण्यासाठी करीत असतात. असे कवी कवितेत सांगतो. ही पाखंडी माणसे फक्त स्वतःसाठी जगतात इतरांचे दुःख आपले दुःख समजत नाहीत. इतरांच्या वेदना, जखमा आपल्या वेदना जखमा समजत नाहीत. भगवान बुध्दाचे नाव घेतात परंतु भगवान बुध्दाच्या अंगी असलेल्या करूणेचा अंश सुध्दा यांच्या रक्तात दिसत नसल्याची खंत कवीला

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

आहे. महाडच्या सत्याग्रहातील पुरूषार्थआपल्या अंगी थोडा तरी येऊ दया असे आवाहन कवी आंबेडकरी समाजातील पांढरपेशा माणसाला 'पाणी' या कवितेतील पुढील ओळीत करतो आणि म्हणतो.

अंगातल रक्त तापत असतांना
उकळत असतांना
आपण का फुसत नाही लाव्हारसासारख
का सरकत नाही राजमार्गावरून
दिवाणखाण्याकडे/हवेल्यांकडे/वाडयांकडे खदखदत
आपल्यासाठी इतरांनी मातीत जाव
हीच आपली धारणा असते.

समाजातील सतावलेल्या माणसांचे जीवन आपण आपल्या कवितेत रेखाटत असल्याचे कवी आनंद गायकवाड 'आंबेडकरी कवी आहे' या आपल्या कवितेत सांगतात. आपण आंबेडकरी कवी आहोत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श आपल्या कवितालेखनामागे असल्याचे कवी कवितेत सांगतो. समाजातील प्रस्थापितांनी त्यांना हव्या त्या भौतिक सुविधा मिळवाव्यात उपलब्ध करून ध्याव्यात परंतु झोपडयांना हात लावू नये, उधवस्त करू नये असा इशारा कवी प्रस्थापितांना कवितेत देतो. दु:खितांचे दु:ख आपल्या कवितेतून मांडतो असे वक्तव्य कवी 'आंबेडकरी कवी आहे' या कवितेतील पुढील ओळीत करतो आणि म्हणतो."हातात भिंग पकडावा तसा डोळा पकडून
सतावलेल्यांच्या जीवनावर ठेवतो.
जे दिसते ते मांडतो.
या मांडणीत मात्र क्रांतीसुर्याची छवी आहे
मी एक आंबेडकरी कवी आहे!

**आनंद गायकवाड यांचे कवितेतील आंबेडकरी समाजाचे वास्तववादी चित्रण%**

कवी आनंद गायकवाड यांनी पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य व आजच्या नवबौध्द समाजावर सवर्ण समाजाकडून झालेले होत असलेले अन्याय अत्याचार आपल्या चीड या कवितेत शब्दबध्द केले आहेत. सार्वजनिक पाणवठयावर अस्पृश्यांना पाणी पिण्यास, भरण्यास मनाई होती. कुत्रे, मांजरे, गुरेढोरे पाणवठयावर जाऊन पाणी पिऊ शकत होती. परंतु अस्पृश्य अस्न त्याला पाणवठयावर पाणी भरण्यास मज्जाव केला जात होता. पाणी पितांना लाथा मारल्या जात होत्या असे कवी सांगतो व या विषयी कवितेत प्रचंड चीड व्यक्त करतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाची विटंबना होते तेव्हा आपण बेभान होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'रिडल्स इन हिदुइझम' या ग्रंथाला झालेला विरोध पाहून कवी विरोधकावर प्रचंड संतापतो व कवितेत या विषयी चीड व्यक्त करतो. अन्याय अत्याचाराच्या विरोधात लढण्यासाठी पुढे सरसावले पाहीजे अशी अपेक्षा कवी 'चीड' या कवितेतील पुढील ओळीत करतो आणि 'म्हणतो.

बाबासाहेब
भाषण दयायचे, तेव्हा ही मला चीड यायची
पाणवठयावर पाणी पितांना
समाजाला लाथा मारायचे सवर्ण
तेव्हाही मला चीड यायची

समताधिष्ठीत समाजाची निर्मितीसाठी कवी आनंद गायकवाड यांची भूमिका

कवी आनंद गायकवाड यांना वर्ण व्यवस्थेची जातीव्यवस्थेची चौकट मोडून त्या जागी भगवान बुध्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानाचुसार समताधिष्ठीत समाजाची निर्मिती करायची आहे.वर्ण व्यवस्थेमुळे, जाती व्यवस्थेमुळे समाजात भेदभाव वाढीस लागला असून उच्चनीश्यतेच्या भावनेमुळे समाज एकमुठ न राहता विभक्त झाला आहे. एकमेकांचा शत्रु झाला आहे. तळागळातील मानसाला अपमानित विषमतेवर आधारित लाचार दरिद्री अज्ञान अंधकारमय जीवन जगावे लागत आहे. खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य समता बंधुता व न्याय यावर आधारित समाजाची उभारणी करायची असेल तर वर्ण व्यवस्थेची, जातीव्यवस्थेची चौकट तोडून त्या जागी मानवतेचे गुणगान करणारी समतेवर आधारित समाजव्यवस्था उभी करावी लागेल, असे प्रतिपादन कवी 'चित्र' या कवितेतील पुढील ओळीत व्यक्त करतो आणि म्हणतो.

एक फ्रेम आहे
अर्थात चार वर्ण
त्यात एक चित्र बंदिस्त
फ्रेम काळी आह

**समारोप**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात सामाजिक, आर्थिक, राजकीय, धर्मिक व सांस्कृतीक दृष्टया राख झालेला अस्पृश्य समाज अस्पृश्तेची राख रांगोळी करून उठून उभा झाला आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

डॉ. बाबासाहेब ओबेडकर यांनी आपल्या जीवन जानिवा विकसित केल्या आहेत. कवी आनंद गायकवाड यांची कविता सामाजिक विषमता, ब्राहमन्य माणसाला मागे ओढणाऱ्या अनिष्ट धर्मिक चालीरीती, रूढी, परंपरा यावर भाष्य करणारी कविता आहे. कवी आनंद गायकवाड यांची कविता सामाजिक अन्याय अत्याचाराच्या विरोधात संघर्ष करण्याचे लढण्याचे आवाहन करणारी कविता आहे. कवी आनंद गायकवाड यांची कविता आपला विरोध प्रकट करतांना कोणाचीही भिडमुर्वत ठेवत नाही. ती सरळ सरळ घणाघाता विरोध करते. कवी आनंद गायकवाड यांच्या सर्वच कविता मुक्तछंदात आहेत. कवितेत उपमा, प्रतिमा प्रतीमांची रेलचेल आहे. कवी आनंद गायकवाड यांच्या कवितेतील अर्थ, आशय, तत्वार्थ समजून घेतला तरच त्यांच्या कवितेतील सामाजिक, धार्मिक, वर्णजातीय विरोधांची सनदशीर बाजू लक्षात येते.

समाजाच्या परिवर्तनाचा प्रामाणिक विचार यामागे आहे. समाजाच्या प्रगतीला, विकासाला गतिमान करण्याचा हेतु यात दडलेला आहे. कवी आनंद गायकवाड यांच्या कविता धार्मिक स्वार्थाला अधिक महत्व न देता माणुसकीला, मानवतेला देशाला सौंदर्य प्रदान करण्यावर जास्त भर देतात. कवी आनंद गायकवाड यांच्या कवितेतील सामाजिक, धार्मिक विरोध राष्ट्रीय हिताला राष्ट्रीय ऐक्याला स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या राष्ट्रीय मुल्यांना अधिक बलशाही करण्यासाठी आहे. कवितेत व्यक्त झालेला सामाजिक, धार्मिक विरोध व्यक्तिगत स्वरूपाचा नाही तर त्याचा आजता गायत मानवाने विकसित केलेल्या प्रगत समाजतत्वांची जोड आहे. कवी आनंद गायकवाड यांची कविता समाजाचे, देशाचे हित अहित ओळखणारी, मांडणारी कविता आहे. कवी आनंद गायकवाड यांच्या कवितेची भगवान बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानव कल्यानकारी तत्वज्ञानावर श्रध्दा आहे. कवी आनंद गायकवाड यांच्या कवितेत देश सवौच्य स्थानी तर धर्म दुय्यमस्थानी, गौणस्थानी आहे. कवी आनंद गायकवाड यांची कविता वर्णजातीविरहीत संवैधानिक लाकशाहीला पुरस्कार करते. कवी आनंद गायकवाड यांची कविता समाजाला, देशाला सुंदर, सुखी बनविण्यासाठी कटिबदध आहे.

तसेच कवी आनंद गायकवाड यांच्या ‘आखरीच तुम्हच सडान चिबवीन’ या काव्यसंग्रहातील कविता समाजाला जागृत करणाऱ्या आहेत.

एक आंबेडकरी चळवळीतील खंदा कार्यकर्ता म्हणून आनंद गायकवाड कवी रूपाने प्रसिध्दीस राहील.

### निश्कर्ष

1. कवी आनंद गायकवाड यांची कविता सामाजिक विषमता ब्राहमन्य मानसाला मागे ओढण्याच्या अनिष्ट धार्मिक चालीरीती, रूढी, परंपरा यावर भाष्य करणारी कविता आहे.
2. कवी आनंद गायकवाड यांची कविता सामाजिक अन्याय, अत्याचाराच्या विरोधात संघर्ष करण्याचे, लढण्याचे आवाहन करणारी कविता आहे.
3. कवी आनंद गायकवाड यांच्या सर्वच कविता मुक्तछंदात आहेत.
4. कवी आनंद गायकवाड यांच्या कवितेतील सामाजिक, धार्मिक विरोध हा धर्मदवेशी नसून समाजातील वाईटाला चांगले चांगल्याला अधिक चांगले बनविण्याचा उद्देशत्यामागे आहे.
5. कवी आनंद गायकवाड यांच्या कवितेतील सामाजिक, धार्मिक विरोध राष्ट्रीय हिताला, राष्ट्रीय ऐक्याला, स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या राष्ट्रीय मूल्यांना अधिक बलशाली करण्यासाठी आहे.
6. कवी आनंद गायकवाड यांच्या कवितेतील विरोध हा मित्रभावी आहे.
7. कवी आंनद गायकवाड यांच्या कविमेची भगवान बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानव कल्यानकारी तत्वज्ञानावर श्रध्दा आहे.
8. कवी आनंद गायकवाड यांच्या कवितेत देश सवौच्यस्थानी तर धर्म दुय्यमस्थानी गौणस्थानी आहे.
9. कवी आनंद गायकवाड याची भ्कविता वर्ण जातीविरहीत संवैधानिक लोकशाहीचा पुरस्कार करते.
10. कवी आनंद गायकवाड यांची कविता समाजाला, देशाला सुंदर सुखी बनविण्यासाठी शब्दबध्द झाली आहे.

### संदर्भग्रंथ

1. कटारे मारोतीराम :
2. फुले आंबेडकरी साहीत्य आकलन आणि आस्वाद', कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद प्र. आ. 2006
3. डांगळे अर्जुन :
4. ‘दलित विद्रोह', ग्रंथघर प्रकाशन, मुंबई प्र. आ. 1991
5. भवरे महेंद्र :
6. ‘दलित कविता आणि प्रतिमा', लोकवाङःमय गृह मुंबई प्र. आ. 2012
7. मनोहर यशवंत :
8. ‘आंबेडकरी मराठी साहीत्य', भीमरत्न प्रकाशन, नागपूर प्र. आ. 1999
9. गयकवाड आनंद :
10. ‘इस्तो' आंबेडकरी साहीत्य व कला अकादमी यवतमाळ प्र. आ. 2012
11. गयकवाड आनंद :
12. ‘हिदांन' आंबेडकरी साहित्य व कला अकादमी, यवतमाळ प्र. आ. 2012

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

13. ढोले संदेश :
14. 'आंबेडकरी कविता आकलन व अर्थमीमांसा' Notion Press. Com यवतमाळ, 2022
15. गायकवाड आनंद :
16. 'आखरीच तुव्हचं सडान चिबवीन', आंबेडकरी साहित्य व कला अकादमी, यवतमाळ प्र. आ. 2000
17. कांबळे उत्तम (संपा) :
18. 'जागतिकीकरणात मराठी कविता' परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई प्र. आ. 2009
19. पिंपळापुरे केतन :
20. 'सूर्यकंकण' समता संगर पब्लिकेशन, नागपूर दु. आ. 2007

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# पर्यावरणीय आव्हाने आणि उपाययोजना

**प्रा. डॉ. विठ्ठल निळकंठ ठावरी**
कला व वाणिज्य महाविद्यालय भिसी ता. चिमूर, जि. चंद्रपूर
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली सलग्न
**Email** :- vitthalthawari@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-1705025
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 5(II)|
Pp. 108-113
May 2025

**Submitted:** 10 Apr. 2025
**Revised:** 22 Apr. 2025
**Accepted:** 21 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश**

प्राचीन काळापासून भारतीय पर्यावरणपूरक होते आणि भारतातील निसर्गाचे रक्षण आणि संगोपन धर्माने केले जात असे. भगवत गीता निसर्गाला परा आणि अपरा असे दोन घटक असलेले एक अस्तित्व मानते. परा हा व्यवस्थेचा चेतना भाग आहे आणि अपरा हा त्याचा भौतिक भाग आहे. पर्यवरण आणि मानवीय विकास यांचे अतिदृढ नाते आहे. परंतु आज विकासाच्या नावावर भांडवलदार पुंजीपती सत्तेच्या हातात हात घालून जल, जमीन आणि जंगलाची पार वाट लावत आहे. त्याचा परिणाम पर्यावरणाची अपरिमित हानी होताना दिसून येत आहे. प्रत्येक राष्ट्र उत्पन्न, उत्पादन, रोजगार, राहणीमानाचा उच्च दर्जा आणि संपूर्ण विश्वात महासत्तेची बळावलेली असीम म्हत्वाकांक्षा व त्यातून होत चाललेल्या नैसर्गिक संसाधनाचा अंधाधुंद वापर हे सर्व करतांना मानव मानवीय विकासाचे उद्दिष्ट्ये व भावी पिढीच्या अस्तित्वाविषयीची जबाबदारीच पार विसरून गेला आहे. भारत क्षेत्रफळाच्या बाबतीत सातवा सर्वात मोठा देश आहे. चीननंतर दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे आणि जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेली लोकशाही. भारत हा देखील वेगाने वाढणारा विकसनशील देश आहे. वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि आर्थिक विकासामुळे पर्यावरणीय समस्या निर्माण होत आहे. आपले हिरवे जग आता धोक्यात आले आहे. मानवांनी पाणी आणि हवा प्रदूषित करून नैसर्गिक संसाधनांचा नाश केला आहे. आपण निर्माण केलेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आपण डोळे उघडले पाहिजेत. ओद्योगिक वाढीचा पर्यावरणावर खोलवर परिणाम झालेला आहे. लोक अधिक सोयीसाठी अधिक प्रदूषण उत्सर्जित करतात. मानवी कृतींचा पर्यावरणावर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे परिणाम होतो. उद्योगांच्या वाढीमुळे आणि रोजगाराच्या शोधात खेड्यांमधून शहरांकडे होणाऱ्या लोकांचे स्थलांतर यामुळे, योग्य घरांच्या समस्या आणि अस्वच्छ राहणीमानाच्या समस्येत नियमितपणे वाढ होत आहे. या कारणांमुळे प्रदूषणाचे घटक वाढले आहेत. पर्यावरणीय प्रदूषण हे पाच मूलभूत प्रकारांचे आहे; हवा, पाणी, माती आणि ध्वनी प्रदूषण, वन प्रदूषण वृक्ष तोडीमुळे वातावरणातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊन लोकांना वेगवेळे आजार होऊ लागलेले आहे.जंगले पृथ्वीचे मुख्य फुफ्फुस आणि विविध प्राणी, पक्षी आणि किटकांसाठी प्राथमिक निवासस्थान म्हणून काम करतात. जंगल तोड आणि मानवी क्रिया-कलापामुळे अनेक वन प्रजाती धोक्यात आलेले आहे. तंत्रज्ञान्याचा युगात मानवाने स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पर्यावरणाच्या मोठ्या प्रमाणावर शोषण केले आहे. यामुळे हरित गृह वायूंचे प्रमाण वाढले आहे. हवामानात झालेले बदल, जागतिक तापमन वाढीची महाभयंकर समस्या निर्माण झाली आहे. पृथ्वीला वाचविण्यासाठी शास्वत विकास फार महत्वाचा आहे . वैज्ञानिकानि, दिलेल्या गर्भित इशार्याचे गांभीर्य लक्ष्यात घेऊन संपूर्ण जगणे शास्वत विकासाची कास धरणे गरजेचे आहे.

**बीज शब्द :** पर्यावरण, प्रदूषण, नैसर्गिक संसाधने, हरती गृह, तापमान, आर्थिक विकास, ओझोन,

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.15817665
OPEN ACCESS

**Address for correspondence:**

*प्रा. डॉ. विठ्ठल निळकंठ ठावरी कला व वाणिज्य महाविद्यालय भिसी ता. चिमूर, जि. चंद्रपूर*
*गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली सलग्न*

**How to cite this article:**

*ठावरी, . विठ्ठल . निळकंठ . (2025). पर्यवरणीय आव्हाने आणि उपाययोजना. Journal of Research & Development, 17(5(II)), 108–113.* https://doi.org/10.5281/zenodo.15817665

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**प्रस्तावना :-**

प्राचीन काळापासून भारतीय पर्यावरणपूरक होते आणि भारतातील निसर्गाचे रक्षण आणि संगोपन धर्माने केले जात असे. हिंदू सूर्य, वर ,जमीन, झाडे, वनस्पती आणि पाण्याची पूजा करतात जे पृथ्वीवरील मानवी अस्तित्वासाठी मुलभूत आहेत. त्याचप्रमाणे गरुड, सिंह, मोर आणि साप यासारख्या वन्यजीवांचा आदर आणि संवर्धन हे अनादी काळापासून आपल्या सांस्कृतिक नीतिमत्तेचा भाग आहेत. भगवान राम आणि देवी सीतेचे संपूर्ण जीवन निसर्गाच्या अगदी जवळ होते. भगवत गीता निसर्गाला परा आणि अपरा असे दोन घटक असलेले एक अस्तित्व मानते. परा हा व्यवस्थेचा चेतना भाग आहे आणि अपरा हा त्याचा भौतिक भाग आहे. ऋग्वेद, सामवेद ,यजुर्वेद आणि अथर्ववेद विविध नैसर्गिक घटकांच्या श्रेष्ठतेला समर्पित स्त्रोतानी भरलेले आहेत. सिंधू संकृतीसारख्या पाण्याच्या स्त्रोतांजवळ संस्कृती अस्तित्वात आली आहे. मध्य भारतातील भिंबटका येथील दहा हजार वर्षे जुनी गुहा चित्रे दर्शवितात कि पक्षी, प्राणी आणि मानव सुसंवादाने राहत होते. सिंधू संस्कृती वन्यजीवांमध्ये मानवी रस असल्याचे पुरावे देते, जसे कि गेंडा, हत्ती, बैल इत्यादींच्या प्रतिमा दर्शविणाऱ्या सिलमध्ये दिसून येते. सर्व जीवनाचे परस्परसंबध आणि परस्परावलंबन पर्यावरणाचे एक मुलभूत तत्व 2000 वर्षापूर्वीच्या इसोपानियसमध्ये मांडण्यात आले होते. पवित्र वनस्पती आणि पवित्र उपवन हे प्राचीन भारतातील वृक्ष आणि वनसंवर्धनाचे सर्वोत्तम उदाहरण आहेत. बौद्ध पौराणिक कथांमध्ये, जातक (बुद्धाच्या मागील जीवनाच्या कथा ) बोधिसत्व आणि प्राण्यांच्या अनेक अवतारांनी भरलेले आहेत.

पर्यवरण आणि मानवीय विकास यांचे अतिदृढ नाते आहे. परंतु आज विकासाच्या नावावर भांडवलदार पुंजीपती सत्तेच्या हातात हात घालून जल, जमीन आणि जंगलाची पार वाट लावत आहे. त्याचा परिणाम पर्यावरणाची अपरिमित हानी होताना दिसून येत आहे. ज्याची सुरवात औद्योगिक क्रांतीपासून झालेली असली तरी. २१ व्या शतकात माहिती व आधुनिक तंत्रज्ञानाच्या अती वेगवान युगात होत चाललेल्या विकासाच्या गतीने संपूर्ण विश्वाला विकासाने एवढे झपाटले आहे कि, प्रत्येक राष्ट्र उत्पन्न, उत्पादन, रोजगार, राहणीमानाचा उच्च दर्जा आणि संपूर्ण विश्वात महासत्तेची बळावलेली असीम म्हत्वाकांक्षा व त्यातून होत चाललेल्या नैसर्गिक संसाधनाचा अंधाधुंद वापर हे सर्व करतांना मानव मानवीय विकासाचे उद्दिष्ट्ये व भावी पिढीच्या अस्तित्वाविषयीची जबाबदारीच पार विसरून गेला आहे.

या सर्व असीम लालसेचा परिणाम पर्यावरणाचा समतोल बिघडून वैश्विक उष्णतेच्या उद्भवलेल्या गंभीर समस्येने संपूर्ण जगालाच नव्हे तर, भूतलावरील समस्त मानवजातीच्याच अस्तित्वाला नाश्याच्या अगदी उंबरठ्यावर नेऊन ठेवले आहे. त्याचे गंभीर परिणाम देश्यात परतीच्या पावसाने जो कहर केला असून उत्तरभारत, उत्तराखंड, केरळ मध्ये उद्भवलेला जलप्रलय यातून ठळकपणे दिसून येत आहे. त्सुनामी, भूकंप, ढगफुटी, पूर, जंगलातील वणवे या सारख्या नैसर्गिक आपदांचा आज संपूर्ण जग सामना करताना दिसत आहे. अश्या प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती म्हणजे आज सामान्य बाब झाली आहे. कोवीड -१९ गेल्या शंभार वर्षातील सर्वात मोठी महामारी होय. अतिमहत्वाकांक्षी महासत्तेच्या नावावर समस्त जगावर एक हाती सत्तेच्या असीम लालसेने प्रेरित होऊन श्रीमंत राष्ट्राद्वारे खेळला जात असलेला व त्याचा संपूर्ण विश्वातील सर्वसामान्य मानव जातीला भोगावा लागत असलेला महाविनाश्याच्या विकृत खेळाचाच तो भयंकर परिणाम आहे. त्यामुळे आज जो निसर्गाचा झपाट्याने ऱ्हास होतांना दिसून येत आहे तो नैसर्गिक नसून मानवनिर्मित आहे. त्यामुळे निसर्गाची झालेली क्षती हि न भरून निघणारी आहे. हि अत्यंत गंभीर अशी बाब आहे.

पर्यावरणाच्या संवर्धनाच्या दृष्टीने सध्या असलेली स्थिती अतिशय चिंताजनक आहे. पृथ्वीच्या पर्यावरणाच्या ऱ्हासाचा अभ्यासकाकडून जो अंदाज लावल्या जात आहे. त्या अंदाजाच्या किमान शंभर पट वेगाने पृथ्वीचा ऱ्हास होत आहे. असे अनुमान आढळते. यामुळेच चालू शतक हे पृथ्वीचे अखेरचे शतक ठरण्याची भीती नाकारता तेत नाही. असे उद्गार सुप्रसिद्ध संशोधक व पदमभूषण डॉ . अनिल काकोडकर यांनी नागपूरच्या आंतरराष्ट्रीय उर्जा परीषदेला संबोधित करताना काढले. त्यांचे हे भाकीत बरेच काही सांगून जाते. भाविष्यकालीन पर्यावरण ऱ्हासाचे हे भाकीत म्हणजे मानव जातीवरील येणाऱ्या भयंकर संकटाची नांदीच ठरते.

मानव आपल्या दैनंदिन गरजा भागविण्याकरिता पृथ्वीच्या घटक द्रव्यांचा कच्चा माल म्हणून उपयोग करतो . वने, समुद्रातील मासे, जमिनीच्या पोटातील खनिज इ. घटकांचा वापर मानवाने साधन संपदा म्हणून केला आहे. मानवाची मानसिकता कशी असते ते आपण पाहू मन आहे तिथे इच्छा , इच्छा तिथे तृप्ती आणि वारंवार इच्छा तृप्त होत राहिली कि मग त्यातून लालसा उत्पन्न होते. या सततच्या पूर्ण होणाऱ्या लालसेतून अहंकार व अहंकारातून सत्ताप्राप्ती अश्या आणि याच मानवीय मानसिकतेतून समस्त जगामध्ये हा आर्थिक सत्ताप्राप्तीचा खेळ आणि निसर्गाचे ओरबडणे सतत सुरु आहे. आता हा महासत्तेचा खेळ वैश्विकरणाच्या प्रवाहात अतिशय जीवघेणा होत चालल्याचे आपण अगदी स्पष्टपणे पाहतो आहे. यामुळे या पृथ्वीचा व तिच्यातील स्तरांचा अतिशय दृद्रुगतीने ऱ्हास होत आहे. असेच मानवाकडून या पृथ्वीचे ओरबाडणे नाश अटळ आहे. त्यामुळेच सद्विवेकाने निसर्गाचा आदर व संवर्धन करणे हे भावी पुढच्या पिढीच्या अस्तित्वाकरिता अतिशय आवश्यक आहे. हे या भुतलवरील याचे भान ठेवणे हे या भूतलावरील समस्त मानव जातीला स्वत:चे या पृथ्वीवरील अस्तित्व टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे .

२१ व्या शतकातील सर्वात मोठी समस्या म्हणजे पर्यावरणातील बदल व वाढते वैश्विक उष्णतामान हे आहे. पृथ्वीच्या निर्मितीपासून पृथ्वीवरील हवामानात आजपर्यंत अनेक बदल घडून आले. परंतु २१ व्या शतकातील हवामानातील बदल हे निरंतर विकासाच्या हव्यासापोटी मानवाकडून पर्यावरणाच्या होत असलेल्या अपरिमित हानीमुळे असल्याने, समस्त जगाने त्याची गंभीर दाखल घेणे आवश्यक आहे. इंटर गव्हर्नमेंटल पनेल ऑफ क्लायमेट चेंज (आयपिसीसी ) या संयुक्त राष्ट्रसंघाने पर्यावरण ऱ्हासाचा अभ्यास करण्याकरिता स्थापन केलेल्या समितीच्या अध्ययनानुसार, संपूर्ण विश्वाची जी उष्णता वाढत आहे. त्याला जे जे घटक कारणीभूत ठरतात. त्या संपूर्ण घटकापैकी ९० टक्के वाटा हा मानवीय कार्यप्रणालीचा आहे. असा धक्कादायक निष्कर्ष काढला आहे. हि अत्यंत गंभीर बाब आहे. त्यामुळे वैज्ञानिकांनी दिलेल्या गर्भित इशार्याचे गांभीर्य लक्षात घेऊन जगाणे शाश्वत विकासाची कास धरणे गरजेचे आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**भारतातील पर्यावरणीय आव्हाने :**

भारत हा असा देश आहे जिथे लोकसंख्या आणि इतर घटकांमुळे संसाधनांची मागणी अधिक असते. या संपादन, वापर आणि वितरण प्रक्रियेत, भारताचे पर्यावरण विविध आव्हानांचा सामना करत आहे:

**१) कृषी संकटे :**

शेती ही भारतातील बहुसंख्य लोकांची मुख्य जीवनशैली आहे. १९६० च्या दशकाच्या उत्तरार्धात भारताने कृषी क्षेत्रात क्रांती घडवून आणली. तेव्हापासून, खते, कीटकनाशके आणि नवीन शेती पद्धतींचा वापर सुरू झाला आहे. तथापि, असे केल्याने, जमिनीची नैसर्गिक सुपीकता नष्ट होत आहे. शेतीची जमीन उच्च उत्पन्न नोंदवण्याची सेंद्रिय क्षमता गमावत आहे. शिवाय, खतांच्या वापरामुळे शेतीच्या मातीतील नैसर्गिक खनिजे कमी होत आहेत.

**२) पाण्याचे प्रदूषण :**

भारतातील पाण्याच्या दूषिततेचे मुख्य कारण औद्योगिकीकरण आहे. भारतातील उद्योग प्रक्रिया न केलेले पाणी आणि कचरा नद्यांमध्ये सोडत राहतात. परिणामी, संपूर्ण जलसाठा दूषित होतो आणि मानवी वापरासाठी योग्य नाही. दूषित जलसाठा पाण्यातील जलचरांना देखील हानी पोहोचवतो.

**३) हवामानात अकाली बदल :**

भारत आधीच जागतिक तापमानवाढ आणि त्याचे परिणाम अनुभवत आहे. अवकाळी पाऊस आणि वारंवार होणारे ऋतू बदल स्पष्ट आहेत. कर्नाटक सारखे राज्य, जे त्याच्या आल्हाददायक हंगामासाठी ओळखले जाते, ते आता उष्णतेच्या लाटा अनुभवत आहेत. हवामान बदलामुळे भारतातील हिमालयीन पर्वतरांगांमधील हिमनद्या वितळण्यासही कारणीभूत ठरले आहे. जर हिमनद्या वितळत राहिल्या तर विनाशकारी पूर येईल असा अंदाज तज्ज्ञांनी वर्तवला आहे.

**४) भूजलाची उपलब्धता नसणे :**

भारतातील असंख्य घरांमध्ये वापरल्या जाणाऱ्या भूजलाचे प्रमाण आधीच कमी होऊ लागले आहे. भूजलाची पातळी आधीच खाली गेली आहे. त्याव्यतिरिक्त, रासायनिक सांडपाणी आणि टाकाऊ पदार्थांमुळे उपलब्ध भूजल वापरासाठी अयोग्य झाले आहे. तसेच, भारतातील वाढती लोकसंख्या अधिक पाण्याच्या वापराची मागणी करत आहे, ज्यामुळे पुन्हा एकदा भूजलाच्या पातळीवर प्रतिकूल परिणाम होत आहे.

**५) सततची जंगलतोड:**

भारतातील प्रचंड गगनचुंबी इमारती आणि इमारती वनजमिनी नष्ट करण्याच्या किंमतीवर बांधल्या जात आहेत. भारतीय शहरांचा मोठा भाग वनजमिनी वापरून बांधकामांमध्ये गुंतलेला आहे. तसेच, धरणे बांधणे आणि सिंचन संयंत्रे बसवणे यामुळे जंगलांना धोका निर्माण होतो. या योजनांच्या दीर्घकालीन अंमलबजावणीत, जंगल बुडू शकते. वनस्पती आणि अधिवासासोबतच ते बुडतील.

भारत ज्या पर्यावरणीय आव्हानांचा सामना करत आहे त्यापैकी ही काही आव्हाने आहेत. या व्यतिरिक्त, हरितगृह वायूचे उत्सर्जन, ध्वनी प्रदूषण आणि इतर पर्यावरणीय प्रतिकूल परिस्थिती भारतात आहेत

पर्यावरणाच्या जागतिक घटनेला भारतही अपवाद नाही. मानसिक अधोगतीमुळे विकासात्मक उपक्रम, आर्थिक वाढ आणि पर्यावरणाच्या किमतीवर विकास ओध्योगीकरण आणि शहरीकरण (वाहतूक, जीवाश्म इंधन जाळणे ) द्वारे होणारा ऱ्हास आणि डीफारेस्ट्रेशन मुळे हिरव्या घराचे उत्सर्जन झाले आहे. ज्यामुळे जागतिक स्तरावर वायू निर्माण झाला. शाश्त्रास्त्रे आणि हवामान बदल, मानवी लोकसंख्या वाढ आणि शहरीकरणामुळे लक्षणीय जंगलतोड, जंगलतोडीमुळे मातीची धूप आणि गाळ साचतो. ज्यामुळे जमिनीचे आकार कमी होतात. जलाशय, अधिवास नष्ट झाल्यामुळे अनेक वनस्पती आणि प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

भारत क्षेत्रफळाच्या बाबतीत सातवा सर्वात मोठा देश आहे. चीननंतर दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे आणि जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेली लोकशाही. भारत हा देखील वेगाने वाढणारा विकसनशील देश आहे. वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि आर्थिक विकासामुळे पर्यावरणीय समस्या निर्माण होत आहे. भारतातील मानसिक समस्या जसे की पर्यावरणाचा ऱ्हास, ओध्योगिक सांडपाण्यापासून होणारे प्रदूषण आणि वाहन उत्सर्जन, घरातील वायुप्रदूषण आणि हवेची गुणवत्ता, सांडपाण्यापासून होणारे जलप्रदूषण, पुरेशा प्रमाणात स्वच्छता, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचा ऱ्हास, माती प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, जंगलतोड, शेतीच्या जमिनीचा ऱ्हास, अधिवासाचा नाश, जैवविविधतेचा नाश, संसाधनाचा ऱ्हास ( पाणी ,खनिज ,जंगल , वाळू ,खडक इ.), अन्न आणि उपजीविकेची असुरक्षितता, उर्जा असुरक्षितता, कचऱ्याचेखराब व्यवस्थापन. ( ई-कच-यासह, वैध्यकीय कचरा, प्लास्टिक आणि मायक्रोप्लास्टिक्स ), सूक्ष्मजीव विरोधी प्रतिकार शाश्वत वापर आणि उत्पादन इ.

अतिलोकसंख्या आणि त्याचा नैसर्गिक संसाधनावर आणि शेतीवर ताण. सर्व घटक जसे की, कीटकनाशके , अतीचराई, लहान लागवड चक्रे , कापणी आणि जाळण्याच्या पद्धती, विनाशकारी लाकूडतोड पद्धती आणि इंधनासाठी लाकडाच्या साठ्याची जंगलतोड हे सर्व योगदान देतात. पर्यावरणाच्या ऱ्हासाच्या अनुषंगाने वाढती लोकसंख्या आणि त्यामुळे होणा-या परिणामामुळे व्यवस्थापन हे भारतासाठी एक आव्हान आहे. पायाभूत सुविधांच्या गरजा, शेतीचे अवशेष जाळणे. ज्यामुळे प्रदूषक पातळी वाढते आणि हवेच्या गुणवत्तेत होणारी घसरण. ही देखील एक मोठी समस्या आहे. या सर्व पर्यावरणीय आव्हानांना तोंड देण्यासाठी एक नाविन्यपूर्ण पद्धत, आपल्या राहणीमानात बदल, नाविन्यपूर्ण विचारसरणी, एकत्मिकता आवश्यक आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**पर्यावरणीय समस्या :**

आपले हिरवे जग आता धोक्यात आले आहे. मानवांनी पाणी आणि हवा प्रदूषित करून नैसर्गिक संसाधनांचा नाश केला आहे. आपण निर्माण केलेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आपण डोळे उघडले पाहिजेत. औद्योगिक वाढीचा पर्यावरणावर खोलवर परिणाम झालेला आहे. लोक अधिक सोयीसाठी अधिक प्रदूषण उत्सर्जित करतात. मानवी कृतींचा पर्यावरणावर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे परिणाम होतो. परिणामी प्राणी आणि त्याच्या सभोवतालच्या परिसरामध्ये एक सहजीवन संबंध आहे .

१) **जागतिक तापमानवाढ:**

नैसर्गिक असंतुलनाचे सर्वात मोठे लक्षण म्हणजे जागतिक तापमानवाढ. जेव्हा हरितगृह वायू जमा होतात आणि तापमान वाढवतात तेव्हा आपल्याला हरितगृह परिणाम दिसून येतो. त्याचा परिणाम जागतिक महासागराच्या पातळीत वाढ आणि आर्क्टिक बर्फ वितळण्यावर होतो. तज्ञांच्या मते, किनारी देश आणि काही बेटे अनेक दशकांपर्यंत पाण्याने भरून जाऊ शकतात.

२) **वाढती लोकसंख्या:**

लोकसंख्या वाढत असताना, अन्न आणि निवासाच्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी लोकांना जास्त जागा आणि संसाधनांची आवश्यकता असते. कुरण आणि शेतीसाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी, लोकांनी झाडे तोडण्यास सुरुवात केली. जंगले पृथ्वीचे मुख्य फुफ्फुस आणि विविध प्राणी, पक्षी आणि कीटकांसाठी प्राथमिक निवासस्थान म्हणून काम करतात. जंगलतोड आणि मानवी क्रियाकलापांमुळे अनेक वन प्रजाती धोक्यात आल्या आहेत.

३) **ओझोन थराचा ऱ्हास:**

ओझोन थराचा ऱ्हास हा एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे ज्याचा सामना मानवजात करत आहे. ओझोन थर अतिनील किरणे शोषून घेतो, जे मानवांसाठी हानिकारक आहे. ओझोन छिद्रांची संख्या वाढल्याने अधिक तीव्र सौर किरणे निर्माण होतात आणि त्वचेच्या कर्करोगाचे प्रमाण वाढते.

४) **जंगलतोड:**

झाडे आणि वनस्पती मानवी जीवनाचे आवश्यक घटक आहेत. झाडे हवा, अन्न आणि औषधे देतात म्हणून सर्वांनाच त्याचा फायदा होतो. वाढत्या मागणीला पूर्ण करण्यासाठी जंगले तोडली जात आहेत. उन्हाळ्यात नैसर्गिक वणवे लागणे सामान्य आहे. नफा वाढवण्यासाठी लोक अनैतिक पद्धतीने झाडे तोडतात.

५) **हवामान:**

शतकापूर्वीच्या तुलनेत हवामान बदल अधिक वेगाने होत आहे. हवामान बदलाचा औद्योगिक प्रगतीवर परिणाम होत आहे. हवामान बदलामुळे विनाशकारी चक्रीवादळे, पूर आणि दुष्काळ निर्माण झाले आहेत. अलिकडच्या काळात, अनेक देशांना अनेक नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागला आहे.

६) **प्रदूषण:**

प्रदूषित वातावरणामुळे विविध आजार उद्भवू शकतात. वनस्पतींसाठी महत्त्वाच्या असलेल्या वनस्पती आणि वन्यजीवांच्या अनेक प्रजाती नष्ट होण्याच्या धोक्यात आहेत. निसर्ग संतुलन राखतो आणि सर्व जीवजंतूंच्या खाण्याच्या सवयी अन्नसाखळीत जोडल्या जातात, जसे आपण सर्वांना माहित आहे. पेट्रोलियम रिफायनरीज, रसायने, लोह आणि पोलाद, धातू नसलेली उत्पादने, लगदा आणि कागद उत्पादक आणि कापड उद्योग असलेल्या क्षेत्रात, औद्योगिक प्रदूषणाची समस्या अनेकदा गंभीर असते.

**पर्यावरणीय समस्येची कारणे :-**

उद्योगांच्या वाढीमुळे आणि रोजगाराच्या शोधात खेड्यांमधून शहरांकडे होणाऱ्या लोकांचे स्थलांतर यामुळे, योग्य घरांच्या समस्या आणि अस्वच्छ राहणीमानाच्या समस्येत नियमितपणे वाढ होत आहे. या कारणांमुळे प्रदूषणाचे घटक वाढले आहेत. पर्यावरणीय प्रदूषण हे पाच मूलभूत प्रकारांचे आहे; हवा, पाणी, माती आणि ध्वनी प्रदूषण, वन प्रदूषण

**वायू प्रदूषण:**

आजच्या जगात वायू प्रदूषण ही एक मोठी समस्या आहे. कारखान्यांच्या चिमण्या आणि मोटारींमधून निघणारा धूर आपण श्वास घेत असलेली हवा प्रदूषित करतो. कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनोऑक्साइड आणि सल्फर डायऑक्साइड सारखे वायू बाहेर पडतात जे हवेत मिसळतात आणि मानवी शरीर, वनस्पती आणि प्राण्यांना मोठे नुकसान करतात. आपल्या गावांमध्ये घरगुती इंधन म्हणून वापरल्या जाणाऱ्या कोरड्या शेतातील कचरा, वाळलेले गवत, पाने आणि कोळशामुळे देखील हानिकारक वायू निर्माण होतात. हवेत जास्त प्रमाणात सल्फर डायऑक्साइड असल्याने आम्ल पाऊस पडतो.

**जल प्रदूषण:**

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

जल प्रदूषण ही सर्वात गंभीर पर्यावरणीय समस्यांपैकी एक आहे. वाढत्या उद्योगांमधून निघणारे कचरा आणि सांडपाण्याचे पाणी नद्या आणि इतर जलसाठ्यांमध्ये सोडण्यापूर्वी योग्यरित्या प्रक्रिया केले जात नाही, ज्यामुळे प्रदूषण होते. अतिरिक्त खते आणि कीटकनाशके असलेल्या कृषी प्रक्रिया देखील जलसाठ्यांना प्रदूषित करतात.

१) **माती किंवा जमीन प्रदूषण:**

पर्यावरण प्रदूषणाचा पुढचा स्रोत माती आहे. प्लास्टिक, पॉलिथिन, बाटल्या इत्यादी टाकाऊ पदार्थांमुळे जमीन प्रदूषण होते आणि माती नापीक होते. शिवाय, माणसांचे आणि प्राण्यांचे मृतदेह टाकणे, कपडे आणि भांडी धुणे या समस्यांमध्ये भर पडते. हा पर्यावरणाचा एक अतिशय धोकादायक पैलू आहे कारण त्याचा परिणाम त्या भागाच्या आणि देशाच्या सुपीकतेवर आणि अन्न उत्पादनावर होतो.

२) **ध्वनी प्रदूषण:**

हा प्रश्न प्रदूषणाचा एक अतिशय सूक्ष्म प्रकार आहे. सर्व मानवी क्रियाकलाप मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषणास हातभार लावतात. वाहनांचे हॉर्न, लाऊड स्पीकर, संगीत प्रणाली, औद्योगिक उपक्रम या समस्येला हातभार लावतात.

ओझोनचा ऱ्हास, जागतिक तापमानवाढ, हरितगृह परिणाम, हवामान आणि हवामानातील बदल, हिमनद्या वितळणे इत्यादी समस्या पर्यावरणातील आणखी काही समस्या आहेत.

**पर्यावरणीय समस्या सोडविण्यासाठी उपाय :-**

पर्यावरण समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना अनेक आहेत, ज्यात कचरा व्यवस्थापन, अक्षय ऊर्जा वापर, पाणी आणि ऊर्जा बचत, वृक्षारोपण आणि प्रदूषण नियंत्रण यांचा समावेश आहे.

**१) कचरा व्यवस्थापन:**

**कचरा पुनर्वापर:**

कचरा पुनर्वापर करणे म्हणजे कचऱ्याचा योग्य वापर करणे, ज्यामुळे कचरा कमी होईल आणि नैसर्गिक संसाधने वाचतील.

**कचरा वर्गीकरण:**

कचरा प्लास्टिक, कागद, ग्लास, धातू आणि इतर प्रकारांमध्ये वर्गीकरण करणे, ज्यामुळे पुनर्वापर प्रक्रिया सोपी होते.

**कचरा कमी करणे:**

कचरा कमी करण्यासाठी, अनावश्यक वस्तू खरेदी करणे टाळणे, पुनर्वापर योग्य वस्तू वापरणे आणि प्लास्टिकचा वापर कमी करणे आवश्यक आहे.

**२) अक्षय ऊर्जा वापर:**

**सौर ऊर्जा:**

सौर ऊर्जा (solar energy) वापरणे म्हणजे सूर्यप्रकाशाचा ऊर्जा निर्मितीसाठी उपयोग करणे, ज्यामुळे जीवाश्म इंधनाचा वापर कमी होतो आणि प्रदूषण कमी होते.

**पवन ऊर्जा:**

पवन ऊर्जा (wind energy) वापरणे म्हणजे वाऱ्याचा ऊर्जा निर्मितीसाठी उपयोग करणे, ज्यामुळे प्रदूषण कमी होते आणि नैसर्गिक संसाधने वाचतात.

**स्वच्छ ऊर्जा:**

जीवाश्म इंधनाऐवजी स्वच्छ आणि अक्षय ऊर्जा वापरणे, जसे की सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि भूऔष्णिक ऊर्जा, आवश्यक आहे.

**३) पाणी आणि ऊर्जा बचत:**

**पाणी बचत:**

पाण्याचा योग्य वापर करणे, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि पाण्याचे पुनर्वापर करणे, ज्यामुळे पाण्याचा पुरवठा टिकून राहतो.

**ऊर्जा बचत:**

वीज वापर कमी करणे, ऊर्जा-दक्ष उपकरणे वापरणे आणि ऊर्जा वाचवण्यासाठी उपाय करणे, ज्यामुळे ऊर्जा खर्च कमी होतो आणि प्रदूषण कमी होते.

४) **वृक्षारोपण:**

**झाडे लावणे:**

अधिक झाडे लावणे, ज्यामुळे कार्बन डायऑक्साइड शोषला जातो, हवा शुद्ध होते आणि नैसर्गिक संतुलन राखले जाते.

**वन्यजीवनाचे संरक्षण:**

जंगलांचे संरक्षण करणे आणि वन्यजीवनाचे संरक्षण करणे, ज्यामुळे जैवविविधता टिकून राहते.

**५) प्रदूषण नियंत्रण:**

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**वायू प्रदूषण:**

वायू प्रदूषण कमी करण्यासाठी, कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या हानिकारक वायूंचे नियंत्रण करणे, वाहनांची नियमित तपासणी करणे आणि पर्यावरणासाठी अनुकूल वाहतूक पद्धती (public transportation) वापरणे आवश्यक आहे.

**जल प्रदूषण:**

जल प्रदूषण कमी करण्यासाठी, दूषित पाणी साफ करणे, कचरा पाण्यात टाळणे आणि रासायनिक कचरा योग्य पद्धतीने व्यवस्थापित करणे आवश्यक आहे.

**कचरा प्रदूषण:**

कचरा व्यवस्थापन योग्य करणे आणि कचरा कमी करणे, ज्यामुळे प्रदूषण कमी होते.

**६) इतर उपाय:**

**पर्यावरण अभ्यास:**

पर्यावरण अभ्यास लोकांना पर्यावरणीय समस्या आणि आव्हानांबद्दल शिक्षित करतात, ज्यामुळे ते अधिक जागरूक होतात आणि पर्यावरण संरक्षणासाठी कृती करण्यास प्रोत्साहित होतात.

**सामुदायिक सहभाग:**

पर्यावरण संरक्षणासाठी सामुदायिक सहभाग घेणे, लोकांना एकत्र आणणे आणि पर्यावरण संरक्षणासाठी काम करणे आवश्यक आहे.

**पर्यावरण धोरणे:**

कठोर पर्यावरण धोरणे लागू करणे, बेकायदेशीर वृक्षतोड रोखणे आणि पर्यावरणाचे संरक्षण करणे आवश्यक आहे.

***निष्कर्ष :-***

तंत्रज्ञानाच्या युगात मानवाने स्वत:च्या गरजा पूर्ण करण्यासाठी पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर शोषण केले आहे. यामुळे जल प्रदूषण, वायू प्रदूषण हरितगृह वायूंचे वाढलेले प्रमाण, हवामानात झालेले बदल, जागतिक तापमान वाढीची महाभयंकर समस्या, जैवविविधतेचा होणारा. ऱ्हास यामुळे पर्यावरण संवर्धनासाठी पाणी वाचवणं, पाण्याचा पुनर्वापर करणे, कचरा व्यवस्थापन करणे, प्लॅस्टिक वापरावर निर्बंध घालाणं. जंगल संरक्षण, वृक्षरोपण, अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा वापार करणे, हरितगृह वायूंच्या निर्मितीवर प्रतिबंध कारणं, जैवविविधतेचे संवर्धन करून पर्यावरणाचा समतोल राखणं यासारख्या उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१) https://www.resarchget.net

२) https://unsademy.com

3) https://mr.m.wikipidia.org

४) देसाई डॉ.स.श्री.मु.भालेराव, डॉ.सौ.निर्मल-भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन पुणे

५) उमाठे रमेश,ठाकरे रेखा-पयार्वरण शास्त्र, विसा बुक्स, नागपूर-२००७

६) झामरे डॉ.जी.एन. भारतीय अर्थव्यवस्था व पर्यावरणात्मक अर्थव्यवस्था, पिंपळापुरे पब्लिकेशन, नागपूर – २०१६

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# महाविद्यालयीन मुली आणि मुलांची भावनिक बुद्धिमत्ता, लवचिकता यामधील सहसंबंध

**डॉ.मिलिंद भगवानराव बचुटे**
आर.सी .पटेल कला ,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,शिरपूर जिल्हा धुळे
**Email** milindbachute@ymail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-1705026
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 114-116
May 2025
**Submitted:** 10 Apr. 2025
**Revised:** 22 Apr. 2025
**Accepted:** 21 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश (Abstract)**

प्रस्तुत अभ्यासाचा उद्देश कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये भावनिक बुद्धिमत्ता आणि लवचिकता यामधील सहसंबंधाचा अभ्यास करणे हा आहे . यादृच्छिक नमुना पद्धतीने निवडलेल्या शिरपूर शहरातील विविध शाखांमधील १९ ते २५ वयोगटातील ३५४ विद्यार्थ्यांचा (१८८ मुली आणि १६६ मुले) अभ्यासामध्ये समावेश करण्यात आला.संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या साधनांमध्ये भावनिक बुद्धिमत्ता,लवचिकता या प्रश्नावलीचा समावेश होता. वारंवारिता वितरण, सहसंबंध गुणांक आणि स्वतंत्र टी-चाचणीच्या साहाय्याने डेटाचे विश्लेषण करण्यात आले. निष्कर्षांनुसार, भावनिक बुद्धिमत्ता आणि लवचिकता यांच्यात सकारात्मक आणि महत्त्वपूर्ण सहसंबंध आढळला. या व्यतिरिक्त, मुले आणि मुली यांच्या लवचिकतेमध्ये कोणताही सांख्यिकीयदृष्ट्या लक्षणीय फरक दिसून आला नाही.

**कीवर्ड्स (Keywords):**भावनिक बुद्धिमत्ता, लवचिकता, विद्यार्थी, मुले, मुली ,

**प्रस्तावना**

**१.१. भावनिक बुद्धिमत्ता :** भावनिक बुद्धिमत्ता हा अभ्यासाचा एक नवीन विषय आहे, जरी त्याची सैद्धांतिक मुळे डार्विनच्या उत्क्रांती सिद्धांतामध्ये आढळतात. डार्विनने असा युक्तिवाद केला की भावनिक अभिव्यक्ती जगण्यासाठी आवश्यक आहे. सालोवे आणि मेयर (१९९०) यांनी भावनात्मक बुद्धिमत्तेची संकल्पना सर्वप्रथम मांडली, ज्याची व्याख्या त्यांनी "सामाजिक बुद्धिमत्तेचा उपसंचय" अशी केली, ज्यामध्ये "स्वतःच्या आणि इतरांच्या भावना आणि मनोवृत्तींचे निरीक्षण करण्याची, त्यांमध्ये भेद करण्याची आणि या माहितीचा उपयोग आपल्या विचार आणि कृतींना मार्गदर्शन करण्यासाठी करण्याची क्षमता" समाविष्ट आहे.

**१.२. भावनिक बुद्धिमत्तेचे मुख्य घटक**

अ. स्व-जागरूकता (Self-awareness) ब . स्व-नियंत्रण (Self-regulation)

क . प्रेरणा (Motivation) ड. सहानुभूती (Empathy)

इ. सामाजिक कौशल्य (Social Skills)

**१.३. भावनिक बुद्धिमत्तेची भूमिका**

**अ. तणाव व्यवस्थापन:**

उच्च भावनिक बुद्धिमत्ता असलेले विद्यार्थी परीक्षा, स्पर्धा, आणि कालमर्यादेच्या दबावांना अधिक चांगल्या प्रकारे सामोरे जाऊ शकतात उदा. एखाद्या विद्यार्थ्याला प्रकल्प सादर करण्यासाठी कमी वेळ असल्यास, भावनिक बुद्धिमत्ता मदत करते. घाबरुन न जाता योजनाबद्ध पध्दतीने काम पूर्ण करेल.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations are licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817682
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*डॉ.मिलिंद भगवानराव बचुटे ,आर.सी .पटेल कला ,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,शिरपूर जिल्हा धुळे*

**How to cite this article:**
*बचुटे, . मिलिंद . भगवानराव . (2025). महाविद्यालयीन मुली आणि मुलांची भावनिक बुद्धिमत्ता, लवचिकता यामधील सहसंबंध. Journal of Research & Development, 17(5(II)), 114–116.* *https://doi.org/10.5281/zenodo.15817682*

**ब. सामाजिक संवाद:**

गटप्रकल्प, चर्चा, आणि शिक्षक-विद्यार्थी संवाद सुधारण्यासाठी भावनिक बुद्धिमत्ता आवश्यक आहे उदा. समुहात सहभागी विद्यार्थी इतरांच्या दृष्टिकोनातून विचार करून संघात सहकार्य वाढवतात.

**क.आत्म-प्रेरणा:**

भावनिक बुद्धिमत्तेच्या मदतीने विद्यार्थी दीर्घकालीन ध्येयांसाठी स्वतःला प्रेरित ठेवू शकतात.

**१.४ लवचिकता :**

सकारात्मक मानसशास्त्रामध्ये लवचिकता हा एक प्रमुख विषय आहे. लवचिकता म्हणजे समस्या आणि आघातांवर मात करण्याची आणि त्यातूनही अधिक मजबूत होण्याची क्षमता. लवचिकता प्रक्रियेत दोन महत्त्वाचे निकष आहेत:

**सकारात्मक समायोजन :**

1. मोठ्या धोक्यांना किंवा गंभीर अडचणींना सामोरे जाताना, त्या कठीण परिस्थितीतही व्यक्ती सकारात्मक समायोजन साधते उदा. आर्थिक संकट, कुटुंबातील तणाव यांसारख्या प्रतिकूल घटनांनंतरही व्यक्तीची मानसिक स्थिरता टिकून राहणे.

**ब. धोका आणि संरक्षणात्मक घटकांचा परस्परसंवाद :**

**१ धोक्याचे घटक :**

धोक्याचे घटक हे अशा परिस्थिती किंवा घटना आहेत ज्या नकारात्मक परिणामांची शक्यता वाढवतात उदा. दारिद्र्य, मानसिक आजार, पालकांचा घटस्फोट.

**२. संरक्षणात्मक घटक :**

संरक्षणात्मक घटक व्यक्तीला धोक्यापासून सुरक्षित ठेवतात उदा. सामाजिक समर्थन, भावनिक स्थिरता, सकारात्मक पालकत्व.

**1.संशोधन पद्धती**

**२.१ उद्देश –**

प्रस्तुत अभ्यासाचा उद्देश कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये भावनिक बुद्धिमत्ता आणि लवचिकता यामधील परस्परसंबंधांचा अभ्यास करणे हा आहे .

**२.२ परिवर्तके**

**स्वतंत्र परिवर्तक**

मुली

मुले

**परतंत्र परिवर्तके**

भावनिक बुद्धिमत्ता

लवचिकता

**२.३. गृहीतक-**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा आणि लवचिकतेचा सहसंबंध आहे.

**२.४. नमुना –**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत शिक्षण घेणारे शिरपूर शहरातील विद्यार्थी

| विद्यार्थी | संख्या |
|---|---|
| मुली | १८८ |
| मुले | १६६ |
| **एकूण** | ३५४ |

**२.५. साधन**

भावनिक बुद्धिमत्ता प्रश्नावली

लवचिकता प्रश्नावली

**२.६. मर्यादा-** या अभ्यासाचा नमुना म्हणून शिरपूर शहरातील विद्यार्थ्यांची निवड .

**२.७. निष्कर्ष**

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**तक्ता १. प्रयुक्ताच्या वयानुसार वारंवारिता वितरणाची टक्केवारी**

| केंद्रीय प्रवृत्ती वितरण कल वितरण बहुलक मध्यक मध्यमान Range प्रसरण SD S कुर्टोसिस | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **भावनिक बुद्धिमत्ता** | ४ | ३.२५ | ४.३२० | ३.३४ | ३४ | ५.८ | -२.२३० | २.६७६ |
| **लवचिकता** | ४.५ | ३.३४ | ४.४०० | ४.३० | ३० | ५.४ | -०.४१५ | -०.३७६ |

**तक्ता २. भावनिक बुद्धिमत्ता आणि लवचिकतेच्या सहसंबंध गुणांक.**

तक्ता २. मध्ये दर्शविलेल्या निकालांनुसार, भावनिक बुद्धिमत्तेच्या गुणांकाचा मध्यमान २४.२२ आणि प्रमाण विचलन ८.३८ आहे. त्याचप्रमाणे लवचिकतेच्या गुणांकाचा मध्यमान २५.६१ आणि प्र-/माण विचलन ७.६७ आहे. भावनिक बुद्धिमत्ता आणि लवचिकता यांच्यातील सहसंबंध गुणांक r = ०.६८ आहे, जो एक महत्त्वपूर्ण सकारात्मक संबंध दर्शवतो(p < ०.०५). यावरून असा निष्कर्ष येतो की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील शिरपूर शहरात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये भावनिक बुद्धिमत्ता आणि लवचिकता यांचा सकारात्मक आणि महत्त्वपूर्ण संबंध आहे. हा निष्कर्ष खोर्दझंगनेह आणि इतर यांच्या निष्कर्षांशी सुसंगत आहे, ज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या लवचिकता आणि भावनिक बुद्धिमत्ता यांच्यात महत्त्वपूर्ण सकारात्मक संबंध आढळला होता.

**टेबल ३. मुले आणि मुलींची लवचिकता याचे t गुणांक.**

| परिवर्तक | लिंग | नमुना संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | t | )p-value) |
|---|---|---|---|---|---|---|
| **लवचिकता** | मुले | १६६ | १६.७० | २.१० | ०.८१ | ०.३२ |
| | | | | | | |
| | मुली | १८८ | १६.७९ | २.१० | | |

तक्ता ३ मध्ये दर्शविलेल्या निकालांनुसार, मुले आणि मुली यांच्या लवचिकतेच्या माध्यांची तुलना करण्यासाठी केलेल्या स्वतंत्र टी-

तक्ता ३ मध्ये दर्शविलेल्या निकालांनुसार, मुले आणि मुली यांच्या लवचिकतेच्या माध्यांची तुलना करण्यासाठी केलेल्या स्वतंत्र टी-चाचणीमध्ये मुलींचे सरासरी लवचिकता मूल्य १६.७९ असून प्रमाण विचलन २.१० आहे तर t मूल्य ०.८१ असून सार्थकता पातळी p = ०.३२ आहे, जी ०.०५ पेक्षा जास्त आहे. यावरून असे स्पष्ट होते की मुले आणि मुली यांच्या लवचिकतेमध्ये फरक नाही. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट विद्यापीठातील शिरपूर शहरात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांमध्ये लवचिकता यामधील परस्परसंबंध निकालांनी दर्शविले की भावनिक बुद्धिमत्ता आणि लवचिकता यांच्यात महत्त्वपूर्ण संबंध आहे. हा निकाल खोर्दझंगनेह आणि इतर यांच्या निकालांशी सुसंगत आहे, त्यांनी मुले आणि मुली विद्यार्थ्यांच्या लवचिकता, भावनिक बुद्धिमत्ता आणि आनंद यांच्या गुणांची तुलना केली आणि दर्शविले की लवचिकता आणि आनंद यांचा विचार केल्यास पुरुष आणि महिला विद्यार्थ्यांमध्ये कोणताही महत्त्वपूर्ण फरक नव्हता.

**संदर्भ:**

1. Baron-Cohen, S. (2003). The Essential Difference.
2. Brody, L.R. (1999). Gender, Emotion, and the Family.
3. Goleman, D. (1995). Emotional Intelligence.
4. Khordzanganeh, F., Heidarie, A.R. and Naderi, F. (2014) The Relationship
5. between Emotional Intelligence, Happiness and Resilience with Mental Health
6. in Male and Female High School Students of Ramhormoz City. Indian Journal of
7. Fundamental and Applied Life Science, 4, 633-641.
8. Mayer, J.D., & Salovey, P. (1997). What is Emotional Intelligence?

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# मराठी विज्ञान साहित्याची भविष्यकालीन वाटचाल आणि कृत्रिम बुद्धिमत्ता

**प्रा.डॉ.कोमल वि ठाकरे**
तायवाडे कॉलेज महादुला, कोराडी नागपूर
**Email:**thakrekomal40@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-1705027
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 117-121
May 2025
**Submitted:** 10 Apr. 2025
**Revised:** 22 Apr. 2025
**Accepted:** 21 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश**

कुठल्याही साहित्याच्या भविष्यकालीन वाटचालीचा विचार करताना त्या साहित्याचे मूलभूत स्वरूप कसे आहे व आजतागायत त्यांनी केलेली वाटचाल कशी आहे, याचा प्रथम विचार करावा लागतो. या पार्श्वभूमीवर प्रथमतः आपण स्थूल स्वरूपात मराठी विज्ञान साहित्याचे स्वरूप समजावून घेऊ.

विज्ञान जाणीवांचे, विज्ञाननिष्ठ आशयाचे साहित्य म्हणजे विज्ञान साहित्य होय. यातून विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा मानवी जीवनावर कसा परिणाम होतो याचे चित्रण केलेले असते. विज्ञान जाणिवांमधून मानवी जीवनाचा शोध घेणारे हे साहित्य आहे. आजच्या आणि उद्याच्या विज्ञानाच्या पर्यावरणात मानवी नातेसंबंधाचा, त्याच्या अस्तित्वाचा, त्याच्या जीवनात आज माहीत नसलेली सुखदुःखे भविष्यात कशी अनुभवायला मिळणार आहे याचा सृजनवेध घेण्यात येतो. तसेच यातून विज्ञानातील शोध, वैज्ञानिकांचे जीवन व त्यांचे कार्य याचाही परिचय करून देण्यात येतो. प्रचलित ज्ञानावर कल्पनेची झालर लावून रंजक करून हे साहित्य लिहिण्यात येते. शोध न लागलेल्या पण कल्पनेत शोध लागलेल्या आधारावर लिहिलेल्या विज्ञान साहित्यात कल्पनाप्रधानता खूप प्रमाणात आढळते. कल्पनेमुळे आश्चर्य वाटते. औत्सुक्यही वाढते आणि वाचकाचे मनोरंजनही होते. कल्पना आणि वास्तवाचा समन्वय साधून आश्चर्यकारक व मनोरंजक अशा कथा कादंबऱ्यांनी विज्ञान साहित्याचे विश्व समृद्ध केलेले आहे. विज्ञान साहित्यातून वैज्ञानिक सत्यावर प्रकाश टाकण्यात येतो ते सत्यवाचकाला माहीत नसले तरी ते स्वीकारण्याच्या मनस्थितीत तो असतो. विज्ञान साहित्यिक हे सत्य हळूहळू भविष्यात कसे प्रकट होणार आहे ते कसा वेगळा आकार धारण करणार आहे, त्याचा मानवी जीवनावर कसा परिणाम होणार आहे याचा उलगडा करीत असतो. वाचकाचे भविष्याबद्दल जाणून घेण्याचे कुतूहल तो जागे करतो. तसेच त्यातून काही नवीन वाचल्याचा आनंदही वाचकमनाला मिळतो. एकूणच विज्ञानशोधाचा भविष्यकाळातील वेध घेणे हे विज्ञान साहित्याचे वेगळेपण ठरते.

नित्याच्या रूढ साहित्यापेक्षा विज्ञानसाहित्याची अनुभवसृष्टी ही वेगळी आहे. ती विज्ञान विषयाशी संबंधित आहे. सर्वसाधारणपणे मराठी विज्ञान साहित्यातून ऊर्जा समस्या, पर्यावरण बदल, यंत्रमानव, संगणक व माहिती तंत्रज्ञान, वस्तुमान प्रक्षेपण, विश्वबंधुत्व, लोकसंख्यावाढ,क्लोनिंग, जैवतंत्रज्ञान, जनुक अभियांत्रिकी, सूक्ष्मजीवशास्त्र, अमरत्वाच्या रूपाने येणारे वैद्यकशास्त्र, टेलिपॅथी, अवकाशप्रगती आणि लढाया, कालप्रवास, मानवी अवयवाचे प्रत्यारोपण, ऐतिहासिक, पौराणिक संकेतावर आधारित नव्या कल्पनांचा आविष्कार, अनुयुद्ध, वैज्ञानिक हेरगिरी, सागरी वसाहत, पृथ्वीवरील सजीव व खगोलामधील संघर्ष, परग्रहवासी जीवांची परस्परांशी व पृथ्वीची भेट, बायोमेडिसीन, नॅनोटेक्नॉलॉजी व गुन्हे तपास इत्यादी विषय विज्ञानसाहित्यातून प्रकट झालेले आहेत.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा.डॉ.कोमल वि ठाकरे तायवाडे कॉलेज महादुला, कोराडी नागपूर*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.15817690

OPEN ACCESS

**How to cite this article:**
*ठाकरे, . कोमल . वि . (2025). मराठी विज्ञान साहित्याची भविष्यकालीन वाटचाल आणि कृत्रिम बुद्धिमत्ता. Journal of Research & Development, 17(5(II)), 117–121.*
*https://doi.org/10.5281/zenodo.15817690*

.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

मानवजातीच्या विकासाला सहाय्यभूत ठरलेले वैज्ञानिक शोध, या शोधातून मानवाने साधलेला आश्चर्यकारक विकास या सर्व गोष्टींना विज्ञानसाहित्यात स्थान असते. विज्ञान साहित्याच्या उपासकांनी विज्ञानाचा उपयोग मानवी संरक्षणासाठी की संहारासाठी करायचा हे ठरविणारे संस्कारशील मन विज्ञान साहित्यातून विकसित करता येईल का याचाही विचार करायला हवा.

स्थूलपणे आजपर्यंत झालेल्या मराठी विज्ञान साहित्याच्या विकासात्मक वाटचालीचे टप्पे खालीलप्रमाणे सांगता येतील

**1) विसाव्या शतकातील द्वितीय महायुद्ध पूर्वकाळ: सन 1900 ते 1939 पर्यंतचा कालखंड**

- या काळात विज्ञान समजावे, मराठी वाचकांची विज्ञान शिक्षणात रुची वाढावी यासाठी पाठ्यपुस्तकापेक्षा निराळे रूप देण्यासाठी लेखकांनी भाषा सोपी केली. आकृत्या कमी केल्यात. विषयात विविधता आणली. या काळात साहसावर आधारित विज्ञान कथा लिहिल्या जात होती. ती कथा परीकथेचे रूप धारण करणारी होती. या काळात कथा कमी विज्ञानही जास्त असायचे. 19 वे शतक हे रसायनशास्त्राचे होते. या काळातील कथा शास्त्रीय शोधाच्या होत्या. मानवी जातीवर होणाऱ्या परिणामाची व उपायांची चर्चा या साहित्यातून सुरू झालेली होती. या काळात विज्ञान कल्पनांवर आधारित कथा होत्या. धूमकेतूचा प्रवास, रेडियमचा परिणाम याबद्दलचे समज गैरसमज या आशयाच्या कथा या काळात लिहिल्या गेल्या होत्या. 1900 मध्ये केरळ राज्यातील कोचीन येथून निघणाऱ्या 'केरळकोकीळ' या कृष्णाजी नारायण आठल्ये यांनी संपादित केलेल्या नियतकालिकातून ज्यूल्स व्हर्ण यांच्या मेन इन द मून या कादंबरीचा 'चंद्रलोकची सफर' हा मराठीतील अनुवाद प्रकाशित झाला. या अनुवादित लेखनावरून मराठी विज्ञान साहित्यनिर्मितीची सुरुवात झाली. इ.स. 1912 साली वा. गो. आपटे यांनी ' एक दिवसाच्या सुट्टीत' ही पहिली विज्ञानकथा लिहिल्याचे वाङमयीन संज्ञा संकल्पना कोशात उधृत केले आहे. इ.स. 1910 साली ह्यालेच्या धूमकेतूच्या शेंडीमध्ये विषारी रेणू असतात. त्या शेंडीतून पृथ्वी जाणार, त्यामुळे माणसे मृत्युमुखी पडण्याची शक्यता असते. या शास्त्रज्ञांच्या मतामुळे देशभर खळबळ माजली होती. त्या पार्श्वभूमीवर 1915 ला श्री बा रानडे यांनी 'तारेचे रहस्य' ही कथा लिहिली. मराठी विज्ञान कथेची ही सुरुवात होती. 1916 ला वामन जोशी यांच्या 'अदृश्य किरणांचा दृश्य प्रकाश' व 'वामलोचना' या कथा प्रकाशित झाल्या. 1923 मध्ये चित्रमय जगत मध्ये त्र्यं. र. देवगिरीकरांची 2018 व शरद लोकांची सफर या कथा प्रसिद्ध झाल्यात. सन 1934 मध्ये भा.रा भागवतांनी 'मंगळावर स्वारी' ही पहिली अंतराळ कथा लिहिली 1932 ला ना.के बेहेरे यांनी 'ध्येयाकडे' ही विज्ञान कादंबरी लिहिली. 1926ला गो.रा. परांजपे ह्यांनी 'सृष्टीज्ञान' हे पहिले मराठी विज्ञानविषयक मासिक काढले. या काळात हंस आणि नवल या मासिकांनी विज्ञान कथेला प्रसिद्धीसाठी प्राधान्य दिले.

**2) विसाव्या शतकातील द्वितीय महायुद्धा दरम्यानचा व महायुद्धोत्तर काळ: सन 1939 ते 1945 व पुढे 1945 ते 2000 पर्यंतचा कालखंड –**

या काळातील विज्ञान कथेत प्रस्थापित विज्ञान आणि कल्पनाविलास याचा तोल सांभाळला जात होता. या काळातील लेखकांनी प्रस्थापितांशी विज्ञानाचे नाते सांभाळत कथा लिहिली. दुसऱ्या महायुद्धानंतर बदललेल्या राजकीय सामाजिक प्रश्नांच्या बदलत्या रूपाचा आविष्कार या काळातील कथामधून झाला. या काळात विद्यापीठे निर्माण झाली. वैज्ञानिक धोरण तयार झाले. विज्ञान संशोधनाला उत्तेजन मिळाले. या काळातील वेगाने बदलणाऱ्या वैज्ञानिक घटनांचा परिणामही संवेदनशील शास्त्रज्ञ लेखकांवर झाला. त्यातून विज्ञानसाहित्यनिर्मितीलाही वेग आला. मराठी विज्ञानसाहित्य प्रकाशित होण्यासाठी सृष्टीज्ञान, विज्ञानयुग, मराठी विज्ञान परिषद पत्रिका यासारख्या नियतकालिकांनीही प्रोत्साहन दिले.

हे शतक भौतिक प्रगतीचे होते. संगणक व माहिती तंत्रज्ञानाचे होते. युद्धामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान कसे असते, अवकाश युद्धे, विज्ञानावरचे चित्रपट, विज्ञान कथा, मानसशास्त्र यावरही या काळात लिहिले आहे. पूर्वीच्या विज्ञानसाहित्यातील आकृत्या, वैज्ञानिक माहिती आता तोंडी लावण्यापूर्ती यायला लागली आहे. कथामधून माणसामाणसामधले व्यवहार, राजकारण, ताणतणाव, नैतिक घटना याचा परस्पर संबंध प्रकट व्हायला लागला. अंतर्मुख करणाऱ्या विनोदी कथा, सामाजिक आशयाच्या कथा, रहस्यमय कथा, धार्मिक कथा, प्रेमकथाही लिहिल्या जाऊ लागल्या. भाषा सोपी, आकर्षक, अर्थवाही, सुटसुटीत अशी झाली. भालबा केळकर यांनी 'विज्ञानाला पंख कल्पनेचे' या विज्ञान कथासंग्रहातून विज्ञान कथेच्या स्वरूपाबद्दल शास्त्रीय माहिती दिली. याच काळात भा.रा भागवतांच्या रूपांतरित कथा 'बालमित्र' नियतकालिकातून प्रकाशित झाल्या. त्यांचा 'उडती तबकडी' हा कथासंग्रह 1966 ला प्रकाशित झाला. पुढे त्यांनी युरोपमधील विज्ञान कथांचे मराठीत दर्जेदार रूपांतर केले. 'झपाटलेला प्रवासी', 'समुद्र सैतान', 'अदृश्य माणूस' या कथा-कादंबऱ्यांच्या माध्यमातून विज्ञान साहित्याला लोकप्रियता मिळवून देण्याचे कार्य भागवतांनी केले. त्याच काळात दि.बा मोकाशी यांनी 'बालचंद्र' हा विज्ञान कथासंग्रह लिहिला. त्यात पृथ्वीवरील हवामान, अनुयुद्धात नष्ट झालेल्या संस्कृतीनंतरची संस्कृती, यंत्रमानव, परग्रहावरील संस्कृतीशोध या विषयावर आधारित कथा आहेत. 1962 ला यशवंत रांजणकर यांनी 'नवल नगरी' 1958ला द. पा. खांबोटे यांनी 'माझे नाव रमाकांत वालावलकर' व 'चंद्रावरचा खून' असे साहसप्रधान कथासंग्रह प्रकाशित केलेत. द. ची. सुमन यांनी भारतीय पर्यावरणावर आधारित अनेक कथा लिहिल्या. बाबा केळकर, डॉ. जयंत नारळीकर, लक्ष्मण लोंढे, निरंजन घाटे, आ.ना.पेंडणेकर, रमेश सरदार, बाळ

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

फोंडके, प्रा.रा.वि.सोवणी, चंद्रकांत पाटील, शुभदा गोगटे, भैय्या पवार, सुबोध जावडेकर, यशवंत देशपांडे, अरुण मांडे, द.व्य. जहागीरदार, रेखा बैजल, डिगणकर, माधुरी शानभाग, वसंत गोवारीकर अशा अनेक लेखकांनी कथा कादंबऱ्या लिहून मराठी विज्ञान साहित्य समृद्ध केले.

**3) 21 व्या शतकाचा कालखंड: सन 2000 ते 2024 –**

या काळातील विज्ञानसाहित्य आशयासोबत रचनातंत्र, घाट आणि शैलीला महत्त्व देत प्रकट होऊ लागले. मराठी विज्ञानसाहित्याचे एक स्वतंत्र वांग्मयप्रकार म्हणून मराठी साहित्यप्रांतात श्रेष्ठत्व सिद्ध होण्यास सुरुवात झाली. इसवी सन 2000 नंतर जवळपास 300 पुस्तकं विज्ञानसाहित्यावर मौज, राजहंस, मनोविकास, मेहता, पद्मगंधा, डायमंड, रोहन, ग्रंथाली, नचिकेत, स्नेहवर्धन आणि मराठी विज्ञान परिषदेने प्रकाशित केलेली आहेत. आरती वासंती विज्ञान कथा विशेषांक 2014, विज्ञानिनी-२ आणि मन्वंतर या संग्रहातून विज्ञानकथांना या काळात स्थान मिळाले. एकूणच विज्ञान साहित्याचे पाश्चात्य संस्कृतीशी नाते असले तरी त्यांची मूल्यप्रणाली ही भारतीय जीवनाशी निगडित राहिली आहे. मातीशी नाते सांगत अवकाशाचा वेध घेणारे हे विज्ञान साहित्य आहे.

**भविष्यकाळातील मराठी विज्ञान साहित्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता**

भविष्यकालीन मराठी विज्ञान साहित्याच्या वाटचालीचा विचार करताना प्रामुख्याने लक्षात घ्यावे लागेल की, विज्ञानसाहित्याचा पाया हा त्या त्या काळाचे मानवी जीवन आणि त्या जीवनात आलेले विज्ञान यांची परस्परावर झालेली आंतरक्रिया, त्यासोबतच भविष्यातील विज्ञानविकासाचे रंगविले गेलेले स्वप्नचित्र, त्याचा लेखकाच्या व्यक्तिमत्वाशी असणारा संबंध यातून आकारास आलेले आहे. भविष्यकालीन साहित्याचे स्वप्न रंगवितांना त्यात पुढील काळात मानवी जीवनामध्ये विज्ञानाचा प्रभाव कसा व कितपत राहील, त्यांच्या दैनंदिन जीवनात विज्ञान किती प्रवेश करेल यावर ते अवलंबून राहणार आहे. विज्ञानाची जी गती होती ती मागच्या काळात किती व कशी होती? दुसऱ्या महायुद्धांनंतरच्या काळात ती गती किती वाढली? आज आपल्या जीवनाला विज्ञानाने किती व्यापले आहे? अर्थातच १९२० मध्ये विज्ञान आपल्या जीवनावर जितका प्रभाव गाजवित असेल निश्चितमानाने त्यापेक्षा आता जास्त प्रभाव गाजवित आहे. लेखक हा त्या जीवनाचा प्रतिनिधी आहे. त्याच्या जीवनावर या विज्ञानाने काय परिणाम झाला हे आपल्या लक्षातच येत आहे. आता आपल्याला भविष्यातील म्हणजेच २१ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत विज्ञान साहित्याची वाटचाल कशी असेल? यावर विचार करावा लागेल.

अतिशय वेगवान गतीने बदलणाऱ्या जगाचे, विज्ञानाचे परिणाम साहित्यावर पडणे स्वाभाविकच आहे. विज्ञानसाहित्य हे मानवी भावभावनांचे साहित्य आहे. त्या मानवी भावविश्वाला आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगाने व्यापलेले आहे. या गतीने बदलणाऱ्या युगाची स्पंदने भविष्यात लिहिल्या जाणाऱ्या साहित्यातून प्रतिबिंबित झालेली असेल. आज दैनंदिन जीवनाचे इतके तपशील वाढले की, त्याची गणनाही करू शकत नाही. प्रत्येक काळात जसे विज्ञान बदलले तसे मानवी जीवनही बदलत गेले. याही काळात मानवी जीवनावर त्याचा चांगला वाईट परिणाम होईल. त्यामुळे मानवी व्यक्तिमत्व बदलेल. त्यांच्यातील परस्परसंबंध बदलतील. त्यामुळे कथा, कादंबऱ्यांची भविष्यकाळातील रचनाही बदलेल. वस्तूमय तपशील बदलतात तसेच मनाचे तपशीलही बदलत जातात॰ (म्हणजेच मोबाईलच्या आजच्या युगात 'पत्र' ही कादंबरी कोणीही लिहिणार नाही.) तशी साहित्याची रचनाही बदलत जाईल. आंतरराष्ट्रीय मानवी जगण्यात बदल होईल. त्यांचे जीवन गतिशील होईल. कोरोनासारख्या सूक्ष्मजीवाणूने केलेल्या जीवहानीनंतरच्या विश्वाची वेदनाही त्यातून प्रकट होईल.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या रोबोर्टचा मानवी जीवनावर भविष्यात होणारा परिणाम हा भविष्यातील विज्ञानसाहित्याचा विषय असेल. एजीआय आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्स यामुळे मनुष्य जातीचा अंत जवळ असल्याचे मत पद्मश्री डॉ. गणेश देवी यांनी नुकतेच व्यक्त केले. ते म्हणाले की, सोफिया या कृत्रिम बुद्धिमत्तायुक्त रोबोटला सौदी अरेबियाने नागरिकत्व दिले होते. या सोफियाने एका मुलाखतीत मनुष्य जातीचा नायनाट करणे हा आपला उद्देश असल्याचे सांगितले. सोफियाचीच प्रजाती आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्स आहे.(एजीआय)एजीआयचे संशोधन मनुष्यजातीचा अंत जवळ असल्याचे सांगणारी घटना असल्याचा विचार त्यांनी व्यक्त केला. एजीआयचा एक समूह निर्माण झाला आहे. त्यामुळे आता जे आंदोलन करावे लागेल ते आंदोलनाचे आंदोलन असेल हेही त्यांनी सांगितले. युगवाणीच्या अंकात नुकताच मी विजय तांबे यांचा मानवी सर्जकता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यावरचा लेख वाचला. त्यात ते म्हणाले की, तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा वेग अफाट असतानाच नोव्हेंबर 2022 मध्ये ओपन ए.आय. कंपनीने बाजारात चॅट जीपीटी 3.5 बाजारात आणला आणि जगात खळबळ माजली. हा चॅट जीपीटी तुम्ही विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतो. उत्तर कसं हवं ते त्याला सांगा एका मिनिटाच्या आत उत्तर मिळतं. आपल्या कल्पनेतला, व्यवहारातला कुठलाही कोणताही प्रश्न मांडा आणि उत्तराचे स्वरूप लिहा तर आपल्याला उत्तर मिळेल. समजा मी आता अमळनेरला विज्ञानाची भविष्यकालीन वाटचाल या विषयावर भाषण देत आहे. या आशयाचे मुद्दे मला हवेत, निबंध हवाय तो लगेच देतो. समजा अमळनेरमधील साहित्य संमेलनाचे वर्णन केले आणि त्यावर कविता मागीतली तर तो लगेच कविता देतो. तुम्हाला जे हवं ते मुद्दे लिहून चॅटजीपीटीकडे सादरीकरण स्वरूपात मागा एका मिनिटात सादरीकरण मिळते. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याहीपुढे जाऊन मार्च 2023 मध्ये ओपन ए.आय.ने चॅट जीपीटी 4 आणि 5 ही पुढची आवृत्ती बाजारात आणली. ती अधिकच प्रगत आहे. त्यात शब्द, प्रतिमा, आवाज असेल डॉ. हिंटन यांनीही कृत्रिम बुद्धिमत्ता बाजारात आणली आहे त्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेचे पितामह म्हणतात. आपण या प्रणालीसमोर काही शब्द, प्रतिमा, सूत्र, माहिती लिहिली. तर त्याची सुसंगती लावून हे यंत्र

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

निष्कर्षासह मांडणी करून आपल्याला देते. याचा अर्थ असा आहे की पुढे आपल्याला संशोधनग्रंथ निर्मितीची गरजच राहणार नाही. आपल्याला काय अपेक्षित आहे ह्या गोष्टी त्रोटक स्वरूपात जरी मांडल्या तरी त्या आपल्याला सूत्रबद्ध पद्धतीने प्राप्त होतील. याही पुढे जाऊन समजा काही शब्द, प्रतिमा टाकून, विषय देऊन मला ग्रेसच्या शैलीतील कविता मागायची आहे. तर ती तशीच कविता आपल्याला ते कृत्रिम यंत्र देईल. आपल्याला ती ग्रेसची अप्रकाशित कविता वाटेल. हे सर्जनशील प्रतिभावंताकरता फार मोठे आव्हान आहे. हव्या तशा कथा, कविता, कादंबऱ्या, चित्र आपल्याला जर मिळाले तर साहित्याच्या क्षेत्रामधील सर्जनशीलता तो सहज खाऊन टाकेल. मग अशावेळी नक्की सर्जकता कोणती? आणि मी सर्जक सजीव माणूस म्हणून वेगळा कसा सिद्ध होणार? या प्रश्नावर गंभीरपणे चर्चा करण्याची वेळ आता आली आहे. कारण त्यात बेरोजगारीची समस्या ही प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. हे भविष्यकालीन मराठी विज्ञान साहित्यातील मोठे अवघड प्रश्न असणार आहेत. बेरोजगारांना उदरनिर्वाहासाठी पैसे देणारी युनिव्हर्सल बेसिक इन्कम युबीआयही आर्थिक संकल्पना आहे. ही युबीआय देऊन आम्हाला कुठलेच काम राहणार नाही. कारण आमच्यापेक्षा अधिक ज्ञान, कौशल्य, सर्जनता, कला या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या रोबोटकडून मिळेल. आम्ही फक्त बेरोजगार आस्वादक होऊ. अशावेळी आपला आत्मसन्मान तर टिकून राहणार नाहीच शिवाय आपण मरेपर्यंत जगावे म्हणून यूपीआयने फेकलेल्या तुकड्यावर जगावे लागेल. हा प्रश्न सर्व सर्जन आणि बिनसर्जकांसमोर उभा ठाकेल. याचा सर्जकांनाच विचार करावा लागेल.

माझ्या मते भविष्यकालीन विज्ञानसाहित्याचे आशयकेंद्र हे तीन स्तरावरील असेल

**1) वास्तवाधारित विज्ञान जाणिवांवर आधारित**

अर्थात प्रत्यक्ष ज्ञान, प्रत्यक्ष वैज्ञानिक जाणीव, विज्ञान विषयक माहिती यावर आधारित हे विज्ञान साहित्य असेल. या विज्ञानसाहित्यशी लोक जास्त समरस होतील.

**2) संभावनीयतेच्या तत्त्वावर आधारित**

यात संभवनीयतेच्या तत्त्वावर आधारित भविष्यात विज्ञान कथा कादंबऱ्या असू शकतात. विज्ञान साहित्यिकाला द्रष्टाची दृष्टी असते. ऑर्थर क्लार्कच्या कथांतील भविष्यवादी कल्पना आज विज्ञानातील वास्तवरूपाने प्रकटल्या आहेत. 1940 च्या दशकात मांडलेली उपग्रहाद्वारे दळणवळणाची कल्पना आज प्रत्यक्षात वापरात आलेली आहे. श्री लक्ष्मण लोंढे यांच्या ऑक्टोबर 2007 साली प्रकाशित झालेल्या थँक्यू मिस्टर फॅरेडे या पुस्तकात 'संदर्भ' नावाच्या कथेतील एक संवाद असा आहे की 'पुरुषांना बाळंत होता येणार आहे का?''अगं होईल तेही शक्य होईल'.ही संभाव्य शक्यता 2008 च्या जुलैमध्ये ब्रिटन मधील थॉमस बॅटी नावाच्या पुरुषाने कन्येला जन्म दिल्याच्या बातमीने सिद्ध केली. पुराणातील पुष्पक विमाने किंवा अग्निबाण हे आज आपल्यासमोर दिसत आहेत.

**3) केवळ कल्पनाधारित**

केवळ कल्पनेच्या आधारावर विज्ञान साहित्याची निर्मिती ही फारसा पाया नसणारे साहित्य असेल. अशाप्रकारच्या साहित्यातून साहित्यिक हे कल्पनेच्या उत्तुंग भराऱ्या मारू शकतील. हे केवळ कल्पनेत रंगविणारे मनोरंजन करणारेच साहित्य असेल. अशाप्रकारे भविष्यातीलविज्ञानसाहित्याचे आशयकेंद्र हे त्रिस्तरीय असेल असे मला वाटते.

**शेवटी श्रेष्ठ मराठी साहित्य आणि मराठी विज्ञान साहित्य**

या संदर्भात विचार करताना अर्थात श्रेष्ठ मराठी साहित्याच्या निकषावर मराठी विज्ञानसाहित्याचा विचार करताना आपल्याला श्रेष्ठ मराठी साहित्याचे ढोबळमानाने निकष लक्षात घेणे आवश्यक आहे माझ्या मते तीन प्रकारच्या निकषावर आधारित आपण कलाकृतीचे मूल्यमापन करू शकतो.

**सौंदर्यमानता :**

यामध्ये कलाकृतीची अभिव्यक्ती कशी असेल अर्थात ही कलाकृती किती रचनात्मक असेल, तिचा घाट किती सुंदर असेल, संवाद, विरोध, समतोल हे सुसंवादाचे तत्व त्यात किती पाळलं गेलं असेल? यावरून त्या साहित्याची सौंदर्यवत्ता आपल्याला लक्षात येईल. एखाद्या कलाकृतीच्या रचनेतील सौंदर्यतत्त्वावरून त्या कलाकृतीची महत्ता लक्षात येईल.

**आस्वाद्यमानता**

कलाकृतीचा आशय किती आस्वाद्य आहे? तो किती रसपरिपूर्ण आहे. याला महत्व देण्यात आलेले आहे. कलाकृती रचनादृष्ट्या किती सुंदर आहे त्याचबरोबर ती किती आस्वाद्य आहे, रस परिपूर्ण आहे? यावरून त्या कलाकृतीची आस्वाद्यमानता ठरेल.

**संप्रेरकता**

त्या कलाकृतीतून तिच्या सौंदर्यपूर्ण आशयातून आपल्याला प्रेरणा मिळायला हवी. त्यातून प्रबोधन व्हावे, नैतिक मूल्याचा प्रसार त्यातून व्हावा. अर्थात ती कलाकृती नुसता कलावाद न राहता जीवनवाद व्हावा. बोधवाक्यातून मिळणाऱ्या ज्ञानापेक्षा कलाकृतीतून मिळणारे ज्ञान हे जास्त उद्बोधक, प्रबोधक असते. म्हणून त्या विशिष्ट कलाकृतीने आपल्याला कोणते जीवनसत्व बहाल केले? कोणती उद्बोधक अशी प्रेरणा दिली? यावरून त्या साहित्यकलाकृतीची संप्रेरकता ठरेल. उपरोक्त तिन्ही घटकांच्या सेंद्रिय रचनेवरून ती

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

कलाकृती श्रेष्ठ होते. या निकषावर विज्ञान साहित्य उतरले तर ते सर्जनशील साहित्य असेल. त्या साहित्यातील सौंदर्यमानता, आस्वाद्यमानता आणि संप्रेरकता हे त्या साहित्याचेएक उत्कृष्ट कलाकृती म्हणून श्रेष्ठत्व सिद्ध करेल असे मला वाटते.

**संदर्भ ग्रंथ** :

1. डॉ. म. सु. पगारे, मराठी विज्ञानसाहित्य, प्रशांत पब्लिकेशन, पुणे 2004
2. डॉ.सुदर्शन दिवसे, विज्ञानवादी मराठी साहित्य: शोध आणि बोध,कला महविद्यालय, कोरपना 2017
3. जोसेफ तुस्कानो, वेधक विज्ञानकथा, डिंपल पब्लिकेशन, ठाणे 2009
4. जयंत श्रीधर येरण्डे, मराठी विज्ञानसाहित्याचा इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 2018
5. विजय तांबे, मानवी सर्जकता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता, युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, नागपूर 2023
6. 6 डॉ. गणेश देवी, लोकमत, दिनांक 20-01-2024
7. वाङ्मयीन सज्ञा संकल्पना कोश, भटकळ फाउंडेशन, मुंबई 2001

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# सदानंद देशमुख यांची कादंबरी ' बारोमास ' ,'तहान' ,'चारीमेरा ' यातील कथानक संदर्भात....

**गीतांजली बाबुरावजी सातपुते.**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ.नागपूर
वैदर्भीय ग्रामीण कादंबरीचा चिकित्सक अभ्यास (बाबाराव मुसळे, नामदेव कांबळे, सदानंद देशमुख ,मिलिंद कांबळे, प्रतिमा इंगोले) यांच्या विशेष संदर्भात.
**Email-**anjalidigraskar1@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-1705028
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 122-126
May 2025
**Submitted:** 10 Apr. 2025
**Revised:** 22 Apr. 2025
**Accepted:** 21 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश:-**

सदानंद देशमुख', यांच्या 'तहान ' , 'बारोमास ' , 'चांरीमेरा' या तिन्ही कादंबरी वाचताना आपल्या एक लक्षात येतं की, सदानंद देशमुख हे अस्सल ग्रामीण कादंबरीकार आहेत .त्यांच्या कादंबरीची भाषा, त्यांच्या कादंबरीचे मन, कादंबरीतील शब्द, आपल्याला ग्रामीण जीवनात घेऊन जातात .शहरी जीवनात वागताना ,रमताना ग्रामीण जीवनात असणाऱ्या हाल-अपेष्टा आपल्या लक्षातच येत नाही. पण सदानंद देशमुख यांच्या या कादंबऱ्या वाचताना ग्रामीण जीवनातील दुःख आपल्या लक्षात येतं. जेव्हा अशिक्षित समाज दुःखाने होरपडतो, तेव्हा वाटतं की यांनी शिकावं; पण जेव्हा सुशिक्षित समाज सुद्धा दुःखात होरफडतो त्यांच्या शिक्षणाचं कोणतेही मूल्य त्यांना मिळत नाही. शिक्षण, प्रामाणिकता, मेहनत, सत्यता या गोष्टींना कुठेच धारा मिळत नसून भ्रष्टाचार, पैसा ,राजकारण, असत्यता अव्यवस्थितता याच गोष्टी समाजात डोकं वर काढून वावरतात ,तेव्हा प्रश्न पडतो आता काय करायचं? शिक्षणाचं ओझं डोक्यावर घेऊन जर बेरोजगाराच्या रांगेत उभे रहावं लागत असेल तर परत प्रश्न पडतो शिकावं की अशिक्षित रहावं? सदानंद देशमुख यांच्या या ग्रामीण कादंबऱ्या या सर्व प्रश्नांची यादीच आपल्यासमोर मांडतो आणि परत प्रश्नावर प्रश्न पडतात की आता काय करावे? काय करावे की हा ग्रामीण समाज पुढे येईल? काय करावं की सुशिक्षतांच्य आयुष्यात सुद्धा सुखाचे क्षण येईल? काय करावं की या देशातील भ्रष्टाचार ,राजकारण ,आपलेपणा दूर होऊन प्रामाणिकता, सत्यता आणि मेहनत या गोष्टीला महत्त्व मिळेल आणि खऱ्या व्यक्तीला त्याची योग्य ती जागा मिळेल. या सर्व प्रश्नांना भांडावून सोडणारी कादंबरी म्हणजेच सदानंद देशमुख यची बारोमास, तहान, चारीमेरा या ग्रामीण कादंबरी होत.

**मुख्य शब्द** :-- तहान शिंगाड, इसाळेल- पिसाळेल शिवळा, भेंदुळयातला,कलमा -हलमा, डव्हात, मानगी,

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817940
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*गीतांजली बाबुरावजी सातपुते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ.नागपूर वैदर्भीय ग्रामीण कादंबरीचा चिकित्सक अभ्यास (बाबाराव मुसळे, नामदेव कांबळे, सदानंद देशमुख ,मिलिंद कांबळे, प्रतिमा इंगोले) यांच्या विशेष संदर्भात.*

**How to cite this article:**
*सातपुते, . गीतांजली . बाबुरावजी . (2025). सदानंद देशमुख यांची कादंबरी ' बारोमास ' ,'तहान' ,'चारीमेरा ' यातील कथानक संदर्भात. Journal of Research & Development, 17(5(II)), 122–126.*
*https://doi.org/10.5281/zenodo.15817940*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

राच्ची इराच्ची,आलप, बटकीच्यायहो, इल्म्, गुलूलां, सुखढाळ, टमरेल, भुई,राष्ट्रानात,

२) वावटळ, उबगलेली अवस्था,पल्डा,,सापल्डी, बुडशेंडे,हारहारल्या, खिंडोऱ्यातल, डबड, धनपायाळ पाणी पायाड, इजपायड ,भूतपायाड हारणकाळजी,धरमधावणी, उन्हाडभरणीची, जित्राब, सोडपिच्छा, बाशिंगबडाच्या, कंदाडाची, बुकलून, नखरचखर, इसमल्यासारखं, कल रसासारखं ,नादर, हुमकारा, कळकल्या,

ग्राम' हा शब्दच मनुष्याला दोन भागात विभाजित करून जातो;

तो म्हणजे ग्रामीण आणि शहरी... शहरी भागातील प्रत्येक संवेदना लिहिणाऱ्या व्यक्ती , सांगणाऱ्या व्यक्ती अवतीभोवती मिळतात .शहरातील प्रगती, शहरीकरणाचे फायदे, तिथे मिळणाऱ्या सोयी.. सुविधा, तेथील मनुष्याचे जीवन यातील सर्व काही आपल्याला सांगणाऱ्या व्यक्ती मिळतात. जणू त्या दिसतात; शहरात गेलं की त्या जाणवतात. त्यांचं दिसणं आणि त्यांचं असणं यात फारशी तपावती असतच नाही, पण याउलट असतो तो ग्रामीण भाग. ग्रामीण भागामध्ये जे दिसतं ते तसंच असेल हे सांगता येत नाही. प्रत्येक ग्रामीण भागात, प्रत्येक घरात एकेक कादंबरी..... एकेक आत्मचरित्र वसलेल आहे ; असं त्यांच्या जीवनावर जीवनानुभवावरून आपल्या लक्षात येईल. पण त्याविषयी हवं उत्कटतेने त्यांच जीवन , त्यांचा जीवनानुभव , त्यांच आयुष्य बघणारा... जगणारा व्यक्ती. ग्रामीण भागातील दुःख , ग्रामीण व्यक्ती कधी स्वतःची दुःख चिवडताना चीरघडताना दिसत नाही .स्वतःच्या मनाशी स्वतःच्या मनाच्या कुपीत ते दळून ठेवून स्वतः त्यासोबत संघर्ष करत रहाने, ही ग्रामीण माणसाची सवय आहे. त्यामुळे असा लेखक की जो या ग्रामीण जनतेच्या मनात उतरून त्यांच्या मनाच्या संवेदना कागदावर उमटवतो तोच महान ग्रामीण लेखक होईल असं वाटतं.

अशाच महान ग्रामीण कादंबरीकारांमध्ये सदानंद देशमुख यांचे नाव अग्रक्रमात घ्यावं लागेल असं मला वाटतं सदानंद देदेशमुखांच्या बारोमास तहान व चारी मेरा या तीन महान कादंबऱ्या. या कादंबऱ्याच्या पृष्टाळू पृष्ठांमध्ये ग्रामीण माणसाच्या संवेदना आपल्याला जाणवतात या कादंबऱ्या वाचताना आपण या कादंबऱ्या वाचत नसून त्यांचा आयुष्य वाचत आहोत किंबहुना ते आयुष्य जगत आहोत असं वाटल्याशिवाय राहणार नाही. या तिन्ही कादंबऱ्या ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीचे जीवन उलगडून दाखवणार आहेत असं वाटतं या कादंबऱ्या नुसत्या त्यांचे दुःखच चिरगळणारे आहेत असं नाही तर त्या दुःखावर उपायही सांगणार आहे बस समाज सुधारकांनी आणि राजकारणांनी त्या उपायानुसार जर चाललं तर शहर ग्रामीण भाग सुद्धा शहरासारखा प्रगतीच्या वाटेवर लागेल एवढी अनमोल संदेश या कादंबऱ्या देऊन जातात.

'तहान',.....ही सदानंद देशमुख यांची पहिली कादंबरी १९९८ साली ती प्रसिद्ध झाली आणि ग्रामीण भागातील वेदना या कादंबरीने चव्हाट्यासमोर मांडल्या. जो ग्रामीणभाग, जी ग्रामीणव्यक्ती आपले दुःख, आपल्या भावना, आपल्या संवेदना आपल्या उराशी बागळून जगत होतं त्या ग्रामीण भागातील ह्या सर्व संवेदना चव्हाटवर आणण्याचे काम या ग्रामीण कादंबरीने केलं. ग्रामीण भागातील लोक हे जगतात ? ते खरंच जगतात का ? की जगण्याच्या नावावर फक्त सोसतात ? आणि ते असे कधीपर्यंत जगतील ? या कादंबऱ्या या प्रश्नाच्या निर्मितीस कारण ठरल्या. सारंगपूर अकोला जिल्ह्यातील एक छोटस गाव. या गावांमध्ये राहणारे एक ग्रामीण कुटुंब. ज्यांच्याजवळ शेती आहे;शेतात राबणारे बैल आहे. मुलगा मुलगी असे एक थोडेफार का होईना पण सदन कुटुंब. या कुटुंबामध्ये असणारा कुटुंबप्रमुख 'राघोजी शेवाळे' या कादंबरीचा नायक. तहान ही कादंबरी राघोजी शेवाळे आणि त्यांची बैल छबिल्या व मुरल्या या भोवती आणि त्यांनी निर्माण केलेल्या प्रसंगाभोवती फिरणारी आहेत. सारंगपूर या गावांमध्ये सर्वात महत्त्वाची समस्या आहे ती पाण्याची. उन्हाळ्याचे चार महिने हे गाव पाण्याअभावी तहानेने व्याकुळ असतं; ही तहान भागवण्यासाठी प्रत्येक व्यक्ती आपापल्या परीने काही ना काही तडजोड करतात. राघोजी शेवाळे हा सुद्धा आपल्या कुटुंबाची तहान भागवण्यासाठी आपल्या छबिल्या आणि मुरल्या या बैला सोबत मिळून ,शेतासोबतच घरी पाणी आणण्याचे काम करतो. या कहाणी मध्ये खलनायक म्हणून भूमिका बजावते ती राघोजी शेवाळे यांची बायको 'रामकोर'. रामकोरला पाण्याच्या तहान सोबतच, पैशाची तहान सुद्धा कधी लागून जाते हे तिलाच कळत नाही. या दोघांचा मुलगा बबन शेवाळे. आपल्या गावातील पाण्याची समस्या ओळखून त्या पाण्याच्या समस्येवरच व्यवसाय करण्याच ठरवतो आणि त्याचे दोन बैल छबीला आणि मुरल्या या दोघांच्या पाठीवर पाण्याने भरलेले ड्रम ; हे मोठ्या टेकडीवरून.... उतारावरून खाच, खडकातून तो सतत आणतो. त्याला जे पैसे मिळत जातात त्यामुळे त्याची हाव इतकी वाढत जाते, त्याची तहान इतकी वाढत जाते , की तो त्या बैलाच्या जीवाकडे न पाहता पैसे मिळवण्यासाठी रात्रंदिवस त्यांच्याकडून पाणी आणण्याचे काम करून घेतो. आणि ते पाणी गावामध्ये विकून त्यापासून मिळणाऱ्या पैशातून रामकोर् स्वतःला, मुलगी वर्षा तिला नवीन कपडे , दागदागिने, घरी लागणारी

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

आणखी इतर भांडी हे सर्व काही घेते . या कादंबरीचा नायक राघोजी शेवाळे हा आपल्या बैलाचा चाललेला छळ बघून नुसता तडफडत राहतो; पण त्याच्या हातात काहीच नसतं . या कादंबरीचा शेवटही एवढाच भयानक लेखकाने रंगवलेला आहे . राघोजी शेवाळे यांचा जीव की प्राण असणारे त्यांचे बैल, छबीला आणि मुरल्या याच पाणी डोहारल्याने हतबल होऊन जातात . त्यांच्या शरीरात फक्त हाड शिल्लक राहते. आणि एके दिवशी ते दोघेही मरून पडतात त्यांच सर्व शरीर कावळे कुरतडत असतात आणि त्यांच्या त्या वेदना त्यांचा तो वेदनादाह अंत बघून कादंबरीचे नायक राघोजी शेवाळे सुद्धा स्वतःच्या अंताकडे बघत असतात हे तहान कादंबरी चे कथानक .

साहित्य अकादमी पुरस्कार (२००४), प्राप्त सदानंद देशमुख यची कादंबरी म्हणजे 'बारोमास'..... बारोमास ही त्यांची अस्सल ग्रामीण कादंबरी .ग्रामीण माणसाच्या जीवनाचे व्यवस्थित आणि अंगोपंगांनी वर्णन करणारी ही कादंबरी. या कादंबरीमध्ये वाशिम जिल्ह्यातील सांजोळ या गावचे कुटुंब साधारण शेती करणार आणि शेतीवरच जगणार असं हे कुटुंब. या कुटुंबाची कहाणी म्हणजेच बारोमास... बारोमास या नावामध्येच या कादंबरीचे कथानक लपलेल आहे, असं म्हटल्यास वावगं होणार नाही. शेतकरी त्यांचे जीवन आणि त्यांच्या आयुष्यातील प्रश्न ही बाराही महिने सारखीच असतात. बारावी महिने ते नुसते लढत असतात. कधी निसर्गाशी , कधी समाज व्यवस्थेशी, कधी राजकारन्याशी, कधी सावकाराशी, कधी स्वतःच्या घरच्या वादावादीशी , तर कधी आरोग्याशी. यांच्या आयुष्याला लागलेली हे सर्व ग्रहण बाराही महिने यांच्यासोबत असतात. हीच ग्रहने यांच आयुष्य कसं संपवून टाकतात यांचं मर्मभेदी वर्णन म्हणजेच बारोमास.

बारोमास या कादंबरीमध्ये सदानंद देशमुख यांनी सुशिक्षित अशा एकनाथ या नायकाची कहाणी वर्णन केलेली आहे. एकनाथ, त्याची बायको अलका, आई शेवंता, वडील सुभान ,भाऊ मधु ,बहीण रुक्मिणी आणि तिचा नवरा रावसाहेब. या सर्वांच्या आयुष्यात घडलेलं घटनाक्रम या कादंबरीत शोकांतिकेद्वारे वर्णन केलेल आहे. सुभानराव शेतकरी असून सुद्धा आपल्या एकनाथ आणि मधू या दोन्ही मुलांना काबाळ, कष्ट करून शिक्षण देतात. एकनाथ हा बीएड होतो तर मधु हा सुद्धा ग्रामसेवकाची परीक्षा पास करतो. पण या दोघांच्याही नशिबात नसतो तो पैसा . पैसा असल्याशिवाय आपल्या देशात तरी नोकरी नाही हे लाजिरवाणी सत्य सांगून जाणारी ही कादंबरी. या कादंबरीच्या प्रत्येक घटनांमध्ये असं वाटतं की शिक्षण झाल्यावर जर यांना नोकरी मिळाली असती तर....... एकनाथ च आयुष्य काही वेगळंच असतं नाही...... पण जर... तर आणि आयुष्य यामध्ये खूप मोठ अंतर आहे हेच ही कादंबरी सांगून जाते. आयुष्यभर मरमर करून आपल्या मुलांना शिकवून तरी त्यांना नोकरी मिळत नसली तर हे शिक्षण घेतलेली मुलं अपंग झाल्यासारखे वागतात. शिक्षणामुळे त्यांना शेतातील काम करताच येत नाही कारण ती त्यांनी केलेली नसते. आणि नोकरी नसल्यामुळे काय करावं हा प्रश्न त्यांच्या उभ्या आयुष्यात आ वासून असतो .अशाच समस्यामध्ये शहरी भागातील अलका नावाची एकनाथ ची बायको ही या वातावरणात स्वतःला सामावून घेण्यात कमी पडते. आणि त्यामुळे एकनाथलां एकांगीआयुष्य जगावं लागतं. शेतीमध्ये सुद्धा नवीन नवीन प्रयोग करण्याची कल्पना करणारा, तरी ना कधी निसर्ग साथ दे, नाही पैसा . शेतात न पिकल्यामुळे देणे कऱ्याचे देणंच तो पूर्ण करू शकत नाही, तर त्याची स्वप्न कधी पूर्ण करणार? त्यामुळे काय करावं? हा एक मोठा प्रश्न बाराही महिने यांच्यासमोर राहतो.यांच्याच हदबलतेचा फायदा सावकार लोकं घेतात थोड्या थोड्या पैशासाठी यांच्याकडून हवे त्या गोष्टी नावावर करून घेतात. पैशावर चक्रवाढ व्याज, त्यावर आणखी खोटे व्यवहार करून यांच्याकडून यांचे हक्काचा वावर सुद्धा कसं स्वतःच्या पदरी पाडून घेतात यांचे विदारक वर्णन या कादंबरीत आहे. एक नात्याचा भाऊ मधु सुशिक्षित असून सुद्धा नोकरी न मिळाल्यामुळे अंधश्रद्धेच्या आहारी कसं जातो हे सुद्धा मार्मिकतेने या कादंबरी सांगितलेला आहे. शेतकऱ्यापेक्षा शेतमजूर सुखी पण शेतकरी नाही हे सुद्धा सांगून जातं. शेतकऱ्यांच्या आत्महत्या का होतात ? शेतकरी आत्महत्या का करतात? या सर्व प्रश्नांची उत्तर ही कादंबरी वाचताना आपल्याला मिळते. ही कादंबरी शेतकऱ्यांच्या आयुष्यातील एक शोकांतिका आहे की सुशिक्षित पण बेरोजगार यांच्या आयुष्याची शोकांतिका आहे हे आपल्या वाचकांना ठरवायचं आहे. पण एकंदरीतच बारोमास ही कादंबरी संवेदनेतून वेदना निर्माण करणारी आहे असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही आणि भारतीय ग्रामीण समाज व्यवस्थेचं नागडे सत्य उघड करणारी आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

चारीमेरा ही (२०१६) साली लिहिलेली सदानंद देशमुखाची तिसरी कादंबरी.... चारीमेरा म्हणजे ...शेताचा बांध. प्रत्येक शेतकरी आपल्या शेताच्या रक्षणासाठी शेताला चारही बाजूंनी बांध बांधतात. शेतात बांधलेला हा बांध त्याच्या हक्काची सीमा व शेताची सुरक्षा या दोन्ही दृष्टिकोनातून या बांधाच महत्व शेतकऱ्यांना अनन्यसाधारण आहे. शेताभोवती आणि याच बांधाभोवती घडलेल्या प्रत्येक घटनाक्रमाची विस्तृत अशी नंदी म्हणजेच चारीमेरा. कादंबरीचे नायक उदेभान , यांच्या उदरनिर्वाहाचे साधन म्हणजे

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

त्यांचे चिकणी हे शेत. शेतामध्ये स्वतःच्या भविष्याचा वेध ते घेतात. या कादंबरीमध्ये उदेभान आणि त्यांची प्रेमीका प्रवीना याबद्दलची कहाणी आली आहे .पण त्यांच्या जातीमध्ये वेगळेपण असल्यामुळे त्यांचं प्रेम हे घरच्यांना मान्य नव्हतं आणि त्यांचे प्रेम हे शेवटच जाऊ शकले नाही ,याचं विरहवेदन या कादंबरीत आहे . राजस्थान मधून आलेले काही लोक आपला आजारी असलेला उंट सोबत न नेता उदेभानच्या चिकनी या शेतातच सोडून जातात . भावनाशील असलेला उदेभान याला त्या उंटाबद्दल असणारी सहानुभूती ही त्याच्याच अडचणीत कशी हातभार लावते, याचं मर्मवेदक वर्णन या कादंबरीत येते. हा उंट कित्येकदा त्याला अडचणीत पाडतो तरीसुद्धा तो त्या उंटाला मरणासाठी एकटा न सोडता त्याही परिस्थितीत त्याची सेवा करतो, त्याला जगवतो. हा त्याचा कारुण्यवाद या कादंबरीत दाखवण्यात आला. उदेभानची पत्नी भावनाताई , तिला शेती... शेतकरी आणि शेतातील काम या तिन्ही गोष्टीची चीड असते. त्यामुळे आपल्या पतीला कामात सात न देता ती त्याला पदोपदी या गोष्टीवरून हिणवत असते. पण जेव्हा उदेभान आणि प्रवीना यांच्या प्रेमाची वर्णन असलेली डायरी तिला मिळते आणि त्या डायरीतील त्यांचं ते भावनात्मक प्रेम बघून उदेभानयांचे विचार ऐकून भावनाताई ही आपल्या विचारांना बदलवते. आणि आपल्या पतीला साथ देण्यासाठी त्याच्या शेतामध्ये कामाचा वाटा उचलते. हे या कादंबरीचा एक विजय म्हणायला हवा .आपल्या वाट्याला जे आलं ते आपल्या मुलांच्या वाटेला येऊ नये यासाठी धडपड करणारा उदेभान. जेव्हा त्यांची मुलगी आंतरजातीय विवाह करण्यास विचारते तेव्हा हाच उदेभान स्वतःहून त्यांचं आंतरजातीय विवाह करून देऊन एका सुंदर अशा प्रथेला जन्म देतो. जुन्या कुस्कट जातीभेदांच्या भिंती सारून माणसाने माणसाकडे माणसासारखं बघावं या विचारांचा उद्धार करतो. अशी ही कादंबरी बदलत्या ग्रामीण संस्कृतीचा भीषण चेहरा चारीमेरा या कादंबरीत बघायला मिळतो.शेतातील प्रत्येक अवस्थेत आपल्या शेतात झगडणारे शेतकरी, शेतातील व्यथा सोबतच आपल्या आयुष्यातील व्यथा सुद्धा कौटाळून आयुष्य कसे जगतजातो याचे विदारक वर्णन चारीमेरा या कादंबरीत केलेल आहे. एकंदरीत चारीमेरा ही सुद्धा शेतकऱ्याच्या आयुष्याचा वेध घेणारी एक उत्कृष्ट अशी ग्रामीण कादंबरी आहे असं म्हटल्यास वावग ठरणार नाही.

**समारोप:**

'सदानंद देशमुख,' यांच्या तहान, बारोमास , चारीमेरा या तिन्ही कादंबरी वाचताना आपल्या एक लक्षात येतं की , या तिन्ही कादंबऱ्या शेतकऱ्यांच्या आयुष्याच्या अवतीभोवती फिरत आहेत. यांच्या कादंबरीतील नायक आणि त्यांच्या सोबत आलेली इतर पात्र त्यांच्या आयुष्यात ही सरमिसळ यांच्या या कादंबऱ्या व्यक्त करतात .या तिन्ही कादंबरीमध्ये उत्कृष्ट असं कथानक , शेतकऱ्यांच्या जीवनाचा आरसा, शेतकऱ्यांचा जीवनाची घडामोड आपल्यासमोर उलगडून ठेवतो. आपण जणू कादंबरी वाचत नसून या शेतकऱ्यांचे जीवन वाचत आहोत असा अनुभव प्रत्येक क्षणाला आपल्याला येतो. आणि आपणही त्यातले एक पात्र आहोत अस आपल्याला वाटायला लागतं. या कादंबरी वाचताना वाटतं त्या प्रत्येक नागरिकाला आपणही काहीतरी सल्ला द्यावा आणि म्हणाव, अशापेक्षा ... अशा प्रकारे वाग. म्हणजे तुझ आयुष्य सुखकर होईल. प्रत्येक प्रसंगी मन त्या कथानकात, त्यांच्या पात्रात, त्यांच्या घडलेल्या प्रसंगात स्वतःला नेऊ पाहतं आणि त्यांच्या आयुष्यात होणाऱ्या या दुःखांच्या खीपल्या कमी करून काहीतरी सुख त्यांच्या आयुष्यात यावं अशी मनोमन प्रार्थना करायला लागतं .अशा यांच्या या कादंबऱ्या. यांच्या कादंबऱ्यातील भाषा ही साधी सोपी आणि त्या प्रत्येक भागाचे प्रतिनिधित्व करणारी आहे.यांच्या भाषेने आपण कादंबरी द्वारे ग्रामीण भागात पोहोचतो. ग्रामीण भागातील म्हणी, वाक्यप्रचार, शब्द ,अलंकारिक शब्द आणि शिव्या सुद्धा यांच्या कादंबऱ्या जिवंत करायला उपयोगी पडतात असं म्हटल्यास वावग ठरणार नाही. या तिन्ही कादंबऱ्या मधील प्रश्न सारखेच आहेत. शेतकऱ्यांचा माडलेला छळ.... मग तो निसर्गाने असो ,समाजाने असो की राजकारणांनी असो. सुशिक्षित असूनही बेरोजगारी हा दुसरा प्रश्न. अंधश्रद्धा युक्त समाज, जातिभेदाच्या कठीण अशा कठड्यामध्ये उभा असलेला हा समाज एक वेळ मनुष्य तुटेल, मनुष्य संपेल पण ही जात संपणार नाही हे सांगणारा हा समाज. फक्त माझं चांगलं व्हावं इतरांचं काहीही हो, त्याला काही देणंघेणं नसणार अशा समाजाचं वर्णन. त्याचबरोबर हाताशी हात घेऊन सुखदुःखात साथ देणारा सुद्धा समाज, जीवनाच्या अंगपांगांचं वर्णन यांच्या कादंबऱ्यांमध्ये वाचायला मिळतं आणि यांच्या कादंबऱ्यातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे यातील निसर्ग. त्यांच्या निसर्ग वर्णनाने आपण त्या निसर्गात कधी पोहोचलो हे स्वतःला सुद्धा सांगता यायचं नाही .तिन्ही ऋतू उन्हाळा, पावसाळा ,हिवाळा या तिन्ही ऋतू मधील ग्रामीण भागातील परिस्थितीचे वर्णन, ग्रामीण भागातील निसर्गाचे वर्णन, निसर्गात झालेले बदल, निसर्गातील आल्हाददायकता, निसर्गातील कोरडेपणा हे सर्व यांच्या कादंबऱ्या बोलक्या करतात. वाचक आणि लेखकांची सरमीसड या कादंबरीच्या कथानकांमध्ये होते. अशा या सदानंद देशमुख यांच्या कादंबऱ्या. यांच्या या तिन्ही कादंबऱ्या उत्कृष्ट ग्रामीण कादंबऱ्या असून ग्रामीण

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

जनतेचा जीवनपट उलगडणाऱ्या या कादंबऱ्या आहेत. या कादंबऱ्या वाचताना मनुष्य म्हणून मी काही करू शकतो का? हा प्रश्न सुद्धा स्वतःला पडतो आणि या ग्रामीण लोकांचं आयुष्य यापेक्षा चांगलं करण्यासाठी सर्वांनी मिळून मदत करून ग्रामीण जनतेला सुखी समृद्ध बनून आपला भारत देश सुखी समृद्ध बनवावा ही मनोमनीची इच्छा निर्माण होते.

**संदर्भ ग्रंथ :**

1. तहान.... कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे- १९९८
2. बारोमास..... कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे- २००२
3. चारीमेरा...... पॉप्युलर प्रकाशन- २०१६
4. अंतर्नाद... डॉ. चंद्रकांत बांदीवडेकर एप्रिल (२००५)
5. साहित्यसूची... अनंत मनोहर, जानेवारी (२००४)
6. महाराष्ट्र साहित्य पत्रिका... डॉ. सुधाकर शेलार जून (२००३)
7. मराठी कादंबरी नव्या दिशा...... डॉ. किशोर सानप

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# भारत की राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 में शिक्षा के मूल्यों का मूल्यमीमांसा

**Pinki Rani**
Dept. of Education Iimt College of education ganganagar Meerut utter
**Email-**Pinkisingh6532@gmail.com
**Dr. Bharti Kumari**
**Assistant Professor, IIMT University,**
**Email:** bharti1101@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-1705029
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 127-132
May 2025
**Submitted:** 10 Apr. 2025
**Revised:** 22 Apr. 2025
**Accepted:** 21 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश:**

भारत की राष्ट्रीय शिक्षा नीति (NEP) 2020 एक परिवर्तनकारी दस्तावेज़ है जिसका उद्देश्य भारतीय शिक्षा प्रणाली को पुनः रूपांतरित करना है, जिसमें समग्र विकास, समावेशिता और मूल्य-आधारित शिक्षा पर जोर दिया गया है। यह नीति शिक्षा में नैतिक, मानवीय और नागरिक मूल्यों के समावेश को महत्वपूर्ण मानती है, जिससे जिम्मेदार और सहानुभूति से परिपूर्ण नागरिकों का निर्माण हो सके। नीति में सत्य, दया और अहिंसा जैसे उच्च नैतिक गुणों के विकास पर बल दिया गया है, जिससे शिक्षा केवल शैक्षिक सफलता तक सीमित न रहे, बल्कि अच्छे चरित्र और सामाजिक जिम्मेदारी की भावना भी विकसित हो। NEP 2020 में विविधता और समावेशन पर भी विशेष ध्यान दिया गया है, यह सुनिश्चित करते हुए कि सभी विद्यार्थियों को समान शैक्षिक अवसर मिलें, चाहे उनका सामाजिक, आर्थिक, या धार्मिक पृष्ठभूमि कुछ भी हो। नीति भारतीय सांस्कृतिक विविधता का सम्मान करती है और क्षेत्रीय भाषाओं के संरक्षण को बढ़ावा देती है, जिससे सांस्कृतिक संवेदनशीलता और सम्मान बढ़े। इसके साथ ही, यह विद्यार्थियों के मानसिक, शारीरिक और भावनात्मक स्वास्थ्य के महत्व को भी रेखांकित करती है। इस प्रकार, NEP 2020 शिक्षा को केवल बौद्धिक ज्ञान से कहीं आगे बढ़कर समग्र विकास के एक साधन के रूप में प्रस्तुत करती है, जो भविष्य में भारतीय शिक्षा की दिशा को प्रभावित करेगा।

**मुख्य शब्द:** राष्ट्रीय शिक्षा नीति 2020, नैतिक मूल्य, समावेशिता, सांस्कृतिक विविधता, समग्र विकास।

**प्रस्तावना**

भारत की राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) एक क्रांतिकारी पहल है, जिसका उद्देश्य भारतीय शिक्षा प्रणाली को 21वीं सदी की आवश्यकताओं के अनुरूप पुनः परिभाषित करना है। यह नीति केवल अकादमिक उत्कृष्टता तक सीमित नहीं है, बल्कि शिक्षा को समग्र विकास और जीवन मूल्यों से जोड़ने पर बल देती है (राष्ट्रीय शिक्षा नीति, 2020)। NEP 2020 यह स्पष्ट करती है कि शिक्षा का उद्देश्य केवल ज्ञान प्रदान करना नहीं, बल्कि ऐसे नागरिक तैयार करना है जो नैतिक, सहानुभूतिपूर्ण और जिम्मेदार हों। जिससे छात्र न केवल ज्ञान में बल्कि चरित्र निर्माण में भी प्रगति करें। साथ ही, यह नीति समावेशी शिक्षा को बढ़ावा देती है, जो सामाजिक, आर्थिक और सांस्कृतिक रूप से सभी वर्गों के विद्यार्थियों को

**_Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)_**
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*Pinki Rani Dept. of Education Iimt college of education ganganagar meerut utter*

**How to cite this article:**
*Rani, P. (2025). भारत की राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 में शिक्षा के मूल्यों का मूल्यमीमांसा. Journal of Research & Development, 17(5(II)), 127–132. https://doi.org/10.5281/zenodo.15817958*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817958

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

"मूल्य मिमांसा" का अर्थ है किसी मूल्य या सिद्धांत का विश्लेषण और उसकी प्रासंगिकता को समझना। NEP 2020 के संदर्भ में, यह शिक्षा के माध्यम से विद्यार्थियों में सत्य, अहिंसा, करुणा, समर्पण और सेवा जैसे जीवन मूल्यों के विकास को दर्शाता है (NEP, 2020)। नीति में नैतिक शिक्षा को पाठ्यक्रम का अनिवार्य हिस्सा बनाया जाना आवश्यक माना गया है, समान अवसर उपलब्ध कराती है (भारत सरकार, 2020)। यह दृष्टिकोण सामाजिक न्याय के साथ-साथ विविधता के सम्मान और स्वीकार्यता की संस्कृति को भी बढ़ावा देता है। इस प्रकार, NEP 2020 शिक्षा को केवल पेशेवर कौशल तक सीमित न रखकर, इसे नैतिक और संवेदनशील समाज के निर्माण का आधार मानती है, जो एक सशक्त भारत की नींव रखता है।

### 1. राष्ट्रीय शिक्षा नीति 2020: मुख्य उद्देश्य

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) का मुख्य उद्देश्य भारतीय शिक्षा प्रणाली को आधुनिक आवश्यकताओं के अनुरूप और वैश्विक मानकों के हिसाब से पुनः रूपांतरित करना है। यह नीति शिक्षा को केवल ज्ञान प्राप्ति तक सीमित न रखकर, इसे एक समग्र और समावेशी प्रक्रिया के रूप में प्रस्तुत करती है, जिसका लक्ष्य विद्यार्थियों का बौद्धिक, नैतिक, सामाजिक और भावनात्मक विकास सुनिश्चित करना है (भारत सरकार, 2020)। NEP 2020 में समावेशी शिक्षा को विशेष महत्व दिया गया है, ताकि सामाजिक, आर्थिक या शारीरिक रूप से वंचित सभी वर्गों को गुणवत्तापूर्ण शिक्षा समान रूप से मिले। इसके तहत विशेष आवश्यकता वाले छात्रों, ट्रांसजेंडर विद्यार्थियों और दूरदराज़ के क्षेत्रों के लिए आवश्यक संसाधन और सुविधाएँ उपलब्ध कराई गई हैं (NEP, 2020)। नीति में तकनीकी और डिजिटल शिक्षा के विस्तार पर भी जोर दिया गया है, जिससे डिजिटल विभाजन कम हो और शिक्षा अधिक सुलभ व प्रभावी बने। 'राष्ट्रीय शैक्षिक तकनीकी मंच' (NETF) जैसी पहलों के माध्यम से शिक्षक और छात्र दोनों को डिजिटल उपकरणों का कुशल उपयोग सिखाया जाएगा (Ministry of Education, 2020)। साथ ही, पारंपरिक भारतीय ज्ञान जैसे योग, आयुर्वेद और दर्शन को आधुनिक शिक्षण पद्धतियों के साथ जोड़कर शिक्षा प्रणाली को सांस्कृतिक और ज्ञानात्मक रूप से सशक्त बनाने पर भी जोर दिया गया है। विद्यार्थियों के मानसिक, भावनात्मक और शारीरिक स्वास्थ्य का संरक्षण भी नीति का अहम हिस्सा है, जिसके तहत जीवन कौशल, परामर्श सेवाएं और खेल-कूद को पाठ्यक्रम में अनिवार्य किया गया है ताकि उनका समग्र विकास हो सके (NEP, 2020)।

### 2. शिक्षा के मूल्यों का महत्व

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) में शिक्षा के उद्देश्य को केवल शैक्षणिक ज्ञान तक सीमित न रखते हुए, उसे जीवन मूल्यों, नैतिकता और सामाजिक उत्तरदायित्व से जोड़ने पर विशेष जोर दिया गया है। यह नीति मानती है कि शिक्षा केवल किताबी ज्ञान नहीं, बल्कि जीवन जीने की कला भी है, जिससे विद्यार्थी अपने व्यक्तिगत और सामाजिक जीवन में सही निर्णय लेने में सक्षम बनें (भारत सरकार, 2020)। नीति में स्पष्ट रूप से उल्लेख है कि शिक्षा का एक महत्वपूर्ण उद्देश्य विद्यार्थियों में सत्य, करुणा, अहिंसा, सहिष्णुता, दया और सहयोग जैसे मानवीय मूल्यों का विकास करना है (NEP, 2020)। ये मूल्य ऐसे नागरिक का निर्माण करते हैं जो केवल अपने हित की नहीं सोचते, बल्कि समाज और राष्ट्र के प्रति जिम्मेदार होते हैं।

शिक्षा के नैतिक आयामों को विद्यालयी स्तर पर पाठ्यक्रम में शामिल किया गया है। कला, साहित्य, योग और सामाजिक गतिविधियों को शिक्षा का अभिन्न हिस्सा बनाया गया है, जिससे छात्रों में भावनात्मक संतुलन और सामाजिक समझ विकसित हो (Ministry of Education, 2020)। NEP 2020 के अनुसार, मूल्य आधारित शिक्षा विद्यार्थियों को सही और गलत के बीच अंतर करने तथा नैतिक निर्णय लेने की क्षमता प्रदान करती है। इससे वे आत्म-नियंत्रण, सह-अस्तित्व और मानवीय सहानुभूति जैसे गुण विकसित करते हैं, जो उन्हें बेहतर नागरिक बनाते हैं (भारत सरकार, 2020)।

### 2.1 नैतिक और मानवीय मूल्य

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) में नैतिक और मानवीय मूल्यों को शिक्षा का केंद्रीय तत्व माना गया है। यह नीति इस बात पर बल देती है कि शिक्षा केवल बौद्धिक विकास का माध्यम नहीं होनी चाहिए, बल्कि इसका उद्देश्य विद्यार्थियों में ऐसे गुणों का विकास करना होना चाहिए जो उन्हें एक संवेदनशील, सहानुभूतिपूर्ण और नैतिक नागरिक बना सकें (भारत सरकार, 2020)। नीति में दया, करुणा, सहानुभूति और समानता जैसे मानवीय मूल्यों को विद्यालयी जीवन से ही विद्यार्थियों में विकसित करने की बात कही गई है। यह मूल्यों पर आधारित शिक्षा प्रणाली छात्रों को आत्म-जागरूक बनाती है, जिससे वे दूसरों के दृष्टिकोण को समझने, स्वीकार करने और सहयोग करने में सक्षम हो पाते हैं (NEP, 2020)। साथ ही, नीति में सत्य, अहिंसा, और निष्कलंकता जैसे उच्च नैतिक मूल्यों के

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

समावेशन पर भी विशेष बल दिया गया है। इन मूल्यों को पाठ्यक्रम में नैतिक शिक्षा, योग, ध्यान और जीवन कौशल के रूप में शामिल किया गया है, ताकि विद्यार्थी न केवल अच्छे विद्यार्थी बनें, बल्कि अच्छे इंसान भी बन सकें (Ministry of Education, 2020)।

**2.2 समाज के प्रति जिम्मेदारी**

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) का एक प्रमुख उद्देश्य विद्यार्थियों में समाज के प्रति उत्तरदायित्व की भावना विकसित करना है। यह नीति इस बात पर ज़ोर देती है कि शिक्षा केवल व्यक्तिगत उन्नति का साधन नहीं होनी चाहिए, बल्कि उसका उपयोग सामाजिक कल्याण और राष्ट्रीय निर्माण के लिए भी किया जाना चाहिए (भारत सरकार, 2020)। नीति में विद्यार्थियों को जिम्मेदार नागरिक के रूप में तैयार करने के लिए सामाजिक कार्यों, सामुदायिक सेवा, और नागरिक कर्तव्यों को शिक्षा प्रणाली में एकीकृत किया गया है। छात्रों को सेवा कार्यों, जैसे स्वच्छता अभियान, रक्तदान शिविर, पर्यावरण संरक्षण और सामुदायिक भागीदारी में भाग लेने के लिए प्रेरित किया जाता है (NEP, 2020)।

इसके अतिरिक्त, पर्यावरणीय चेतना को भी पाठ्यक्रम में शामिल किया गया है ताकि विद्यार्थी प्राकृतिक संसाधनों के संरक्षण, सतत विकास और जलवायु परिवर्तन जैसे मुद्दों के प्रति जागरूक हो सकें। यह नीति विद्यार्थियों को यह सिखाती है कि वे समाज में सकारात्मक बदलाव लाने वाले सक्रिय भागीदार बनें (Ministry of Education, 2020)। इस प्रकार, NEP 2020 विद्यार्थियों को न केवल अपने अधिकारों के प्रति सजग बनाती है, बल्कि उनके कर्तव्यों के निर्वहन के लिए भी प्रेरित करती है। यह समाजिक उत्तरदायित्व की भावना को शिक्षा का अभिन्न अंग बनाकर, एक संवेदनशील, जागरूक और उत्तरदायी नागरिक के निर्माण की दिशा में सशक्त कदम है।

**3. विविधता और समावेशन**

भारत एक विविधताओं से भरा हुआ देश है, जहाँ विभिन्न जातियाँ, धर्म, भाषाएँ, और संस्कृतियाँ सह-अस्तित्व में हैं। राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) इस सामाजिक-सांस्कृतिक विविधता को स्वीकार करते हुए, समावेशी शिक्षा प्रणाली को बढ़ावा देने पर विशेष बल देती है। नीति का उद्देश्य यह सुनिश्चित करना है कि शिक्षा सभी विद्यार्थियों के लिए सुलभ और समान रूप से उपयोगी हो, चाहे वे किसी भी जाति, धर्म, लिंग, भाषा या आर्थिक पृष्ठभूमि से संबंध रखते हों (भारत सरकार, 2020)। NEP 2020 में "समावेशिता" को शिक्षा का मूल आधार माना गया है। इसमें विशेष रूप से वंचित समूहों जैसे अनुसूचित जाति, अनुसूचित जनजाति, दिव्यांग, ट्रांसजेंडर, और ग्रामीण क्षेत्रों के विद्यार्थियों के लिए विशेष सुविधाओं और सहायता प्रणालियों की व्यवस्था का उल्लेख किया गया है (NEP, 2020)।

इसके साथ ही, पाठ्यक्रम में विविध भाषाओं, परंपराओं और संस्कृतियों को स्थान देकर विद्यार्थियों को विविधता का सम्मान करना सिखाया जाता है। इससे न केवल सहिष्णुता और सामंजस्य की भावना विकसित होती है, बल्कि सामाजिक एकता और राष्ट्रीय एकजुटता भी सुदृढ़ होती है (Ministry of Education, 2020)।

**3.1 सभी के लिए शिक्षा**

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) शिक्षा के अधिकार को सभी के लिए सुनिश्चित करने पर जोर देती है, विशेषकर कमजोर वर्गों और विकलांग विद्यार्थियों के लिए। नीति का उद्देश्य ऐसी शिक्षा प्रणाली विकसित करना है जो सामाजिक, आर्थिक या शारीरिक किसी भी प्रकार की बाधा के बावजूद सभी को समान अवसर प्रदान करे (भारत सरकार, 2020)। NEP 2020 में विशेष शिक्षा के लिए व्यापक प्रावधान किए गए हैं। इसमें विकलांग विद्यार्थियों के लिए समायोजित पाठ्यक्रम, सहायक तकनीकों, और विशेष शिक्षकों की व्यवस्था का उल्लेख है, जिससे वे भी शिक्षा प्रणाली का पूरा लाभ उठा सकें (NEP, 2020)। साथ ही, नीति डिजिटल शिक्षा को बढ़ावा देती है ताकि दूरदराज़ क्षेत्रों के बच्चे भी गुणवत्तापूर्ण शिक्षा प्राप्त कर सकें। डिजिटल उपकरणों और ऑनलाइन प्लेटफॉर्म के माध्यम से शिक्षा का प्रसार करने पर विशेष ध्यान दिया गया है। प्रौद्योगिकी के समावेशन से न केवल शिक्षा सुलभ होती है, बल्कि यह शिक्षा के गुणवत्ता स्तर को भी बढ़ाती है। NEP के तहत 'राष्ट्रीय शैक्षिक तकनीकी मंच' (NETF) जैसे प्रयास किये गए हैं, जो शिक्षकों और विद्यार्थियों को डिजिटल संसाधनों से जोड़ने का काम करते हैं (Ministry of Education, 2020)।

**3.2 भाषाई विविधता**

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) में भाषाई विविधता को अत्यंत महत्वपूर्ण माना गया है। भारत एक बहुभाषी देश है, जहाँ कई क्षेत्रीय भाषाएँ और बोलियाँ प्रचलित हैं। NEP 2020 का उद्देश्य इन भाषाओं के संरक्षण और संवर्धन के साथ-साथ विद्यार्थियों को उनकी मातृभाषा में शिक्षा प्रदान करना है (भारत सरकार, 2020)। नीति के अनुसार, प्रारंभिक शिक्षा में मातृभाषा या क्षेत्रीय भाषा

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

में पढ़ाई को प्राथमिकता दी जाएगी क्योंकि शोध भी यह दर्शाता है कि मातृभाषा में शिक्षा से बच्चों की सीखने की क्षमता और समझ में सुधार होता है (NEP, 2020)। इससे न केवल शिक्षा की गुणवत्ता बढ़ती है, बल्कि बच्चों का आत्मविश्वास और सांस्कृतिक पहचान भी मजबूत होती है।

इसके अतिरिक्त, नीति भाषा शिक्षा के तीन-भाषा सूत्र को प्रोत्साहित करती है, जिसमें मातृभाषा के साथ-साथ हिंदी और अंग्रेज़ी या अन्य भारतीय भाषाओं का अध्ययन शामिल है। यह दृष्टिकोण विद्यार्थियों को भाषाई समृद्धि और सामाजिक सौहार्द की भावना विकसित करने में मदद करता है (Ministry of Education, 2020)। भाषाई विविधता का सम्मान न केवल भाषा संरक्षण के लिए आवश्यक है, बल्कि यह भारत के सामाजिक-सांस्कृतिक ताने-बाने को भी मजबूत करता है। NEP 2020 के माध्यम से भारतीय भाषाओं को पुनर्जीवित और लोकप्रिय बनाने का प्रयास किया गया है, जिससे सभी भाषाई समूह शिक्षा के समान अवसर पा सकें।

**4. आध्यात्मिक और सांस्कृतिक मूल्य**

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) में भारतीय संस्कृति और आध्यात्मिकता को शिक्षा प्रणाली का महत्वपूर्ण अंग माना गया है। यह नीति यह मानती है कि विद्यार्थियों को न केवल आधुनिक ज्ञान प्राप्त करना चाहिए, बल्कि अपनी सांस्कृतिक जड़ों और आध्यात्मिक विरासत से भी परिचित होना आवश्यक है (भारत सरकार, 2020)। NEP 2020 में कहा गया है कि शिक्षा के माध्यम से विद्यार्थियों को उनके सांस्कृतिक मूल्यों की समझ विकसित करनी चाहिए। इसमें भारतीय दर्शन, योग, ध्यान, लोक कला, संगीत और नृत्य जैसे तत्व शामिल हैं, जो विद्यार्थियों के समग्र विकास में मदद करते हैं (NEP, 2020)। इन पहलुओं के अध्ययन से छात्र अपनी संस्कृति के प्रति गर्व और सम्मान की भावना विकसित करते हैं।

नीति का यह भी उद्देश्य है कि शिक्षा से विद्यार्थियों में सामाजिक समरसता और सांस्कृतिक सहिष्णुता को बढ़ावा मिले, जिससे वे विविधता में एकता की भावना को समझ सकें। आध्यात्मिक शिक्षा से विद्यार्थियों में नैतिकता, धैर्य, संयम और आत्म-नियंत्रण जैसे गुण उत्पन्न होते हैं, जो उनके व्यक्तिगत और सामाजिक जीवन में सहायक होते हैं (Ministry of Education, 2020)।

**4.1 धार्मिक और सांस्कृतिक सहिष्णुता**

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) शिक्षा को सामाजिक समरसता और राष्ट्रीय एकता के लिए एक महत्वपूर्ण माध्यम मानती है। नीति का उद्देश्य विद्यार्थियों में धार्मिक और सांस्कृतिक सहिष्णुता की भावना विकसित करना है, ताकि वे विभिन्न धर्मों, मान्यताओं और परंपराओं के प्रति सम्मान और समझ बनाए रख सकें (भारत सरकार, 2020)। NEP 2020 में यह स्पष्ट किया गया है कि शिक्षा का उद्देश्य न केवल ज्ञान देना है, बल्कि सामाजिक सद्भाव और सह-अस्तित्व की भावना को भी बढ़ावा देना है। विद्यार्थी जब विभिन्न धार्मिक एवं सांस्कृतिक विविधताओं को समझेंगे और उनका सम्मान करेंगे, तभी एक समृद्ध और सशक्त समाज का निर्माण संभव होगा (NEP, 2020)। नीति के अंतर्गत विभिन्न धर्मों, त्योहारों, रीति-रिवाजों और सांस्कृतिक पहलुओं को पाठ्यक्रम में शामिल किया गया है, जिससे विद्यार्थियों को विविधता में एकता का संदेश मिले। यह सहिष्णुता और पारस्परिक सम्मान का बीजारोपण करती है, जो आज के वैश्विक और बहुसांस्कृतिक समाज में अत्यंत आवश्यक है (Ministry of Education, 2020)।

**5. शिक्षा का उद्देश्य**

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) शिक्षा को केवल बौद्धिक और कौशल विकास तक सीमित नहीं रखती, बल्कि इसे एक समग्र जीवन कौशल के रूप में देखती है। नीति का उद्देश्य छात्रों को ज्ञान, नैतिकता, सामाजिक उत्तरदायित्व और जीवन के विविध पहलुओं के लिए तैयार करना है (भारत सरकार, 2020)। शिक्षा का लक्ष्य न केवल तकनीकी दक्षता प्राप्त करना है, बल्कि विद्यार्थियों में अच्छे नागरिक बनने के गुण, जिम्मेदारी, सहिष्णुता और मानवीय मूल्यों का विकास करना भी है। इसके जरिए छात्र अपने परिवार, समाज और राष्ट्र के प्रति जागरूक और समर्पित बनते हैं (NEP, 2020)। नीति में यह स्पष्ट किया गया है कि शिक्षा के माध्यम से व्यक्तित्व के समग्र विकास पर जोर दिया जाएगा, जिसमें मानसिक, शारीरिक, भावनात्मक और सामाजिक विकास शामिल है। इससे विद्यार्थी न केवल ज्ञान संपन्न होंगे, बल्कि सामाजिक और नैतिक रूप से भी सशक्त बनेंगे।

**5.1 स्वतंत्रता और आत्मनिर्भरता**

NEP 2020 का एक महत्वपूर्ण पहलू छात्रों को आत्मनिर्भर बनाने का है। "आत्मनिर्भर भारत" के लक्ष्य के अनुरूप, नीति शिक्षा के माध्यम से स्वतंत्र सोच, निर्णय लेने की क्षमता और स्वावलंबन को प्रोत्साहित करती है (भारत सरकार, 2020)। नीति में कौशल विकास, उद्यमिता, नवाचार और प्रयोगात्मक शिक्षा को बढ़ावा दिया गया है, जिससे विद्यार्थी अपने जीवन और रोजगार के लिए आत्मनिर्भर बन

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

सकें। नीति यह मानती है कि शिक्षा केवल नौकरी के लिए तैयारी नहीं, बल्कि स्वयं की आर्थिक और सामाजिक स्थिति सुधारने का साधन होनी चाहिए। इससे छात्र न केवल अपने लिए, बल्कि समाज और देश के लिए भी योगदान दे सकेंगे। डिजिटल शिक्षा, तकनीकी प्रशिक्षण और व्यावहारिक शिक्षा के माध्यम से विद्यार्थियों को आधुनिक युग के आवश्यक कौशल दिए जाते हैं, जो उन्हें आत्मनिर्भर बनाने में मदद करते हैं (Ministry of Education, 2020)।

**5.2 सामाजिक, मानसिक और शारीरिक स्वास्थ्य**

राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) में विद्यार्थियों के मानसिक, शारीरिक और सामाजिक स्वास्थ्य को शिक्षा का अनिवार्य हिस्सा माना गया है। नीति के अनुसार, शिक्षा केवल अकादमिक सफलता तक सीमित नहीं होनी चाहिए, बल्कि विद्यार्थियों के समग्र विकास पर भी समान ध्यान दिया जाना चाहिए (भारत सरकार, 2020)। NEP 2020 में शारीरिक शिक्षा को पाठ्यक्रम में अनिवार्य किया गया है, जिससे विद्यार्थियों का शारीरिक स्वास्थ्य मजबूत हो। इसके साथ ही, मानसिक स्वास्थ्य के लिए भी विशेष कार्यक्रम और पहल शामिल की गई हैं, जैसे योग, ध्यान, Counselling, और जीवन कौशल विकास, ताकि विद्यार्थियों को तनाव प्रबंधन, आत्म-स्वीकृति और भावनात्मक स्थिरता प्राप्त हो सके (NEP, 2020)। सामाजिक स्वास्थ्य को भी नीति में महत्वपूर्ण स्थान दिया गया है, जिसमें विद्यार्थियों को सामाजिक कौशल, सहयोग, सहिष्णुता, और नेतृत्व गुण विकसित करने पर बल दिया गया है। इससे वे न केवल शैक्षिक रूप से, बल्कि सामाजिक रूप से भी सक्षम बनते हैं।

**निष्कर्ष**

भारत की राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 (NEP 2020) शिक्षा को एक समग्र और व्यापक दृष्टिकोण से देखती है, जहाँ शिक्षा केवल बौद्धिक या तकनीकी विकास तक सीमित नहीं है। इस नीति का मूल उद्देश्य शिक्षा प्रणाली को इस प्रकार विकसित करना है कि यह विद्यार्थियों को अच्छे नागरिक, जिम्मेदार और संवेदनशील व्यक्ति बनने में मदद करे (भारत सरकार, 2020)। NEP 2020 में नैतिकता, सामाजिक जिम्मेदारी, सहिष्णुता और समावेशन जैसे महत्वपूर्ण मूल्यों के विकास को समान महत्व दिया गया है। नीति समावेशिता और विविधता पर विशेष ध्यान केंद्रित करती है, जिससे सभी वर्गों, धर्मों, जातियों, लिंगों और क्षेत्रों के विद्यार्थियों को समान शैक्षिक अवसर मिल सकें (NEP, 2020)। इसके साथ ही, विद्यार्थियों को उनकी मातृभाषा में शिक्षा प्राप्त करने का अधिकार भी प्रदान किया गया है, जिससे उनकी सांस्कृतिक और भाषाई पहचान मजबूत हो सके। NEP 2020 शिक्षा को केवल अकादमिक या तकनीकी दक्षता तक सीमित न रखकर, इसे जीवन के सभी पहलुओं के लिए आवश्यक एक माध्यम मानती है। यह नीति विद्यार्थियों के मानसिक, शारीरिक, सामाजिक और आध्यात्मिक विकास पर भी सम्यक् ध्यान देती है। इस प्रकार, राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 एक समग्र और समावेशी शिक्षा प्रणाली प्रस्तुत करती है, जो प्रत्येक विद्यार्थी को सशक्त, जिम्मेदार और समाज में सकारात्मक योगदान देने वाला नागरिक बनने के लिए सक्षम बनाती है। यह नीति भारत के भविष्य के लिए एक मजबूत और समृद्ध शिक्षा मॉडल का निर्माण करती है।

**संदर्भ:**

1. भारत सरकार। (2020)। *राष्ट्रीय शिक्षा नीति 2020*। Ministry of Education, Government of India.
2. Ministry of Education, Government of India. (2020). *National Education Policy 2020.*
3. National Council of Educational Research and Training (NCERT). (2020). *NEP 2020: An overview.*
4. Sharma, R. (2021). Education reforms under NEP 2020: A new paradigm. *International Journal of Education*, 15(2), 45-58.
5. Singh, P. (2021). Inclusive education and digital learning in NEP 2020. *Journal of Indian Education*, 47(3), 12-25.
6. Gupta, A. (2020). Role of mother tongue in early education: Insights from NEP 2020. *Language and Culture Journal*, 9(1), 33-40.
7. Kumar, S. (2021). Impact of NEP 2020 on Indian education system. *Education and Society*, 14(4), 56-70.
8. Mishra, N. (2020). NEP 2020 and holistic development of students. *Educational Review India*, 22(1), 5-15.
9. Reddy, V. (2021). Promoting ethical values through education: A study on NEP 2020. *Journal of Moral Education*, 28(2), 102-110.
10. Indian Express. (2020, August 5). How NEP 2020 is transforming Indian education. Retrieved from https://indianexpress.com/article/education/nep-2020-transformation/
11. Times of India. (2021, January 10). Digital education and NEP 2020: Bridging the gap. Retrieved from https://timesofindia.indiatimes.com/digital-education-nep-2020
12. Ministry of Education, Government of India. (2020). *National Curriculum Framework 2020*.
13. Jain, R. (2021). Spirituality and culture in Indian education: NEP 2020 perspectives. *Journal of Cultural Studies*, 11(2), 80-89.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

14. Sharma, L. (2020). Social responsibility and citizenship education in NEP 2020. *Indian Journal of Social Science Education*, 5(1), 60-68.
15. Patil, S. (2021). Language diversity and educational inclusion: NEP 2020 approach. *Language Policy Journal*, 7(3), 120-132.
16. Government of India. (2020). *Report on mental health and education: NEP 2020 guidelines*. Ministry of Health and Education.
17. Verma, M. (2021). Role of yoga and meditation in student wellness: An NEP 2020 review. *International Journal of Holistic Education*, 10(1), 45-53.
18. Indian Ministry of Education. (2020). *Digital Education Initiatives under NEP 2020*.
19. Singh, A. (2021). Promoting cultural heritage through education: NEP 2020's vision. *Journal of Heritage Studies*, 13(4), 150-160.
20. World Bank. (2020). *India Education Sector Analysis*. Washington DC: World Bank Publications.
21. Joshi, P. (2021). Challenges and opportunities in NEP 2020 implementation. *Educational Policy Review*, 19(2), 77-90.
22. Rao, K. (2020). Gender equity and education reforms in India. *Gender and Education Journal*, 8(2), 40-49.
23. The Hindu. (2020, September 10). NEP 2020: Emphasis on regional languages. Retrieved from https://thehindu.com/nep-2020-language-policy
24. Kumar, V., & Singh, D. (2021). Inclusive education models in India post-NEP 2020. *International Journal of Inclusive Education*, 25(5), 500-515.
25. Ministry of Education, India. (2021). *Annual Report on Education 2020-21*.
26. Chatterjee, S. (2021). Ethical education in modern India: NEP 2020 framework. *Ethics in Education*, 6(1), 25-35.
27. BBC News Hindi. (2020, July 30). NEP 2020: भारत की शिक्षा में बड़ा बदलाव। Retrieved from https://bbc.com/hindi/india-education-policy-2020
28. Mehta, R. (2021). Environmental education and sustainability in NEP 2020. *Journal of Environmental Studies*, 12(3), 100-110.

# Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# मानव आणि पर्यावरण

**डॉ. वंदना वा. चरडे**
समाजशास्त्र विभाग, बिनझानी सिटी कॉलेज नागपूर, आरटीएमएनयू नागपूर
**Email:** vandanawcharde@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-1705030
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 133-136
May 2025
**Submitted:** 10 Apr. 2025
**Revised:** 22 Apr. 2025
**Accepted:** 21 May. 2025
**Published:** 31 May. 2025

## प्रस्तावना

पर्यावरणाचा अर्थ भोवतालचे वातावरण किंवा परिस्थिती, पण शास्त्रीयदृष्टया ही संकल्पना बहुव्यापक, बहुससमावेशक आणि गुंतागुंतीची आहे. 'Environ' मूळचा फ्रेन्च शब्द आणि त्यावरून इंग्रजीत तयार झालेला शब्द 'Environment' असुन त्याचा मराठी अर्थ 'पर्यावरण' आहे. सभोवतालची परिस्थिती विशिष्ट घटक किंवा घटकसमूहाच्या बाबतीत असू शकते. पृथ्वीवरील जीवसृष्टीच अनेक घटकांनी मिळून बनलेली आहे.

या सजीव घटकांत परस्पर आंरतक्रिया सातत्याने चालू असते. पुथ्वीवर काही घटक निर्जीव स्वरूपाचेसुध्दा आहेत. विविध प्रकारच्या घटकांमधील परस्पर आंरतक्रियांमुळे पर्यावरण निर्माण होते. पर्यावरण ही संकल्पना स्थल आणि कालसापेक्ष आहे. सर्व देशातील स्थिती सारखी नसते. हवामान, जंगलसंपत्ती, खनिजसंपती, सागरीसंपती यांचे वाटप सारख्या प्रमाणात झालेले दिसत नाही. तसेच एकाच दिवसात प्रत्येक देशातील तापमान, हवामान वेगवेगळे असते. संपूर्ण पृथ्वी ही पर्यावरणाने वेढलेली आहे. प्रखर सुर्यप्रकाशापासून रक्षण करणारी यंत्रणा(नैसर्गिक) पृथ्वीभोवती आहे. प्रखर उष्णता रोखली गेल्याने जीवसृष्टीस आवश्यक असेच वातावरण निर्माण होते.एकूण विचार करता,"पर्यावाण म्हणजे सजीवसृष्टीस तारक किंवा मारक ठरणाऱ्या परस्पर बदलते प्रमाण असणाऱ्या अनेक घटकांचा समुच्चय" असे म्हणता येईल. ती एक सर्वसमावेशक संज्ञा आहे.

### पर्यावरण व्याख्या:

मानवी अस्तित्व आणि सजीवांच्या सृष्टीवर परिणाम करणाऱ्या विविध घटकांचे शास्त्रोक्त पध्दतीने केलेले अध्यन होय."

'पर्यावरणशास्त्र म्हणजे विविध परिसंस्था प्रणालींचे परस्परसंबंधातील संतुलनमूलक स्वरूपाचे अध्ययन होय."

### पर्यावरणाचे स्वरूप

पर्यावरणशास्त्राचे स्वरूप् अतिशय व्यापक आहे. विविध नैसर्गिक व सामाजिक शास्त्रांचा संकलित समन्वय पर्यावरणशास्त्राच्या अभ्यासात अभिप्रेत असल्याने पर्यावरणशास्त्र हा विषय सर्वस्पर्शी आहे. पृथ्वीचे सरासरी तापमान वाढत आहे याची कारणे फक्त बेसुमार जंगलतोड एवढेच नसून नैसर्गिक जलचक्रातील बिघाड, ओझोन वायूचा क्षय, क्षेपणास्त्र चाचण्या यांसारख्या भौगौलिक व वैज्ञानिक घटनांची समस्यात्मक निर्मितीदेखील आहे.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. वंदना वा. चरडे*
*समाजशास्त्र विभाग, बिनझानी सिटी कॉलेज नागपूर, आरटीएमएनयू नागपूर*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817972
**How to cite this article:**
*चरडे, . वंदना . वा . (2025). मानव आणि पर्यावरण. Journal of Research & Development, 17(5(II)), 133–136.* https://doi.org/10.5281/zenodo.15817972

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

पर्यावरणशास्त्राच्या अभ्यासात विविध प्रश्नांची शास्त्रीय उकल करून घेणे आवश्यक असते. उदा., जीवनशास्त्रातील सजीवांच्या सविस्तर अभ्यसाचा उपयोग सजीवांच्या पर्यावरणातील जीवनपध्दती समजून घेण्यास होतो. अंटार्क्टिका खंडावर तांबे, कोळसा, युरेनिअमसारखी खनिजे उपलब्ध असली तर भौगोलिक पार्श्वभूमी ची उकल खनिजांच्या उत्पादनासाठी आवष्यक ठरते. जल वायू व स्थलप्रदूषण जाणून घ्यायला भौतिकी व रसायनशास्त्रांचा उपयोग तितकाच महत्वाचा ठरतो. म्हणून पर्यावाणशास्त्राचे स्वरूप आंतरविघाशाखीय(Interdisciplinary)आहे. भौतिक, भूगोल, भू-गर्भ रसायन, जीव या निसर्गशास्त्रांबरोबरच मानववंशशास्त्र, मानवशास्त्र, इतिहास, पुरातत्व या सामाजिक शास्त्रांचाही पर्यावरणशास्त्राषी घनिष्ठ संबंध येतो.

पर्यावरणशास्त्र हा विषय अनेकपदरी असल्याने पर्यावरणाचे विविध व घटनांचे क्लिष्ट पैलू अभ्यासले जातात. पर्यावरणविज्ञानाचे स्वरूप )Scientific( असल्याने मानव, सजीवसृष्टी व भोवतालचे पर्यावरण यांच्या विविध अंगांचे शास्त्रीय विवेचन करून पर्यावरणात्मक प्रश्नसंची नीट ओळख करून घेणे व समस्यांचे शास्त्रीय विश्लेषण करून नियोजनासाठी चौकट आखणे या गोष्टी पर्यावरणशास्त्राच्या अभ्यासक्षेत्रात येतात.

हल्लीच्या यंत्रयुगात पर्यावरण विज्ञानाची व्याप्ती सतत विस्तारत आहे. हा विषय सर्वस्पर्शी व संकीर्ण असल्याने इतर ज्ञानशाखांशी पर्यावरणशास्त्राचा घनिष्ठ संबंध येतो. मानवाच्या बुध्दिकौशल्याची क्षितीजे उतरोतर उंचावत असल्याने या प्रवाहात पर्यावरणाचे आरोग्य सांभाळणे अत्यावश्यक आहे. पर्यावरणातील नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांचे शास्त्रीय विश्लेषण झाले पाहिजे. संपूर्ण मानवजातीस भेडसावणारे प्रश्न साकल्सने सोडविण्यासाठी पर्यावरणशास्त्राचा व्याप जाणून घेणे निकडीचे आहे. मानवासह सर्व सजीवसृष्टी जीवन-मरणाच्या उंबरठयावर उभी आहे. वंगवेगळया क्षेत्रांतील अभ्यासक, संशोधक, नियोजक व प्रशासक पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने जनजागरण करहत आहेत. जागतिक, प्रादेशिक व स्थानिक पातळीवर पर्यावरणीय अभ्यासाची व्याप्ती जाणून घेण्याच्या दृष्टीने जगभर प्रयत्न सुरू झाले असेल तरी मानवाचा अतिरेकी उच्छाद अव्याहत सुरू आहे. गतिमान मानव व अस्थिर पर्यावरण यामुळे पर्यावरणशास्त्राच्या अभ्यासाची व्याप्ती सतत वाढत आहे.

**पर्यावरणाचे प्रकार**

प्रत्येक प्रदेशात तानवी जीवनासाठी विशिष्ट अशी पार्श्वभूमी असते. त्या पार्श्वभूमीच्या अनुषंगाने मानवी जीवनाचा विकास होत असतो. आर्थिक व व्यापारी हालचाली घडत असतात. ही पार्श्वभूमी म्हणजेच पर्यावरण होय. मानवाच्या सभोवताली असलेल्या परिस्थितीला 'पर्यावरण' असे म्हणतात. ही सभोवतालची परिस्थिती दोन प्रकारची असते. त्यानूसार पर्यावरणाचे दोन प्रकार पडतात.

क) प्राकृतिक पर्यावरण किंवा नैसर्गिक पर्यावरण

ख) सांस्कृतिक पर्यावरण किंवा मानवनिर्मित पर्यावरण

**क) नैसर्गिक पर्यावरण :** निसर्गाने दिलेले जे पर्यावरण असते, त्याला 'नैसर्गिक किंवा प्राकृतिक पर्यावरण' असे म्हणतात. प्राकृतिक पर्यावरणात स्थान, हवामान, भू-रचना, मृदा, खनिजे, वनस्पती व प्राणी या घटकांचा समावेश होतो.

**1) हवामान :**

प्राकृतिक पर्यावरणातील सर्वांत महत्त्वाचा व प्रभावी घटक म्हणजे हवामान होय. हवामानाचा परिणाम मानवाच्या आर्थिक व व्यापारी हालचालींवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे होत असतो. शेतीव्यवसाय व मासेमारी हे व्यवसाय प्रत्यक्षपणे हवामानाशी निगडित असतात. सुती वस्त्रोद्योग, सिमेंट उद्योग हे व्यवसाय कच्या मालाच्या व पक्क्या मालाच्या संदर्भात हवामानावर अप्रत्यक्षपणे अवलंबून असतात. वाहतूक, दळणवळण व व्यापार या हालचालींवरही हवामानाचा फार मोठा प्रभाव पडतो-

**2) भूरचना:**

हवामानाप्रमाणेच भूरचनेचा परिणाम मानवाच्या व्यापारी हालचालींवर होत असतो. उंचीनुसार मूरचनेचे पर्वत, पठारे व मैदाने असे तीन प्रकार पडतात.

पर्वतीय प्रदेशात मर्यादित सपाट प्रदेश, उंच सखलपणा यामुळे व्यापारी हालचाली मर्यादित असतात. वाहतुकीच्या अपुर्या सोयी, मृदेची धूप, पाण्याची अशाश्वती यांमुळे वस्त्या विखुरलेल्या स्वरूपात असतात. वनसंकलन, पशुपालन, स्थलांतरित शेती यांसारख्या प्राथमिक व्यवसायांवर येथील मानवी जीवन अवलंबून असते.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**3) मृदा :**

कृषीयोग्य जमीन म्हणजे मृदा होय. मृदेमध्ये अनेक खनिज कण, सेंद्रिय द्रव्ये, जल व वायू यांचे घन मिश्रण असते. वनस्पतींच्या पोषणासाठी सुपीक मृदेची अत्यंत आवश्यकता असते. भूपृष्ठावर अनेक प्रकारच्या मृदा आढळतात. मृदेचे प्राकृतिक व रासायनिक गुणधर्म वेगवेगळे असतात. या गुणधर्मांनुसार मृदेची गुणवत्ता ठरत असते. मृदेचा पोत, जाडी व सुपीकता या गुणधर्मावर पिकांचे स्वरूप व प्रकार अवलंबून असतात.

**4) खनिजसंपत्ती :**

खनिजसंपत्ती ही औद्योगिक विकासासाठी आधारभूत अशी संपत्ती आहे. या जागतिक वितरण असमान पद्धतीने झालेले आहे. स्तरित खडकांच्या प्रदेशात दगडी कोळसा व खनिज तेल तर अग्निजन्य खडकांच्या प्रदेशात धातुखनिजे सापडतात. खनिजसंपत्तीमुळे कोणत्याही देशातील औद्योगिक विका चालना मिळते. आंतरराष्ट्रीय व्यापाराची संधी मिळते. संयुक्त संस्थाने, सोव्हिएत रशिया व अरब देश संपत्तीमुळे आर्थिक विकासात अग्रेसर ठरले आहेत.

**5) वनसंपदा :**

वनसंपदेला मानवी जीवनात अतिशय महत्त्वाचे असे स्थान आहे. मानवाच्या व इतर सजी अन्नविषयक गरजा वनसंपदेमुळे पूर्ण होतात.

स्थान, हवामान या भौगोलिक घटकांचा परिणाम वनस्पतिजीवनाकर असतो

**6) प्राणी :**

प्राणी ही एक प्रकारची संपदा आहे. प्रतिकूल पर्यावरणात मानवी जीवनात प्राण्यांनां विशेष आहे. पशुपालन हा व्यवसाय प्राण्यांवरच अवलंबून असतो. आंतरराष्ट्रीय व्यापारात प्राणिजन्य उत्पादनांना विष आहे.

**ख) सांस्कृतिक पर्यावरण :**

नैसर्गिक पर्यावरणात मानवी हालचालींमुळे बदल होतात. या बदलांमुळे (पर्यावरण निर्माण होते. वस्त्या, वाहतूक, दळणवळण व तंत्रज्ञान हे सांस्कृतिक पर्यावरणाचे विविध घटक आहेन

**1) वस्त्या :**

मानवी वस्त्यांच्या स्वरूपावर मानवाचे आर्थिक व्यवसाय अवलंबून असतात. अस्थिर किया। स्वरूपाच्या वस्त्या असल्यास कंदमुळे गोळा करणे, मासेमारी, भटके पशुपालन व रूपांतरित शेती हे जातात. शेती व्यवसायात स्थैर्य आल्यानंतर मानवी वस्त्यांतही स्थिरता आली, त्यामुळे व्यवसायांचे मानवाच्या व व्यापारी हालचालींचे स्वरूप बदलून गेले. वस्त्यांचे आकार, कार्य व लोकसंख्या या निकषांवर मानवी प्रमुख प्रकारांत वर्गीकरण केले जाते ग्रामीण वस्त्या, नागरी वस्त्या.

**2) वाहतूक :**

मानवाच्या आर्थिक व व्यापारी क्रियांमध्ये वाहतुकीस विशेष महत्त्व आहे. कोणी आर्थिक, सांस्कृतिक व सामाजिक विकास वाहतुकीवरच अवलंबून असतो. वस्तूंची किंवा माणसांची ने आन करणाऱ्या क्रियेला वाहतूक असे म्हणतात. वाहतुकीमुळे उत्पादन वाढते. कच्च्या व पक्क्या मालाची ने- आन करता येते व व्यापाराला चालना मिळते, भौगोलिक अंतर कमी होते. वाहतुकीचे विविध प्रकार अस्तित्वात आहे. रस्ता, वाहतूक आणि लोहमार्गाने केली जाणारी वाहतूक, जलवाहतूक व हवाई वाहतूक हे वाहतुकीचे विविध प्रकार अस्तित्वात आहेत. जलवाहतूक ही सर्वांत स्वस्त वाहतूक आहे, तर हवाई वाहतूक सर्वांत खर्चीक अंत्यत जलद अशी वाहतूक आहे.

**3) दळणवळण :**

दळणवळणामुळे जग अगदी जवळ आले आहे. दळणवळण म्हणजे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठीकाणी होणारे संदेशवहन होय. पूर्वीच्या

काळी दळणवळणासाठी प्राण्यांचा व माणसांचा वापर केला जात असे. आधुनिक काळात दळणवळणाची अतिशय गतिमान व आधुनिक

साधने अस्तित्वात आली आहेत.

**4) तंत्रज्ञान :**

आर्थिक विकास व तंत्रज्ञान यांचा फार जवळचा संबंध आहे. प्रत्येक प्रदेशात वेगवेगळ्या दर्जाचे तंत्रज्ञान उपयुक्तठरते. जगातील सर्व
भागांत तंत्रज्ञानाचा विकास सारख्या प्रमाणात झालेला नाही. तंत्रज्ञानाचा विकास ज्या देशात मोठ्या प्रमाणात होतो आर्थिक व
औद्योगिक विकास मोठ्या प्रमाणावर झालेला आढळतो. पाश्चिमात्य देशात तंत्रज्ञानाचा विकास मोठ्या प्रमाणात झाला असल्यामुळे
आर्थिक विकासाची पातळीही वरची आहे.

**मानव व पर्यावरण यांच्यातील संबंध**

शास्त्रीयदृष्टया सजीवांच्या वसतिस्थानांभोवती प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम करणाऱ्या घटकांचे भूजैविक दृश्य म्हणजे पर्यावरण होय, मानव व पर्यावरण यातील संबंध अनादिकाळापासून आहेत. निसर्गातील भौगोलिक आपत्तींमुळे पर्यावरणाच्या संतुलनात वेळोवेळी बिघाड निर्माण झाले. परंतु निसर्गतत्त्वानुसार पर्यावरणीय व्यवस्था संतुलित होण्याची काही क्षमता निसर्गतःच असल्याने पर्यावरणाचा तोल सावरला गेला. मानवाचे पृथ्वीवरील अस्तित्व सुमारे 20 लक्ष वर्षापासून आहे. या लक्षावधी वर्षांमध्ये मानवी संस्कृतीचा बहुतांश कालावधी म्हणजे मानव निसर्गाचाच एक भाग म्हणून जीवन व्यतीत करीत होता, पण मानवाने स्वतःचे बौद्धिक सामर्थ्य व वाचाशक्ती, कल्पनाशक्ती आणि नत्रकौशल्ये यांच्या जोरावर निसर्गात लहान-मोठे बदल घडवून आणण्यास सुरुवात केली, मानवाच्या आशा-आकांक्षा बाढून पर्यावरणाचा भाग म्हणून जगणारा मानव पर्यावरणावर मात करणारा एक शक्तिमान घटक सिद्ध झाला. अठराव्या शतकात औद्योगिक क्रांती ही मानव पर्यावरण विसंवादाला कारणीभूत ठरली. औद्योगिकीकरणामुळे पर्यावरणीय संपदांचा प्रचंड वापर केला गेला. उद्योगधंद्यांमुळे शहरांची वाढ झाली. मानवाचे राहणीमान उंचावले. गरजा, नागण्या यात वाढ झाली. पर्यावरणातील जमीन, पाणी, हवा व मृदा, खनिजे यावर अतिरेकी ताण पडला. नागरिकीकरणाच्या अति वेगामुळे श्प्रदूषणश् ही समस्या भेडसावू लागली. औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादनांच्या गतीत व प्रकारात वाढ झाली. भांडवलनिर्मितीला वाव मिळाला. श्रमिकांची मागणी वाढली, श्रमिक हा उत्पादन यंत्रणेतील एक नहानसा भाग बनला. काम केल्याचे समाधान मंदावले व मानव म्हणून तो एकटा पडला, कारखानदारी, औद्योगिक उत्पादनांचे केंद्रीकरण व नागरिकीकरणामुळे वर्गकलह, विषमता व गरिबी श्रीमंती विकृत स्वरूपात प्रकट झाल्या, आर्थिक विषमता तशीच राहिली.

मानवी विकास पूर्णपणे पर्यावरणावर अवलंबून आहे त्यामुळे मानवाने पर्यावरणात हस्तक्षेप केलेला दिसतो. पर्यावरणाचा समतोल ढळेल म्हणून विकास प्रक्रिया थांबविता येणार नाही. परंतु विकासाच्या योजना आखताना सजीवांचे अस्तित्व पर्यावरणावर अवलंबून आहे हे विसरून चालणार नाही. मानवी संस्कृतीचा विकास पूर्वीपासून वृक्ष, राणी यांच्या साहचयनिच झाला आहे. याचे मानवाला विस्मरण झाले आहे. हे पर्यावरणाच्या असमतोलाचे एक कारण आहे. पृथ्वीवर 50 लाख ते 3 कोटींपर्यंत जीवजाती आहेत. यांपैकी 15% जीवजाती मानवाला परिचित आहेत. जगभर आलेल्या औद्योगिकीकरण व निर्वनीकरणामुळे वनस्पती व प्राणी पृथ्वीवरून नामशेष झालेत. जैविक समतोलाचा मानवी अस्तित्वासाठी प्रथम विचार करायला हवा. या जैविक समाजाला मानवाइतकाच जगण्याचा हक्क आहे याची जाणीव मानवामध्ये वाढायला हवी. याकडे राष्ट्रीय संपत्ती म्हणून बघितले जाणे गरजेचे आहे. जैविक संपदांच्या क्षयाला मानव कारणीभूत आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात जैविक विविधता मोठ्या प्रमाणावर आहे. हा वारसा जोपासल्यास अजूनही पर्यावरण विकासाला वाव आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1) पर्यावरण भूगोल – डॉ. विठ्ठल धारपुरे
2) पर्यावरण समस्या व निराकरण व क्षेत्र अभ्यास - डॉ. श्रीकांत कार्लेकर
3) पर्यावरण अभ्यास - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
4) पर्यावरण भूगोल (2006) – डॉ. शैलेजा धारपूरे
5) साधन एवं पर्यावरण – SBPD PUBCI CATIONS
6) सेट मार्गदर्शक अनिवार्य पेपर 1 - निराली प्रकाशक

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून महिला सबलीकरण एक अध्ययन" (परिक्षेत्र:मधुबन कॉलनी, पंचवटी,नाशिक.)

**प्रा.चंद्रप्रभा निकम**
मविप्र समाजाचे समाजकार्य महाविद्यालय,नाशिक
समृद्धी जोशी (द्वितीय वर्ष विद्यार्थिनी), मविप्र समाजाचे समाजकार्य महाविद्यालय,नाशिक
**Email:** ctnkm123@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-1705031
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 137-145
May 2025
**Submitted:** 12 Apr. 2025
**Revised:** 25 Apr. 2025
**Accepted:** 22 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**गोषवारा**

महिला सबलीकरणाच्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारने विविध योजना सुरू केल्या आहेत. त्यापैकी एक अत्यंत महत्त्वाची योजना म्हणजे लाडकी बहीण योजना. या योजनेचा उद्देश महिलांना आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या सबल बनवणे आहे. योजनेतून महिलांना विविध प्रकारचे आर्थिक सहाय्य, आरोग्यविषयक सुविधा आणि शैक्षणिक मार्गदर्शन दिले जाते. या लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांचे सबलीकरण कसे साधले जात आहे, यावर सखोल विचार केला जाईल.

लाडकी बहीण योजनेचा महिलांच्या जीवनावर होणारा सकारात्मक परिणाम शोधणे आहे. योजनेच्या अंमलबजावणीमुळे महिलांमध्ये आर्थिक स्वावलंबन, आरोग्य सेवा, आणि शिक्षणाच्या दृष्टीने अनेक सुधारणा घडून आल्याचे दिसून आले आहे.

**मुख्य शब्द:** लाडकी बहीण योजना, महिला, आर्थिक सबलीकरण.

**प्रस्तावना:**

भारतात महिलांना सक्षम बनवण्यासाठी विविध योजना आणि उपक्रमांची अंमलबजावणी केली जाते. यामध्ये महिलांचे आर्थिक सबलीकरण हा एक महत्त्वाचा घटक आहे महिलांना आर्थिक स्वावलंबनाच्या प्रवासात सामावून घेण्यासाठी शासनाने विविध पावले उचलली आहेत त्यामध्ये लाडकी बहीण योजना हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे जी महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनवण्यासाठी राबवली जात आहे.

महिलांचे आर्थिक सबलीकरण हे समाजाच्या सर्वांगी विकासाचे प्रतीक मानले जाते जेव्हा महिना आर्थिक दृष्ट्या सक्षम होता तेव्हा त्या केवळ स्वतःच्याच नव्हे तर कुटुंब समाज आणि देशाच्या आर्थिक प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान देतात या योजनेचा उद्देश महिलांना अर्थपूर्ण मदत पुरवणे तसेच जीवनमान सुधारण्यास हातभार लावणे हा आहे.

लाडकी बहीण योजना ही महिला आर्थिक सबलीकरणाच्या दिशेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे या अध्ययनाच्या माध्यमातून या योजनेच्या अंमलबजावणीचे स्वरूप त्याच महिलांच्या जीवनावर होणारा प्रभाव आणि योजनेच्या यशस्वीरितेची मोजणी करण्याचा प्रयत्न केला जाईल यामुळे महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रातील नवीन दृष्टिकोन आणि उपक्रमाची दिशा निश्चित करण्यासाठी मदत होईल.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा.चंद्रप्रभा निकम, मविप्र समाजाचे समाजकार्य महाविद्यालय,नाशिक*
*समृद्धी जोशी (द्वितीय वर्ष विद्यार्थिनी), मविप्र समाजाचे समाजकार्य महाविद्यालय,नाशिक*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817977
OPEN ACCESS

**How to cite this article:**
*निकम,चंद्रप्रभा (2025). लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून महिला सबलीकरण एक अध्ययन" (परिक्षेत्र:मधुबन कॉलनी, पंचवटी,नाशिक.) Journal of Research & Development, 17(5(II)), 137–145.* https://doi.org/10.5281/zenodo.15817977

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**संशोधन संकल्पना**

**लाडकी बहीण**

राज्य शासनाने महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांच्या आरोग्य आणि पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजनेची अंमलबजाणी करण्यात आली आहे .

महिलांना त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी, त्यांच्या जीवनाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आणि लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी आहे. विविध सामाजिक-आर्थिक उपक्रमांमध्ये महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी, त्यामुळे त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी ही योजना तयार करण्यात आली आहे.

**लाडकी बहीण योजनेचा उद्देश:**

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांच्या स्वावलंबनाला चालना देणे आणि त्यांच्या आरोग्य आणि पोषणात सुधारणा करणे हा आहे.

**लाडकी बहीण योजनेचे महत्त्व -**

**1. शैक्षणिक आणि व्यावसायिक सशक्तीकरण:**

लाडकी बहीण योजना मुलींना शालेय आणि उच्च शिक्षणात सहाय्य प्रदान करते, ज्यामुळे त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळवून दिले जाते. यामुळे महिलांना आपल्या भविष्याच्या कक्षा विस्तृत करण्याची संधी मिळते. शिक्षणाने महिलांना आत्मविश्वास वाढवण्यास मदत होते, तसेच त्यांना रोजगाराच्या अधिक संधी मिळतात.

**2. आर्थिक स्वायत्तता आणि आत्मनिर्भरता**:

या योजनेद्वारे महिलांना व्यावसायिक शिक्षण, कौशल्य विकास, आणि स्वरोजगार सुरू करण्यासाठी वित्तीय मदत मिळवून दिली जाते. महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आणि आत्मनिर्भर बनवणे हे योजनेचे मुख्य उद्दीष्ट आहे. जेव्हा महिलांना आर्थिक स्वातंत्र्य मिळते, तेव्हा त्यांचे निर्णय घेण्याच्या सामर्थ्यात वाढ होते.

**3. सामाजिक सुरक्षा आणि कायदेशीर संरक्षण:**

लाडकी बहीण योजना महिलांना सामाजिक सुरक्षा प्रदान करते, ज्यामुळे त्यांच्या जीवनाच्या विविध बाबींमध्ये संरक्षण मिळवले जाते. यामध्ये महिलांना लघुउद्योग, आरोग्य व शालेय सहाय्य यासारख्या अनेक क्षेत्रात संरक्षण मिळते. महिलांना आर्थिक, सामाजिक आणि शारीरिक हिंसाचारापासून बचाव करण्यासाठी या योजनेंतर्गत विविध संरक्षणात्मक उपाययोजना आहेत.

**4. सामाजिक दृष्टिकोनातून बदल:**

लाडकी बहीण योजना समाजात महिलांना समान अधिकार व संधी मिळवून देण्याच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका बजावते. यामुळे महिलांच्या सामाजिक स्थानात सुधारणा होऊन, त्यांच्या परंपरागत भूमिकांचा पुनर्विचार केला जातो. महिलांच्या अधिकारांची जाणीव वाढवणे आणि त्यांना स्वातंत्र्य व सन्मान देणे हे या योजनेचे उद्दीष्ट आहे.

**5. आत्मविश्वास आणि मानसिक सशक्तीकरण**:

महिलांना योग्य मार्गदर्शन आणि मदत मिळाल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढतो. त्यांना त्यांच्या हक्कांबद्दल जागरूक करून, त्यांच्या कार्यक्षेत्रात त्यांना समान वागणूक मिळवून दिली जाते. यामुळे महिलांचा मानसिक दृष्टिकोन सुधारणार असतो, ज्यामुळे ते अधिक सक्षम बनतात.

**6. समान संधी आणि लिंग समानता:**

लाडकी बहीण योजना महिलांना लिंग समानतेच्या दृष्टीने विविध संधी उपलब्ध करून देते. या योजनेत, महिलांना पुरुषांप्रमाणेच सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक संधी दिल्या जातात, ज्यामुळे लिंगभेद कमी होतो आणि महिलांना एक समृद्ध जीवन जगण्याची संधी मिळते.

**लाडकी बहीण योजनेच्या अटी**

1. अर्जदार महिला असावी.
2. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
3. अर्जदाराचे वय 21 ते 65 वर्षे दरम्यान असावे.
4. अर्जदाराचे बँक खाते आधार लिंकसह असले पाहिजे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

5. अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ₹2,50,000/- पेक्षा जास्त नसावे.

**शोधनिबंधाचा उद्देश**

1. लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांच्या वैयक्तिक माहितीचे अध्ययन
2. लाडकी बहीण योजनेचे अध्ययन.
3. लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरणाचे अध्याय.

**गृहितके**

लाडकी बहीण योजनेतून महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा झाली आहे.

**संशोधन आराखडा**

सदर शोधनिबंधाकरिता वर्णनात्मक संशोधन आराखडा याचा वापर करण्यात आलेला आहे. माहितीचे संकलन करण्याकरीता नाशिक मधील पंचवटीतील मधुबन कॉलनीतील योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांची निवड केली आहे. एकूण किती महिलांनी योजनेचा लाभ घेतला आहे व लाभार्थी महिलांचे त्यांच्या विनियोग कसा केला याविषयी वर्णनात्मक पद्धतीने माहितीचे विवेचन करण्यात आले. .

**संशोधन पद्धती**

सदर शोधनिबंधाकरिता सामाजिक सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला यकारिता बंदिस्त स्वरूपाची मुलाखत अनुसूची तयार करून उत्तरदात्यांकडून भरून घेण्यात आली.

**नमूना विश्व**

सदर संशोधन विषयाचे विश्व ही नाशिक तालुक्यातील पंचवटी भागातील मधुबन कॉलनीतील लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतलेल्या 569 महिला आहेत .

**नमूना आकार**

नमूना विश्वातुन 30 महिलांची निवड केली आहे . संशोधन नमूना आकार 30 इतका आहे .

**नमुना निवड पद्धत**

सदर संशोधनात संभाव्यता नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. संभाव्य नमुना निवड पद्धतीमधील अनियमित अंकित प्रणाली पद्धतीचा उपयोग केला केला आहे.

**नमूना निवड प्रक्रिया**

सर्व प्रथम संशोधनासाठी महानगरपालिकेतून लाभार्थी महिलांची यादी मिळवली . त्यानुसार 569 लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांची यादी मिळाली .महिलांची यादी समोर ठेवून संभाव्य नमुन्यातील साधा यादृच्छिक नमुना निवड पद्धतीतील अनियमित अंकन् पद्धतीचा वापर करून यादीतील पहिला व शेवटचा अंक सोडून अनियमित पद्धतीने लाभार्थी महिलांची निवड केली.

**तथ्य संकलनाचा पद्धती :**

प्रस्तुत अध्ययनातील सत्यता शोधून काढण्यासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन केले आहे.

विषयासंदर्भात माहिती गोळा करण्यासाठी प्राथमिक स्त्रोत म्हणून मुलाखत अनुसूचीचा वापर केला आहे. आणि निवेदकांकडून माहितीचे संकलन करण्यात आहे. तसेच दुय्यम स्त्रोत म्हणून यामध्ये शोधनिबंधा विषयी इतर माहिती, पुस्तके, वर्तमानपत्रे, संशोधन प्रकल्प, इंटरनेट वरील विषयाच्या अनुषंगाने महत्वपूर्ण माहितीचा दुय्यम स्त्रोत म्हणून केला आहे.

**संशोधनात्मतक मांडणी व विश्लेषण**

**सारणी क्र.1.1 : वय**

| अ.क्र. | वय | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| | 21- 30 | 10 | 33.33 |
| | 31-40 | 13 | 43.34 |
| | 41-50 | 04 | 13.33 |
| | 51-60 | 03 | 10.00 |
| | एकूण | 30 | 100 |

प्रस्तुत सारणी वरून असे निदर्शनास येते की, एकूण 30 निवेदकापैकी सर्वाधिक निवेदक 31ते 40 वयोगटातील म्हणजे 13(43.34%)

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

आहेत. 21ते 23 वयोगटातील निवेदकांची संख्या 10(33.33 % आहे. 41ते 50 वयोगटातील निवेदकांची संख्या 4(13.33%) आहे .तसेच 51 ते 60 वयोगटातील निवेदक फक्त 3(10%) आहे.

**विश्लेषण**

प्रस्तुत वर्तुळलेखामध्ये असे निदर्शनास येते की एकूण 30 निवेदकापैकी पदव्युत्तर शिक्षण झालेल्या निवेदिकांची संख्या 33.3 % सर्वाधिक आहे, उच्च माध्यमिक शिक्षण झालेल्या निवेदकांचे 26. 7% प्रमाण आहे तसेच 10 पर्यंतचे शिक्षण झालेल्या निवेदकांचे प्रमाण 20% आहे आणि अशिक्षित निवेदिकांच प्रमाण 16.7% आहे.

**वर्तुळालेख क्र.2.2 : वैवाहिक स्थिती विश्लेषण : प्रस्तुत वर्तुळालेख**







वर्तुळलेखांमध्ये असे निदर्शनास येते की एकूण 30 निवेदकापैकी विवाहित निवेदकांची संख्या सर्वाधिक 90% आहे. घटस्फोटीत निवेदकांची संख्या 2.(6.7%) आहे. तर अविवाहित निवेदकांची संख्या 1(3.3 %) आहे. व विधवा निवेदकांची संख्या 0%

**स्तंभालेख क्र.1. 2: निवेदकांच्या कामाचे स्वरूप**




**विश्लेषण**

प्रस्तुत स्तंभालेखामधून असे निदर्शनास येते की एकूण 30 निवेदकांपैकी गृहिणी निवेदकांची संख्या सर्वाधिक 21(70%) आहे. नोकरी करणाऱ्या निवेदकांची 3(10%) आहे. व्यवसाय करणाऱ्या निवेदकांची संख्या अल्प म्हणजे 1(3.3%) आहे. तर इतर काम करणाऱ्या निवेदकांची संख्या 5(16.7%) आहे.

**स्तंभालेख क्र.1.3:लाडकी बहीण योजनेचा फॉर्म कोणाकडून भरून घेतला**



Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**विश्लेषण**

प्रस्तुत स्तंभलेखांमधून असे निदर्शनास येते की एकूण 30 निवेदकांपैकी अंगणवाडी सेविकांकडून फॉर्म भरलेल्या निवेदकांची संख्या सर्वाधिक 43.3% आहे.स्वतः फॉर्म भरलेल्या निवेदकांची संख्या 20 %आहे. मोबाईल ॲप वरून फॉर्म भरलेल्या निवेदकांची संख्या 13.3 % आहे. तर सायबर कॅफे मधून फॉर्म भरलेले निवेदकांची संख्या 23.3% आहे.

**वर्तुळालेख क्र.2.3 : लाकडी बहीण योजनेची माहिती कोणा कडून मिळाली**




**विश्लेषण**

प्रस्तुत वर्तुळलेखांमध्ये असे निदर्शनास येते की एकूण 30 निवेदकांपैकी वृत्तपत्रातील बातमी वाचून माहिती मिळालेल्या निवेदकांची संख्या 43.3% सर्वाधिक आहे. सोशल मीडिया वरून माहिती मिळालेल्या निवेदकांची संख्या 20% आहे. सरकारी कर्मचारी किंवा अधिकारी यांच्याकडून माहिती मिळालेल्या निवेदकांची संख्या 16.7 % आहे. कुटुंबातील सदस्यांकडून माहिती मिळालेल्या निवेदकांची संख्या 13.3% आहे. तर शेजारील महिले कडून माहिती मिळालेल्या निवेदकांची संख्या 6.7% अल्प आहे.

**वर्तुळालेख क्र.2.4 : निवेदकला बँकेत व्यवहार करता येतो का**

प्रस्तुत वर्तुळलेखांमध्ये असे दिसून येते की एकूण 30 निवेदकांपैकी 69% निवेदकांना बँकेत व्यवहार करता येतो. तर 31% निवेदकांना बँकेत व्यवहार करता येत नाही.




**वर्तुळालेख क्र.2.5 : लाडकी बहीण योजणेचा लाभ कोणत्या महिन्यापासून मिळाला**

**विश्लेषण** प्रस्तुत वर्तुळालेखामध्ये असे निदर्शनास येते की एकूण 30 निवेदकांपैकी ऑगस्ट महिन्यापासून लाभ घेतलेल्या निवेदकांची संख्या 70% म्हणजे सर्वाधिक आहे. सप्टेंबर महिन्यापासून लाभ घेतलेले निवेदकांची संख्या 26.7% आहे. तर ऑक्टोंबर महिन्यापासून लाभ घेतलेल्या निवेदकांची संख्या 3.3% म्हणजे अल्प आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025




**वर्तुळालेख क्र.2.6 : लाडकी बहीण योजणेचे किती हप्ते मिळाले**

**विश्लेषण**

प्रस्तुत वर्तुळालेखामध्ये असे निदर्शनास येते की एकूण 30 निवेदकांपैकी सगळे हप्ते मिळालेल्या निवेदकांची संख्या 70% म्हणजे सर्वाधिक आहे. दोन हप्ते मिळालेल्या निवेदकांची संख्या 6.7% म्हणजे अल्प आहे. तीन हप्ते मिळालेल्या निवेदकांची संख्या 10% आहे. तर चार हप्ते मिळालेल्या निवेदकांची संख्या 13.3% आहे.




**स्तंभालेख क्र.1.5 :लाडकी बहीण योजनेचे पैसे कोणाच्या खात्यावर आले**




**विश्लेषण**

प्रस्तुत स्तंभालेखांमधून असे निदर्शनास येते की एकूण 30 निवेदकांपैकी स्वतःच्या खात्यावर पैसे आलेल्या निवेदकांची संख्या 97.% आहे. तर पतीच्या खात्यावर पैसे आलेल्या निवेदकांची संख्या 3.3% आहे. मुलांच्या व कुटुंबातील सदस्य सदस्यांच्या खात्यावर पैसे आलेल्या निवेदकांची संख्या 0% आहे.

**वर्तुळालेख क्र.2.7 : निवेदकाच्या मतानुसार लाडकी बहीण योजनेचे उदिष्ट**

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025




**विश्लेषण**

प्रस्तुत वर्तुळा लेखा मधून असे निदर्शनास येते की एकूण 30 निवेदकांपैकी आर्थिक सक्षमीकरण हे योजनेचे उद्दिष्ट आहे असे मत असणाऱ्या निवेदकांची संख्या 53.3% आहे. रोजगाराची संधी उपलब्ध होणे असे मत असणाऱ्या निवेदकांची संख्या 13.3% आहे. तर महिलांचा आत्मविश्वास वाढवा असे मत असणाऱ्या निवेदकांची संख्या 33.3% आहे. व महिलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे असे मत असणाऱ्या निवेदकांची संख्या 0% **आहे.**

**स्तंभालेख क्र.1.6 : निवेदकला लाडकी बहीण योजनेचा लाभ**




**विश्लेषण**

प्रस्तुत स्तंभालेखांमधून असे निदर्शनासी येते की 30 निवेदकांपैकी आरोग्य सुधारण्यासाठी फायदा झालेल्या निवेदकांची संख्या 3.3% आहे. महिला सक्षमीकरणाकरिता फायदा झालेल्या निवेदकांची संख्या 33.3% आहे. आर्थिक स्वावलंबना करिता फायदा झालेल्या निवेदकांची संख्या 46.7 %. म्हणजे सर्वाधिक आहे. तर इतर कामांसाठी फायदा झालेल्या निवेदकांची संख्या 30% आहे.

**स्तंभालेख क्र.1.7 : योजनेची माध्यमातून मिळालेल्या पैशांची बचत**

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025




**विश्लेषण**

प्रस्तुत स्तंभालेखांमधून असे निदर्शनास येते की एकूण 30 निवेदकांपैकी स्वतःसाठी बचत केलेल्या निवेदकांची संख्या 50% म्हणजे सर्वाधिक आहे. SIP केलेल्या निवेदकांची संख्या 6.7% आहे. विमा काढलेल्या निवेदकांची संख्या 3.3% आहे. सोने घेतलेल्या निवेदकांची संख्या 10% आहे. RD केलेल्या निवेदकांची संख्या 6.7% आहे. व इतर पद्धतीने बचत केलेल्या निवेदकांची संख्या 26.7% आहे.

**वर्तुळालेख क्र.2.8 :या योजनेमुळे सामान्य महिलांना उपयोग होत आहे**




**विश्लेषण**

प्रस्तुत वर्तुळातलेखांमधून असे निदर्शनास येते की एकूण 30 निवेदकांपैकी ह्या योजनेमुळे सामान्य महिलांना उपयोग होत आहे असे मत असलेल्या निवेदकांची संख्या 96.7% आहे. तर या योजनेमुळे सामान्य महिलांना उपयोग होत नाही असे मत असलेल्या निवेदकांची संख्या 3.3% आहे.

**निष्कर्ष**

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

1. 1.गरीब वंचित महिलांपेक्षा शिक्षक महिलांनी अधिक लाभ घेतलेला आढळून येतो.
2. वय 31 ते 40 या युवा वर्गातील महिलांनी अधिक लाभ घेतलेला आढळून आल्या .
3. 90% योजनेच्या लाभार्थी महिला या पदवीधर आहेत.
4. योजनेच्या लाभार्थी महिला या सर्वाधिक गृहिणी आहेत
5. योजनेचे लाभ मिळाल्यामुळे शाश्वत विकासासाठी उपजीविकेचे संसाधन निर्माण करून महिला आर्थिक स्वावलंबी होत आहे .
6. सर्वाधिक महिला या पदवीधर असल्या कारणाने बँकेचे आर्थिक व्यवहार करता येतात.
7. 7.सर्वाधिक महिला या स्वतःच्या आर्थिक बचतीचे नियोजन करतात. त्यामुळे सर्वाधिक महिला स्वतःसाठी व कुटुंबसाठी फायदा होत आहे.

**संदर्भ सूची**

1. http://ladakibahin.maharashtra.gov.in
2. https://marathi.abplive.com
3. https:// wikipedia.org
4. योजना मासिक
5. सकाळ न्यूजपेपर
6. दैनिक भास्कर

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# महाराष्ट्रातील पहिल्या महीला आयपीएस डॉ.मीरा चढढा—बोरवणकर यांच्या स्वकथनातून व्यक्त होणाऱ्या स्त्रीवादी जाणीवा

**धीरजकुमार रामदास नंदागवळी [१] डॉ. प्रवीण बळीरामजी काळे[2]**
[१]एस आर पी एफ ग्रुप ४, हिंगणा रोड, नागपूर
[2]मार्गदर्शक,
प्राध्यापक मराठी विभाग,
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आर्वी जिल्हा वर्धा
**Email:** nandagawalidhirajkumar@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-1705032
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 146-149
May 2025
**Submitted:** 12 Apr. 2025
**Revised:** 25 Apr. 2025
**Accepted:** 22 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**प्रस्तावना**

पोलीस हा समाजातील एक विशिष्ट व वैशिष्टपुर्ण असा घटक आहे. जगाच्या पाठीवर कोठेही जा.जनमानसात याबाबत कुतूहल,आकर्षण आढळेल. पोलीस हा शब्द ' ग्लोबल आयडेंटी ' असलेला शब्द आहे. नाटक, सिनेमांमधून 'पोलीस' दाखविल्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. लहान शेंबडं पोरदेखील 'पोलीस' या शासकीय कर्मचाऱ्याला सर्वात आधी ओळखू लागते. पोलिसांबद्दल एवढया वयात देखील त्याला आश्चर्यमिश्रित कुतूहल,अनामिक भीती वाटत असते. तरुण पिढीला 'पोलीस' चे आकर्षण असते. फिल्म व टी.व्ही. वरील विविध सिरीयल्स पाहून तर दिवसेंदिवस त्यात भरच पडत आहे. पोलीस दलात नोकरी मिळवण्याकरिता अक्षरशः लाखो युवक धडपडत असतात,स्वप्न पाहत असतात. भारतीय पोलीस सेवेने अनेक आयपीएस अधिकारी या देशाला दिले आहेत. मात्र केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फतीने स्पर्धा परिक्षेतून महाराष्ट्र राज्यातील पहिल्या महीला आयपीएस होण्याचा मान डॉ. मीरा चढढा—बोरवणकर यांना मिळाला आहे.

१९८१ सालच्या तुकडीमधील पोलीस अधिकारी असलेल्या डॉ. मीरा चढढा—बोरवणकर हया अतिशय प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष अशा आयपीएस अधिकारी आहेत. त्यांनी आयुष्य खुप जवळून पाहिलेल असून त्यातूनच चुकत धडपडत जगणं त्या शिकल्या आहेत. एखाद्या माणसाने डोळसपणे दुसऱ्याचे निरीक्षण केले आणि त्याच्या अनुभवातून तो शिकला तर त्यांचं शिक्षण अधिक पटकन आणि कदाचित कमी वेदनादायी होईल असे त्यांना ठामपणे वाटते. ' माणसाने स्वत:च्या चुकांमधूनच शिकाव ' या पाश्चिमात्य विचारसरणीच्या त्या विरोधात आहेत. १९८१ मध्ये त्या हैद्राबादच्या सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमीमध्ये असतांना भारतीय पोलीस सेवेतील केटीपी (कीन टाईप प्रोबेशनर्स) या नावाने ओळखल्या जाणारे आयपीएस उमेदवार त्या ठिकाणी प्रशिक्षण घेत होते. त्यांची बहुतांश तुकडी सहनशील होती आणि त्या तुकडीमध्ये त्या ' एकमेव' स्त्री असल्यामुळे काहींना त्यांच्या विषयी सहानुभुती वाटायची. मुलींसाठी अगदी योग्य असलेले प्रतिष्ठेचे भारतीय लेखा आणि लेखापरीक्षण विभाग सोडून पोलीस खात्याच्या खडतर क्षेत्रात स्वत:ला अडकवण हा त्यांचा मुर्खपणा होता. अस त्यांच्यापैकी काही जणांना वाटत होत. काहींनी तर चक्क प्रत्यक्षपणे बोलून सुध्दा दाखविले होते. परंतु त्यांच्याबोलण्याकडे मीरा चढढा बोरवणकर यांनी साफ दुर्लक्ष केले होते. त्यावेळी संपुर्ण भारतामध्ये जवळपास १७ महिला आयपीएस अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. त्या सगळया आपली कर्तव्य चोखपणे पार पाडत होत्या. त्यांच्या पैकी एक असलेल्या किरण बेदी यांनी तर आपल्या कर्तृत्वाचा मोठाच ठसा उमटविला आहे. परंतु प्रशिक्षणादरम्यान पुरुषी वर्चस्व असलेल्या क्षेत्रात त्यांचा टिकास कसा लागणार ? असा प्रश्न अनेकांच्या तोंडी होता. परंतु डॉ. मीरा चढढा—बोरवणकर यांनी आपल्या कर्तबगारीपणाने या सर्व प्रश्नाचे उत्तर या शंकेत असणाऱ्या वर्गास दिलेले आहे. पोलीसी खात्यात काम करतांना त्यांनी आपले कर्तव्य अगदी चोखपणे पार पाडलेले आहेत. एक स्त्री असून पुरुषांच्या बरोबरीने अगदी प्रतिकुल परिस्थितीमध्ये सुध्दा त्यांनी अनेक साहसी आणि धाडसी निर्णय घेऊन आपल्या खाकी वर्दीला न्याय मिळवून दिलेला आहे. अनुकूल—प्रतिकुल वेळेचा विचार न करता आपलाला पीडितांकरिता न्यायाच्या भावनेने जेजे करता येईल तेते कार्य नैतिकतेच्या आणि कायद्याच्या चौकटीत राहून तसेच कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता त्यांनी केलेले आहे.

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15817994
OPEN ACCESS

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*धीरजकुमार रामदास नंदागवळी ,एसआरपीएफ ग्रुप 4, हिंगणा रोड, नागपूर*

**How to cite this article:**
नंदागवळी, . धीरजकुमार . रामदास ., & काळे, . प्रवीण . बळीरामजी . (2025). महाराष्ट्रातील पहिल्या महीला आयपीएस डॉ.मीरा चढढा-बोरवणकर यांच्या स्वकथनातून व्यक्त होणाऱ्या स्त्रीवादी जाणीवा. Journal of Research & Development, 17(5(II)), 146–149.
https://doi.org/10.5281/zenodo.15817994

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

परिणामी येथील गुन्हेगारी वर्गाची मने चिंताग्रस्त होऊ लागली आणि पुढे मीरा चढढा –बोरवणकर यांच्या रुपाने या पुरुषी वर्चस्व असलेल्या क्षेत्रात रणरागींनीचे युग सुरु झाले. अशा भारतीय पोलीस सेवेतील स्त्री अधिकाऱ्यांमध्ये अग्रदुत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मीरा चढढा–बोरवणकर यांच्या स्वकथनातून व्यक्त झालेला स्त्रीवादी जाणीवांचा आढावा घेणे, अध्ययन करणे हाच या प्रस्तृत लघुशोध निबंधामागील एक प्रामाणिक उद्देश आहे.

**डॉ. मीरा चढढा – बोरवणकर यांचा जीवनपट**

मीरा हया मुळच्या पंजाबच्या असून त्याचे शालेय शिक्षण फाझिल्का या छोटयाशा गावात सरकारी शाळेत झालेले आहे. त्यांनी इंग्रजी साहित्यामध्ये पदव्युत्तर पदवी जालंधरच्या डीएव्ही महाविद्यालयामधून पुर्ण केलेली आहे. पुढे त्यांनी सेवेमध्ये असतांना पुणे विद्यापीठामधून कायद्याचे शिक्षण आणि पीएचडी पुर्ण केली . तसेच त्या अमेरिकेच्या हयुबर्ट एच हंफ्री शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या मानकरी ठरल्या आहेत.फाझिल्कामध्ये असतांना त्यांचे वडिल सीमा सुरक्षा दलामध्ये कार्यरत होते. युपीएससी परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर त्यांना आयपीएस हे पद मिळाले. त्यांचे पती हे महाराष्ट्रीयन असून ते सुध्दा भारतीय प्रशासकीय सेवेत कार्यरत आहेत. त्या महाराष्ट्रातील पहिल्या महिला आयपीएस अधिकारी असून महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्हयाच्या त्या पहिल्या महिला पोलीस अधीक्षक ठरल्या आहेत. नाशिक, कोल्हापूर, मुंबई, औरंगाबाद, पुणे, नागपूर आणि दिल्ली या ठिकाणी डॉ. मीरा चढढा–बोरवणकर यांनी पोलीस दलात आपले कर्तव्य अत्यंत प्रामाणिकपणे बजावले आहेत. वेळोवेळी कोणत्याही राजकीय दबावाला न जुमानता त्यांनी कायद्याच्या चौकटीत राहून नैतिकतेच्या आधारावर आपले कर्तव्य आणि जबाबदारी पार पाडलेली आहे. त्या मुंबईमध्ये गुन्हे शाखेच्या सहआयुक्त, पुण्याच्या आयुक्त तसेच महाराष्ट्र तुरुंग विभागाच्या प्रमुख होत्या.

डॉ. मीरा चढढा–बोरवणकर यांच्या सेवाकार्यकाळात त्यांनी केलेल्या उत्कृष्ट आणि विशेष उल्लेखनिय कामगिरीबद्दल त्यांना राष्ट्रपतींच्या पोलीस पदकाने सन्मानित केलेल असून त्यांना इतरही अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. पोलीस आणि तुरुंग प्रशासनाच्या सुयोग्य कामकाजासाठी नागरिकांचा सहभाग खूप महत्वाचा आहे. यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. तसेच त्यांनी पोलीस संशोधन आणि विकास विभागाच्या प्रमुख म्हणून आपले कर्तव्य पार पाडलेले आहे.

**स्त्रीवादी जाणीवा**

डॉ. मीरा चढढा–बोरवणकर हया पोलीस विभागामध्ये रुजू झाल्यानंतर त्यांची महाराष्ट्रातील ज्या ज्या ठिकाणी बदली झालेली होती त्या त्या ठिकाणी तिथल्या पुरुष वा महिला पोलीस या दोघांनीही त्यांना नेहमीच पाठींबा दिलेला आहे आणि मनापासून सहकार्य केले होते. एवढंच काय तर एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची तर अशी तक्रार होती की, घरीसुध्दा मीरांविषयी कोणतीच तक्रार करता येत नाही. कारण घरी गेल्यावर पत्नीसुध्दा मीरांचीच बाजू घेते. याच एक कारण हेही असेल की पोलीस कर्मचाऱ्यांच्या पत्नीशी बोलायला ,बाईपणाच्या गोष्टी ऐकायला त्यांना आवडत असे. दिवसभर पुरुषांबरोबर काम केल्यावर त्याच त्या पुरुषी गोष्टी पेक्षा वेगळया गोष्टी ऐकायला , सांगायला मिळाल्या, तर नक्कीच खूप छान वाटतं, खरंतर पोलीसांच्या अधिकृत भोजनसमारंभातही त्यांना महिलांबरोबर बसणे आवडते.

नियुक्तीनंतर त्यांचे सुरुवातीचे काही महिने तर जळगाव लैगिंक अत्याचार प्रकरणात शिकार ठरलेल्या मुलींशी बोलण्यातच गेले. तिथल्या काही श्रीमंताच्या वाया गेलेल्या मुलांमुळे त्या पीडीत मुलींवर ही वेळ ओढवली होती. ती मुले एका विशिष्ट राजकीय पक्षाशी संबंधित होती आणि त्यामुळे सत्ता आणि पैसा या दोन्हींचा त्यांना माज होता. त्यांनी या मुलींना लग्नाची खोटी आमिष दाखवून प्रेमाच्या जाळयात त्यांना ओढल होतं. आणि त्यांच्या हेतूविषयी अनभिज्ञ असलेल्या मुलींना विवाहपुर्व लैगिक संबंध ठेवण्यास भाग पाडले होते. त्यानंतर त्यांना ब्लॅकमेल करुन इतर मुलांशी लैगिंक संबंध ठेवण्यासाठी भाग पाडण्यात आले होते. या मुली एका भयंकर दुष्टचक्रात अडकल्या होत्या. त्यांच सार जीवनच उद्ध्वस्त झाले होते. हे सगळंच प्रकरण आत केवळ स्थानिक पातळीवर मर्यादित राहिले नव्हते. काही घटनांमध्ये तर तरुण मुलींच्या गरीबीचा हेतुपुर्वक वापर करुन त्यांचे शोषण करण्यात आले होते. पण तरीही या प्रकरणात शैक्षणीक संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या मध्यमवर्गीस मुलीच अधिक करुन अडकल्या होत्या.

जळगाव लैगिक अत्याचार प्रकरणामुळे मुलींच्या वा स्त्रीयांच्या प्रश्नासंदर्भात संवेदनशील पध्दतीने काम करणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचारी वर्गाची किती गरज आहे, याची जाणीवही त्यांना झाली. खरोखरच जर स्त्रीयांचे दु:ख कमी करायच असेल तर अधिकाअधिक महिला पोलीस अधिकारी आणि कर्मचारी वर्ग असायला हवा याची त्यांना जाणीव झाली. पुरुष अधिकारी महिलांना न्याय देऊ शकत नाहीत असं त्यांना म्हणायच नाही. परंतु विशेष करुन ग्रामीण भागात बहुतांश मुली या महिला अधिकाऱ्यांशी अधिक मोकळेपणाने संवाद साधू शकतात. या गोष्टीकडे दुलर्क्ष करुन चालणार नाही. आपल्या सारख्या पोलीस अधिकाऱ्यांकडे तपास कौशल्यांच्या जोडीला सल्ला मार्गशदर्शन कौशल्यही असले पाहीजे. हे ही त्या घटनेतून त्यांना जाणवले होते.

स्मार्ट दिसण्यासाठी आपल्याला कोणासारख दिसण्याची काहीच गरज नाही हे ही त्या शिकल्या होत्या. आपण जस आहोत तस स्वत:ला आवडण ही खरोखरच खूप मोठी कमाई असते. हैद्राबाद पोलीस अकादमीमध्ये प्रशिक्षण सुरु असतांना त्यांना केस कापण्याचा सल्ला देण्यात आला होता. महिला पोलीस अधिकाऱ्यांच्या समितीची ही शिफारस असल्याचे त्यांना सांगण्यात आले होते. परंतु त्यांनी तो प्रस्ताव मान्य नसल्याने त्यांनी फारशी तपशिलात चौकशी केली नव्हती. पोलीस खात्यात चांगल कार्य करण्यासाठी त्यांना पुरुषांसारख दिसण वा त्यांच्या सारखं वागण्याची काहीच गरज नाही असे त्यांना मनापासून ठामपणे वाटत होते. तसेच या विचारांशी त्या अगदी आजपर्यत ठाम असल्याच्या दिसून येतात. ज्या कपडयांमध्ये त्यांना सर्वात जास्त आरामदायी वाटते ते कपडे त्या घालतात. तसेच त्या जशा आहे तशाच त्या वागतात आणि या पुरुषप्रधान खात्यात त्या व्यवस्थीतपणे टिकून राहिलेल्या आहेत. हे अतिशय महत्वाचे आहे. प्रबळ आंतरीक इच्छा या शब्दांबदल त्यांनी ऐकल होत. त्यामुळे केव्हा आपल्या आतल्या आवाजाला प्रतिसाद घावा आणि केव्हा तर्कसंगत धोरण धराव याचा त्यांनी विचार केला. तार्किक विचाराच महत्व कमी लेखता त्यांनी त्यांच्या प्रबळ इच्छेला झुकत माप दिलेले दिसून येते.

डॉ. मीरा चढढा–बोरवणकर यांना घोडस्वारी आवडायला लागली होती. तसेच त्या जीप चालविणे, पाइंट टू टु रायफल चालवायलाही शिकल्या होत्या. एवढ होऊनही जेव्हा युपीएससीची वेळ आली तेव्हा त्यांनी भारतीय लेखा आणि लेखापरीक्षण या सेवेची निवड केली होती. ' मुलींसाठी हाच सुरक्षित पर्याय ' असल्याचे त्यांच्या कुटुंबाला वाटत होते. आधी त्यांची बहीण पात्र ठरली होती. तिने करिअर म्हणून महसुल सेवा म्हणजेच प्राप्तीकर विभागाची निवड केली होती. ' मला जे करायच, ते हे नाही ', अस त्यांना राहून राहून वाटत होते. पण त्या काळात समस्त मुलींप्रमाणे त्यांनी देखील स्वत:च्या सुप्त इच्छेकडे दुर्लक्ष केले होते. त्यांना लेखा म्हणजेच आकडेमोड करण्यात आणि एका टेबलावर बसून विविध खाती साभांळण आणि तपासण यात काहीच रस वाटत नव्हता. मस्त मैदानी खेळात त्यांना विशेष रस होता. त्यांनी स्वत:च्या सुप्त इच्छेकडे लक्ष दिले नाही

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

आणि मुलीसांठी योग्य या नावाखाली सरधोपट मार्गाच्या जाळयात येऊन त्या पडल्या होत्या. त्यांतल्या त्यात चांगली गोष्ट म्हणजे खूप उशीर व्हायच्या आधी त्यांना या गोष्टीची जाणीव झाली आणि त्यांना आवडत असलेल्या पोलीस खात्यासाठी त्यांनी परत एकदा युपीएससीची परीक्षा दिली. १९८१ सालच्या आयपीएस तुकडीत एकटीच महिला अधिकारी त्या होत्या. त्यामुळे आणखीनच एकाकीपणा त्यांना जाणवायचा. प्रशिक्षणादरम्यान शारीरिक क्षमतेची कसोटी बघणारे,थकवून टाकणारे ते वर्ष होते. प्रशिक्षणा दरम्यान उस्तादांनी सराव थांबवेपर्यंत त्या पार थकून जायच्या. दिवसभराचा शारीरिक व्यायाम कधी एकदा संपतो असंच त्यांना व्हायचं आणि तरीही संध्याकाळी निवांत गप्पा मारायला कोणीच नसायचं. रिकाम्या खोलीत एकटयानं राहण्यात कसली आली आहे मजा ? अकादमीमधून उत्तीर्ण होऊन बाहेर पडताना आपण नक्कीच सर्वार्थाने तयार झालेलो असतो. जर आपल्यापैकी बऱ्याच जणींना फिटनेसची समान पातळी राखण्यात अपयश आले तर आपल्याला दोष दिला जातो. कारण गुरुकुलाने आपल्याला सर्वोत्तम दिलेले असते. अर्थात ‘ निसर्गाने स्त्रीयांना स्थिर हात आणि स्थिर मन ’ अशा दोन्ही गोष्टी दिलेल्या आहेत. असे त्या प्रामाणिकपणे सांगतात.

‘ मुलींच्या आयुष्यात लग्न म्हणजेच संगळ काही आणि सगळयाचा शेवट असं नसतं.’ अस त्यांच ठाम मत आहे. महाविद्यालयात त्यांच्या बरोबर शिकणाऱ्या सगळया मुलींचे लग्नाविषयी बोलण ऐकून त्या खूप गोंधळून गेल्या होत्या. जणू काही त्यांच्या आयुष्याचा दुसरा काही उद्देशच नसल्या सारख्या त्या बोलत असे. त्यांच्या मैत्रीणी जणू काही त्या ‘ विशिष्ट कार्यक्रमावरच ’ मुलींच जीवन अवलंबून असल्यासारखे बोलायच्या.

डॉ.मीरा चढढा–बोरवणकर जेव्हा त्यांच्या आयुष्यामध्ये मागे वळून बघतात आणि आता आजुबाजुला समाजात बघतात तेव्हा किमानपक्षी मोठया शहरांमध्ये तरी मध्यमवर्गीय मुलींच्या दृष्टीने अनेक चांगले बदल घडत आहेत हे त्यांना दिसून येत आहे. मुली आता महत्वाकांक्षी ,निश्चीत उदिष्टे डोळयासमोर असलेल्या आणि करिअरकेंद्री बनत आहे. छोटया गावांमधल्या परिस्थितीबाबत त्या ठाम नाहीत. अजूनही पालकांच्या वा समाजाच्या दृष्टीने जे क्षेत्र मुलींसाठी चागल वाटत तिथं त्यांना पाठवलं जातं, या बाबतीतही त्या साशंक आहेत. एकतर त्यांना त्यासाठी परवानगी नाकारली जाते कींवा घरातल्या वडीलधाऱ्या मंडळीकडून त्यांना या इच्छेपासून परावृत्त केले जाते.

डॉ.मीरा चढढा–बोरवणकर यांना त्यांच्याच वयाच्या अनेक स्त्रीया वेळोवेळी भेटायला येतात. त्यावेळी त्या सद्‌गदित होऊन त्यांचा हात हातात घेतात. अनेकदा तर लवकर लग्न झाल आणि आमची गाडी चुकली हो ! अस सांगतांना त्या भावनावश होतात. आता आपल्या मुलींच्या बाबतीत मात्र परत अस होता कामा नये, याबाबतीत त्या स्त्रीया ठाम आहेत. हया गोष्टी त्यांना जास्त भावते. उलट आपल्या मुलांना शाळेत, शिकवणी वर्गाला, खेळांसाठी दुचाकीवरुन आणायला पोहोचवायला चाललेली मध्यमवर्गीय ‘ आई ’ हे त्यांना आजच्या महत्वाकांक्षी स्त्रियांचं प्रेरणादायी असं प्रातिनिधीक रुप वाटते. अगदी ग्रामीण भागातल्या कमी उत्पन्न गटातल्या महिलांनाही या संधी मिळाव्यात अशी त्यांची इच्छा आहे.

हयुबर्ट एच हंफ्री फेलोशिप २००१–२००२ साठी डॉ. मीरा चढढा–बोरवणकर यांची निवड झाली होती. त्यामुळे त्यांना अमेरिकेतील विद्यापीठात दहा महिन्यांचं शिक्षण घेणे अनिवार्य होते तसेच त्यांना अमेरिकेतील वेगवेगळया पोलीस संस्थांमध्ये काम करायचे होते. खर सांगायचे झाले तर त्यांचे स्वप्न पुर्ण होणार होतें आणि तरीही कुटुंबाला सोडून जाणे आणि ते सुध्दा सलग दहा महिने.याचा विचारही करणे त्यांना अवघड जात होते. त्यांच्या या द्विधा मन:स्थितीतून त्यांना बाहेर काढतांना त्यांच्या सत्तर वर्षाच्या मैत्रीणीने स्पष्टपणे सांगीतले, “ आपण स्त्रीयांच अशाच असतो , ज्या इतक्या सर्वोत्तम संधी मिळून सुध्दा त्यांचा स्वीकार करायचा की नाही याचा विचार करीत बसतो. पुरुष मात्र अशा संधीचा स्वीकार करायला एका पायावर उभा असतो.”

**समारोप**

१९८१ सालच्या तुकडीमधील पोलीस अधिकारी असलेल्या डॉ. मीरा चढढा–बोरवणकर हया अतिशय प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष अशा आयपीएस अधिकारी आहेत. त्यांनी आयुष्य खुप जवळून पाहिलेल असून त्यातूनच चुकत धडपडत जगणं त्या शिकल्या आहेत. या त्यांच्या जीवनकाळात त्यांना आलेले जे अनुभव आहेत. ते अनुभव १४ ते २५ या वयोगटातल्या तरुणीसमोर मांडण्याची त्यांची प्रबळ इच्छा आहे. तसेच त्यांच्या जीवनानुभवातील काही गोष्टी या मुलींना त्यांच्या वयाच्या या टप्प्यात नक्कीच खूप आवडतील आणि उपयुक्त ठरतील असा त्यांना विश्वास वाटतो.या सर्व अनुभवांचा तसेच गोष्टींचा सार त्यांनी आपल्या ‘ माझ्या आयुष्याची पानं ’ या स्वकथनात पुस्तक रुपाने लिहीलेला आहे.

ज्यावेळी युपीएससीतून अनेक पुरुष हे पोलीस अधिकारी सेवांमध्ये नियुक्त होत होते. त्यावेळी मात्र पोलीस खात्यामध्ये पोलीस अधिकारी म्हणून महिलांचे येण्याचे प्रमाण हे अल्प होते. पोलीस विभाग म्हटला की, अतिशय खडतर,पुरुषी वर्चस्व असलेला भाग होता. त्यामुळे महिलांचा कल या सेवेकडे अतिशय कमी प्रमाणात होता. शिवाय या विभागात काम करणे म्हणजे पुरुषांच्या खांदयाला खांदा लावून काम करणे हे फार जिकरीचे काम होते. परंतु अशाही परिस्थितीमध्ये डॉ. मीरा चढढा–बोरवणकर यांनी या पुरुषी समजणाऱ्या खात्यात कोणत्याही परिणामांची चिंता न करता अगदी सहजपणे त्यांनी या खात्यात काम करण्याचं आव्हान पेललेल आहे . डॉ. मीरा चढढा–बोरवणकर यांचे वडील हे स्वत: पंजाब पोलीस दलात असल्याने त्यांना वर्दीविषयी विशेष आकर्षण असल्याचे दिसून येते. या खात्यात त्यांचे वडीलांचे कार्य त्यांनी जवळून बघीतले असल्याने त्यांनी भविष्यात आपण पोलीस सेवेतच जायला पाहिजे असा ठाम निश्चय केला होता. शिवाय सुरुवातीस युपीएससी मार्फत भारतीय लेखा आणि लेखापरीक्षण या विभागामध्ये त्यांची निवड झालेली होती. त्या नौकरीचा भाग म्हणून शिमला येथील प्रशासकीय अधिकारी प्रशिक्षण अकादमीमध्ये त्यांचे प्रशिक्षण सुरु असतांना आपण चुकीची फिल्ड निवडली असून भारतीय लेखा आणि लेखापरीक्षण विभागात प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करणे हा चुकीचा निर्णय असल्याचे त्यांना वाटू लागले. नंतर परत त्यांनी युपीएससीची तयारी करत नंतर त्यांची आयपीएस पदी निवड होऊन त्यांना महाराष्ट्र कॅडर मिळाले. येथूनच भारतीय पोलीस सेवेतील त्यांच्या जीवनप्रवासाचे आणि देशसेवेच्या कार्यास प्रारंभ झाला.

**निष्कर्ष**

1. १) डॉ. मीरा चढढा–बोरवणकर यांचे प्राथमिक शिक्षण फाझिल्का या गावात सरकारी शाळेत झाले आहे.
2. २) डॉ. मीरा चढढा–बोरवणकर यांचे एक कर्तव्यदक्ष व प्रामाणिक महिला पोलीस अधिकारी म्हणून समाजसेवचे
3. तसेच देशसेवेचे कार्य अद्वितीय आहे.
4. ३) डॉ. मीरा चढढा–बोरवणकर हया सन १९८१ च्या तुकडीतील महाराष्ट्रातील पहिल्या महिला आयपीएस आहेत.
5. ४) डॉ. मीरा चढढा–बोरवणकर हया औरंगाबाद जिल्हयाच्या पहिल्या महिला पोलीस अधीक्षक आहेत.
6. ५) डॉ. मीरा चढढा–बोरवणकर यांनी भारतीय लेखा आणि लेखापरीक्षण विभागातील उच्च पद सोडून आयपीएस हे
7. होणे पसंत केले .

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

8. ६) डॉ. मीरा चढढा–बोरवणकर यांना त्यांचे सेवाकाळात अनेक पुरस्कार मिळालेले असून त्यांना शौर्याकरीता
9. राष्ट्रपती पुरस्कार मिळाला ही त्यांच्या कार्याची पावती आहे.
10. ७) डॉ. मीरा चढढा–बोरवणकर यांचे स्वकथन ' माझ्या आयुष्याची पानं ' हे आहे.
11. ८) डॉ. मीरा चढढा–बोरवणकर यांना २००१– २००२ साली अमेरिकेतील हयुबर्ट एच हंफ्री फेलोशिप मिळाली आहे.

**संदर्भ ग्रंथ**


1. दाते डॉ सदानंद 'वर्दीतील माणसांच्या नोंदी', समकालीन प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे
2. दुसार डॉ. रोहीदास, सेंट्रल पोलीस ट्रेनिंग स्कुल अर्थात महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनीचा इतिहास, संवेदना प्रकाशन , पुणे
3. कदम डॉ. ज्योती, ब्रिटीशकालीन भारतीय पोलिसव्यवस्थेचा प्रारंभ, सर्वोदय प्रकाशन, नांदेड
4. इंदरकर अशोक, लेफ्ट राइट, राजश्री प्रकाशन, धनकवडी पुणे,
5. पाटील डॉ. आनंद, स्पर्धा परीक्षा, नोकरी संदर्भ, सदाशिव पेठ,पुणे
6. लोकराज्य मासिक, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई
7. दक्षता मासिक, मुंबई

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# आधुनिक काळातील नाविन्यपूर्ण उद्योजकतेच्या स्थितीचे आर्थिक अध्ययन

**कु. शुभांगी भगवानजी राऊत[1] डॉ. विठ्ठल मा. घिनमिने[2]**
[1]संशोधक विद्यार्थी रा.तु.म.नागपुर विद्यापीठ, नागपुर
[2]संशोधक मार्गदर्शक सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र महाविद्यालय, वडणेर जि. वर्धा
श्री साईबाबा लोक प्रबोधन कला आणि विज्ञान
**Email** - shubhangitanay1234@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-1705033
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 5(II)|
Pp. 150-155
May 2025

**Submitted:** 12 Apr. 2025
**Revised:** 25 Apr. 2025
**Accepted:** 22 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**गोषवारा :**

उद्योजकता (Entrepreneurship) म्हणजे नव्या कल्पना, नवीन व्यवसाय आणि नवीन उत्पादने किंवा सेवा निर्माण करून त्याचा आर्थिक मूल्यात बदल घडवणारी प्रक्रिया होय. कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासामध्ये उद्योजकतेची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.नाविन्यपूर्ण उद्योजकतेमुळे नवीन रोजगार निर्मिती होऊन उद्योजक नवीन उद्योग सुरु करतात आणि त्यामुळे थेट व अप्रत्यक्षरित्या अनेक लोकांना नोकऱ्या मिळतात.बेरोजगारीचा दर कमी होतो आणि लोकांचे जीवनमान उंचावते.नवीन उत्पादने व सेवा निर्माण झाल्यामुळे उद्योजक नव्या गरजांसाठी उत्पादन व सेवा तयार करतात, त्यामुळे बाजारात नवनवीन पर्याय निर्माण होतात.यामुळे ग्राहकांना अधिक चांगल्या दर्जाच्या व स्वस्त दरातील पर्याय मिळतात. नवीन गुंतवणूक आकर्षित होऊन एकदा यशस्वी उद्योग सुरु झाल्यावर, त्यामध्ये देशांतर्गत व परदेशी गुंतवणूक वाढते, ज्यामुळे आर्थिक वाढीला चालना मिळते.उद्योग व तंत्रज्ञानाचा विकास करून नाविन्यपूर्ण योजनांद्वारे उद्योजक नव्या कल्पना व तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन कार्यक्षम बनवतात.संशोधन व नवकल्पनांना प्रोत्साहन दिले जाते.उद्योगाच्या विकासामुळे क्षेत्रीय विकासाला चालना मिळते.ग्रामीण व मागास भागात उद्योग उभारल्यास त्या भागाचा सर्वांगीण विकास होतो (उदा. रोजगार, शिक्षण, आरोग्य सुविधा सुधारतात).उद्योगधंद्यांमधून निर्माण होणाऱ्या उत्पादन व सेवांमुळे देशाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न (GDP) वाढते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते. त्यामुळे देशाची आर्थिक स्थिती मजबूत होते.स्वदेशी उत्पादनांना चालना मिळते आणि देशाची निर्यात वाढते. आणि त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते.त्यामुळे देशाची आर्थिक स्थिती मजबूत होते.स्वदेशी उत्पादनांना चालना मिळते आणि देशाची निर्यात वाढते. आणि स्वावलंबन आणि जागतिक स्पर्धेमध्ये सामर्थ्य वाढविण्यास मदत होते. आणि म्हणूनच जागतिक बाजारात देशाची स्पर्धात्मक क्षमता वाढते.

**बीज शब्द :** नाविन्यपूर्ण, स्टार्टप्स, डिजिटल अर्थव्यवस्था, नवोन्मेष, समावेशिता

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.15820282

OPEN ACCESS

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*शुभांगी भगवानजी राऊत , संशोधक विद्यार्थी रा.तु.म.नागपुर विद्यापीठ, नागपुर*

**How to cite this article:**
*राऊत, . शुभांगी . भगवानजी ., & घिनमिने, . विठ्ठल . मा . (2025). आधुनिक काळातील नाविन्यपूर्ण उद्योजकतेच्या स्थितीचे आर्थिक अध्ययन. Journal of Research & Development, 17(5(II)), 150–155. https://doi.org/10.5281/zenodo.15820282*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**प्रस्तावना**

उघोजकता (Entrepreneurship) म्हणजे एखादी नवीन संकल्पना प्रत्यक्षात आणून, आर्थिक जोखीम पत्करून, उत्पादन, सेवा किंवा व्यवसाय तयार करणे व वाढविणे ही प्रक्रिया होय.

"उद्योजक (Entrepreneur) हा असा व्यक्ती आहे जो संधी ओळखतो, कल्पना विकसित करतो, संसाधनांचे व्यवस्थापन करतो आणि व्यवसाय उभा करतो."

"उद्योजकता म्हणजे नवीन कल्पनांचा वापर करून व्यवसाय निर्माण करणे व त्यातून आर्थिक व सामाजिक विकास साधणे होय.

**उद्योजकतेची संकल्पना आणि पार्श्वभूमी**

उद्योजकता ही केवळ आर्थिक फायदा मिळवण्यासाठी नसून नव्या संधी निर्माण करून समाजातील सकारात्मक बदल घडवणारी शक्ती आहे.ती काळाच्या ओघात विकसित होत गेली आहे आणि आज ती देशाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी अत्यावश्यक घटक बनली आहे.उद्योजकताहकेवळ उद्योग किंवा व्यवसाय सुरु करणे नाही, तर ती आर्थिक, सामाजिक आणि तांत्रिक प्रगतीसाठी एक प्रेरक शक्ती आहे. त्यामुळे उद्योजकतेला प्रोत्साहन देणारी धोरणे (Policy), प्रशिक्षण कार्यक्रम, आर्थिक मदत व सुविधा देणे हे सरकार आणि समाजासाठी अत्यंत आवश्यक आहे.

उद्योजकतेचा इतिहास खूप जुना आहे आणि तो काळानुसार बदलत गेला आहे. प्राचीन काळात लोकांनी व्यापार, वस्तूविनिमय (Barter System) सुरू केला.लहान-मोठ्या वस्त्र, धान्य, धातूंचा व्यापार करणे हा सुरुवातीचा प्रकार होता.मध्ययुगीन काळामध्ये व्यापाराचे आणि कारागिरीचे (Handicrafts) जाळे विकसित झाले.व्यापारी समुद्रमार्गाने नवीन प्रदेश शोधून व्यापार करायला लागले (उदा. भारतात आलेले युरोपीय व्यापारी).औद्योगिक क्रांती (१८व्या-१९व्या शतकात)नवीन यंत्रांचा शोध लागला (जसे की वाफेवर चालणारी यंत्रे).मोठ्या प्रमाणावर उत्पादन सुरू झाले आणि उद्योजकतेला नवीन वळण मिळाले.अनेक उद्योजकांनी कारखाने काढून मोठी औद्योगिक घडामोड घडवून आणली.२०वे शतकात विविध सेवा क्षेत्रात (IT, बँकिंग, शिक्षण, आरोग्य) उद्योजकतेचा झपाट्याने विकास झाला.संशोधन व नवकल्पना (Innovation) यांचा भर वाढला.२१वे शतक आज उद्योजकता केवळ उद्योग उभारण्यापुरती मर्यादित नाही, तर स्टार्टअप्स, सोशल इंटरप्रेन्युअरशिप (समाजिक उद्योजकता), ग्रीन बिझनेस (पर्यावरणपूरक उद्योग) यांसारख्या विविध क्षेत्रांत २१वे शतक आज उद्योजकता केवळ उद्योग उभारण्यापुरती मर्यादित नाही, तर स्टार्टअप्स, सोशल इंटरप्रेन्युअरशिप (समाजिक उद्योजकता), ग्रीन बिझनेस (पर्यावरणपूरक उद्योग) यांसारख्या विविध क्षेत्रांत विस्तारली आहे.डिजिटल तंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय बाजारपेठ आणि स्टार्टअप संस्कृतीमुळे उद्योजकतेचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे.

**आधुनिक काळातील नाविन्यपूर्ण उद्योजकतेची पार्श्वभूमी:**

औद्योगिक क्रांती (१८व्या-१९व्या शतकात) उद्योजकतेला गती देणारा एक मुख्य टप्पा होता. यामुळे उत्पादन तंत्रात बदल झाला, आणि नवीन व्यवसायांचे स्वरूप तयार झाले.तंत्रज्ञानातील प्रगती (विशेषतः संगणक, इंटरनेट, आणि मोबाईल तंत्रज्ञान) यामुळे २०व्या शतकाच्या उत्तरार्धात नवीन उद्योग सुरू करणे सोपे झाले. गलोबलायझेशन (जागतिकीकरण) मुळे बाजारपेठा विस्तारल्या आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धा वाढली, ज्यामुळे नवीन आणि नाविन्यपूर्ण व्यवसायांच्या संधी निर्माण झाल्या.

**नाविन्यपूर्ण कल्पनांची पार्श्वभूमी:**

डिजिटल परिवर्तन: कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ब्लॉकचेन, IoT, आणि बायोटेक्नोलॉजी यांसारख्या नव्या तंत्रज्ञानामुळे अनोख्या संकल्पना शक्य झाल्या. कस्टमर-केंद्रित दृष्टिकोन: ग्राहकांच्या गरजांनुसार आणि त्यांच्या समस्यांवर आधारित नवीन उत्पादने आणि सेवा विकसित केली जाऊ लागली. डिझाईन थिंकिंग आणि अगाईल इनोव्हेशन या पद्धतींनी नाविन्यपूर्ण

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

विकास जलद आणि अधिक प्रभावी झाला. गुगल, ॲपल, टेस्ला, ॲमेझॉन नवन्यपूर्णतेला त्यांच्या यशाचा मूलभूत पाया बनवते.

**स्टार्टअप्स आणि लघुउद्योग**

स्टार्टअप संस्कृतीचा उदय:

विशेषतः १९९० नंतर सॉफ्टवेअर, IT, आणि ई-कॉमर्स क्षेत्रात झपाट्याने वाढ झाली. या काळात "स्टार्टअप" ही संकल्पना लोकप्रिय झाली.सामाजिक उद्योजकता केवळ नफा न पाहता सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठीही उद्योजक पुढे येऊ लागले. कोविडकाळात शिकलेली धडा. सरकार आणि प्रायव्हेट सेक्टरचे सहकार्य (उदा., स्किल इंडिया).स्टार्टअप इंडिया ही भारत सरकारची एक महत्त्वाकांक्षी योजना आहे .जी उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. याअंतर्गत अनेक सरकारी योजना आहेत. ज्यामुळे स्टार्टअप्सना आर्थिक मदत, मार्गदर्शन, आणि इतर सुविधा मिळतात.

स्टार्टअप इंडिया योजना:16 जानेवारी 2016 रोजी सुरुवात झाली.

स्टार्टअप्ससाठी कर सवलत,पेंटरशिप आणि फंडिंगसाठी मदत,सिंगल विंडो क्लीयरन्स, सुरुवातीच्या टप्प्यातील स्टार्टअप्सना निधी, संशोधन आणि उत्पादन विकासासाठी मदत, अटल इनोव्हेशन मिशन (AIM), इनोव्हेशन आणि संशोधनाला प्रोत्साहन, अटल टिंकरिंग लॅब्स, मेक इन इंडिया,उत्पादन क्षेत्रातील स्टार्टअप्सना प्रोत्साहन विदेशी गुंतवणूक आकर्षित करणे, स्टँड अप इंडिया योजना,SC/ST आणि महिला उद्योजकांसाठी कर्ज,₹10 लाख ते ₹1 कोटी पर्यंत कर्ज उपलब्ध भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये "स्टार्टअप इंडिया" सारख्या योजना नाविन्यपूर्ण उद्योजकतेला चालना देत आहेत. भारतातील स्टार्टअप्स आणि MSME सेक्टर हा जागतिक स्पर्धेत मोठ्या भूमिका बजावत आहे. योग्य पॉलिसी, टेक्नॉलॉजी, आणि ग्लोबल नेटवर्किंगच्या मदतीने हा क्षेत्र आणखी प्रगती करेल.

लघुउद्योगांचे फायदे:

१)स्थानिक युवकांना त्यांच्या गावातच रोजगार मिळतो.स्थलांतर कमी होते (शहरांकडे जाण्याची गरज कमी) त्यामुळे रोजगारनिर्मिती वाढ होते.

२)शेतकऱ्यांचे पूरक उत्पन्न वाढते.छोट्या गुंतवणुकीतून चांगला नफा मिळू शकतो.उत्पन्नात वाढ घडून येते.

३) स्थानिक कच्चा माल (जसे की दूध, फळे, भाज्या, कापूस, गहू वगैरे) वापरून उत्पादन करता येते.वाहतूक व कच्च्या मालावर खर्च कमी होतो. त्यामुळे स्थानिक साधनसंपत्तीचा उपयोग पुरेपूर प्रमाणात होतो.

४) स्वतःचा व्यवसाय असल्याने गावकरी आत्मनिर्भर होतात.गावाचा आर्थिक विकास वेगाने घडतो.सांस्कृतिक आणि पारंपरिक कौशल्यांना चालना हस्तकला, विणकाम, लोणचं बनवणं, शेतीप्रधान प्रक्रिया उद्योग टिकून राहतात.गावाची संस्कृती व व्यवसाय परंपरा जिवंत राहते. आणि सक्षम किंवा स्वालंबन होण्यास मदत होते.

५)चांगल्या गुणवत्तेच्या उत्पादनांना मोठ्या बाजारपेठेत मागणी असते.काही उत्पादने (जसे की ग्रामीण हस्तकला, ऑर्गेनिक फूड) थेट निर्यात होऊ शकतात. याचा परिणाम म्हणून देशात निर्यातक्षमतेत वाढ घडून येण्यास मदत होते.

६) महिला बचत गट आणि स्वयंरोजगार गटांद्वारे महिलाही मोठ्या प्रमाणात सहभागी होतात.महिला उद्योजकतेला प्रोत्साहन मिळते. महिलांना रोजगार मिळवून महिलांचे सक्षमीकरण होते

७)ग्रामीण भागात बायोगॅस, सौर ऊर्जा यासारखे पर्याय पूरक व्यवसाय म्हणून उपलब्ध होते.

लघुउद्योगांचे उदाहरण:

दुग्ध व्यवसाय (डेअरी),हँडीक्राफ्ट आणि हस्तकला वस्तू बनवणे,शेती प्रक्रिया उद्योग (लोणचं, जॅम, आंबा पल्प)

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

,बियाणे निर्मिती व विक्री,कापड उद्योग (हातमाग, पावरलूम),अन्न प्रक्रिया उद्योग (पिठाच्या गिरण्या, पापड-लोणचं युनिट),बायोगॅस युनिट्स,मत्स्यपालन,सेंद्रिय शेती यासारख्या लघुउद्योगांद्वारे देशाचा आर्थिक विकासात वाढ होण्यास मदत होते म्हणजेच लघुउद्योग हे देशाच्या विकासाला हातभार लावणारे आहे.

**डिजिटल अर्थव्यवस्थेचा प्रभाव आणि जागतिक बाजारपेठेतील बदल**

डिजिटल अर्थव्यवस्था म्हणजे आर्थिक क्रियाकलाप डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे (इंटरनेट, मोबाइल, क्लाउड कॉम्प्युटिंग, AI, ब्लॉकचेन इ.) चालविलेली व्यवस्था. यात उत्पादन, वितरण आणि सेवांची खरेदी-विक्री डिजिटल माध्यमांतून होते.

मुख्य घटक:

- ई-कॉमर्स:,ॲमेझॉन, फ्लिप्कार्ट, अलीबाबा सारख्या प्लॅटफॉर्म्सद्वारे ऑनलाइन व्यापार. - डिजिटल पेमेंट्स: UPI (फोनपे, गूगल पे), क्रिप्टोकरन्सी, डिजिटल वॉलेट्स. - क्लाउड कॉम्प्युटिंग: AWS, Google Cloud सारख्या सेवांद्वारे डेटा स्टोरेज आणि प्रक्रिया. - आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) आणि बिग डेटा: व्यवसाय आणि ग्राहकांच्या वर्तणुकीचे विश्लेषण. - 5G आणि IoT (इंटरनेट ऑफ थिंग्स): स्मार्ट उपकरणांची जोडणी आणि डेटा एक्सचेंज.

**जागतिक बाजारपेठ (Global Marketplace)**

जागतिक बाजारपेठ म्हणजे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर वस्तू, सेवा आणि भांडवलाची देवाणघेवाण करणारी एकीकृत व्यवस्था.

**वैशिष्ट्ये:**

- ग्लोबलायझेशन: उत्पादने आणि सेवा जगभरात सहज उपलब्ध.
- स्पर्धा: चीन, यूएस, युरोपियन युनियन सारख्या अर्थव्यवस्थांमधील कंपन्यांची स्पर्धा.
- सप्लाय चेन: डिजिटल प्लॅटफॉर्म्सद्वारे जागतिक पुरवठा साखळीचे व्यवस्थापन.

डिजिटल अर्थव्यवस्थेचा प्रभाव:

- ई-कॉमर्स वाढ: २०२५ पर्यंत जागतिक ई-कॉमर्स बाजार $7 ट्रिलियन पार करेल (स्टॅटिस्टा).
- रिमोट वर्क: फ्रीलान्सिंग (Upwork, Fiverr) आणि डिजिटल नोकऱ्यांची वाढ.
- क्रिप्टोकरन्सी: बिटकॉइन, एथेरियम सारख्या डिजिटल चलनांनी पारंपारिक बँकिंगला आव्हान दिले.

**डिजिटल अर्थव्यवस्थेची भूमिका**

- डिजिटल इंडिया: UPI, Aadhaar, GST ने डिजिटल ट्रान्झॅक्शन्स वाढवल्या.
- IT सेक्टर: TCS, इन्फोसिस सारख्या कंपन्या जागतिक IT सेवा पुरवतात.
- स्टार्टअप्स: स्विगी, झोमॅटो, पेटीएम सारख्या युनिकॉर्न कंपन्या जागतिक स्तरावर ओळखल्या जातात.

**जागतिक बाजारपेठेवर डिजिटल अर्थव्यवस्थेचे सकारात्मक परिणाम**

१) व्यवसायांचे जागतिकीकरण घडून येत आहे. याचाच परिणाम छोटे व्यवसाय देखील ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर येऊन जागतिक ग्राहकांपर्यंत पोहोचू शकतात.ई-कॉमर्स, डिजिटल मार्केटप्लेस (जसे Amazon, Alibaba) मुळे व्यापार अडथळे कमी झाले.

२) नवीन रोजगार संधीत वाढ होऊन डिजिटल मार्केटिंग, डेटा ॲनालिटिक्स, सायबर सुरक्षा, ॲप डेव्हलपमेंट या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती झाली.त्यामुळे फ्रीलान्सिंग आणि रिमोट वर्कचे प्रमाण वाढले.

३))व्यवहार सुलभ व गती वाढण्यास मदत झाले त्याचा परिणाम डिजिटल पेमेंट सिस्टीम्स (जसे PayPal, UPI, Crypto) मुळे व्यवहार जलद, सुरक्षित व पारदर्शक झाले.आंतरराष्ट्रीय व्यवहार करताना वेळ व खर्च दोन्ही कमी झाला.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

४)उद्योग व उत्पादन क्षेत्रात सुधारणा घडून आले.स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग, इंडस्ट्री 4.0 यामुळे उत्पादनक्षमता वाढली.ऑटोमेशन व रोबोटिक्स
चा वापर वाढला, ज्यामुळे गुणवत्ता सुधारली.

५)नवीन - नवीन उद्योगांचा उदय झाला. त्यामुळे स्टार्टअप्सनी नव्या कल्पनांवर आधारित व्यवसाय सुरू केले (जसे, फिनटेक, एडटेक, हेल्थटेक कंपन्या).नवोन्मेष (Innovation) वाढल्यामुळे अर्थव्यवस्था अधिक गतिमान झाली.

६) डिजिटल शिक्षण आणि कौशल्य विकासात प्रगती झाल्यामुळे ऑनलाइन कोर्सेस व डिजिटल शिक्षणमुळे विविध देशांतील लोकांना नवीन कौशल्ये आत्मसात करता आली.ज्ञानाचा प्रसार व स्पर्धात्मकता वाढली.

७) समावेशिता वृद्धिंगत झाल्यामुळे दूरवरच्या, मागासलेल्या भागांतील लोकही डिजिटल तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जागतिक अर्थव्यवस्थेचा भाग बनू शकतात.

**जागतिक बाजारपेठेवर डिजिटल अर्थव्यवस्थेचे नकारात्मक परिणाम**

१). डिजिटल तंत्रज्ञानात गुंतवणूक आणि प्रवेश करणाऱ्या देशांमध्ये आणि कंपन्यांमध्ये झपाट्याने प्रगती होते, तर गरीब आणि विकसनशील देश मागे पडतात. त्यामुळे आर्थिक विषमतेत वाढ होते.त्यामुळे श्रीमंत आणि गरीब देशांमध्ये आणि लोकांमध्ये दरी वाढते.

२). मोठ्या डिजिटल कंपन्या (जसे Amazon, Alibaba) छोट्या स्थानिक व्यवसायांना स्पर्धेतून बाहेर टाकतात.त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्था कमकुवत होते.आणि स्थानिक व्यवसायांना धोका निर्माण होते.

३). डिजिटल व्यवहारांमध्ये सायबरहल्ले, फसवणूक, आणि डेटा चोरीचे प्रमाण वाढले आहे.त्यामुळे ग्राहकांचा विश्वास कमी होतो व अर्थव्यवस्थेला नुकसान होते. आणि सुरक्षा आणि गोपनीयतेच्या बाबतीत समस्या निर्माण होतात.

४) ऑटोमेशन (automation) आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मुळे पारंपरिक नोकऱ्या कमी होतात.बेरोजगारीचा दर वाढतो.विशेषतः कमी कौशल्य असलेल्या कामगारांचे रोजगार धोक्यात येतात.

५). क्रिप्टोकरन्सी सारख्या नव्या डिजिटल गुंतवणूक साधनांमुळे बाजारपेठेत अनिश्चितता वाढते.
आणि आर्थिक अस्थिरता निर्माण होण्याचा धोका भाग कधीकधी डिजिटल संपत्तीचा फुगा (bubble) फुटल्यास जागतिक आर्थिक संकट उद्भवू शकते.

६). काही जागतिक डिजिटल कंपन्या विशिष्ट प्रादेशिक बाजारपेठांवर वर्चस्व प्रस्थापित करतात, त्यामुळे स्थानिक स्पर्धक टिकत नाहीत.त्यामुळे प्रादेशिक बाजारपेठेवर नियंत्रण राहत नाही

७). वेगवेगळया देशांमध्ये डिजिटल व्यवहारांचे नियम भिन्न आहेत, त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये गोंधळ आणि संघर्ष होतो.आणि आणखीनच कायदेशीर व नियमनातील अडचणी निर्माण होतात.

**नाविन्यपूर्ण उद्योजकतेचा आर्थिक विकासावरील प्रभाव**

नाविन्यपूर्ण उद्योजकता ही एक महत्त्वाची चालक शक्ती आहे. उद्योजकतेमुळे नवीन कल्पना, उत्पादने, सेवा आणि तंत्रज्ञान विकसित होते, ज्यामुळे रोजगार निर्मिती, उत्पादकता वाढ आणि समाजाचा आर्थिक स्तर उंचावतो.

खालील मुद्दे नाविन्यपूर्ण उद्योजकतेची आर्थिक विकासातील भूमिका स्पष्ट करतात:

1. नवीन तंत्रज्ञान आणि उत्पादन पद्धतींचा विकास:

नाविन्यपूर्ण उद्योजक नवीन तंत्रज्ञान (जसे की AI, IoT, रिन्युएबल एनर्जी) शोधून कार्यक्षमता आणि उत्पादनक्षमता वाढवतात. - उदाहरण: स्टार्टअप्सच्या माध्यमातून डिजिटल पेमेंट, ई-कॉमर्स, आणि ऑटोमेशन सिस्टीम्सचा विकास.

2. रोजगार निर्मिती आणि आर्थिक संधी

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

- लहान-मोठ्या स्टार्टअप्समुळे थेट आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतो. उदाहरण: भारतातील IT स्टार्टअप्समुळे लाखो युवकांना नोकरीच्या संधी मिळाल्या.

3. परिसंवाद सुधारणे आणि स्पर्धात्मकता

- नाविन्यपूर्ण कंपन्या बाजारात स्पर्धा वाढवून ग्राहकांना स्वस्त आणि गुणवत्तापूर्ण उत्पादने पुरवतात. उदाहरण: जिओने भारतात डेटा आणि दूरसंचार सेवा स्वस्त केल्या.

4. परदेशी गुंतवणूक आणि विदेशी चलन आकर्षण

- युनिकॉर्न स्टार्टअप्स (जसे की Flipkart, Paytm) परदेशी गुंतवणूक (FDI) आकर्षित करतात, ज्यामुळे देशाचा GDP वाढतो.

5. सामाजिक समस्यांचे निराकरण

- नाविन्यपूर्ण उपक्रम (जसे की स्वच्छ ऊर्जा, शेतीत तंत्रज्ञान) मुळे गरिबी, रोग आणि पर्यावरणीय समस्या सोडवल्या जातात. भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये "स्टार्टअप इंडिया", सारख्या योजना नाविन्यपूर्ण उद्योजकतेला चालना देत आहेत.

**निष्कर्ष**:

भारतातील आर्थिक विकासाची प्रगती नाविन्यपूर्ण योजनांद्वारे साकारली जात आहे. या योजना आर्थिक सुधारणा, तंत्रज्ञानाचा वापर, शाश्वत विकास आणि सामाजिक समावेश यावर भर देतात. या योजना आर्थिक सुधारणा, तंत्रज्ञानाचा वापर, शाश्वत विकास आणि सामाजिक समावेश यावर भर देतात. भारत जगातील *तिसऱ्या क्रमांकाचे* सर्वात मोठे स्टार्ट-अप इकोसिस्टम बनत आहे (USA आणि चीननंतर). डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया यासारख्या उपक्रमांमुळे स्टार्ट-अप्सना पुढे जाण्यास मदत होत आहे.

.डिजिटल अर्थव्यवस्था जागतिक बाजारपेठेचे स्वरूप बदलत आहे. भविष्यात AI, ब्लॉकचेन आणि ग्रीन टेक्नॉलॉजीचा प्रभाव अधिक वाढेल.भारतातील स्टार्टअप्स आणि MSME सेक्टर हा जागतिक स्पर्धेत मोठ्या भूमिका बजावत आहे. योग्य पॉलिसी, टेक्नॉलॉजी, आणि ग्लोबल नेटवर्किंगच्या मदतीने हा क्षेत्र आणखी प्रगती करेल. नाविन्यपूर्ण उद्योजकता ही भारताच्या आर्थिक विकासाचा कणा ठरत आहे. ती केवळ GDP वाढवतेच असे नाही, तर सामाजिक परिवर्तनालाही चालना देते.

**संदर्भग्रंथसूची**

1. पाटील, अजित, 2021: स्टार्टप्स: यशाची गुरुकिल्ली, सरकार पब्लिकेशन, पुणे.
2. महाजन, मुकुंद, 2020: भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास, निराळी प्रकाशन.
3. कुमार, अजय, 2019: डिजिटल भारत; एक परिवर्तन, प्रभात प्रकाशन.
4. देशमुख, सीमा, डिजिटल इंडिया संधी आणि आव्हाने, विश्वगंधा प्रकाशन.
5. ढवळे, संजय: उद्योगाचे नवे परिमिती, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
6. बागची, सुब्रोतो: तुम्हीही व्हा धडाडीचे उद्योजक, बुक विश्वा पब्लिकेशन.
7. Shukla,Ravindra,2020: Small is Big: The source code for fullfillment ,Productivity and Extraordinary Results,Treeshade Books.
8. Singh,Nalin,2017:Startup India:An Entrepreneurial Revolution, Pentagon Press .

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# भारतातील भाववाढीचा चिकीत्सक अभ्यास

**अमृता करवंदे**
Morden college of Arts and science Ganesh Khind pune
**Email:** amrutakarwande@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-1705034
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 156-158
May 2025
**Submitted:** 12 Apr. 2025
**Revised:** 25 Apr. 2025
**Accepted:** 22 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**प्रस्तावना :-**

भारत हा एक विकासनशील देश असुन येथे आर्थिक सामाजिक आणि राजकीय घडामोडींचा थेट परिणाम सामान्य जनतेवर, जनतेच्या जीवनमानावर होतो यामधील एक अत्यंत महत्त्वाचा भाणि सतत चर्चेतीलत विजय म्हणजे जीवनाश्यक वस्तुंच्या किमतीत सातत्याने होणारी वाढ सामान्य नागरिकांच्या आर्थिक स्थितिवर मोठा परिणाम वाढवते. भाववाढीचा संबंध केवळ बाजारातील मागणी पुरवठा या तत्त्वाशी नसून जागतिक घडामोडी, सरकारची आर्थिक धोरणे, उत्पादन खर्च, औद्योगिक विकास, बंधन दर अशा अनेक घटकांशी असतो.

भारतातील भाववाढीचे स्वरुप. त्याची कारणे, परिणाम व यावरिल उपाययोजना या साऱ्या गोष्टींचा चिकीत्सक अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण महागाई केवल आर्थिक- आर्थिक क्षेत्रापुरती मर्यादित राहत नाही, तर ती सामाजिक असंतुलन, गरिबी वाढ, बेरोजगारी इत्यादी. समस्यांना कारणीभूत ठरते.

या अभ्यासामधुन आपल्याला भाववाढीचे विविध पैलु समजून घेता येतील, तसेच ती नियंत्रित करण्यासाठी कोणत्या धोरणात्मक उपायांची आवश्यकता आहे हे देखील स्पष्ट होईल. त्यामुळेच या विषयाचा सखोल आणि चिकीत्सक अभ्यास आज या घडीला करणे अत्यंत आवश्यक ठरतो.

**उद्दिष्टे :-**

1) भाववाढ या संकल्पनेचा अभ्यास करणे.
2) भारतातील भाववाढीच्या कारणांचा अभ्यास करणे.
3) भारतातील भाववाढीच्या परिणामांचा अभ्यास करणे.

**ठळक शब्द**

A) भाववाढ
B) किंमत
C) आर्थिक तेजी

**संशोधन पद्धणी :-**

प्रस्तुत संगोधन अहवालामध्ये संशोधीकेने शोध निबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर करुन माहिती संकलित केली आहे.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*अमृता ,करवंदे, Morden college of Arts and science Ganesh Khind pune*

**How to cite this article:**
*करवंदे, . अमृता . (2025). भारतातील भाववाढीचा चिकीत्सक अभ्यास. Journal of Research & Development, 5(II), 156–158.* https://doi.org/10.5281/zenodo.15818456

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15818456
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**विश्लेषण :**

A) भाववाढ या संकल्पनेचा अभ्यास करणे.

**व्याख्या :-**

"जेव्हा एखाद्या अर्थव्यवस्थेत एकुण किंमत पातळी सातत्याने वाढते आणि त्यामुळे चलनाची खरेदी क्षमता कमी होते. त्यास भाववाढ असे म्हणतात "

**अर्थ :-**

भाववाढ म्हणजे वस्तु आणि सेवांच्या किंमतींमध्ये सातत्याने होणारी वाढ जेव्हा बाजारातील बहुतेक वस्तुंच्या किंमती वाढतात बाजारातील आणि त्या वाढलेल्या किमती दीर्घकाळ टिकतात, तेव्हा त्याला भाववाढ किवा महागाई असे म्हणतात.

**B ) भारतातील भाववाढीच्या कारणांचा अभ्यास करणे :-**

भारतासारख्या विविध आर्थिक सामाजिक आणि भौगोलिक घटक असलेल्या देशामध्ये भाववाढीची अनेक कारणे आहेत. काही प्रमुख कारणे दिली आहेत.

**(1) मागणी पुरवठा तफावत :**

जेव्हा एखादया वस्तुची मागणी जास्त असते पण तिचा पुरवठा कमी असतो. तेव्हा त्या वस्तुच्या किमती वाढतात.

**(2) इंधन दरांमध्ये वाढ :**

पेट्रोल, डिझेल, आणि गैस यांच्या किंमती वाढल्या की, वाहतुक खर्च वाढतो, त्यामुळे सर्वच वस्तु महाग होतात.

**(3) अन्नधान्य उत्पादनातील अनिश्चितता :**

पावसावर अवलंबुन असलेल्या शेतीमुळे उत्पादनात चढ-उतार होतो आणि यामुळे अन्नधान्याच्या किमती वाढतात.

**4) सरकारी सोहळे व खर्च :**

काहीवेळ सरकार जास्त खर्च करते (उदा, सबसिडी. पगारवाढ ) यामुळे बाजारात जास्त पैसा आणि महागाई वाढते.

**5) जागतिक बाजारातील घडामोडी :**

तेलाचे दर, अलेन – राशीचा युध्द , डॉलरच्या यांसारख्या जागतिक तुलनेत रुपयाचे अवमुल्यन यांसारख्या जागतिक घटकांचा भारतातील महागाईवर परिणाम होतो.

**6) कालबद्ध साठवणुक व काळाबाजार :-**

व्यापारी वस्तु साठवुन ठेवुन कृत्रिम टंचाई निर्माण करतात आणि नंतर त्या वस्तु महाग दरात विकतात.

**(7) चलनवाढ:-**

जर सरकारने बाजारात जास्त प्रमाणात नोटा छापल्या, तर किंमत कमी होते आणि महागाई वाढते.

**8) आयात खर्च वाढणे :-**

जेव्हा भारत आयात करत असलेल्या कच्चा किमती वाढतात. तेव्हा त्याचा थेट परिणाम देशातील महागाईवर होतो.

**9 ) भारतातील भाववाढीच्या परिणामांचा अभ्यास करणे :-**

भारतातील भाववाढीचा परिणाम केवळ अर्थव्यवस्थेपुरता मर्यादित राहत नाही तर तो समाजाच्या सर्व स्तरांवर जाणवतो याचा चिकित्सक अभ्यास केल्यास खालीलप्रमाणे विविध परिणाम स्पष्टपणे दिसुन येतात

**1 ) सामान्य जनतेवर परिणाम :**

- जीवनाश्यक वस्तु महाग झाल्याने सामान्य माणसाच्या खर्चात वाढ होते.
- गरिब आणि मध्यमवर्गीय कुटूबांचे बजेट बिघडते .
- बचतीत घट होते व कर्ज घेण्याचे प्रमाण वाढते

**2) उत्पन्नातील असमानता वाढते :-**

- श्रीमंत वर्ग महागाईचा सहज सामना करु शकतो. 101 गरिब वर्गाला मोठा फटका बसतो.
- यामुळे सामाजिक विषमता वाढते.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**(3) बचत आणि गुंतवणुकीवर परिणाम :**

- महागाईमुळे पैशाची किंमत कमी होते. त्यामुळे बचतीची प्रेरणा कमी होते.
- स्थिर व्याजदर असलेल्या गुंतवणुकीवर परिणाम होतो कारण प्रत्यक्ष परतावा कमी वाटतो.

**(4) व्यवसाय व उध्योगधंदयावर परिणाम :**

- कच्चा माल महाग झाल्याने उत्पादन खर्च वाढतो .
- उत्पादन खर्च वाढल्यास ते ग्राहकांकडुन वसुल करण्यासाठी विक्री दर वाढवावे लागतात , त्यामुळे मागणी घटते.

**(5) चलनाच्या मूल्यावर परिणाम :**

- सततच्या भाववाढीमुळे रुपयाची क्रयशक्ती कमी होते.
- आयात महाग होते, त्यामुळे देशाच्या चालु खात्याच्या तूटीवर परिणाम होतो.

**(6) सरकारी धोरणांवर परिणाम :-**

- सरकारला भाववाढ नियंत्रणासाठी व्याजदर वाढवावे लागतात जे गुंतवणुकीत मर्यादा आणतात.
- सबसिडीचा भार वाढतो. आणि त्यामुळे वित्तीय तूट वाढू शकते.

**संदर्भ सूची –**

1. **द्रविड, सी.एन.** )2018) – *भारतीय अर्थव्यवस्था – एक अभ्यास, संदीप प्रकाशन, पुणे.*
2. **भोसले, एस.आर.** *)2020)* **–** *मूल्यवाढ व त्याचे परिणाम, शालेय ग्रंथनिर्मिती मंडळ, मुंबई.*
3. Government of India *(2023) – Economic Survey of India, Ministry of* Finance, New Delhi.
4. Reserve Bank of India (RBI) – *Annual Reports (2020–2024), www.rbi.org.in*

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# नागपूर विभागातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यक्षमतेचे आर्थिक विश्लेषण

**श्री. अमोल विठोबाजी भगत**[1] , **प्रा. डॉ. सुनिल शिंदे**[2]
[1]संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग पदव्युत्तर शिक्षण विभाग,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, जिल्हा- नागपूर
[2]भिवापूर महाविद्यालय,भिवापूर जि. नागपूर
**Email**: bhamol111@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-1705035
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp.159-163
May 2025
**Submitted:** 12 Apr. 2025
**Revised:** 25 Apr. 2025
**Accepted:** 22 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीत येणारे महत्वाचा सार्वजनिक वाहतूक सेवा पुरवणारा उपक्रम असून नागपूर विभाग हे परिवहन महामंडळाचे विदर्भातील एक प्रमुख प्रशासकीय व वाहतूक केंद्र आहे. प्रस्तुत संशोधनाचा विषय हा 'नागपूर विभागातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यक्षमतेचे आर्थिक विश्लेषण' हा असून संशोधनाचा मुख्य उद्देश नागपूर विभागातील उत्पन्न व खर्चाचे विश्लेषण करणे. कार्यक्षमतेत अडथळे निर्माण करणारे घटक ओळखणे. खासगी वाहतुकीशी होणा-या स्पर्धेचा अभ्यास करणे. कार्यक्षमतेत सुधारणा करण्यासाठी शिफारसी मांडणे हा आहे. प्रस्तुत संशोधनात महामंडळाला तिकिट विक्री, मालवाहतूक, जाहिरात महसूल, शालेय बस करार, खासगी भाडे, पास सेवा यांचा माध्यमातून मिळणा-या उत्पन्नाच्या विविध साधनांचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच महामंडळाच्या व्ययाचा विचार करतांना इंधन, वेतन, वाहन देखभाल, टोल, कर इत्यादींच्या स्वरूपात होणाÚया खर्चाचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. परिवहन महामंडळाच्या नागपूर विभागाच्या आर्थिक स्थितीचे अवलोकन करतांना परिवहन महामंडळाच्या कार्यक्षमतेवर परिणाम करणा-या विविध घटकावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने इंधन खर्च, वाहनांची स्थिती व देखभाल, कर्मचारी व्यवस्थापन, वेळेचे पालन, तांत्रिक सुधारणा व डिजिटायझेशनचा अभाव, प्रवासी संख्या, धोरणात्मक निर्णय व राजकीय हस्तक्षेप, वाहतूक नियोजन व मार्ग व्यवस्थापन, भाडे दर व सबसिडी धोरण, भाडे दर व सबसिडी धोरण आणि खजगी बसेसे सोबतच्या स्पर्धेवर सविस्तर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

**कळीचे शब्द** Key Word - परिवहन] टपाल] जाहीरात] महामंडळ] सवलती] योगदान] ग्रामिण] वाहतुक एसटी] बस] आगार] बसस्थानक] नियोजन] व्यवस्थापन] नेतृत्व] विभागिय] हस्तक्षेप] दुर्गम] इंधन] प्रवास] दर] सेवा] कार्यक्षमता-

**प्रस्तावना**:

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (MSRTC) ही राज्यातील एक महत्त्वाची सार्वजनिक वाहतूक संस्था आहे. ही संस्था ग्रामीण, आदिवासी, शहरी तसेच औद्योगिक भागात दळणवळणाची सुविधा पुरवते.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15818494
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*श्री अमोल विठोबाजी भगत ,संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग पदव्युत्तर शिक्षण विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, जिल्हा- नागपूर*

**How to cite this article:**
*भगत, . अमोल . विठोबाजी ., & शिंदे, . सुनिल . (2025). नागपूर विभागातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यक्षमतेचे आर्थिक विश्लेषण. Journal of Research & Development, 17(5(II)), 159–163. https://doi.org/10.5281/zenodo.15818494*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

. विदर्भातील नागपूर विभाग हे या सेवेचे एक महत्त्वाचे केंद्र असून, याचा उपयोग लाखो प्रवासी दररोज करतात. मात्र गेल्या काही वर्षांत महामंडळ आर्थिक तणावात सापडले आहे

विशेषतः नागपूर विभागामध्ये प्रवासी संख्येत घट, खर्चवाढ, तांत्रिक अडचणी आणि खासगी स्पर्धा यामुळे कार्यक्षमतेवर विपरित परिणाम झाला आहे. परिणाम करणारे घटक शोधून काढणे. याचे विश्लेषण केल्यामुळे भविष्यातील धोरणात्मक सुधारणा व सक्षमीकरणासाठी मार्गदर्शन करता येईल.

राज्यातील शहरी तसेच ग्रामीण भागांमध्ये नागरिकांना प्रवासाची सुलभ, सुरक्षित व परवडणारी सेवा पुरवणे हे या महामंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. राज्यभर 16,000 हून अधिक बस आणि दररोज 50 लाखांपेक्षा अधिक प्रवासी या सेवेचा लाभ घेतात. असे असले तरी, मागील काही वर्षांत महामंडळाच्या आर्थिक स्थितीत मोठी घसरण झाली आहे. वाढती इंधन दर, देखभाल खर्च, कर्मचारी संप, खासगी वाहतुकीशी स्पर्धा, आणि प्रशासकीय अडचणी यांमुळे महामंडळाला मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर, MSRTC च्या कार्यक्षमतेचे आर्थिक विश्लेषण करणे अत्यंत आवश्यक बनले आहे. या संशोधनाचा उद्देश म्हणजे महामंडळाच्या उत्पन्न व खर्चातील तफावत, त्यामागील कारणे, तसेच कार्यक्षमतेवर

**संशोधनाची गरज आणि उद्दिष्टे:**

या संशोधनाचे उद्दिष्ट नागपूर विभागातील MSRTC च्या कार्यक्षमतेचे आर्थिक विश्लेषण करणे हे आहे. या विश्लेषणात प्रवासी भाडे, मालवाहतूक, जाहिरात, शासकीय अनुदान, तसेच खासगी स्पर्धेचा परिणाम समाविष्ट आहे. मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे:

1. नागपूर विभागातील उत्पन्न व खर्चाचे विश्लेषण करणे.
2. कार्यक्षमतेत अडथळे निर्माण करणारे घटक ओळखणे.
3. खासगी वाहतुकीशी होणाऱ्या स्पर्धेचा अभ्यास करणे.
4. कार्यक्षमतेत सुधारणा करण्यासाठी शिफारसी मांडणे.

**संशोधन पध्दती (Methodology):**

प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित माहिती संकलित करतांना द्वितियक साधन सामग्री पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला असून यामध्ये प्रामुख्यानेमहाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे महामंडळाची आर्थिक स्थिती दर्शविणारे प्रकाशित वार्षिक अहवाल, महाराष्ट्र सरकारच्या वाहतूक खात्याचे दस्तऐवज, वृत्रपत्रातील वाहतुकीशी सबंधित प्रकाशित माहिती इत्यादी साहित्याचा वापर करण्यात आलेला आहे.

नागपूर विभागिय परिवहन महामंडळाची माहिती

या विभागातून नागपूर-गडचिरोली, नागपूर-चंद्रपूर, नागपूर-वर्धा अशा विविध मार्गांवर बससेवा नियमितपणे चालवली जाते. विभागात साध्या, सेमी-लक्झरी, शिवशाही व महिला प्रवाशांसाठी विशेष बससुद्धा उपलब्ध आहेत. इंधन खर्च, देखभाल, कर्मचारी पगार आदी बाबतीत हा विभाग आर्थिक आव्हानांना सामोरे जात असला तरी सेवा सुरू ठेवण्यात सातत्य राखले गेले आहे. नवीन वाहने, डिजिटल तिकीट प्रणाली व पर्यावरणपूरक (इलेक्ट्रिक) बस सेवेचा विस्तार करण्याचा प्रयत्न विभाग करत आहे. नागपूर विभाग हे MSRTC च्या कार्यप्रणालीतील एक महत्त्वाचे अंग असून, याच्या कार्यक्षमतेचा राज्याच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर मोठा प्रभाव पडतो.

नागपूर विभागामध्ये एकूण 10 जिल्ह्यांमध्ये सेवा कार्यरत असून सुमारे 1200 बस आणि 15 बस डेपो कार्यरत आहेत. विभागात दररोज अंदाजे 2.5 ते 3 लाख प्रवासी MSRTC च्या सेवा वापरतात. विभागाचे मुख्यालय नागपूर शहरात आहे आणि या विभागात सुमारे 5000 कर्मचारी कार्यरत आहेत. विभागाची KPTL (प्रति किलोमीटर प्रवासी) 44.87 असून ती राज्याच्या सरासरीच्या जवळ आहे.

**परिवहन महामंडळाच्या उत्पन्नाची प्रमुख साधने**

1. **तिकिट विक्री** (Ticket Revenue):

ही MSRTC च्या उत्पन्नाची सर्वात मोठी व मुख्य बाब आहे. प्रवाशांकडून प्रवासासाठी आकारले जाणारे तिकिट दर हे महामंडळाच्या दैनिक उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. दररोज लाखो प्रवासी विविध मार्गांवर प्रवास करतात. सामान्य, सेमी-लक्झरी, शिवशाही, वातानुकूलित व इतर विशेष बससेवांसाठी वेगवेगळे तिकीट दर असतात. ग्रामीण व शहरी भागातील प्रवाशांसाठी सवलतींची तरतूदही आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

2. **पास विक्री** (Bus Passes):

विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, अपंग, महिला व नियमित प्रवाशांसाठी मासिक व साप्ताहिक पास दिले जातात. यामधूनही मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळते. जरी काही वर्गांना सवलत मिळत असली, तरी मोठ्या प्रमाणात पास धारक असल्याने हा एक स्थिर उत्पन्नाचा स्रोत आहे.

3. **जाहिरात महसूल** (Advertisement Revenue):

MSRTC च्या बसगाड्या, बसस्थानके, तिकीट बुकिंग काउंटर, वेटिंग एरिया, तसेच ऑनलाइन पोर्टलवर जाहिरातीसाठी जागा दिली जाते. यामधून खाजगी कंपन्यांकडून महसूल मिळतो. जाहिरात क्षेत्राचा योग्य वापर केल्यास उत्पन्न वाढवण्याची मोठी संधी असते.

4. **वाहन भाड्याने देणे** (Vehicle Hiring/Contract Services):

   MSRTC आपल्या काही बसेस खासगी कार्यक्रमांसाठी किंवा शासकीय वापरासाठी भाड्याने देते. उदाहरणार्थ, निवडणूक कार्यासाठी, सरकारी दौऱ्यासाठी किंवा खासगी संस्थांच्या सहलींसाठी बस भाड्याने दिल्या जातात. या सेवेतूनही महत्त्वाचे उत्पन्न मिळते.

5. **मालवाहतूक सेवा** (Parcel and Cargo Services):

   ST महामंडळ प्रवाशांच्या बरोबरीने मालवाहतूक सेवाही पुरवते. बसद्वारे पार्सल, कुरिअर किंवा लहान व्यवसायिक माल एक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठवण्याची सुविधा आहे. ही सेवा विशेषतः ग्रामीण व लहान शहरांमध्ये लोकप्रिय आहे.

6. **व्यावसायिक जागा भाड्याने देणे:**

   बसस्थानकांवरील दुकाने, स्टॉल्स, खानावळी, बँक एटीएम्स यांना जागा भाड्याने देण्यात येते. या भाड्यांमधून नियमित उत्पन्न मिळते. काही ठिकाणी बसस्थानकांची इमारत व्यावसायिक वापरासाठीही दिली जाते.

7. **सरकारी अनुदान** (Government Subsidy):

   MSRTC ला राज्य शासनाकडून वेळोवेळी अनुदान मिळते, विशेषतः तोट्यातील सेवा चालवण्यासाठी. सामाजिक बांधिलकीच्या अनुषंगाने पुरविण्यात येणाऱ्या सवलतींसाठी हे अनुदान मिळते.

**खर्चाचे मुख्य घटक**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (MSRTC) ही एक मोठी सार्वजनिक वाहतूक संस्था असून ती राज्यभर प्रवाशांना सेवा पुरवते. या सेवांचा खर्च सांभाळण्यासाठी महामंडळाला मोठ्या प्रमाणावर आर्थिक नियोजन करावे लागते. महामंडळाच्या एकूण खर्चाचे विश्लेषण केल्यास खालीलप्रमाणे प्रमुख खर्चाचे घटक समोर येतात:

1. **इंधन खर्च** (Fuel Expenses):

MSRTC च्या बससेवा डिझेलवर आधारित असल्यामुळे इंधन खर्च हा सर्वात मोठा खर्चाचा घटक आहे. डिझेलच्या दरांतील सतत चढ-उताराचा महामंडळाच्या आर्थिक स्थितीवर मोठा परिणाम होतो. प्रवासाच्या एकूण किलोमीटरवर अवलंबून इंधन खर्च ठरतो, आणि तोट्यातील मार्गांवर हा खर्च विशेषतः अधिक असतो.

2. **कर्मचारी वेतन व भत्ते** (Salaries and Allowances):

   MSRTC मध्ये हजारो कर्मचारी कार्यरत आहेत – चालक, वाहक, तांत्रिक कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी इत्यादी. त्यांचे मासिक वेतन, निवृत्तीवेतन, भत्ते, ओव्हरटाइम व इतर सुविधा यावर मोठा खर्च होतो. कर्मचारीसंख्या मोठी असल्यामुळे एकूण खर्चाच्या 30-40% भाग वेतनावर खर्च होतो.

3. **वाहन देखभाल व दुरुस्ती** (Vehicle Maintenance & Repairs):

   बसगाड्यांची नियमित देखभाल, स्पेअर पार्ट्स, टायर, इंजिन रिपेअर, तेल बदल इत्यादीसाठी खर्च लागतो. जुनी वाहने असतील तर देखभाल खर्च अधिक वाढतो. खराबीमुळे बस बंद पडल्यास सेवा व महसूल दोन्हीवर परिणाम होतो.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

4. **प्रशासनिक खर्च** (Administrative Expenses):
   या विभागात कार्यालयीन खर्च, स्टेशनरी, विज बिल, पाणी, मोबाईल/इंटरनेट सेवा, सुरक्षा खर्च इत्यादींचा समावेश होतो. विविध आगार, विभागीय कार्यालये व बसस्थानकांच्या व्यवस्थापनासाठी हा खर्च आवश्यक असतो.
5. **विमा व कर** (Insurance and Taxes):
   प्रत्येक बससाठी विमा बंधनकारक असतो. तसेच रस्त्याचा कर, वाहतूक परवाना शुल्क, पर्यावरण कर इत्यादी सुद्धा महामंडळाला भरावे लागतात. हा खर्च नियमित व अनिवार्य स्वरूपाचा असतो.
6. **कर्ज फेडणी व व्याज** (Loan Repayment and Interest):
   MSRTC ने वेळोवेळी नवे बस खरेदी, सुविधा सुधारणा यासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड व त्यावरील व्याजाचा खर्च हा महामंडळाच्या आर्थिक ताळेबंदात मोठा भाग व्यापतो. कधी कधी नवीन बस खरेदीसाठी थेट कर्जाशिवाय सरकारी हमीवर कर्ज घेतले जाते.
7. **प्रशिक्षण व मानव संसाधन विकास** (Training and HR Development):
   कर्मचाऱ्यांना नवीन तंत्रज्ञान, सुरक्षिततेचे नियम, ग्राहक सेवा व व्यवस्थापन कौशल्यांसाठी वेळोवेळी प्रशिक्षण देणे आवश्यक असते. या प्रशिक्षणासाठी लागणारा खर्च हा दीर्घकालीन दृष्टिकोनातून फायदेशीर असतो.

**परिवहन महामंडळाच्या नागपूर विभागाच्या आर्थिक स्थितीचे अवलोकन पुढील तक्त्यामध्ये नागपूर विभागाच्या परिवहन महामंडळाच्या वर्ष 2019 ते 2023 पर्यंतच्या उत्पन्न, खर्च व नुकसान दर्शविणारी माहिती दर्शविलेली आहे.**

| वर्ष | एकूण उत्पन्न (कोटी रू.) | एकूण खर्च(कोटी रू.) | निव्वळ तोटा/नफा (कोटी रू.) | प्रति किलोमीटर उत्पन्न | प्रति किलोमीटर खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 2019 | 145.2 | 190.4 | -45.2 | 32.5 | 42.6 |
| 2020 | 120.8 | 172.3 | -51.5 | 30.1 | 42.9 |
| 2021 | 132.5 | 180 | -47.5 | 31.2 | 43.9 |
| 2022 | 141.7 | 189.5 | -47.8 | 33 | 44.8 |
| 2023 | 150.6 | 198.9 | -48.3 | 34.1 | 45 |

कार्यक्षमतेवर परिणाम करणारे प्रमुख घटक

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (MSRTC) कार्यक्षमतेवर परिणाम करणारे प्रमुख घटक खालीलप्रमाणे आहेत:**

1. **इंधन खर्च** (Fuel Cost):
   इंधनाचे दर सतत वाढत असल्याने वाहतूक खर्चात मोठी वाढ होते. हे एक प्रमुख आर्थिक दबाव निर्माण करणारे कारण आहे. कमी मायलेजबद्दल देखील खर्च वाढतो.
2. **वाहनांची स्थिती व देखभाल** (Vehicle Maintenance):
   जुनी बसगाड्या अधिक देखभाल मागतात व जास्त वेळ बंद राहतात. त्यामुळे वेळेचे पालन होणे कठीण जाते व प्रवासी नाराज होतात.
3. **कर्मचारी व्यवस्थापन** (Staff Management):
   कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्तीवेतन, संप, किंवा अनुपस्थिती यामुळे सेवा खंडित होते. तसेच अपुरी मनुष्यबळ उपलब्ध असल्यास वेळापत्रकावर परिणाम होतो.
4. **वेळेचे पालन** (Punctuality):
   बस वेळेवर येणे आणि जाणे हा प्रवाशांचा विश्वास टिकवण्यासाठी महत्त्वाचा घटक आहे. ट्रॅफिक, खराब रस्ते, किंवा तांत्रिक बिघाड यामुळे उशीर होतो.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

5. **तांत्रिक सुधारणा व डिजिटायझेशनचा अभाव:**
ई-तिकीटिंग, GPS ट्रॅकिंग, ऑनलाइन सेवा नसल्यामुळे प्रवाशांना सुविधा मिळत नाहीत आणि खासगी वाहतूकदारांशी स्पर्धा करता येत नाही.
6. **प्रवासी संख्या** (Ridership):
प्रवासी कमी झाल्यास तिकिट विक्रीतून होणारे उत्पन्न घटते. खासगी वाहन वापर किंवा रिक्षा, प्रवासी वाहन सेवांमुळे हे प्रमाण कमी होते.
7. **धोरणात्मक निर्णय व राजकीय हस्तक्षेप:**
काही वेळा राजकीय दबावामुळे घाट्यातील मार्ग चालवावे लागतात. तसेच निर्णय प्रक्रिया धीम्या गतीने होणे कार्यक्षमतेस अडथळा ठरते.
8. **वाहतूक नियोजन व मार्ग व्यवस्थापन:**
अनुत्पादक किंवा कमी प्रवासी असलेल्या मार्गांवर बसगाड्या चालवल्यास तोटा होतो. बससेवा योग्य वेळा, मार्ग व फ्रीक्वेन्सीनुसार नसेल तर कार्यक्षमता कमी होते.
9. **भाडे दर व सबसिडी धोरण:**
प्रवाशांना अनुदान देण्यासाठी भाडे दर कमी ठेवले जातात, पण त्यातून मिळणारे उत्पन्न खर्चाच्या तुलनेत अपुरे ठरते.
10. **स्पर्धा** (Competition):
खाजगी बस, रिक्षा, ओला-उबेर इ. सेवांमुळे MSRTC वर प्रवाशांच्या आकर्षणात घट होते, त्यामुळे उत्पन्नावर परिणाम होतो.

**निष्कर्ष:**

MSRTC ही राज्यातील एक महत्त्वाची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असून तिचे सामाजिक योगदान मोठे आहे. मात्र, आर्थिकदृष्ट्या ती सध्या अडचणीत आहे. कार्यक्षमतेत सुधारणा करण्यासाठी धोरणात्मक निर्णय, तांत्रिक अंमलबजावणी आणि आर्थिक शिस्त आवश्यक आहे. नागपूर विभागातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (MSRTC) ही संस्था विदर्भातील शहरी व ग्रामीण भागांना जोडणारी एक महत्त्वाची सार्वजनिक वाहतूक सेवा आहे. या विभागातील बस सेवा नागरीकांसाठी परवडणारी, सुरक्षित आणि महत्त्वाची जीवनरेषा आहे.

**संदर्भसूची** (References):

1. 1. क्षिरसागर रा.ना., वाहतूक सिंध्दात व विकास, महाराष्ट्र राज्य विद्यापीठ ग्रंथ निर्मितीमंडळ, कान्टीनेन्टल प्रकाशन, पुणे
2. डॉ. मोडक शंकर केशव, आधुनिक परिवहनाचे अर्थशास्त्र, महाराष्ट्र राज्य विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर.
3. MSRTC वार्षिक अहवाल (2019–2023)
4. महाराष्ट्र शासनाचे अर्थ व परिवहन विभागाचे दस्तऐवज
5. लोकसत्ता, सकाळ, लोकमत, नवराष्ट्र वृत्तपत्र
6. 6.www.google.com

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# अंतराळ संशोधन आणि विज्ञानातील नवी क्षितिजे

**प्रा. डॉ. सुनंदा चरडे**
कला व वाणिज्य महाविद्यालय भिसी
मराठी विभाग प्रमुख
**Email**- scharde537@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-1705036
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 5(II)|
Pp.164-167
May 2025

**Submitted:** 12 Apr. 2025
**Revised:** 25 Apr. 2025
**Accepted:** 22 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**भुमिका**

अंतराळ संशोधन म्हणजे अशी जागा की जी पृथ्वीच्या वातावरणाबाहेर आणि आणि जिच्याद्वारे खगोलशास्त्राचा अभ्यास विषय आहे तसेच या जागेत ग्रह तारे आणि आकाशगंगा आहेत. अंतराळ म्हणजे जिथे गुरुत्वाकर्षणाचा प्रभाव कमी होतो अशी पृथ्वीच्या वातावरणाबाहेरची जागा. अंतराळात खगोलशास्त्राचा अभ्यास करताना दुर्बीणचा वापर करतात त्याप्रमाणेच उपग्रह आणि अंतराळ यान आणि अंतराळवीरांचाही उपयोग केला जातो. अंतराळ म्हणजे पृथ्वीच्या पलीकडे आणि आकाशीय शरीर यांच्यामध्ये अस्तित्वात असलेला विस्तार होय. यालाच अवकाश असेही म्हणतात. अंतराळात संशोधन करताना अंतराळवीरांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतो तिथे गुरुत्वाकर्षण शून्य प्रमाणात असतं. अनेक अंतराळवीर अवकाशात राहून काम करतात अंतराळ म्हणजे पृथ्वीच्या बाहेरचा विस्तार होय. अंतराळ हा एक मोठा प्रदेश आहे पण त्यात अत्यंत कमी घनता असलेले कण जसे की हायड्रोजन आणि काही प्रमाणात धूळ आणि किरणे देखील आहेत अंतराळात खगोलीय वस्तूप्रमाणे वायू धूळ प्रकाश आणि चुंबकीय क्षेत्र असतात. अंतराळाचा मानवी जीवनावर अनेक प्रकारे परिणाम होतो जसे उपग्रह हे आपल्याला दुरध्वनी आणि हवामानाची माहिती देतात. एकंदरीत अंतराळ संशोधने मानवाच्या वैज्ञानिक ज्ञानाला प्रोत्साहित करते विश्वाच्या जडणघडणीतील एक मूलभूत घटक म्हणजे अंतराळ होय. विश्वातील कुठल्याही वस्तूच्या वातावरणाबाहेरील रिकाम्या भागाला पोकळीला अवकाश असे म्हणतात जणू ही पृथ्वी भोवतालच्या वातावरणाचे अथांग पोकळी असते. या अंतरिक्ष, अवकाश किंवा अंतराळाला इंग्लिश मध्ये स्पेस म्हणतात. पृथ्वीच्या बाहेरील या अंतराळात म्हणजे पोकळीत आपल्या सूर्यमालेसारख्या अनेक सूर्यमाला व अनेक तारकासमूह आहेत. अंतराळ मधील या तारका त्यांच्या नैसर्गिक उपग्रहांसोबत सूर्याभोवती किंवा अन्य मोठ्या ताऱ्यांवरती प्रदक्षिणा पूर्ण करत असतात. अंतराळ संशोधनाद्वारे तंत्रज्ञानाचा अनेक प्रकारे उपयोग होतो जसे की पृथ्वीचे निरीक्षण करणे. उपग्रहाच्या मदतीने हवामान नैसर्गिक आपत्ती आणि पर्यावरणातील बदल याबाबत निरीक्षण करणे रेडिओ, इंटरनेट, दूरदर्शन, टेलिफोन यासारख्या माध्यमांसाठी उपग्रहांचा वापर करणे. स्थान आणि दिशा निश्चित करण्यासाठी उपग्रह नेव्हिगेशन प्रणालीचा उपयोग होतो.

Quick Response Code:

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Website:
https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.15820450

**Address for correspondence:**
*प्रा. डॉ. सुनंदा चरडे, मराठी विभाग प्रमुख कला व वाणिज्य महाविद्यालय भिसी*

**How to cite this article:**
*चरडे, . सुनंदा . (2025). अंतराळ संशोधन आणि विज्ञानातील नवी क्षितिजे. Journal of Research & Development, 17(5(II)), 164–167. https://doi.org/10.5281/zenodo.15820450*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

मानवाने अंतराळात याना च्या माध्यमातून उड्डान भरणे आणि अंतराळातील स्थानांचा शोध घेणे शक्य होते. ग्रह, तारे आणि इतर आकाशी वस्तूंचा अभ्यास करणे वैज्ञानिक संशोधनाद्वारेच शक्य होते. अंतराळ संशोधना बरोबरच तंत्रज्ञानाचे महत्त्व हे मोठ्या प्रमाणावर आहे. अंतराळ तंत्रज्ञान हे जागतिक अर्थव्यवस्थेवर प्रभाव पाडणारे असते. दूरसंचार पर्यटन आणि विज्ञान यासारख्या उद्योगांना ते चालना देते. अंतराळातील उपग्रहांचा हवामान अभ्यास आणि हवामान अंदाज घेण्यासाठी वापर होतो.

अंतराळ संशोधन हे वैज्ञानिक प्रगतीला चालना देणारे ठरते. इस्रो (ISRO) ही भारतीय संस्था भारतातील अंतराळ संशोधनाचे प्रमुख केंद्र आहे. या केंद्राद्वारे अनेक उपग्रह प्रक्षेपित केले जातात त्यामुळे ही संस्था अंतराळ संशोधनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. अंतराळ संशोधन आणि तंत्रज्ञान एक व्यापक क्षेत्र आहे. पृथ्वी आणि अंतराळ दोन्ही ठिकाणी तंत्रज्ञानाचा महत्त्वपूर्ण उपयोग होतो. अंतराळ तंत्रज्ञानामध्ये ज्या गोष्टींचा समावेश होतो त्या गोष्टी म्हणजे अंतराळयान, उपग्रह, अंतराळ स्थानके आणि अंतराळातील प्रणोदन तसेच आधारभूत सुविधा उपकरणे अशाप्रकारे विविध तंत्रज्ञानाचा समावेश आहे.

सोव्हिएत युनियन हा अंतराळात कोणतेही तंत्रज्ञान पाठविणारा पृथ्वीवरील पहिला देश. या देशाला पूर्वी 'युनियन ऑफ सोव्हिएत सोशालिस्ट रिपब्लिक 'म्हणून ओळखले जात असे. 4 ऑक्टोबर 1957 रोजी स्पुतनिक १ उपग्रह पाठवला. त्याचे वजन सुमारे 83 किलो 183 पौंड होते.

भारतीय अंतराळ कार्यक्रमाचे जनक विक्रम अंबालाल साराभाई हे आहेत. हे भारतीय भौतिकशास्त्रज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ होते आणि त्यांनी भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) Indian Space Research Organisation स्थापन केली. जी भारतात अंतराळ कार्यक्रमाची प्रमुख संस्था आहे.

19 50 च्या दरम्यान अंतराळ संशोधनाला सुरुवात झाली. डॉक्टर विक्रम साराभाई यांचे क्षेत्रात महत्त्वाचे योगदान असल्यामुळे भारताला महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले. त्यांना भारतीय विज्ञान तंत्रज्ञानाचे जनक मानले जाते. पहिली भारतीय महिला अंतराळवीर म्हणून कल्पना चावला यांचा उल्लेख होतो.

***अंतराळ संशोधन आणि विज्ञानातील नवी क्षितीजे**

अंतराळ संशोधनाचा प्रवास हा थक्क करणारा आहे. अंतराळ संशोधन हे केवळ विज्ञानाचे क्षेत्र नसून मानवी जिज्ञासाचे आणि तांत्रिक प्रगतीचे प्रतीक आहे . अंतराळ क्षेत्रातील प्रमुख नवकल्पना, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभाव आणि जागतिक स्तरावर सुरू असलेल्या संशोधनाचा अभ्यास होय. याबाबत जयंत नारळीकर म्हणतात," जे आज अमेरिकेत घडत आहे ते उद्या परवा जगभर पसरणार यात शंका नाही. तसेच अनेक गोष्टींनी ही जादूची पट्टी संगणक यंत्राद्वारे माणसाला कंटाळावाणी वाटणारी कामे झटपट करून त्याची दगदग वाचवणार यातही शंका नाही. केबल टेलिव्हिजनच्या प्रसारामुळे दूरदर्शन अधिक सोपे आणि व्यापक स्वरूपाचे होणार हे पण दिसून येत आहे. त्यामुळे आणखी 50 वर्षांनी माणसाला आपले बरीचशी कामे 'घर बसल्या' करता येतील. ऑफिसला जाण्याचे श्रम वाचतील . मुलांना शाळेत राखडत न जाता हव्या त्या सोयीच्या वेळी हवा तो पाठ शिकता येईल- घरबसल्या! केवळ ह्या कामासाठी येण्या - जाण्यावर खर्च होणारी ऊर्जा आणि वाहतूकीमुळे होणारे प्रदूषण हे भूतकाळात जमा होतील."१(पृ.क्र.३८) हे त्यांचे मत आज खरे झाल्याची जाणीव होते.

पुनर्वापरयोग्य रॉकेट्स, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ,3D प्रिंटिंग आणि उपग्रह संप्रेषण तंत्रज्ञान यासारख्या प्रगत प्रणालीमुळे अंतराळ संशोधनाला नवी दिशा मिळाली आहे. या संशोधनात प्राथमिक आणि दुय्यम स्तोत्रांवर आधारित विश्लेषण करून अंतराळ संशोधनाच्या भविष्यातील दिशा आणि त्याच्या संभाव्य सामाजिक आर्थिक आणि वैज्ञानिक परिणामांचा अभ्यास करण्यात आला आहे अंतराळातील नवकल्पना भविष्यात मानवी जीवनशैली कशी बदलू शकतात याचे संभाव्य दृष्टिकोन यात मांडले आहेत. 1957 मध्ये सोवियत संघाने प्रथम स्फुटनिक वन हा उपग्रह अंतराळात पाठवला आणि 1969 मध्ये नील आर्मस्ट्राँग यांनी चंद्रावर पहिले पाऊल ठेवले. या ऐतिहासिक घटनेपासून सुरू झाला तो चंद्र आणि मंगळावरील मानवी वसाहतींच्या योजनांपर्यंत येऊन पोहोचला आहे. विज्ञानाच्या नाविन्यपूर्ण अशा संशोधनामुळे मानवी भविष्यासाठी नवीन संधी निर्माण होत आहे अलीकडे काही दशकांच्या काळात

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

अंतराळ संशोधनात फार मोठी क्रांती झाल्याच्या जाणवते ( उदा. सुनिता विल्यम्स). अंतराळ संशोधनाची ही प्रगतीपथावरील सूत्रे आज केवळ भारतातील इस्त्रो, अमेरिकेतील नासा या सरकारी संस्थांकडेच नाही तर Space x, Blue Origin & Virgin Galactic यांसारख्या खाजगी कंपन्या सुद्धा तंत्रज्ञानाच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देताना दिसतात. पुनर्वापरयोग्य रॉकेट्स ,3D प्रिंटिंग, चंद्र आणि मंगळावरील संशोधन, उपग्रह संप्रेषण तंत्रज्ञान आणि अंतराळ पर्यटन यासारखे अंतराळ क्षेत्रातील नाविन्यपूर्ण संकल्पनात्मक शोध पृथ्वीवरील मानवी जीवनाचा सुधारलेला दर्जा आणि विकासाचा आलेख मांडणारा आहे हे नाकारता येत नाही. GPS प्रणाली, हवामान अंदाज , इंटरनेट सॅटॅलाइट्स यासारख्या क्षेत्रात झालेली प्रगती विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा परिणाम म्हणता येईल. याबरोबरच पुढील काळातील अंतराळ संशोधनामुळे खनिज संपत्तीचा उपयोग मंगळ ग्रहावरील संभाव्य मानवी वसाहत आणि इतर ग्रहावरील जीवन संशोधन यासारख्या गोष्टींवर संशोधन होत आहे ही अंतराळ क्षेत्रातील मानवी जीवनाशी निगडित महत्त्वपूर्ण घटना होय.

*अंतराळ क्षेत्रातील नावीन्यपूर्ण शोध

अंतराळ क्षेत्रात गेल्या काही दशकात मोठ्या प्रमाणावर संशोधन आणि तंत्रज्ञान विकास झालेला आहे. या संशोधनामुळेच अंतराळ मोहिमा अधिक यशस्वी झाल्या असून नवीन ग्रह, उपग्रह आणि अन्य खगोलीय घटकांचा शोध घेण्यात मदत झाली आहे. ही अंतराळ तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वैज्ञानिक क्षेत्रात झालेली क्रांती केवळ अभियांत्रिकी स्तरावरच नाही तर आर्थिक सामाजिक आणि राजकीय स्तरावरही प्रभाव टाकणारी आहे. अंतराळ संशोधनामुळे मानवी जीवनाच्या कक्षा रुंदावल्या आहेत. "म्हणून विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची शक्ती ओळखून त्यांना योग्य दिशा दाखवणे हे जास्त समंजसपणाचे होईल. त्याकरता मानवाच्या निकट भविष्यावर म्हणजे पुढच्या ५०-६० वर्षाच्या कालखंडावर- नजर टाकून मानवी हिताच्या दृष्टीने आणि मानव समाजावरील युद्ध, प्रदूषण, रिकामटेकडेपणा यासारखी संभाव्य संकटे टाळण्याच्या दृष्टीने विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा याचा विचार होणे आवश्यक आहे. म्हणून भविष्याकडे टाकलेली नजर एखाद्या विज्ञान कथा- लेखकाची कविकल्पना समजून वाचकाने दुर्लक्षू नये ! विसाव्या शतकातील काही शोध अशा प्रकारचे आहेत की ज्यांचे परिणाम मानवी जीवनावर दूरपर्यंत पोचणारे आहेत."२(पृ.क्र.३६) अंतराळ वसाहती आणि ग्रहांवरील जीवन याकडे सुद्धा आता मानवाने लक्ष केंद्रित केले आहे.

अंतराळ क्षेत्रातील नाविन्यपूर्ण शोधाचा विचार केल्यास पुढील गोष्टी लक्षात येतात. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग चा वापर अ़तराळ मोहिमांकरिता होताना दिसतो. नवीन प्रकारच्या प्रपल्शन तंत्रज्ञानामुळे लांब पलल्याच्या अंतराळ प्रवासाला चालना मिळतांना दिसते. स्पेस एक्स, नासा, इस्त्रो, एएसए सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी नाविन्यपूर्ण संशोधन केल्यामुळे अंतराळ क्षेत्रात फार मोठे क्रांती झाली असे म्हणतात. हा विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा मानवी जीवनावर झालेला चांगला बदल होय चंद्र आणि मंगळ ग्रहांवर वसाहत संशोधनाचे कार्य वेगाने सुरू असलेले कार्य मानवाच्या बौद्धिक विकासाचे प्रतीक होय. अंतराळ संशोधन आणि जीवशास्त्र, भौतिकशास्त्र आणि खगोलशास्त्र यांचे मानवी जीवन विकासात फार मोठे स्थान आहे. मोहिमा यशस्वी आणि सुरक्षित होण्यासाठी पुनर्वापरयोग्य रॉकेट्स आणि स्वयंचलित अवकाश यान अत्यंत महत्त्वाचे ठरलेले आहे. पृथ्वीवर दुसरे ग्रह शोधण्याची क्षमता विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे शक्य झाली.
विज्ञान आणि तंत्रज्ञान हे मानवी जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे कारण यामुळे मानवी जीवनात अमुलाग्र बदल झाले आहेत. या बदलां मध्ये अनेक सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम जाणवतात विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे मानवी जीवन जसे अधिक सोयीचे, सुखकर झाले तसे त्यात काही समस्या सुद्धा निर्माण झाल्या. विज्ञानाने मानवी जीवन सुखी समृद्ध केले मानवाच्या जीवनातील आनंद वाढविला तंत्रज्ञानाने संवाद साधने, काम करणे आणि जगणे सोपे झाले मात्र त्याच प्रगत तंत्रज्ञानाचा अतिवापर किंवा गैरवापर हा मानवी आरोग्य आणि पर्यावरणासाठी घातक ठरू शकतो.

***विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा मानवी जीवनावर परिणाम**

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सकारात्मक परिणामांचा विचार करता विज्ञान आणि मानवी जीवन सुखर झाले खरे. नवीन औषधोपचार वैद्यकीय सुविधांमुळे आरोग्य सुधारले आहे. मोबाईल इंटरनेट सोशल मीडियामुळे दूर असलेले लोक सहज एकत्र येऊ

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

शकतात, परस्परांशी संवाद साधू शकतात . एकंदरीत तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले. तंत्रज्ञानामुळे अनेक शैक्षणिक बदल झालेत, उद्योग क्षेत्र प्रगत झाले आहे. अनेक नवीन उत्पादने तयार करता येत आहेत . पर्यावरणाच्या संरक्षणासाठी विज्ञानाचा उपयोग केल्या जातो अशा प्रकारे विज्ञान आणि अनेक नवीन लागलेल्या शोधांमुळे मानवी जीवनात बदल आणि सुधारणा झाली आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचे मानवी जीवनातील सकारात्मक परिणामा बरोबरच नकारात्मक परिणामही आहे ते असे तंत्रज्ञानाच्या अतिवापरामुळे मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यता जाणवते किंबहुना ते बिघडते. सोशल मीडियामुळे सामाजिक संबंध कमी होत चाललेले दिसतात तंत्रज्ञानाचा वापर प्रदूषण वाढविणारा ठरतो. काही उत्पादने तयार करताना नैसर्गिक संसाधनाचा वापर होतो ज्याचा परिणाम पर्यावरणावर होतो उदाहरणात शेतमालावरील सल्फेटचा वापर. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे अनेक नोकऱ्या कमी होताना दिसतात. माणसाची कामे यंत्र करू लागले. " सध्याचा काळ हा 'विज्ञान युग' म्हणून समजला जातो दिवसेंदिवस विज्ञानाची झपाट्याने आगेकूच चालू आहे. रोज एखादे तरी नवे वैज्ञानिक संशोधन उजेडात येते ज्यामुळे रुढ असलेल्या पूर्व कल्पनांना तडाखा बसतो, किंवा ज्यामुळे मानवी जीवनचर्येत मोठा बदल घडून येण्याची शक्यता निर्माण होते. वैज्ञानिक आणि एकंदरीत मानवसमाज ह्या विज्ञानाच्या घोडदौडीची सवय करून घेण्याच्या प्रयत्नात आहेत. पण हे प्रयत्न अजून यशस्वी झाले नाहीत याची साक्ष विज्ञानाबद्दल सध्या असलेले वाद देत आहेत.... विज्ञानाचे समर्थक म्हणतात विज्ञान मग ते कुठल्याही स्वरूपात असो मानवी ज्ञानात भर असल्याने ग्राह्यच- वैज्ञानिक दृष्टिकोन हा केवळ वैज्ञानिकांनाच नव्हे तर सर्वसामान्य माणसाला उपयोगी ठरलेला आहे - म्हणून समाजाने सुज्ञ स्वार्थ दाखवून विज्ञानाच्या प्रसार आला त्या उलट विज्ञानाच्या अकुंठित प्रसाराचे विरोधक आता त्याच्या वापराबद्दल शंका घेऊ लागले आहेत. त्यांच्या मते विज्ञान आता समाजाला पेलेनासे झाले असल्याने त्यावर मर्यादा घालणे आवश्यक आहे.... हा वाद विज्ञानाच्या फायदा- तोट्यासंबंधी असला तरी त्यात वैज्ञानिक आणि वैज्ञानिकेतर असे दोन तट नाहीत, विज्ञानाच्या तोट्यांबद्दल समाजाला सावध करणारे प्रख्यात वैज्ञानिक हया वादात भाग घेत आहेत, तसेच विज्ञानाचा कैवार घेणारे पण विज्ञानाच्या बाहेरील क्षेत्रातील मान्यवर विद्वानही आढळतात... विज्ञान हे सृष्टी संबंधीच्या मानवी जीज्ञासेतून जन्माला आले. जिज्ञासा सर्वसाधारणपणे कुठल्याही मानवात असली तरी तिला संशोधनाचे रूप देण्याची प्रज्ञा आणि ते संशोधन करायला आवश्यक असणारे पाठबळ हे काही मोजक्या व्यक्तींनाच मिळतात ...... शेवटी वैज्ञानिक कितीही उंच आणि मुलुखावेगळया हस्तीदंती मनोऱ्यात काम करीत असला तरी त्याच्या संशोधनाची झळ केव्हा ना केव्हातरी समाजापर्यंत पोहोचतेच शिवाय आजकालच्या दिवसात वैज्ञानिक संशोधनाला लागणारा पैसा समाजाकडून विशेष करून कर भरणाऱ्या नागरिकांच्या खिशातून पुरवला जातो, तेव्हा समाज हया वादातील त्रिकोणाचा शिरोबिंदू समजावा."३ (पृ.क्र. ११९,१२०) असे आपले विज्ञान विषयक शोधासंबंधीचे मत जयंत नारळीकर यांनी विज्ञानाची 'गरुड झेप' या पुस्तकात नोंदवले आहे

आज या ज्ञानविज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात विज्ञान तंत्रज्ञानाचा वापर मानवी जीवनात महत्त्वपूर्ण झालेला आहे. परंतु त्याचा योग्य वापर केल्यास मानव चांगले जीवन जगू शकतो परंतु गैरवापर टाळणे आवश्यक झाले आहे मानवाला विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा समतोल सांभाळता आलं पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ**

१.जयंत नारळीकर,'विज्ञानाची गरुडझेप', श्रीविद्या प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती,१९९०.

२. सुधाकर भालेराव,'कृत्रिम उपग्रह आणि अवकाश विज्ञान ', साकेत प्रकाशन औरंगाबाद, दुसरी आवृत्ती,१९९३.

३. लेख आणि संशोधन पेपर.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# स्त्री सक्षमीकरण आणि शाश्वत विकासाकडे महाराष्ट्राची वाटचाल

**कु. शिल्पा मधुकर रामटेके**
(संशोधक)
संशोधन केंद्र - नागपूर विद्यापीठ, नागपूर
**Email** -shilparamteke9@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-1705037
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 5(II)|
Pp.168-176
May 2025

**Submitted:** 12 Apr. 2025
**Revised:** 25 Apr. 2025
**Accepted:** 22 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**गोषवारा-**

स्त्री सक्षमीकरण हे केवळ लैंगिक समानतेचे प्रतीक नाही, तर शाश्वत विकासाचे मूलभूत अंग आहे. महाराष्ट्र राज्याने सामाजिक सुधारणांची परंपरा जपलेली असून, स्त्रियांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय स्तरांवर सक्षम करण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी केली आहे. प्रस्तुत अभ्यासात महाराष्ट्रातील स्त्री सक्षमीकरणाचे वर्तमान चित्र, शासनाच्या धोरणांचा परिणाम, व ग्रामीण-शहरी भागातील परिस्थिती यांचा अभ्यास केला आहे. महाराष्ट्र राज्याने २०२४ मध्ये जाहीर केलेल्या **चौथ्या सर्वसमावेशक महिला धोरणा**च्या माध्यमातून स्त्री सक्षमीकरणाच्या दिशेने एक निर्णायक पाऊल उचलले आहे. या धोरणात आरोग्य, पोषण, शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, राजकीय सहभाग, आणि लैंगिक हिंसाचाराविरोधातील उपाययोजना यांचा समावेश आहे. विशेषतः ग्रामीण, आदिवासी आणि दुर्लक्षित भागातील महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, भरोसा कक्ष, आणि महिला लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण यांसारख्या उपक्रमांची अंमलबजावणी प्रस्तावित आहे.यामध्ये विशेषतः स्वयं-सहायता गट, अंगणवाडी, महिला बचतगट, शिक्षणातली वाढती उपस्थिती आणि महिलांच्या नेतृत्वाचे यांचा समावेश करण्यात आलेला आहे. शाश्वत विकासासाठी आवश्यक असलेली सामूहिक सहभागाची भूमिका, स्त्री दृष्टिकोनातून धोरणात्मक समावेशकता या घटकांवरही लक्ष केंद्रित केले आहे.

या अभ्यासातून हे स्पष्ट होते की, स्त्री सक्षमीकरण आणि शाश्वत विकास यांचा परस्परसंबंध केवळ सामाजिक न्याय मिळवण्यापुरता मर्यादित नसून, तो पर्यावरण, अर्थव्यवस्था, नवीन तंत्रज्ञान- डिजिटल शिक्षण आणि सांस्कृतिक सुधारणांपर्यंत पोहोचतो. महाराष्ट्राची वाटचाल सकारात्मक असली, तरी अद्याप सर्वसमावेशक व स्थायीत्वाकडे नेणाऱ्या मार्गांची आवश्यकता अधोरेखित होते.

**कीवर्ड** -स्त्री,सक्षमीकरण ,शाश्वत विकास, सामाजिक न्याय, डिजिटल समावेशन, महाराष्ट्राचे महिला धोरण,योजना.

**प्रस्तावना**

'जिच्या हाती पाळण्याची दोरी, तीच जगाते उद्धारी.' हे सर्वश्रुत आहे. पण आता त्याही पुढे जाऊन, महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करू लागल्या आहेत. आपला वेगळा ठसा उमटवत आहेत. विश्वनिर्मितीचे सूत्र तत्वताच 'स्त्री'आहे. असंख्य रूपांमध्ये त्यांचे दर्शन घडत असते.

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.15818720

OPEN ACCESS

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*कु. शिल्पा मधुकर रामटेके, (संशोधक) संशोधन केंद्र - नागपूर विद्यापीठ, नागपूर*

**How to cite this article:**
*रामटेके, . शिल्पा . मधुकर . (2025). स्त्री सक्षमीकरण आणि शाश्वत विकासाकडे महाराष्ट्राची वाटचाल. Journal of Research & Development, 17(5(II)), 168–176.*
*https://doi.org/10.5281/zenodo.15818720*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

कधी आई, कधी बहीण, कधी पत्नी, कधी सून, कधी मुलगी.. अशा विविध भूमिका निभवताना ती पुरेपूर प्रयत्नशील असते. कुठेही कमी पडत नाही, किंबहुना सरस ठरते. कुटुंबाच्या जबाबदाऱ्या स्वीकारत; आपल्या कार्यस्थळावरील कार्यातही ती आपले योगदान देते. तिच्यातील उत्तम व्यवस्थापक नेहमी जागृत असतो. ही मानवी जातीसाठी मोठी देणगीच आहे. समाजाला पुढे घेऊन जाणाऱ्या अनेक करारी कर्तृत्ववान महिला देशाला,राज्याला लाभल्या. हे आपले भाग्यच आहे. मोगली जुलमातून रयतेची सुटका करणाऱ्या शिवरायांना घडवणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ असो, की समाजाचा विरोध झुगारून अपमान सह करून हाती पाटी घेऊन स्त्रीला साक्षर करणाऱ्या सावित्रीबाई फुले असो,यांनी समाज, देशाला दिशा दिली आहे. अशा असंख्य कर्तृत्ववान महिलांचा वारसा पुण्यभूमी महाराष्ट्राला लाभला आहे. कुटुंबासह समाजाला पुढे घेऊन जाण्याचा वारसा अनेक महिला आजही चालवत आहेत.

**विषय विवेचन**

स्त्री केवळ माता, पत्नी किंवा बहिण नसून ती; समाजाच्या प्रगतीचा खरा आधार आहे. इतिहास साक्षी आहे, की स्त्रियांनी प्रत्येक क्षेत्रात आपले अमूल्य योगदान दिले आहे. पूर्वीच्या काळी महिलांना शिक्षण, स्वातंत्र्य आणि हक्क मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागला. पण आज परिस्थिती हळूहळू बदलत आहे. स्त्रिया शिक्षण, विज्ञान - तंत्रज्ञान, प्रशासन, क्रीडा आणि कला अशा प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. मात्र अजूनही काही अडथळे आहेत. लैंगिक असमानता, वेतन, प्रशिक्षण आणि संधीच्या मर्यादा आहेत. भारतीय राज्यघटनेने दिलेल्या समानतेच्या हक्काची अंमलबजावणी करण्यासाठी महिलांचे सक्षमीकरण व विकास यासाठीचे सर्वांगीण सर्वसामावेशक असे, राज्याचे चौथे महिला धोरण २०२४ ला जाहीर करण्यात आले आहे. २०२४ नंतर जन्माला आलेल्या व्यक्तीच्या शासकीय दस्ताऐवजावर नाव, आईचे नाव, वडीलचे नाव, आडनाव .असे लिहिले जाणार आहे. आईचे नाव नोंदणी बंधनकारक करण्यात आले आहे. गृहिणींना लघु उद्योगाचा मार्ग कळवा आणि अर्थव्यवस्था कमकुवत असलेल्या महिलांचे आर्थिक सक्षमतेकडे वाटचाल व्हावी. यासाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या लाभार्थ्यांना महिला आर्थिक विकास महामंडळाच्या साहाय्याने उद्योग सुरू करण्यास सहकार्य केले आहे. असे हजारो महिलांना स्वतःच्या अस्तित्व निर्माण करण्याचा मार्ग मिळाला आहे याचबरोबर महिलांचा प्रवास सुरक्षित व्हावा त्यासाठी महिला सन्मान योजना लाभ महिलाना देण्यात येत आहे.

**केवळ महिलांसाठी धोरण तयार** करणारे **महाराष्ट्र** हे **देशातील पहिले राज्य** आहे. राज्याला सर्वात जास्त महिला उपक्रम असलेले, राज्य बनवणे महिला उद्योजकांच्या वाढीसाठी राज्यात आश्वासक व्यावसायिक वातावरण निर्माण करणे तांत्रिक परिचयनात्मक व आर्थिक सहाय्य पुरवून राज्यातील महिलांना अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी सर्वकश महिला उद्योजक धोरणासह इतर योजनांमधूनही महिलांना आपल्या व्यवसाय वृद्धीसाठी शासनाचे सहकार्य घेता येते.

**स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्त्रियाचे स्थान-**

राज्यातील ३४ जिल्हा परिषदांमध्ये सदस्य संख्या १९५५ इतकी आहे, त्यापैकी ९७८महिला सदस्य जिल्हा परिषदांचे काम यशस्वीरित्या चालवत आहेत. त्याच पद्धतीने ३५१ पंचायत समित्यांमधील ३९१० सदस्यांपैकी १९५५ महिला सदस्य आहेत. तसेच २७हजार ८९६ ग्रामपंचायत यांच्या १ लाख ९७ हजार ३३८ सदस्यांपैकी सुमारे ९८ हजार ६६९ सदस्य या महिला आहेत. राज्यातील ग्रामपंचायत मध्ये महिला मोठ्या संख्येने म्हणजेच ५०% जागांवर सदस्य म्हणून निवडून आल्या आहेत. आरक्षणा नुसार अनेक ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी महिला विराजमान झाल्या आहेत. काही गावांनी तर स्वयंस्फूर्तीने सर्वच सदस्य पदांवर महिला निवडून आणल्या आहेत. गावाचा शंभर टक्के कारभार महिलांच्या हाती देण्यात आला आहे.

राज्यातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या अनेक ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेल्या महिला फार प्रभावीपणे काम करीत आहेत. नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायतच्या निवडणुकांमध्ये महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने ग्रामीण विकास विभागामार्फत प्रोत्साहन व ग्रामविकास विषयक विविध विषयांचे प्रशिक्षण देण्यात आले. बचत गटांचे उमेद अभियान हे राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. महिला व बालकल्याण समित्यांमार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णयही सरकारने घेतला आहे.ग्रामसभा मध्ये महिलांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे ७३ व्या घटना दुरुस्ती मुळे ग्रामसभेचे व्यापक अधिकार दिल्याने पंचायत राज व्यवस्थेला महत्त्व प्राप्त झाले आहे.

सर्वत्र बघितले तर, आज प्रत्येक क्षेत्रात महिला आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत. 'आहे त्या परिस्थितीत उपलब्ध साधनांच्या माध्यमातून त्या आपले क्षितिज वाढवत आहेत' कुटुंबाची आर्थिक घडी बसवत आहेत. कृषी उद्योग लघुउद्योग सेवा शिक्षण व्यवसाय आधी क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तृत्वाची छाप महिला पाडत आहेत.

- **स्त्रियांसाठी राबविण्यात आलेल्या विविध योजना: स्त्री सक्षमीकरण आणि स्त्रियांचा शाश्वत विकास -**

२०२४ राष्ट्रीय महिला धोरणानंतर महाराष्ट्र शासनाने विविध योजना आणि प्रकल्प महीलांच्या विकासाच्या दृष्टीने आखले आणि त्याची अंमलबजावणीलाही वेग आला आहे.

**तेजस्वी ऊर्जा** प्रकल्पाचा वापर करून बारा महिलांना दुर्गा सोलार एनर्जी डुंगरपुर राजस्थान येथे सोलर पॅनल निर्मितीचे प्रशिक्षण दिले. वर्धा जिल्ह्याच्या कवठा झोपडी येथील महिलांनी वेगळी वाट ठरत नवा अध्याय लिहिला आहे. अपारंपारिक ऊर्जेला बळ देतानाच सौर ऊर्जा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केला, गावातील महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा या महिला बचत गटाचा मार्ग राज्यातील इतर महिला गटांसाठी निश्चितच अनुकरणीय आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

महिलांना आर्थिक आणि प्रशिक्षणाची ताकद दिली, तर त्या आपल्या कुटुंबाचा केवळ आधार होत नाही, तर त्या समाजाच्या आर्थिक प्रगतीला कारक ठरतात. महिला आर्थिक विकास महामंडळ अर्थातच (महावीम) यांनी साथ दिल्याने महिलांनी केवळ रोजगार निर्माण केले नाहीत, तर राज्याच्या विकासात एक अर्थाने आपला कर्तृत्वाचा वाटा उचलला आहे.

महाराष्ट्र शासनाने राज्यात प्लास्टिक बंदी लागू केली आहे, हे लक्षात घेता सप्टेंबर २०१९ मध्ये महिला आर्थिक विकास महामंडळ (महावीम) जिल्हा कार्यालय ठाणे अंतर्गत अनगाव येथील क्रांतीज्योती लोकसंचालित साधन केंद्र व जिल्हा नियोजन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने त्याची अंमलबजावणीस सुरुवात करण्यात आली.

महिला सक्षमीकरण व विकासासाठी चे सर्वांगीण सर्वकश आणि सर्वसामावेशक असे महाराष्ट्राचे चौथे महिला धोरण २०२४ ला जाहीर करण्यात आले. या धोरणात समानतेच्या हक्काचे अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील महिला व मुलींना आवश्यक संधी आणि सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच त्यांचा सामाजिक आर्थिक आणि अन्य क्षेत्रातील विकास साधने, आरोग्य, पोषण-आहार, स्वास्थ्य ,शिक्षण व कौशल्य, महिलांप्रती होणारा सर्व प्रकारचा हिंसाचार समाप्त करणे ,रोजगार उद्योजकता व कौशल्य विकास इत्यादी. उपजीविकेची साधने वृद्धिंगत करणे, आवश्यक पायाभूत सुविधांमध्ये विकास करणे. प्रशासन व राजकीय सहभाग नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन हवामान बदल अनुकूलन व आपत्ती व्यवस्थापन तसेच अन्य महत्त्वाची क्षेत्रे यांचा समावेश यात करण्यात आला आहे. याच धोरणाच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाने महिलांसाठी विविध योजना महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून राबविलेले आहेत.

**'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना**' या योजनेच्या माध्यमातून दर महिन्याला पंधराशे रुपयांचा थेट लाभ हस्तांतरित करण्यात येतो. यातून वय वर्ष २१ ते ६५ या वयोगटातील पात्र महिलांना एक वर्षात १८ हजार रुपये मिळणार आहेत.

महिलांचा सन्मान वाढविण्यासाठी **'लेक लाडकी'** ही नवी योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेतून लाभार्थी मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिला १ लाख १ हजार रुपये असा लाभ देण्यात येत आहे.

**'मनोधैर्य योजना'** यात ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या, महिला व लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या बालकांचे, पुनर्वसन व त्यांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी मदत योजना राबविण्यात येत आहे.

**'पिंक रिक्षा'** या योजनेच्या माध्यमातून महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी शासनाने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. मुंबई शहर, नवी मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, कल्याण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि अमरावती अशा महानगरांमध्ये 'पिंक इ रिक्षा' योजना सुरू करून दहा हजार महिलांना रिक्षा खरेदीसाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे त्यासाठी ८० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**'मातृशक्तीचा सन्मान'** १ मे २०२४ नंतर जन्माला आलेल्या मुलांच्या नावाची नोंद शासकीय दस्तऐवजांमध्ये त्यांचे नाव आईचे नाव वडिलांचे नाव व आडनाव याप्रमाणे करण्याचे बंधनकारक आहे.

**'वन स्टॉप सेंटर'** महिलांवर होणाऱ्या शारीरिक व मानसिक अत्याचार आर्थिक फसवणूक समाजाकडून होणारा त्रास अवहेलना या संकटातील महिलांना वन स्टॉप सेंटरमध्ये वैद्यकीय उपचार समुपदेशन पोलीस सहाय्य मानसोपचार विविध सहाय्य अल्प कालावधीसाठी निवारा व अन्न इत्यादी स्वरूपाची संकटात असलेल्या महिलांना जलदगतीने सर्वसामावेशक मदत करण्यात येते. प्रत्येक जिल्ह्यात वन स्टॉप सेंटर उभारण्यात आले आहे.

**'नवीन शक्ती सदनाची निर्मिती'** या योजनेच्या माध्यमातून शहरी भागात नोकरीसाठी आलेल्या महिलांसाठी, केंद्राच्या मदतीने ५० वस्तीगृहांची निर्मिती करण्यात येणार आहे. राज्यातील निराधार निराश्रीत तसेच कौटुंबिक हिंसाचा बळी पडलेल्या बेघर आणि लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या महिलांच्या सुरक्षिततेसाठी व सक्षमीकरणासाठी स्वाधार आणि उज्वला या दोन योजनांचे एकत्रीकरण करून केंद्राच्या मदतीने शक्ती सदन ही नवीन योजना राज्य सरकार मार्फत राबविण्यात येत आहे.

**'ग्रामीण महिला उद्योग विकास योजना'** आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी त्यांच्या सहाय्यतेने, नवीन 'नव तेजस्विनी महिला उदयन' विकास प्रकल्पाची अंमलबजावणी महिला विकास आर्थिक महामंडळ करत आहे. या प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी कडून आणि राज्य शासनाचा हिस्सा असा एकुण ५२३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे. कृत्रिम संघ म्हणून ४३५ कोटी ५०लाख लोक सहभागाचे ३२ कोटी १७ लाख वित्तीय संस्थांच्या सहभागाचे १६३० कोटी ४६ लाख खासगी संस्थांच्या सहभागाचे ६४ कोटी ६५ लाख याप्रमाणे प्रकल्पाच्या एकूण किमतीत २६८५ कोटी ४६ लाख रुपये अशी सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

विविध औद्योगिक योजनांच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्याचा मानस महाराष्ट्र शासनाने डोळयासमोर ठेवलेला आहे. त्याच दृष्टीने शासन प्रयत्न करत आहे.

**'मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना'** कौशल्य विकास विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे ही योजना राबवली जाणार आहे. या योजनेकरिता ५५०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेसाठी १८ ते ३५ वर्षे वयोगटातील उमेदवारांना प्रशिक्षण दिले जात आहे.

**'स्टार्टअप'** या योजनेच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी व आत्मनिर्भर बनवणे. देशातील सर्वाधिक महिला स्टार्टअप' असलेले राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख निर्माण करणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे या योजनेसाठी १०० कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून सुमारे ५००० स्टार्ट अप्स ना २५ लाखापर्यंत आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

कौशल्य सन्मान योजना या माध्यमातून पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या कारागिरांची व्यवसाय वृद्धी व्हावी यासाठी अठरा प्रकारचे पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या विश्वकर्मांना पाच दिवसांचे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येते. संबंध व्यवसायाच्या तुलकिटसह १५००० रुपये रकमेचे ई वाउचर दिले जाते.

**'कौशल्य विकास केंद्र योजना'** नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व देण्यात आले आहे. या धोरणाच्या अंमलबजावणी अंतर्गत आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र ही नाविन्यपूर्ण योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत १००० नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात येणार आहेत, प्रतिवर्षी किमान १५० युवक -युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

**'शिकाऊ उमेदवार प्रसाद योजना'** या योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या शिका उमेदवारांना ध्येय विद्या वेतनाच्या ७५टक्के किंवा जास्तीत जास्त पाच हजार रुपये यापैकी कमी असलेली विद्यावेतन शासनातर्फे देण्यात येते सद्यस्थितीत एकूण दोन लाख ५४ हजार ८३९ शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण घेत आहेत.

**'व्हर्चुअल क्लासरूम'** व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या मार्फत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यात ७५ व्हर्चुअल क्लासरूम सुरू करण्यात आले आहेत. व्हर्चुअल क्लासरूम मध्ये इंटरनेट, संगणक सेवा, उत्तम बैठक व्यवस्था असणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील 'स्किल इंडिया व डिजिटल इंडिया' या उपक्रमांतर्गत राज्यातील ४२९ या सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था व ५४७ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना सहकार्य करून हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर या महापुरुषांचे कौशल्य विषयक विचार या पुस्तकात समावेश करण्यात आले आहेत.

**'रोजगार मेळावे'** कौशल्य विकास विभागामार्फत उद्योजक आणि रोजगार इच्छुक उमेदवारांमध्ये दुवा साधानारे रोजगार मेळावे आयोजित केले जात आहेत. सन २०२३-२४ मध्ये मार्च २०२४ अखेरपर्यंत एकूण ५८१ रोजगार मेळावे पार पडले. राज्यातील विद्यार्थ्यांना योग्य उत्तीर्ण कौशल्य शिक्षणाचे व रोजगाराचे मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हास्तरावर ६ मे ते ६ जून २०२३ या कालावधीत छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एक लाख ७४ हजार ६३८युवक- युवतींनी सहभाग घेतला.

**'महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ'** महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात १८ अभ्यासक्रम शिकविले जातात. विद्यापीठाने विविध उद्योग समूहां बरोबर ५५ करार केले आहेत. सगळा अभ्यासक्रमात उद्योग समूह विद्यार्थ्यांना ऑन द जॉब ट्रेनिंग देणार आहेत. विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय प्लेसमेंट साठी एन एस डी सी इंटरनॅशनल बरोबर करार केला आहे. तसेच विद्यापीठाने यावर्षी युरोपच्या नामवंत डिझाईन संस्था रुबिकबरोबर करार करून जागतिक दर्जाचा बीडीइएस इंडस्ट्रियल डिझाईन अशा कौशल्य आधारित अभ्यासक्रमाची निर्मिती केली आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

महाराष्ट्रातील माता-भगिनी हे राज्याच्या वैभवशाली संस्कृती आणि परंपराचे दर्शन घडवतात असे प्रधानमंत्री श्री मोदी यांनी अधोरेखित करून महाराष्ट्राच्या परंपरा केवळ भारतात नव्हे तर जगभरात ओळखल्या जातात. असे मत, नुकत्याच झालेल्या पोलंड दौऱ्यात त्यांनी महाराष्ट्राची संस्कृती पाहिल्याचा उल्लेख करत पोलंडच्या नागरिकांना महाराष्ट्रातील लोकांचा खूप आदर असल्याचे संगितले.

'प्रधानमंत्री जनधन' योजनेतही बहुतांश बँक खाते महिलांच्या नावाने उघडण्यात आली. 'प्रधानमंत्री मुद्रा' योजनेची सुमारे ७० टक्के लाभार्थी देशाच्या माता भगिनी आहेत. प्रधानमंत्री यांनी तीन कोटी महिलांना लखपती दीदी करण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यावेळीच्या महाराष्ट्र दौऱ्याचे स्मरण करून श्री मोदींनी सांगितले की, गेल्या दहा वर्षात एक कोटी लखपती दीदी निर्माण करण्यात आल्या तर, अकरा लाख महिला नवीन लखपती दिदी मागच्या दोन महिन्यात झाल्या आहेत. ते त्यात एकट्या महाराष्ट्राच्या १ लाख प्रतिनिधी आहेत. हे सांगून त्यांनी राज्य सरकारच्या प्रयत्नाचे कौतुक केले आणि अनेक नवीन योजना आणि कार्यक्रम सुरू करा. महाराष्ट्रातील महिलांचे सक्षमीकरण आणि बळकटीकरण करण्यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना संपूर्ण टीम एकत्र आणून काम करत असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अधोरेखित केले. देशाच्या तीन कोटी महिलांना लखपती दीदी बनण्याच्या प्रक्रियेत महाराष्ट्राचा वाटा मोठा असेल, असे सांगून देशातील तीन कोटी दिदीमध्ये राज्यातील ५० लाख दिदींचा समावेश राहील, देशाला महाशक्ती बनवण्यासाठी महिलांची भागीदारी आवश्यक आहे. त्यासाठी केंद्र शासनाचे सहकार्य मिळत आहे. केंद्र शासनाने ७६ हजार कोटींच्या वाढवण बंदर विकासाला सहाय्य केले. मेट्रो प्रकल्पाला मदत केली. राज्यातील कांदा, कापूस, दूध, सोयाबीन यांना चांगला दर मिळण्याच्या दृष्टीने सरकार कटिबद्ध आहे. त्या दिशेने वाटचाल सुरू आहे.

महिला विकासाच्या प्रवाहात आल्यास देशात प्रभावी आणि विकासात्मक बदल घडू शकतो. त्यामुळेच विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान असणाऱ्या नारीशक्तीच्या आर्थिक बळकटीकरणासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहाय्य करत असल्याचे दिसून येते आहे. महाराष्ट्र कुठेच कमी पडणार नाही. संत मुक्ताई आणि कवित्री बहिणाबाई यांच्या पद स्पर्शाने पावन झालेली ही भूमी आहे. अशा ठिकाणी हे लखपती दीदींचे संमेलन झाले. राज्यात बचत गटामार्फत ७५ लाख कुटुंबे जोडली गेली. दोन कोटी कुटुंबे जोडण्याचा संकल्प सरकारने केला आहे. हरित हायड्रोजन निर्मिती आणि विकासासाठी महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण २०२३ ठरवण्यात आले. मागेल त्याला सौर कृषी पंप त्यासाठी ९० टक्के अनुदान शेतकऱ्यांना दिले जाते. घरगुती वीज मोफत. अशा विविध योजना, असे सर्वसामान्यांच्या हिताची व शाश्वत विकासाची विविध कामे महाराष्ट्र शासनाने यशस्वीरित्य पूर्ण केली आहेत.

सन २०२५ -२६या वर्षासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास २५ हजार ५८१ कोटी ,रुपये आदिवासी विकास विभागात २१ हजार ४९५ कोटी रुपये, तर इतर मागास व बहुजन कल्याण विकास विभागात ४ हजार ३६८ कोटी रुपये, दिव्यांग कल्याण विभागात १०० कोटी रुपये आणि अल्पसंख्याक विकास विभागास

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

८१२ कोटी रुपये, तरतूद आहेत.असंघटित कामगार कल्याण आबासे महामंडळाकडून १ कोटी ७५ लाख असंघटित कामगार व शेतमजुरांसाठी सामाजिक सुरक्षा योजना राबविण्याचे नियोजन आहे.

**विशेष सहाय्य योजना**, **'संजय गांधी निराधार'** अनुदान योजना **'श्रावणबाळ' 'सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना'** लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येते. लेक लाडकी योजना यांतर्गत १ लाख १३ हजार लाभार्थींना थेट लाभ देण्यात आला आहे. २०२५-२६ मध्ये या योजनेकरिता ५० कोटी ५५ लाख रुपये निधी देण्याची तरतूद आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना या अंतर्गत सुमारे २ कोटी ५३ लाख लाभार्थी महिलांना जुलै २०२४ पासून आर्थिक लाभ देण्यात येत आहे. त्यासाठी ३३ हजार २३२ कोटी रुपये खर्च झाला आहे. सन २०२५-२६ मध्ये या योजनेकरिता एकूण ३६ हजार कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहेत. लखपती दीदी दीनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानांतर्गत सुमारे २२ लाख महिलांना लखपती दिदी होण्याचा मान मिळाला असून २०२५-२६ मध्ये आणखी २४ लाख महिलांना लखपती करण्याची उद्दिष्ट आहे. उमेदवार नवी मुंबईत उलवे मध्ये १९४ कोटी १४ लाख रुपये किमतीच्या युनिट मॉल चे काम प्रगतीपथावर आहे. पहिल्या टप्प्यात दहा जिल्ह्यांसाठी १५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. क्रीडा स्पर्धानाही वाढीव अनुदानास मंजूरी देण्यात आली आहे.

समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महिला सबलीकरण अत्यावश्यक आहे. कारण समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासाशिवाय देशाचा संपूर्ण विकास शक्य नाही. महिलांना आर्थिक सामाजिक शैक्षणिक आणि राजकीय दृष्ट्या सक्षम केल्याशिवाय समृद्ध आणि संतुलित समाजाची निर्मिती होऊ शकत नाही. समाजाला प्रगती करायची असेल तर महिलांचे सबलीकरण अनिवार्य आहे. "शिक्षण,आर्थिक स्वावलंबन,सुरक्षा आणि सन्मान" या चार गोष्टी प्रत्येक महिलेला मिळाल्या पाहिजेत. महिलांना समान संधी देणे म्हणजे केवळ त्यांच्या हिताचे नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे. त्यासाठी राज्य शासनाचा महिला व बालविकास विभाग पुढाकार घेत आहे.

**निष्कर्ष:-**

१) शिक्षण आरोग्य आणि आर्थिक स्वायत्तता यावर आधारित धोरणांचे मूल्यांकन करण्यात आले आहे.

२) डिजिटल शिक्षण आणि तांत्रिक सक्षमीकरण अत्यंत प्रभावी घटक आहे.

३) महिला उद्योजकता वाढविण्यासाठी धोरणात्मक पावले प्रभावी ठरले आहेत.

४) आरोग्य सेवा सुधारणात सरकारी योजनांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे.

५) शिक्षणासाठीच्या योजनांमुळे ग्रामीण भागातील महिलांनाही संधी उपलब्ध झाल्या आहेत.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**टिपा:-**

- शासकीय योजना अधिक प्रभावीपणे अमलात आणण्यासाठी स्थानिक पातळीवर अधिक सहकार्य आवश्यक आहे.
- संशोधनाचा उपयोग भविष्यातील धोरणात्मक सुधारणा आणि नवीन योजनांच्या रचनेसाठी होऊ शकतो.

**संदर्भसूची -**

१)ब्रिजेश सिंह, "माहिती व जनसंपर्क महासंचालनालय" *लोकराज्य,* जुलै ,ऑगस्ट- २०२४

२)जयश्री भोज, "माहिती व जनसंपर्क महासंचालनालय" *लोकराज्य,* डिसेंबर- २०२२

३)डॉ.दिलीप पांढरपट्टे "माहिती व जनसंपर्क महासंचालनालय" *लोकराज्य,* मार्च- २०२१

४)ब्रिजेस सिंह "माहिती व जनसंपर्क महासंचालनालय"लोकराज्य, मार्च- २०२५

५)https://mahayojanaa.in ७ जानेवारी २०२५

६) https://womenchild.maharashtra.gov.in/mr/policies/maharashtra-womens-policy १६जुलै २०२१.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# तंत्रज्ञान आधारित आरोग्यसेवा प्रणालीचा अभ्यास

**डॉ. जिजाबाई राऊत**
गृहशास्त्र विभागप्रमुख,
कला वरिष्ट महाविद्यालय,
सावंगी, छत्रपती संभाजीनगर.
**Email**-jijaraut@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-1705038
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 5(II)|
Pp. 177-180
May 2025

**Submitted:** 12 Apr. 2025
**Revised:** 25 Apr. 2025
**Accepted:** 22 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश –**

तंत्रज्ञान आधारित आरोग्यसेवा प्रणाली रुग्णांसाठी उपयुक्त आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे व संशोधनामुळे व्यक्तीला वेगवेगळ्या आजारांवर सहज उपचार करता येतात. तंत्रज्ञान आधारित आरोग्यसेवा प्रणालीमुळे रोबोटद्वारे, मशीनद्वारे वेगवेगळ्या सर्जरी करणे, इतर देशातील डॉक्टरांचा सल्ला घेणे शक्य झाले आहे. आज आरोग्य सेवेतील आधुनिक तंत्रज्ञानामुळे रुग्णांना फायदा होत आहे; अनेक आजारांवर मात करता येते. ग्रामीण भागातील उत्तरदात्यांच्या मते तंत्रज्ञान आधारित आरोग्यसेवा खर्चिक आहे. सर्वसामान्य लोकांना परवडत नाही. पण शहरातील रुग्णांना ती कमी खर्चिक वाटते. तसेच कधी कधी दवाखान्यात रुग्ण चुकीच्या प्रॅक्टिस मुळे किंवा उपचारामुळे दगावताना दिसतात. "आरोग्य हीच खरी संपत्ती" आज तंत्रज्ञान सारख्या भौतिक साधनसंपत्ती मध्ये वाढ झालेली दिसून येते. पण आरोग्य या साधनसंपत्तीची जपवणूक करणे काळाची गरज आहे. “उपचारापेक्षा प्रतिबंध चांगला” (Prevention is better than cure) याप्रमाणे आजार होऊ नयेत यासाठी सर्व स्तरावरून प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**मुख्य शब्द-** तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, उपचार, उपयुक्त व प्रतिबंध.

**प्रस्तावना –**

जागतिकीकरणामुळे प्रत्येक क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो; व त्यामुळे वेळेची आणि श्रमाची बचत होताना दिसते. आरोग्य सेवा मध्ये तंत्रज्ञान प्रणालीचा उपयोग केल्यामुळे आरोग्य सेवांचा वापर करताना सुलभता निर्माण झाली आहे. असमतोल आहार, मशीनचा वापर, बैठे काम, परिश्रमाचा अभाव,कामाचा ताण, रासायनिक पदार्थांचा अति वापर या आणि अशा अनेक कारणांमुळे आरोग्य समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे आरोग्य सेवांचा वापर वाढलेला आहे; आणि तंत्रज्ञानआधारित आरोग्यसेवा प्रणालीचा वापर केल्यामुळे रुग्णांना जलद आरोग्य सेवा प्राप्त होते. तंत्रज्ञान युगात आरोग्य सेवा क्षेत्रात माहिती तंत्रज्ञांना चा खुप मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. ई-हेल्थ, वैद्यकीय नोंदी, दूरस्थ आरोग्यसेवा आणि डेटा विश्लेषण यासारख्या तंत्रज्ञानाचा उपयोग आरोग्यसेवा सुधारण्यासाठी केला जातो.

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

DOI:10.5281/zenodo.15818777
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*डॉ. जिजाबाई राऊत, गृहशास्त्र विभागप्रमुख, कला वरिष्ट महाविद्यालय, सावंगी, छत्रपती संभाजीनगर.*

**How to cite this article:**
*राऊत, . जिजाबाई . (2025). तंत्रज्ञान आधारित आरोग्यसेवा प्रणालीचा अभ्यास. Journal of Research & Development, 17(5(II)), 177–180. https://doi.org/10.5281/zenodo.15818777*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**तंत्रज्ञान आधारित आरोग्य सेवा प्रणाली -** तंत्रज्ञान आधारित आरोग्य सेवा प्रणाली म्हणजे आरोग्य सेवा क्षेत्रात माहिती आणि संवाद तंत्रज्ञानाचा वापर करून आरोग्य सेवा सुधारणे आणि त्या लोकांपर्यंत सुलभ रीतीने पोहोचवणे. आरोग्य सेवांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे, ज्यामुळे आरोग्य सेवा अधिक सुलभ, प्रभावी आणि परवडणाऱ्या बनतात. यात वैद्यकीय उपकरणांचा वापर, कृत्रिम बुद्धिमत्ता, टेलीमेडिसिन, डेटा विश्लेषण, विविध ऑनलाईन आरोग्य सेवा, डिजिटल आरोग्य उपकरणे, माहिती व्यवस्थापन प्रणालीचा उपयोग करणे आणि रुग्णांना बरे करून आरोग्य सुधारणे किंवा देखभाल करणे यांचा समावेश होतो.

**तंत्रज्ञान आधारित आरोग्य सेवा प्रणालीचे फायदे:**

**डिजिटल वैद्यकीय नोंदी:**

वैद्यकीय नोंदी डिजिटल केल्याने आवश्यक असल्यास त्वरित माहिती उपलब्ध होते. उदा. रुग्णांची माहिती डिजिटल स्वरूपात साठवणे, जी डॉक्टरांना आणि आरोग्य सेवा पुरवठा यांना सहज उपलब्ध होते.

**दूरस्थ आरोग्य सेवा:**

दूरस्थ आरोग्य सेवा किंवा टेलिमेडिसिनमुळे डॉक्टरांना दूर असलेले रुग्ण देखील तपासता येतात. उदा. डॉक्टरांना दूर असलेले रुग्ण तपासण्यासाठी व्हिडिओ कॉल आणि इतर तंत्रज्ञानाचा वापर करणे. टेलिमेडिसिन आणि ऑनलाइन सल्लामुळे लोकांना त्यांच्या घरी बसून डॉक्टरांचा सल्ला मिळू शकतो, ज्यामुळे आरोग्य सेवा अधिक सोयीस्कर आणि जलद होतात.

**वैयक्तिक उपचार:**

डेटा विश्लेषण आणि कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून, रुग्णांना वैयक्तिक उपचार योजना बनवता येतात.

**अधिक प्रभावी उपचार:**

तंत्रज्ञानाचा वापर करून, वैद्यकीय प्रक्रिया अधिक प्रभावी आणि सुरक्षित होऊ शकतात. उदा. हृदय गति आणि इतर आरोग्य माहिती गोळा करणे आणि डॉक्टरांना पाठवणे.

**रोग व्यवस्थापन:**

तंत्रज्ञान-आधारित प्रणाली लोकांना त्यांच्या आरोग्याची माहिती आणि आरोग्यविषयक डेटा संकलित करण्यास आणि व्यवस्थापित करण्यास मदत करते, ज्यामुळे त्यांना त्यांच्या आरोग्याची अधिक चांगली माहिती मिळते.

**शिक्षण आणि जागरूकता:**

तंत्रज्ञान लोकांना आरोग्यविषयक माहिती आणि शिक्षण देण्यासाठी एक प्रभावी साधन आहे, ज्यामुळे लोकांना त्यांच्या आरोग्याबद्दल आणि आजारांबद्दल अधिक माहिती मिळते.

**खर्च कमी:**

तंत्रज्ञान आधारित प्रणालीमुळे, आरोग्य सेवा अधिक स्वस्त होऊ शकते.

**सुविधा आणि कार्यक्षमता:**

तंत्रज्ञान वापरून, आरोग्य सेवा अधिक सोयीस्कर आणि कार्यक्षम बनवता येते.

**कृत्रिम बुद्धिमत्ता :**

डेटा विश्लेषण करून, रुग्णांना अधिक अचूक निदान आणि उपचार मिळवणे.

**आरोग्य सेवा :** आरोग्य सेवा म्हणजे व्यक्ती आणि समुदायांच्या आरोग्य आणि कल्याणासाठी आवश्यक असलेल्या सेवा आणि सुविधा होय. लोकांमधील रोग, आजार, दुखापत आणि इतर शारीरिक आणि मानसिक दुर्बलता प्रतिबंध, निदान, उपचार, सुधारणा किंवा बरे करून आरोग्य सुधारणे किंवा देखभाल करणे होय. या सेवांमध्ये प्राथमिक आरोग्य सेवा, सार्वजनिक आरोग्य सेवा आणि विशेष आरोग्य सेवांचा समावेश होतो. आज या आरोग्य सेवा विविध स्तरावर सहज उपलब्ध होतात. या सेवांमध्ये सर्वसामान्य रोग, आजारांवर उपचार, एखाद्या आजाराचे निदान व प्रतिबंधात्मक उपचार तसेच आरोग्य सुधारणे इत्यादींचा समावेश होतो.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

तंत्रज्ञान प्रणालीने आरोग्य सेवा क्षेत्रात मोठे बदल घडवले आहेत. अनेक ॲप्स (Apps) आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्समुळे आरोग्य सेवा अधिक सोयीस्कर, जलद आणि प्रभावी झाली आहे. यामध्ये, 'आरोग्य सेतू' ॲप, 'टीबी आरोग्य साथी' ॲप आणि 'डॉ. डॉक्टर' (Dr.Doctor) यांचा समावेश आहे.

**तंत्रज्ञान आधारित आरोग्य सेवा ॲप्सचे काही फायदे:**

**संपर्क ट्रेसिंग:**

आरोग्य सेतू सारखे ॲप्स कोविड-१९ सारख्या साथीच्या रोगांमध्ये संपर्क ट्रेसिंगसाठी उपयुक्त ठरले, ज्यामुळे लोकांना धोक्याची जाणीव झाली.

**वैयक्तिकृत आरोग्य व्यवस्थापन:**

काही ॲप्स वापरकर्त्यांना त्यांच्या आरोग्यविषयक आकडेवारीचा मागोवा घेण्यास, आहारात बदल करण्यास आणि व्यायामाचे नियोजन करण्यास मदत करतात, ज्यामुळे त्यांचे आरोग्य सुधारते.

**आरोग्य सेतू:**

हे ॲप भारत सरकारने विकसित केले आहे आणि कोविड-१९ साथीच्या काळात लोकांसाठी संपर्क ट्रेसिंग, सिंड्रोमिक मॅपिंग आणि स्व-मूल्यांकनासाठी एक महत्त्वाचे साधन ठरले.

**टीबी आरोग्य साथी:**

हे ॲप क्षयरुग्णांना आवश्यक माहिती, मार्गदर्शन आणि मदतीसाठी उपयुक्त आहे, तसेच नागरिकांमध्ये क्षयरोगाबद्दल जागरूकता वाढवते.

**डॉ. डॉक्टर:**

हे ॲप रुग्णांना त्यांच्या डॉक्टरांशी सहजपणे संपर्क साधण्यात, भेटीचे नियोजन करण्यात आणि आरोग्यविषयक माहिती मिळविण्यात मदत करते.

**कॅलरी काउंटर :**

हे ॲप लोकांना त्यांचे कॅलरी सेवन आणि आरोग्यविषयक आकडेवारीचा मागोवा घेण्यास मदत करते, ज्यामुळे त्यांना त्यांच्या आहारावर नियंत्रण ठेवता येते.

**फिटनेस ॲप:**

हे ॲप वापरकर्त्यांना त्यांच्या आरोग्याच्या उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करण्यास, जसे की वजन कमी करणे किंवा तंदुरुस्त राहणे, मदत करतात.

**संशोधनाची उद्दिष्टे –**

1. तंत्रज्ञानआधारित आरोग्यसेवा प्रणालीचा अभ्यास करणे.
2. तंत्रज्ञानआधारित आरोग्यसेवा प्रणालीच्या उपयुक्ततेची पाहणी करणे.

**गृहितक -** तंत्रज्ञानआधारित आरोग्यसेवा प्रणाली रुग्णांना उपयुक्त आहे.

**संशोधनपद्धती –**

तंत्रज्ञानआधारित आरोग्यसेवा प्रणालीचा अभ्यास करण्यासाठी सहेतुक नमुना निवड पद्धतीने ग्रामीण आणि शहरी भागातील रुग्णांची नमुना म्हणून निवड करण्यात आली.

**तथ्यसंकलन –**

प्रस्तुत अध्ययनात मिळालेली माहिती ही प्रामुख्याने उत्तरदात्यांनी दिलेल्या मौखिक स्वरूपाच्या उत्तरांशी निगडित आहे. याकरिता मुलाखत व प्रश्नावली तंत्राचा वापर करण्यात आला.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

**परिणाम व चर्चा –**

तंत्रज्ञानआधारित आरोग्यसेवा प्रणाली संदर्भात ग्रामीण आणि शहरी भागातील रुग्णांच्या माध्यमातून आणि दुय्यम तथ्याद्वारे प्राप्त झालेल्या माहितीनुसार तंत्रज्ञान आधारित आरोग्यसेवा प्रणाली उपयुक्त आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे व संशोधनामुळे व्यक्तीला वेगवेगळ्या आजारांवर सहज उपचार करता येतात. डेटा उपलब्ध असल्यामुळे सर्वांनाच वैद्यकीय जागतिक माहिती सहज प्राप्त होते. ग्रामीण भागातील उत्तरदात्यांच्या मते तंत्रज्ञान आधारित आरोग्यसेवा खर्चिक आहे. सर्वसामान्य लोकांना परवडत नाही. पण शहरातील रुग्णांना ती कमी खर्चिक वाटते.

कमी वेळेत मशीनद्वारे रिपोर्ट मिळतात. तसेच दुर्मिळ रोगांवर आधुनिक पद्धतीने उपचार केले जातात. पण कधी कधी काही डॉक्टर विनाकारण पेशंटला वेगवेगळ्या टेस्ट करायला सांगतात; आणि या माध्यमातून जास्तीचे बिल आकारले जाते.

**निष्कर्ष –**

सुरवातीला सेवाभाव म्हणून आरोग्य सेवा दिली जात होती. पण आज वैद्यकीय क्षेत्रात व्यावसायिकीकरण, भांडवलशाहीमुळे स्पर्धा निर्माण झालेली दिसून येते. कधी कधी रुग्णांकडून जास्तीचे बिल आकारले जाते कारण सध्या कार्पोरेट हॉस्पिटलची संख्या वाढताना दिसते.

तंत्रज्ञान आधारित आरोग्यसेवा प्रणालीमुळे इतर देशातील डॉक्टरांचा सल्ला घेऊन रोबोटिक सर्जरी करता येते. म्हणजेच इतर देशातील सुपर स्पेशालिस्ट डॉक्टरांचा फायदा घेता येतो. तंत्रज्ञान आधारित आरोग्यसेवा प्रणालीमुळे रोबोटद्वारे, मशीनद्वारे वेगवेगळ्या सर्जरी करणे सहज शक्य झाले आहे. पण कधी कधी रोबोटला जर चुकीची कमांड दिली तर त्याचे अनपेक्षित परिणाम पण होतात; त्यामुळे सतर्क, अद्ययावत रहावे लागते. मशीनवर किंवा आधुनिक तंत्रज्ञानावर अवलंबून राहिल्यामुळे मानवी कौशल्याचा ऱ्हास होताना दिसतो. आज आरोग्य सेवेतील आधुनिक तंत्रज्ञानामुळे रुग्णांना फायदा होत आहे; अनेक आजारांवर मात करणे सहज शक्य झाले आहे. पण कधी कधी दवाखान्यात रुग्ण चुकीच्या प्रॅक्टिस मुळे किंवा उपचारामुळे दगावताना दिसतात. "आरोग्य हीच खरी संपत्ती" आज तंत्रज्ञान सारख्या भौतिक साधनसंपत्ती मध्ये वाढ झालेली दिसून येते. पण आरोग्य या साधनसंपत्तीची जपवणूक करणे काळाची गरज आहे. उपचारापेक्षा प्रतिबंध चांगला (Prevention is better than cure) याप्रमाणे आजार होऊ नयेत यासाठी सर्व स्तरावरून प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची –**

1. www-ruralhealthinfo-org.
2. International Journal of Pharmaceutical and Healthcare Marketing,
   Issue(s) available: 74 – From Volume: 1 Issue: 1, to Volume: 19 Issue: 2
3. Mourine Achieng and & Ephias Ruhode - Context-based factors that influence healthcare information system implementation in resource-constrained public hospitals, Published Online : 8 Nov 2023.
4. https://onlinedegrees-sandiego-edu.
5. https://pmc.ncbi.nlm.nih.gov.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

Original Article

# योगाचे मानसशास्त्र - एक चिंतन

**डॉ. राजेंद्र जाणे**
माजी प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय,
भिसी, तह. चिमूर, जि. चंद्रपूर.
**Email**-janerajendra380@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-1705039
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5(II)|
Pp. 181-183
May 2025
**Submitted:** 12 Apr. 2025
**Revised:** 25 Apr. 2025
**Accepted:** 22 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश**

प्रत्येक व्यक्ती जीवन जगत असतांना आनंद शोधत असतो. त्यासाठी आपले आरोग्य चांगले असणे ही काळाची गरज आहे. चांगले आरोग्य ठेवण्यासाठी आपण व्यवस्थित व्यायाम, समतोल आहार आणि शांत झोप या बाबींना महत्त्व दिले पाहिजे. आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये माणसाचे जीवन खुप जलद गतीने धावते आहे. शरीराला पाहिजे तशी हालचाल होत नाही. डॉक्टर मंडळी प्रत्येकाला व्यायाम करण्यासाठी प्रवृत्त करतात. त्यासाठी आपण वेगवेगळ्या प्रकारचे व्यायाम करतो. परंतु योगाभ्यास हे असे माध्यम आहे की ज्यामुळे आपले शारीरिक नाही तर मानसिक आरोग्य सुद्धा चांगले राहते. शरीर, मन आणि बुद्धी याचा सुरेल संगम योगशास्त्रामध्ये केलेला आहे. विज्ञानाने खुप प्रगती केलेली असल्याने माणसाचे जीवन सहज व सुलभ झालेले आहे. परंतु ही प्रगती भौतिक आहे. माणुस भोगवादी जीवन जगतो आहे. त्याचा विपरित परिणाम त्याच्या व्यक्तिमत्वावर झालेला आहे. माणसाच्या गरजा खुप जास्त प्रमाणात वाढल्या आहे. माणुस अती महत्त्वाकांक्षी झाल्याने त्याचे मन वायुच्या वेगाने धावते आहे आणि अपेक्षा जर पूर्ण झाल्या नाही तर माणसामध्ये वैफल्य निर्माण होते. त्याचा आत्मविश्वास कमी होतो. त्यासाठी आपले तन आणि मन व्यवस्थित ठेवणे हे फार महत्त्वाचे आहे. मन फार चंचल आहे. जसे तलावातील पाण्यात एक दगड फेकला तर अनेक तरंग उसळतात तसंच थोडं मनाविरूद्ध झालं की, माणसाचे मन छिन्नविछिन्न होऊन जाते. बहिणाबाई चौधरी आपल्या 'मन' कवितेतून सांगतात-

“मन मोकाट मोकाट
त्याले ठायीं ठायीं वाटा,
जशा वाऱ्यानं चालल्या
पान्यावऱ्हल्यारे लाटा.”

**प्रस्तावना**

आनंद दोन प्रकारचे असतात - एक तात्पुरता आनंद व दुसरा कायमस्वरूपी आनंद. मनात आले आणि आईस्क्रिम खायची इच्छा झाली. त्याच्या सेवनाने आनंद झाला. परंतु तो आनंद तात्पुरता आहे. जे व्यवस्थित योगाभ्यास करतात त्यांना कायमस्वरूपी आनंद मिळतो. ज्याला आध्यात्मामध्ये सत्चिदआनंद म्हटलेले आहे. योगामुळे आपले जीवन आनंदमय होते. आपण स्थितप्रज्ञ होतो. योग या शब्दाचा अर्थ आहे जोडणे. आपला आत्मा परमात्म्याशी योगामुळे एकरूप होत असतो. मानसशास्त्र म्हणजे मनाचे शास्त्र. पतंजली ऋषींनी सांगितलेले आहे.

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.15819181
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*डॉ. जिजाबाई राऊत, गृहशास्त्र विभागप्रमुख, कला वरिष्ट महाविद्यालय, सावंगी, छत्रपती संभाजीनगर.*

**How to cite this article:**
*जाणे, . राजेंद्र . (2025). योगाचे मानसशास्त्र - एक चिंतन. Journal of Research & Development, 17(5(II)), 181–183.* https://doi.org/10.5281/zenodo.15819181

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

की, मनाची छिन्नविछिन्न असलेली अवस्था आपल्याला दु:ख देते म्हणून मनाचे नियंत्रण योगाभ्यासाने सहज करता येते.मनावर जे अनेक बंधने असतात ते काढुन टाकता येतात. मन योगाभ्यासाने शांत करता येते व त्याला स्थिर करून आनंद मिळविता येतो. स्वत:वर नियंत्रण आणता येते. पतंजली ऋषींनी अष्टांगयोगाद्वारे आपण कसे छान जीवन जगू शकतो याचे विवेचन केलेले आहे. त्यातील पहिल्या दोन पाय-या म्हणजे यम आणि नियम. या दोन पाय-या नैतिकता शिकवितात. त्यांनी सांगितलेल्या आठ पाय-या खालीलप्रमाणे आहे -

1) **यम** : यम म्हणजे आत्मसंयमन करणे. भावनांवर ताबा असणे होय. स्थितप्रज्ञ असणे होय. यामध्ये पतंजलींनी खालीलप्रमाणे पाच भावनांवर प्रकाश टाकलेला आहे.

अ( **अहिंसा** : हिंसा म्हणजे फक्त कुण्या प्राण्यांना किंवा मनुष्याला ठार करणेच नव्हे. विचाराने किंवा शब्दाने किंवा कृतीने कुणाला दुखावणे म्हणजे हिंसा होय. मोहनदास गांधी रोज प्रार्थना व ध्यान करतांना स्वत:ला तीन प्रश्न विचारायचे, 'मी कुणाला चुकीचे बोललो आहे काय?', 'माझ्या मनामध्ये कुणाबद्दल चुकीचा विचार आला काय?' किंवा 'मी कुणाशी चुकीचं वागलो आहे काय?' ह्या तीनही प्रश्नांची उत्तरे 'होय' असायची. मग ते परमेश्वराला सांगायचे की, यानंतर अशी चुक करणार नाही. तरीही रोज चुका होत होत्या. परंतु पुढेपुढे चुकांचं प्रमाण कमी झाले व ते खरोखर महात्मा झाले. अशाप्रकारे त्यांनी अहिंसेचं तत्व जपलं.

ब( **सत्य :** सत्याचा वापर करणे हा सद्‌गुण आहे. परंतु वास्तविक जीवनामध्ये वापरणे फार कठिण आहे. व्यापारामध्ये सत्य बाजुला ठेवले जाते. परंतु जे योगी असतात ते सत्याचे पालन करतात. एक वेळ असत्याचा वापर केल्यामुळे ते लपविण्यासाठी अनेक वेळा असत्याचा वापर करावा लागतो.

क( **अस्तेय :** अस्तेय म्हणजे चोरी करु नये. हा सुद्धा सद्‌गुण आहे. आपली जी वस्तु नाही, तिच्याबद्दलचे आकर्षण आपल्याला नसावे. लोभ व मोह आपल्याला आवरत नाही. षडरिपू आपल्याला गोंधळुन टाकतात आणि कळत नकळत आपण चोरी करायला लागतो. जेव्हा आपल्याला एखादी वस्तु प्रामाणिकपणे प्रयत्न केल्याने मिळत नाही, तेव्हा आपण कसंही करून ती वस्तु मिळविण्याचा प्रयत्न करतो. अशा वृत्तीमुळे आपण आपला आत्मविश्वास गमावतो. आपल्याला आसक्ती कमी करायची आहे. जर आपल्याला आध्यात्मिक मार्गाने शांती मिळवायची असेल, तर आपल्याला गरजा फारच कमी ठेवाव्या लागतील.

ड( **ब्रह्मचर्य :** आपण जीवन जगत असतांना बऱ्याच प्रसंगी काही व्यक्तींमुळे किंवा वस्तुंमुळे किंवा अन्य कोणत्या कारणाने संमोहित होत असतो. जर आपण साधे जीवन जगलो व कोणतीही अपेक्षा ठेवली नाही तर आपण संसारात राहून सुद्धा ब्रह्मचर्याचे पालन करु शकतो. ब्रह्मचर्य असा सद्‌गुण आहे की, त्यामुळे आपल्या मनाची एकाग्रता वाढते व आपल्याला जीवनात बरेच सकारात्मक व सृजनात्मक कार्य करता येते.

इ( **अपरिग्रह :** जीवन चांगल्या प्रकारे जगायला जास्त संपत्तीची गरज नाही. त्यामुळे आपण आर्थिक ताण येणार नाही व चांगल्या प्रकारे जगता येईल असे संतुलित जीवन जगलं पाहिजे. विनाकारण धनसंचय करु नये.

2) **नियम :** अष्टांगयोगातील नियम म्हणजे आत्मअनुशासन होय. आपण शिस्तीचे पालन करणे म्हणजे नियम होय. ह्याचे पाच प्रकार आहे.

**अ( स्वाध्याय:** अशा ग्रंथांचे वाचन केले पाहिजे ज्यामुळे तत्व कळले पाहिजे. सकारात्मकता वाढली पाहिजे. प्रामाणिकपणे अभ्यास केला तर ब्रह्मांड मीळू शकतो. असा अभ्यास आपली आध्यात्मिक प्रगती करु शकतो.

ब( **संतोष:** योगामध्ये 'समाधानाय सौख्याय' असं म्हटल्या जाते. आपल्याकडे ज्या वस्तु नाही, त्याबद्दल दु:ख करून घेऊ नये. 'आसक्ती' नसली तर आपण समाधानी राहू शकतो. 'माझ्याजवळ काय आहे', त्याचा स्वीकार करावा. समाधान हा शब्द असा आहे की, त्यामुळे मन शांत होते.

क( **शौच :** शरीराची पूर्णपणे व पवित्र वृत्तीने स्वच्छता करणे गरजेचे आहे. मनाची स्वच्छता करणे पण तेवढंच महत्त्वाचे आहे. मनामध्ये एक दिवसात 60,000 विचार येतात, त्यातले फारच कमी उपयोगाचे असतात. त्यामुळे महत्त्वाचे विचार मनामध्ये ठेवून बाकीचे अनावश्यक विचार काढून टाकणे म्हणजे मनाची स्वच्छता होय.

ड( **पावित्र्य :** आपण स्वच्छ राहून पावित्र्य ठेवणे गरजेचे आहे. आपण अनावश्यक विचार न करता पावित्र्य जपावे.

**इ( ईश्वराचे चिंतन :** परमेश्वराला समर्पण करून ईश्वराचे चिंतन करणे फार गरजेचे आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5(II) | May - 2025

3) **आसन :** ह्या पायरीमुळे शरीरावर ताबा मिळवून स्थैर्य प्रदान केले जाते. शरीराला आसनामुळे शिस्त लागते. काही आजार कमी होतात. शरीर स्थिर आणि चांगले राहते. मन शरीरावर राज्य करते. सर्व कल्पना सुरूवातीला मनामध्ये उत्पन्न होतात. नंतर त्या अस्तित्वात येतात.

4) **प्राणायम :** प्राण म्हणजे श्वास आणि यम म्हणजे नियमन. प्राणाचे नियमन करणे म्हणजेच प्राणायम. आपल्या शरीराला प्राणवायुची सतत गरज असते. लहानपणी श्वाशोस्वामार्फत भरपूर प्राणवायु आपल्या शरीराला मिळतो. परंतु कालांतराने त्याचे प्रमाण कमी होते, कारण श्वसननलिकांमध्ये अवरोध तयार होतो. प्राणायम केल्याने शरीराला भरपूर प्राणवायू मिळतो आणि आपलं स्वास्थ्य चांगलं राहते.

प्राणायम म्हणजे फक्त शारीरिक श्वसनावर नियंत्रण नव्हे तर यामुळे मनाला पण नियंत्रित करता येते. श्वासावर आपण लक्ष केंद्रित केलं तर आपलं मन शांत होते व हळूहळू आपण ध्यान करण्यासाठी तयार व्हायला लागतो.

5) **प्रत्याहार :** प्रत्याहार म्हणजे इंद्रियांवर नियंत्रण ठेवणे होय. मनाला ताब्यात ठेऊन आत्मपरिक्षण करणे म्हणजेच प्रत्याहार. ही एक मानसशास्त्रीय पद्धती आहे. ज्याद्वारे आपण आपली एकाग्रता वाढवू शकतो. बाहेरच्या गोष्टींकडे लक्ष न देता अंत:र्मुख होऊन आपल्या आतमधील निरीक्षण करून मनाला व शरीराला नियंत्रणात आणणे प्रत्याहाराने सोपे जाते.

6) **धारणा :** एखाद्या विषयावर मन स्थिर ठेवणे म्हणजे धारणा होय. यामुळे मनाला स्थिरता येते. मनाची एकाग्रता वाढते. सर्व मानसिक शक्ती, ज्या इकडे तिकडे विखुरल्या असतात, त्यांना एकत्रित करून मनाची शक्ती वाढवावी. म्हणजे आपोआपच मनाची एकाग्रता वाढेल. थॉमस अल्वा एडिसन यांनी आपली पूर्ण मानसिक शक्ती एकवटली व ती बल्बचा शोध कसा लागेल, या दिशेने विचार करण्यासाठी व तो शोध पूर्ण करण्याच्या दिशेने वापरली.

7) **ध्यान :** ध्यान म्हणजेच लक्ष. डोळे बंद करून व पाठीचा कणा ताठ ठेऊन मन शांत करण्यासाठी प्रयत्न करणे म्हणजे ध्यान होय. ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी या ग्रंथात ध्यानावर सुंदर विवेचन केलेले आहे. ते म्हणतात -

"अवधान एकले देईजे
मग सर्व सुखाशी पात्र होईजे"

यशस्वी लोकांनी आधी ध्यान केलेले आहे. यामध्ये पद्मासन किंवा मुखासनामध्ये बसुन दोन्ही डोळे बंद करावे व शांततेने श्वास घ्यावा. ध्यानाचे खुप फायदे आहे.

8) **समाधी :** सातही पायऱ्यांचा अभ्यास केल्यानंतर शेवटी समाधी पर्यंत आलो. समाधी अवस्थेमध्ये सर्व देहभान विसरून आध्यात्मिक शांती मिळविली जाते. समाधी स्थिती म्हणजे केवळ आणि केवळ आनंददायी स्थिती. या स्थितीमध्ये पूर्णपणे परमेश्वराशी योगी एकरूप होतो. वास्तव जगातील सर्व व्यवहाराचे विस्मरण होते व योगी पूर्णपणे स्वत:मध्ये तल्लीन होतात.

भगवान गौतम बुद्ध, भगवान महावीर, राष्ट्रसंत, विवेकानंद, महात्मा गांधी यांनी ध्यान साधना केली व त्यांनी मानवाला चांगला संदेश दिला.

**संदर्भ ग्रंथसूची**

1. स्वामी विवेकानंद - राजयोग - रामकृष्ण मठ, नागपूर.
2. गांधी मोहन - सत्याचे प्रयोग, नवजीवन मुद्रणालय, अहमदाबाद.
3. चौधरी बहिणाबाई - बहिणाबाईची गाणी.
4. संत ज्ञानेश्वर - ज्ञानेश्वरी.
5. Abhenananda - Yoga Psychology - Ramkrishna Vedantmath, Kolkata.